कर्नाटकातील मराठी हस्तलिखिते

डॉ. भीमाशंकर देशपांडे

तेवी रामायण लोणी जाणा।
आले घृतपण मराठी।
लोण्याहुनि लोणकढीचे।
तूप म्हणती गोडआचे।
तेवी गीर्वाण रामकथेचे।
जनांसी रुचे प्राकृत।।

राज्य मराठी विकास संस्था
मुंबई ४००००१

Karnatakatila Marathi hastalikhite

कर्नाटकातील मराठी हस्तलिखिते

कर्नाटकातील मराठी हस्तलिखितांची वर्णनात्मक सूची

Despande, Bhimasankar

डॉ. भीमाशंकर देशपांडे

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ४०० ००१.

दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास
प्रकल्प प्रकाशन क्र. ६

■

■

प्रकल्प प्रमुख व संपादक : डॉ. वसंत स. जोशी

■

प्रथमावृत्ती : ऑगस्ट १९९९

■

प्रकाशक :
प्रशासकीय अधिकारी,
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय
३ महानगरपालिका मार्ग
धोबीतलाव, मुंबई ४०० ००१.

■

अक्षरजुळणी :
एच. एम. टाईपसेटर्स
११२० सदाशिव पेठ
निंबाळकर तालीम चौक
पुणे ४११ ०३०.

■

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

■

मूल्य : १५०/- रुपये

अनुक्रमणिका

कर्नाटकातील मराठी हस्तलिखितांचे खासगी संग्रह

(अभ्यासकांच्या सोईसाठी या संग्रहांचे पत्ते व अन्य माहिती येथे एकत्र देण्यात आली आहे.)

१. देशपांडे साहित्य संशोधन संग्रह,
'विश्रामधाम', आळंद, जि. गुलबर्गा, ५८५३०२. दूरध्वनी (०८४७७) ८२२६०.
(आळंद : गुलबर्गा जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण. उत्तरेस उस्मानाबाद व पश्चिमेस सोलापूर हे जिल्हे. महाराष्ट्राचा भाग १५ कि. मी.वर गुलबर्ग्यापासून ४५ कि.मी. पुणे, सोलापूर, अक्कलकोट, लातूर, औरंगाबाद, बार्शी, तुळजापूर, नांदेड, परळी, कलंब येथून गुलबर्गा व गाणगापूरकडे जाणाऱ्या गाड्या येथूनच जातात.)

२. श्री वासुदेव महाराज मठ, आळंद
श्री नानाबुवा, दत्तात्रेय, शामराव रामदासी, आळंद ५८५३०२.

३. श्री. के. भीमसेनराव वकील, गुलबर्गा संग्रह.
इ. ३०० गाजीपुरा, गुलबर्गा.

४. श्री. पुरुषोत्तमराव नृसिंहराव नळदुर्गकर, गुलबर्गा संग्रह
११/८९ जयभवानी पथ, वरची आळी, लालगेरी, ब्रह्मपूर, गुलबर्गा इ.

५. श्री. शंकरराव सुभेदार, गुलबर्गा, ग्रंथसंग्रह.
सुभेदार वाडा, वरची आळी, ब्रह्मपूर, गुलबर्गा.

६. हुताशनानंद महाराज संग्रह
श्री. दत्तात्रेय रघुनाथ दीक्षित, बबरीची गल्ली, बिदर.
(बिदर या जिल्ह्याच्या ठिकाणी गुलबर्गा, सोलापूर, पुणे, लातूर, हुमणाबाद येथून बसेसची सोय.)

७. गोविंदराज महाराज महागाव मठ संग्रह
(गुलबर्गा-हुमणाबाद रस्त्यावर महागाव हे गाव आहे.
(गुलबर्ग्याच्या उत्तरेस अंतर ४० कि. मी. बसेसची सोय.)

८. श्री. पु. ना. तथा बाबासाहेब गुर्जर संग्रह, गुलबर्गा.
संगम अपार्टमेंट, फ्लॅट नं. ४, ऐवानशाही समोर, गुलबर्गा, २.

९. ॲड. प्रभाकरराव जहागीरदार गुलबर्गा, संग्रह.
संगमेश्वर कॉलनी, गुलबर्गा, ३.

१०. शिवराम (समर्थशिष्य) मठ, संग्रह.
अपचंद. ता. आळंद, व्हाया-महागाव जि. गुलबर्गा.

११. श्री. शिवराज कुलकर्णी संग्रह
मौजे हिप्परगा, ता. जेवरगी, जि. गुलबर्गा.
(गुलबर्गा येथून जेवरगीमार्गे बसेस जातात.)

१२. श्री. भीमाशंकर मठ, शिंदगी संग्रह
पू. सदाशिवप्पा महाराज, शिंदगी, जि. विजापूर
(गुलबर्गा-विजापूर मार्गावरील तालुक्याचे गाव.)

१३. श्री दादासाहेब मोहरीर संग्रह
अफझलपूर, जि. गुलबर्गा
गुलबर्गा-विजापूर, सोलापूर, गाणगापूर बस मार्गावर.

१४. श्री माणिकप्रभु संस्थान ग्रंथसंग्रह
पू. सिद्धराज महाराज, माणिकनगर (हुमणाबाद) जि. बिदर.
दूरध्वनी : (०८४८३) ७००४२, ७०५८५.
(मुंबई-हैद्राबाद राजमार्गावर, पुणे, मुंबई, सोलापूर, बसेस. हैद्राबादेस जाणारा मार्ग, गुलबर्ग्याहून खूप बसेस.)

१५. वे. मोहनभट अणंभट जोशी संग्रह
घ. क्र. १०-१३१ खालची आळी, ब्रह्मपूर, गुलबार्गा.

१६. श्री. माणिकराव बळवंतराव होदलूरकर संग्रह
ब्राह्मण गल्ली, आळंद, जि. गुलबर्गा ५८५३०२.

१७. वे. नारायणभट्ट रामभट्ट ग्राम जोशी संग्रह
बाहेर पेठ,आळंद, जि. गुलबर्गा.

१८. श्री. चंदुलाल पदमण्णा पंडित संग्रह
जैन गल्ली, आळंद, जि. गुलबर्गा.

१९. श्री. चिदंबर साहित्य प्रसार सभा
श्री. एस. एन्. कुलकर्णी, दोडवाड, जि. बेळगाव. ५९०००४.

२०. श्री. नानचंद अमीचंद संग्रह
मेन रोड, आळंद, जि. गुलबर्गा. ५८५३०२.

२१. श्रीपतानंद आत्मानंद मठ
श्रीपती महाराज, बगदाळ, जि. बिदर
हुमणाबाद-हैद्राबाद राजमार्गावर मन्रा-एक्केहळ्ळी बसस्थानकापासून उत्तरेस ४ मैल बिदरकडे.)

२२. वे. भालचंद्र दीक्षित संग्रह
हळीखेड (बी.) जि. बिदर
(हुमणाबाद-बिदर मार्गावर बसस्टॉप-हळीखेड फाटा.)

२३. श्री. सदानंद मठ कल्याणी ग्रंथसंग्रह
बसवकल्याण, जि. बिदर
हुमणाबादेपासून १६ कि. मी. बसमार्गे ईशान्येस.)

२४. वे. रमाकांत दादा दीक्षित संग्रह
घर नं. ३-२-११४, ब्राह्मण वाडी, चौबारा, बिदर.

२५. श्री. लक्ष्मीकांतराव आणि आबाराव कुलकर्णी संग्रह
(सरस्वती गंगाधराचा वंश.)
मौ. कडगंची, ता. आळंद, जि. गुलबर्गा
(आळंद-गुलबर्गा रस्त्यावर)

२६. वे. राजमणी दीक्षित मुंडगेरी संग्रह
घर नं. ४-२-१५०, चौबारा, बिदर.

२७. डॉ. चंद्रशेखर कपाळे संग्रह

'शिवरत्न', १०/२-३६ एस्. बी. कॉलेजपथ,

गुलबर्गा ५८५१०३. दूरध्वनी : (०८४७२)२२६३४

२८. श्री. पंतमहाराज बाळेकुंद्री संस्थान

श्रीक्षेत्र बाळेकुंद्री, जि. बेळगाव ५९११०३

(दूरध्वनी : (०८३१) ४१८२४७

२९. आत्माराज महाराज मठ, जहिराबाद (एक्केहळ्ळी)

नारायण नृसिंह रामदासी, रामण्णा पेठ,

जहिराबाद, जि. बिदर ५०२२२०

३०. श्रीसमर्थ मठ. निलंगा. (लातूर)

(आज निलंगा समर्थ मठ महाराष्ट्र सीमेत आहे.)

३१. संकीर्ण भाग :

अनेक ठिकाणी तुरळक ग्रंथ लाभले. ती संख्या बरीच आहे. त्या ग्रंथांच्या विवरणात खालच्या भागात यजमान व प्राप्तीस्थान यांचा निर्देश केला आहे. हा भाग विखरून आलेला आहे.

श्रेयनामावली

येथील मराठी हस्तलिखित ग्रंथांची नोंद करते वेळी ग्रंथाच्या प्राप्तिस्थानातील मठ, मंदिर व यजमान यांचे बहुमोल साह्य झाले. तो ऋणनिर्देश आवर्जून करावा लागेल.

आळंद : सर्वश्री – डॉ. योगेश्वर देशपांडे, दत्तात्रय व शामराव शंकरबुवा रामदासी मठ, माणिकराव हादेलूर, नारायण भट, रामभट ग्रामजोशी, चंदुलाल पंडितजी, डॉ. प्र. ना. शहा, डॉ. आपटे, दत्ताबुवा मठ अपचंद (रामदासी), लक्ष्मीकांतराव, आंबाराव, कुलकर्णी, कडगंची पू. बालस्वामी कौलगा.

गाणगापूर : सर्वश्री – वे. भीमभट्ट चिंतामणभट पुजारी, वे. वामन भीमभट्ट पुजारी, पिंगळे, गुरुनाथराव कुलकर्णी, दत्तात्रेय शंकरभट पुजारी, कमलाकर भीमभट्ट पुजारी, शिवराम गुरुभट्ट पुजारी, श्रीमती कुलकर्णी, सिद्नाळ.

गुलबर्गा : सर्वश्री – शंकर नरहर सुभेदार, के. अप्पाराव वकील चितापूर, पुरुषोत्तमराव नळदुर्गकर, बाबासाहेब गुर्जर, प्रभाकरराव जहागीरदार, वे. मोहन भटजी जोशी, शिवराम कुलकर्णी हिप्परगा, बाळासाहेब महाराज महागाव मठ, दादासाहेब मोहरीर अफझलपूर, डॉ. र. वि. जोशी, डॉ. चंद्रशेखर कपाळे.

विजापूर : सर्वश्री – द्यावपया काखंडकी कीर्तनकार, पू. सदा शिवयप्पा महाराज शिंदगी मठ.

बेळगाव : सर्वश्री – डॉ. मधुकर कुलकर्णी, बेळगाव, एस. एन. तथा बाबूराव कुलकर्णी दोड्डवाड.

बिदर : सर्वश्री – पू. सिद्धराज महाराज व ज्ञानराज महाराज माणिकनगर, दत्तात्रेय रघुनाथ दीक्षित बिदर, वे. भालचंद्र दीक्षित हळीखेड (बी), श्रीपती महाराज मठ, बगदाळ. गोविंदराव, बगदाळ, मातोश्री सेवेकरी, सदानंद, मठ कल्याणी, वे. रमाकांत दादा दीक्षित बिदर, शिवराम दीक्षित जहिराबाद, दक्षिणामूर्ती दीक्षित कोहीर, वे. राजमणि दीक्षित बिदर.

विविध मठ मंदिरे व व्यक्तिगत संग्रहातील ग्रंथ याबद्दल सूची करताना सहृदयतेने साह्य करणारे सर्वश्री : विजय अनंत चिटगोपेकर, भालचंद्र कुलकर्णी, आळंद, विठ्ठलराव माहेरीर, प्रा. इंदू देशपांडे, गुलबर्गा, नृसिंह दीक्षित हळीखेड, जगन्नाथराव महागाव, दिवाकर जोशी बिदर, सिद्धारूढ मुत्रोळी ॲडव्होकेट, आळंद, जयवंत कुलकर्णी मांजरीकर, संदीप आणि महेश देशपांडे, आळंद. आराध्ये आळंद. ॲड. पुरुषोत्तम आपटे आळंद, श्री जगन्नाथराव कोथळीकर, आळंद. नारायण रामदासी आत्मारामठ जहिराबाद गणपती दीक्षित. शंकरराव देशपांडे, हैद्राबाद. शामाचार्य व भीमाचार्य अर्थक सन्नती. डॉ योगेश्वर देशमुख, महागांव, कल्याणराव देशपांडे, मडकी गुलबर्गा.

निवेदन

'दक्षिण भारतातील मराठी साहित्याचा इतिहास' या राज्य मराठी विकास संस्थेच्या संशोधन प्रकल्पाचा निम्मा भाग १९९८ मध्ये पूर्णतेस गेला. त्यानंतर त्यापैकी उरलेला, आंध्र-कर्नाटकाशी संबंधित असलेला निम्मा भाग आम्ही हाती घेतला (१९९९). या भागामध्ये दोन सूची प्रकाशित होणार आहेत. त्यांपैकी एक आहे, कर्नाटकातील मराठी हस्तलिखितांची आणि दुसरी आहे, हैद्राबाद येथील मराठी हस्तलिखितांची. त्यानंतर अभ्यासाची ही साधने समोर ठेवून जाणकार अभ्यासक एकेका वाङ्मयप्रकारातील नव्याने उपलब्ध झालेल्या लेखनाचा परामर्श घेणारे लेखन सिद्ध करतील. त्यांच्या कामाला थोडा प्रारंभही झालेला आहे. पूर्वीच्या अनुभवावरून असे वाटते की, हा उर्वरित भागही ते दोन वर्षांत पूर्ण करून वाचकांच्या हाती ठेवतील.

ही सूची गुलबर्गा येथील एक ज्येष्ठ अभ्यासक डॉ. भीमाशंकर देशपांडे यांनी तयार केलेली आहे. पारंपरिक, सांप्रदायिक जीवनाचा त्यांना जो घनिष्ट अनुभव आहे तो आम्हांला या वेळी फार उपयुक्त ठरला आहे. मी डॉ. देशपांडे यांचे त्यांच्या बहुमोल कार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानते.

डॉ. वसंत स. जोशी हे त्यांची प्रकल्प-प्रमुखाची जबाबदारी समर्थपणाने पार पाडून राज्य मराठी विकास संस्थेला सहकार्य करीत आहेत. डॉ. जोशी व डॉ. देशपांडे यांच्या परिश्रमातून पुढील काळात प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे लेखन अधिक समृद्ध होण्यास हातभार लागलेला असेल, असा विश्वास मला वाटतो.

राज्य मराठी विकास संस्था **सरोजिनी वैद्य**

१ मे १९९९

कर्नाटकातील मराठी हस्तलिखिते

(विवरणात्मक सूची)

● विवरणातील संक्षेपांचा खुलासा ●

आकार	:	आ.
पृष्ठे	:	पृ.
पाने	:	पा.
ओव्या	:	ओ.
प्रत्येक पानात ओळी	:	प्र. पा. ओ.
अध्याय	:	अ.
त्रुटित	:	त्रु.
संपूर्ण	:	सं.
सेंटीमीटर	:	सें.
प्रकरण	:	प्र.
श्लोक	:	श्लो.
ग्रंथ पहावयास मिळाला नाही	:	ग्रं. पा. मि. ना.
केवळ ग्रंथाची अधिकृत नोंद पाहून	:	के. ग्रं. अ. नों. पा.

पृष्ठसंख्या × २ = पाठोपाठ दुप्पट पाने

कर्नाटकातील मराठी हस्तलिखिते

'दक्षिण भारतातील मराठी हस्तलिखितांची सूची' आणि 'दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास' हा प्रकल्प आम्ही राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने १९९४ मध्ये हाती घेतला. गेल्या चार वर्षांत या प्रकल्पातून 'त्रिवेंद्रम, मद्रास व तंजावर येथील मराठी हस्तलिखिताची' सूची आणि 'तंजावर खंड' हे चार ग्रंथ सिद्ध होऊन प्रसिद्धही झाले. दक्षिणेकडील टोकाच्या भागातील मराठी वाङ्मयाचा मागोवा घेत आम्ही आता आंध्र-कर्नाटक प्रदेशाकडे वळलो आहोत. या प्रदेशातील मराठी हस्तलिखितांच्या सूची व वाङ्मयेतिहास प्रसिद्ध झाल्यानंतर या प्रकल्पाचे काम पूर्ण होईल. त्यापैकी कर्नाटकातील मराठी हस्तलिखितांची वर्णनात्मक सूची आम्ही सादर करीत आहोत.

दक्षिणेतील मराठी हस्तलिखित संग्रह

त्रिवेंद्रम, मद्रास (चेन्नई) आणि तंजावर येथील मराठी हस्तलिखितांचे संग्रह सुस्थितीत आहेत. तेथील शासन आणि विद्यापीठ या संग्रहाच्या जोपासनेचे कार्य करीत असतात. हस्तलिखितांची सुरक्षितता, व्यवस्था, त्यांचे संशोधन आणि प्रकाशन यांसाठी आवश्यक ती शासकीय यंत्रणाही त्यांनी उभी केली आहे. अनेक अभ्यासक व संशोधक या संग्रहांचा लाभ घेत आले आहेत. केंद्र आणि राज्य सरकार या संग्रहांसाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देत असतात. त्यासाठी भव्य इमारती आणि वातानुकूलित विभाग, मायक्रोफिल्मिंग, झेरॉक्सिग यांसारख्या आवश्यक सोईही करण्यात आल्या आहेत. या ठिकाणी मराठी हस्तलिखितांचे मोठे संग्रह अस्तित्वात येण्यासाठी तंजावरचे राजे शरफोजी, त्रावणकोरचे राजे श्रीमूलम् तिरुनाल यांसारखे विद्याकलांचे चाहते व पुरस्कर्ते राजे आणि कर्नल मेकेन्झीसारखे जिज्ञासू इंग्रज प्रशासक यांचे धन, श्रम आणि प्रेरणा कारणीभूत आहे. हे तिघेही वाङ्मयाभ्यासक आणि रसिक वाचक होते. त्यामुळे वरील तीनही ठिकाणी असणारे मराठी हस्तलिखितांचे संग्रह सुसज्ज स्थितीत असल्याचे दिसून येते. कर्नाटकात मात्र मराठी हस्तलिखितांचा एकत्रित संग्रह असलेली एखादी संस्था अस्तित्वात नाही. त्यामुळे या भागातील आज उपलब्ध होणारी हस्तलिखिते मठ, मंदिरे यांच्या आश्रयाने किंवा धनिक, रसिक वा धार्मिक सद्‌गृहस्थांच्या निवासस्थानी विखुरलेल्या स्वरूपात उपलब्ध होतात.

उत्तर कर्नाटकाच्या सीमावर्ती भागात असे लहान मोठे व्यक्तिगत संग्रह आहेत. ठिकठिकाणी असणारे असे संग्रह अनास्था, दुर्लक्ष आणि द्रव्याभाव यांमुळे नष्ट होत चालले आहेत. त्यांची नोंद किंवा सूची करणारे जाणकार अभ्यासकही मिळणे कठीण होत आहे. तंजावर, मद्रास, त्रिवेंद्रम इ. ठिकाणच्या सुव्यवस्थित संग्रहासारखे संग्रह अन्यत्र नाहीत. त्यामुळे हस्तलिखितांची माहिती व उपलब्धी यांची मोठी समस्या अभ्यासकांपुढे उभी राहते. अशा स्थितीत डॉ. भीमाशंकर देशपांडे यांनी 'कर्नाटक सूची' सिद्ध करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे आणि घेतलेल्या परिश्रमांचे मोल विशेष आहे. डॉ. देशपांडे यांचा मध्ययुगीन मराठीचा विशेष अभ्यास आहे. शिवरामस्वामींच्या साहित्याचा अभ्यास करून त्यांनी पीएच. डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांचे संशोधनपर अनेक लेख व पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. कर्नाटकातील गाणगापूर, शिंदगी, सन्नती इ. अनेक मठांशी विश्वस्त म्हणून त्यांचा संबंध आहे. त्यांच्या लोकसंग्रह आणि लोकसंपर्कामुळे

त्या व्यक्ती आणि संस्था यांचा विश्वास संपादन करून त्यांनी प्रस्तुतची सूची तयार केली आहे. अर्थात या हस्तलिखितांची ही एकत्र सूची अभ्यासकांना उपलब्ध झाली, तरी त्यांच्या अभ्यासासाठी त्यांना या संग्रहकर्त्यांकडे जावे लागणार आहे. प्रस्तुत सूचीच्या संदर्भात ज्येष्ठ संशोधक डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांनी डॉ. देशपांडे यांना पाठविलेल्या दि. ११.११.९७ च्या पत्रात म्हटले आहे, 'मुळात सामग्री विविध स्वरुपाची आहे. या अनेक क्षेत्रात पारंगत असलेला संशोधकच हे काम हाती घेऊ शकेल... या एकूण सामग्रीच्या आधाराने तुमच्या परिसराचा सांस्कृतिक इतिहास उत्तमप्रकारे सिद्ध होऊ शकतो. सुमारे दहाव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंतच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील विविध अंगांचा शोध या हस्तलिखितांच्या आधाराने घेता येईल. ऐतिहासिक कार्यपरंपरेमुळे भारतीय संस्कृतीचे संगोपन, संवर्धन करण्याची ऐतिहासिक कामगिरी या परिसराने पार पाडलेली आहे. निरनिराळे पंथ, परंपरा आणि बाडे यांतून ज्या प्रकारच्या साहित्याचा संग्रह झालेला आहे, त्या सामग्रीचे विश्लेषण केले असता असा निष्कर्ष अगदी साधार काढता येतो.'

कर्नाटक सूचीचे वेगळेपण

तंजावर, मद्रास येथील हस्तलिखितांपेक्षा प्रस्तुत कर्नाटकातील हस्तलिखितांच्या संग्रहांचे आणखी एक वेगळेपण आहे. तंजावर हे मराठ्यांचे दक्षिणेतील स्वतंत्र राज्य होते. गरज, आवड आणि अशा निर्मितीला असणारे राज्यकर्त्यांचे प्रोत्साहन यामुळे तेथे मराठी भाषेत विपुल आणि विविध प्रकारची रचना झाली. नृत्यनाट्यानुकूल संगीत रचनाही झाल्या. तंजावरच्या मराठी राजांची नाटकेही प्रसिद्ध आहेत. समर्थ सांप्रदायिक मठातून सांप्रदायिक स्वरुपाची रचना झाली आणि शाहिरी साहित्याचे दालनही तत्रस्थ कवींनी संपन्न केले. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, मुक्तेश्वर अशा महाराष्ट्रीय कवींचे ग्रंथ 'सरस्वती महाला'त उपलब्ध आहेत. पण तेथील संग्रहातील बव्हंश रचना तंजावरच्या कवींनीच केलेल्या आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे. त्रिवेंद्रम संग्रहातील हस्तलिखितात तंजावरस्थ कवींच्या रचनांचा भरणा अधिक आहे. चेन्नई (मद्रास) येथील संग्रह कर्नल मेकेन्झीसारख्या ज्ञानपिपासू प्रशासकाच्या अविरत परिश्रमांतून सिद्ध झाला आहे. त्यामुळे त्याच्या संग्रहात ऐतिहासिक बखरी, कैफियती आणि पत्रव्यवहार यांचा समावेश आहे. काही आख्यानकाव्ये, जैनधर्मीय रचना आणि मराठी व्याकरणावरील ग्रंथही त्यात आहेत. पण त्यांची संख्या अल्प स्वरुपाची आहे. कर्नल मेकेन्झी हा राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रातील अधिकारी असल्यामुळे त्या क्षेत्राशी निगडित असे ग्रंथ त्याने गरज आणि आवड या पोटी संग्रहित करणे स्वाभाविक म्हणावे लागेल.

कर्नाटक सूचीतील हस्तलिखिते विखुरलेल्या ठिकाणची आहेत. त्यामुळे त्यांच्यात विषयांची विविधता आहे. त्यांचे कर्तेही विविध संप्रदायांचे आहेत. तरीही या सर्वांतील अंतःसूत्र अध्यात्माचे आहे. अध्यात्म हे क्षेत्र मध्ययुगात राजकारण वा सत्ताकारण यांपासून मुक्त होते. त्यामुळे तद्विषयक नव्या विचारांचे प्रवर्तन, खंडन-मंडन यांसारख्या बौद्धिक प्रक्रिया ग्रंथरूपात साकार झाल्या आहेत. सामराजाच्या 'रुक्मिणीहरण' सारख्या काव्यात अशा वादविवादांचे उल्लेख सापडतात. या काळात धर्मकारणास प्राधान्य असल्यामुळे संप्रदायाधिष्ठित वाङ्मय विपुल प्रमाणात निर्माण झाले व परंपरेने ते पुढे चालत राहिले. लौकिक स्वरुपाची रचना जरी झाली असली, तरी तिला संप्रदायाचे अधिष्ठान नसल्यामुळे तिची जोपासना संवर्धन आणि प्रसारण यांना मर्यादा पडलेल्या दिसतात. कर्नाटकातील हस्तलिखितांचा विचार करता तेथील बव्हंश वाङ्मय हे कोणत्या ना कोणत्या संप्रदायाशी निगडीत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त व समर्थ या प्रमुख धर्मसंप्रदायातील रचना तर त्यात आहेतच, पण या भागात प्रभावी असलेल्या शैव आणि वैष्णव संप्रदायांच्या वाङ्मयाबरोबरच आनंद, चैतन्य, नागेश, सकलमत, अवधूत आणि सूफी इ. संप्रदायातील रचनाही विपुल प्रमाणात आढळतात. त्यामुळे कर्नाटकातील मराठी हस्तलिखितांचे वेगळेपण जाणवते. सैद्धान्तिक मतभिन्नता असली तरी तिचा परिणाम सामाजिक जीवनावर झाल्याचे दिसून येत नाही. सकलधर्मसमभावाचे जीवन ही माणसे नकळत जगत होती. वाङ्मयेतिहास हे आपल्या सांस्कृतिक इतिहासाचेच एक अंग असते. संस्कृतीच्या वेगवेगळ्या छटांचे दर्शन

वाङ्मयातूनही घडते. तिथला भौगोलिक परिसर, विचारधारा, राजकीय व अन्यपरंपरा यांमुळे भारताच्या वेगवेगळ्या प्रदेशात निर्माण झालेल्या मराठी वाङ्मयातही त्यांचे प्रतिबिंब पडल्यामुळे त्यांना एक प्रादेशिक वेगळेपण लाभले आहे.

आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र यांच्या सीमाप्रदेशातील मराठी भाषेत परस्परांच्या शब्दविशेषांचा, वाक्यरचनेचा संकर झालेला आहे. गुलबर्गा, बिदर या भागातील उर्दू आणि कन्नड भाषा आणि विजापूर, बेळगाव, धारवाड या भागातील कन्नड भाषा यांच्या प्रभावामुळे तेथील मराठी भाषेला एक संमिश्र स्वरूप आणि शैलीला एक वेगळा ढंग प्राप्त झाला आहे. विशेषतः आधुनिक काळातील व्यवहारात त्याचे वेगळेपण लक्षात येण्याइतके जाणवते. या सीमावर्ती भागात ज्यांची कौटुंबिक भाषा कन्नड होती, त्यांचे व्यापारादि क्षेत्रातील जमाखर्च आणि व्यवहार मराठी भाषेत परवा परवापर्यंत चालत. आजही या दोन भाषा व्यवहारात प्रचलित आहेत. त्यामुळे कर्नाटकातील मराठी व कन्नड भाषांतील ग्रंथांची लिपी उभय भाषक व्यक्तींच्या परिचयाची असावयाची. प्रस्तुत सूचीतील कित्येक मराठी ग्रंथ कन्नड लिपीत, तर कन्नड ग्रंथ मराठी बाळबोध लिपीत आढळतात, यामागे त्यांच्या वाचकांचे द्विभाषिकत्व हेच कारण असले पाहिजे. कर्नाटकातील वारकरी संप्रदायाचे अनुयायी एकादशीस भजन करतात, त्यातील सर्व रचना मराठीत असतात. त्यांनी त्या मुळातून वाचलेल्या नसतात. मौखिक परंपरेतून त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत पोचतात. आजही असे दृश्य या सीमा प्रदेशात अनुभवावयास मिळते. अध्यात्माच्या क्षेत्रात भाषाभेद आडवे येत नाहीत याची जाणीव त्यामुळे होते. 'शरण बसवेश्वर चरित्र' या ग्रंथातील या भाषासमस्येविषयीचा उल्लेख या संदर्भात महत्त्वाचा आहे. कवी म्हणतो, 'जरी देश कानडी। परी मराठी लेखन मोडी। ऐसी पाहुनी परवडी। ग्रंथ बिरडी घातला पै।।४।। येथिलिया देशी जाण। सर्वचि मराठी लेखन। उदीम व्यापार कुलकरण। मराठी लागून लेख पै।।५।। येथील देशाचे जन। तया कर्नाटक लिपीचे स्वप्न। मग ग्रंथ कर्नाटकीत लेहुन। काय प्रयोजन असे जी।।६।। ग्रंथ जरी कानडीत लिहावा। तरी तो कोणी पै वाचावा।। ऐसा विचार आणुनी बरवा। जनसेवा आरंभली।।७।। संस्कृत-मराठी ग्रंथ रचनेच्या वादाचाही विचार शिवरामस्वामीसारख्या कवींनी केला आहे. त्यांनी त्यांच्या 'अध्यात्म रामायण' या ग्रंथात म्हटले आहे, 'तेवी रामायण लोणी जाणा। आले घृतपण मराठी। लोण्याहुनि लोणकढीचे। तूप म्हणती गोड साचे। तेवी गीर्वाण रामकथेचे। जनांसी रुचे प्राकृत।।१०९।।'

प्रस्तुत कर्नाटक सूचीत सुमारे चौदाशे मराठी हस्तलिखितांचा परिचय करून देण्यात आला आहे. यात उपरोक्त संप्रदायातील ग्रंथांचा समावेश आहे. त्यात वेदान्त, उपनिषदे, धर्मशास्त्र, वैद्यक-ज्योतिष इ. शास्त्रे, अश्वपरीक्षा, कथा, व्रतकथा, कहाण्या, पदे, स्तोत्रे, अभंग, आरत्या, विपुल चरित्रात्मक ग्रंथ, मध्वानुयायी द्वैत वैष्णव ग्रंथ, गीता-भागवतावरील भाष्यग्रंथ, रामायण-महाभारत यांवरील रचना आहेत. करीना, कुळकटी, कैफियती, वंशावळी, निवाडापत्र इ. ऐतिहासिक स्वरुपाच्या रचना आहेत. चरित्रात्मक ग्रंथांची विपुलता आहे. द्वैतमताधारित मराठी वैष्णव ग्रंथांची उपलब्धी हे या सूचीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. नागेश संप्रदायातील अनेक ग्रंथांचा आढळ येथे होतो. सकलमत संप्रदायातील रचनेचा विचार या सूचीमुळे वाङ्मयेतिहासात प्रथमच होणार आहे. विविध व्रते, क्षेत्रे, ग्रंथ यांवरील महात्म्य ग्रंथ येथे आहेत शोधयात्रेत उपलब्ध झालेल्या काही संस्कृत ग्रंथांचीही नोंद करण्यात आली आहे.

मराठी भाषेच्या अस्तित्वाच्या खुणांचा शोध घेत आपण कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथील श्री गोमटेश्वराच्या मूर्तीपाशी पोचतो. त्याच्या चरणाशी असलेल्या मराठी भाषेतील दोन गद्य वाक्यांवर आपली नजर खिळते आणि मन सुखावते. 'श्री चावुण्डराये करवियले। श्री गंगराये सुत्ताले करवियले' अशी ही दहाव्या शतकातील मराठी वाक्ये आहेत. तीर्थयात्रेसाठी येणाऱ्या मराठी जैन यात्रेकरूंच्या माहितीसाठी ती कोरलेली आहेत. जैन धर्मियांच्या मराठी वाङ्मयाचा शोध आणि संशोधन या भागात व्हावयास हवे. प्रस्तुत सूचीत अशा जैनधर्मीय मराठी हस्तलिखितांचा परिचय आपल्याला होतो आणि अधिक संशोधनासाठी प्रेरणाही मिळते. शिवरामस्वामी कल्याणीकर हा या भागातील महत्त्वाचा कवी आहे. त्याची विपुल ग्रंथरचना उपलब्ध आहे. 'गुरुचरित्र' या दत्तसंप्रदायाच्या धर्मग्रंथाच्या अनेक प्रती या भागात मिळतात. गाणगापूर, हुमणाबाद, कल्याणी अशी धर्मस्थाने या भागात आहेत. ज्ञानेश्वरांच्या कर्नाटकातील नाथपरंपरेचा

परिचय या सूचीतील ग्रंथातून होतो. विजापूर जिल्ह्यातील शिंदगी येथे श्री नरसिंह सरस्वती परंपरेशी संबंधित श्री भीमाशंकर मठ आहे. ज्ञानेश्वरांची नाथपरंपरा कर्नाटकात चालविणारा मठ होय. आदिनाथ-गोरक्ष-गहिनी-निवृत्ती-ज्ञानेश्वर-सोपान-मुकुंद अशी ही परंपरा आहे. या परंपरेचा गाणगापुराशी असलेला संबंध लक्षात घेता 'गुरुचरित्र' या ग्रंथाच्या प्रारंभी सरस्वती गंगाधराने 'ज्ञानदेवा जी मज' असा केलेला उल्लेख ज्ञानदेवांशी संबंधित असल्याचा डॉ. देशपांडे यांचा तर्क संभाव्य वाटतो. असा उल्लेख असलेली ही एकच प्रत असून अन्य प्रतीत 'ज्ञान द्यावे जी मज' असा पाठभेद आहे. मुकुंदराजाच्या 'परमामृत या ग्रंथाची श. १७२१ मधील तंजावरी प्रत आळंद येथे उपलब्ध होते. ही माहिती या भागाचा तंजावरशी असणारा संबंध सूचित करते. मुकुंदराजाशी संबंधित कर्नाटकातील 'मुडलगी परंपरे'चा परिचय डॉ. पंडित आवळीकर यांनी ग्रंथरूपाने करून दिला आहे. या भागात मराठी लेखन करणाऱ्या ग्रंथकारांत भीमराज जगदीश, बहिरोपंत मांडवेकर, सोनेश्वर, पांडुरंग गोटूर, राघो व्यंकटेश, कृष्णदास (चैतन्य संप्रदाय), कृष्णदास बैरागी, खंडेराव, हनुमदात्मज, लिंगणभट, भानजी, विक्रम पंडित, गोविंदराय, अनंतात्मज अशा मराठी वाचकांना नवीन वाटणाऱ्या कवींचा परिचय या सूचीत होतो.

कर्नाटक राज्यात मराठी हस्तलिखिते असण्याची शक्यता असलेल्या कित्येक ठिकाणी आम्ही चौकशी केली, पण एक तर तेथे हस्तलिखिते नाहीत आणि असलीच, तर संस्कृत भाषेत असल्याचे कळले. सर्व ठिकाणी जाऊन शोध घेणे, टिपणे करणे हे एका व्यक्तीच्या आवाक्यातील काम नव्हे. त्यामुळे ही सूची म्हणजे कर्नाटकातील सर्व ठिकाणच्या मराठी हस्तलिखितांची सूची असा आमचा दावा नाही. डॉ. भीमाशंकर देशपांडे यांचा स्वतःचा संग्रह आणि अन्य ठिकाणचे व्यक्तिगत आणि मठमंदिरे यांतील संग्रहांच्या शक्य त्या ठिकाणांचा धांडोळा डॉ. देशपांडे यांनी घेतला. या प्रयत्नांतून मिळालेली माहिती आम्ही अभ्यासकांना उपलब्ध करून देत आहोत. त्यातील मर्यादांची जाणीव आम्हाला आहे. ही सर्व हस्तलिखिते एकत्र नसल्याने त्या त्या संग्रहातील ग्रंथक्रमांक वेगळे असू शकतात. अभ्यासकांनी या हस्तलिखितांच्या अभ्यासासाठी त्या त्या संग्रहकर्त्यांशी पत्रव्यवहार करून माहिती व परवानगी घ्यावी. या संग्रहांचे पत्ते व माहिती अन्यत्र दिली आहे.

डॉ. भीमाशंकर देशपांडे यांनी पूर्वी काही हस्तलिखितांची सूची 'मराठी संशोधन पत्रिके'त प्रसिद्ध केली होती. आमच्या प्रकल्पासाठी इतर बऱ्याच ठिकाणी जाऊन, माहिती घेऊन ही सूची त्यांनी सिद्ध केली. त्यांच्या या सहकार्याबद्दल आम्ही त्यांना मनःपूर्वक धन्यवाद देतो व त्यांचे आभार मानतो.

आमच्या प्रकल्पातील हैदराबाद येथील हस्तलिखितांची सूचीही लवकरच प्रसिद्ध होईल. अनुषंगाने आंध्र-कर्नाटक वाङ्मयेतिहास खंडाच्या लेखनाचे काम सुरू आहे. तो प्रसिद्ध होताच आम्ही हाती घेतलेल्या प्रकल्पाचे काम पूर्ण होईल. हे सर्व परिश्रमाचे, सोशिकतेचे काम आहे. ते करीत असताना कष्ट तर होतेच, पण काही वेळा नाउमेदीचेही प्रसंग येत. अशा सर्व प्रसंगी राज्य मराठी विकास संस्थेच्या संचालक डॉ. सरोजिनी वैद्य यांचे संपूर्ण सहकार्य व मार्गदर्शन लाभत राहिले. मी त्यांचा आणि राज्य मराठी विकास संस्थेचा अत्यंत आभारी आहे. ही सूची सिद्ध करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात व्यक्तींचेही मी आभार मानतो. एच. एम. टाइपसेटर्स (पुणे) चे श्री. हेमंत जोशी यांनी सर्व सूचींच्या मुद्रणाचे थोडे कष्टाचे काम नेटकेपणाने केले. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

दि. १ मे १९९९

– डॉ. वसंत स. जोशी

१२४ महात्मा गृहरचना संस्था,
गांधी भवनजवळ, कोथरूड,
पुणे ४११०२९.

॥ श्रोतीं ऐकावे निश्चल ॥

आजच्या कर्नाटक राज्यात प्रांतरचनापूर्व काळातील हैद्राबाद राज्याचे गुलबर्गा, बिदर, रायचूर हे जिल्हे आणि मुंबई इलाक्यातील बेळगाव, धारवाड, विजापूर आणि कारवाड असे चार जिल्हे यांचा समावेश आहे. या दोन राज्यांतील या भागांना हैद्राबाद - कर्नाटक आणि मुंबई - कर्नाटक असे म्हटले जाते. या भागात मध्ययुगीन मराठी वाङ्मय विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. त्याहून अधिक प्रमाणात संस्कृत वाङ्मयाचे संग्रह या भागात आढळतात. मराठी वाङ्मयाचा सर्वांगीण इतिहास लिहिण्याचा झाल्यास उत्तर कर्नाटकातील या मराठी ग्रंथ संपदेचा विचार आवश्यक आहे.

थोडा पूर्वेतिहास

या सीमा प्रदेशात अनेक शतकांपासून मराठी ग्रंथरचना होत आलेली आहे. ते सर्व साहित्य अनेक मठ, मंदिरे, लेखक, कवींचे वंशज यांच्याकडे आपला परामर्श घेणारा कधीतरी, कुणीतरी भेटेल म्हणून तग धरून आहे. परंपरेने या विभागात जोपासलेली ही रचना व ते ग्रंथ, गंध, फुले वाहून पूजेत असणारे व वर्षात एक दिवस पूजले जाणारे आहेत. या भावनेतून पण शतकानुशतके ही संपदा जोपासली गेली आहे. या रचनेत ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेच्या वैशिष्ट्यांसह आनंद, चैतन्य, दत्त, वारकरी, रामदासी, नागेश, वीरशैव इ. संप्रदायांचे साहित्य आढळते.

मराठीचा जन्म मराठवाड्यात झाला. तिचा विकास पश्चिम महाराष्ट्र भागात झाला; पण ती मध्यंतरीच्या काळात या भागातून रांगत गेली याचा प्रत्यय येतो. म्हणूनच सांस्कृतिकदृष्ट्या या उत्तर कर्नाटकाचे वैशिष्ट्य अनन्यसाधारण ठरणारे आहे.

माझे आजोबा (कै.) कल्याणराव देशपांडे आणि (कै.) धोंडोपंत देशपांडे यांचा संशोधनाचा व्यासंग होता. त्यांचे स्नेही सर्वश्री म. म. दत्तो वामन पोतदार, सरदार गं. ना. तथा आबासाहेब मुजुमदार, शंकर श्रीकृष्ण देव, आबा चांदोरकर, कोशकार केतकर आणि दाते, ग. ह. खरे, कर्नाटकातील डॉ. पांडुरंग भीमराव देसाई, कपटराळ किशनराव यांच्या साह्याने त्यांनी या परिसराचा इतिहास इ.स पू. ५०० वर्षांपासूनचा लिहिला आहे. काही तुरळक ग्रंथसंग्रहांची नोंद यादीसह त्या काळी केलेली आहे. या भागातील बरेच ग्रंथ धुळे व अन्यत्र गेले आहेत. निजाम राजवटीत हैद्राबाद राजधानी होती. कल्याणी परिसरातील बरेच ग्रंथ तेथे गेलेले आहेत. ग्रंथ अभ्यास व नोंद ही चळवळ हैद्राबाद मुक्तीनंतरचीच आहे. त्यापूर्वी असे हे कार्य निजामी प्रशासनात रोषास कारण ठरणारेच होते. हा संशोधनाचा वारसा माझ्या आजोबांपासून मला लाभला. आम्ही परगण्याचे देशपांडे, म्हणजे परंपरेने रेकॉर्ड जोपासनेच्या अधिकृत कामावरचे वतनदार, त्यामुळे परिसरातील अन्य सारा इतिहास व कागदपत्रे उर्दू, मोडी लिपीतून आजही सुव्यवस्थित ठेवलेली आहेत. ती वानगीही दिली आहे. संशोधन कार्याबद्दल एक संहिताच (कै.) शंकर श्रीकृष्ण देव यांनी रामदास-रामदासीमधून दिली आहे,[१] त्या आधारेच मी या विषयाचे विवेचन मराठी संशोधन पत्रिकेत केले आहे.[२] मराठी हस्तलिखित संशोधनाचाच तो अंक होता. या कार्यातील प्रत्यक्ष अनुभव मी गेल्या ३०-३५ वर्षांत घेतलेला आहे. त्याबद्दलच्या काही गोष्टींची नोंद करणे अगत्याचे वाटते.

ग्रंथ नकलून घेण्याकरिता एका संशोधकांना एका मठास मी ओळखपत्र दिले. बरीच हस्तलिखिते त्यांनी नेली. एका मान्यवर विद्यापीठाचे कार्यकर्ते म्हणविणाऱ्या लोकांनी शेवटी ग्रंथाचा अपहारच केला. अभ्यासाकरिता महिन्याच्या हमीने नेलेल्या ग्रंथाचा प्राध्यापक मित्राने अपहार करावा, पुढे साधे पत्राचे उत्तरपण त्यांना देणे अगत्याचे वाटले नाही. नंतर अनेक सबबी दाखवीत सावरासावर करावी, या गोष्टी खचितच मन व्याकुळ करणाऱ्या आहेत. तो पत्रव्यवहार मी सांभाळून ठेवला आहे. प्राचीन ग्रंथ वाळवी व कसरीच्या भक्ष्यस्थानी जातात आणि उरलेल्या ग्रंथांबद्दल असा विचित्र अनुभव येतो. समाजात

होणाऱ्या अनेक स्थित्यंतरामुळे अशी संपदा धुळीस मिळते. पंथ, जात, धर्म, भाषा यातील वेगळेपण सामावून घेण्याइतपत आपण उदार बनू शकत नाही, यामुळे सांस्कृतिक जीवनातील अशी संपदा नामशेष होते व सारे अवशेष लयास जातात.

मध्यंतरीच्या काळात या परिसरात सतत यावनी सत्ता होती. प्रथम बहामनी राजवट, त्या नंतर मुघलांचा अंमल आणि शेवटी निजामाची सत्ता येथे होती. हैद्राबाद राज्यात राजभाषा उर्दूच होती. पेशव्यांच्या काळानी विसाजीपंतदादा बिनीवाले यांनी येथे विजय संपादन केला. हि. स. ११६६ (इ. स. १७६७) मध्ये त्यांनी हा भाग जिंकला. पुढे १७ वर्षांनी पुन्हा हा भाग तहामुळे निजामाकडेच गेला. जाधव राजांचा संबंध या भागाशी आला. त्यांच्या घोड्यांच्या पागेची वीस परगण्यांची जहागीर होती. त्यामध्येच आळंद, अफझलपूर, रायचूर, भालकी, कल्याणी, चिटगोपा इत्यादी भाग होता. जाधवांचा इतिहास फितुरीने कलंकित असला तरी त्यांची धर्म व समाजकार्य दृष्टीने राजवट चांगलीच होती. जाधवांची पाग्याची जहागीर निजामाने नष्ट केली, रामचंद्र जाधवास ठार केले व हीच जहागीर आपल्या जावयांना दिली. पागेची जहागीर जाऊन तेथे निजाम राज्यात तीन 'पायगा'वाले जहागीरदार निर्माण झाले. हे अवशेष हैद्राबाद पोलिसी कारवाईपर्यंत म्हणजे १९४८ पर्यंत होते. शिवरायाच्या स्वराज्याचा स्पर्श झाला नाही असाच हा भाग होता.

पेशव्यांच्या व जाधवांच्या सत्तेमुळे मराठीचा सराव या गुलबर्गा बिदर परिसरात वाढत गेला. विशेषतः वरील सर्व संप्रदायाची महत्त्वाची स्थाने या भागातच असल्यामुळे त्या त्या स्थानी साधुसंत, मठाधीश व त्यांचे वंशज, अनुयायी यांनी केलेली रचना येथे विपुलतेने आढळते. श्रीक्षेत्र गाणगापूर पंचक्रोशीत नरहरी कवी, सायंदेव, माणिक प्रभू, नंदीनाम, चंदलापरमेश्वरी, क्षेत्र काळगी, नागवेलांबा, खंडोबाचे मैलार क्षेत्र, समर्थांचा अपचंद मठ इ. स्थाने महत्त्वाची आहेत. रचनेच्या दृष्टीने हा भाग समृद्ध बनला.

संस्थेत हस्तलिखित संग्रहाचा अभाव

या विभागातील ग्रंथांचे अवलोकन केल्यास एक गोष्ट प्रामुख्याने ध्यानी येते ती ही की, हैद्राबाद-कर्नाटक भागात कानडी ग्रंथ मराठी लिपीत आणि मुंबई-कर्नाटक भागात मराठी ग्रंथ कन्नड लिपीत आहेत. तसे मुद्रित ग्रंथही लाभतात. एवढी विपुल ग्रंथसंपदा या परिसरात असून, कर्नाटक विद्यापीठे वा साहित्यसंस्था यात आज एकही मराठी हस्तलिखित संग्रही नाही, असे दिसून येते. आज लौकिकदृष्ट्या हस्तलिखित ग्रंथांस कोणतेच महत्त्व दिलेले आढळत नाही. वंशपरंपरेने ज्या स्थानात ग्रंथांची जोपासना झाली तेथील नव्या पिढीस त्याबद्दल प्रेम जेमतेमच आढळते. त्यांच्या ठायी विश्वास आणि प्रेम संपादून त्यांचा एकत्र संग्रह परिसरात महत्त्वाच्या संस्थेत करण्याचे काम त्या त्या भागातील जाणकारांचे आहे. आला अनुभव जमेस धरता सहसा कुणी ग्रंथ स्वाधीन करण्यात तत्पर नसतात. ग्रंथ तेथेच पडून नामशेष झाले तर त्यांना दुःख नसते. अशी ही शोचनीय अवस्था हस्तलिखितांबाबत असून, ही संपदा कशी जोपासली जाईल, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

अनेक वेळा मी स्वतः पाहून व्यवस्थित ठेवलेल्या हस्तलिखितांचे या सूचीच्या निमित्ताने पुनरावलोकन करताना मला खूपच त्रासाचे झाले. एका पिढीत त्याबद्दलची आस्था मावळत गेलेली आढळते. आज उपलब्ध झालेल्या मराठी हस्तलिखितांत गुलबर्गा बिदर भागाचाच वाटा महत्त्वाचा आहे. तेथेच विपुल ग्रंथ आढळले. अज्ञात ग्रंथांची तर गणतीच करता येणार नाही. पूर्वीच्या जुन्या संशोधकांनी त्या काळी प्रत्यक्ष पाहून यादी केली. ती नोंद पाहता त्या ठिकाणी आज एकही ग्रंथ आढळत नाही. काळाच्या कवचाआड दडलेला हा समग्र इतिहास व ते सर्व ग्रंथ पुढे येतील तो सुदिन. त्या त्या ग्रंथकाराच्या पुण्याईचाच तो भाग ठरेल.

महाराष्ट्र शासनाच्या राज्य मराठी विकास संस्थेच्या योजनेमुळे या संपदेची थोडीफार ओळख रसिक, अभ्यासक व संशोधक यांना करून देण्याचा योग आला. ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. या योजनेबद्दल माणिकनगरचे पू. सिद्धराज महाराजांनी लिहिले की, हे काम फार पूर्वीच व्हावयास पाहिजे होते. उशिरा का होईना आता आरंभले, ही समाधानाची गोष्ट आहे. प्रभुकृपेने हे महत्त्वपूर्ण कार्य तडीस जाईल, असा त्यांनी आशीर्वाद दिला.

श्रीक्षेत्र गाणगापूर देवस्थानाशी आमच्या घराण्याचा शंभर वर्षांपासून संबंध आहे. सिद्धपुरुष स्वामी समर्थकृपेने माझा वंश चालत आलेला आहे. अनेक संतपुरुषांचा संपर्क आला. सर्वप्रथम या संशोधनात आलेला अनुभव सांगणे अनाठायी ठरणार नाही. दत्त महाराजांचे निजशिष्य नंदीनाम वंशज पू. बालस्वामी यांचे ओळखपत्र घेऊन मी एका मठात गेलो. ओळखपत्र

असूनही त्यांनी मोठ्या कष्टाने शिवराम स्वामींची एकादश समश्लोकी हा एक ग्रंथ हाती दिला. त्या दिवशी तेथे वीज नव्हती. रॉकेल व चिमणी आणून तो संपूर्ण १३०० श्लोकांचा ग्रंथ रात्रीतून मी लिहून काढला. दुसऱ्या दिवशी तेथील यजमानाने संपूर्ण संग्रहच माझ्यापुढे ठेवला. हा अनुभव कमी मोलाचा नाही. श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांनी तर या परिसराचा दौरा केला, तो काळ वाहतुकीच्या दृष्टीने कष्टप्रद होता. जालना ते गुलबर्गा हा भाग त्यांनी बैलगाडीतून कैक आठवडे केला आहे. हा प्रवास सुमारे अडीचशे मैलांचा ५.४.१९१२ ते १.५.१९१२ पर्यंत केलेला आहे. अनेक ठिकाणी त्यांना शतकाधिक ग्रंथ पाहावयास मिळाले.[४] पण आज त्या स्थानात एकही ग्रंथ नाही. तो त्यांचा अहवाल आजच्या अभ्यासकांनी वाचून मनन करण्याजोगा आहे. त्यांनी दिलेली संशोधकाची आचारसंहिता पण तेवढीच मोलाची आहे. या पूर्वीसूरींच्या मानाने परिश्रम, कष्ट आणि तळमळ या बाबतीत आम्ही निश्चितच कमी पडतो, असे वाटते.

हस्तलिखितांचे स्वरूप

आज उपलब्ध झालेल्या या ग्रंथसूचीत गुरुचरित्र, ज्ञानेश्वरी, नाथांचे ग्रंथ, शिवराम रचना, श्रीधरी ग्रंथ, दासबोध, सर्व संतांच्या रचनांची बाडे यांची विपुलता आहे. कर्नाटकातील ज्ञानेश्वरांचा नाथपंथ व ती परंपरा चालविणारी मठ-मंदिरे या भागात आहेत. या ग्रंथाची सर्वात जुनी प्रत आमच्या संग्रहात आहे. ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेचे व्याकरण दाखविणारे काही ग्रंथ गलंड कवीचे तसेच मूळ ग्रंथाची ताजी प्रत शेख महंमदकृत योगसंग्राम ज्ञानेश्वरी पर्यायशब्द, गूढभाषा टिपणी, पदबोधिनी हे सर्व ग्रंथ येथील पीठाधीशांनीच लिहिलेले आहेत. शिवरामांची प्राचीन पंडिती परंपरेची मराठी गद्य रचना या सर्व गोष्टी जमेस धरल्यास येथील ग्रंथात त्रुटित प्रतींचा भाग खूप आहे, त्यामुळे या महत्त्वपूर्ण संपदेची होणारी अवहेलना समजू शकते. अध्यात्माचे सूत्र राखून संतांनी केलेले आंतरभारतीचे कार्य महत्त्वाचे ठरावे. ब्राह्मणाने वीरशैव साधूचे चरित्र लिहावे. अल्लंखान व अल्लंप्रभूने नागेशाचे गुणगान करावे. नाममात्र यवन असलेल्या राजाने मृत्युंजय बनून अद्वैत वेदांत सांगावा. विजापूरच्या महिपतीने एकाच काव्यात एक एक चरण हिंदी, मराठी, कन्नड, दखनी, तेलगु, उर्दू असलेली रचना करावी, हा सर्व पुरावा उद्बोधक आहे. चिदंबर दीक्षिताचे शिष्य मराठवाड्याचे कवी राजारामबुवा यांची रचना त्या बेळगाव परिसरात कन्नड लिपीतून जोपासाली हा सर्व पुरावा मनन करण्याजोगा आहे.

माझ्या आजोबानी केलेले संशोधन, 'आळंदवृत्त, आत्मवृत्त' निजाम राजवटीत छापण्यास परवानगी मिळत नव्हती. त्यांच्यावर मुसलमानांनी गोळ्या झाडल्या. त्या वेळेस केसरीत १९३३ मध्ये अग्रलेख आला.[५] केसरीवर त्या वेळेस निजाम राज्यात बंदी होती. १९३३ मध्ये घायाळ झालेले आजोबा १९३९ पर्यंत हयात होते. ते या ग्रंथाच्या आरंभी नमूद करतात, 'मला फुरसद मिळत नव्हती, पण गोळीबार करणाऱ्यांनी मजवर उपकार केले. सक्तीच्या विश्रांतीच्या काळात आळंदचा इतिहास व आत्मचरित्र लेखन पूर्ण झाले.' माझे धाकटे आजोबा (कै.) धोंडोपंत यांच्या निधनानंतर म. म. दत्तो वामन पोतदार यांनी एकच वाक्य पत्रातून लिहिले. 'आजोबांची कीर्ती आपण सांभाळावी' आणि यामुळेच मी हे काम महत्त्वाचे मानले. गुरुवर्य डॉ. श्री. रं कुलकर्णी, हैदराबाद यांच्यामुळे माझ्या संशोधन कार्यांला निश्चित दिशा लाभली. पुणे विद्यापीठात गु. डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्यामुळे माझा उत्साह वाढत गेला. पितृतुल्य सेतुमाधवराव पगडी यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. या गोष्टी कृतज्ञतेने नमूद करणे हे मी माझे परम कर्तव्य समजतो.

आमची पिढी 'सकल गुणालंकृत' हा मोडी कित्ता गिरविलेली आहे. प्रांत कानडी असला तरी व्यवहार मराठी मोडी लिपीत होता. एका कवीनेच त्याबद्दल ग्रंथातून विवेचन केले आहे. (क्र. ८९६) तो भाग खालीलप्रमाणे आहे.

''जरी देश कानडी।। परी मराठी लेखनमोडी।। ऐसी पाहुनि परवडी।। ग्रंथ बिरडी घातला पै।।४।। येथिलया देशी जाण।। सर्वचि मराठी लेखन।। उदीम व्यापार कुलकरण।। मराठी लागून लेख पै।।५।। येथील देशाचे जन।। तथा कर्नाटक लिपीचे स्वप्न।। मग ग्रंथ कर्नाटकीत लेहून।। काय प्रयोजन असे जी।।६।। ग्रंथ जरी कानडीत लिहावा।। तरी तो कोण पै वाचावा।। ऐसा विचार आणुनी बरवा।। जनसेवा आरंभली।।७।।''

तत्कालीन भाषिक परिस्थितीवर येथे प्रकाश पडतो. एका शतकापूर्वीचे हे लेखन आहे; पण राज्यपुनर्रचनेनंतर स्थिती झपाट्याने पालटत गेली.

खुद्द विजापूरच्या आदिलशाहीत असा एक महत्त्वाचा पुरावा इतिहासात लाभतो. ही नोंद शके १५२६ (इ. स. १६०४-

१०१३ हिजरी) ची आहे. अकबरचा वकील असदबेग विजापुरास गेला तेव्हा तेथील बादशहा त्याच्याशी मराठीत बोलू लागला. कारण तो म्हणाला, मला फारशी समजते; पण ती भाषा भराभर बोलता येत नाही. (इं. डौ. Vol; ६ पृ. १५२) त्या वेळेस इब्राहीम तख्तावर होता. [६]

या परिसराच्या मराठी रचनेच्या परंपरेस अनुसरून पुढील काळात पण सातत्याने येथे वाङ्मय निर्माण होत आलेले आहे. विशेषतः वीरशैवाचे मराठी साहित्य या भागात गेल्या २५-३० वर्षांतच निर्माण झाले. डॉ. कपाळे (गुलबर्गा), रेखा अष्ठुरे (भालकी), डॉ चाफेकर (गदग), गुंडवाले (हुबळी) यांचे कार्य यात महत्त्वाचे आहे. तमिळनाडू, आंध्र, त्रिवेंद्रमप्रमाणे कर्नाटकात या योजनेमुळे मराठी संशोधक, अभ्यासक यांच्या दृष्टीने हे काम अगत्याचे होते. या परिसरातील सांस्कृतिक जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आज पुढे येत आहे. येथील परिसरात प्रदीर्घ काळात इतिहासात विविध संक्रमणे झाली. हैद्राबाद पोलिसी कारवाईपूर्वी रझाकाराच्या अंमलात अनेक ग्रंथ नाश पावले. डॉ. पंडित आवळीकर यांच्या संशोधनामुळे मुंबई कर्नाटकातील मराठी साहित्याचा परिचय आजवर काही अंशी होत आला.

आज या सूचीत सुमारे १३१९ ग्रंथांची नोंद केली आहे. अनेक अडचणींमुळे प्रत्यक्ष ग्रंथ अवलोकनास बराच त्रास झाला. एकाच वेळी सर्व ग्रंथ जेथे पाहावयास लाभले नाहीत, त्यांची नोंद त्या त्या भागाची पुरवणी म्हणून दिली. ग्रंथ अवलोकन, टिपण आणि ती नोंद हे काम एकाच वेळी करीत गेल्याने, ते अपरिहार्य ठरले. ग्रंथ प्रकारात विपुलता व विविधता आहे. सर्वच सामग्री शक्य तो समाविष्ट करण्याचा यत्न केला. अत्यंत महत्त्वाचे ग्रंथ येथे निर्माण झाले. कालौघात लुप्त झालेले उद्या उपलब्धही होतील. ती अधिकृत नोंदीच्या आधारेच नमूद करीत आहे. त्यापैकी बरीच रचना धुळ्याच्या संग्रहात गेली, पण आज त्या स्थानी एकही ग्रंथ नाही. त्यांची नोंद मात्र आढळते. जुन्या संशोधकांना पूर्वी जे ग्रंथ पाहावयास मिळाले, त्यांची नोंद परिशिष्टात केली आहे. संस्कृत ग्रंथस्थळांचा उल्लेख केला आहे.

या परिसरातील प्राचीन शिलालेख व ताम्रपट पण तेवढेच महत्त्वाचे आहेत. शिलालेख त्रिभुवनमल्ल विक्रमादित्य कालीन शके १००५ पासूनचे आहेत. तसेच ताम्रपट कलचुरी घराण्यापासूनचे आहेत. शके ३५ पासूनचे ताम्रपट संस्कृत भाषेतून आहेत. शिलालेख मात्र हळीगन्नड (जुनी कन्नड) भाषेत आहेत. नृसिंहसरस्वती निजशिष्य नंदीनाम वंशात पूजेच्या देवपाटात अशी चवड आढळली. शके १२६० चा ताम्रपट रामदेवरावचे बंधु प्रतापरुद्र काळाचा आहे. ते हे माडपंतासह आळंदात वास करून होते याची नोंद महिकावतीच्या बखरीत आहे.

या परिसरातील समाज, सांस्कृतिक जीवनांची बाजू राखणारा होता. संस्कृत विद्या, धर्मशास्त्र, कर्मकांड, शास्त्रग्रंथ यांच्या बरोबरच विविध संप्रदाय या परिसरात वाढले आहेत. सर्व समावेशकता हा समाजधर्म बनलेला होता. संप्रदायात परस्पर संघर्ष न होता त्यांचा समन्वय झालेला आहे. समाजातल्या सर्व घटकांना सांस्कृतिक उत्थानाच्या कार्यात संस्कृतीचे वाहन करणारी भाषा मराठी होती. त्यामुळे मराठी साहित्य आणि समाजजीवन यांतील सर्व परंपरा या परिसराने नुसत्याच जपल्या नाहीत त्या वाढविल्या आहेत. हे या सूचीचे महत्त्वाचे फलित आहे. भाष्यग्रंथ महाराष्ट्रापेक्षा दक्षिणेत विपुलतेने आहेत. भूमापन व प्रशासन विषयक ग्रंथ पण याच परिसरात झाले. हे तंजावर आणि त्रिवेंद्रम सूचीमुळे स्पष्ट होते. महाराष्ट्राच्या मानाने या प्रांतात स्थैर्य थोडे बहुत होते. कारण इकडे यवन कालात ठराविक खंडणी भरली की उपद्रव होत नव्हता. महाराष्ट्र प्रदेशात मात्र 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' अशी अवस्था होती. त्यामुळे अन्य टीका व भाष्य ग्रंथ निर्माण होऊ शकले नाहीत. या परिसरातील रचनेत रागतालांचा उल्लेख प्रामुख्याने असल्याने जनसामान्याचे प्रबोधन कोणत्या साधनाने होत असेल याचा अंदाज बांधता येतो.

अभ्यासकांना या सूचीच्या संकलनाचे ग्रंथांचे अवलोकन करण्यास सोईचे जावे याकरिता शेवटी ग्रंथनामसूची आणि लेखकनामसूची दिली आहे. प्राप्ति स्थान व यजमानाचे नाव यांचा तपशीलही दिला आहे. तशी अनुक्रमणिका पण ग्रंथ संख्येसह दिली आहे. कर्नाटक प्रांतात माध्वमताचे प्राबल्य असून, या परिसरात मराठी संतांच्या अद्वैत प्रतीती पुढे त्यांचा प्रभाव पडला नाही. त्यामुळे 'द्वैत वैष्णव' सारख्या विचाराचे ग्रंथ या परिसरात मराठीत झाले. त्यांना ज्ञानेश्वर, नाथ यांचा हरिपाठही मान्य नाही. अशी रचना शंभर वर्षांतील आहे, पण त्याची कल्पना कुणास नाही. त्या ग्रंथांची नोंद येथे केलेली आहे. मराठी संतांच्या उपदेशापुढे ही विचारप्रणाली निस्तेज ठरली. ज्ञानेश्वरादी मराठी संतांचा प्रभाव कर्नाटकात महाराष्ट्राच्या मानाने कमी आहे, असे मानण्याचे कारण नाही. जैन परंपरेतीलही वाङ्मय या परिसरात विखुरलेले आहे. राष्ट्रकुटांचे मळखेड

व चालुक्याची कल्याणी ही स्थळे या परिसरातीलच. येथे जैन संस्कृती नांदत होती. त्यानुसार आळंद येथे हिंदी, संस्कृत, मराठी, गुजराती वाङ्मय विपुल आहे. त्यातील मराठी रचनेची नोंद केली आहे. महानुभाव पंथाच्या सांकेतिक लिपीचा केवळ एक ग्रंथ उपलब्ध झाला आहे. स्फूट रचनेच्या बाडांची संख्या खूपच आहे. यातून मराठीच्या सर्वच संतांची रचना, इतिहास, समाज, धर्माबद्दलचे सबळ पुरावे लाभतात. दासोपंत, मृत्युंजय, जनार्दनस्वामी यांची बरीच नवीन रचना उपलब्ध होते. सकळसंत गाथेत नाहीत त्या संतरचनांचा भाग या बाडांतून लाभतो. पुराण, शास्त्र, आयुर्वेद, ज्योतिषशास्त्र यांवरील विपुल ग्रंथ आहेत. मोडी लिपीतून ग्रंथरचना इतक्या प्रमाणात महाराष्ट्रात क्वचितच आढळेल. प्रथम उल्लेख केलेल्या उपनिर्दिष्ट सर्व संप्रदायाची स्थाने व त्या संतांची कर्मभूमीच हा भाग असल्याने हे भाग्य या परिसरास लाभलेले आहे. सूफी संप्रदायाचे जाळेच या प्रांतात होते. कैफियतीत तो भाग आलेला आहे. बाडातून बंदेनवाजसारख्या सूफीसंतावर मराठी कवीची रचना आढळते. सांस्कृतिकदृष्ट्या सर्वच साहित्याचे मोल अनन्यसाधारण ठरणारे आहे. त्याचा सुसूत्र अभ्यास होणे अगत्याचे ठरते.

अनेकांनी अनेक प्रकारे साह्य केले. सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. श्रेयनामावली पृथक दिली आहे. या सर्व गोष्टी जुळून येण्यास राज्य मराठी विकास संस्थेच्या संचालक डॉ. सरोजिनी वैद्य आणि डॉ. वसंत स. जोशी प्रमुख असून, ते अभिनंदनास पात्र आहेत. ही योजना नसती तर तग धरून राहिलेले हे सर्वच साहित्य अल्पावधीतच काळाच्या उदरात कायमचे नामशेष झाले असते. त्या सर्वच संतकवींच्या पुण्याईने आज या उरल्यासवरल्या संपदेस चांगले दिवस आले आहेत असे म्हणावे लागेल. पुढील काळातील अभ्यासकांना संकलन साह्यभूत ठरल्यास हे परिश्रम सार्थकी लागले असे म्हणावे लागेल. या महत्त्वपूर्ण कार्याबद्दल राज्य मराठी विकास संस्थेचे पुन्हा एकवार आभार मानतो. अस्तु।

।।इति।। हे सलगीचे विनवण।।छ।।
शुभंभवतु।। श्रीरस्तु।।छ।। छ।।

'विश्रामधाम' आळंद ५८५३०२
जि. गुलबर्गा (कर्नाटक राज्य)
दूरध्वनी ८२२६०, (०८४७७)

डॉ. भीमाशंकर देशपांडे

संदर्भ

१. गुलबर्गाबिदर परिसरातील मराठी रचना. डॉ. भी. दे. अनुबंध गुलबर्गा अंक १, १९७७.
२. मराठी हस्तलिखिते : डॉ. भी. दे. म. सं. प. मुंबई, १९७८
३. शिवरामहृदय (खंड १) डॉ. भी. दे. विश्रामधाम आळंद, १९६६
४. जालन्यापासून गुलबर्ग्यापर्यंत : शंकर श्रीकृष्ण देव. रामदास रामदासी अंक १६३, १६ फेब्रुवारी १९३५, धुळे.
५. न्यायदेवतेची कबर बांधणार का? अग्रलेख 'केसरी' पुणे. दि. २८ जुलै १९३३
६. शिवकालीन शकावली. शं. ना. जोशी. भा. इ. सं. मं. पुणे १९३७ पृ. ३.

ग्रंथसंग्रह अनुक्रम

२९)	वे. राजमणी दीक्षित मुडगेरी संग्रह, बिदर	१०५३ ते १०९२	१४६ ते १५०
३०)	डॉ. चंद्रशेखर कपाळे संग्रह, गुलबर्गा	१०९३ ते ११६९	१५० ते १६०
३१)	बाळेकुंद्री संस्थान, बाळेकुंद्री, जि. बेळगाव	११७० ते ११७३	१६० ते १६१
३२)	आत्माराम महाराज मठ जहिराबाद	११७४ ते १२५५	१६१ ते १६८
३३)	बिदर परिसरातील रचना समर्थ मठ, निलंगा (लातूर)	१२५६ ते १२७४	१६८ ते १७१
३४)	के. शिवराम दीक्षित संग्रह, जहिराबाद.	१२७५ ते १२७६	१७१ ते १७१
३५)	कै. भीमराव वकील नाईक संग्रह, जहिराबाद	१२७७ ते १३०३	१७१ ते १७४

कर्नाटकातील मराठी हस्तलिखिते

"देशपांडे साहित्य संशोधन" संग्रह, आळंद

१ ग्रं.क्र. १ **बाड**

अ- १४॥ × १२ से. पा. १३२ × - प्र. पा. ओ. १५ कागद जाड, गडद शाई, प्रथम व शेवट भाग पुसट.

शिवराम, भीमराज, नामदेव, रामदास, एकनाथ, जगदीश, कृष्णात्मज यांची विपुलपदे, टिपरी, आरती, रचना. मराठी, हिंदी व कानडी रचना. भीमराज, जगदीश कवींची कन्नड रचना. बाळबोधलिपीत सलग लेखन. यामुळे कोणती रचना कुठे आरंभते व संपते हे शोधावे लागते. मधोमध शिवण. कापडी वेष्टन फाटलेले. वरून दोरीने बांधण्याची सोय. भीमराजांची २४ नावांसह एक विनोद पूर्ण रचना; वानगी :

"चालले सैवरासी॥ थोर थोर भुसूर॥ विचित्र नाव त्यांचे॥ ऐकताचि पापहरे॥धृ.॥ केशवभट दिव्य नेटके॥ नारायणभट हिटके॥ माधवभट बहु लटके॥ गोविंदभट फार बुटके॥१॥ सर्व बाडात वेदांतपर रचना-संकलन वैशिष्ट्यपूर्ण. रचनेत रागतालांचा निर्देश आवर्जून.

२ ग्रं.क्र. २०० **योगविलास** गोरक्षनाथ

अ १४॥ × १२ सें. पृ. ४ × २ प्र. पा. ओ. १५ ओ. १६ अक्षर मोठे. सं.

यातील शेवटचा भाग :-

अठरावी ते पद्मावती। तुज करीतसे विनंती।

गोरक्ष म्हणे श्रीकृष्णा प्रति। तुम्ही जावे गोकुळासि॥१६॥ इतिश्री योगविलास श्रीगोरक्ष। नाथ विरचिते समाप्तमस्तू॥छ॥

३ ग्रं.क्र. २०१ **आत्मनिश्चयशतक** जगदीश

आ. १४॥ × १२ सें. पृ. - प्र. पा. ओ. १५

ओ. १०१ अक्षर मोठे, कागद जाड, सं.

जगदीश कवीची वेदांतपर रचना. योग मार्गातील अनेक तत्त्वांचे विवेचन आलेले आहे.

शेवटी : त्रिकूट श्रीहगोल्लाट। औंटपीठभ्रामरी। गुंफानीट पिंडब्रह्मांडयकवट॥ कर्ता तो मी॥९८॥ परात्पर परं जोती। परब्रह्मचिंतन॥ अव्दयानंद आत्मस्थिति॥ विश्वरूप मी॥९९॥ निर्विकार निर्विशेष। निर्गुण अति॥ नाइ जना जो इश॥ जगदीश तो मी॥१००॥ ईत्यात्म निश्चयशतक जगदीश बोलयक॥ जे न मानुनिलोक॥ सुखी होती॥१०१॥ इत्यात्मक निश्चयेशतक॥ जगदीश क्रुत समाप्त॥ शुभं भवतु॥ श्रीसदगुरूनाथार्पणमस्तु॥ प्रतलेखक, कालोल्लेख नाही.

४ ग्रं क्र. **बाड**

आ. १९॥ × ११॥ सें. पा. १३० × २ प्र.पा.ओ. १२ अक्षर मोठे. जाड कागद. सुवाच्य लेखन. प्रारंभीची पाने गहाळ.

आरंभीची १५ पाने मोडीत. यात लवकुश आणि रामाबरोबर युद्धाचे वर्णन आले आहे. यज्ञापूर्वीचा प्रसंग. या रचनेत शेवटी : अध्या समाप्त जाहले हा विज्ञापना-शके १७९२ प्रमोदनामसंवत्सर सन १२८० फसली. मिती माघ शु॥१ रोज शनवार. हे बखर कोण येक भावे करून वाचील त्यास रामचंद्रजी स्वामी बहुत विद्या देतील. कळावे हे विज्ञापना. हे बखर संबा आबा देशमुख परगणे गुंजोटी याचे असे. कोण खोईल त्यास पंचवीस रुपये सूर्ति दंड केले जाईल, हे लोकास समजण्याकरिता लिहिले आहे. हे विज्ञापना." शेवटी खाली चौकटीत "हे लवकुश याची बखर समाप्त असे कळावे."

त्यानंतर सिंहासन बत्तिशी असे लिहून दोन पाने कोरी. पान १६ नंतर ४ × ४ चौकड्याचा आकार करून त्यात काही चिन्हे व आकडे दिले आहेत. त्यावरून धन, यात्रा, नाश, मान, चोर, कंटनाश, भय, गमन, संतोष, अश्व, भजन, राजलोभ, सुख, दुःख, लाभ यांचे भाकित ओळखण्याची रीत दिली आहे.

नंतर शिवराम, रामदास, केशवस्वामी, तुकाराम, निपट निरंजन, १२० रामनाम, भजन, पदे.

काही पाने कोरी. नंतर कोक शास्त्रातील माहिती, प्रयोग कोष्टक. पुढे ४३ क्रमांकापासून पृष्ठास नंबर दिले आहेत.

५१ पृष्ठापासून दुर्बोधकोश शीर्षकाखाली अष्टदिक्पाल, अष्टधातू, अष्टप्रकार गणित, अष्टविवाह, अष्टप्रधान, अष्टभोग, नवरस, नवविधाभक्ती, नवइंद्रिय, नवदरवाजे, पंचगव्य, पंचमहाभूते, पंचोपचार, पंचाळ जाती, चार वेद, सप्त अंत्मज, सप्त चिरंजीव, सप्त पाताळ, सप्त पुऱ्या, चौदा रत्ने दोन मती, तीन अवस्था, त्रिलोह, त्रिगण, त्रिलोक याचे विवरण आहे. अधुन मधून व शेवटची पाने कोरी. शेवटची पाने फाटलेली.

५ ग्रं.क्र. ३३ **दक्षिणामूर्तिस्तोत्र** शिवराम

आ. १८।। × १५।। सें. पा. ७ × २ ओ. १५ प्र. पा. ओ. ९ कागद पातळ, अक्षर मोठे.

आरंभी :

जैसे बाहिरले परिच जग हे निद्रेसि भासे तसी।।
माया सृष्टि हि आरिशांतिल पुरी तैसी विलोकी कुसी।।
साक्षात्कार करी प्रबोध समई जो आपणा अद्वया।।
त्या श्रीमन्निज दक्षिणाभिमुखिया वंदू गुरुराजया।।१।।

शेवटी : इतिश्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य।।श्री मत्पूर्णानंदानुचरिताया श्री दक्षिणामूर्ति स्तोत्र सटीका संपुर्ण।।छ।। श्रीगुरुनाथार्पणमस्तु।। जयराम।।१५।। आचार्यांच्या स्तोत्रावरील समश्लोकी मराठी भाष्य.

६ ग्रं.क्र. १७२ **चंद्रलोपाख्यान** जगदीश

आ. १६ × १० से. पृ. ३३ × २ अ. ५ प्र. पा. ओ. ८

सं. कागद पातळ, लालसर, अक्षर बारीक, सं.

आरंभी : निर्विघ्ने पदबंध श्लोकसवया माझ्या मुखे चालवी। हे आशा पुरवि रसार्थ भरवी आख्यान विस्तारवी। गिर्वाण तिरे अति गहन। महाराष्ट्र शब्द सोपान।। बांधल्या का असहन।। व्यर्थचि हे न मानिजे।।९।।

शेवटी : इतिश्रीमार्कंडेय मुनि केले पुराण।। श्रीचंद्रलोपाख्यानि उपदेशिले शौनकादिमुनी।। हे प्राकृत वचनी जगदीशकृत।।२६।।

इतिश्री मार्कड्येय पुराणे पंचमोध्याययः।।

रचनेत श्लोक, सवाया, ओळी, पदे, सन्नती क्षेत्राचे अर्चक वे. भीमाचार्य यांनी केलेली प्रत. रचना काल नाही.

७ ग्रं.क्र.१६९ **ज्ञानसागरानंद** बहिरोपंत

आ. २१ × ९ सें. पा. १५ × २ प्र. पा. ओ. ७ ओ. ३८ + २२ अक्षर सुटसुटीत, सं, चैतन्य परंपरेतील ग्रंथ.

आरंभ :

श्रीगणेशाय नमः। श्रीगुरुदत्तात्रेय नमः।।

ॐ नमोजी सच्चिदानंदा। सकळ मंगळादिकंदा।।

प्रपंच, परमार्थ, ज्ञान वैराग्य विवेचन पूर्वार्धात. पूर्वार्ध देवशात व उत्तरार्ध इटे ग्रामात लेखन.

शेवटी :

बहिरोपंत मांडवेकर। ग्रंथ लेखक अत्यादरे।
होऊनि पावले परात्पर। ग्रंथ सार गुरु कृपे।।२१।।
श्रीदत्त निरंजना। पूर्ण केली मन कामना।
चिद्विलासा प्रकार नाना। दाविले नयना गोचर।।२२।।

इतिश्री ज्ञानसागरानंद ग्रंथे एकोन विंशति तरंग समाप्त।।१९।।

शके १७६४ शुभकृत नामसंवत्सर अश्वीन कृष्ण त्रयोदशी इंदुवासरे समाप्त।। शुभं भवतु।।छ।।छ।।छ।।

नानिवडेकरांची अर्वाचीन प्रत.

८ ग्रं.क्र. १७० **ज्ञानसागर** बहिरोपंत

आ. २१ × ९ सें. पृ. २७ × २ प्र. पा. ओ. ७ ओ. ४४ सं.

आरंभ : श्रीगणेशाय नमः।। श्रीसरस्वत्येय नमः।। श्रीगुरुदेवदत्त प्रसन्न।। अप्रमेय त्रयातीत निर्मल ज्ञान मूर्तये नमः।। मनेगिरा विदूराय दक्षिणामूर्तये नमः।।१।।

या रचनेत गुरुपरंपरा विवेचन आहे. शेवटी आत्मकथनपर लेखन करताना कवी म्हणतो-

येऱ्हवी पाहता मी दुबळा। परि हा स्वानुभवाचा गळाळा। सेविती ते कळीकाळा।। मारोनि मोकळा मार्ग करिती।।३०।। मीरज प्रांत कृष्णतिरी।। कसबे इटे नाम नगरी।। रेवण सिद्धेश्वर डोंगरी।। वसतो घरी दत्तात्रेय।।३१।। कुलकर्णी पतके जोशी।

वतने आमुची मिरासी।। कृष्णातीर पंच क्रोशी विश्वामित्र गोत्रीचा।।३२।। शाखा शुद्ध अश्वलायन।। कनिष्ठ बंधु दोघे जाण।। गोविंद गोपाळ चैतन्य।। करिती अनन्य गुरुभक्ति।।३३।।

रचनाकाल : श्री शालिवाहननृपेशा। शके सत्राशे चवतीस।। ज्ञान सागरोल्हास।। जनकल्याणास जाहला।।४४।। इति गुरुपरंपरा नाम चतुर्दशरेषायां समाप्त।।१४।। शके १७६३ प्लवंगनाम संवत्सरे मार्गशिर्ष शुक्ल पंचमी मंद वासरे समाप्त।।छ।। नानिवडेकरांची प्रत.

९ ग्रं.क्र. ६७ **बाड**

आ. १४ × ११।। सें. पृ. ८६ × २ कागद जाड, गडद काळी शाई. प्रथमची पाने फाटलेली. विविध स्फुट रचना. पाल पडणे संकेत. तुकाराम, दासोपंत, केशव, रामदास, शिवराम, देवीदास, काही प्रकरणे. पदे, गीता, गंगा, तुळशी आरत्या, रामाची पदे. मोडीमध्ये अवांतर लेखन. नंतर लावणी. एक पान भरून कासीराव देशपांडे स्वामीचे सेवेसी हा मजकूर. २४ रकान्यात मंत्र. वामनाची आर्या रचना.

१० ग्रं.क्र. २०२ **सीता स्वयंवर** विठ्ठल दास

आ. १४ × ११।। सें. पृ. कागद जाड.

प्र.पा.ओ. १२. सं. ओ. ५८ (बाड क्रमांक ६७ मध्ये ही रचना आहे.)

शेवटी दशरथाप्रती जाऊनि कौसीका वचने मागितला भीक इति सीता सेंवर वीटल दास क्रतौ द्वितीयश्वर्गेस संपूर्णम्।। श्रीरस्तु।।

११ ग्रं.क्र. २०३ **शकुनवतिविज्ञान** ज्ञानदेव

आ. १४ × ११।। सें. पृ. प्र.पा.ओ. १२ सं.

कागद जाड. अक्षर मोठे

आरंभ : श्रीराम समर्थ। शकुन वति ज्ञानदेवकृत प्रां।। आमी तो बरव्यारिति करूनिया सांगेन वीर तारुनि।। प्रश्नानी शकुनावळी अती बरी पहा तुम्ही लोचनी। ते का सांगितल वीषश करुनि पूर्ण ज्ञानेश्वर।। आधी श्री कमळानिवास विधीने पूजोनिया भक्तीने। फासा तो मग तिनदा निजकर भूमिवरी टाकणे।। तेथे त्या समई...

पुढील रचनेत नानाना, नानाये, नारारा, नाराय अशा शीर्षकाखाली एक एक ओवीतून विवेचन आहे. शेवटी

इति श्री ज्ञानदेवकृत हे षेकुनावळि।। म्या भाग्ये करूनि रचिली। प्रकटार्थ ++ र।। तेथे जरी परी आसल विरोध काहि।। गोविंदषूत म्हणतो मज बोल नाही. रचना काल नाही.

१२ ग्रं.क्र. ७१ **बाड**

आ. २२ × १३ सें. पा. ८ प्र.पा.ओ. १८

यात नाथमहाराज, शिवराम इ.ची रचना. राम चरित्रावर पदे. अक्षर ठसठशीत. कसरीने एक कोपरा खराब झालेला आहे.

१३ ग्रं.क्र. १२८ **बाड**

आ. २६ × १३।। सें. पृ. ८ × २ कागद पातळ

तपकिरी रंगाचा. प्र.पा.ओ. २१

गुरुस्तुतीपर पदे अधूनमधून मोडीतून लेखन. गणपती, हनुमान, राम यावर रचना. शेवटी चार पाने मोडीत. प्रथमची व शेवटची पाने गहाळ.

१४ ग्रं.क्र. १६४ **बाड**

आ. २१ × १७ सें. पृ. २५ × २ कागद पातळ

विविध व विपुल पदरचना. मराठी, कानडी, हिंदी रचना. निर्मलसुत, शिवराम, रघुनंदन, भीमराज, तुकाराम, मीरा, पुरंदर विठ्ठल, नामदेव, भीमाशंकर, नारायण आत्मज, एकनाथ, नानाजीनंदन, गोसावीनंदन, ज्ञानेश्वर, रघुवीर, विश्वात्मज, रुक्मांगद, विठ्ठल दीक्षित, रचना व आख्यान इ.

१५ ग्रं.क्र. १७३ **वंशावळ**

आ. ३० × ५० सें. पृ. ३ × २ कागद जाड पांढरा.

गाणगापूर नृसिंह सरस्वती दत्त महाराजांचे शिष्य नरहरी कवीच्या मौजे हिप्परगा ता. जेवरगी जि. गुलबर्गा येथील घराण्याची वंशावळ लेखन कानडी व मराठीमध्ये.

१६ ग्रं.क्र. १३३ **दत्तात्रेय स्तोत्र** दासोपंत

आ. १५ × १० सें. पा. ४ × २ ओ २१. अक्षर मोठे सं.

आरंभ : श्रीगणेशायनमः।। एक सर्वगतसाक्षी योगीराज

ईश्वर।। सच्चिदानंद बोधात्मा पूर्णब्रह्म सनातन।।१।।

शेवट : इतिश्री मद्दिगंबरानुचर विरचित दत्तात्रेयनामामृत स्तोत्र संपूर्ण।।छ।। श्रीदेव दत्तात्रेयार्पणमस्तु।।२१।। छ।।छ।।छ।।

१७ ग्रं.क्र. ७० **गुरुचरित्र** नामधारक

आ. १४ × १० सें. पा. १० × २ ओ ५२

लाल चौकटीत लेखन. अक्षर रेखीव ५२ श्लोकी गुरुचरित्र प्रत.

शेवटी : शके १७७२ साधारणनाम संवत्सरे जेष्ठ व।। ५ पंचम्यासमाप्तं।। कांकेरे उपनाम बल्हाळ सुत गोपाळेन लिखितं।। व्यांकापा आचारी इदं पुस्तकं दत्तं।।छ।।छ।।

१८ ग्रं.क्र. १४३ **बाड**

आ. १५ × २० सें. पृ. ४० × २ कागद पातळ. प्र.पा.ओ. ९

विजापूरचे महिपती काखंडकी आणि त्यांचा मुलगा कृष्णराय यांची विविध व विपुल रचना. मूळ रचना मराठी भाषेत पण कानडी लिपीत आहे.यात राम, जगदंबा, दत्त, कृष्ण, गणपती इ.वर पदे, आरत्या, श्लोक.

१९ ग्रं.क्र. १९ **पदबोधिनी** अनामिक

आ. २१ × १० सें. पृ. ७२ × २ प्र.पा.ओ. ७/८ जाड कागद. त्रु.

गीतेच्या ९ व्या अध्यायावरील मराठी भाष्य. प्रथमची चार पाने कसरीच्या भक्ष्यस्थानी पडली आहेत. संस्कृत श्लोकासह रचना.

शेवटी : श्रीगोपाळ मुखोद्गत वाणी। सार्थक ऐकति जे श्रवणी। ते धन्य ये त्रिभुवनी।। होती तत्त्वतात्तह्योद।।६१।।

लेखक, प्रतलेखक, काल नाही.

२० ग्रं.क्र. १२ **सच्चिदानंद चरित्र** सोनेश्वर

आ. २० × १४ सें. प्र.पा.ओ. ८ अ. २०. ओ. २४६८ कागद पातळ तपकिरी. त्रु.

संत सेवक सोमेश्वर हा अक्कलकोटजवळील नागपासूर येथील राहणारा होता. गाणगापुरी भीमेच्या पैलतिरी इष्टगापूर (इटगी) येथे या प्रतिगुरुचरित्राची रचना झाली. या रचनेत वामन पंडिताच्या जीवनातील ब्रह्मराक्षसाची कथा संपूर्ण यथार्थ शब्दात आहे. त्यामुळे वामनाच्या गुरुपरंपरेवर प्रकाश पडतो. प्रत्येक अध्यायाच्या शेवटी.

चिदानंद चरित्र पठण। भावे वाचिता व्यथाहरण।।
पिशाच्च करिती प्रयाण। नामस्मरण ऐकता।।०।।

ही रचना मंगळवार मार्ग. शु. १५ शके १८३६ मध्ये इष्टगा पुरी झाली. कवीने व्यंकटेश हणमंत कुलकर्णी यांना प्रसिद्धीस दिली. त्यानी देवस्थान गाणगापूरचे अध्यक्ष धोंडोपंत देशपांडे यांना दिली. दत्त संप्रदायाच्या दृष्टीने महत्त्वाचा ग्रंथ. या दत्तावताराचे आयुष्य २६० वर्षांचे होते. दत्त संप्रदायातील महत्त्वाची रचना. अवताराची पूर्ण माहिती गोवलेली आहे. यात ७ वा अध्याय गहाळ. (काल शके १५७५ ते १८३५)

२१ ग्रं.क्र. १६६ **काळेश्वर पुराण** हेबाळकर

आ. २१ × १० सें. पृ. १९८ × २ पातळ तपकिरी कागद अ. ४८ ओ. २५०९ अक्षर बारीक. सं.

गुलबर्गा जिल्ह्यातील काळगी (चितापूर ता.) येथील रामायणकालीन शिवाचे क्षेत्र माहात्म्य. संस्कृत पुराणाधारे रामशास्त्री शंकरशास्त्री हेबाळकर सुरपूर यांनी लेखन केले. लेखनकाल शके १८२५ पुष्य व।। ५ गुरुवार. शेवटी सहस्रनामाची संहिता.

२२ ग्रं.क्र. ७८ **मानसपूजा** अनामिक

आ. १०।। × १५ सें. पा. १८ × २ प्र.पा.ओ. ८ कागद जाड. अक्षर रेखीव. सं.

गाणगापूर नृसिंह सरस्वती दत्त महाराजांची मानस पूजा. लेखनात जेथे चूक झाली तेथे गंध लावून पुसलेले आहे. दोन्ही बाजूस लाल रेघा. शेवटी दत्तषडाक्षरी स्तोत्र. रचना काल दिला नाही.

२३ ग्रं.क्र. ६८ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. २१ × १५ सें. पृ. ५१ × २ त्रु. कागद जाड. काळी शाई.

दोन्ही बाजूस लाल रेघा. प्रत्येक चरणास लाल दंड. प्र.पा.ओ. ११.

२४ ग्रं.क्र. १३९ **काळेश्वर माहात्म्य** पांडुरंग गोटूर

आ. २० × १० सें. पा. ४० × २ प्र.पा.ओ. ८. ओ. २३२ त्रु.

क्षेत्र व तीर्थ वर्णन. पहिली २ पाने गहाळ

शेवटी : शके १८०६ तारणनाम संवत्सर मार्गशिर शुक्ल पंचमी स्थिरवार तृतीयामे समात्पोयं। इदं पुस्तक गोटूर मुरहरसुत पांडुरंग सन्निधोलेखनं।। श्रीपांडुरंग विठलार्पणमस्तु। श्रीमाणिक प्रसन्नो भवा।।छ।।छ।।छ।।

२५ ग्रं.क्र. १०४ **गुरुगीता** शिवरामस्वामी

आ. १६ × १८।। सें. पृ. २० ×२ **मध्यभागी कसरीने भोके.**

काही मजकूर वाचता येत नाही.

संस्कृत श्लोक व भाष्य. गोविंदराज बाबासाहेब यांची पोथी. हस्ताक्षर महागाव ग्रामोपाध्ये महिपतीन लिख्यितं ।।छ।।छ।।छ।। कालोल्लेख नाही.

२६ ग्रं.क्र. १३४ **पार्थिव पूजा** यमणभट्टसुत

आ. १७ × ११ सें. पृ. ७ × २ प्र.पा.ओ. ७. कागद पातळ.

पार्थिव लिंगपूजा विधान. अक्षर रेखीव. सं.

लेखनकाल शके १८२९ प्लवंगनाम संवत्सर दक्षिणायन आद्या द्वादशी तिथी १२ भार्गववासरे भाद्रपद कृष्ण पक्ष यमणभट्ट सुत सिद्देन लिखितं स्वस्त अक्षर सिद्भट इटकल संस्थान हैद्राबाद काळगी रामानंद स्वामी महाराज सन्निध।।छ।।छ।।छ।।

२७ ग्रं.क्र. ६५ **वेदांतपट** अनामिक

आ. ३५ × २९ सें. जाड कागद. एका कागदाचीच घडी. घडीच्या जागेत जीर्ण. सं.

मोक्षपट खेळाच्या धर्तीवर वेदांत ऊहापोहाचा पट तयार करण्यात आला आहे.

९' × ९' चौकोन. १ साप व १ शिडी.

विवरणातील उल्लेख : द्वेषाचे क्रोधात अधःपतन।।१।। अविवेकाचे महापातकात पतन।।२।। ज्ञान मोहाचे संसारीपतन।।३।। अहंकाराचे स्थूलदेही पतन।।४।। तामस अहंकाराचे क्रोधी पतन।।५।। क्रियाशक्तीचे राज अहंकारी पतन।।७।। राजस अहंकाराचे शुन्यात पतन।।८।। येणेप्रमाणे पतन।।

उजव्या बाजूस : ब्रह्म लोकाहून वैकुंठास जाणे अखंड होत नाही. याचा खेळ असा आहे. कवड्या सहा उताण्या पडतील त्याप्रमाणे चिन्ह ++ वाचक् जागा जाली ×× पुडल माघ सारावी। येणेप्रमाणे हा खेळ खेळावा। हे खेळल्याने ऐश्वर्यप्राप्ति. मोक्षप्राप्ति असे आ ++–

पटाचे वरील भागास शिवलिंग. त्याखाली दोन चौकटीत कैलास व त्याखाली मोक्षपद. तेथील शिडी "श्रीगुरुपद येथून वैकुंठास जावे" असा मजकूर असलेल्या स्थानापासून आहे.

२८ ग्रं.क्र. ६५ **बाड**

आ. १५ × १० सें. पा. २० × २ प्र.पा.ओ. १२ कागद जाड. प्रथमची व शेवटची पाने नाहीत.

प्र.पा.ओ. १२ उभी वही.

तुकाराम, केशवस्वामी, जनाबाई, राजाराम, कमलाकर सुत बाळकृष्ण, शिवराम, मुक्ताबाई, महिपती निवृत्ती कृत पद, आरत्या, इ. विविध रचना.

२९ ग्रं.क्र. २०४ **भानुदासचरित्र** राजाराम

आ. १५ × १० सें. पृ. पा. ओ. १२ ओ. ५२

भानुदास चरित्राचा प्रसंग. सं. (बाड क्रमांक ६५ मध्ये)

आरंभ : पंढरासयात्रा मिळाली अपार।। राही दीनोद्धार पांडुरंग।।१।। म्हणती संत जन काये जाले देवा।। पडीला संदेह सकळिका।।२।।

शेवटी : आमुचे वचन साच केले आम्ही।। आता लोभ तुम्ही असो द्यावा।।५१।। उचलोनिया देव खांदेसी बैसविला।। पंढरीसी आला भानुदास।।५२।। इति भानुदास चरित्र संपूर्णमस्तु।।छ।।छ।।छ।।

३० ग्रं.क्र. १४० **सोळा सोमवार कथा** राघोव्यंकटेश

आ. १२ × १२ सें. पा. २७ × २ प्र.पा.ओ. ८ पहिले पान गहाळ. कागद लालसर. ओ. १००

आख्यानपर रचना. फलश्रुतीने शेवट.

शेवटी : म्हणे राघोव्यंकटेश साचार।। मजही जाहला चमत्कार।। आस्था धरूनिया सादर।। सर्वार्थ कामसिद्धी

होती।।९५।। शालिवाहन शके सोळासे यक।। वन्र आगळी वर्षे संवत्सर विरोधीनाम असे।। दिनप्रमाण चालविजे ।।९९।। कार्तिक वद्य एकादशी भृगुवार असे ते दिवसी।। गुरुविरचिते कथा ऐसि। जो शुभदायक सर्वदा।।१००।। इतिश्री ब्रह्मांड पुराणानुसार विरचितं प्राकृत भाषाय दासे संस्कृत सत्रा सोमवार वृतकल्प संपूर्ण।। श्री पार्वति संगमेश्वर्रापणमस्तु।।छ।।छ।।छ।।

३१ ग्रं.क्र. ६० **योगवाशिष्ठसार** शिवराम

आ. २० × १७।। सें. पृ. १०० × २ कागद पातळ प्र. १० सं.

शेवटी : इतिश्री परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमर्त्पूर्णानंद लक्ष्मीनारायणनुचर रचित: वशिष्ठसार टिकाया निरुपण नाम प्रकरण समाप्त।।१०।। वशिष्ठसार टिकाया शिवराम प्रकाशिता देशवाचा रमानाथ संपूर्णानंद दर्पिता।।श्रीराम।। जय।। राम।। जय।। जय।। राम।।

३२ ग्रं.क्र. ७२ **साधनचातुष्टय**

आ. २१ × १४ सें. पृ. १० × २ शेवटची पाने नाहीत. कसरीने भोके. डावा भाग जवळजवळ नष्ट. त्रु.

आरंभी : मुमुक्षु ऐसे चारी साधन।। नित्यानित्य विवेक म्हणजे काये।। नित्य तो आत्मा।। अनित्य देहादि प्रपंच।। देहादि प्रपंची उदास होऊन।। आत्माकडे फिरूनी पाहणे या नाव नित्यानित्य वस्तू।। गद्यस्वरूपाची रचना. लेखक, काल निर्देश नाही.

३३ ग्रं.क्र. ६४ **चैतन्यलीला** कृष्णादास बैरागी

आ. १७ × २० सें.. पाने ४४० × २ सं. अ. २१. ओ. ३३८०. पोथी मधोमध कसरीने खाल्लेली.

चैतन्य संप्रदायाचा संपूर्ण इतिहास. शिवछत्रपतीस राज्यारोहणप्रसंगी अर्पण केल्याचा शेवटी उल्लेख. वैशाख व।।१२ पर्व शके १५९६ रचना काल. कवीचे मूळ नाव कृष्णाजी एकनाथ धर्माधिकारी राहणार जुन्नर-कवी म्हणतो :

श्रीचैतन्यलीला ग्रंथ थोर।। वर्णितसे नाथ किशोर प्रेमानंदे जैसा मोर।। बोलबोले २१ (१९३) या ग्रंथात राघवचैतन्य यांनी आळंद गुंजोटी येथे चैत्र शु।। १३ गुरुवारी समाधी घेतल्याचा उल्लेख. (शके १४९०) मिळतो. केशव चैतन्य तीन वर्षे येथे या भागात होते. नंतर औतुरास गेले. ही राजर्षी घराण्याच्या प्रतीवरून केलेली प्रत. १९५७ सालची.

३४ ग्रं.क्र. २०५ **चैतन्यलीला** कृष्णदास बैरागी

आ. १७ × २० सें. पाने ४०० × २ अ. २१ सं. अक्षर बारीक.

विजय दबडगाव यानी केलेली अर्वाचीन प्रत.

३५ ग्रं.क्र. १०३ **भागवतमहात्म्य सार** खंडेराव

आ. १७ × १२ सें. पृ. १९ × २ प्र.पा.ओ. ११. कागद पातळ ओ. १८८. सं.

आरंभी : श्रोते ऐका सावधान।। केवळ कथा हे पुण्यपावन।। भागवत महात्म्य सार हे।।६।।

शेवटी : स्वस्ती श्रीभागवत माहात्म्य सार।। हा पद्मपुराणीचा विस्तारा।। विनवी पेमदेव जोडुनी करा।। करा निरंतर सज्जन हो।।१८८।। कृष्णार्पणमस्तु।। शुभं भवंतु।।

शेवटी म्हाळसाकांत, पांडुरंगाची आरती ही शंभर वर्षापूर्वीची रचना आहे. कवीने जन्मनाव पेमू म्हणून तोच उल्लेख केला आहे. मूळ गंगाखेडचे कवी गुलबर्गा येथे वास्तव्यास.

३६ ग्रं.क्र. ११ **योगसंग्राम** शेख महंमद

आ. २१ × १० सें. पृ. ३४० × २ सं. प्र.पा.ओ. ९ प्र. १८. कागद अत्यंत जीर्ण. प्रत्येक प्रकरणास दोरीने बांधलेले.

यात वेदांत चर्चा. मूळ ग्रंथ रचनेनंतरची ही ताजी प्रत ठरते. पाठभेदाच्या दृष्टीने महत्त्वाची प्रत.

शेवटी : पार्थिव नाम संवत्सर।। ते दिवशी ग्रंथ केला जाहीर। शुद्ध पुर्णिमा सोमवार। गुरु ग्राहण पुरत होते। शुद्ध श्रावणमास पाडवा।। अधिक पहिला सोमवारचा ठेवा। पुजा बेलपत्री सदाशिवा। नामघोष ब्रह्मानंद।।१९।।...

३७ ग्रं.क्र. १६ **गुरुगीता** शिवराम

आ. २५ × १४ सें. पृ. १८ × २ कागद जीर्ण. सं. संस्कृतची मराठी टीका.

प्रत. शके १७५३ खरनाम संवत्सर दक्षिणायन वसंत ऋतु वैशाख आधीक मास शुक्ल पक्ष १-गुरू वडवाळसिद्ध नागनाथ सर्वेष्ठ देवतार्पणमस्तु।।

३८ ग्रं.क्र. ८७ **अज्ञानभक्तोद्धार** खंडेराव

आ. २१ × १६ सें. पृ. १६७ × २. अ १२. ओ. १९१६

अक्षर मोठे. प्र.पा.ओ. ११. कागद पातळ. सं. शंभर वर्षातील रचना. कवीने ग्रंथ सजावटीस काही आयती चित्रेच वापरली. डकवली आहेत. त्याखाली रचनेतून ओव्या. यात भक्त व संताची आख्याने दिली आहेत. कालनिर्देश नाही.

३९ ग्रं.क्र. ६३ **पंचीकरण** शिवराम

आकार २१ × १० सें. पृ. १० × २ प्र.पा.ओ. १० सं.

आरंभी : श्रीगणेशायनमः।। श्रीगुरवेनमः।। अथ पंचीकरण।। सच्चिदानंद रूपाय सर्वधी वृत्ति साक्षेणे।। प्रत्यक चैतन्यरुपाय शिवरामायेनमः।।१।।

शेवटी : ऐसे प्रकारे वेदोक्त जाणून आत्मरूप अनुभवणे जन्ममरण हे धर्म क्षुधा तृषा प्राण धर्म सुखदुःख मनोधर्म ऐसे जाणून हे धर्म सांडावे आपल्या माथा घेऊन अबाधित प्रारब्ध दुग्धपट न्याय देह ऐसे जाणून हे देह प्रारब्धाशी गाठ घालून सदगुरु भजन कालक्षेप करीत कृतकृत्य होईन।' इतिश्री शिवराम स्वामीकृत पंचीकरण संपूर्ण।।. ॐ।।१७६६।।

ही प्राचीन गद्यरचना आहे.

अमेरिकेच्या पेनेनसाल्वेसिया विद्यापीठ संग्रहातील चार्लस पटेरसन वेनपेल्ट लायब्ररी फिलडेलफिया पी. ए. १९१०४ यू.एस.ए. येथून आलेली फोटो प्रत आहे. (१९६५)

४० ग्रं.क्र. ४५ **ज्ञानेश्वरगूढाभाषाटिपणी**

आ. २०।। × १५ सें. पृ. ६२ × २ कागद पातळ चिवट.

ग्रंथनाम शीर्षक लाल रंगात. सं. दोन्ही बाजूस लाल रेघा. प्र.पा.ओ. ११

आरंभ : श्रीगणेश सरस्वती ईष्ट कुलदैवत सदगुरु-भ्योनमः।।छ।। अथ ज्ञानेश्वरी गूढ शब्दार्थ लिख्यते।। प्रथमोध्याय।।

वानगीदाखल विवेचनाचा भाग : त्या त्या भागातील वोवी व त्यातील शब्द व अर्थ असा क्रम :

अध्याय (१) वोवि (३) शब्दब्रह्म = वेद

वर्णवपु।। आकारादि (४) ठेव।। स्वरूप (५) खेवणे।।कोंदणे (६) अंबर।। वस्त्र सपुर।। बारीक (९) सडका।। अग्रभाग.

शेवटी : इति अष्टदशोध्यायसंपूर्णमस्तु। श्रीकृष्णार्पणमस्तु।।छ।।छ।।छ।।छ।।

लेखक व कालनिर्देश नाही.

४१ ग्रं.क्र. ७७ **पर्वनिर्णय** गणपती रावल

आ. २०।। × १५ सें. पा. २६ × २ अक्षर मध्यम. सं. शास्त्रीय माहिती. संस्कृत ग्रंथाधारे. लेखक श्रीराव लहरिशंकरसुत गणपती प्रत १८३६ शकेची. मूळरचना शके १७४२ ची असा उल्लेख.

४२ ग्रं.क्र. २७ **वाक्यसुधा** शिवराम

आ. २०।। × १५ सें. पृ. ४८ × २ ओ १०३०

सं. कागद पातळ पांढरा. लेखन मध्यम. आचार्यांच्या मूळ ८३ श्लोकावर मराठी प्रदीर्घ भाष्य.

आरंभी : तेचि विषद निरुपण।। ते वाक्य सुधा ग्रंथ म्हणोन।। सर्वशास्त्रसंग्रह लक्षण।। जे आचार्योक्ति बोलिजले।।१५।।

शेवटी : ऐशे सर्व शास्त्राचे सार।। जे वेदांताचे अभ्यंतर।। गुरुकृपा साक्षात्कार। बोलिले ज्ञान।।१०२४।।

लेखन काल दिला नाही.

४३ ग्रं.क्र. २८ **आत्मबोध** शिवराम

आ. २१।। × १५ सें. पृ. २४ × २ ओ. ७० सं.

आचार्यांच्या ग्रंथावरील मराठी टीका. कवी म्हणतो :

हा शंकरोक्तबरवा निज आत्मबोधु।।
त्या प्राकृते विवळुनि सकलार्थभेदु।।
हातीचा अर्थ सगळा सगळा दिला हो।।
तेथे रिघोनि पाहता शिवराम होये।।७।।

श्री गंभीरानंद सरस्वती स्वामी यानी मंठाळ मुक्कामी मिती निज वैशाख कृ. ७ सोमवार शके १८५६ भाव संवत्सरे श्रीकृष्णार्पणमस्तु छ।।छ।।छ।।

४४ ग्रं.क्र. १७४ **हस्तामलकटीका** शिवराम

आ. २० × १० सें. पृ. ४ × २ पातळ कागद जीर्ण. ओ. १५ सं.

शंकराचार्यांच्या मूळ रचनेवरील समश्लोकी टीका आहे. काल व प्रतलेखक अज्ञात.

४५ ग्रं.क्र. ६१ **पूर्णानंद चरित्र** हनुमदात्मज

आ. २२ × ११ सें. पा. १८० × २ अ. १८. ओ. २८८१. कागद जाड. रेखीव अक्षर. सं.

शिवरामाचे वडील व गुरू पूर्णानंद यांचे चरित्र. आनंद संप्रदायाचा इतिहास यात आला आहे.

शिवराम वंशज हुताशनानंद यांनी शके १८४३ मध्ये प्रत केली. मूळ लेखक हनुमदात्मज हा कृष्णा हनुमंत बीदरचा राहणारा. टोपण नावाने रचना. रचनाकाल शके १७५३ खर संवत्सर चैत्र शु.।।१५

४६ ग्रं.क्र. ४० **बाड**

आ. २१ × १२।। सें. पृ. १६ × २ कागद जाड. अक्षर बारीक.

कोणी भिकारी राजाकडे गेला आणि त्याने प्रश्न केला. यक पूर्णांक मला दे-अनुक्रमे १/२, १/३, २/३, ३/४, १/५ अंश अशी मागणी केली. यातून गणिताची उदाहरणे पुढे करून विवरण केलेले बाड. विविध प्रकरणे उदाहरणे असा भाग. बाडाची शिवण उसवलेली. काही पाने गहाळ.

४७ ग्रं.क्र. ५९ **एकादशी कथा** शिवराम

आ. २० × १५ सें. पृ. १८ × २ कागद पातळ. सं.

शिवरामाच्या कथाकामधेनूतील रचनेचा भाग. आख्यान. यातच द्वादशीकथापण आहे. कवी म्हणतो

कथारूपसुंदरकामधेनु।।

संपूर्ण दावी शिवराम भानू।।छ।।छ।।

४८ ग्रं.क्र. १७५ **आत्मबोध** शिवराम

आ. २० × १५ सें. पृ. ७ × २ त्रु. वेदांतपर रचना

४९ ग्रं.क्र. १३ **जीवनमुक्त**

आ. २० × १५ सें. पृ. ७२ × २ कागद पातळ तपकिरी. त्रु. अक्षर नेटके. प्रत्येक चरणास लाल रेघ.

वेदांत चर्चा.

शेवटी : अनादि सिद्ध जैसा हरिपूर्ण।। म्हणवुनि त्यासी म्हणताती सनातन।। अनुभवी जे जाणती त्याची खूण।। जीवन्मुक्त सांगतो।। अनुभवून हो।।३।। सद्रूप आत्मा चिद्रूपचि स्वयं जाणीव विना जो ज्ञा।।

रचनेत ओवी, पद, इ. योजना. शेवटची पाने नाहीत.

५० ग्रं.क्र. ३ **गुरुगीता** शिवराम

आ. १५ × ७।। सें. ५८ × २ प्र.पा.ओ. ७ अक्षर ठसठशीत. सं. दोन्ही बाजूस लाल रेघा.

ओ. १३८, समश्लोकी मराठी भाष्य.

प्रतलेखक ग्रामोपाध्ये. काल नाही.

५१ ग्रं.क्र. ४ **गणेशस्तोत्र**

आ. ४।। से. × १० सें. पृ. २५ × २ प्र.पा.ओ. ४

ईश्वर नंदिकेश्वर संवाद. प्रदोष स्तोत्र, श्रीसुलांगल मंत्र, सौरमंत्र, विविध रचना.

५२ ग्रं.क्र. १० **रामगीता** शिवराम

आ. २१ × ११ सें. पृ. १४ × २ ओ. १४०. कागद पातळ तांबूस. अक्षर बारीक. सं. अ-५ शिवराम स्वामीची ही रचना म्हणजे त्यांच्या अध्यात्म रामायण टीकेतील प्रकरण होय. रामाने लक्ष्मणास केलेला उपदेश. वेदांतपर-प्रत किंवा लेखक काल निर्देश नाही.

शेवटी : इति श्रीमद् अध्यात्मरामायणे उत्तर कांडे, उमामहेश्वरसंवादे।। पूर्णानंदानुचर टिकायां निरुपणनाम पंचमोध्यायः।। श्रीरामचंद्रार्पणमस्तु।।

५३ ग्रं.क्र. ३५ **लीला भागवत** पंडित

आ. २० × १० सें. पा. २७ × २ प्र.पा.ओ. ७ मधलीच पाने गहाळ. त्रु.

आरंभी : श्रीगणेशाय नमः।। श्री सरस्वत्येय नमः। श्रीकुलदेव्यौ नमः।। श्री सदाशिवाय नमः।।३।। भागवत दशम पंडितकृत लिख्यते।। वंदुनि सज्जन पाय आधी।। गजाननाते नमिले।। त्रिशुद्धा सरस्वति वंदियली पराधी।। श्री सद्गुरु वंदुनि ब्रह्मबुद्धि।।१।।

कंस देवकी यांच्याबद्दलचा कथाभाग उपलब्ध आहे.

५४ ग्रं.क्र. ९९ **बसवपुराण**

आ. २।। × १५ सें. पृ. १४० × २ प्र.पा.ओ. ९

समास विरहित लेखन.

कानडी भाषेतील या पुराणाची प्रत लेखकाने मोडी लिपीत लिहिली आहे. अधुनमधून वेलबुटी अध्याया शेवटी. काल व प्रतलेखक अज्ञात.

५५ ग्रं. क्र. **बाड**

आ. १० × १० सें. पा. ४० × २ सें. बाडास वाळवी मुळे मधोमध छिद्र. प्रथमची पाने वाचता येत नाहीत. नाथ, निजानंद, शिवराम, केशव इ. ची पदे. शिवनामावली, नवग्रहस्तोत्र, पोटशूळ मंत्र, औषधी उपचार. शेवटची पाने पण खराब झाली आहेत.

५६ ग्रं. क्र. २०६ **करुणांमृत** देवदास

आ. १० × १० सें. पृ. ओ. १४३. अक्षर चांगलं. देवदासकृत व्यंकटेश दैवताचे महात्म्य. रचनाकाल नाही.

५७ ग्रं. क्र.१३७ **उपांगललिताव्रत** पुराण

आ. २० × १० सें. पा. ३२ × २ प्र.पा.ओ. ७. कागद जाड, काळी शाई. ओ. १५०. सं. यात उपासनेचे नियम व मंत्र.

शेवटी : स्कंद पुराणे स्कंद महर्षि संवादे उपांगललिता व्रथा कथा संपूर्ण।। इदं पुस्तक शांभट देवळे क्षेत्र श्रीनरसिंह. हस्ताक्षर बाळाजी माणकेश्वर देशपांडे प्रगणे इंदूर वास्तव्य कसबे टेंभुर्णी सके १७९० किलकनाम संवत्सरे भाद्रपद वद्य दशमि त दिने समाप्तं।। पुस्तकाचा जो अभिलाश करील त्यास श्री लक्ष्मी नृसिंहाचि शपथ आस।। हे पुस्तक दाजिभट तुळसे यास दान दिले अस।। श्री।। श्री।। श्री।।

५८ ग्रं. क्र.३८ **आत्मबोध** शिवराम

आ. २० × १०।। सें. पा. १४ × २ प्र. पा. ओ. ८ ओ. ७० अक्षर बारीक.

गंभीरानंद सरस्वती स्वामीनी प्रत केली. मंठाळ मु. वै. व।। ७ सोमवार शके १८५६ भावनाम संवत्सर.

५९ गं. क्र. ३२ **ब्रह्मोत्तरखंड** शिवराम

आ. २० × १५ सें. पा. १२० × २ प्र. पा. जीर्ण प्रत. कागद पातळ.

शिवउपासनेचे विविध प्रसंग. आख्यान-सवाई चामरी राग यांचा उल्लेख पदे, आरत्या, इ.

शेवटी : कथा रहस्य परम पावने! वक्तालक्ष्मीनारायणे।। श्रोता आंगे स्वये होऊने। निरुपणे प्रगटवि।।४०।। गुरुकृपेचा लाघव मोठा।। पिकविल्या शिवकथेच्या पेठा।। अधिकारी ये लुटिती यथेष्ठा।। निलकंठ सुख तेथे।।२१-४१।।

शेवटी शंकराची आरती. लेखनकाल नाही.

६० गं. क्र. ११३ **शकुन प्रश्नावली** पिंगळे

आ. ३० × २० सें. पृ. ७ × २ कागद पातळ. ओ. ४९. गाणगापूर येथील सेवेकरी याने केलेली रचना. त्यात "अ" ते "ज्ञ" एकएक ओवी असून त्यातील भाव भाकीत दाखविणारे आहेत. ७' × ७' च्या ४९ चौकोनात बोट वा काडी ठेवून काव्य वाचावे म्हणजे उत्तर लाभते.

शेवटी :

पुष्प शकुनचि सांगतो।
सद्‌गुरु भार वाहतो।
स्वानुभव तुज येतो।
श्रीजगदंब कृपे।

हरि दत्तोपंत पिंगळे हे कवीचे नाव. ५० वर्षांपूर्वीची ही रचना.

६१ ग्रं. क्र. २४ **बाड**

आ. २१ × १६ सें. पृ. १५० × २ जाड कागद उभी वही.

कानडी रचनेबरोबर गुरुगीता, शिव उपासना काव्य, आरंभ व शेवटी कन्नड रचना. सर्व कानडी रचना बाळबोध लिपीमध्ये आहे.

६२ ग्रं. क्र. ४७ **सच्चिदानंद सरस्वती** सोनेश्वर

आ. २० × १६।। सें. पाने ३०० × २ पातळ कागद. अ. २० ओ. २४६८ सं.

कवीच्या मूळ ग्रंथाची श्रीपतराव अनगरकर यांनी केलेली प्रत ५५० वर्षांपूर्वीची आहे. लेखन गुलबर्गा येथे करण्यात आले.

६३ ग्रं. क्र. १७९ **वंशावळ**

आ. ३० × ३२ सें. पृ. २ × २ जाड कागद घडी घातलेला.

गाणगापूर नृसिंह सरस्वती निज शिष्यनंदीनाम जोशी मौ. कौलगा ता. आळंद यांच्या घराण्याची वंशावळ. वंशावळीत महत्त्वाची नोंद अशी. पुण्याचे थोरले बाजीराव पेशवे याचे गुरु ब्रह्मानंद पूर्वाश्रमीचे या वंशातील होते. जिडगा भुसनूर या वंशशाखेची पण माहिती. लेखन मोडी बाळबोध मिश्र.

६४ ग्रं. क्र. १८० **वंशावळ**

आ. ३० × २५ सें. पृ. ३ × २ जाड कागद. गाणगापूर नृसिंहसरस्वती शिष्य सायंदेव घराण्याची सरस्वती गंगाधर याची वंशावळ. तीन बंधू आणि त्यांचा वंश पृथकपणे नमूद केलेला. दोन भागांतून दिलेला आहे.

६५ ग्रं. क्र. ९ **बाड**

आ. ११ × १५ सें. पृ. ९५ × २ पांढरा चिवट कागद. गडद काळी शाई. काही भाग मोडीमध्ये वेष्टन व काही पाने गेलेली. मालु, भानुदास मृत्युंजय माधवनाथ, कबीर, जगदीश, केशव, रामदास, निवृत्ती-मुक्तेश्वर. मराठी, हिंदी कन्नड पदे. जगदीशाची ''ज्ञानेश्वरीगुज'' रचना. शिवलिखित मुहूर्त. अक्षर रेखीव. शेवटची पाने गहाळ.

६६ ग्रं. क्र. २०७ **स्वात्मसुख** ज्ञानदेव

आ. ११ × १५ सें. पृ. प्र.पा.ओ. १२. ओ. २३०. अक्षर सुटसुटीत. ज्ञानेश्वरांचा ग्रंथ. सं.

शेवटी : हा स्वानुभव प्रगटार्थ ग्रंथ वैभव।। करिता जाला ज्ञानदेव।। निवृत्तिप्रसादे।।२९।। शके बाराशे बारा।। तै केला ग्रंथ उभारा।। परिसावया संत चतुरा।। म्हणे निवृत्तिदासु।।२३०।। (बा. क्र. ९ मध्ये)

प्रतलेखक व काल अज्ञात. सुस्थितीतील ग्रंथ.

६७ ग्रं. क्र.२०८ **रत्नमालिका** चांगदेव

आ. ११ × १५ सें. पृ. ओ. २९ अक्षर चांगले. सं. (बाड क्रमांक ९ मध्ये अंतर्भूत आहे.)

आरंभ : श्री गुरुभ्योनमः।। प्रथम नमन गजानना।। जोविध अठरा पुराणाः।। साहे हो तो कवि जनाः।। अठावीस वेळा।।१।।

शेवटी : इति श्रीचांगदेव विरचिते प्रत्यो सरपंचेपृंशती। रत्नमालिकाः।। श्री रामचंद्रार्पणमस्तु।।छ।।छ।।छ।।

६८ ग्रं. क्र.१७६ **बाड**

आ. १९ × ११ सें. पृ. १८ × २ प्र. पा. ओ. १७. समास विरहित लेखन. उभी वही. कागद जाड. अक्षर ठळक जाड.

मराठी वाङ्मयातील वसमतनगर जि. नांदेड येथील शुकानंद परंपरेचे बाड. गुरुवरील पदे, भजन, अभंग, २५ अभंग. तसेच ज्ञानेश्वर, निजानंद, जीवनमुक्त, शिवराम नित्यानंद यांची रचना. बाडाचा मधला भाग कसरीने खराब व आडवी चीर पडलेली आहे.

६९ ग्रं. क्र. ४६ **बाड**

आ. २४ × १४ सें. पा. ३० × २ उसवलेली पाने. कागद जाड. उभा आकार.

गुंडा, केशव, ज्ञानदेव, शिवराम, शुकानंद, रामदास, उद्धव चिद्घन, सहजरंग, निर्मलशाम, एकनाथ यांची रचना. गुंडा, केशव व शिवराम पदे विपुल.

७० ग्रं. क्र. १८१ **बाड**

आ. ४६ × २८ सें. मोठ्या आकाराचा जाड कागद. त्याची घडी घालून ४ पाने × २ अक्षर मोठे. प्र.पा.ओ. २१. समास सोडले नाही.

जीवनमुक्त कवीची रचना, पदे, मध्वनाथ, अलंखान रचना. आरंभीचे एक चरण लाल शाईत रंगविलेले. घडीच्या ठिकाणी कागद जीर्ण. काल नाही.

७१ ग्रं. क्र. १६७ **बाड**

आ. १९ × १५ सें. पृ. ४४ × २ कागद पातळ तपकिरी. प्र.पा.ओ. ११. अक्षर सुटे.

आरंभी हिंदी रचना. नंतर नाथ रचना. लावणी अनुभवीचे धृपद :

अग सकुबाई सांगु मी काई नवल गुरुचि लिळा।। वरदहस्त मस्तकी ठेवता अनुभव देही आला।। ही शिवदिनाची रचना आहे. तुकाराम, जगदीश, माणिक प्रभू, जनार्दन. प्रथम समार्धी रचना, रामदास, शिवराम, श्रीरंगानुज, केशव नित्यानंद, नागेश, अज्ञान यांचे काव्य इ.

७२ ग्रं. क्र. १८२ **ज्ञानदेवकृत हरिपाठ** बोकील

आ. ८ × ५ सें. पृ. २४ × २ छोटे बांधीव पुस्तक. प्र.पा.ओ. १४ सं.

औसा जि. लातूर येथील धोंडो सीताराम बोकील यांच्या कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. ग्रंथात सुंदर वेलबुटीत प्रथम चौकोनात ग्रंथनाम लेखकाचे नाव नंतर ज्ञानदेवाचे काढलेले चित्र त्या खाली श्लोक नंतर ज्ञानेश्वरांचा हरिपाठ २७ अभंगात अशी मांडणी आहे. अशी मांडणी १ ते १९ पानात. या छोट्या ग्रंथात सुवाच्य एकूण ११० ओव्या. २० ते २४ पानात विठलस्तवराज स्तोत्र. शेवटी ज्ञानेश्वर आरती. प्रत्येक पानास सुंदर वेलबुटी. कला कुसर. हे लेखन बलिप्रतिपदा शके १८५७ मध्ये केले. पाहताच मुद्रित प्रतीचा भास होतो. मन या कलेमुळे थक्क होते. मूळ ग्रंथाचीच फोटोची मुद्रितप्रत त्याच आकारात व मूळस्वरुपात २ × ३ इंचामधील लेखन मन वेधून घेते. कवी देगलूरकर बंडा महाराजांचे शालक होते.

७३ ग्रं. क्र. १५० **बाड**

आ. २७ × १७ सें. पृ. १४ × २ कागद तपकिरी जाड, समासरहित लेखन. प्रथमची पाने मोडीत. त्याखाली शंकरभट आळंद असे मोडी व उर्दूत. नंतर सूचना वजा मजकूर– हे वही शंकरभट याचे आहे. कोणी घेतले तर वापस द्यावे. त्यानंतर मारुतीस्तोत्र, विष्णुशतनाम, रामदास, आचार्य रचना. दत्त, नवग्रह, शेवटी विदुरनीतीचे वेचे. भूपाळी, गणपती, विष्णु, शंकर, विठल व तुळसीवंदन इ.

७४ ग्रं. क्र. १८ **बाड**

आ. २२ × १२ सें. पृ. ३३ उभी वही. कागद जाड. लाल चौकटीत लेखन. प्र.पा.ओ. २०. नाथ रचना, ध्रुवाख्यान, रामदासकृत, शिवदास, शिवराम, उत्तरगीता इ. रचना.

७५ ग्रं. क्रं. २१० **अष्टोत्तरतुळसी** शिवराम

आ. २२ × १२ सें. पृ. उभा आकार. ओ. १०८. शिवराम स्वामीनी नारायणाची केलेली पूजा १०८ ओव्यातून आहे.

त्यातील भाग.

नारायणापाशी अष्टोतरशत।।

शिवराम वाहात राम तुळसी।।

राम चरित्रावर रसाळ वर्णन करण्यात आले आहे. प्रासादिक रचना.

७६ ग्रं. क्र. ८१ **बाड**

आ. २१ × १३ सें. पृ. ९४ × २ कागद चिवट पांढरा, प्र. पा. ओ. १६ सुवाच्य.

प्रथम गुरु देशिकवराची आरती. गुरुवर कमलाकर मुकुंदतनय, याची रचना. हिंदी कवन. त्यानंतर विद्या अविद्या बहिणींचा बोधपर संवाद. शिवराम पदे, वामन, मध्वमुनिश्वर, प्रल्हाद चरित्र "देवा केले उपकार", ही कमलाकराची प्रदीर्घ रचना. श्रीयाळ, दुर्वास इ. प्रसंग. कमलाकराची शुकानंदावरील विपुल रचना, काही पाने कोरी. शेवटी उलट बाजूने २५ ग्रंथाची नावे मोडीमध्ये, बाड महत्त्वाचे.

७७ ग्रं.क्र. २११ **शुकानंद चरित्र** कमलाकर

आ. २१ × १३ सें. पृ. १० (बाड क्रमांक ८१ मध्ये) × २

आरंभी :

श्रीशुकानंद चतुराक्षरी।। मंत्र जपता निज वदनी।।

वृत्ति निवृत्ति होऊनि तत्क्षणी ।। पसरेचिग्दगती, धृ।।

विविध पदातून कवीने गुरूचे हे चरित्र गोवलेले आहे. संप्रदायाच्या दृष्टीने मोलाची रचना.

७८ ग्रं.क्र. २१२ **बोधबासष्टी** शिवराम

आ. २१ × १३ सें. पृ. १० × २ ओ. ६२. प्र.पा.ओ. १६

विविध पदातून. आपल्या शिष्याला प्रबोधण्याकरिता चांगदेव पासष्टीच्या धर्तीवर कवीची रचना, सं.

शेवटी : गुरु चरणाते वंदुनिया।। चरणतीर्थ ते सेवुनिया,

मुक्ति प्रसाद मागुनिया।। तारितारिते मृतकाया।।६१।। बासष्ट पद ते बोधाचे।। जीवन करतो जीवाचे।। बलदे श्रीगुरु करणीचे।। तो शिवरामी होऊनी नाचे।। ६२।। (बाड क्रमांक ८१ मध्ये)

७९ ग्रं.क्र. २५ **बाड**

आ. २४ × २५ सें. पृ. ६० × २ कागद जाड पण भिजून खराब झाला आहे. अनेक हस्ताक्षरातील रचना.

तुकाराम, शिवानंदेन, विठल, यांची रचना. अहिल्या, सीतास्वयंवर, एकादशी कथा.

शके १६७७ वासुदेव बाबा निज धामासी गेले युवनाम संवत्सरे दक्षिणायने हिमतरुतु मारगेश्वेर मासे वदय नवमी शेनीवार, व तेथे मोडीत ११६५ फसली माहे रबिलावल श्री. रामचंद्रार्पणमस्तु।।

आळंद येथील जाधवराजेगुरु वासुदेव महाराज यांचा निर्याणकाल दिला आहे. पुढे केशव, शामराज पदे. अमृतकृत कटिबंध, गोपाळकाला, एक शुकाख्यान, नागेश, नाथ, १०८ रामनाम, औषधी उपचार, अनुपान, आर्या इ. रचना

८० ग्रं.क्र. २१३ **शुकाख्यान** अमृतराय

आ. २४ × १५ सें. पृ. ओ. १५

(बाड क्र. २५ मध्ये हा भाग आहे.)

आरंभी : रंभाभरली क्रोध भरुन। भ्रमा पावली गर्वमदांधने।। शक्तिपुढे सम उदराने गोमटे।। आधर चाउनि विदारुनिया पदर।।

शेवटी : सोडुनि हरि वैकुंठि नेइल हे सत्यवचन।। अमृतराय संतासी दल।। श्री शुकयोगींद्राने रंभेच गर्व हारील।।१५।। शुकरंभा।। छ।। (बाड क्र. २५)

८१ ग्रं.क्र. १०८ **बाड**

आ. १६ × ११ सें. पृ. ५० × २ चिवट पांढरा कागद. अक्षर तिरपे सुवाच्य. कापडी वेष्टन. शिवलेले बाड. शेवटी कसरीने खराब.

कालिदास, कबीर, शिवराम, अनंतसुत, पुरंदर विठ्ठल, तुकाराम, अमृतराय, शिवराम, केशव, नाथ, मीरा, आनंदतनय, उद्धव रुक्मांगद, चिद्घन, अमृतेश्वर, मालो यांची विपुल संस्कृत, हिंदी, मराठी, कन्नड रचना. आरती, भूपाळी, पदे, आख्यान इ.

८२ ग्रं.क्र. १४ **बाड**

आ. २२ × १६ सें. पृ. २५ × २ जाड कागद. तपकिरी रंग. अक्षर मोठे. उलटसुलट लेखन.

प्रथम ८ पानात गोपिचंद आख्यान. उलट बाजूने. पुढे भीमराज कवीची रचना. दासोपंत पद. एक अभिनव रचना पंतांचे वानगी.

क का। कामक्रोध टाकून दीजे।।।
ख खा। खोम आसल मदत कीजे।।
ग गा। गायन कळा अभ्येस कीजे।।
घ घा। घात कोणाचा न किजे।।
च चा। चाडि लक्षण सो(ड)न दीजे।।
छ छा। छळणा संताची न कीजे।।

ही पूर्ण बाराखडीची रचना आहे. लेखन फार निष्काळजीपणाने केले आहे.

८३ ग्रं.क्र. १६८ **बाड**

आ. १७ × १४ सें. पृ. ७० × २ उभी शिवलेली वही. शिवण उसवली आहे. दाब पडताच भुगा होणारा पातळ कागद. दोन्ही बाजूस लाल रेघा. प्र.पा.ओ. १२

पुरंदरदास, इरपा महाराज औसेकर, नाथ, दामा, शिवराम (कानडी पद) तुकाराम, कबीर अष्टपदी, केशव, अमृत, सहजानंद, रामदास पंचायतनसाधु विठल यांची पदे, अभंग, आरत्या, नंतर १७ लावण्या. पुण्याचे वर्णनाची लावणी, ब्राह्मणी राज्य जोरदार।। घोड्यावरी स्वार।। रामजोशीच्या लावण्यांचे संकलन. काही पानावर पान क्रमांक १३०. म्हणजे मुळात मोठे बाड होते.

८४ ग्रं.क्र. ८ **हस्तामलक** एकनाथ

आ. २० × १३ सें. पृ. ६३ × २ ओ. ६७३. कागद जाड. आचार्यांच्या ग्रंथावरील नाथ टीका. सं.

शेवटी : हेचि येथिचे निरोपण।। जे ज्ञाना। ज्ञानाची बोळवण।। येका जनार्दनी जनजिवन।। वस्तुपरिपूर्ण पूर्णत्वे।। ६७२।। पूर्णत्वाचे परिपूर्ण।। सदगुरुंचे श्रीचरण।। येका जनार्दनी शरण।। येकपण नुरवी।।६७३।। इति श्री शंकर हस्तामलक गुरुशिष्य संवादे। हस्तामलक ग्रंथ येकाकारटीका। संपूर्णमस्तु।। श्रीगुरु चरणारविंदार्पणमस्तु।।छ।।छ।।

पोथी सुरक्षित पण लेखन काळ नाही.

८५ ग्रं.क्र. ७९ बाड

आ. १६ × १० सें. पृ. ८६ × २. प्र.पा.ओ. १४. अक्षर मोठे. समास विरहित लेखन. प्रथमची ४ पाने गहाळ.

आत्महित व अन्य कारणामुळे रुदन यावर संस्कृत भाषेत १०१ श्लोक, प्रातःस्मृती, पंचतंत्र, आनंदसुत, नामदेव, केशव, मीरा, कबीर, गोसावीनंदन, नागात्मज, मुद्‌गल यांची पदे. पंढरीत चंद्रभागेस पूर आला त्याचे वर्णन. काव्यात अशी रचना :

चंद्रभागेशी पूर आला।

अपार चढले पाणी। वेढा पंढरीला पडला। वेढा पंढरीला पडला।।धृ.।।

शके १६८५ शुभनाम संवत्सरीते।।

जाले परियसी। आषाढ शुद्ध येकादसी।।

घडीघडीमध्ये चढू लागले। आले वो पायरीसी।। भगवंताची कळा कैसी।। पुंडलिकाचे देऊळ बुडाले न दिसे कवणासी।। टाकिला।।... अर हरी।।

असेतु नावरे लोण। बाबुळवनातून पुर। फलला।। अपार।।१।।

नंतर भानुदास, गुंडामहाराज, शिवराम, अमृत गोसावीनंदन, कबीर, मीरा, मध्वमुनी, यांची पदे, डफगाणे इ. रचना.

८६ ग्रं.क्र. ५८ बाड

आ. ४५ × ३० सें. पृ. ६ × २ कागद जाड चिवट डावीकडे शिवलेले.

समास सोडला नाही. सलग विविध रचना. मोठी वही म्हणून १/८ घडी. घडीचा भाग नाजूक. सलग लेखनामुळे रचनेचा आरंभ व शेवट शोधावा लागतो. वेदांतपर रचना. रामदासांचीपदे. रामोपासना काव्य. त्या काळातील महसूल खात्याच्या रजिष्टरचा उपयोग केला आहे. एका ठिकाणी शिक्का आहे. वही १२२६ फसलीची आहे. निजाम राजवटीत कालगणना तीच होती. त्यावेळेस साल इ. स. १८७५ येते.

८७ ग्रं.क्र. ५७ बाड

आ. ३ × ११।। सें. पृ. ८२ × २ पांढरा पण पिवळसर कागद. उभी वही. प्र.पा.ओ. २५. बाडात आरंभी विषयानुक्रम २ पानांत ७६ रचनेची नोंद. पृष्ठसंख्या नमूद.

प्रथमची ८ पाने मोडीत. विविध पदे आरत्या, स्त्रियांच्या शब्दात वेदांत, हे वडवळ नागनाथ परंपरेचे बाड. गुरुबद्दल कृतज्ञ भावना सर्व रचनेतून आहे.

८८ ग्रं.क्र. २० बाड

आ. २० × १६ सें. पृ. १५० × २. संपूर्ण बाड भिजून खराब. कागद चिवट म्हणून टिकले. प्रथम व शेवटची पाने अर्धी फाटलेली. आरंभी एक ज्ञानेश्वरचरित्र. मध्येच औषध अनुपान मोडी लिपीत. आरत्या, वामनकृत कृष्णजन्म, बालक्रीडा, शिवराम रचना, कटिबंदात, नाथवर्णन, अमृतराय काव्य, तुकाराम, रामदास, सूरदास, तुलसी यांची रचना.

८९ ग्रं.क्र. १५ बाड

आ. ४३ × १४ सें. पा. ३२ × २ कागद जाड-तपकिरी, भिजून खराब झालेला आहे. लांब पट्ट्या असे पृष्ठ. समास सोडलेला नाही. प्र.पा.ओ. २४. अक्षरे मोठी.

गवळण, बालक्रीडा, गोंधळ रचना, महिपती, नित्यानंद, जगदीश, होनाजी, श्रीपती, नाथ, दासविठ्ठल, तुकादास, तुकाराम, इ. ची रचना. पाळणा, आख्यान, आरती, दोहरे इ. विविध रचनेची वानगी.

९० ग्रं.क्र. २६ चंद्रलोपाख्यान पुराण

आ. २२ × ११ सें. मी. पृ. २८० × २ सं. पोथी.

चंदला परमेश्वरी देवीची माहिती. स्कंद पुराणातील आख्यानाधारे रचना. प्रत लेखक व काळ नाही.

९१ ग्रं.क्र. ७ पूर्णानंद चरित्र हनुमदात्मज

आ. १६ × १४ सें. पृ. ६० × २ त्रु.

हनुमदात्मजाची सांप्रदायिक रचना. अधूनमधून पाने विस्कळीत. सलग रचना नाही. त्रु.

९२ ग्रं.क्र. ८२ निवृत्तिटीका सखाराम

आ. २०।। × १०।। पान १८८ × २ अ. १८. सं. कागद पांढरा चिवट. व्यवस्थित लेखन. प्रत्येक पानास दोन्हीकडे लाल रेघा. चरणापुढे लाल दंड. प्रत्येक अध्यायानंतर वेलबुटी तांबड्या रंगात आहे.

गीतेचे भाष्य. यात शेवटी : शके १७२९ प्रवर्तमाने प्रभवनाम संवत्सरे अश्विन शु।। द्वितीया स्थिर वासरे भुजंगस्य आत्मज सखारामेण लिखितं।। इदं पुस्तकं हनुमंतराव गोविंद क्षीरसारोपनाम कुलकर्णी मौजे शहाढोकरी प्रगणे वांगीकर-स्येदसत्यं।। श्रीकृष्ण परब्रह्मार्पणमस्तु। छ।। छ।।

आरंभी नमनात :

पहिला नमू इश्वरुं।।
जो गिरिजेचा मनोहारु।।
तो परमपदाचा दातारु।।
शूळपाणी।।१।।

९३ ग्रं.क्र. ११९ **नागनाथ लीलामृत** त्रिंबक

आ. १७ × ११ सें. पा. ३० × २ पांढरा कागद. प्र.पा.ओ. १४ अक्षर बारीक. अ. २.

नागनाथ लीलामृतातील केवळ ३२, ३३ दोन अध्याय. प्रत लेखन १८५३ प्रजोत्पतनाम संवत्सर कार्तिक शु।।१४।।

आळंद येथील राघव चैतन्याबद्दलची विशेष माहिती देण्यात आली आहे. मूळ ग्रंथ त्र्यंबक भानजी देशपांडे यांचा.

९४ ग्रं. क्र. १३५ **स्तोत्रसंग्रह**

आ. १० × ७ सें. पृ. १६० × २ कागद जाड. प्रत्येक पानावर श्लोक व ओवी. विविध देवतांची स्तोत्र व धावे.

९५ ग्रं.क्र. ३४ **अमृतानुभव** ज्ञानेश्वर

आ. १४ × १० सें. पा. ९० प्र.पा.ओ. कागद पातळ, अक्षर ठळक ओ. ८०२

इति श्रीराजयोग अनुभवामृत ज्ञानदेव विरचिते संपूर्णमस्तु।। श्रीज्ञानेश्वरायेनमः।। छ। छ।। छ।।

९६ ग्रं.क्र. ११५ **त्रिकालपूजाविधान** भीमभट

आ. १७ × १४ सें. पा. ११० × २. पातळ कागद.

श्रीक्षेत्र गाणगापूर येथील दत्तमहाराज व परिवार देवतांची पूजा पद्धती विधान, मंत्रासह देण्यात आली आहे. गाणगापूर पुजारी वे. भीमभट रामभट पुजारी यांनी ६० वर्षापूर्वी लेखन केलेले आहे.

९७ ग्रं.क्र. ८८ **वीरलीलामृतसार** खंडेराव

आ. १७ × १५ सें. पा. ६५. अ १२ ओ. १५२४ सं.

वारकरी संप्रदायाचे औसेकर वीरनाथ व मल्लप्पा महाराज या दोन पिढ्यांचा इतिहास यात ग्रंथित केला आहे.

शेवटी :

संत दीन दयाळथोर। कृपा केली मजवरी फार।।
महिमा संताचा अपार। ते मी पामर काय वर्णू।।१३०।।

स्वस्ती श्रीवीरलीलामृतसारबोले दीनवाणी रामचंद्रकुमर।। सदा श्रवण करीत भाविक जन।। द्वादशोध्याय गोड हा।। १३२।। कृष्णार्पणमस्तु।। शुभंभवतु।।छ।। छ।।

गुलबर्ग्याचे खंडेराव गंगाखेड यांच्या हस्ताक्षरातील ८० वर्षांपूर्वीचा ग्रंथ.

९८ ग्रं.क्र. ४१ **आळंदवृत्त** कल्याणराव देशपांडे

आ. ३० × १९ सें. बांधीव वही. प्र. पा.ओ. ३२ पृ. १८० × २

आळंदचे संशोधक कल्याणराव यांनी त्यांचे स्नेही दत्तोपंत पोद्दार, आबा चांदोरकर, केतकर, दाते, कर्नाटकातील पांडुरंग देसाई, कपटराळ या संशोधक मित्रांच्या साह्याने आळंदचा इ.स. पूर्व ५०० पासूनचा इतिहास टिपलेला आहे. समाज, धर्म, इतिहास, राजकीय जीवन व संस्कृतीचा संपूर्ण आढावा.

आळंद प्रांत वनी हुडकिता।। ही जी फुले लाधली।। ती बहु यत्ने खुडुनिया

असे मनोगत प्रास्ताविकात आहे. याचे लेखन १९३४ साली झालेले आहे. फारसी उर्दूचे इतिहासातील पारिभाषिक शब्दांचे अर्थ व सर्व आधारभूत ग्रंथाची यादीपण दिलेली आहे.

९९ ग्रं.क्र. ८४ **बाड** श्रीपाद भट्ट

आ. ९ × ८ सें. पा. १०२ × २. छोटे बाड. बांधीव वही.

श्री चंद्रलांबादेवी उपासनेतील कानडी, मराठी पदे, सप्तवारश्लोक व त्यांस पदे, इ. रामगुरूची रचना, श्लोक इ. साहित्य.

श्रीपाद भट्ट शिवणी यांनी १९५० साली लेखन केले. पदांना रागतालांचा निर्देश.

१०० ग्रं.क्र. ३७ परमामृत मुकुंदराज

आ. १२ × ६।। सें. पा. १० × २. कागद पातळ. प्र.पा.ओ. ६. त्रु. शेवटची पाने गहाळ. कालनिर्देश नाही.

१०१ ग्रं.क्र. १३८ पराजिताविद्या सरस्वतीगंगाधर

आ. १३।। × ९।। सें. पृ. ८ कागद जाड. प्र.पा.ओ. ७. अक्षर चांगले.

गुरुचरित्रकार सरस्वती गंगाधराची रचना. देवी उपासनेकरिता महत्त्वाचे. काल नाही.

१०२ ग्रं.क्र. ३१ विवेकसिंधू मुकुंदराज

आ. १५ × १० सें. पा. ८५ × २. प्र.पा.ओ. १० त्रु. प्रत. फक्त पहिल्या प्रकरणातील काही पाने नाहीत. लेखन काल व प्रत लेखक अज्ञात.

१०३ ग्रं.क्र. ७४ गीतापदबोधिनी

आ. १४ × २० सें. पा. ३३ × २. प्र.पा.ओ. ९ गीतेचे श्लोक, अन्वय, विवेचन असा क्रम. लेखनकाल, प्रतलेखक अज्ञात. शेवटचे पान गहाळ. संस्कृत श्लोक व काही शब्दांसह विवरण.

आरंभी :

नमोनमोकरणाकरा।।
श्रीसद्‌गुरुपरात्परा।।
नमोचि सुखपारावारा।।
अनंत अपारानिर्गुणा।।

१०४ ग्रं.क्र. १५८ रामअर्चनपद्धति मंत्र

आ. २१।। × १०।। सें. पा. ४३. कागद पातळ, गडद काळी शाई.

रामअर्चनेचे विधान. आळंद येथे सरसंबेकर देशपांडे यांच्या घराण्यात आलेल्या अतिथीने कोदंडधारी रामाच्या मूर्तीसह ही पोथी पडशीत ठेवली व ते निघून गेले. ती मूर्ती धर्माधिकारी (हस्तामलकाचे घराण्यात) घरामध्ये आळंदला स्थापून पूजेची व्यवस्था केली. त्या सुमारास लाभलेली ही पोथी दीडशे वर्षांपूर्वीची आहे.

१०५ ग्रं.क्र. १५१ चंदलास्तवन मडकीकर

आ.१९ × १६ सें. पा. १४ × २. प्र.पा.ओ.२० ओ. १०८

चंदला कुलदैवत असलेले कल्याणराव मडकीकर यांनी १०८ ओवींतून देवीची पूजा केलेली आहे.

शेवटी : चंदला 'कल्याण'कारिणी।
चंदला सेतु संहारिणी।।
वरदायिनी नारायणाची।।१०७।।
प्रत्येक ओवी एकमणी।
एकशे आठाची ही सुमिरणी।।
फिरविता मागे मागणी।
त्रिलोचनी मम हृदयी बसावे।।१०८।।
इति चंदलार्पणमस्तु।।छ।।

१०६ ग्रं.क्र. १७६ माझे आत्मवृत्त कल्याणराव देशपांडे

आ. ३० × २० सें. पाने २५० × २. प्र.पा.ओ. २३

मोडी व मराठीत लेखन. आळंदचे कल्याणराव देशपांडे यांनी आत्मचरित्र लिहिले. यात जीवनातील घडामोडी, निजाम राजवटीतील स्थिती, धर्म, संस्कृती यांचे दर्शन घडविले आहे. यात २२ प्रकरणे. धार्मिक तंट्यात सन १९३३ मध्ये त्यांच्यावर मुसलमानांनी गोळ्या झाडल्या. केसरीत २८ जुलै १९३३ ला अग्रलेख "न्यायदेवतेची कबर बांधणार काय?" आला; पण त्या वेळेस निजामराज्यात केसरीवर बंदी होती. हा ग्रंथ प्रकाशित करण्याचा प्रयत्न करूनही निजामराज्यात परवानगी मिळाली नाही. याची उर्दू प्रतपण आहे. प्रस्तावनेत लेखक म्हणतात-

"कभी फुरसतसे सुन लेना बडी है दास्तां मेरी"

फुरसतीने वाचावे. माझी राम कहाणी मोठी आहे. हे उर्दू काव्यातून नमूद केले आहे. तसेच ते म्हणतात, "आमच्या आयुष्यातील घडामोडींवर प्रतिभावान लेखकास उत्तम कादंबरी लिहिता आली असती. तशी योग्यता आमचे अंगी नाही. गोळीबारात आम्ही आटोपलो असतो, तर धूळ खाऊन नष्ट होत चाललेले आठवणीचे टाचण नामशेषच झाले असते; परंतु आम्ही वाचलो. संकल्प तडीस गेला." लेखन १९३४ साली मोघा खुर्द येथे केले. मुद्रणाकरिता संक्षेप.

१०७ ग्रं.क्र. २१४ **सालवार आठवणी** कल्याणराव देशपांडे

आ. ३० × २० सें. २ खंड, पृ. २०० + २५०. ८ × २. प्र.पा.ओ. २८

हे टिपण मोडीत बारीक अक्षरांत स्वहस्ते लेखकाने केलेले. आपल्या स्मरणाच्या कक्षेत येणाऱ्या जीवनातील सर्व गोष्टी टिपलेल्या आहेत. शेवटी नोंद १९३४ ची. यात मोतीलाल नेहरू, टिळक, न. चिं. केळकर, ह. ना. आपटे, धों. के. कर्वे, बोडस, माटे, शि. म. परांजपे, सातवळेकर आणि पाचलेगावकर; तसेच भा. इ.सं. मं., वसंत व्याख्यानमाला. निजामी पोलिसाचा ससेमिरा चुकवून अज्ञातवासात असतानाचा विपुल अनुभव इ.चा तपशील महत्त्वाचा. जुन्या पिढीचा एक आगळा इतिहास.

१०८ ग्रं.क्र. १७८ **परात्परगुरू राघवचैतन्य** धोंडोपंत देशपांडे

आ. ३० × २० सें. पा. ९० × २. पांढरा कागद.
काळ्या शाईत मोडी लिपीत.

आळंद येथील राघवचैतन्य स्थान व परंपरेचा इतिहास, समाधीस्थळ, विविध राजांच्या सनदा, अर्चक, अन्य महत्त्वाच्या घडामोडी, पेशवे दप्तर पुणेतील नोंदी या सर्वांसह साधार विवेचक इतिहास. इ. स. १९४९ चे लेखन. लेखक आळंदचे देशपांडे.

१०९ ग्रं.क्र. २२ **अध्यात्म रामायण** शिवराम

आ. १८ × १६. सें. पृ. ५०१ + ९. अवतरणिका × २ का. सं. प्र.पा.ओ. १६. ७ कांड ओ. ५५००.

हे संस्कृत ग्रंथाधारे भाष्य केलेले आहे. यास रामहृदय असेपण नाव. मंगलाचरणातील भाव

तुझे पाद कमळ सुकुमार।।
गगनाहुनि अरुवार।।
जिथे विसावेल जीव भ्रमर।।
प्रपंचा विसर पाडुनी।।

अद्वैत तत्त्वातून रामभक्तीचे प्रतिपादन म्हणून या ग्रंथावर भाष्य. ही मूळ टीका १६०७ शकेची. कवीची शेवटची रचना. ग्रंथाच्या शेवटी ज्ञानेश्वर, पणजोबा नाथ व अन्य संतांचा उल्लेख कवीने केलेला आहे. मराठी भाषेचा अभिमान व्यक्त करताना :-

स्वये लक्ष्मीनारायण।। मथिता ब्रह्मांडपुराण।
नवनीत अध्यात्मरामायण। दिल्हे काढुनि मज।।
राम तेजे प्रदिप्त। माझे बोल हे प्राकृत।।
रामकथेचे करूनी घृत। वाढीन संत भोजना।।
सहज आहे लोकरचना। घृतमुख्य जाणावे भोजना।।
तेवी रामायण लोणी जाणा।।
आले घृतपण मराठी।।
लोण्याहुनि लोणकढीचे।।
तूप म्हणती गोड साचे।।
तेवी गीर्वाण रामकथेचे।।
जनासी रूचे प्राकृत।।

पणजोबा नाथाप्रमाणेच पणतवाने मराठीचा अभिमान नमूद केला आहे. प्रत लेखनकाल नाही.

११० ग्रं.क्र. ४९ **ब्रह्मोत्तर खंड** शिवराम

आ. १४ × १६ सें. पृ. २८० × २. प्र, पा ओ, ६ प्र, २१ सं जीर्ण प्रत ओ, २९५ शिवपूजेतील व उपासनेतील प्रसंग येथे आख्यान रूपाने रचले आहेत. अक्षर साधारण, शेवटी कवी वर्णन करतो :

लक्ष्मी नारायण समर्थ।
पूर्णानंद रसभरित।।
चालली अत्यद्भुत।
सिवराम निमित्य करुनिया।।
इति.।।

१११ ग्रं. क्र. ९२ **सदानंदचरित्र** अमलानंद

आ २३ × १४।। सें पृ, २० × २ लेखन रेखीव. कागद जाड. प्रत्येक चरणास लाल रेघा. सं. सदानंद संप्रदायी हुताशनानी बीदर येथे केलेली प्रत. शके १८५४. एका अमलानंद यांची रचना.

शेवटी : शके १०५ मिती वैशाख ५ इंदुवासरे प्रमादि सं. विक्रमार्क. सं. १९७० ते दिवसी गुरू रामानंदकडून मला मिळाले।।छ।।

११२ ग्रं.क्र. १०६ **पंचीकरण** शिवराम

आ. १६×११ सें. पा. २२×११ सें. प्र.पा.ओ. ९ सं.

नाथांचे पणतू शिवराम यांची गद्यरचना म्हणजे आचार्य ग्रंथांवरील भाष्य आहे.

शके १७० (?) पराभव नाम संवत्सरे आषाढ मासे शुक्ल पक्षे चतुर्दशी इंदुवासरे तदिने समाप्तः।।

हस्ताक्षर त्रिमल भुजेंगराव नाडगौडा सरकार कल्याण व परगणे प्रतापपूर।।छ।।छ।।छ।।

११३ ग्रं.क्र. १४१ **गुरुबोधाष्टक** शिवराम

आ. १७ × ११ सें. पा. ८ × २. कागद पातळ.

प्र.पा.ओ. ८. प्रथम काळी शाई. शेवटी तीन पाने जांभळी शाई. यातच अमृताष्टक रचना आहे. लेखन भिन्न. बोधाष्टक २१ ओव्या व अमृताष्टक ८ ओव्या. काल नाहो.

११४ ग्रं.क्र. ३६ **ग्रंथसंग्रह** दासोपंत

आ. २० × १३ सें. पा. ८ × २. प्र.पा.ओ. १०. त्रु. अक्षर मोठे.

गुरूनी शिष्यास केलेला उपदेश. शेवटची पाने नाहीत. परीक्षा लक्षणाच्या भागात कवीचे कथन :-

श्रीमद्दिगंबरानुचर विरचिते ग्रंथसंग्रह नाम।। श्रीगुरु शिष्य संवादे परीक्षा. लक्षण नाम चतुर्थ प्रकरण ग्रंथ संपूर्णमस्तु।।छ।।

११५ ग्रं.क्र. १०१ **चंद्रलासहस्रनाम** पुराण

आ. १७ × ११ सें. पा. ४० × २. प्र.पा.ओ. १४.

पुराणाधारे सहस्रनाम अंकासह मोठ्या अक्षरात. आचार्यकृत देवीस्तुती. कोहीर निजामाबाद (आंध्र) येथील दक्षिणामूर्ती दीक्षितांची प्रत. लेखनकाल नाही.

११६ ग्रं.क्र. ४८ **वैशाखमहात्म्य** पुराण

आ. २० × १३ सें. पा. ७७ × २. तपकिरी कागद. लेखन बारीक. दोन्ही भागांस लाल रेघा. स्कंद पुराणातील रचनेच्या आधारे. काल निर्देश नाही.

११७ ग्रं.क्र. १७ **योगसंग्राम** शेख महंमद

आ. १७ × १३ सें. पा. २८० × २. प्र.पा.ओ. १२ सं.

मूळ पोथीची ही प्रत आहे. मध्ये बरेच शब्द सुटलेले आहेत. जवळकोटे मास्तर आळंद यांचे लेखन काल नाही.

११८ ग्रं.क्र. ७६ **गणेशमहात्म्य** हेबाळकर

आ. २४ × १३ सें. पा. ७८ × २५. प्र.पा.ओ. १३

कागद पातळ. रेखीव लेखन. अ. २४ त्रु. गणेशदैवताबद्दल माहिती पुराणाधारे हेबाळ गोविंद चिंतामणी याने प्रत केली. भाद्रपद कृष्ण ८ मीस लेखन समाप्त. शक दिला नाही.

शेवटी :

अनंतमुनी वाक्यबीज।।
कर्ताकरविता गणराज।।
ग्रंथ चालिला सहजीसहज।।
श्रवणकाजे इच्छिल अर्थू।।२४।।

११९ ग्रं.क्र. ३९ **बाड** महानुभावीय

आ, ११ × ८।। सें प्रा ७४ × २ प्र, पा. ओ. १२

कापडी वेष्टन. सं.

प्रथम १ पानात गीताश्लोक. नंतर पुढे सांकेतिक लिपीत लेखन. अक्षर स्पष्ट व सुटे. आरंभीचा भाग बाळबोध लिपीत २ पाने.

आरंभी :

दर्शनप्रकाश। कामीमुद्रा : धर्माकुची योगीलागी सारयोजिती : वेदात वैदंडी : यायी मुंडी : बोक्ता मार्ग हा : मुद्री १२ : नागेश्वर : भैरव : संतनाथ : जालंधरी : धावडी : कळंकनाथ : अघोरपंथ : बाळनाथ : हा जोग जाणिजे बारा : पंथ १२ : धर्मशास्त्र म्हणजे मीमांसकर : तेथे कुचि दर्शन द्विधा रेखा :

शेवटी : तया सन्निधाने रिघोनये: जैसा दंडियाचा।।७४।। प्रतिकुळा पारिघोनये। परिमनोधर्म नेतीकीना: ते सन्निधानी न बद्धितो: जैसा अग्नि संबंधाचा।।७५।। यापरि राखिले ज्ञान।। जरठ झाले या काइसे नही न वचे।। जैसा वट रोपाचा।।७६।। दोरीने बांधून ठेवण्याची योजना. त्यामुळे बाड व्यवस्थित आहे.

१२० ग्रं.क्र. ८५ **उत्तरगीता** शिवराम

आ. २३।। × १५ सें. पा. ३० × २. पांढरा चिवट कागद. प्र.पा.ओ. १७. उभी वही. अक्षर स्पष्ट.

शिवरामाची टीका. अनेक पद पदांतराची योजना. यात

काही लावण्या व शिवरामाचे तेलगू एकमेव पद आहे. मध्येच उर्दू पारसीत काही लेखन केलेले आहे.

काही भाग :

इतिश्री उत्तरगीतायां श्रीकृष्णार्जुनसंवादे प्रथमोध्याय शुभंभवतु।।

शेवटी : शके १७६२ शर्वरीनाम संवत्सरे कार्तिक शुद्ध त्रयोदशी शनीवारी लेखन भागानगरी समाप्त।। चंद्र ११ माहेरमजान सन १२५६ हिजरी. प्रत लेखक नाव नाही.

१२१ ग्रं.क्र. ५० **एकादशस्कंध** शिवराम

आ. १६ × १२ सें. पा. १४३ × २. सं. प्र.पा.ओ. १६. अ. ३१. ओ. १३१५.

मूळ एकादश स्कंधाचे भाष्य नाथ आज्ञेने समश्लोकीत.

आरंभी :

एकादश प्रकट भागवत प्रयासे।
मी अर्थवीन म्हणता पण न प्रकाशे।
काहीच अर्थ न कळे अभिमानियाला।
श्रीएकनाथ दिवटा त्रिजगी उदेला।।
तो नातीचा वाक्य अगत्य मानुनि।।
श्लोकोक्ति बोले शिवराम होऊनि।।

नाथसंबंध कवीने या ग्रंथात स्पष्ट दिला आहे. गंभीरानंदानी याची प्रत शके १८५६ मध्ये योगेश्वरी देवालय अंबेजोगाई येथे केली. त्यावरून केलेली ही प्रत. लेखनकाल नाही.

१२२ ग्रं.क्र. १८३ **निःसंदेहदिनकर** शिवराम

आ. १५×१० सें. पा. ८×२. प्र.पा.ओ. ११. ओ. ८९. सं.

शिवरामाची ही रचना शिष्याची शंका दूर करणाऱ्या गुरूच्या भूमिकेतून आहे.

शेवटी : हा निःसंदेह दिनकरू।। या ग्रंथाचा केला उभारू।। बोलीला शिवराम मुनेश्वरू।। लक्ष्मीवर प्राप्तीशी।। इतिश्री परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमत् पूर्णानंदानुचर टिकाया निःसंदेह दिनकर समाप्त।। सांब शिवार्पणमस्तु।।

लेखनकाल नाही.

१२३ ग्रं.क्र. १८४ **ऋषिपत्न्याख्यान** शिवराम

आ. **१६ × १२ सें.** पान. १६ × २. अक्षर बारीक. सं. कथा कामधेनूचा भाग. प्रकरण– ज्ञान व भक्ती याचे विवेचन याकरिता दिलेला दृष्टांत.

श्रोता व्हावे समाधान। जाले ऋषिपत्न्याख्यान। पुढे गोवर्धनी धारण। करि श्रीकृष्ण परियसा।।६७।। पूर्णानंद परिपूर्ण धरोनि शिवराम अभिधान।। निरूपण चालवी।।

प्रत लेखकाने खाली उर्दूत सन १३१७ फ्सली काल दिला आहे. तो १९०७ इ. स. येतो.

१२४ ग्रं. क्र ५३ **वंशावळी** शिवराम

आ. २२ × १० सें. पा. १६ × २. अक्षर मध्यम. ओ. २५९. सं.

वडील बंधू अनंत यांच्याबरोबर जो संवाद झाला, त्या माध्यमातून अध्यात्म व स्ववंश याची माहिती कवीने दिली आहे.

शेवटी :

या परि देखता उभय बंधु।।
सभेसि जाला परमानंदु।।
सभासद करिती साधु वादु।।
सुख अगाध दोघांचे।।२५८।।

इतिश्री पूर्णानंदानुचर।। शिवरामानंद संवादे वंशावळी समाप्त।। वोव्या।२५९।। श्रीराम जयराम।। जय जय राम।।छ।।

१२५ ग्रं.क्र. १८६ **पंचरत्नमाला** शिवराम

आ. १२ × ८ सें. ५ पा. सं. अक्षर मध्यम. आचार्यांच्या श्लोकाची समश्लोकी.

कवी म्हणतो :
रत्नाची दीपिका हे प्रकटित।।
सहज भाविकाचेनि काज्ये।

१२६ ग्रं क्र. १८७ **मनीषापंचक** शिवराम

आ. १२ × ८ सें. पा. ७ × २. बारीक अक्षर. सं.

आरंभी :

ॐ नमो सद्गुरुनाथा। कवतुक जाले तुज वंदिता।। यति अंत्यज संवाद कथा। होय पुसता ते ऐका।।१।।

शेवटी : ब्रह्मांडादि देवपंगती। निज किरीट रत्नेदीप्ती। विराले दोघां दोनि पण।। पूर्णानंद परिपूर्ण।। गेले

हरपोनि एकरसि। हे मनीषापंचक आख्यान।। सुंदर केले सुंदराने।। वक्त्या श्रोत्या नारायण।। अभिनवपणी शिवरामा।।छ।।

१२७ ग्रं.क्र. १८८ **वाक्यसुधा** शिवराम

आ. २० × १५ सें. पा. ७० × २. ओ. १०३१. अक्षर ठळक. सं.

आचार्यांच्या ७५ श्लोकांवर मराठी भाष्य.

आरंभी :

तेचि विशध निरूपण।
ज्या वाक्य सुधा ग्रंथ म्हणोन।।
सर्व शास्त्र संग्रह लक्षण।।
ते आचार्योक्ति बोलिजले।।१५।।

नंतर टीका आरंभली. काल निर्देश नाही.

१२८ ग्रं.क्र. १८९ **उपमन्याख्यान** शिवराम

आ. ८ × ६ सें. पा. १० × २. ओ. ५१ कागद जाड. क्रोधाचा उपशम तोचि उपमन्य।। असे आरंभी वर्णन.

शेवटी :

वचने संतोषला घननिळ।
सावळा निजधामा।। नेला उपमन्य।।
ऐसा भक्ताचा अखिला। लक्ष्मी नारायण।
शिवरामी पूर्णानंदू।।५१।।

१२९ ग्रं.क्र. २३ **वेदांतसूर्य** श्रीधर

आ. २४ × १३।। सें. पा. ३० × २. कागद जाड ओ. २८१.

त्रु. शेवटची पाने वाळवीने कुरतडलेली.

ठळक अक्षर. काळी गडद शाई. दोन्ही बाजूंस लाल रेघा. प्रथमची पाने गहाळ झाली आहे. वेदांताचा ऊहापोह करणारा. महत्त्वाचा ग्रंथ.

१३० ग्रं.क्र. १९० **भागवत** एकनाथ

आ. २९ × १७ सें. पा. १०४ × २. अक्षर बारीक. प्र.पा.ओ. १३. सं. शेवटची पाने चिकटलेली.

शेवटी :

देश भाषा एकाकार टीकाया संपूर्णमस्तु।। सद्‌गुरु ज्ञानघन येकनाथार्पणमस्तु।।छ।।छ।।छ।।

श्रावण शुद्ध ३ वर्षा ऋतु गुरुवार सोम्य सं. शके १६५१. प्रतलेखक अज्ञात.

१३१ ग्रं.क्र. १९१ **नाथचरित्र** केशव

आ. २० × १५ सें. पा. ४६४ × २. अक्षर साधारण. अ. ३१ ओ. २६३८. सं.

नाथ समाधी नंतरची ही ताजी प्रत. भक्तिविजय-भक्तविजयास याचाच आधार आहे. लेखन शके १७१४ परीधावी नाम संवत्सरे माघ शु।। १३ इंदुवासरे नासिक पंचवटी येथे लेखन जाले.

प्रतीचा काल नाही. पैठण येथील नाथ घराण्यातील गोसावी मधुकर यांच्या प्रतीवरून.

१३२ ग्रं.क्र. १८३ **नृसिंहसरस्वतीचरित्र** जीवन

आ. १० × ८ सें. पा. ६० × २. अ. ३. ओ. ४३५. प्र.पा.ओ. १२. सं.

आळंदीच्या या सत्पुरुषाचे चरित्र जीवन कवीने लिहिलेले. कवी म्हणतो :

शके अठराशे पंधरा साली।।
दुजी तेरासे तीस फसली।।
लक्ष देऊनि गुरुकमली।
स्वामी चरित्र संपविले।।१२२।।
श्रीसंतलीलामृत।।
मंदबुद्धि जीवन बोलत।।
श्रवण करी श्रीगुरु समस्त।।
वसोनि ममांतरी।। (३-१२३)

हा औसा येथील राहणारा कवी. पुढे भागानगरी गेला. श्री. ज. प. पाळेकर यांची प्रत.

१३३ ग्रं.क्र. १९२ **परमामृत** मुकुंदराज

आ. १८।। × १४ सें. पा. १०५ × २. प्र. १४ ओ. ३४८. सं.

मुकुंदराजाचा वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ. आपला शिष्य योगानंदास प्रबोधण्यासाठी ग्रंथरचना केली, हे प्रथमच येथे नमूद होत

आहे. आनंद संप्रदायी महत्त्वाची प्रत. याचा रचनाकाल शके १११०२ विवेकसिंधूपूर्वीचा दिला आहे. तो भाग :

शके अकराशे दोहोत्तरी।
शर्वरिनाम संवत्सरी निर्धारी।।
आग्रहायणी उत्सव योगेश्वरी।।
मुकुंदराज उद्‌बोधे।।३२।।
ॐ तत्सत परमामृत।।
मुकुंदराज उदगीथ।।
योगानंद प्रसीदीत।
साक्षात्कार निगमीचे।।छ।।

१३४ ग्रं.क्र. ५६ **विराट पर्व** मुक्तेश्वर

आ. २१ × १५।। सें. पा. ५५ × २. प्र.पा.ओ. ९. अ. ८. सं. अक्षर ठळक. पांढरा जाड कागद.

प्रतलेखक : विठ्ठल अणा गुमास्ते-देशमुख, परगणे आळंद सरकार किले सोलापूर।। समाप्त।। लेखनकाल १६९४ शके. नंदननाम संवत्सर जेष्ठ सुध १ दिवसी मंगळवार.

१३५ ग्रं.क्र. १८५ **अनुक्रमणिकाध्याय** पुराण

अ. १६ × १० सें. पा. ४० × २. प्र.पा.ओ. १४.

स्कंदपुराणातील महत्त्वाचा भाग. पूर्ण पोथी वाचल्याचे श्रेय या पठणाने प्राप्त होते. सन्नती येथील चंद्रलांब देवीचे अर्चक भीमाचार्य यांनी १९५० मध्ये प्रत केली.

१३६ ग्रं.क्र. ६२ **अष्टवक्रगीता** शिवराम

आ. १९ × १४।। सें. पा. ३० × २. अ. २० ओ. २९५

वेदांतपर विचाराचे विवरण. मराठी भाष्य-प्रतलेखन शके १८४७ क्रोधनाम संवत्सर पौष शु।। ११ भार्गवारे.

इदं पुस्तके संपूर्ण। हरसूर रायेश्वरात्मज रामनाथसुत रायेश्वर उर्फ दादाख्य सुबुद्ध ताराय लिखित संपूर्णम्‌।छ।।

१३७ ग्रं.क्र. ७५ **भक्तराज** ज्ञानेश्वर

आ. १४ × १० सें. पा. २० × २. प्र.पा.ओ. ५. अक्षर मोठे. उजव्या कडेला वाळवीने भोके. ओ. ३०२ पोथी जीर्ण।।

प्रारंभ : ॐ नमोजी अनादिसिद्धा।। अनाक्षरा आनंदकंदा।। चिदानंदा अभेदा।। अविनाश तु।।१।।

शेवटी : ग्रंथानाव भक्तिराज।। मऱ्हाठा बोलीजो सहज।। भक्तिभावे चिंतन तुज।। अखंड हृदयी असावे.

१३८ ग्रं.क्र. १०१ **कैफियत** कोनेराव

आ. ३९ × १७ सें. पा. ५ × २. अक्षर बारीक. मोडीमध्ये. तीन ठिकाणी घडी घातल्याने चीर पडून पाने गळालेली आहेत. प्र.पा.ओ. २५ सं.

कोनेराव अण्णा देशमुख सावळेश्वर ता : आळंद यांनी टिपलेली ही कैफियत. चैतन्य व सूफी संप्रदायावर प्रकाश टाकणारी नोंद यात आहे. रूढ कल्पना स्पष्ट होते. लेखनकाल सन १२३६ फसली (१८१६ इ.स.) ची नोंद.

आरंभ : कैफियत लाडलेमशाखेचे पूर्वील वृत्तांत कसबे आळंदसी आलेलीचे वडिलानी सांगितल्याप्रमाणे कोनेराव आणा सावळेश्वरकर यांनी आपले घरी लिहिला आहेत. १२३६ फ.

१३९ ग्रं.क्र. १३२ **दत्तात्रेयसहस्त्रनाम**

आ. १६ × १० सें. पा. २१ × २. प्र.पा.ओ. ७ ओ. १४३. सं.

शेवटी : इतिश्री परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमच्छंकराचार्य विरचित स्वप्रावस्थायां दत्तात्रेयोपदेशितं सकल पुराण वेदोक्त प्रपंचार्थ सार व संग्रह नामस्तोत्र।। श्रीगुरु दत्तात्रेयार्पणमस्तु।। श्रीगुरु सन्निधसमाप्त।।छ।।छ।।छ।।

१४० ग्रं.क्र. ७ **पूर्णानंदचरित्र** हनुमदात्मज

आ. १० × १६. सें. पा. ३०८ × २. अक्षर बारीक. त्रु. अ. १८; पण मधूनच काही पाने गहाळ झाली आहेत.

१४१ ग्रं.क्र. ३० **पर्याय शब्द** बाळाजी

आ. २३ × १३।। सें. पा. २५ × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर गिचमिड. कागद जाड.

ज्ञानेश्वरीच्या संहितेतील शब्दार्थ.

आरंभी : इति पर्याय शब्द प्रारंभ। श्रीकृष्णाये नमः।। पुस्तक पर्याय शब्द लिहिण्यावरून पुस्तकातील वोवियाचा अंख (क) पाहून मनास आणणे।। अध्या।।१।। वोवी।।३।।

शब्दब्रह्म।। वेद।। वर्ण वपु।। अकारादिका।।

शेवटी : शक. शोभनकृत नामसंवत्सर जेष्ठ शु।। १५ सोमवार. लेखक बाळाजी लक्ष्मण आळंदकर लिखितं।।छ।।

आळंद वासुदेवमहाराज यांच्या वंशजाचे लेखन

१४२ ग्रं.क्र. ८६ **देवीमानसपूजा** शास्त्र

आ. १९ × १२।। सें. पा. १५ × २. लेखन स्वच्छ. प्र.पा.ओ. ७. ओ. ७५ त्रु.

कसरीने खराब स्थिती.

१४३ ग्रं.क्र. ७३ **अनेक अर्थध्वनिमंजिरी**

आ. २१ × ९ सें. पा. २६ × २. प्र.पा.ओ. ७.

लेखन सुटसुटीत. प्रत्येक ओवीस लाल शाईची खूण.

शब्दार्थाच्या पद्धतीनेच विवेचन. मूळ संस्कृत रचनेसह.

१४४ ग्रं.क्र. १०२ **कुळकटी**

आ. ७ × २० सें. पा. १२५ × २. मोडी लिपीतील लेखन.

आळंद येथील धर्माधिकारी व ग्रामजोशी यांच्यातील गणपती पूजेचा वाद हंपी शंकराचार्य यांनी मिटविला. तो निवाडा यात आहे.

फसली सन १२७६ (इ.स. १८८५) स याचे लेखन झाले.

१४५ ग्रं.क्र. ९३ **नरोणाक्षेत्रपाल** लिंगणभट

आ. २० × ९ सें. पा. १०२ × २. कागद जाड. प्र.पा.ओ. ७.

आळंद परिसरातील नरोणा येथील विश्वेश्वर स्थान, रामस्थापित लिंग, कार्तिकस्वामी, अष्टतीर्थ यांची माहिती यात आहे. लेखनकाल शके १७०२ तेथील लिंगणभट्ट ग्रामजोशी यांनी लेखन केले.

१४६ ग्रं.क्र. ७९ **नागेशलीलामृत** भानजी देशपांडे

आ. १८ × २१ सें. पाने ६०० × २. अक्षर मध्यम. प्र.पा.ओ. २०.

चैतन्य संप्रदायी वडवळ नागनाथ शिष्य परंपरेचा ग्रंथ. अर्वाचीन कवी भानजी त्रिंबक देशपांडे यांची रचना. यात काल दिला नाही. चैतन्य संप्रदायाचा अर्वाचीन इतिहास टिपलेला आहे.

१४७ ग्रं.क्र. १९८ **स्तवनमंजिरी** योगानंद

आ. १७ × २६ सें. पा. ३५ × २. प्र.पा.ओ. २०. ओ. २३२.

मुकुंदराज शिष्य योगानंद यांनी गुरूच्या स्तवनाची रचना केली. यात गुरूची व थोरवी जैतपाळ राजा, त्याची उपरती हा विषय विस्ताराने आहे. मुकुंदराज चरित्रात राजाने बंदिस्त केले, जाते भरडण्यास लावले, ही दंतकथा येते. ती येथे विस्तारपूर्वक आहे. योगानंदाची ही रचना शके ११०० ला केली अशी नोंद. संप्रदायाच्या दृष्टीने महत्त्वाची प्रत.

आर्तोद्गीत ऱ्हदी स्फूर्त हाकाटी गुरु पाऊले। योगानंद स्तुति मूर्त मुकुंद पद वाहिले। सबाह्यभ्यंतरी पूर्ण अणु रेणु तृणांतरी। मंजिरी तरु कल्पेची तुझिया पदी वाहिली।।२३०।।

दासाचा दासत्व च्यरणी साष्टांगे सर्वथे श्रयी। समर्थे करुणा पूर्णे वरपाणि भया श्रयी। योगेश्वरी परांबा श्रीकृपे सद्गुरु भेटले। अक्षरे मातृका बिजगुरु पादाब्ज अर्पिले।।२३१।।

आनंद संप्रदायी गोविंदानंद स्वामीच्या प्रतीवरून प्रत केलेली.

१४८ ग्रं.क्र. १९५ **परमामृत** मुकुंदराज

आ. २० × १५. सें. पा. ६०. प्र.पा.ओ. १०. प्र. १४ ओ. ३२६

प्रत शके १७६८ पराभव नामसंवत्सर श्रावण शु. एकादशी इंदुवासरे सायन्हे समाप्ती गतम्।। श्री अमृतसुधा समाप्त. ही अर्वाचीन प्रत.

१४९ ग्रं.क्र. १९६ **परमामृत** मुकुंदराज

आ. २२ × १७ सें. पा. ४२ × २. अक्षर बारीक. प्र. १४. ओ. ३२५.

प्रत १७४१ शके. सदाशिव मोहिते प्रत तारणनाम संवत्सर. उत्तरायण वै. व।।६ शके १७४६ सखाराम. लेखन सं१पूर्ण. ही तंजावर ग्रंथाची प्रत.

१५० ग्रं.क्र. १९३ **प्रल्हादचरित्र** एकनाथ

आ. १८ × ७ सें. पा ८ × २. प्र.पा.ओ. ७. ओ. १०१

ही नाथ महाराजांची रचना दुर्मिळ आहे. नाथ वंशज मधुकर गोसावी पैठण यांच्या संग्रहातूनची प्रत.

शेवटी : यका जनार्दनराम।। भक्तकामकल्पद्रुम।। निवारी भ्रमाचा भ्रम। भवभ्रम उरो नेदि।।१०१।। श्री प्रल्हादचरित्र संपूर्णमस्तु।।

१५१ ग्रं.क्र. १०९ **योगवाशिष्ठ** हरिदास

आ. २८ × १३ सें. पा. १०५० × २. प्र.पा.ओ. १३. ठसठशीत लेखन. ओ. १६०००.

प्रचंड अशी वेदांतपर रचना. प्रतलेखक अज्ञात. शके १६१९ ईश्वरनाम संवत्सर अश्विन व।। ७ रविवार याचे लेखन भागानगरी झाले. स्थिती छान.

१५२ ग्रं.क्र. १०७ **एकादशस्कंध** एकनाथ

आ. ३० × १७ सें. अक्षर मोठे. प्र.पा.ओ. १२. शेवटचे २ अध्याय चिकटून एकजीव झालेत. अनेक अध्यायांच्या शेवटी रंगीत चित्रे. चित्रे भिजून खराब. अक्षर सुंदर; पण जीर्ण अवस्थेतील पोथी. गोविंद तुकाराम बडवे पंढरपूर यांची प्रत.

१५३ ग्रं.क्र. १८६ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. २० × १४ सें. लालसर कागद. प्र.पा.ओ. ११.

प्रथम पान लाल शाईत. दोन्ही बाजूंस लाल रेघा. चरणास लाल दंडरेषा. अ. ५१ सं. शके १७१३. प्रतलेखन विरोधीकृतनाम पौष व।।१४ रवि. एकूण ओ. ७१५१ गाणगापूर देवस्थानची प्रत. गुरुचरित्र कोनाड्यात प्राचीन काळी पूजा होत असावी. अलीकडेच ती वे. वामन भीम भट्ट पुजारी यांच्या घराण्यातून उपलब्ध झाली.

१५४ ग्रं.क्र. १८७ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. १०।। × १०।। सें. प्र.पा.ओ. १०. ओ. ७४०५. अ. ५१ सं. कागद जाड. स्थिती चांगली.

प्रत्येक अध्यायास चित्रे. संशोधनदृष्ट्या महत्त्वाची प्रत।। यातील पाठभेदात ज्ञानेश्वरास वंदन स्पष्टपणे आहे. प्रत १७२२ शके प्रवर्तमान माघ व।।१२. मूळ ग्रंथाची फोटो प्रत. हिप्परगा प्रतीवरून. सुटलेले शब्द काकपद दर्शवून समासात लिहिलेले आहेत.

१५५ ग्रं.क्र. १९४ **बोधामृत** शिवराम

आ. ३० × २० सें. पा. ६ × २. ओ. ५३.

समश्लोकी भाष्य. वेदांत विवेचन. 'अनंत देही आत्माच दिव्य असा आहे' ज्ञानाग्नीने कर्म जाळावे. आत्मतत्त्व लता फोफावली की, त्यावर अमृतासमान गोड फळे लाभतात. ती फळे चारून जीवास भरवावे. गुरूंच्या पदतीर्थाने हे सर्व घडते, असा वेदांत ग्रथित झाला आहे.

१५६ ग्रं.क्र. १९५ **होळीचे पद** शिवराम

आ. १० × १२ सें. पाने १२ × २. अक्षर बारीक. ओ. २५.

ही कवीची एकमेव वानगी. होळीच्या प्रसंगी उपयोगी अशी भाषा. मानवी मनाचे दोष व अज्ञान यावर कोरडे. अशा प्रसंगीच्या भाषेतूनही वेदांताचीच चर्चा आहे. हुताशनानंद प्रतीवरून नकल केलेली प्रत.

१५७ ग्रं.क्र. १२८ **बाड**

आ. ३० × १५ सें. पा. ४० × २. अक्षर मोठे. काळी शाई.

हनुमंत कवीकृत विविध विपुल रचना. मराठी व कानडी भाषेत. बरीच रचना चित्तवेधक वाटते.

१५८ ग्रं.क्र. १९३ **कृष्णजन्माख्यान** शिवराम

आ. २० × १४ सें. पा. ३२ × २. बारीक अक्षर. ओ. १९०.

शिवरामाची भाषा मोहक भासते. वेधक भाग :

ऐसा जन्मला कृष्णनाथ। सर्वांचा पुरला मनोरथ।। ज्याचे रूप नभातीत।। गोपिका न्हाणिती तयासी।।६८।। विराट रूप ज्याचे थोरी।। तयासी घालती पायावरी। ज्याचे हात देवाचे शिरी। माखिती तयासी।।६९।। गंगा जन्मली ज्याचे चरणी। त्यासी ओतती ओंजळीने पाणी। जो द्रौपदीचा वस्त्रदानी।।

दुपटी तयालागी पांघरिती।।७०।। जेणे केली ब्रह्मांड रचना।। घालिती पाळणा तयासी।। जयासी रूप ना वर्ण।। तयासी घुगऱ्या घालिती।।७३।।

१५९ ग्रं.क्र. १९६ **बाड**

आ. २५ × ३० सें. पा. ८० × २. अक्षर मध्यम.

शिवरामाची विपुल रचना. मराठी भारुडाबरोबर कानडी भारुडेही आढळतात. ललितपदे.

१६० ग्रं.क्र. १९७ **श्रीगुरुस्तवन** जनार्दनस्वामी

आ. २०×१२ सें. पा. ११×२. प्र.पा.ओ. १२. ओ.२५.

जनार्दन स्वामींनी गुरुकृपेचे वर्णन केले. त्यांच्या स्वानुभवाचे हे कथन महत्त्वाचे. नाथ परंपरेत यवन संबंध जोडण्याचा यत्न भ्रामक याची कल्पना येते. बालस्वामीकडील प्रतीवरून केलेली प्रत. काल नाही.

१६१ ग्रं.क्र. १९८ **बाड**

आ. २२ × १७ सें. पा. ३८ × २.

यामध्ये भीमराज, दक्षिणामूर्ती स्तोत्र शिवरामकृत. ज्ञानदेवदत्तदर्शन. समर्थकृत आरती. तुकारामाचा गाणगापूर वरील अभंग, पाताळगंगा वर्णन. समर्थ शिवराम भेट, मृत्युंजय अग्निप्रवेश (३५ ओवी) प्रकरण, संप्रदायदृष्टीने महत्त्वाचे संकलन. बालस्वामी महाराज संग्रहातील प्रत.

१६२ ग्रं.क्र. २०५ **बाड**

आ. ३१ × १२ सें. पृ. ४७ × २. प्र.पा.ओ. १५

या बाडात तुकारामाचे विपुल अभंग, तसेच शिवरामस्वामींची पदे. शिवदास कवीची विविध रचना. बाडाची पहिली व शेवटची पाने गळून गेली. समर्थ हरिपाठ, भूपाळी, आख्यान. शेवटच्या अभंगास क्रमांक १०३ दिले. त्यानंतर अन्य रचना. मुळात बाड खूप मोठे असावे.

१६३ ग्रं.क्र. २१५ **करीना** नरसप्पा

आ. ३० × १३ सें. पृ. ४ × २. प्र.पा.ओ. १७.

अक्षर साधारण. सं. गद्य स्वरूपात घटनेची संपूर्ण माहिती. गाणगापूरजवळील मान्यहाळ येथे केशवचैतन्य यांचा मठ आहे. तो मठच आज शेख शहाबुद्दीन दर्गा म्हणवला जातो. तेथे दर्ग्यात लिंगाची पूजा होते. ब्राह्मण पुजारी वंशपरंपरेने आहेत. त्या घराण्यातील मागील पिढीतील नरसप्पा पुजारी यांनी या स्थानाबद्दल व त्यांच्या घराण्यातील पूर्वजांबद्दल महत्त्वाच्या गोष्टींची नोंद केली. कैफियत रूपाने उपलब्ध आहे. लेखन मोडीमिश्रित आहे. काल दिलेला नाही.

१६४ ग्रं.क्र. २२६ **श्रीदत्तात्रेयनामामृत** दासोपंत

आ. ७ × १२ सें. प्र.पा.ओ. १०. सं. श्लो. २१. अक्षर जाड. कागद पातळ.

शेवटी : इति श्री मद्दिगंबरानुचर विरचित दत्तात्रेय नामामृत स्तोत्र संपूर्णमस्तु। श्री देवदत्तात्रेयार्पणमस्तु।।छ।।छ।।छ।।

१६५ ग्रं.क्र. २२९ **सरसंबेकर घराण्याचा इतिहास** कल्याणराव

आ. ३० × १७ सें. पा. ८० × २. अक्षर बारीक. मोडी लिपीत. आळंद परगण्यातील सरसंबेकर देशपांडे घराण्याची पाती आहे. त्या घराण्याचा समग्र इतिहास जुन्या कागदपत्राधारे जुने संशोधक कल्याणराव देशपांडे यांनी टिपलेला आहे. लेखनकाल (इ. स. १९३२) फसली सन १३४२ असा दिला आहे. निजाम राजवटीत तीच पद्धत होती.

१६६ ग्रं.क्र. २३० **खजुरी घराण्याचा इतिहास** कल्याणराव

आ. ३० × १७ सें. पा. ६४ × २. अक्षर बारीक. मोडी अक्षरात. आळंद परगण्याचे खजुरी देशमुख घराणे पुरातन असून विविध सनदा, करीना, कैफियतीद्वारे टिपलेला इतिहास. कुलदेवता बनशंकरी आणि पुढील काळात व्यंकटेश उपासना याची नोंद. लेखनकाल (इ. स. १९३०) फसली सन १३४०. हैद्राबाद संस्थानातीलही पद्धत होय.

१६७ ग्रं.क्र. २३१ **टिपण**

उत्तर कर्नाटक म्हणजे हैद्राबाद कर्नाटकातील गुलबर्गा बिदर परिसरात उपलब्ध असलेल्या जुन्या बाडातून जी संतकवींची रचना आढळते त्यातील विविध रचना तपासून अप्रकाशित अशा रचनेची ही वेगळी नोंद टिपण वजा आहे. यात खालील

संतांची रचना त्यांच्या पद्य संख्येसह दिली आहे. संशोधनदृष्ट्या महत्त्वाची नोंद सकलसंतगाथेत वा अन्यत्र ही रचना नाही. पडताळून टिपलेली रचना एकूण ५७. तुकाराम (२३), निवृत्तीनाथ (२), एकनाथ (१०), जनार्दनस्वामी (१), मुक्ताबाई (१), ज्ञानेश्वर (१०), नामदेव (४), जानाबाई (२), मालो (१), भानुदास (१)

१६८ ग्रं.क्र. २३३ **आत्मारामखेळ** ज्ञानदेव

आ. १७ × १२ सें. पा. ६. प्र.पा.ओ. ७. अक्षर मोठे. ओ. २७ सं.

आरंभ :

आरैता येरे धाकटा मूळा।।
कश्याने आले थोरपण तुला।।धृ।।
इलुसरे की रे दिसतो पोर।।
ब्रह्मी काय लहान थोर।।१।।

शेवटी : सारा खेळ त्याचाच कायरे।।
खेळ खेळुनि उरला की रे।।२६।।
हा खेळ तुला कशाने कळला।।
ज्ञानदेव म्हणे निवृत्ती प्रसादे।।
फळासी आला।।२७।।

१६९ ग्रं.क्र. २३२ **अग्निप्रवेश** मृत्युंजय

आ. १७ × १३ सें. पा. ९ × २. प्र.पा.ओ. १६. ओ. ३५. सं.

आरंभ :

अग्निप्रदिप्त करुनी गुरुद्वारी तत्क्षणी।।
आज्ञापिती मज मुनी उडी घालिया क्षणी।।
शब्द सर्वे दत्तकरी झुकलो स्वभावे।।
गुरुदेव दत्त म्हणुनी अनळी तंतु झोकिलारे उडाणे।।१।।

शेवटी : पाखंड खंडुनी मठी श्रुति मार्ग वाहू।।
सद्धर्म पावन घरी आम्ही नित्य सेवु।।
येणे परी कळिमळ निपटुनी काढू।।
जेणेचि भुवरी समंगल यशेश्रीय धर्म वाढू।।३५।।

रचनेत मृत्युंजय व गुरूंचा संवाद स्पष्टपणे आला आहे. बालस्वामी संग्रहातील रचनेची ही प्रत आहे.

१७० ग्रं.क्र. २२४ **दत्तधावा** दासोपंत

आ. १४ × २० सें. पा. ८ × २. कागद जाड; पण जीर्ण. अक्षर मोठे. ओ. ४२. सं.

दासोपंत दत्तोपासक. त्यांनी संकट समयी केलेली दत्ताची प्रार्थना व ते वर्णन या रचनेत आलेले आहे.

आरंभी : श्री गणेशायम नम:।। श्री दत्तात्रेय नम:।। देह देहीचा आत्मारामु।। परब्रह्म आवधात घन:शाम।। नमस्कारिता त्रिविधे हरेश्रम।। ज्ञानसागरा अखिल पूर्ण कामु।।१।। अर्थिस्तविले सखिया माझे मन।। चिंतन पुरे लागले तुझे ध्यान।। परब्रह्म श्री दत्तु गुणहीन।। रूपी अरूपी निशब्द: निरंजन।।२।।

शेवटी :

ऐसे स्मता पावला भास मुरडी।।
दत्तु मा भेदाची भास मुरडी।।
मन विरोनी जाय घेता गोडी।।
भव भाव स्वभाव सर्व सोडी।।४०।।
दृष्टि देखता दिखणा नय माय।।
अंगी अंगे प्रकट रूपे आहे।।
मन कधी हे भारची विरोन जाय।।
++य संचली ठाय ठाय।।४१।।
धावा करिता शोकोनी विरे मन।।
दत्तु आत्मा स्वरूपी निरंजन।।
निभास भास स्वना शन।।
दिगंबर अद्वय ब्रह्म पूर्ण।।४२।।
धावा संपूर्णमस्तु।।छ।।छ।।छ।।

१७१ ग्रं.क्र. २३५ **बाड**

आ. ७ × १२ सें. पृ. ३० × २. जीर्ण बाडाची उभी पोथी. काही पाने उसवलेली. तपकिरी रंगाचा पातळ कागद. काळी शाई. काही भाग पुसट. प्र.पा.ओ. २०. विविध स्फुट रचना.

प्रथम शिवरामस्वामीची लळिताची रचना. यात मराठीबरोबरच हिंदी व कानडी पदे. भाषा कानडी व लिपी मराठी असे लेखन. या अशा रचनेत मराठी भारुडाच्या धर्तीवर कानडीत भारूड रचना. ब्राह्मण कुणाला म्हणावे, जंगम कुणाला म्हणावे, यावर मार्मिक लेखन. झोळीचा प्रताप, इ. रचना. दखनी हिंदी भाषेत वेदांतपर विपुल पदे. स्त्रियांच्या भाषेत

कथन केलेला वेदांत मर्मग्राही आहे. काही वानगी :

(१) घर झाडी।। झाडील घर बाई।। शुद्ध केलि बाई।।
प्रकृति पुरुष गुण धर्म उरू दिला नाही।।१।।

(२) सत्कर्माचा सडा बरा घालुनिया द्वारी।।
माझि घरचि तोजवरी दावी लोकचारी।।१।।

(३) जिन आपकु जोया नही।
तन्मनकु खोया नही।।
मन मैल धूया नही।।
अंगुले किया तो क्या हुवा।।१।।

(४) विचार कांडणी कांडिता सायसे।।
वरील पंचकोश साच कोंडा।।३।।
उखळ मुसळ कवण्या कामा आता।।
आल्यावरी हाता शुध धान्य।।५।।
पूर्णानंदी सर्व सरले हो काम।।
माहेर शिवराम भेटलिया।।६।।

कानडीत कुडमुड्याचे पद; तसेच यात एकनाथ रचना संस्कृत उतारे आणि अनामिक कवीचे दामाजीचे त्रोटक चरित्र मल्हारी मार्तंड स्तुतीपर विविध रचना.

श्रीवासुदेवमहाराज मठ, आळंद

१७२ ग्रं.क्र. १ **वरदीगुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. ३० × १४ सें. अ. ५१. ओ. ७२८१. जाड कागद. काळी शाई. प्र.पा.ओ. १२. चांगली प्रत. सं.

मलपृष्ठावर वरदीगुरुचरित्र नाव नंतर लिहिलेले. मूळात श्रीगुरुचरित्र असेच आहे. हा ग्रंथ मठात पूजेतील असून, प्रतीत शेवटी.

हा ग्रंथ वासुदेव महाराज मठसंस्थान आळंद याचा असे।।छ।। प्रतीचा काल रुधिरोग्दारी नाम संवत्सर मार्गशीर्ष व।। १२ शके १७२५. मठात पोथी बांधलेले कापड भिजवून पाणी तीर्थ म्हणून देत. अनेक बाधा दूर होत. ही परंपरा म्हणून नाव श्रीवर दी गुरुचरित्र असे झाले. वासुदेव महाराजांच्या कुबडीसह या ग्रंथाची पूजा होते.

१७३ ग्रं.क्र. २ **रामविजय** श्रीधर

आ. ३० × १९ सें. प्र. पा. ओ. १५ अ. ४० सं. ओ. ९१०७. प्रत्येक चरणास लाल दंड.

शेवटी : शके १७१३ विरोधीनाम संवत्सरे माघ वद्ये भानुवासरे तदिनी रामविजय ग्रंथ संपूर्ण। हे पुस्तक मल्हार मुकुंद दबडघाव हल्ली वस्ती मौजे डाळंज प्रगणे इंदापूर शुभ।।छ।। ग्रंथ संख्या ९१०७ नऊ हजार येकशे सात श्लोक समाप्त।।

१७४ ग्रं.क्र. ३ **सुदामचरित्र** कचेश्वर

आ. ४६ × ३१ सें. मोठ्या कागदाची घडी. ४ पाने × २. अक्षर मोठे. त्रु. ओव्या. ७५ पासून १०२ पर्यंत.

शेवटी : सुदाम देवा हरि पावला हो।। त्याची मनी नाम लाहो। ते नाम योगे नीधी लाधला हो। कचेश्वराला हरि पावला हो।।१०२।। सुदाम चरित्र समाप्त।।श्रीराम।।

१७५ ग्रं.क्र. ४ **भक्तिराज** ज्ञानेश्वर

आ. १७ × १० सें. अक्षर मोठे. पा. २५. पांढरट कागद. त्रु. मधील पाने आहेत. प्रथमचा व शेवटचा भाग नाही. २ ते २६ पाने आहेत.

आरंभ : अरुपा असंगा आकळा।। अपरंपरातु।।२।।

शेवटचा भाग नसल्याने काल व लेखक निर्देश नाही.

१७६ ग्रं.क्र. ५ **रुक्मिणी स्वयंवर** एकनाथ

आकार २५।। × १० सें. पृ. ३१२ × २. कागद जाड, तांबूस. सं. लेखनकाल नाही.

१७७ ग्रं.क्र. ६ **दासबोध** रामदास

आ. २५।। × १५ सें. पृ. २८४ × २. सं.

या ग्रंथाचे लेखन शके १७३४ ते १७३५ या कालखंडात झाले. वासुदेव महाराज मठ परंपरेतील शिष्याचे लेखन आहे. प्रत्यक्ष समर्थांनी दिलेली मारुतीची प्रसाद मूर्ती मठात पूजेत आहे. म्हणून रामदासी मठ म्हणून ओळखतात.

१७८ ग्रं.क्र. ७ **उत्तरगीता**

आ. १३ × २१. सें. पा. ३६ × २. प्र.पा.ओ. १०. केवळ ३ अध्याय. त्रु. संस्कृत श्लोकासह टीका. शेवटची २ पाने गहाळ. त्यामुळे कवी, प्रत लेखक व काळ अज्ञात.

१७९ ग्रं.क्र. ८ **गुरुगीता**

आ. १० ×६ सें. पृ. १८ × २. प्र.पा.ओ. ५. अक्षर रेखीव. कागद जाड. लाल चौकट पानास. शके १६९६ रचनाकाल. प्रत लेखक अज्ञात. ।।विजेयनामसंवत्सरे अस्वीन वद्य त्रितीया भृगुवासरे तदिनी समाप्त।।

१८० ग्रं.क्र. ९ **भगवद्गीता**

आ १७।। × १० सें. पृ. १८ × २. गीता भाष्याची रचना. त्रु. अक्षर मोठे. शेवटचा भाग नाही.

१८१ ग्रं.क्र. १० **विष्णुसहस्रनाम** पुराण

आ. २० × १० सें. पृ. ४४. सं. पोथी छान. मठातील. लेखनकाल नाही.

१८२ ग्रं.क्र. ११ **रुक्मिणी स्वयंवर** एकनाथ

आ. ११ × १६ सें. पृ. १४ × २. त्रु. लेखनकाल नाही. अक्षर साधारण.

१८३ ग्रं.क्र. १२ **रेणुकामाहात्म्य** पुराण

आ. ७।। × १० सें. पा. १४० × २. प्र.पा.ओ. १०. शेवटी ३२ पाने नाहीत. पद्म पुराणाचा भाग.

१८४ ग्रं.क्र. १३ **भागवत** एकनाथ

आ. २२।। × ९ सें. पा. ७२ × २. त्रु. प्रत. प्र.पा.ओ. ६. शेवटचा भाग नाही.

१८५ ग्रं.क्र. १४ **विष्णुसहस्रनाम** पुराण

आ. ७ × १२।। सें. पा. ५२ × २. कागद जाड. शांती पर्वाचा भाग. काल नाही.

१८६ ग्रं.क्र. १५ **जातकशास्त्र**

आ. १२।। × १५ सें. पृ. २० × २. संस्कृत श्लोक व टीका. प्रत लेखक, काल अज्ञात.

१८७ ग्रं.क्र. १६ **मल्हारीमाहात्म्य** पुराण

आ. १७ × १० सें. पा. ६ त्रु. प्र.पा.ओ. ७ त्रृ.

इति ब्रह्मांड पुराणे पंचमस्कंद क्षेत्रखंडे मल्लारी महात्म्य स्तोत्र सप्तदशोध्याय।।छ।।

१८८ ग्रं.क्र. १७ **वायुस्तुती** विक्रम पंडित

आ. १० × १५ सें. पा. ४८ × २. त्रु. शेवटचा भाग नाही. मध्व संप्रदायी माणसाचे लेखन. प्रतीचा काल शके १७३३. तिथी नाही.

१८९ ग्रं.क्र. १८ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. २१ × १५ सें. पा. ६ ० × २. त्रु. प्रथमचा बराच भाग नाही.

वासुदेव महाराज मठातील वंशज राजाराम बुवा यांनी श्रावण व।। १० रौद्र संवत्सरी प्रत केली. शकाचा आकडा नाही.

१९० ग्रं.क्र. १९ **पंचमुखी हनुमान**

आ. १५ × १० सें. पा. ५५ × २. सं.

सुदर्शन संहित आधारे टिपलेले अशी नोंद, प्रत लेखक काल निर्देश नाही.

१९१ ग्रं.क्र. २० **ज्ञानेश्वरी** ज्ञानेश्वर

आ. ३२ × १६।। सें. प्र.पा.ओ. ११ त्रु. प्रत

यात अध्याय ६, ७, ८ उपलब्ध. चरणास लाल दंडरेषा. अक्षर बारीक-रेखीव.

१९२ ग्रं.क्र. २१ **ज्ञानेश्वरी** ज्ञानेश्वर

आ. २८ × १० सें. पा. ६०० × २. अक्षर रेखीव. ठसठशीत. प्रत लेखक अज्ञात. मठातीलच लेखन असावे. कारण गुरूनमनात वासुदेव महाराजांचे नाव. पोथी भिजून पाने चिकटलेली आहेत.

१९३ ग्रं.क्र. २२ **ज्ञानदेवी** ज्ञानेश्वर

आ. २०॥ × १४॥ सें. पा. ४२ × २. प्र.पा.ओ. १२ त्रु. यात १६ वा अध्याय

१९४ ग्रं.क्र. २३ **ज्ञानदेवी** ज्ञानेश्वर

आ. २२ × १५॥ सें. पा. ६ × २. प्र.पा.ओ. १२. त्रु. अ. १७, १८ चा भाग उपलब्ध.

१९५ ग्रं.क्र. २४ **अश्वमेध**

आ. ३२ × २० सें. पा. ६६० × २. सं. प्रत लेखक नाव नाही. काल नाही. प्रत्येक चरणास लाल रेघा. दोन्ही बाजूंस जोड लाल रेघा.

१९६ ग्रं.क्र. २५ **हरिविजय** श्रीधर

आ. ३५ × १०॥ सें. ४६० × २. कागद जाड. अक्षर बारीक. प्रत्येक चरणास लाल दंड. प्रत लेखक व काल नाही.

१९७ ग्रं.क्र. २६ **एकादशस्कंध** पुराण

आ. २५॥ × १२॥ सें. पा. २८० × २. सं.

वासुदेव महाराज यांच्या हातची संहिता. अक्षर चांगले. काल नाही. वासुदेव महाराज नाथ अनुग्रहित होते. नाथांनी दिलेली प्रसादमूर्ती रामांकितसीता पूजेत आजही आहे.

१९८ ग्रं.क्र. २७ **जातक परिज्ञान** शास्त्र

आ. २८ × १२॥ सें. पा. ९८ × २. यात शास्त्राचे विवेचन. कागद जाड. लेखनकाल १७६९. शके-तिथी नाही.

१९९ ग्रं.क्र. २८ **पर्यायशब्द** बाळाजी

आ. २८ × १५ सें. पृ. ८० × २. सं. लेखन. बाळाजी लक्ष्मण यांचे असून, शोभननाम संवत्सर जेष्ठ शु॥१५ सोमवार लेखनकाल-शकाचा आकडा नाही.

२०० ग्रं. क्र. २९ **उद्योगपर्व** श्रीधर

आ. २५॥ ×१५ सें. पा. २९४ × २. कागद जीर्ण. अक्षर साधारण.

२०१ ग्रं.क्र. ३० **समासचक्र**

आ. २० × १० सें. पृ. १६ प्र.पा.ओ. १०. त्रु. लेखन निष्काळजीपणाने केलेले दिसते. काल निर्देश नाही.

२०२ ग्रं.क्र. ३१ **ज्ञानेश्वरी** ज्ञानदेव

आ. २५ × १० सें. पृ. ६८ × २ त्रु. प्र.पा.ओ. १२ बारीक अक्षर. १ ते ९ उपलब्ध.

२०३ ग्रं.क्र. ३२ **भागवत** एकनाथ

आ. २५॥ × १२॥ सें. पृ. ८० × २. त्रु. प्रथमचा भाग नाही. प्रत मठाचे वंशज बाळाजी लक्ष्मण यांनी केली. काल नाही. अ. २९ ते ३१ पूर्ण. सर्व कागद भिजून चिकटलेले.

२०४ ग्रं.क्र. ३३ **गीताटीका**

आ. १७ × ११॥ सें. पृ. ४४ × २. प्र.पा.ओ. ७. त्रु. प्रत. शेवटचा भाग नाही. कागद निळसर जाड. भाष्यकार अज्ञात.

आतील ११ व्या अध्यायाची ओवी।
येकेयेकु वेचला॥ शून्य बिंदु शून्य पुसिला॥
दृष्टा दृश्या मिळाला। तैसा होय॥७८॥

२०५ ग्रं.क्र. ३४ **विराट पर्व** मुक्तेश्वर

आ. २५ × १५ सें. ८४ × २. रेखीव अक्षर. त्रु. प्रत. शेवटचा भाग नाही.

२०६ गं. क्र. ३५ **स्वात्मसुख** वेदांत

आ. २५ × १० सें. पृ. ३४ × २. त्रु.

आचार्याच्या अद्वैत तत्त्वज्ञानाचे विवेचन. शेवटचा भाग नाही. कागद जीर्ण. लेखनकाल व प्रत लेखक अज्ञात.

२०७ गं. क्र. ३६ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. २५॥ × १५ सें. पा. २६८ × २. त्रु. शेवटचा भाग नाही. जीर्ण प्रत.

२०८ गं. क्र. ३७ **भवानी सहस्त्रनाम** पुराण

आ. १० × ७॥ सें. पा. १७२ × २. यात नंदिश्वर संवादातून पुराणाचा भाग. काल नाही.

२०९ गं. क्र. ३९ **हनुमान कवच**

आ. ११ × ७ सें. पा. ८ × २. अक्षर तिरपे व रेखीव. प्र.पा.ओ. ८.

शेवटी : इति श्रीसुदर्शन संहिता।। हनुमान कवच संपूर्णमस्तु।। श्रीरामचंद्रापर्णमस्तु ।।छ।।

२१० गं. क्र. ४० **बाड**

आ. २८ × २० सें. पा. ६० × २. जीर्ण. यात मोडीत लेखन. वासुदेव महाराज निर्याणकाल. त्यांच्यावरील पदे; शिवराम, एकनाथ, तुकाराम रचना. मठात, उत्सवात, पालखीपुढे म्हणावयाची पदे आवर्जून दिली आहेत. शिवराम पदाची वागगी

(१) झाडीनबाई।।धृ।।
(२) गुरूने गुंग मला केले।।धृ।।
भुरळ घालूनि एका एकी उलट चालविले।।

२११ गं. क्र. ४१ **रामायणकथा** गोविंदराम

आ. ३० × १० सें. पा. ४६ × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर बारीक. रामायणातील निवडक प्रसंग. लेखक गोविंदराम मौजे सोन्नत कलबुर्गी येथील राहणारा होता.

शेवटी :

समाप्त जाहले।। लिखित हरिरामबोवा।।

सांगनार -गोविंदा

मौजे सोन्नत प्र।। कलबरगा।। सन बाराशे तेतीस फसली तारीख चंद्र

आठवी जफर बुधवार। असविन सुध यकादसि संपूरण जाहले।।

दसरा जाहले दुसरे दिवशी तधीच रामचंद्रार्पणमस्तु।।

२१२ गं. क्र. ४२ **बाड**

आ. २२ × १६ सें. पृ. २२ × २. लेखन सलग.

समासविरहित. विविध संतांची पदे,

अमृत, तुकाराम, शिवराम, केशव, निरंजन, माधव, एकनाथ, वामन, एक कालियामर्दन आख्यान. कागद जीर्ण.

२१३ ग्रं. क्र. ४३ **गुरुचरित्र अवतरणिका** सरस्वती गंगाधर

आ. १५ × १० सें. पा. २६ × २. प्र.पा.ओ. ९. कागद जाड. अक्षर रेखीव.

प्रत लेखक परशरामभट्ट पुणेकर. शके १७९०.

२१४ ग्रं.क्र. ४४ **जातकशास्त्र**

आ. २० × १५ सें. पा. ३२ × २ अक्षर बारीक. काही दुर्बोध भाग. गद्य रचना. काल व प्रतलेखक अज्ञात. लहान लहान शीर्षक त्यानंतर विवेचन.

२१५ ग्रं.क्र.४५ **संध्या**

आ. १५ × ६।। सें. पा. २४ × २. संहितेसह विवेचन.

शेवटी : हे पुस्तक रुद्राजी व्यंकटेश नगरकर याच असे हस्ताक्षर रामभट्ट पटवर्धन व गोविंद भोजराज निळकंठ शके १६८२.

शेवटच्या पानावर गायीचे चित्र रेखाटलेले आहे. दोन्ही भागांस काळ्या जोड रेषा.

२१६ ग्रं.क्र. ४६ **विविधस्तोत्रे**

आ. १० × ७।। सें. पा. ८० × २. लेखन नेटके. विविध देवतादिकांची स्तोत्रे. काल नाही.

२१७ ग्रं.क्र. ४७ **हनुमानमाला**

आ. ११ × ८ सें. पा. १४ × २. प्र.पा.ओ. ५ मठाच्या शिष्याचे लेखन. लाल दंड व रेघा. रचनाकाल १८३५ शके १३२२ फसली. तिथी नाही.

२१८ ग्रं.क्र.४८ **सभापर्व** मुक्तेश्वर

आ. २५।। ×१२।। सें. पा. २६४ × २. कागद पांढरट जाड. प्र.पा.ओ. १० प्रत्येक चरणास लाल दंड रेषा. प्रत लेखक कृष्ण लक्ष्मण सावंत शके १६५१. तिथी नाही.

२१९ ग्रं.क्र. **ज्ञानदेवी** ज्ञानेश्वर

आ. २८।। × १४ सें. पा. ८८ × २. प्र.पा.ओ. १२ त्रु. प्रत. मधलीच पाने उपलब्ध.

२२० ग्रं.क्र. ५ **ब्रह्मोत्तर खंड** श्रीधर

आ. २०।। × १० सें. पृ. १० × २. त्रु. प्रत. शेवटचा भाग आहे. अ ३४ शेवटचा भाग. कागद जीर्ण.

इतिश्री स्कंद पुराणे ब्रह्मोत्तरखंड़।।

श्रीधर ब्रह्मानंदकृत टीका।। काही पाने चिकटलेली.

२२१ ग्रं. क्र. ५४ **वनपर्व** मुक्तेश्वर

आ. २५।। × १० सें. पृ. ६३० × २. अक्षर रेखीव. कागद पांढरा. काही भाग भिजून खराब.

२२२ गं. क्र. ५५ **भागवत** एकनाथ

आ. ३७।। ×१५ सें. पा. ४० ×२. त्रु. प्रत १ ते ११ अध्याय उपलब्ध. पाने भिजून चिकटलेली.

२२३ गं.क्र.५६ **पांडवप्रताप** श्रीधर

आ. ३५ × १२।। सें. पा. ४४ × २. त्रु. प्रत. अक्षर चांगले. शेवटचा भाग नाही.

२२४ गं. क्र.५७ **हरिविजय** श्रीधर

आ. ३५ × १५ सें. पृ. ६६ × २. त्रु. प्रत. प्रथमचा व शेवटचा भाग नाही. अक्षर सुवाच्य.

२२५ गं. क्र.५८ **स्वर्गारोहण** विष्णुदासनामा

आ. २२।। × १५ सें. पृ. ६० × २ त्रु. प्रतलेखक व काल अज्ञात. पोथी भिजून वाचण्यास कठीण. प्र. ४, ५, ६

"पुढे काय वर्तेले।। सांगा नामा विष्णुदास।।८।।अ-।।५।।

२२६ गं. क्र. ५९ **नृसिंहचंपू**

आ. २५ × १० सें. पा. २६ × २ अक्षर छान मूळ संस्कृतसह. भट्ट केशव प्रतकार. रचनाकाल नाही.

२२७ गं. क्र. ६० **गुरुचरित्र** मरस्वती गंगाधर

आ. ३० × १४ सें. पा. ६०० × २. अक्षर खूप मोठे. कागद जीर्ण. सं. प्रतलेखक व काल नाही.

२२८ गं. क्र. ६१ **रामविजय** श्रीधर

आ. ३० × १५ सें. पृ. ७०० × २. अक्षर साधारण. काही भाग भिजून खराब. कसरीने उजवीकडील भाग खराब झाला. कागद जाड.

२२९ गं. क्र. ६२ **हनुमान उपासना**

आ. १० × ७ सें. पृ. ८ × २. बारीक अक्षर. बिभीषणकृत उपासनेची पद्धत. लेखनकाल नाही. कागद जीर्ण.

शेवटी : इति श्री महाआगम सारे बिभिषणकृत

हनुमान उपासना समाप्त।। श्री।। छ।। श्री।। छ।।

२३० ग्रं. क्र. ६३ **हनुमानदुर्ग**

आ. १७ × ११ सें. पा. २० × २. प्र.पा.ओ. ६. अथर्वण वेदरहस्यातील विवेचन. दंड रेखा.

शेवटी : मीती आशाड कृष्ण पक्ष १० रोज सोमवार

शके १८५२ प्रमोदनाम संवत्सरे समाप्त।।

पुढील पाने कोरी.

२३१ ग्रं.क्र. ७० **कार्तिवीर्यर्जुनस्तोत्र**

आ. २० × १४ सें. पृ. ४ × २. तपकिरी कागद. प्र.पा.ओ. ८.

शके १८११ विरोधा. उतरा. फाल्गुन. भृगृ वा. दिवा द्वितीय यामे लिखित।। श्री दत्तात्रेयर्पणामस्तु।।छ।।

२३२ ग्रं.क्र.७१ **नृसिंह अष्टोतरशत**

आ. १५ × १० सें. पा. ६ × २. प्र.पा.ओ. ११ अक्षर मोठे. चरणास गंध लावलेले.

शेवटी : शके १६९१ वर्षे विरोधीनाम संवत्सरे दक्षिणायने कार्तिक मासे पौर्णिम्या भानुवासरे नृसिंहपूरस्थित घळसासी त्यूपनाम्ना बादरायण शर्मणा लिखितं श्री नृसिंहार्पणमस्तु।।

२३३ ग्रं.क्र. ७७ **तारकटिका** ज्ञानेश्वर

आ. ७ × १० सें. पृ. ४ × २. प्र. पा. ओ. ५ संस्कृत आणि मराठी भाष्य. केवळ २ श्लोक संस्कृतचे असून, त्यावर १० ओव्यांची टीका आहे. एका बाडाच्या सुट्या

पानांच्या समूहात ही रचना लाभली. दुर्मिळ रचना.

शेवटी :

परात्पर ठाईं विसावला।।
सायोज्यता वोवाळी तयाला।।
योगीराज तो।।१०।।
इतिश्री ज्ञानदेवकृत निवृत्ती प्रसादे तारकटिका संपूर्णमस्तु।।छ।।छ।।

२३४ ग्रं.क्र. ७८ **वासुदेव कवचस्तोत्र**

आ. ७ × ८ सें. पाने ६ × २. त्रु.

यात वासुदेव कवच पूर्ण. अष्टक केवळ २ पाने. संप्रदायाचा क्रम. नाथ व भानुदास यांचा उल्लेख. नाथांनी दिलेली रामांकित सीता प्रसाद मूर्ती या मठात आहे. त्यामुळे उपासनेत नाथांना महत्त्वाचे स्थान दिलेले आढळते. बाडांच्या सुट्या पानांच्या गठ्यात रचना सापडली.

२३५ ग्रं.क्र. ७९ **गीता**

आ. ७ × ११ सें. त्रु. पाने ७२ × २. क्रमांक ३४ ते ४६. सुटी पाने. कागद साधारण. गडद काळी शाई. प्र.पा.ओ. ६. अ. ८, १०, ११ मधील ज्ञानेश्वरीच्याच ओव्या निवडून. छापील वाटणारे लेखन.

२३६ ग्रं.क्र. ८० **गुरुचरित्र अवतरणिका** सरस्वती गंगाार

आ. १७ × ११ सें. पा. १६ × २. प्र.पा.ओ. ८. प्रत्येक अक्षर सुटे-तुटक. ओ १०२. सं. सप्ताह पद्धतीनंतर मजकूर त्याच तुटक पद्धतीने नमूद :-

हे पो थी श्री रा जा रा म बा बा म ट
शा म रा ज वा सु दे व बा बा क स बे
आ ळं द पु र्वी म य त. अ स ले ले प्र
ती व रू न ही प्र ती उ त र ली आ हे.
मि ती श्रा व ण व द य १० रो ज
मं ग ळ वा र श के----- रौ द्र
ना म सं छ रे ह स्ता क्ष र रा जा
रा म बा बा आ ळं द म ट
शा म रा व वा सु दे व.

कागद पातळ. आडवी पोथी. शाई पुसट. लेखन मात्र वरील तुटक अक्षरांच्या पद्धतीनेच आहे.

२३७ ग्रं. क्र. ८१ **दासबोध** रामदास

आ. १२ × २० सें. प्र.पा.ओ. १०. त्रु. दशक ७८ पर्यंत. प्रत्येक भाग दोरीने बांधलेला. अक्षर नेटके. पाने भिजून खराब.

२३८ ग्रं.क्र. ८२ **हरिपाठ** एकनाथ

आ. १० × १३ सें. प्र.पा.ओ. २६. सं. पा. १४ × २. कागद पातळ व वृत्तपत्राचे वेष्टन-शिवलेली उभी वही.

यांत २६ अभंग.

शेवटी : "संपूर्णम्".

यातील लेखन पूर्ण रेघ मारून केलेले सलग आहे. शब्द तोडलेले नाहीत.

२३९ ग्रं.क्र. ८३ **बाड**

आ. १५ × ११ सें. मी. पा. ८ × २. अक्षर तुटक सुटे. उभी वही वरून शिवलेली.

यात तुकाराम, ज्ञानेश्वर आणि शिवराम स्वामींची निवडक प्रसिद्ध पदे. लेखन राजाराम बाबाचे. क्रमांक २३६पोथीप्रमाणेच तुटक शब्द

२४० ग्रं.क्र. ८४ **मूलस्तंभ**

आ. १८ × १० सें. पृ. ८ × २. प्र.पा.ओ. ८. अ १ फक्त २३ ते ५५ ओव्या उपलब्ध

आतील वर्णनाचा भाग- या ग्रंथनाम मूलस्तंभ ।। ईश्वर पार्वती संवाद।। दोहीचा अनुवादु परसावा जी।।२३।। पार्वती होय पुसती ।। ईश्वर देव सांगती ।। पिंड ब्रह्मांडाची स्थिती ।। बोलती आता।।२४।। प्रत लेखक, काल नाही. दासोपंत रचना ठरावी.

२४१ ग्रं.क्र. ८५ **यंत्र**

आ. ३८ × ३२ सें. पाने ४ × २. यात श्रीदुर्गा यंत्र व

त्या आलेखात दिलेले विवेचन, मूळ प्रथम साध्या कागदावर, त्यानंतर चांगल्या कागदावर विविध रंगांत तीच यंत्रे रेखाटलेली. देवी उपासनेच्या दृष्टीने महत्त्वाची.

२४२ ग्रं. क्र. ८६ **बाड**

आ. ३० × १२ पा. ४० × २ प्र. पा ओ.१८ अक्षर साधारण. कागद पातळ. या बाडात दोहरे, तुकारामाचे अभंग विशेषत: कुण्या शिवदास कवीची विविध विपुल रचना.

श्री. के. भीमसेनराव वकील, गुलबर्गा संग्रह

२४३ ग्रं. क्र.१ **शिवनामावली** कृष्णा

आ. १३ × १९ सें. पृ. १४ × २. पा. प्राओ. ८. १४ नंतर कोरी पाने. अक्षर छान.

शेवटी : शके १७१७ प्रमादिनाम संवत्सर श्रावण शु।। १३ भौम वासरे प्रथम प्रहरे शिवनामावळी स्वार्थ परमार्थ अनंतात्मजेन कृष्णेन लिखिते।।छ।।छ।।

२४४ ग्रं.क्र. ३ **संगमेश्वर महात्म्य** माणिक प्रभू

आ. १७।। × १० सें. पा. २४ × २. अ. ५

आरंभी :

श्रीगणेशाय नमः।।
अथ माणिक प्रभूकृत संगमेश्वर महात्म्य प्रारंभ।।
संगमेशा हेचि मागण। तुझे महात्म्य पुण्यें पावन।
ते मजकडून बोलऊन।। ग्रंथ समाप्त प्रीतीनेई।।१।।
श्रोते हे कथा ऐका बरी।। संगमेश महात्म्य कोणे परी।।
श्रवण मात्र होय दुरी।।

शेवटी :

इति श्री ब्रह्मांड पुराणे हरिश्चंद्र सूत संवादे जाण।।
ते संगमेश्वर महिमान।। प्राकृत माणिक बोलिल।।२०।।
इति श्री संगमेश्वर महात्म्य् पंचमोध्याय।।
श्री पार्वती संगमेश्वरार्पणमस्तु।।छ।।छ।।
प्रत शके १८७३ खर संवत्सर श्रावण
शुक्ल तृतीया रविवार समाप्त।। इदं
मटलकुंडी नागनाथ शर्मा लिखित।।छ।।

२४५ ग्रं.क्र. ४ **मदनंतपूजा** पुराण

आ. १४ × ९ सें. पा. ३३ × २. जाड कागद.

शेवटी :

भविष्योत्तर पुराणे मंदनवृतकथा संपूर्णमस्तु।। श्री कृष्णार्पणमस्तु।।छ।।

शके १८२२ शार्वरिनामब्दे भाद्रपद व।। प्रतिपदा इंदुवासरे उत्तर नक्षत्रे दिवा प्रथमयामे समाप्त।।

गणपती सुत रघुनाथ लिखिते. स्वार्थ परार्थ।।

२४६ ग्रं.क्र. ६ **उपनिषद**

आ. १५।। × ११ सें. पा. ११० × २. अक्षर चांगले. शेवटी काही पद्यरचना. अनेक उपनिषदांचे विवेचन. लेखनकाल व प्रत लेखक अज्ञात.

२४७ ग्रं.क्र. ७ **शिक्षा**

आ. १८ × ८ सें. पा. १० × २. वेदांतपर रचना व विवेचन. शेवटची पाने गहाळ.

२४८ ग्रं.क्र. ८ **येकादशस्कंध** एकनाथ

आ. २० × १० सें. पा. २२० × २. अक्षर मोठे. अ. ३१ सं. प्रत्येक अध्यायास प्रथमची ओवी व शेवटची ओवी लाल रंगात. प्रत्येक चरणास लाल दंड.

शेवटी : इदं पुस्तक शके १७८९ ने या प्रवर्तमाने प्रभावनाम संवत्सरे उत्तरायणे चैत्र।।१।। प्रतिपदा भार्गवासरे तृतीया प्रहरे तदिते।। श्री पांडुरंगचरणारविंद सन्निधे श्रीमद् भागवते श्री कृष्ण हस्ते लिखिते।। समाप्ती मग मूतू।। श्रीकृष्णार्पणमस्तु।। श्री रस्तु।। गरू पूर्णानंद मंगल रामार्पण।।

२४९ ग्रं.क्र. ९ **एकदशस्कंध** श्रीधर

आ. ३० × १२।। सें. पा. २१३ + २० × २. सं. अक्षर-बारीक नेटके. कागद पातळ. प्रत्येक चरणास लाल दंड. प्र.पा.ओ. १० लेखनकाल कार्तिक शु. १२ अब्दे विकारी संवत्सर शके १७०१.

२५० ग्रं.क्र. १० विष्णुलोकमहिमान

आ. १९ × १०॥ सें. पा. १६ × २ प्र.पा.ओ. ९ आरंभीची पान २ नाहीत. त्रु. प्रत. विष्णू उपासनेचे विवरण.

२५१ ग्रं. क्र. ११ बाड

आ. २२ × १४ सें. पा. ४० × २ तीही क्रमाने नाहीत. लेखन ठसठशीत जाड अक्षरांत. यात पंचायतन स्थापना, चंदला पदे, गुरू विठ्ठल रचना, गोसावी नंदन गणपती पद, सूरदास कबीर बंद, कृष्णपर पदे. यातील-

गोविंद गाणे। गाईचे गोटणी गीत गातो॥धृ.॥
उगे तळमळे जिव राहिना॥
सये तिने गुंतविलेमना।
ईची मसलत समजेना॥
चर चर चर चर॥
गळा कापिला॥
कोठे होती रांड केरसुणी॥
ईश्वर जीव मधुवनी भाऊजी॥९॥

त्यानंतर लावणी, कटीबंध, रंगकृतरचना, केशव, तुळसी, अनामिक कवींची कृष्णपर पद्यरचना. अमृत, शिवदिन केसरी रचनेनंतर पाने कोरी.

२५२ ग्रं.क्र. १२ अष्टपदे अनंतात्मज

आ. २२ × १४ सें. पा. २४ × २. संस्कृत श्लोक व मराठी भाष्यरचना. प्रत्येक श्लोकास ८ पदे म्हणून अष्टपदी नाव.

वानगी :

यमुनातीर वानीर निकुंज मंदमा स्थित॥
माह प्रेम भरोभ्द ते माधवं राधिका सखी ॥७॥

भाष्य :

यमुनातीर झोडारी जाळीय मंद बैसल्या ।
बोले प्रेमभर भ्रांत कृष्णासी राधिका सखी ॥

काही पदांना भैरवी राग अशी टीप.

२५३ ग्रं.क्र. १३ बाड

आ. १७१॥ × १०१॥ सें. सुटी. पा. १० × २. यात मंत्र, विधान, औषधी उपचार इ. माहितीचे संकलन. काही भाग सुंदर, रेखीव, मोडी अक्षरांत. कागद पातळ.

२५४ ग्रं.क्र. १४ द्रावणादि औषध

आ. १११॥ × १७ सें. पृ. २० × २ निम्मा भाग बाळबोध लिपीत. बाकीचा मोडीमध्ये. यात १० विकारांवर मूळ श्लोक व टीका ५२ ओव्या. अनेक उपचारांचे औषधी विवरण. शेवटी मोडीमध्ये अनुक्रमणिका दिलेली आहे. प्रतलेखक काल नाही.

२५५ ग्रं.क्र. १५ बाड

आ. १७ × ११ सें. पा. ८ × २. संपूर्ण लेखन मोडीमध्ये. अक्षर नेटके व स्वच्छ. यात किरकोळ आजार, मूळव्याध, रासायनिक प्रकरण, काढा, नारू, कुत्रादंश, चूर्ण, पिनस, रोग यावर विवेचन.

शेवटी विषयाची अनुक्रमणिका आहे.

२५६ ग्रं.क्र. १६ श्रीकाळज्ञानग्रंथ अज्ञानसिद्ध

आ. १८ × १२ सें. पा. ४४ × २. प्र.पा.ओ. १०. ओ. ४९५

शेवटी : ऐसा श्रीगुरुदेव। अज्ञानाचा सर्व भाव॥ कर्ता कार्य श्रीनागदेव॥ सत्य सभ्व व शिष्याचा॥९३॥ या ग्रंथाचा निर्माता। तुचि तु श्रीगुरुनाथा॥ तुचि तु निरोपिता॥ परिसता तुझा तुचि॥४९४॥

इति श्री काळज्ञान ग्रंथ॥ अज्ञानसिद्ध विरचित। येकाकर श्लोक टीकासहित संख्य संपूर्णमस्तु॥४९५॥छ॥

२५७ ग्रं.क्र. १७ रसेंद्रसार

आ. १४ × १० सें. अ. २. प्र.पा.ओ. ७. ओ. ६१ + १८१.

दहा रोगांवर विवरण. शंकर योगसाधन. अथ पारद महात्म्य प्रशंस, लक्षण, दोष, मतांतर, रक्षामंत्र, रसनिगुट, शुद्धि, शेवटचा भाग लाल शाईत. अक्षर साधारण. कालनिर्देश व प्रतलेखक नाव नाही.

२५८ ग्रं.क्र. १८ योगरत्नावली

आ. १९ × १० सें. अ. २१. प्र.पा.ओ. ३२. या बाडात प्रथम या भागात प्राचीन काळी झालेल्या भूकंपाची नोंद करण्यात आली आहे. तो भाग :

१. क्रोधन १७८७ पौष शु १४ रविवार प्रथम प्रहरे

कंपायमान जाहली. १२७५ फसली. मु. स. १२८२ हिजरी दक्षिणायने.

२. कार्तिक शु. ।। ७ मंगळवार तीन प्रहर कंपायमान. सन १२८६ फसली. १२९३ हिजरी ६ सवाल शके १७९८ धातृनाम संवत्सर.

यानंतर अनुक्रमे ६४ रोगांवरचे विवेचन. अर्ध्यावर लेखन सुंदर मोडी अक्षरांत.

२५९ ग्रं.क्र. १९ **विष्णुसहस्त्रनाम** कृष्णा

आ. १६ × ११ सें. पा. ७५ × २. कागद छान. रेखीव लेखन.

प्रस्तावनेत :

नामाचा जो अर्थ श्रीमच्छशंकराचार्य स्वामी याणी संस्कृत भाषेत वर्णन केला. त्याचा महाराष्ट्र भाषेत दर एक नामाचा अर्थ यथामती करून लिहिला.

वानगी :

विश्वस्मेनम: हे परमेश्वर जगाचे आदिकारण अथवा विश्वामध्ये प्रवेश करणारा तूच. प्रलय काळात जलरूपी जग राहते ते तोही तूच. सर्व जग हा तूच. तुज कारणे,--- फक्त यामध्ये ४१५ नावांचा मजकूर आहे. पुढील पाने कोरी.

२६० ग्रं.क्र. २१ **केशवमूर्तिलक्षण**

आ. १५ × ११ सें. सं. पा. १४ × २. विग्रह लक्षण व शास्त्रीय विवेचन. वैशिष्ट्यपूर्ण कथन.

२६१ ग्रं.क्र. २२ **कपिलगीता**

आ. १५ × ११ सें. पा. २६ × २ त्रु. प्रत. कसरीने भोके पाडून खराब. अ. ५. शेवटचा भाग - मधूनच पाने गहाळ. गणपती नारायण प्रत लेखक. काल नाही.

२६२ ग्रं.क्र. २३ **हरिमीडे स्तोत्र**

आ. १० × १२ सें. पा. १० × २. ओ. ४५ आचार्यांच्या श्लोकावर भाष्य : गणपती नारायण चितापूर प्रतलेखक- काल नाही.

२६३ ग्रं.क्र. २४ **बाड**

अ. २४ × १३ सें. पा. २१ × २. मोडीमध्ये लेखन. या बाडात अभ्रक भस्म, मोरचूद, शुद्धी, बाणरस आणि २५ औषधींची माहिती. काल निर्देश नाही.

२६४ ग्रं.क्र. २५ **बाड**

आ. २४ × १२ सें. पा. १८ × २. कागद साधारण. विविध यंत्रे आणि यंत्राचे शीर्षकात.

।। हे मंत्र चोराचे असे।।

सत्य सत्य सत्य त्रीवाचे।।

अशा प्रकारे उल्लेख. विविध व्याधींवर उपचार.

२६५ ग्रं.क्र. २६ **बाड**

आ. २४ × १२ सें. पा. २० × २. मोडी लेखन. यात हात गोळ्या, अष्टगंध, फळ येण्यास, हुनर प्रकट करण्यास, तंत्र, गंधक, हिंग, रसकापूर, वस्त्र जाळणे, मुसळ लढाई, अग्निभक्षण, दिवट्या वाचून प्रकाश, शेंदूर, सोने, कस्तुरी, भूत दिसणे घालवणे, इ. वर विवेचन. सुंदर मोडी अक्षरांत नेटके लेखन. कागद पातळ.

२६६ ग्रं.क्र. २७ **बाड**

आ. २४×१५ सें. पा. १६×२. बारीक मोडी अक्षर. उभे बाड.

यात : पाकक्रियेचे विवेचन व तंत्र दिले आहे. साखरेचा पाक, वांगी भातास मसाला, साखर भात, आंबरसाचा भात, गव्हल्याची खिचडी, हिरव्या केळ्याचे पुरण, मांडे, तांदळाचे उसळ, गुरवळ्या, साखर बेंडे, बासुंदी, घीवर, जिलेबी, खारकाचे लोणचे, आनंदपुरी, गरम मसाला प्रयोग यांच्या पाकक्रिया दिल्या आहेत.

तव्यास माती, मीठ, राख लावा म्हणजे जळणार नाही.

लेखनकाल, प्रत लेखक अज्ञात.

२६७ ग्रं.क्र. २८ **बाड**

आ. २० × १२ सें. पा. २० × २. प्र.पा.ओ. १२. मोडी लिपीत लेखन. चूर्ण इ. बद्दलची प्रक्रिया।।छ।।

२६८ ग्रं.क्र. २९ **बाड**

आ. २४ × १७ सें. पा. १६ × २ मोडी लेखन. विविध रोगांवर निदान, उपचार.

२६९ ग्रं.क्र.३० **बाड**

आ. १४ × २५ सें. सुटी पाने ३१ × २. विविध औषधी प्रयोग. मोडीमध्ये लेखन.

२७० ग्रं.क्र. ३१ **बाड**

आ. १४ × २२ सें. पा. १३ × २. प्र. पा. ओ. १३. वैद्यकशास्त्र. पेन्सी रोग, इ. माहिती मोडीमध्ये लिहिलेली आहे.

२७१ ग्रं.क्र. ३२ **बाड**

आ. १५ × १२ सें. पा. ३२ × २ मोडीत. यात काय खाल्ल्याने काय होते याचे विवेचन. नंतर रातआंधळेपणा, तृष्णा हरण, समुद्र फूल, पोटात अवषध परमास उपाय, सन्निपात, गोरा मनुष्य फिका पडल्यास उपाय, नासूर पडणे, तांबा मारणेस, याबद्दलचे विवेचन.

२७२ ग्रं.क्र.३३ **बाड**

आ. १७॥ × १०१॥ सें. पा. १५ × २. काही भाग मोडीत व बाळबोधमध्ये.

या संकलनात : जपांगुल नियम, जपदीड, कमलाध्यान, अन्नपूर्णा मंत्र, गणेशगायत्री, वंशसिद्धी, विघ्नहरण, तीव्रबुद्धी, देहरक्षा मंत्र, सर्वज्वरनाशक, जादूटोणा निवारण, ढेकूण निवारण (बेहड्याच्या काष्टाचे चूर्ण फुलवातीमध्ये ठेवून त्याचा दिवा लावला तर त्याच्या प्रकाशात ढेकूण पळतात.) २८ रुईच्या कापसाची वात करून कडू तेलाच्या दिवा लावला असता सर्व ढेकूण जातात व जांभूळ याची धुरी मशक निवारण करते. कुभयाचे मुळ हातरणासाल घेऊन किंवा पलंगास बांधून निजावे म्हणजे ढेकूण आपोआप नाहीसे होतात. रविवारी रान तुळशीचे झाड आणून घरात बांधावे म्हणजे डासाचे उपद्रव दूर होतात ही माहिती आणि सर्पादी विषरोध, विंचू विष, संग्रहणी, इ. वर काही मंत्र दिले आहेत. प्रतलेखक काल नाही.

२७३ ग्रं.क्र. ३४ **अनामिक ग्रंथ**

आ. २० × १० सें. पा. ४ × २. अक्षर मोठे. क्रमांक ३७ नंतरची पाने. अक्षर नेटके.

रचनेची वानगी : अस्तनास्तिक दोन्ही। भावना कल्पित जाणोनि।। कल्पना गेली विरोनि।। द्वैत नसे।।७।। मनो भाविला संकेत।। परब्रह्म भाव अतीत।। यकपणाचा ही अंत।। होवोनि गेला।। जोवरी अरव भाजिला।। शेवटी केवळ बिडला।। तोहि अंति पुसिला।। त्याची काय म्हणावे।।

प्रत्येक चरणास लाल दंड रेषा. काल नाही.

२७४ ग्रं.क्र. ३५ **बाड**

आ. २२ × १७ सें. पा. ३३ × २. यात रामदास, तुकाराम इ. ची रचना आहे. देवदत्त यंत्र, अन्य २० यंत्रे, मंत्र दिले आहेत. अक्षर साधारण.

२७५ ग्रं.क्र. ३६ **बाड**

आ. २० × १५ सें. पा. १० × २. कागद जीर्ण. ज्ञानलक्षण, ध्यान लक्षण, पावसाचे संकेत, प्रसूतीबद्दल विवेचन, संपूर्ण लेखन मोडीमध्ये.

२७६ ग्रं.क्र. ३७ **बाड**

आ. २२ × १७ सें. पा. ६ × २. बारीक मोडी अक्षर. यात विविध रोगांवर उपचार, मूत्रपरीक्षा इ. वर माहिती.

२७७ ग्रं.क्र. ३८ **बाड**

आ. २० × १५ सें. पा. ३० × २. मोडीमध्ये. वैद्यामृत स्फुट इ. रचना. रेखीव अक्षर.

२७८ ग्रं.क्र. ३९ **बाड**

आ. १८ × १० सें. पा. २० × २. अमृत व औषधी, धोत्रा इ. बद्दल माहिती. लेखन मोडीत.

२७९ ग्रं.क्र. ४० **बाड**

आ. १८ × १२ सें. पा. ४० × २. मोडीमध्ये लेखन. उपचार वाटिका, विविध रोगांवर उपाय.

२८० ग्रं.क्र. ४१ उपयुक्त चमत्कार

आ. ४३ × ४१ सें. मोठ्या कागदाची घडी पा. ८ × २. संपूर्ण मोडी लेखन. कागद जाड. या चमत्कारात कापड पेट घेणे, तपकीर करणे, कपड्यास कसर न लागणे. पाण्यात दिवा जळणे, कपाळ शूल, उचकी, नवीन लेखन प्राचीन दिसण्यास उपाय (शाईच्या २ तोळे भारात २ गुंज केशर घालणे) आंब्याचे झाड करणे, यावर विवेचन करण्यात आलेले आहे.

२८१ ग्रं.क्र. ४२ बाड

आ. ७ × १२ सें. पा. १२ × २. या बाडात पुन्नपुसक संजीवनी याची माहिती. लेखन मोडीत; तसेच प्राचीन काव्य दोन्ही बाजूंनी, वरून खाली, खालून वर तेच शब्द येण्याची रचना याची वानगी दिली आहे.

२८२ ग्रं.क्र.४३ सर्पविषनिरोध

आ. १२ × ८ सें. पा. २१ × २. मोडीमध्ये लेखन. प्र.पा.ओ. १२. विविध विषांवर उपचारांची माहिती दिली आहे.

सर्पादिविषविरोधाची वानगी : एका पिशवीत हरभरे भरून जुन्या उंबराचे झाड कोरून ठेवणे. त्याचेच बूच बसवून चिखलाने बंद करावे. सहा महिन्यांनंतर त्यातील एक डाळ याप्रमाणे आठ दिवस सेवन. ती पचल्यास एक एक संबंध खात जाणे. तीन महिने केल्यास सर्प विष बाधा होत नाही.

विंचू : मिठाचे पाणी त्या भागातील कानात घालावे.

२८३ ग्रं.क्र. ४४ एकादशस्कंध शिवराम

आ. १८ × १२ सें. पृ. ३०० × २. प्र.पा.ओ. १० अ. ११ सं. ओ. १३१५.

शिवराम स्वामींची संपूर्ण रचना उपलब्ध. ही प्रत शके १७८९ची आहे. अक्षर सुटे व व्यवस्थित लेखन. समश्लोकी रचना.

श्री पुरुषोत्तम नृसिंहराव नळदुर्गकर, गुलबर्गा संग्रह

२८४ ग्रं.क्र. १ द्वैतवैष्णव ज्ञानामृत कृष्णराव

आ. १२१॥ × १५ सें. पा. १४२ × २ प्र.पा.ओ. १० सं. अ. ३१. ओ. १४६९. कागद जाड. लेखन नेटके. प्रथमपासून शेवटपर्यंत अक्षर सारखे.

जगन्नाथदास हे कर्नाटकातील दासकूटातील प्रमुख कवी होत. त्यांच्या हरिकथामृत सार ग्रंथाचे हे मराठी भाष्य आहे. मराठी संतांच्या विचारसरणीपासून भिन्न अशी तत्त्वज्ञानाची बैठक असल्यामुळे ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ यांचा वैष्णव धर्म गौण मानला आहे. यामुळेच 'द्वैत वैष्णव' असे आगळे नाव देण्याची योजना.

आरंभी : श्री लक्ष्मी नृसिंहाये नम:॥ श्री गुरुभ्यो नम:॥ कलियुगी वाढता उत्तरोत्तर॥ संस्कृत विद्येचा झाला अनादर॥ हीन विद्ये भरता उदार॥ त्यासाठी आदि मानिती (प्रस्तावनेत).

शेवटी : शके अठराशे चाळीस॥ कालयुक्त संवत्सर॥ अश्विन मास तिथी शुद्ध प्रतिपदा शुभ दिवस॥ ग्रंथ संपवी श्रीहरी॥ श्रीकृष्णार्पणमस्तु॥

कृष्णराव रंगराव तथा अप्पासाहेब महाराज नळदुर्गकर हे कवीचे नाव. लेखनात प्रत लेखकाचे नाव नाही. कृष्णा, कृष्णदास ही नाममुद्रा वापरलेली आहे.

२८५ ग्रं.क्र.२ द्वैत वैष्णव ज्ञानामृत कृष्णराव

आ. २२॥ × १५ सें. पा १४८ × २ सं. वरील ग्रंथाचीच प्रत वंशजांनी केली.

२८६ ग्रं.क्र. ३ द्वैतगीतार्थ बोधिनी कृष्णराव

आ. २२॥ × १५ सें. अ. १८ सं. प्र.पा.ओ. १०. अक्षर नेटके.

शेवटी : महाराष्ट्र देशी अनेक भक्त॥ नित्य पारायणी असती सक्त॥ परी न समजती गुह्यार्थ युक्त। मार्ग मूळ जो॥१७४॥ ती व्हावी उणीव दूर॥ म्हणोनि प्रार्थना मध्वगुरुवर। ध्यानिराहति निरंतर॥ ग्रंथ लिहवी स्वसत्ते॥१७५॥ काळगी क्षेत्रपावन सुमती।

नृसिंहमंदिर ज्याची वसती। कृष्णदास म्हणती देहा प्रती। नळदुर्ग ग्राम मूळ।।१७६।। शके अठराशे चाळीस। श्रावण दशमी शुद्ध दिवस। कालयुक्ती संवत्सर समाप्त होतसे।। नेमी श्रीहरि स्वकृपे।।१७७।। इति श्री गीतार्थ प्रबोधिनीनाम अष्टदशोध्याय।१८।। श्रीकृष्णार्पणमस्तु।।

२८७ ग्रं.क्र. ४ **द्वैतगीतार्थ प्रबोधिनी** कृष्णाराव

आ. २२।। × १५ सें. पा. ७६ × २. प्र.पा.ओ. १० वरील ग्रंथाचीच दुसरी प्रत.

प्रतलेखन शके १८५० विभवनाम संवत्सर।। भुतनूर रुद्र देवालय. हणमंत रामराव देशपांडे. निलगुंद मु।। मजकूर हरि ॐ तत्सत।। या प्रत लेखकानेच बहुतेक सर्व रचना लिपीबद्ध केली आहे.

२८८ ग्रं.क्र. ५ **मध्वलीलासार**

आ. २२।। × १५ सें. प्र.पा.ओ. १०. कागद जाड. अक्षर नेटके. अ. ८.

आरंभी :

श्रीमध्वनाथ राजगुरुभ्योनमः।।
कलियुगी वाढले अति अद्भुत।।
दैत्य घोर ब्राह्मण कुळी निपजता।।
अनाचार व्हावा हाचि हेत।। मनि ठेविती पामर।।१।।

अध्याय ७ नंतर मूळ पोथीची पाने गहाळ. पुढील ५० पाने वंशजांनी अन्यत्र पाहून रचना पूर्ण केली. काल व प्रत लेखक नाव नाही.

आचार्य, अद्वैत मत. अनुयायी यांचे निर्भत्सनेच्या शब्दात केलेले वर्णन खटकते. दैत्य, अनाचार, पामर हे संबोधन पूर्ण रचनेतच आहे.

२८९ ग्रं.क्र. ६ **मध्वलीलासार** कृष्णाराव

आ. ३० × १७ सें. प्र.पा.ओ. १७. अ. ८. अक्षर बारीक. मधला भाग कसरीने खाल्लेला. कवीच्या नातवाने प्रत केली. सुमध्व विजयचे भावचित्र असे वर्णन. मूळ संस्कृतची टीका.

शेवटी : अठराशे बावन। तिथी हरि दिनी (एकादशी) अत्यंत पावन।। ग्रंथ झाला कृपे पूर्ण।। सद्भक्ति भक्ता द्यावया।।३६।। कृष्णदास मंदमती हे परि गुरुवर पदरी घेती। यशर्वाच्य देवोनि मती। सेवा घेती अनुपम।। इति श्री मध्वलीला सार ८ अध्याय।। श्रीकृष्णार्पणमस्तु।।

२९० ग्रं.क्र. ७ **द्वैतसार** कृष्णराव

आ. २२।। × १५ सें. प्र.पा.ओ. १०. पा. १० १०४ × २. अ. २७. ओ. १३३१. अक्षर चांगले.

शेवटी : शके अठराशे चाळीस। पुण्यतिथी आषाढ मास।। शुद्ध पौर्णिमा पुण्यदिवस।। ग्रंथ संपण्या कारणी।। ६५।। काळगी क्षेत्र पुण्य भूमी।। दास राही नृसिंह धामी।। नळदुर्ग म्हणाली मूलग्रामी।। दास्य सेवी सर्वदा।।६६।। कृष्णदास घेवोत नामा।। अक्षय हुडकी पूर्ण कामा।। अंतरी अनुपम नामा।। जागृत सर्वदा राहुनि।। ६७।। इतिश्री द्वैतसार मोक्ष कथन नाम सप्तदशोध्याय श्रीकृष्णार्पणमस्तु।।

यात अद्वैत खंडन. हरिसर्वोत्तम नवविधा, जीवरक्षण, देहरचना, पंचभेद, नित्य विभूती, कर्म, नाम, लयचित्त, जन्ममरण, पंचप्राण, वैष्णवकालक्षेत्र, मोक्षकथन असे विषय आहेत.

२९१ ग्रं.क्र. ८१ **द्वैतसार** कृष्णराव

आकार २२।। × १५ सें. प्र.पा.ओ. २०. सं. उभी वही. वरील ग्रंथाचीच ही वंशजांनी केलेली नंतरची प्रत आहे.

२९२ ग्रं.क्र. ९ **द्वैत वैष्णवी नित्यपाठ** कृष्णराव

आ. २२।। × १५ सें. प्र.पा.ओ. १०. पृ. ८ × २. सं. अद्वैत वैष्णवांचा म्हणजे मराठी संतांचा हरिपाठ याकरिता कवीची ही रचना. प्रत्येक अभंग रचनेत 'कृष्ण' ही नाममुद्रा आहे. असे ४० अभंग आहेत.

शेवटी कवी म्हणतो

चित्त पायावरी ठेवून।। चाळीस अभंग नित्य पठण।। करिता लाभे ज्ञानकळा।। कृष्ण भेटे तो सावळा।।४१।।

यांना ज्ञानदेव व नाथांची हरिपाठ रचना मान्य नाही.

२९३ ग्रं.क्र. १० **कृष्णलीलामृत** कृष्णराव

आ. २२।। × १५ सें. प्र.पा.ओ. १३ पृ. ४०४ × २.

अ. ३२ सं. ओ. ६१६३. कृष्णलीलेचे वर्णन.

शेवटी : काळगी क्षेत्र पावन जगती।। त्या स्थळी झाली लेखनस्फूर्ती।। अणु पंढरी होई ग्रंथपूर्ती।। साधन भक्ता व्हावया।। १९९।। शके अठराशे बेचाळीस।। श्रावणमास चतुर्थी तिथीस समाप्त करोनि रमाधीश।। ऐके तोषित होवोनी।।२००।। इतिश्री कृष्णलीलामृतनाम ३२ अध्याय।। श्रीकृष्णार्पणमस्तु।।

२९४ ग्रं.क्र. ११ **पांडवदिग्विजय** कृष्णदास

आ. २२।। × १५ सें. पृ. १४ × २. अ. ३८ सं. महाभारतातील कथा.

आरंभी कवी म्हणतो : जयजय श्रीहिरण्यकश्यपुमर्दना। कुलस्वामिया तात मदन।। भवभय विमोचका लक्ष्मी रमणा।। त्रितापशमना श्रीहरी।।

शेवटी : निर्विघ्न ग्रंथा संपवून।। करवि दासा कथामृत पान।। भक्त काम कल्पद्रूम ब्रीद रक्षण।। केले कृपेने दाखवुनि।।९३।। अठराशे अठ्ठेचाळीस।। वद्य अष्टमी कार्तिकमास।। शनिवारी कृतकार्य रमाधीश।। करीउत्सव दाखवुनी।।९४।। काळगी क्षेत्र नृसिंह तीर्थ परमपावन जगी म्हणवीत।। कृष्णदास बादरायणीराहुनि।। तेथे ग्रंथ लिहिलासे।।९५।। इति।।

२९५ ग्रं.क्र. १२ **श्रीरामलीलामृत** कृष्णदास

आ. २२।। × १५ सें. पृ. २६० × २. अ. २० सं. अक्षर चांगले. पिवळसर कागद. जाड.

प्रारंभ : पांडव दिग्विजय श्रीकृष्णलीलामृत ग्रंथ।। लिहविशी वळवोनि चित्त।। राम दिग्विजय लिहावा।। येई मना तुझ्या प्रेरणेने श्रीहरि।।२।।

शेवटी : शके अठराशे पन्नास।। फाल्गुन मास शुद्ध द्वादशीस।। शुक्रवारी समाप्ती करवि जगदीश।। ग्रंथ पावन कृत।।९३।। अ. ।।२०।।

२९६ ग्रं.क्र. १३ **नीरानृसिंहपूरमहात्म्य** कृष्णराव

आ. २२।। × १५ सें. पृ. ३१ × २. प्र.पा.ओ. २०. ओ. २३२. उभा आकार. सं.

कवीने कुलदैवतावर ही रचना केली आहे.

शेवटी : कृष्णदास अनुयायी जना।। हीच असे निक्षुनी सुचना।। वैष्णव दीक्षे वळवोनि बा मना।। पुरुषार्थ साधावा नित्य जो।।२३१।। शके अठराशे एकावन।। शुक्ल संवत्सर पावन तिथी।। दशमी शनवार पूर्ण।। लेखन होय समाप्त।।२३२।। इति।।

२९७ ग्रं.क्र. १४ **भक्तिविजय** कृष्णराव

आ. २२।। × १५ सें. पृ. १०० × २. सं. प्र.पा.ओ. २०. या संकलनात नामदेव, जनाबाई, राखा, नरहरी, शांत- ब्राह्मण, सूरदास, नामदेव, म. मोहन, भानुदास, नागामित्र, कमाल, रोहिदास, चोखामेळा, परिसा, गोराकुंभार, जनजसवंत, सादुका, गणेशनाथ, निंबराज, सात्विक राजा, दासोपंत, कर्माबाई, रामदास, कबीर, सेना, तुकाराम, नरसी, रसिक मुरारी, विसोबा, बहिरंभट, परमानंद, ज्ञानेश्वर, एकनाथ, तिपाजीराजा, जीवातत्त्वा, दामाजी, रामराजा, माणकोजी यांची चरित्रे गोवली आहेत.

दासोपंत चरित्रातील वानगी : (३५) ओव्या.

भेटी पाठवि मांस गोवधुनिया।। नेवैद्यास दत्तात्रेया।। तीर्थ सिंचुनी पूर्ण पुष्प।। बनवी सदभक्ती प्रेमेतया।। राये वंदुनिया ग्राम एक दिधला।। अद्यपी चाले कुळी।। कृष्णेपासुनि लिहिली ही लीला।। तराया कली।।३५।।

रचनेत पदे, चामरी, साकी, श्लोक, इ. ची नोंद. रागतालांचा निर्देश आवर्जून. कीर्तनकारांना उपयोगी पडावी अशी रचना. कट्टर द्वैतमताच्या कवीने सर्वसंतांवर अशी रचना करावी हे आश्चर्याचे आहे. या रचनेत कालनिर्देश नाही.

२९८ ग्रं.क्र. १५ **पौराणिक कथा** कृष्णराव

आ. २२।। × १५ सें. पाने भिजून खराब. यात भरत-भेट. अहिमही रावण, दुर्वास भोजन गरूड गर्वहरण, सुलोचना, कीचक वध, शिबी, हरिश्चंद्र, यांच्या वरील आख्यान रचना आहेत.

२९९ ग्रं.क्र. १६ **बाड**

आ. २२।। × १५ सें. पृ. ७२ × २ सं. यात कवीची १६० पद्य रचना. प्रारंभी १ ते ८ पानांत पदांची अनुक्रमणिका दिली आहे.

पद्य रचनेतील काही धृपद :
(१) दावी सत्पद नरहरिराया।।
झणि अवरोनिया भव माया।।धृ.।।
(२) पाहुनिया पदनरहरि।। वृत्ति शांत झाली।।धृ.।।
श्रवण मनन विधी।। ध्यायेमूर्तिकरा आली।।धृ.।।
(३) मनमोहन माझा स्वामी।।धृ.।।

३०० ग्रं.क्र. १७ बाड

आ. २२।। × १५ सें. पृ. २९ × २ सं. स्फुट रचना, भूपाळी, आरत्या, विडा, पाळणा, विनवणी, अष्टके इ.

३०१ ग्रं.क्र. १८ विठ्ठलभक्तमालिका कृष्णराव

आ. २२।। × १५ सें. सं. पांढरा कागद. रेखीव - बारीक अक्षर. भुजंगप्रयात वृत्तातील रचना.

आरंभी :
सदारक्षिती संकटी भक्त रामा।।
नुपेक्षी कदा लागती संत पाया।।
रमाधीश जो शेष शेजी निजे तो।।
तया विठ्ठला मालिका पुष्प देतो।।

यात पुंडलिक, तुकाराम, निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ता, एकनाथ, सावता, सेना, कबीर, कमाल, राका, बाका, गोरा, नागा, जोगा, निळोबा, निंबराज, रामराजा, बोधले, रामदास, भानुदास, रोहिदास, विसोबा, चांगा, तिपाजी, मुरारी, सती मेमदानी, गोविंद तुलसी, मच्छेंद्र, गोरक्ष, दामाजी, मीरा, कान्होपात्रा, जनावत इ. वर ३० श्लोक आहेत.

कवी म्हणतो :
मला दास देई दुजे मोल नाही।।
मनी मानसी तू सदास्थित राही।।
गणी कृष्णभक्ता तुला विनवितो।।
तया विठ्ठली मालिका पुष्प देतो।।३०।।

या संत पुष्पांनी पांडुरंगाची पूजा केलेली आहे. शेवटी मारुती अष्टक असून, यात मध्वाचार्य परंपरेचा दुवा साधलेला आहे.

३०२ ग्रं.क्र. १९ साधक शतवचनी कृष्णराव

आ. २० × १५ सें. पृ. ६ × २. या छोट्या रचनेत जीवाने सांभाळावयाचे पथ्य व संकेत एकूण १०० आहेत. सारे विवेचन द्वैतमताधारित आहे.

३०३ ग्रं.क्र.२० प्रल्हाद चरित्र कृष्णराव

आ. ३० × १५ सें. पा. २२ × २.ओ. ३४४. अ. ४ सं. अक्षर बारीक.

शेवटी : कृष्णदास मूढमती।। काळगी ज्याची मूळ वस्ती।। भाग्य नगरी चरित्र संपविती।। साह्य श्रीहरि देऊनी।।४१।। शके अठराशे बावन।। प्रमोदनाम संवत्सर।। चंपाषष्टी पावन।। केले श्रीशा समर्पण।। अभय निती होऊनी।।४१।।

३०४ ग्रं.क्र. २१ माणिकप्रभूचरित्र कृष्णराव

आ. २२।। × १५ सें. पृ. ३ × २. त्रु. अक्षर साधारण. पुढील पाने गहाळ.

३०५ ग्रं.क्र. २२ गोपाळकाला चरित्र कृष्णराव

आ. २२।। × १५ सें. प्र.पा.ओ. २१. ओ. १७३ बारीक अक्षर.

रचनेत : गोपाळकाला चरित्र सुंदर।। पठता पावे रमावर।। श्री पांडुरंग लिहवी।। श्रीकृष्णदास किंकर पुढे करूनी निज कृपे।।

शेवटी :
शके अठरशे त्रेपन।। प्रजापती संवत्सर।।
अत्यंत पावन तिथी दशमी।।
करवि लेखन दास आपुला मानुनी।।

३०६ ग्रं.क्र. २३ सन्मार्गदीपिका कृष्णदास

आ. ३० × १५ सें. पृ. २२ × २. अक्षर बारीक. कवीचे हस्ताक्षरातील रचना. लेखनात शेवटचा भाग निम्मा खोडलेला. कालनिर्देश नाही. गुलबर्गा जिल्ह्यातील चितापूर तालुक्यातील पुराणकालीन काळगी क्षेत्रातच कवीचे बरेच लेखन झाले. द्वैत तत्त्वाचेच विवेचन या रचनेत आवर्जून आहे.

श्री. शंकरराव सुभेदार, गुलबर्गा, ग्रंथसंग्रह

३०७ ग्रं.क्र. १ **वैद्यकशास्त्र**

आ. २३ × १३ सें. पृ. ९२ × २. प्र.पा.ओ. १० कागद जाड, संस्कृतश्लोकासह विवरण. सं.

आरंभ : श्री गणेशाय नमः।। श्री सरस्वतेनमः।। श्री गुरुवे नमः।। श्री हरिये नमः।। श्री गणेशाय नमः पंचदेवताये नमः।। प्रकाश ग्रंथ याची टिका बहुरोग उपाय।। वात ज्वराचे लक्षण। शितकफ रोमाचं अंग फुटते दुखते।। हात पाय दुखते।। कटि दुखते।। ...

प्रतलेखक व काल निर्देश नाही.

३०८ ग्रं.क्र. २ **तुरजामाहात्म्य** पुराण

आ. २३ × ११ सें. पृ. १३१ × २. प्र.पा.ओ. १० अक्षर साधारण. गडद शाई. अ. ७. सं.

स्कंद पुराण शंकर वशिष्ठ संवादातून विवेचन. प्रत लेखक व काल निर्देश नाही.

३०९ ग्रं.क्र. ३ **वैद्यजीवन** कल्याण मल्ल

आ. १४ × २१ सें. पृ. १०० × २. प्र.पा.ओ. १२. अक्षर रेखीव. सं. प्र. १८

मल्लाडखान विनोदी राजर्षि कल्याण मल्ल कृत ग्रंथाचे विवेचन. अनंगरंगरतिशास्त्र विषय. ''महतुविलासो चेतुर्थ स्त्रीया निर्णय भेदन'' असे मलपृष्ट २ वर उल्लेख. अनंगरंग मल्लाडखानकृत आरंभ असे लिहून पुढे रचना.

शेवटी : शके १७१८ नल सवत्छर वैशाख वद्य १४ मंदवार १२०५ फसली तद्दिने लिखित समाप्ति ग्रामे सोलापूर.

३१० ग्रं.क्र. १० **कपिलगीता**

आ. १० × १२।। सें. पृ. ७० × २. अ. ५. सं. प्र.पा.ओ. १० सं. संस्कृतश्लोकासह. कपिल ऋषीच्या विवेचनाचे वेदांतपर विषय. प्रतलेखक, काल निर्देश नाही.

३११ ग्रं.क्र. ४ **नेत्ररोगचिकित्सा**

आ. १२१।। × २२१।। सें. पृ. ८० × २. प्र.पा.ओ. १२ सं. पोथीचा थोडा भाग कसरीने खराब-उजवीकडील खालचा भाग. दत्तात्रेय ईश्वर संवादातून विवेचन. प्रतलेखन, कालनिर्देश नाही.

३१२ ग्रं.क्र. ५ **महा अत्रेयसंहिता**

आ. १५ × २२।। सें. पृ. ३११ × २ प्र.पा.ओ. ९ सं. यात एकूण १४१ रोगांवर उपचार दिले आहेत. अनुक्रमणिका दिली आहे.

३१३ ग्रं.क्र. ६ **भावप्रकाश**

आ. १५ × २२।। सें. पृ. ३२ × २. प्र.पा.ओ. १२ सं. संस्कृत श्लोकासह. विविध १०८ रोगांवर उपचार. पातळ चिवट कागद. काल दिला नाही.

३१४ ग्रं.क्र. ७ **बाड**

आ. १३ × २३ सें. पृ. ४० × २ सुटी पाने. सं. कागद जाड. यात भगंदर रोग निदान व उपचाराची माहिती.

३१५ ग्रं.क्र. ८ **बाड**

आ. १३ × २३ सें. पा. ८० × २. अक्षर चांगले. प्र.पा.ओ. १३. लेखन वेगवेगळ्या अक्षरांत. यात ज्ञानदेवाचा हरिपाठ, नामदेव अभंग व अन्य संतांची रचना आढळते.

बाडाचा लेखक रावजी खिदमतगार असे नमूद केलेले आहे.

३१६ ग्रं.क्र.९ **बाड**

आ. १० × १२।। सें. पृ. ४० × २. अक्षर बारीक. कागद पातळ चिवट. थोडा भाग भिजलेला. यात प्रातःस्मरण, संतांची पदे. संतानगोपाळ इ. रचना व व्याकरण.

३१७ ग्रं.क्र. ११ **अनुस्मृती**

आ. १२।। × १० सें. पृ. १२ × २. कागद जाड. अ. ४ भागवतातील स्कंध ८ चा भाग.

३१८ ग्रं.क्र. १२ **मंत्रशास्त्रक्रम**

आ. १२।। × १० सें. पा. ९४ × २. अक्षर बारीक.

कागद पातळ. यात बीजमंत्रासह विधानाचे विवेचन. विविध व विपुल मंत्र. कालनिर्देश नाही.

३१९ ग्रं.क्र. १३ **शिवसहस्रनाम**

आ. १२।। × १० सें. पृ. १९ × २ अक्षर मोठे. यात शिवोपासनेचे विवेचन संस्कृत रचनेसह करण्यात आले आहे. लेखनकाल विकारी संवत्सर शके १७०१ असून, तिथी दिली नाही.

३२० ग्रं.क्र. १४ **चतुर्दशयात्रा**

आ. १५ × ६।। सें. पृ. १३ × २ प्र.पा.ओ. ७ यामध्ये संस्कृत श्लोकासह वेदांताचे विवरण-लेखनकाल १४८० संवत असा दिला आहे. कागद जीर्ण.

३२१ ग्रं.क्र. १५ **गजेंद्रमोक्ष**

आ. १२।। × १० सें. पा. १२ × २. संपूर्ण लेखन कागदाच्या एका बाजूनेच आहे. अक्षर रेखीव. प्रतलेखक, काल अज्ञात.

३२२ ग्रं.क्र. १६ **अपामार्जनस्तोत्र**

आ. १२।। × ६।। सें. पा. २० × २. लेखन स्वच्छ सुटसुटीत. कागद पांढरा. प्रत्येक चरणास लाल रेखा. भोवताली चौकट तांबडी. विष्णुधर्मोत्तर पुराणाचा भाग. संस्कृत श्लोकासह विवरण.

३२३ ग्रं.क्र. १८ **बाड**

आ. २३ × १७।। सें. पृ. ८६ × २. प्र.पा.ओ. १३ उभे बाड शिवलेले. अक्षर बारीक. यात जयदेवकृत गीत - गोविंद सटीक समाविष्टत आहे. प्रतलेखक रघुनात्मज भगवंत सोत्रत सरकार कलबुर्गे. लेखनकाल शके १७२४ वैशाख व।। ९ इंदुवासरे.

३२४ ग्रं.क्र. १९ **अगस्तिप्रस्थान** पुराण

आ. १४ × ११ सें. पृ. ३९ × २. प्र.पा.ओ. ९. स्कंध पुराणातील काशीखंडाचा भाग. पाचवा अध्याय विवेचनासह.

शेवटी : ।। इति श्रीस्कंद पुराणे कासिखंडे अगस्ती प्रस्थापन पंचमोध्याय।। श्रीमस्तु।।

३२५ ग्रं.क्र. २० **षष्ठी जिवतिका**

आ. १३।। × २३ सें. पृ. १० × २ प्र.पा.ओ. ९. कागद खूप जाड. अक्षर मोठे. लेखक नामनिर्देश नाही. शास्त्रीय विषयाचे विवेचन. प्रत काल - भाद्रपद वद्य पंचमी भौमवार शके १७८९ रक्ताक्षी संवत्सर.

३२६ ग्रं.क्र. २१ **प्रश्नभैरवी**

आ. २४ × १४ सें. पा. ३६ × २. प्र.पा.ओ. १२ सें. कागद जाड. शिव स्वरोदय शास्त्रातील संस्कृत श्लोकासह विवेचन. संपूर्ण रचनेनंतर शेवटच्या पानावरची नोंद :

संवछर प्रतिपदा आहे व पंच्यांग केले त्यास तुम्ही गावचे प्रभु आहात तर रुपाय यक याची आज्ञा केली पाहिजे. वर्षाचा दिवस लाभाचा म्हणून विनंती त्या आपण सुज्ञ अहात किंवा दादासाहेब यासि विनंत करायास हे विज्ञापन आज्ञा प्रमाण।

३२७ ग्रं.क्र. २४ **पूजाकल्पसूक्त तंत्रसार**

आ. १५ × १० सें. पा. ४४ × २. प्र.पा.ओ. १२. पूजा मंत्र, विधान आणि तंत्र याची माहिती. सुवाच्य अक्षर.

३२८ ग्रं.क्र. २५ **तंत्रसार पूजा** मदनानंद

आ. १५ × १० सें. पृ. २१ × २. कागद जाड. पूजा तंत्राचे संस्कृत श्लोकासह विवेचन. मूळ रचना एका मदनानंदाची आहे. प्रतलेखक व काल अज्ञात.

३२९ ग्रं.क्र. २६ **कपिल गीता**

आ. १५ × १० सें. पा. ५० × २. प्र.पा.ओ. ११ जाड कागद. संस्कृत श्लोकासह भाष्य. प्रतलेखन शके १६३० चैत्र शुद्ध प्रतिपदा. देवगिरी पर्वत खडकी ग्राम बाईजीपुरी केशव मंदिरी कानागडी हनुमंत याने लेखन केले आहे. मूळ रचना कुणाची आहे हे कळत नाही.

३३० ग्रं.क्र. २७ **स्वाध्याय**

आ. १२।। × १० सें. पा. १५ × २. प्र.पा.ओ. ७ वेदांतपर विषय. संस्कृत रचनेसह.

प्रतलेखक शामराज अडगारे नृसिंहपूर. लेखनकाल शके १७४२ वैशाख शुद्ध ५ विक्रम संवत्सर.

३३१ ग्रं.क्र. ३१ **गंगासहस्त्रनामस्तोत्र**

आ. १२।। × १० सें. पा. ३४ × २. प्र.पा.ओ. ९ अ. २०. स्कंद पुराणातील संहितेसह वर्णन.

३३२ ग्रं.क्र. ३३ **गर्भस्तुती**

आ. २२।। × १० सें. पा. ३६ × २ अक्षर बारीक. थोडा भाग कसरीने खाल्लेला. भागवत पुराणाचा भाग व विवेचन. काल व लेखक अज्ञात.

३३३ ग्रं.क्र. ३६ **दत्तलहरी**

आ. १२ × १० सें. पा. २९ × २. प्र.पा.ओ. १२ अक्षर मोठे. कागद पांढरा चिवट. दलदल मुनि विरचित संस्कृत काव्य व त्याचे विवेचन. काळ व लेखक यांचा उल्लेख नाही.

३३४ ग्रं.क्र. ३७ **गुरुगीता**

आ. १९ × १० सें. पा. १०८ × २. प्र.पा.ओ. ९ त्रु. अक्षर मध्यम. कागद जीर्ण. शेवटची ८ पाने नाहीत. संस्कृत श्लोक व भाष्य. मूळ भाष्य कुणाचे आहे हे ओळखता येत नाही. प्रतलेखक नाव व प्रतलेखन कालनिर्देश नाही.

३३५ ग्रं.क्र. ४० **महाभारत** मुक्तेश्वर

आ. ३२।। × १२।। सें. पृ. ३०० × २. अक्षर खूप बारीक. कागद पांढरा चिवट. सं. शके १६०० वैशाख वा. १० ची प्रत. शेवटी प्रतलेखक शिवराम जीवाजी कुलकर्णी किलेकलबरगा हस्ताक्षर यादव भगवंत कुलकर्णी मौजे हातिज प।। रातंजन हल्ली वस्ती कसबे चितापूर.

३३६ ग्रं.क्र. ४१ **निर्णयसिंधू**

आ. १५ × १२।। सें. पृ. १४७ × २. अक्षर बारीक. लेखन रेखीव, व्यवस्थित. कागद जाड. सं. प्रतलेखक व काल अज्ञात.

३३७ ग्रं.क्र.४३ **आदिपर्व**

आ. १५ × १२।। सें. पृ. ३६५ × २ मूळ संहितेसह विवेचन. अक्षर नेटके. त्रु. कागद जीर्ण.

३३८ ग्रं.क्र. ४४ **हरिविजय** श्रीधर

आ. १५ × १० सें. पृ. ५४० × २. अक्षर फार बारीक. लेखन व्यवस्थित. सं. प्रतलेखक व काल दिला नाही.

३३९ ग्रं.क्र. ४५ **काशीमाहात्म्य**

आ. १८ × १० सें. पृ. १५६ × २. कागद जाड. अक्षर ठसठशीत.

ब्रह्मपुराणातील संहितेसह विवेचन. लेखनकाल व लेखक अज्ञात.

३४० ग्रं.क्र. ४७ **सुंदरकांड**

आ. २२।। × १२।। सें. पा. २१ × २. प्र.पा.ओ. ९ वाल्मीकी रामायणातील संहितेसह भाष्य.

प्रतलेखक बाबाभट्ट चिटगोपा. लेखनकाल शके १७९६ तिथी दिली नाही.

३४१ ग्रं.क्र. ५४ **गयामाहात्म्य**

आ. २० × ११ सें. पा. ३० × २. प्र.पा.ओ. ८ वायुपुराणाचे विवेचन. अक्षर चांगले. काल नाही.

३४२ ग्रं.क्र. ४९ **समश्लोकी गीता**

आ. २२।। × १५ सें. पृ. ६८ × २. त्रु. कागद जीर्ण. अक्षर मोठे. मूळ रचना कुणाची कळत नाही. शेवटचा भाग गहाळ.

३४३ ग्रं.क्र. ५० **पंचकोशमहात्म्य**

आ. १२।। × १० से. पृ. २१ × २. सं. प्र.पा.ओ.

१०. ब्रह्मपुराणातील वर्णन. अक्षर बारीक पण सुवाच्य. कागद पातळ चिवट. लेखनकाल, लेखक अज्ञात.

३४४ ग्रं.क्र. ५१ **शार्ङ्गधरसार**

आ. १२।। × १० सें. पृ. २१ × २. सं. प्र.पा.ओ.१० सं. यात ४५ रोगावर उपचाराची माहिती. तपकिरी रंगाचा कागद.

प्रत करणार पांडुरंग मैराळ सुभेदार शके १७७१ जेष्ठ....

३४५ ग्रं.क्र. ५२ **अत्रेय संहिता**

आ. २५ × १४ सें. प्र.पा.ओ. २४ सं. अक्षर बारीक. पृ. १११ × २, वैद्यक शास्त्रावरील ग्रंथ. प्रतकाल व लेखक अज्ञात.

३४६ ग्रं.क्र. ५३ **वैद्यवत्तंसा**

आ. १२।। × १० सें. पृ. १२ × २. वैद्यकशास्त्र विवेचन, रोगनिदान, उपचार यांची माहिती देण्यात आली आहे. काल अज्ञात.

३४७ ग्रं.क्र. ६२ **रसपद्धती** कामदेव

आ. २० × ११ सें. पृ. ९४ × २. प्र.पा.ओ. ११ सं. अक्षर खूप बारीक, कागद पातळ. यात ९१ रोगांवर उपचार दिले आहेत. कामदेव पंडित विरचित ग्रंथाची टीका माधव पंडित याने केली आहे.

शके १७६५ शोभन नाम संवत्सर माघ शु।। ८ मंदवार प्रत लेखन काल.

३४८ ग्रं.क्र. ५५ **पथ्यापथ्यविचार**

आ. २२।। × १२ सें. पा. ४१ × २ सं. मूळ ६०० श्लोकावर विवेचन असा ग्रंथ. अक्षर खूप बारीक. प्रतकाल, लेखक अज्ञात.

३४९ ग्रं.क्र. ६४ **योगरत्नावली**

आ. २१।। × ११ सें. पृ. ६९ × २. प्र.पा.ओ. १० ओ. १२०० अक्षर बारीक. पातळ सं. प्रथम सात पानांत प्रदीर्घ अनुक्रमणिका. वैद्यकशास्त्र; तसेच बागकामासह व वनस्पती वाढीचा योग पण यात आहे. विविध विषयांवर योगाचे महत्त्व विशद केलेले आहे.

३५० ग्रं.क्र. ५७ **चिंतामणी**

आ. १२।। × १० सें. पृ. ४८ × २. प्र.पा.ओ. १२ सं. अक्षर खूप बारीक. कागद तांबूस जाड. अनेक रोगांवर चर्चा.

प्रतकार लक्ष्मण मैराळ सुभेदार शके १७५६ ची प्रत. तिथी दिली नाही.

३५१ ग्रं.क्र. ५८ **वैद्यरहस्य**

आ. १२ × १० सें. पा. ११६ सं. वैद्यकशास्त्रातील महत्त्वाची माहिती मूळ संस्कृतासह विवेचन. अक्षर साधारण. काल नाही.

३५२ ग्रं.क्र. ५९ **धन्वंतरी निघंट**

आ. १२।। × १० सें. पृ. ५२ × २. प्र.पा.ओ. १२ सं. वैद्यकशास्त्रातील विवेचन. कागद जाड. पांडुरंग मैराळराव सुभेदार प्रतलेखक. भाद्रपद वद्य १२ शके १७५६ ची प्रत. "दक्षिणायन वर्षारुतौ भाद्रपद मासे कृष्ण भौम."

३५३ ग्रं. क्र. ६८ **मदनपाल निघंट**

आ. २४ × १४ सें. पृ. ५५ × २. प्र.पा.ओ. १० सं.

आरंभ : श्रीगणेशाय नमः।। श्रीरामचंद्रेय नमः।। अविघ्नमस्तु।। हरिताकिमापगुणा।। हरितकीशिवापप्याचेतकी विजया जय. आरोग्यशास्त्र संबंधित विवेचन. प्रतकाल व लेखक अज्ञात.

३५४ ग्रं.क्र. ४३ **अत्रिवैद्यकशास्त्र**

आ. २४ × १७ सें. पा. १५६ × २. प्र.पा.ओ. सं. अक्षर लहान-मोठे. वैद्यकशास्त्रातील महत्त्वाची नोंद.

आरंभी : श्रीगणेशाय नमः।। श्रीगुरुभ्योनमः।। श्रीराम सपरिवार गणेश सरस्वती...

कालनिर्देश नाही. लेखक अज्ञात.

३५५ ग्रं.क्र. ७१ **रामविजय** श्रीधर

आ. ३० × १४ सें. पा. ४३२ × २ प्र.पा.ओ. १२.

अ. ४०. शेवटचा भाग नाही. त्रु. अक्षर मोठे-जाड. कागद जाड; पण जीर्ण.

आरंभी : ओम नमोजी पुराणपुरुषा।। श्रीमदभीमा तट विलासा।। दिगंबरा अविनाशा। ब्रह्मानंद जगद्गुरू।।

लेखनात जुनी लिपी. २ च्या बाळबोध अक्षरास मोडी २ चा उपयोग केला आहे. शेवटचे १ पान नाही, त्यामुळे काल व प्रतलेखक कळत नाही.

३५६ ग्रं.क्र.७२ **ज्ञानेश्वरी** ज्ञानेश्वर

आ. ३० × १४ सें. पा. ४०७ × २. अक्षर साधारण. प्र.पा.ओ. १०. अ. १८. सं. कागद जीर्ण. प्रत लेखन काल व प्रत लेखक नामनिर्देश नाही.

३५७ ग्रं.क्र. ८० **रामविजय** श्रीधर

आ. ३० × १७।। सें. प्र.पा.ओ १२. पृ.१५० × २. त्रु. अक्षर मोठे जाड. प्रथमचा व शेवटचा भाग गहाळ.

३५८ ग्रं.क्र. ७४ **भागवत एकादश** एकनाथ

आ. २८ × १५ सें. प्र.पा.ओ. ९. त्रु. पृ. ४० × २. अक्षर अगदी बारीक. कागद पातळ-चिवट. काही पाने, व अध्याय १३ पूर्ण.

३५९ ग्रं.क्र. ७५ **विराटपर्व** मुक्तेश्वर

आ. १० × १२ सें. पा. १८ × २. प्र.पा.ओ. ७. अध्याय ८ पूर्ण उपलब्ध. अक्षर चांगले. पांढरा जाड कागद.

३६० ग्रं.क्र. ६० **हरिविजय** श्रीधर

आ. २१ × १५ सें. प्र.पा.ओ. १२ पा. ४२६ × २. अ. ३६. ओ. ७९६१. संपूर्ण पोथी भिजून खराब झाली आहे. सं.

प्रत-- गोविंद तिमया मुद्गल यांची असून, प्रत लेखक सीतारामसुत. शके १६९८ सोलासे अठ्याणव दुर्मखी संछराचे नाव भाद्रपद मासचे वैभव शुद्धतृतीया भानुवारी दीड प्रहरी दिवस चढता श्रीहरिविजय संपदिला तत्त्वता. अनुदिनी हा ग्रंथ पाहता।। संकट चिंता हरिती पै।।२।।

३६१ ग्रं.क्र. ७८ **वंगसेन** गदाधरसुत

आ. ३८ × २० सें. पा. ३३९ × २. प्र.पा.ओ. १७. अक्षर अगदी बारीक. सं.

वैद्यक शास्त्रातील महत्त्वाची माहिती. एकूण ३३२ रोग आणि उपचार.

वैद्य गदाधरसुत वैद्य विद्यार्चन विरचित. लेखन साल १७७७ तिथी वार नाही.

३६२ ग्रं.क्र.७० **भागवत**

आ. ३१ × १५ सें. पृ. ४०० × २. प्र.पा.ओ. १४. दोन्ही बाजूंस काळे जोड दंड. चरणास लाल दंड रेषा. अक्षर वळणदार. प्रतलेखक व काळनिर्देश नाही.

३६३ ग्रं.क्र. ७२ **बाड**

आ. २८ × १२ सें. उभी वही. काही पाने गळलेली. अनेक स्तोत्रे, मंत्र, पूजा, उपचार, विधान, स्फुट रचना. इ. चा समावेश आहे. विपुल छोट्या रचना. पृ. ४३. अक्षर बेताचे.

३६४ ग्रं.क्र. ७३ **बाड**

आ. १२ × १५ सें. पा. ३० × २. उभा आकार. कागद जाड. समर्थ पदे, शिष्यांची पदे. रामदासी संप्रदायी रचना.

३६५ ग्रं.क्र. ७४ **चित्र**

आ. ५४ × ६० सें. पा. ३ × २ प्रत्येकी ४ घड्या त्यामुळे १२ तुकडे झालेले आहेत. कागद पांढरा जाड. ब्रह्मांड पुराणाधारे काढलेले चित्र. रंगीत चित्रामध्ये विवेचनाचा भरपूर मजकूर. वेदांत, शास्त्र, इ. बद्दलचे विवेचन. प्रात्यक्षिक-दर्शन घडवीत विषय समजावण्याचा उपक्रम यात आहे.

३६६ ग्रं.क्र. ७५ **मंत्रसंग्रह**

आ. २५।। × ६ सें. पृ. ५० × २. ताडपत्रीच्या लांब पट्ट्या. मधोमध समांतर दोन भोके. त्यातून ओवलेले पृष्ठ.

प्र.पा.ओ. ४. अक्षर सुरेख. वर-खाली त्याच आकाराची नाजूक लाकडी फळी.

३६७ ग्रं.क्र.७६ **निर्णयसिंधू**

आ. ३५ × १० सें. पा. १४७ × २. अक्षर साधारण. प्र.पा.ओ. १३. कागद जाड.

लेखक : नारायणभट्ट सुरी रामकृष्ण भट कमलाकर भट कृते.'' हस्ताक्षर पांडुरंग मैराळ.

३६८ ग्रं.क्र. ८५ **रामविजय** **श्रीधर**

आ. २८ × १६ सें. प्र.पा.ओ. १२. अ. १८ त्रु.

शेवटी : ब्रह्मानंदा पांडुरंगा।। श्रीधरवरदा पूर्ण अभंगा।। पुराण पुरुषा।। भय भव भंगा।। श्रोता वक्ता तूच पै।।७।। इति श्री राम विजय ग्रंथ सुंदर।। संमत वाल्मिकी नाटकधार।। चाळिस अध्याय विस्तार।। ग्रंथ संपूर्ण जाहला।।८।। येकूण वोवी।।२०८।। श्रीरामार्पणमस्तु।।

शेवटी विशेष मजकुराची नोंद

श्री राम प्रसन्न।।

।।अ. १८।।

शेवटी : तिघांनी मिळून ग्रंथ अध्येचा लिखन संपविले. व्यंकटाचारी. अ. २१, ३१, ३४, ३८, सीताराम येकापासून अठरा पावतो. नाना १९, २०, २१, २२, २३, २४, २६, २७, २९, ३०, ३२, ३३, ३५, ३६, ३७, ३९, ४०.

शके सोलासेहे सहायैसी। पार्थिवनाम संवत्सरास गुरुप्रतिपदा शुद्धचिराषे चैत्र मास विख्यात पै। धनवाड ग्रामी निश्चयेसी। लेखी आणि श्रोते यासी कल्याण असो.

३६९ ग्रं.क्र. ८८ **बाड**

आ. १४ × २० सें. पा. ६० × २. प्र.पा.ओ. ११. यांत आचार्याचे श्लोक व त्यावर भाष्य. टीकाकार अज्ञात. औषधी माहिती. एका केशव कवीचे गीताभाष्य ७०० श्लोक.

३७० ग्रं.क्र. ९० **बाड**

आ. १२ × २१ सें. पा. ४० × २. अक्षर मोठे. जीर्ण कागद.

यात ज्ञानेश्वर हरिपाठ, अभंग. नामदेव, मोरोपंत आर्या, रागदारींची नावे आवर्जून असलेली रचना. भीष्मप्रतिज्ञा शुकारख्यान इ. स्फुट.

३७१ ग्रं.क्र. ९२ **बाड**

आ. १५ × १३ सें. पा. ४८ × २ यात कालियामर्दन, गोवर्धन, कृष्णजन्म आख्यान. पदपदांतरे. यात ठुमरी, परज, जंगला, खट, कानडा इ. रागाचा उल्लेख.

पुढे नृसिंहभट्ट गोविंदभट्ट काळगी यांचे प्रश्न, त्याचे उत्तर. सन १२४२ फसलीचे (इ.स. १८३२) त्यानंतर पूतनाप्राणहरण, राधाष्टक, पंचायतन आरती आणि जन्मपत्रिका नावाची रचना.

३७२ ग्रं.क्र. ९७ **अपरोक्षानुभूती**

आ. २२ × १५ सें. पा. २१ × २. प्र.पा.ओ. १२. त्रु.

शेवटी : इति श्रीशंकराचार्य विरचिता अपरोक्षानुभूती मुळटीका समाप्त। समश्लोकी आशी टिका अपरोक्षानुभूतिचि। वामने अर्पिली पाई शेष शाई गुरुचिया।।१४६।। श्री सच्चिदानंद सदगुरुना अर्पणमस्तु।। शुभंभवतु।।छ।। १४६ श्लोक.

यात प्रथमच्या ३ श्लोकांचा भाग नाही.

३७३ ग्रं.क्र. ९८ **बाड**

आ. २१ × १७ सें. पा. २६ × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर मध्यम. फिकट शाई.

गरुड पुराण भाग, सुप्रभात रचना (भूपाळी) व्यंकटेश व अन्य दैवतांची, संतानगोपाळ रचना. तप १०८ पुरःश्चरण १,००,००० क्लीं संतान गोपाळ।। क्लीं वंश गोपाळ।। क्ली वंश गोपाळ।। शुभं।।

३७४ ग्रं.क्र. ९९ **मदुत्तरगीता**

आ. १० × १५ सें. पा. २२ × २. प्र.पा.ओ. ७. अक्षर मोठे. पानाला अधूनमधून वेलबुट्टीची सजावट. शके १८१८. दुंदुभी संवत्सर पालगुण शु।।१।।

३७५ ग्रं.क्र. १०० **दत्तसहस्रनाम**

आ. १० × १३ सें. पृ. २१ × २. कागद जाड. लेखन

रेखीव. काही दत्त पदे व अन्य रचना. उपासना विधान शेवटी.

प्रत. शके १७७६ आनंद सं. श्रावण शु।। ५ रविवार.

३७६ ग्रं.क्र. १०१ **अनामिक**

आ. २३ × ११. पृ. ३७ × २. प्र.पा.ओ. ९. वेदांत चर्चा.

आरंभी : अथ ब्रह्म शब्द निर्णय कथन।। श्रीगणेशाय नमः।। श्रीगुरुवे नमः।। अविकाराय शुद्धाय नित्याय परमात्मने शब्दं कंपूपरुपाय विष्णवे प्रभु विष्णु अथर्वण वेद।।

रचना कुणाची याचा बोध होत नाही. प्रतलेखक व लेखनकाल नाही.

३७७ ग्रं.क्र. १०२ **बाड**

आ. ३७ × ११ सें. पा. ३७ × २. प्र.पा.ओ. ४८. अक्षर अत्यंत बारीक पण नेटके. प्रथमची पाने अनुक्रमणिकेची, त्यानंतर रोगनिदान व उपचार याची माहिती देण्यात आली आहे.

३७८ ग्रं.क्र. १०४ **कार्तिकमहात्म्य**

आ. २२ × ५ सें. पृ. १४२ × २. प्र.पा.ओ ५. अ. २८ सं. अक्षर रेखीव, सुंदर. नेटके लेखन. दोन्ही भागास जोड लाल दंड. यात सनत्कुमार संहितेच्या आधारे कार्तिकमहात्म्य सांगितलेले आहे. त्याच आकाराच्या लाकडी फळीने ग्रंथ व्यवस्थित बांधलेला आहे. प्रतलेखक व कालनिर्देश नाही. शीर्षक व नमनाचा भाग आणि समाप्तीचा भाग लिहून झाल्यावर लालसर रंगाने रंगवलेला. प्रथमपासून शेवटपर्यंत अक्षर एकाच पद्धतीने रेखीव व प्रमाणबद्ध. कागद जाड व गडद शाई.

हुताशनानंद महाराज संग्रह

३७९ ग्रं.क्र. १ **एकादशस्कंध** शिवराम

आ. १८ × × १२ सें. २६५ × २. कागद पांढरट-जाड. प्र.पा.ओ. १२. अ. ३१. सं. अक्षर नेटके. एकादशस्कंधावर मराठी समश्लोकी. ओ. १३१५.

या ग्रंथाची प्रत गंभीरानंद स्वामींनी शके १८५६ भावनाम संवत्सर उतरायण पौष शु ६ भृग वासरी योगेश्वरी मंदिर अंबेजोगाई येथे केली. त्या ग्रंथाद्वारे कवीचे वंशज हुताशनानंद यांनी शके १८६९ मध्ये केलेली आहे. कवी म्हणतो, "म्या एकादश एकनाथ स्वरुपे वोवीच विस्तारिली।।

३८० ग्रं.क्र. २ **अध्यात्मरामायण** शिवराम

आ. १७ × १५ सें. पृ. ४०० × २. अक्षर साधारण तपकिरी जाड कागद. लेखन सुवाच्य. ओ. ५४३८ सं. नाथांचे पणतू शिवराम मंगलाचरणात म्हणतात :

तुझे पाद कमळ सुकुमार।।
गगनाहुनि अरुवार।।
जिथे विसावले जीव भ्रमर।।
प्रपंचा विसर पाडुनि।।

शांकर वेदांतातून रामभक्तीचे प्रतिपादन यात असल्याने तोच भाष्यासाठी कवीने निवडला आहे. यास रामहृदय असे दुसरे नावही आहे. रामानीच शंकरास ते प्रथम कथन केलेले आहे.

मनोगतात कवीने मराठी संतांना वंदन केले आहे. या ग्रंथाचे लेखन कोनेरी बाबाने केले आहे. कल्याणीसच हा ग्रंथ संपविलेला आहे.

या ग्रंथाची प्रत शके १८४५ रुधिरोद्धार नाम अब्दे अश्विन वद्य ३ स्थिर वार विदुरनगरी (बिदर) येथे दत्तानंद मठात केली आहे. या प्रतीचे लेखन शिवराम वंशज हुताशनानंदांनीच केले आहे.

३८१ ग्रं.क्र. ३ **बाड**

आ. १८ × १५ सें. पाने २८ × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर साधारण.

यात रामचंद्र महाराज यानी टिपलेली अनेक औषधांची माहिती दिलेली आहे. रोगनिदान व उपचार याचे विवेचन आहे.

३८२ ग्रं.क्र.४ **स्वरोदयचिंतामणी**

आ. १७ × १३ सें. पाने ३५ × २. अक्षर मध्यम.

व्यासकृत संस्कृत श्लोकासह या शास्त्राचे विवेचन आहे. लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

३८३ ग्रं.क्र. ५ **ब्रह्मोत्तरखंड** शिवराम

आ. २२।। × १७।। सें. पृ. ९९ × २. अक्षर बारीक सुवाच्य. अ. २२ सं. रचनेत विविध विपुल रचना. या रचनेत साकी, आर्या, श्लोक, ओव्या, आरत्या अशी वानगी आहे. विष्णू, शिव यात भेद नाही, याचे विवेचन, जीवशिव ऐक्य याचे विवरण. यात शिवकथा आख्यानरूपाने दिलेल्या आहेत.

कवी म्हणतो :

गुरु कृपेचा लाघव मोठा।।
पिकविल्या शिवकथेच्या पेठा।।
हुताशनानंद महाराजांनीच ही प्रत केलेली आहे.

३८४ ग्रं.क्र. ६ **अष्टाव क्रगीता** शिवराम

आ. १७ × १५ सें. पाने ७० × २. प्र.पा.ओ. १० ओ. २९५. कागद जाड. चांगले अक्षर. अ. २०. सं.

शिष्याची शंका आणि गुरूंनी त्याचे केलेले निरसन. त्यानंतर जीवनमुक्तीचे विवेचन आलेले आहे. ही समश्लोकी रचना आहे. घरात व बाहेर आकाशच आहे, असा अद्वैताचा मार्मिक उपदेश गुरूंचा आहे. शके १८४७ ला रामेश्वरात्मज रामेश्वर ऊर्फ दादख्य या शिवराम वंशजाने बिदर येथेच ही प्रत केलेली आहे.

३८५ ग्रं.क्र. ७ **रामगीता** शिवराम

आ. १७ × १५ सें. अक्षर चांगले सुवाच्य. अध्यात्म रामायणातील सुंदरकांडाचा हा एक प्रसंग आहे. यातील वेदांतामुळे हा ग्रंथ वेगळा काढून वाचण्याजोगा आहे, म्हणून यास रामगीता असे नाव. यात रामाने लक्ष्मणास केलेला महत्त्वाचा उपदेश आहे. या ग्रंथाची प्रत हुताशनानंदांनीच केलेली आहे. प्रतकाल नाही.

३८६ ग्रं.क्र. ८ **श्रीगुरुएकविशी** शिवराम

आ. ७ × १५ सें. पृ. ८ × २. ओ. २१. अक्षर सुटसुटीत. सं.

यात गुरूचे श्रेष्ठत्व नमूद झालेले आहे. गुरूंचे अपूर्व सामर्थ्य व त्यांचा प्रभाव; तसेच त्यांची अवकृपा झाली की जळून खाक होते, हे दाखविले आहे. प्रासादिक रचना. हुताशनानंदांनी लेखन केलेले आहे.

३८७ ग्रं.क्र. ९ **मानसपूजा** शिवराम

आ. ७ × १५ सें. पृ. १२ × २. ओ. २५ सं. यात दैनंदिन क्रम, उपचार, पूजा, यासह वेदांतपर विवेचनाची मानस पूजा बांधलेली आहे.

कवी शेवटी म्हणतो :

देह गेह शिवराम राजया।
पूर्ण अर्पूनिभजे मी तया।।
प्रतलेखक : हुताशनानंद.

३८८ ग्रं. क्र. १० **सद्‌गुरुपकार अनुतीर्ण** शिवराम

आ.७×१५ सें.पृ. ६×२. अक्षर मोठे, पूर्ण वेदांतपर रचना.

आरंभी :

मी पूर्ण चिद्‌घन निरामय शुद्ध पाही।
मद्रूप येऊनि भ्रमे पडली प्रवाही।।
तत्काळ येऊनि बरा निजबोध केला।।
उतीर्ण होईन कसा शिवरामजीला।।

शेवटी :

कल्याण कल्याण असेच धाता।।
कल्याण वासी मग येत हाता।।
या लागी कल्याण आम्हास आहे।।
येरासी हे सौख्य कदापि नोहे।।८।।

प्रत : हुताशनानंदांची.

३८९ ग्रं.क्र. ११ **स्वरूप ओळख** शिवराम

आ. ७ × १५ सें. ओ. २०. अक्षर ठसठशीत.

जीवाशिवात भेद नाही. संपूर्ण वैराग्य आहे. कोणत्या व्यक्तीस शिवराम म्हणावे याचे विवेचन - वेदांतपर रचना. प्रतलेखक हुताशनानंद.

३९० ग्रं.क्र. १२ **रामतुळसी** शिवराम

आ. ८ × १६ सें. पाने ३० × २. ओ. १०८. अक्षर मोठे. कागद जाड.

शिवरामांनी १०८ श्लोकांतून नारायणाची पूजा केली आहे. रामचरित्राचे रसाळ वर्णन यात आहे.

शेवटी :

नारायणापाशी अष्टोत्तरशत।।
शिवराम वाहात राम तुळशी।।
प्रतकर्ता हुताशनानंद.

३९१ ग्रं.क्र. १३ **सप्तभूमिकाश्लोक** शिवराम

आ. ७ × १८ सें. ओ. १५. कागद जाड. अक्षर रेखीव. वेदांताचा ऊहापोह.

शेवटी :

ऐशा परि जिंकुनी सप्तभूमिका।।
जो पावला याच कर्मे सुखा।।
ग्रासुनि काळासि सुखे निरंतरी।
तो पूर्वा नंदे शिवराम मंदिरी।।६।।

लेखन - वंशजाचे.

३९२ ग्रं.क्र. १४ **निर्वाणाष्टक** शिवराम

आ. ७ × १५ सें. पृ. ४ × २. कागद चांगला. अक्षर सुटसुटीत - ठळक. सं. समश्लोकी टीका संस्कृतश्लोकासह.

शेवटी :

निर्वाणाष्टक टीका पढे नित्यसाचि।।
शिवराम येईल हाता मज भेटलाचि।।
प्रत. वंशजाची.

३९३ ग्रं.क्र. १५ **शुकाष्टक** शिवराम

आ. ७ × १५ सें. पृ. १२ × २. अक्षर मोठे सुवाच्य. सं.

शेवटी :

प्रातःकाळी उठोनि पठण करिती जे
व्यास पुत्राष्ठकाते।। ते पूर्णानंदधामी अनुदिनी रमती ग्रासुनिया भवाते।।
प्रत. हुताशनानंदांची.

३९४ ग्रं.क्र. १६ **देहचतुःसाक्षी** शिवराम

आ. ६ × १२ सें. पृ. ७ × २. अक्षर मोठे. सं. मूळ संस्कृत श्लोक, त्यावर मराठी भाष्य असा क्रम. प्रासादिक वाणी.

वानगी : श्लोक :

जागृत्यूदभूत बाह्येंद्रिय...

भाष्य :

देहसाक्षी पाहा देहसाक्षी।।
तोचि अंगे अहा स्वरूप होऊनिया राहे।।धृ.।।
प्रत हुताशनानंद यांनी केलेली आहे.

३९५ ग्रं.क्र.१७ **मनीषा पंचक** शिवराम

आ. ७ × १५ सें. पृ. २१ × २. श्लो. ४५ कागद जाड. अक्षर रेखीव.

मूळ संस्कृत श्लोकास ५ ते ६ मराठी श्लोक अशी भाष्यरचना.

शेवटी :

हे मनिषा पंचक आख्यान। सुंदर केले सुदराने।। वक्ता श्रोता नारायण अभिनवपणी शिवरामाने।।६।।

लेखन हुताशनानंद यांचे.

३९६ ग्रं.क्र. १८ **पंचरत्नमाला** शिवराम

आ. ७ × १५ सें. पृ. ४ × २. श्लो. १२. सुटसुटीत अक्षर. आचार्यांच्या मूळ श्लोकासह भाष्य. प्रतलेखक अज्ञात. लेखन निष्काळजीपणाने केलेले.

३९७ ग्रं. क्र. १९ **निर्वाणदशक** शिवराम

आ. ७ × १५ सें. पृ. १ × २ आचार्यांच्या मूळ श्लोकावर मराठी भाष्य.

शेवटी :

दाऊनि अर्थ दीपिका सकळार्थु।।
आता आत्मवरा गवसुनि शिवराम देतां ज्या माजि भासत त्या न दिसेचि।।
भेदुसेवितथापि।। शिवराम अगाध बोलु।।
लेखन निष्काळजीपणाने केलेले.

३९८ ग्रं.क्र. २० **आत्मबोध** शिवराम

आ. ८ × १४ सें. पृ. ३८ × २.ओ. ७. सं. आचार्यांची मूळ रचना. त्यावर समश्लोकी.

शेवटी :

हा शंकरोक्ति बरवा निजआत्म बोधु।।
त्या प्राकृते विवळुनि सकलार्थ भेदु।।
हातीचा सगळा सगळा दिला हो।।
तेथे रिघोनि पाहाता शिवराम होये।।

या ग्रंथाची प्रत गंभीरानंद सरस्वती स्वामींनी केलेली आहे. शके १८५६ दिला आहे. तिथी नाही.

३९९ ग्रं.क्र. २४ **बोधबासष्टी** शिवराम

आ. १७ × १० सें. पृ. ३२ × २. ओ. ६२. सं. कागद पांढरा - जाड. ठळक अक्षर. शिवराम स्वामींनी आपला शिष्य राजमणी यास प्रबोधण्याकरिता ही रचना केलेली आहे. चांगदेव पासष्टीच्या धर्तीवर ही रचना आहे. प्रतकार हुताशनानंद. काल निर्देश नाही.

४०० ग्रं.क्र.२५ **बाड**

आ. १२ × १८ सें. पृ. ४० × २. प्र.पा.ओ. ८. अक्षर, बारीक सुवाच्च.

शिवराम स्वामींच्या विविध व विपुल रचनेचे बाड. यात सात वारांच्या व अन्य पूजेतील उपचाराच्या आरत्या, पदे व संप्रदायास उपयुक्त अशी रचना. यातच कवीची, संस्कृतसह कन्नड रचना पण आहे.

४०१ ग्रं.क्र. २६ **बाड**

आ. १५ × १२ सें. पृ. ३५ × २ अक्षर बारीक शिवरामाची विविध स्फुट रचना, भारूड, कैकाय, वासुदेव, पांगूळ इ. रचना.

४०२ ग्रं.क्र. २७ **संतालंकारभूपाळी** शिवराम

आ. ७ × १५ सें. पृ. १० × २. अक्षर मोठे. कागद जाड. ओ. ११.

शिवराम स्वामींची ही महत्त्वाची भूपाळी. यातील कवीची कल्पना मनोहर भासते. प्रातःकाळी यशोदा माता कृष्णास उठवते. रानात धेनू घेऊन जाण्यास सांगते. त्या वेळेस अलंकार परिधान करण्याची सूचना देते. संतलोक हे अलंकारच आहेत व ते परिधान कर, असे सांगत असता या मराठी संतांत आचार्य शंकरांना प्रथम मान दिला आहे. मराठी संतांचे तत्त्वज्ञान येथूनच आरंभते, हे कवीला सूचित करावयाचे आहे.

आरंभी :

आचार्य शंकरमुकुट घाली।।
लोभे सावळ्या रे।।धृ०।।

शेवटी :

तुझे महाद्वारी शिवराम भाट।।
गाय कृष्ण जीरे।।१।।

४०३ ग्रं.क्र. २८ **त्रिपंचपदी** शिवराम

आ. १० × १८ सें. पृ. २७ × २. अक्षर मोठे सुवाच्य. एकूण २५ पदे.

आनंद संप्रदायात सकाळी ब्रह्माची, दुपारी विष्णूची आणि प्रदोष काळी शिवाची अशी उपासना. त्याला अनुसरून ही पंचपदी रचना केलेली आहे. यातील मराठी पदाबरोबर संस्कृत आणि कानडी रचनेची पण योजना आहे.

४०४ ग्रं.क्र. २९ **पाळणा** शिवराम

आ. १५ × ७ सें. बांधीव वही. पृ. १८ × २. यात राम, कृष्ण इ. वर पाळणा रचना आहे. याचा उपयोग कवीने आपल्या विविध आख्यानांत केलेला आढळतो. अशी बरीच रचना या संकलनात संग्रहित केलेली आहे.

४०५ ग्रं.क्र. ३० **होळीचे पद** शिवराम

आ. १८ × ७ सें. बांधीव वही. प्र.पा.ओ. ९ पृ. १२ × २. ओ. २५. सं. अक्षर मोठे. कवीच्या रचनेची ही एकमेव वानगी.

होळीच्या प्रसंगास उपयोगी पडावी अशी रचना. त्या वेळेस अनुसरून भाषा व शब्द वापरले, पण त्यातून वेदांताचा उपदेश आहे. मानवी मनातील विविध दोष येथे दाखविले आहेत.

धृपद : अबब! हे नवल केवढे।।
जवळचि असुनि नेणति मूढे।।धृ.।।

आत्मविवेचनाचा भाग :

परनिंदेचे दीर्घ फरारे। जिभेसी लाविता मधोमध रे।
हरिनामाचे घेईन वारे। तोंडी तयाचे मुतोनिया रे॥१०।
हरिहरि म्हणता येतसे रागा। फाकट बोली जाये उपेठा।
आठविना पांडुरंगा। त्याच्या तोंडी हाणोनी या रे॥११॥
संसाराते येऊनि बारे। संत दुकाना जाऊनि या॥
घेतले नाही रामराया रे।
कासाया आलासी शेण खाया रे॥१४॥

४०६ ग्रं.क्र. ३१ **ललित** शिवराम

आ. १० × १८ सें. पृ. ८० × २. प्र.पा.ओ. १०. ओ. ६०. अक्षर बारीक. लेखन स्पष्ट..

ही रचना मराठी, कन्नड, हिंदी सर्वच भाषेत आहे.

त्या रचनेची वानगी :

(१) येवो माझीमाय सद्गुरु अहिणुली॥
कांडिता एकली शीण ठावे॥धृ॥
(२) पूर्णानंदी सर्व सरले हो काम॥
माहेर शिवराम भेटलिया॥
(३) पावावया निजपदा प्रतीठाव तेथे॥
पंचांग सोडुनि जनासिमुहूर्त सांगे॥
(४) हे पावले सुलभसे मन मीन रासी॥
कल्याणीचा बहुखरा सिवराम जोशी॥

कवीची ही रचना हुताशनानंदांनी संकलित करून लिहिली आहे. ते स्वतः यावर ललित करीत.

४०७ गं. क्र. ३२ **गोपाळकाला** शिवराम

आ. १० × १८ सें. पृ. २०० × २. प्र.पा.ओ. १२. अक्षर बारीक व स्पष्ट. यात भरपूर पदे व विविध रचना.

आरंभीचे पद :

उठी उठी बाळ माझ्या कान्ह्या रे॥
तुज गोवळे बोलविती वना जावयारे॥धृ॥

सर्व प्रसंगांचे वर्णन अनेक पदांतूनच सलग ओव्यांऐवजी ही अभिनव योजना यात - वासुदेव इ. पद्य रचना आहे.

यात शेवटची रचना :

गोविंदा रामा हो॥ गोपाळ रामजी॥धृ॥

यात शेवटचे चरण :

तैमीच सहीत हेतु निर्शिन द्वैत भावजी॥
भवभय वारूनिया सारी जे थोर नेम।
अठवेन्य शरण आलो आर्पिले स्वात्म खूण॥३॥ इति.

४०८ ग्रं.क्र. ३३ **उत्तरगीता** शिवराम

आ. २० × १५ सें. पा. ४५ × २. अक्षर बारीक. प्र.पा.ओ. ९.

यात कवीने मूळ पुराणातील संस्कृत श्लोकांवर मराठी भाष्य केलेले आहे. ही सलग ओवी व श्लोक अशी रचना नाही. कवीने आपला वेदांताचा विषय अनेक पद्य रचनांतून समजावून सांगितलेला आहे. संपूर्ण रचनेत अद्वैत तत्त्वाचे विवेचन मोजक्या शब्दांतून आहे. प्रत जीर्ण. प्रतलेखक व कालनिर्देश नाही.

४०९ ग्रं.क्र. ३४ **एकादशी कथा** एकनाथ

आ. २० × १५ सें. पा. २२ × २. प्र.पा.ओ. ८. अक्षर मध्यम.

आरंभी :

ऐका पुण्यपावन कथा
सावधान व्हावे श्रोता॥
जीचे ती अवधान सर्वथा॥
कली किलमिश नाशती॥१॥

शेवटी :

तीर्थ त्रय पै जाणा॥ यका जनार्दनु सांग॥
का सीणला योगयाग॥ यकादसीचनी पांग॥
देव आगच देख॥ यकादसी जाण शिवरूप॥
दशमी जाण ब्रह्मरूप हे तीर्थत्रयचि महिमान।
इती श्री यकादसी संपूर्णमस्तु॥ छ॥ छ॥

४१० ग्रं.क्र. ३५ **द्वादशी कथा** शिवराम

आ. ७ × १५ सें. पाने २१ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक.

शिवराम स्वामींनी द्वादशी निरूपणाची ही कथा १५ पदांतून उद्‌धृत केलेली आहे. प्रत्येक पदात रागतालांचा उल्लेख

आढळतो. शिवराम, शिवरामा, पूर्णानंदानुचर, इ. नाममुद्रा उपयोजिलेल्या आहेत.

शेवटी :

कथारूप सुंदर काम धेनु।।
संपूर्ण दावी शिवराम भानू।।छ।।।

४११ ग्रं.क्र. ३६ **कृष्णजन्म** शिवराम

आ. २४ × १० सें. पा. १४ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक. सं.

आरंभ : श्रीशिवराम देशिकेंद्राय नमः।। श्रीगुरुभ्यो नमः।। धाटि।। देवचितो नर की।। घेऊन मानव बुंथि शरीरदावि नित्य चरित्र परोपरी।।१।। लीला विग्रहीही।। हरी अवतारिला मही हो ।।छ।।

या रचनेत सलग ओव्या न करता विपुल पद रचनेतून कथानक पुढे नेलेले आहे. यात रागतालाचा उल्लेख आहे. सुमारे ३५ पदे.

शेवटी : अक्षता घालोनिया शिरी वदनी घ्या घ्या गोविंदा।। म्हणउनि।। झेलिती चक्रपाणी।। या जो जो जो जो बांधन शामा।। मुनिजन विश्रामा पौढे पर्यंकी।। गुणधामा आवात्पपूर्ण कामा।। जो।।छ।। गाता हळरे गोपिका।। निजऊनि बाळका।। नावे...

४१२ ग्रं.क्र. ३७ **रामजेन्म** शिवराम

आ. २४ × १० सें. पा. २३ × २. अक्षर बारीक. सं.

आरंभ : श्री गुरुभ्योनमः।। आद्यंत प्रारंभा।। पद राम-टी द्वेकारें घ्यानारे।।छ।। उघडुनिया कानिचिखिळी देह बुद्धी बाहेर यानारे।।१।।

या रचनेत पद्याची योजना. कथेस गती पदातूनच. रागताल योजना भरपूर. सुमारे ६० च्यावर पदे.

शेवटी : हे रामजन्माचे कथन पुढे रामचरित गहना।। श्रोते व्हावे सावधान रामायण परियसा।।१।। धन्य वाल्मिकाचे निजवक्त्रू। धन्य श्रोत्याचे श्रोत। धन्य शिवरामचे हृदय पवित्र।। रामचरित्र साठ-वी।। या इति रामजेन्म संपूर्ण।।छ।।

४१३ ग्रं.क्र.३८ **प्रकाशदीप**

(ग्रं.पा.मि.ना)
पूर्वी संशोधनात टिपलेला ग्रंथ
या सूचीच्या वेळेस उपलब्ध झाला नाही.

४१४ ग्रं.क्र. ३९ **गीताचंद्रिका** शिवराम

आ. १४ × १२ सें. पाने २४० × २. अक्षर बारीक प्र.पा.ओ. १३. अ. १८. सं. श्रीकृष्णचंद्राची गीताही अध्यात्मशक्ती आणि तिच्या प्रकाशास चंद्रिका नाव देण्यात कवीने औचित्य साधले आहे. ही प्राचीन मराठी पंडिती परंपरेचं गद्य भाषा आहे. हा उत्कृष्ट नमुना आहे.

आरंभी :

पण आम्ही ना ऐकली हे पद्य रचना।।

जे तुझी ऐकावया तुज जवळी आलो।। लाजसी तू का। बुद्धि तुझी हरिशी सन्मुख होय जे तेव्हांचि तुज तो सुप्रसन्न असे। क्षणी अनुमान करिसी येथे १/१

पुढे राहूग्रस्त सूर्याला म्हणजे अर्जुनाला परमेश्वराने कोणता उपदेश केला ते सांगताना :

।। ते पुढे बरवे कथा कवतूक वाटे परिसता।।
श्रीनाथ पादरज वंदुनी शिवराम अनुवदे।।४७।।

शेवटी :

जागृति हे चंद्रिका। स्वन्पांत पाहाता चंद्रिकाची
सुषुप्ति माझी। अनुष्ठिता हे चंद्रिका दिसे।
उठता बसता तसे ही बोलता चालता।।
हे सर्वदा सर्वत्र गीता चंद्रिका प्रगटे।।
१८ (८०-८१)
मूळ ग्रंथाची हुताशनानंदांनी प्रत केलेली आहे.

गोविंदराज महाराज महागाव मठ संग्रह

४१५ ग्रं.क्र. १ **वरदनागेश** अज्ञानसिद्ध

आ. २२ × १९ सें. पृ. १०२ × २. ओ. २१२५. अ. १८. कागद पातळ. अक्षर बारीक. सं. नागनाथ संप्रदायी मठ. वारकरी व चैतन्य संप्रदाय अंतर्गत. संप्रदायाचा महत्त्वाचा ग्रंथ.

शेवटी :

।। इति श्रीमुद्गल शिष्य संवादे वरद नागेश ग्रंथ. ओव्या. २१२५।।

पार्थिवद्विच आषाढ त्रितिया पक्ष यो.

भानुवासरेच सायन्हि माहाग्रामे वोविया दोनि हजार लिखिताक्षरे।। शिष्यराया किंकर। गुरु महाराज प्रसाद वरे।। येकसेह दोनि पानावर लिहिले स्वहस्ते।।

शके १६९४ वर्तमाने नंदननामाद्वै वैशाख शुद्ध पक्ष द्वितिया तिथौ इंदुवासरे शुभदिनै वरदनागेश संपूर्णमस्तु।। शुभं भवतु।।

४१६ ग्रं.क्र. २ **कपिलगीता** पुराण

आ. १० × १५ सें. पृ. ६० × २. अ. ५. कागद जाड. अक्षर साधारण.

शेवटी :

गोपाल रघुनाथ समर्थ।। श्रीगुरु नागेश कृपावंत। स्फूर्ति देता भगवंत।। मज निश्चय कृपाळु हा।। इति कपिलगीताया।। योगशास्त्रे कपिल मुनि विरचिते।।छ।।

प्रतलेखक व काल अज्ञात.

४१७ ग्रं.क्र. ३ **कोशप्रतिकोश** वेदांत

आ. ७ × १२ सें. पृ. २२ × २. अक्षर साधारण. जाड कागद. ओ. ६७.

उमा महेश्वर संवादातून मूळ संस्कृतातील विवेचन. प्रतलेखक व कालनिर्देश नाही.

४१८ ग्रं.क्र. ४ **सप्तशती**

आ. १२ × १५ सें. पृ. २७० × २. अ. १६. कागद जीर्ण. संहितेसह.

शेवटी : शके १६०८ वर्षे प्रभव नाम संवत्सरे वैशाख वदि येकादशि सौम्य वासरे गोमांत पर्वत तसन्निध्य फोंडा ग्राम नारायण भट्टेन आज्ञेस्तव विश्वनाथ आत्मज गोविंद लिखिते।।

संवत १७६० समय प्रा. शु।। १३ मंगळवासर काशि मणिकर्णिकेवर लिहिलेला.

४१९ ग्रं.क्र. ५ **मनचरित्र**

आ. १० × १२ सें. पा. ४० × २. अक्षर बारीक. अ. ७. कागद पातळ.

वेदांतपर विवेचन. अद्वैत तत्त्व निरूपण.

शेवटी :

पार्थिव नाम संवत्सर उत्तरायणे पुष मासे कृष्ण पक्षे माध्यान्य काळी माहागाव ग्रामे बुध वासरे तद्दीने लेखन संपूर्ण।।

शकाचा आकडा दिला नाही. लेखन मूळ कोणाचे कळत नाही. प्रतलेखक नाव नाही.

४२० ग्रं.क्र. ६ **ज्ञानेश्वरी** ज्ञानेश्वर

आ. २५ × १५ सें. पृ. ३७० × २. अक्षर मध्यम. कागद पातळ. जीर्ण प्रत. सं.

शेवटी :

शके १७०२ शालवरी नाम संवत्सरे चैत्र मासे कृष्ण पक्षे १३ भोमवासरे रेवती नक्षत्र... प्रतलेखक अज्ञात.

४३० ग्रं.क्र. ७ **भागवत** एकनाथ

आ. २८ × १५ सें. पृ. २८० × २. अक्षर खूप बारीक. कागद जाड. सं.

शेवटी :

स्वस्ति श्रीनृप शालीवाहन शके सत्राशेबावन आब्दे विकृति उत्तरायण शुक्ल पक्ष त्रयोदशि भृगुदिनी आळंद सिद्ध स्थळी लिहिले।। भागवत स्कंद अकरा। गोविंदराज बिनरायभट्ट अप्पा। मठ कसबे महागाव नागनाथ संप्रदाय चैतन्याचे असा। ग्राम उपाध्ये मैदंर्गे हस्ताक्षर गोविंद जयराम मकादम मौजे कसगी परगणे आळंद।। शुभं भवतु।।छ।।

४३१ ग्रं.क्र. ८ **उत्तरगीता**

आ. १९ × १० सें. पृ. ६८ × २. अक्षर नेटके. कागद पांढरा. सं. प्र.पा.ओ. ९.

संप्रदायाच्या शिष्याची प्रत. काल दिला नाही. कुणाचे भाष्य याचा उलगडा होत नाही.

४३२ ग्रं.क्र. ९ **गुरुगीता** शिवराम

आ. १४ × ७ सें. पा. ३८ × २. अक्षर बारीक. प्र.पा.ओ. ७. लाल चौकटीत मजकूर लिहिलेला. कागद तपकिरी-पातळ.

ही प्रत रायभट्ट अप्पाच्या हातची. काल निर्देश नाही.

४३३ ग्रं.क्र. १० **गीतापदबोधिनी** शब्दार्थ

आ. १८ × १२ सें. पा. १७० × २. अक्षर साधारण. प्र.पा.ओ. ११.

गीतेच्या अध्यायाचे ओवीपरत्वे कठीण शब्द व अर्थ अशी रचना. मठाचे रायभट्ट अप्पा यांनी स्वहस्ते केलेली प्रत.

रचना काल :

शके १७१८ नळनाम संवत्सर मार्गशीर्ष शु॥१ बुधवार ज्येष्ठ नक्षत्र प्रथम प्रहर॥

४३४ ग्रं.क्र. ११ **कर्मतत्त्व** वामन

आ. २१ × १३ सें. पृ. ३८ × २. प्र.पा.ओ. ९. त्रु. वेदांतपर रचना. पाने विस्कळित व जीर्ण. अक्षर मोठे.

शके १७४० बहुधान्य सं. वैशाख शु॥ १५ भौमवार लेखक पाठकयो शुभं भवतु॥

४३५ ग्रं.क्र. १२ **बाड**

आ. १४ × ४२ सें. पृ. ३० × २ प्र.पा.ओ. १९ अक्षर खूप मोठे. विपुल पदे. अभंग रचना. प्रथम ४ पाने अनुक्रमणिका. त्यानंतर ती सर्व नागनाथ भजनावलीची पदे दिली आहेत. सांप्रदायिक बाड, नागनाथ, चैतन्य संप्रदायी पदे, अभंग, स्तवन.

४३६ ग्रं.क्र. १३ **संहिता** मंत्रसंग्रह

आ. १८ × १० सें. पा. १३२ × २. अक्षर निरनिराळे; पण बारीक.

विविध व विपुल मंत्र आणि विवेचन. प्रतीचा काल शके १६७८. प्रतलेखक नाव नाही.

४३७ ग्रं.क्र. १४ **पंचीकरण** अद्वैततत्त्व

आ. २५ × १२ सें. पृ. १८ × २ कागद पातळ. लेखन साधारण. आद्य आचार्यांच्या पंचीकरणाचा भाग व विवरण. प्रतलेखक व काल नाही. ही टीका कुणाची आहे हे कळत नाही.

४३८ ग्रं.क्र. १५ **स्वात्मसुख** एकनाथ

आ. १७ × १५ सें. पा. ४२ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक. कागद कसरीने खराब झाले आहेत. त्रु. प्रथमचा भाग नाही.

प्रतलेखक पांडुरंग बाळाजी अलगोल, पण लेखनकाल दिला नाही.

४३९ ग्रं.क्र. १६ **पांडवप्रताप**

आ. २४ × १५ सें. प्र.पा.ओ. १२. अ. ७. त्रु. गडद काळी शाई. लाल दंड. कागद जाड.

संपूर्ण पोथी भिजून खराब झालेली आहे. अध्याय ७ नंतरचा सर्व भाग गहाळ.

४४० ग्रं.क्र. १७ **लघुचाणक्य**

आ. २५ × २४ सें. प्र.पा.ओ. ९. पृ. १५ × २. अक्षर मोठे. कागद जाड-चिवट.

संपूर्ण पोथी भिजून खराब असून, वाळवीने दुर्दशा झालेली. वाचण्यास कठीण.

प्रतलेखक व कालनिर्देश नाही.

४४१ ग्रं.क्र. १८ **पासष्टी** ज्ञानेश्वर

आ. २६ × १५ सें. प्र.पा.ओ. ११. पृ. ११ × २. श्लो. १०८. टी.॥ सं.॥ ज्ञानदेव विरचित टीका॥ उद्देशें येकदोनी जायीचेति॥ बोलोनि तुम्ही आदि कदनी मुख्य जे जे॥४॥

लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

४४२ ग्रं.क्र. १९ **समश्लोकी** वामन

आ. १४ × १५ सें. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक, पण स्पष्ट. पृ. ४५ × २. अ. १८. सं.

इति टीका समश्लोकी॥ श्रीपती साठी कर्ता तो वामनाचा मनोरथी॥ कोठुनि मत कुमत चि घेऊनि सांगितले जे निमूट कसे॥ वामन यात ते फारनि शोधिले कोण्ही आश्रय नाहिये॥

४४३ ग्रं.क्र. २० **निगमसार** वामन

आ. १५ × १२ सें. प्र.पा.ओ. १०. पृ. १० × २. कागद जाड. अक्षर मोठे. मधली पाने आरंभी.

श्रीगणेशाय नमः॥ श्री सरस्वत्येय नमः॥ श्री सभ्यो नमः॥ ८४ ओवीपर्यंतचा भाग उपलब्ध.

४४४ **गुरुगीता** शिवराम

आ. १५ × १७५ सें. पा. १४० × २ प्र.पा.ओ. ७. समश्लोकी. एकूण ओव्या १३८. मठाच्या पीठाधीशानी केलेली प्रत. काल दिला नाही.

४४५ ग्रं.क्र. २१ **आगमसागर** वामन

आ. १५ × २१ सें. प्र.पा.ओ. १३. अक्षर मोठे. त्रु. पोथीवरील भाग व शेवटचा भाग गहाळ. पूर्ण पोथी पाण्याने भिजून कागद चिकटलेले. प्रतलेखक आणि काल अज्ञात.

४४६ ग्रं.क्र. २२ **हस्तामलक** एकनाथ

आ. १७ × १३ सें. प्र.पा.ओ. १३ अक्षर अत्यंत बारीक. त्रु.

अधूनमधून पाने गहाळ. विस्कळित असा ग्रंथ. क्रम लागत नाही.

मठाच्या गोविंदराज महाराजांनी केलेली प्रत. श्रमाने ग्रंथ लिहिला असा आवर्जून उल्लेख. लेखनकाल अज्ञात.

४४७ ग्रं.क्र. २३ **वैराग्यतरंग** रघुनाथ

संशोधनात टिपलेली ही पोथी अपरिहार्य कारणामुळे या सूचीच्या वेळी पाहावयास मिळाली नाही.

४४८ ग्रं.क्र. २४ **मैलारी माहात्म्य**

आ. २४ × १५ सें. प्र.पा.ओ. १३. अ. ७ पर्यंत.

शेवटी : ब्रह्मोतर खंडीची कथा. सनत्कुमार म्हणती एक सुत।। शौनिकादिका। प्रतित्वता व्यास सुत सांगतो।।

शके १७८४ रक्ताक्षी माघ शु. १४ मधूनच पाने गहाळ. शेवटचा भाग नाही. अंबादास बाजी.

४४९ ग्रं.क्र. २५ **कपिलगीता**

आ. १७ × १२ सें. प्र.पा.ओ. ९ अक्षर मध्यम. कागद जीर्ण. त्रु. प्रतलेखक व लेखनकाल अज्ञात.

४५० ग्रं.क्र. २६ **शिवगीता**

आ. १७ × १५ सें. प्र.पा.ओ. ६. पृ. ३० × २. संशोधनात पूर्वी टिपलेली पोथी आता सूची करतेवेळी सापडली नाही. (ग्रं. पा. मि. ना.)

४५१ ग्रं.क्र. २७ **अष्टावक्रगीता** शिवराम

आ. १७ × १५ सें. प्र.पा.ओ. ९. पृ. २८ × २. अक्षर साधारण. त्रु. कागद पातळ.

शिवराम स्वामींचे हे भाष्य. शेवटचा भाग गहाळ. प्रत लेखक व प्रतीचा काल निर्देश नाही.

४५२ ग्रं.क्र. २८ **पांडुरंग माहात्म्य**

आ. १७ × १५ सें. प्र.पा.ओ. ९. अक्षर बारीक. कागद जाड. पृ. १८ × २. त्रु.

संपूर्ण पोथी भिजून पाने चिकटलेली आहेत. शेवटचे पान नाही. प्रतलेखक व काल अज्ञात.

४५३ ग्रं.क्र.२९ **ललितासहस्रनाम**

आ. ११ × ९ सें. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक. देवी उपासनेतील महत्त्वाची रचना.

कौलकल्प सूत्रानुसार ललिता अंबिका नित्य कर्मानु...

शेवटी : शके १८५० विभवनाम संवत्सरे उ. शिशीर माघ कृष्ण बुध सायंका. रामकृष्ण ग्रामोध्ये मंदिर सिद्धेश्वर शिवा सुलतानपूरकर लेखन।। रामकृष्ण आणासाहेब मठ संस्थानस्यदत्वा परोपकारार्थ श्रीसद्‌गुरु नागनाथार्पणमस्तु।।छ।।

४५४ ग्रं.क्र.३० **गीतामंजिरी** उद्धव

आ. २१ × ११ सें. प्र.पा.ओ. ९. अ. १८. कागद जाड. अक्षर मोठे.

शेवटी : उद्धव चैतन्यकृत संवाद।। टीका।। भावगर्भ गीतार्थमंजिरी मोक्ष।। श्रीपतियोगपति कमलापति जेथ कृपा करी आत्म सुखाने पार्थ धनुर्धाराति कृपामृत प्रासुनिघलितेथ चिहोणे. तेथ श्रीया विजयासह नांदत व्यासकृपे मजनिश्चित बाणे।। उद्धव चिदघन् स्वानुभवे सुख पावतो अव्दय लेणे।।

४५५ ग्रं.क्र. ३१ **सीता स्वयंवर** वामन

आ. १३ × १७ सें. प्र.पा.ओ. ९. पृ. ३० × २.

अक्षर अत्यंत बारीक व पुसट पोथी. संपूर्ण भिजून पाने चिकटलेली आहेत. वाचणे कठीण. काल व प्रतलेखक अज्ञात.

४५६ ग्रं.क्र. ३२ **बाड**

आ. २० × १६ से. उभी वही. पृ. २०२ × २. वस्त्रहरणाची एक रचना. २४७ ओव्या-तुकारामांचे ३३२ अभंग. मोठे बाड. मराठी अन्य संतांची तुरळक रचना. प्रामुख्याने तुकारामांची रचना संकलित केलेली आहे. प्रतीचा काल कळत नाही.

४५७ ग्रं.क्र. ३३ **शिवरात्री कथा**

आ. १७ × १५ सें. प्र.पा.ओ. १० अक्षर बारीक. कागद पातळ, पण चिवट. शाई गडद काळी. त्रु. शेवटचा भाग नाही. पृ. १३ × २.

शिवरात्री आख्यानाचा भाग.

प्रतलेखक व प्रतकाल ज्ञात होत नाही.

४५८ ग्रं.क्र. ३४ **दासबोध** रामदास

आ. १७ × ११ सें. प्र.पा.ओ. १०. कागद जाड व गडद काळी शाई. त्रु.

दशक ३, ९, १०, १६ यातील भाग.

पोथी भिजून पाने चिकटलेली. प्रतलेखक आणि प्रतीचा काल नाही. पोथीची दुर्दशा झालेली आहे.

४५९ ग्रं.क्र. ३५ **गीता**

आ. १६ × ७ सें. प्र.पा.ओ. ७. पृ. १४२ × २. अक्षर छान. कागद पांढरा, चिवट. श्लोक व भाष्य या क्रमाने लेखन.

शके १७७३ रक्ताक्षी नाम संवत्सराची प्रत. दक्षिणायने शरदऋतु कार्तिक मास शुद्ध इंदु वासर. तिथी नाही.

प्रतलेखकाचे नाव नाही. कागद भिजून खराब. मूळ टीका कुणाची कळत नाही.

४६० ग्रं.क्र. ३६ **अर्चनपद्धती**

आ. ७ × १२ सें. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक. पृ. २० × २.

नागनाथ संप्रदायी उपासनेतील अर्चनेचे संकलन. प्रतलेखक व कालनिर्देश नाही.

४६१ ग्रं.क्र. ३७ **विष्णुसहस्रनाम**

आ. १७ × १२ सें. प्र.पा.ओ. १०. अक्षर अत्यंत बारीक. सपूर्ण संहिता असून, काही भागाचे मराठीत विवेचन आलेले आहे.

गोविंदराज महाराज यांनी स्वहस्ते केलेली प्रत. मठातील परंपरेची नावे नमनात, आरंभी आलेली आहेत. शेवटी नागनाथार्पणमस्तु।।छ।।

४६२ ग्रं.क्र. ३८ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. १४ × २२ सें. प्र. पा. ओ. १२. कागद जाड. अक्षर नेटके. सं. अं. ४९ उल्लेख अध्याय क्रमांक चुकलेले. संपूर्ण पोथी आहे. गोविंदराज महाराजांच्या शिष्याने प्रत केली. यात प्रतीचा काल शके १७८७ असा दिलेला आहे. तिथी-वारांचा भाग नाही.

४६३ ग्रं. क्रं. ३९ **व्यंकटेश स्तवन** देवीदास

आ १६ × ११ सें. प्र पा ओ ९. पृ १६ × २.

गडद काळी शाई. कागद दौलताबादी. ओ. १००.

शेवटी : देवदास श्रोतया चतुरा प्रार्थना।। शतक पठण करता जावया मोक्षाच्या माहेरा।। कधिनलगे सायास।। श्रीव्यंकटेशस्तोत्र संपूर्णमस्तु।। लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

४६४ ग्रं.क्र. ४० **गीता**

आ. १४ × ४ से. प्र. पा. ओ. ९. अक्षर बारीक. नेटके पृ. २११ × २. काही पाने कसरीने खराब. रामात्मजाने केलेली प्रत. श्रावण शु।। २ मंदवासर सन १२३६ फसलीची प्रत (हा काळ १८२६ इ. स. चा येतो.)

प्रतीचे लेखन महाग्राम येथे मठातीलच असून, मठांच्या गुरूंची नावे नमनात आली आहेत.

४६५ ग्रं.क्र. ४१ **इंद्र नारद संवाद**

आ. १३ × १७ सें. प्र. पा. ओ. १३.

अक्षर अत्यंत बारीक कागद पातळ, पण चिवट. त्रु.

इंद्र-नारद संवादातील भाग. प्रथमची व शेवटी पाने गहाळ. प्रतलेखक व कालनिर्देश नाही.

४६६ ग्रं. क्र. ४२ **गीता**

आ. १५ × १२ सें. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक. संस्कृत श्लोक व भाष्य.

।।शके १६९५ जयनाम संवत्सर ३ पर्व शैष रु. माघ व।। १४ इंदुवासरे, प्रत. सर्वच भाग कसरीने खराब. पोथी भिजून बरीच पाने चिकटलेली. प्रत कुणाची व भाष्य कुणाचे याचा बोध होत नाही.

४६७ ग्रं. क्र. ४३ **ताराकांड**

आ. २२ × ११ सें. प्र. पा. ओ. ९ पृ. ४८ × २.

अक्षर मोठे. कागद जाड. प्रत्येक चरणास लांब दंड रेषा. पाने विस्कळित झालेली. संपूर्ण पोथी भिजून खराब झालेली प्रत.

१७०४ शुभकृत नाम संवत्सर कार्तिक मास शु।। ५ स्थिर वासर पाषाणाख्य पुरस्तेन तमण भट्ट लक्ष्मणाख्या. कलबुर्ग (गुलबर्गा) या कानडी नावाचे संस्कृतीकरण पाषाणाख्य-पूर असे केले आहे.

४६८ ग्रं. क्र. ४४ **सूतसंहिता** पुराण

आ. १० × २५ सें. प्र. पा. ओ. ८. अक्षर मोठे. अ. ८. यातच एका ठिकाणी सूतगीता असाही उल्लेख.

शेवटी नागनार्थर्पणमस्तु एवढाच भाग. कालनिर्देश नाही. प्रतलेखक अज्ञात.

४६९ ग्रं. क्र. ४५ **स्कंदपुराण वैभवखंड**

आ. १७ × १५ सें. प्र. पा. ओ. ८ अक्षर गिचमिड. कागद भिजून पोथीची दुर्दशा झालेली आहे.

स्कंद पुराणातील काही आख्यानाचे येथे विवेचन आलेले आहे. प्रतलेखक व काल अज्ञात.

४७० ग्रं.क्र. ४६ **देवीमहात्म्य**

आ. १८ × ११ सें. प्र. पा. ओ. १०. अक्षर बारीक. कागद - जाड तपकिरी पृ. २१६ × २.

शके १७०९ माघ शुध्द द्वितीया भौमवासर. गोविंद बाळकिशेन पोलीस पाटील अपचंद।।छ।।

४७१ ग्रं. क्र. ४७ **शिवदिव्यनाभापार्जन**

आ. १७ × १५ सें. प्र. पा. ओ. ९. अक्षर मोठे. त्रु. देवी उपासनेतील संस्कृत श्लोकाचा भाग. मराठी विवेचन. पोथी भिजून खराब झालेली आहे.

शके १८५० विभवनाम संवत्सर राजोळग्राम विश्वनाथ पुत्र सांभभट लेखक. मठातील प्रत. वर-नागनाथ प्रसन्न असा उल्लेख.

४७२ ग्रं. क्र. ४८ **अर्चनपद्धती**

आ. १७ × १२ सें. प्र. पा. ओ. १२. अक्षर बारीक. पृ. ४० × २.

मठाच्या परंपरेतील अर्चनेचे संकलन. प्रतीचा काल व प्रतलेखक अज्ञात.

४७३ ग्रं. क्र. ४९ **रामार्या** मुद्गल

आ. १४ × १० सें. प्र. पा. ओ. १०. पृ. १३ × २. त्रु.

कागद भिजून पोथी खराब झालेली आहे. यामध्ये आर्या क्रमांक २५ पासून क्रमांक ८५ पर्यंतचा भाग विवेचनासह आहे. प्रतलेखक आणि कालनिर्देश नाही. मूळ संस्कृत ग्रंथावर कुणाचे भाष्य आहे हे कळत नाही. अक्षर पुसट. वाचणे कठीण.

४७४ ग्रं.क्र. ५० **लापणिका**

आ. १५ × १० सें. प्र. पा. ओ. ९. त्रु. ८ अ. कागद पांढरा जाड-कृष्णार्जुन संवादातून. पृ. ८ × २.

शेवटी : हे बरे की भजनी जे निर्गुण तेचिते बरे।।

करू हा प्रसंग सर्वज्ञा प्रति हे धरिले मनी।।

प्रश्नभावे श्रीकृष्णप्रती अजी ठेवुनिया समश्लोकी सांगती श्लोक हे पृथक।।१००।।

४७५ ग्रं. क्र. ५१ **नागेशलीलामृत** भानजी

आ. १७ × २२ सें. प्र.पा.ओ. १८ अक्षर बारीक पृ. ५७० × २.

पूर्वी संशोधनात नोंद केली. तो ग्रंथ सूची करताना उपलब्ध नाही. (ग्रं. पा. मि. ना.) विवरण अन्यत्र आले आहे.

४७६ ग्रं. क्र. ५२ **दत्तात्रेय अवधूत अनुवाद**

आ. १७ × १५ सें. प्र. पा. ओ. ९. पृ. २६ × २ अक्षर मोठे त्रु. शेवटचा भाग नाही. दत्तसंप्रदायी पोथी. दत्तात्रेय अवधूत संवादातून आलेले वेदांताचे विवेचन यात आहे.

शेवटचा भाग नसल्याने प्रतलेखक व लेखनकाल कळत नाही.

४७७ ग्रं. क्र. ५३ **विवेकसिंधू** मुकुंदराज

आ. १७ × १३ सें. प्र.पा. ओ. ९. पृ. ७० × २. अक्षर मोठे. कागद जाड. प्रत्येक चरणास लाल दंड रेषा. त्रु. पोथीची प्रथमची पाने व शेवटची पाने गहाळ. प्रतलेखक व प्रतीचा काल उपलब्ध नाही. पोथी भिजून खराब झालेली.

४७८ ग्रं. क्र. ५४ **गीतार्णव** दासोपंत

आ. ३० × २१ सें. प्र.पा.ओ. १३. अक्षर मध्यम. काळी गडद शाई. कागद जाड. पृ. १४० × २ त्रु. प्रचंड ग्रंथाचा थोडा भाग. पाने विस्कळित. अनेक अध्यायांची पाने एकत्र ठेवलेली पोथी. प्रतलेखक व काल अज्ञात.

४७९ ग्रं.क्र. ५५ **संदेहहरण** रघुनाथ

आ. २१ × १५ पृ. १४ × २. प्र.पा.ओ. १४. अक्षर बारीक. वेदांताची चर्चा. संपूर्ण ग्रंथ भिजून दुर्दशा. वाचनास अत्यंत कठीण. मूळ लेखक अज्ञात.

प्रतलेखक रघुनाथ निंबाळकर.

धारासूर क्षेत्रस्य– लेखनकाल नाही.

४८० ग्रं.क्र. ५६ **अपरोक्षानुभूती**

आ. १३ × १७ सें. प्र.पा.ओ. १०. अक्षर साधारण. पृ. ३१ × २.

आचार्यांच्या मूळ रचनेवर मराठी भाष्य. भाष्य कुणाचे आहे ते कळत नाही. लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

४८१ ग्रं. क्र. ५७ **गर्भगीता**

आ. १७ × १२ सें. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक. पृ. १० × २. त्रु.

गीतेच्या मूळ श्लोकासह मराठी भाष्य. ही टीका कुणाची आहे याचा बोध होत नाही. शेवटचा भाग नाही. प्रतलेखन काल नाही.

४८२ ग्रं. क्र. ५८ **रुक्मिणी स्वयंवर** एकनाथ

आ. ३० × २१ सें. प्र.पा.ओ.१३. पृ. ६० × २.

अक्षर साधारण. संपूर्ण पोथी भिजून पाने चिकटलेली आहेत. मधलेच काही अध्याय नाहीत.

शके १७७१ दुर्मेतीनाम सवत्सर फाल्गुन श॥१२ लक्ष्मण मुद्गल कुलकर्णी कसबे चिंचोळी पृगणे भालकी सरकार सुभे ममदाबाद बिदरस्य.

४८३ ग्रं.क्र. ५९ **रामविजय** श्रीधर

आ. २८ × २० से. प्र.पा.ओ. १६. कागद जाड. गडद काळी शाई. सं. अ. ४०.

प्रत्येक चरणास लाल दंड रेषा. लेखन व्यवस्थित केलेले. अक्षर नेटके.

शके १७३५ श्रीमुख संवत्सर श्रावण शु॥ १० मंदवासरे. लेखनकाल दिला असून, प्रतलेखक अज्ञात.

४८४ ग्रं.क्र. ६० **पदबोधिनी**

आ. १७ × १४ सें. प्र.पा.ओ. ८.

पृ. ५१ × २. अक्षर मोठे. त्रु. शेवटचा भाग नाही. प्रतलेखक अज्ञात. काल दिला नाही. विवरण अन्यत्र आले आहे.

४८५ ग्रं. क्र. ६१ **गोपिकागीत** गोपाळ कवी

आ. १० × १५ सें. प्र.पा.ओ. ८

अक्षर बारीक. प्रथमची व शेवटी पाने गहाळ. पृ. ३२ × २.

श्रीकृष्ण चरित्रातील विविध प्रसंग.

४८६ ग्रं.क्र. ६२ **भावार्थरामायण** एकनाथ

आ. ३० × १४ सें. प्र.पा.ओ. १२ अक्षर रेखीव. प्र. १८. शाई गडद काळी. वरील पानावर वेलबुटीने सजावट. अक्षर मोठे.

संपूर्ण पोथी भिजून खराब झालेली आहे. प्रतलेखक व लेखनकाल नाही. मठातीलच लेखन. नमनात पीठाधीश नावे.

४८७ ग्रं.क्र. ६३ **ज्ञानेश्वरी** ज्ञानेश्वर

आ. १४ × ३० सें. पा. ३००. सं.

कागद जाड. अक्षर मोठे. गडद काळी शाई. लेखन सुरेख. प्रत्येक चरणास लाल दंड रेषा. काही भाग भिजून चिकटलेला.

यात प्रत लेखनाचा काल व प्रतलेखकाचे नाव नाही.

४८८ ग्रं.क्र. ६४ **एकादशस्कंध** एकनाथ

आ. २४ × १२ सें.प्र.पा.ओ. १३. अक्षर नेटके. कागद दौलताबादी जाड. अ. ८. पृ. १०२ × २. यामध्ये केवळ प्रथमची पानेच उपलब्ध. शाई गडद काळी. काही पानांना कसरीने भोके पडलेली आहेत. लेखनकालाचा उल्लेख नाही. एका पानावर रामानंद गुरू सन्निध समाप्त असा उल्लेख शेवटी आलेला आहे. मठाच्या कुणा शिष्याने ही प्रत केलेली असावी.

४८९ ग्रं.क्र. ६५ **अश्वमेध** जयमुनी

आ ३० × ४५ सें. प्र.पा.ओ.

अ. ९६ ओ. ९९७२ सन १२३५ पार्थिव नाम संवत्सरे उत्तरायणे पौष शु।। ११ शुक्रवार. अथ अनुक्रम टीका. स्थिती चांगली.

पार्थिवनाम संवत्सर उत्तरायण पौष शु।।११ शुक्रवार शके १७४७ पौष शु।। गुरुवार श्रीहरीकृत असा उल्लेख.

४९० ग्रं.क्र. ६६ **जीवनमुक्त** वामन

आ. १५ × १३ सें. प्र. पा. ओ. १२ अक्षर फार बारीक. पृ. १४ × २. त्रु.

मधलाच काही भाग नाही.

शेवटी : शके १७४० वामनकृत समाप्त, असा उल्लेख. प्रत लेखकाचे नाव नाही.

४९१ ग्रं. क्र. ६७ **लघुचाणक्य**

आ. ३० × १५ सें. प्र. पा. ओ. १०. पृ. १३ × २. कागद जाड. त्रु.

संपूर्ण पोथी वाळवीने खराब अक्षर पुसट झालेली प्रत.

४९२ ग्रं. क्र. ६८ **रामनाममंत्र**

आ. १३ × १५ सें. प्र.पा.ओ. १०.

पृ. ८ × २. अक्षर बारीक. कागद पातळ. रामनामाचे महत्त्व विशद करणारे. मंत्रासह विवेचन.

४९३ ग्रं.क्र. ६९ **प्रकाशदीप** मृत्युंजय

आ. १५ × ११. पृ. २१ × २. प्र.पा.ओ. ९. पृष्ठ ३ ते २४ त्रु. काळी गडद शाई.

शेवटी : सकळासि जाणि ते जाणणे चि उरले। आणि तेचि आपुले रूप जाण।।१२।। जे जे तु जाणसी तेचि तु नव्हेसी मग उरलासी तुजे व उरलासी।।२४।। आरंभी १४ वा श्लोक. म्हणोनि चातुरी सावध होई जेथे ग्रंथीचा अनुभव घेईजे हृदयी सदा वाहीजे ते होईजे सित्ध।....

४९४ ग्रं. क्र. ७० **काशिखंड**

आ. १७ × २५ सें. प्र.पा.ओ. १३. पृ. ३०० × २.

अक्षर मोठे. कागद जाड. पुराणाचा भाग. खंड १७.

शेवटी : इतिश्री स्कंद पुराणे काशिखंडे शिवोपाख्याने दंडपाणी कथन्नोनाम सूची शतीमोध्यायाय।।३६ संपूर्णमस्तु श्री आबोत्धोवा सुबत्धो वा ममदोषो न विद्यते।।छ।।

शके १७७१ प्रवर्तमाने शु. ना. स. ३ वैश कृष्ण... काशिखंड समाप्त।।६३६।। वडवाळ सिद्ध नागनाथार्पणमस्तु।। गोविंदराज।।

४९५ ग्रं. क्र. ७१ **वनपर्व** मुक्तेश्वर

आ. २१ × १३ सें. प्र.पा.ओ. ९. अक्षर मोठे. जाड कागद. प्रत्येक चरणास लाल दंडरेषा. प्रत्येक अध्यायास वेलबुट्टी. संपूर्ण रचना उपलब्ध. प्रतलेखक व कालनिर्देश नाही शेवटच्या पानाला वेलबुट्टीची सजावट.

४९६ ग्रं. क्र. ७२ **विराटपर्व** मुक्तेश्वर

आ. २१ × १३ सें. प्र.पा. ओ. ९ अक्षर मोठे. कागद जाड

पांढरा. प्रत्येक चरणास लाल दंडरेषा. संपूर्ण रचना. प्रथमचे व शेवटचे पान वेलबुटीने सजविलेले. प्रतलेखक व काल अज्ञात.

४९७ ग्रं. क्र. ७३ **रामविजय** श्रीधर

आ. २८ × २० सें. प्र.पा.ओ. १६. कागद दौलताबादी जाड. अक्षर मोठे. गडद काळी शाई. शेवटची पाने भिजून खराब. संपूर्ण अ. ४०. सुभानुसंवत्सर... भानुवार. उ प. असा उल्लेख. शकाचा आकडा नाही.

४९८ ग्रं. क्र. ७४ **संदेहहरण** रघुनाथ

आ. १७ × १५ सें. प्र.पा.ओ. १३. पृ. १० × २. अक्षर मध्यम. कागद जाड. त्रु.

शेवटी :

इतिश्री संदेहहरण शिवगौरी संभाषण
सेवानामी ऐक्य पूर्णतपपदतत्पद आणि
पदोन्नमद शमो खंड।।१३९।। इतिसंदेह
हरण राघवकृत संपूर्णम्।। श्रीदत्तात्रेय अवधूत-
पर्णामस्तु।। रघुनाथ विरचित संपूर्णम्।।
रचनाकाल व प्रतलेखक अज्ञात.

४९९ ग्रं. क्र. ७५ **दीपरत्नाकर** रामानंद

आ. २३ × १५ सें. प्र.पा.ओ. १३ पृ. ५० × २. अक्षर साधारण. कागद जाड. शेवटचा भाग नाही.

आरंभी :

श्रीगुरवे नमः।। जयजय सद्‌गुरू दीन बंधु।।
जयजय सद्‌गुरू कृपासिंधु।। जयजय
अनादि सद्‌गुरू साधु।। जगवंद्य सद्‌गुरू।।१।।
गुरूस्तवनपर व उपदेशपर. शेवटचा भाग गहाळ.
प्रतलेखक व काल अज्ञात.

५०० ग्रं. क्र. ७६ **पुंडलिक आख्यान**

आ. १४ × ३० सें. प्र.पा.ओ. १२. पृ. ८० × २ अक्षर मोठे. कागद जाड.

शेवटी :

इति श्रीइतिहास समुच्चये पुंडलिक
कथानाम त्रयविशर्ती मोध्यायः श्रीरामकृष्ण
गोविंदाय नमः गणपतीये नमः सरस्वतीये
नमः श्रीरस्तु।।छ।।
सन्न ११७७ जेष्ठ शु।। ७ भृगुवार होन्नोदेव।
राव कुलकर्णी मौजे मणूर सरकार कलबुर्गा
हस्तलिखित समाप्त।। इदं पुस्तक लक्षणपंत दिवाणीचे असे (११७७ फ.ला. इ.स. १८५७ चा काळ येतो.)

५०१ ग्रं. क्र. ७७ **हरिविजय** श्रीधर

आ.३१ × १४ सें. प्र.पा.ओ. १२. अ. ३६. त्रु. अक्षर मोठे. कागद पांढरा,जाड छान, पुढील अध्याय नाही.

सन ११९४ फसली भौमवार राधो बाबूराव सुत गोपाळेन लिखित (इ.स. १८८४)

५०२ ग्रं. क्र. ७८ **वीरभद्रवडभव**

आ. १४ × १० सें. प्र.पा.ओ. ६. पृ. १४ × २. अक्षर मोठे. गडद काळी शाई. कागद जाड. श्रीगणपतेय नमः।। श्रीवीरभद्र वडभव वीरभद्रस्तोत्र मंत्रा।। पुढे विवेचन.

शेवटी : शके १७६० प्रवर्तमाने विलांबी नाम संवत्सरे हेमंत ऋतु पुष्यमासे कृष्ण पक्षे आद्या गुरुवासरे अतंतीरायन दैवत चरण सायंन्ही समयो।।छ।।

५०३ ग्रं. क्र. ७९ **गौरीकवच**

आ. १७ × ११ सें. प्र.पा.ओ. ११. संस्कृत श्लोक।। भाष्य।। अशी रचना. पृ. १० × २. श्रीगुरुभ्योनमः।। नागनाथ ये नमः।। अथ मंत्र।। टीका।।

शेवटी : जंभीर वृक्षाचे खाली गौरीकवच १०८ वेळा कवच पउण करून येताना त्या वृक्षाचे पान डोक्यावर धरावे. याप्रमाणे २८ दिवस नित्य पठण केले, तर अनेक पापताप लय पावते।।छ।। लेखनकाल व प्रत लेखक अज्ञात.

५०४ ग्रं. क्र. ८० **महाभारत**

आ.३०×१९ सें. प्र.पा.ओ.१६.पृ. ८२×२. त्रु.अ. १४.

आरंभ :

श्रीगणाधिपतये नमः।। श्रीगुरुदत्तात्रेय नमः।।
श्रीदेवीये नमः।। ॐ नमोजी लक्ष्मीकांता,

विश्वव्यापका श्री अनंता उत्पती स्थिती
संव्हारिता स्वानंद मूर्ती चिद्धन।

शेवटी :

भृगुकुला यशभारत।। जामदग्न गोत्री उद्धव
जाणी मोरोजी नरहर निधान। देशपांडे इटे।।२७।।
तयो उदरीद्भवक नरहरी जन्मला
भाग्यवंत हरिगुण प्रेमा अद्भुता पर्णकीय भारती।।१२६।।
इति श्रीमन्महाभारत व शक्य कर्ण पर्वणी
संजय धृतराष्ट्र संवादे द्वितीय दिवस युर्ध
स्वामी श्रीतृप शालिवाहन शके सत्राशे
सातेचाळी साजिरा वर्षे अधिक सत्यताळीस
वरी (१७४७) पार्थवसंवत्सरे.... पौष
शु तिवाचस्पती वर्या....

५०५ ग्रं. क्र. ८१ **ज्ञानेश्वरी** ज्ञानेश्वर

आ. १४ × ३० सें. अक्षर मोठे छान प्र.पा.ओ. १३. कागद जाड. गडद काळी शाई. सं. स्थिती चांगली.

प्रतलेखक व कालनिर्देश नाही.

५०६ ग्रं. क्र. ८२ **पांडवप्रताप** श्रीधर

आ. २४ × १५ सें. प्र.पा.ओ. १२ अक्षर छान. गडद काळी शाई. कागद जाड. अ. ७. त्रु.

संपूर्ण पोथी भिजून पोथीची दुर्दशा

५०७ ग्रं. क्र. ८३ **भक्तराज** ज्ञानेश्वर

आ. २३ × १७ सें. प्र.पा. ओ. १०. अक्षर मोठे. पृ. १८ ×२. सं. विवरण अन्यत्र आले आहे. ही पोथी भिजून पाने चिकटली आहेत. लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

५०८ ग्रं. क्र. ८४ **सवाया** वामन

आ. २४ × १५ सें. पृ. १० × २. प्र. पा. ओ. १३. अक्षर बारीक. पोथी भिजून खराब. इति वामनकृत सवायी श्लोक संपूर्णम्।। श्रीरस्तु।।छ।।छ।।

५०९ ग्रं. क्र. ८५ **विठ्ठलसहस्रनाम**

आ. १५ × ११ सें. प्र.पा.ओ. ९. पृ. १० × २. अक्षर साधारण. पोथी भिजून दुर्दशा. त्रु.

शेवटी : शके १६९५ सवर्तमाने. सं. तदिनी लिखिते. एवढा भाग वाचता येतो.

श्री. पु. ना. तथा बाबासाहेब गुर्जर संग्रह, गुलबर्गा

५१० ग्रं. क्र. १ **बाड**

आ. १० × १४ सें.प्र.पा.ओ. १८. पाने २४ × २.

या बाडात विविध रचना. अक्षर मोठे. कृष्णदान कथा, गजगौरी आख्यान, तुकाराम अभंग, चंदिरवदनी स्तुती, पुरंदरदास कानडी पदे. रागतालांचा उल्लेख आवर्जून. २४ पानांनंतर पुढील पाने कोरी.

५११ ग्रं. क्र. २ **बाड**

आ. १२ × १२ सें. पृ. ४५० × २. प्र.पा.ओ. ८. अक्षर मोठे. मजबूत. कोरे असलेले जाड कपड्याचे वेष्ठन. दोरीने बांधण्याची सोय.

प्रथम २०० पानांत नागनाथ संप्रदायी रचना, अभंग, भूपाळी, अष्टक, आनंदलहरी (२५ ओ.) ही रचना अज्ञात, सिद्धलिंग, यांची, नंतर तुकाराम, मानपुरी, धारया जंगम, कबीर, ज्ञानेश्वर, नामदेव, रामदास, मालो, गुंडा, विष्णुदास, केशवदास, आणि शेवटी वीरकवींची २९ अभंग रचना. यासच वीरनाथ औसेकर म्हणतात. हिंदी कन्नड रचना ज्ञानेश्वर हरि पाठ. २७. अभंग ३० खूप मोठे बाड. मध्येच एका पानावर सन १२२८ फ. (इ.स. १८१८) अश्विन मास सन ३३ असा उल्लेख आहे.

५१२ ग्रं. क्र. ३ **माणूर शिलालेख**

आ. ३० × २१ सें. पाने २ × २ अक्षर बारीक. टिपण महत्त्वाचे.

कृष्णदेवची कारकीर्द तपशील. शके ११६७ ते ११८२ चा इतिहास. शके ११७० कीलक संवत्सराचा महत्त्वाचा भाग.

५१३ ग्रं. क्र. ४ **अल्लंखानची पदे**

आ. १३ × २० सें. पाने ६ × २. अक्षर बारीक. एकूण विविध ८ पदे. सर्व वेदांतपर रचना. नागनाथ संप्रदायी रचना.

५१४ ग्रं. क्र. ५ **पद्यात्मकपत्र**

आ. ११ × १४ सें. पृ. ४ × २. त्रु.

महागाव नागनाथ मठाचे गोविंदराज महाराज यांना श्रीपाद यांनी पाठविलेले पद्यात्मक पत्र.

आरंभ :

तुम्ही संत कुळीचे राजा।।
म्हणोनि श्रीनाम गोविंद राजा।।धृ।।
आलो महाग्रामा अति उटाउटी।।
फाल्गुन मास इनान भेटी।।८।।
सुचे उफराटी पत्रार्थ।।
कळी साल मजकुरी।। नागर अर्धमात्रा।।
उभारी।। सुत्रा लावोनि वृजेपुरी।।
लेखन काल अज्ञात.

५१५ क्र. ६ **फटाक**

आ. १० × १२ से. पृ. २ × २ त्रु.

नागनाथ संप्रदायी स्तोत्र. चंदलादेवी स्तवन. पाने जीर्ण. लेखन सुटसुटीत. रचनेच्या वर मोठ्या अक्षरांत 'फटाक' शीर्षक. अर्थबोध होत नाही. कागद लालसर

५१६ क्र. ७ **अल्लंप्रभु रचना**

आ. १८ × २५ सें. पृ. ४ × २. अक्षर मोठे. व्यवस्थित लेखन.

विविध स्फुट रचना. नागनाथ संप्रदायी रचना.

वानगी : आरतीची

जय जय आरती नागनाथ देवा।।
सद्गुरू नागनाथ देवा।।धृ.।।

शेवटी :

सहजचि आरती निजाचा भाव।।
अल्लंप्रभू ओवाळी नागेश।।१।।छ।।

५१७ क्र. ८ **पत्र**

आ. २८ × १२ सें. पाने ४ × २. अक्षर मोठे-सुटसुटीत.

गोविंदराज यांना एका पत्रात चार जणांनी लिहिलेला मजकूर. कसे वागावे याबद्दलचा मजकूर.

५१८ क्र. ९ **पत्र**

आ. १८ × १२ सें. पृ. ३ × २. जीर्ण कागद. अक्षर ठळक रेखीव.

गोविंद राजगुरू आत्मानंद पत्र, असा उल्लेख. वेदांताचा उपदेश. संप्रदायी विवेचन.

५१९ क्र. १० **नागनाथस्तवन** गुरुदास

आ. ४३ × १४ सें. प्र.पा.ओ. २६. अक्षर बारीक. १७ ओ.

आरंभ :

सिद्धराज सिद्धमूर्ती।।
श्रीवडवाळसिद्ध गुरुमूर्ती।।धृ।।

शेवटी :

अनन्यश्चिंतयेनर।। हे वचन करावे खरा।।
हे भगवद्गीतेच वरदवर।। दिधला गुरुदास तु।।१७।।छ।।

५२० क्र. ११ **बाड**

आ. १५ × १२ सें. पा. ३० × २. अक्षर साधारण. कागद जीर्ण. प्र.पा.ओ. २०

या बाडात सिद्धराज, गुरुदास यांची विपुल सांप्रदायिक रचना, अभंग, आरत्या इ.

५२१ क्र. १२ **बाड** एकलिंग

आ. १७ × १२ से. पृ. ८ × २. या बाडात परंपरा कथन. एकलिंग यांची विविध रचना. नागनाथ संप्रदायातील महत्त्वाचे बाड.

५२२ क्र. १३ **दानपत्र**

आ. ३९ × १५ सें. पृ. ८ × २. मोडीमध्ये रेखीव

लेखन. वर मोठ्या अक्षरांत वडवाळ नागेश असे लिहिलेले. प्र.पा.ओ. २६. चार ओळींनंतर त्यावर दोन शिक्के. स्पष्ट अक्षरात एक गोल आकार व दुसरे लंबगोलाकार. शिवछत्रपती शिवाजी महाराजांनी दान दिल्याचा उल्लेख.

राज्याभिषेक शके २९ चित्रभानुनाम संवत्सर पौष शु॥ ११ भृगुवार क्षत्रीय कुलवंतस श्रीराजा शिवछत्रपती यांनी... मौजे नागूर ता. कलबुर्गे येथील श्रीदेवस्थानास...

५२३ क्र. १४ **बाड**

आ. १९ × १६ सें. सुटी पाने ४ × २. प्र.पा.ओ. १३. यात संप्रदायाची परंपरेची आरती, रचना व इतर स्फुट शिवराम स्वामींची पदे.

५२४ क्र. १५ **संकटहरिणी** अज्ञानसिद्ध

आ. १६ × १० सें. पृ. ८० × २. प्र.पा.ओ. ७. संपूर्ण ग्रंथ भिजून पाने चिकटलेली. अक्षर मोठे– सुटसुटीत. वाचणे कठीण. कागद जीर्ण झालेला ग्रंथ.

५२५ क्र. १६ **संकटहरिणी** अज्ञानसिद्ध

आ. १७ × १२ सें. पृ. १० × २. त्रु. अ. ७. ओ. १३८.

आरंभी :

श्रीनागनाथ करठेवि माथा॥
संसार व्यथा निरशी समर्था॥

शेवटी :

अज्ञानसिद्ध स्वामीसान॥
श्रोतया विनवी सावधान॥
साद सद्गुरू पठणे काना॥
शिवस्वामी नाममाला धरून॥
कंठी माळा अखंड रुळे॥२५॥
शके तेराशे तेरा मार्गशीर्ष शुद्ध नवमी
गुरुवार॥ प्रकटला नागेश फणीवर
भक्त शिरी डुल्लत॥
मोहोळच्या प्रतीवरून केलेली प्रत.

५२६ क्र. १७ **संकटहरिणी**

आ. १७ × १२ सें. पृ. १२ × २. अक्षर बारीक. मूळ संकटहरिणी.

या अज्ञानसिद्ध ग्रंथाचे स्पष्टीकरण गद्य स्वरूपातून. अक्षरबारीक. प्रतलेखक व कालनिर्देश नाही.

५२७ क्र. १८ **बाड** चंद्रभट जोशी

आ. १७ × १२ सें. पृ. ८ × २. अक्षर बारीक. गुरुमहिमा, रुद्रयामलाचा भाग विवरणासह. श्रीसूक्त इ. चंद्रभट जोशी बाडाचा लेखक.

५२८ क्र. १९ **नागेशमाहात्म्य**

आ. २० × १४ सें. अक्षर साधारण. गुरू नागेश यांच्याबद्दलचे स्तुतिपर. संप्रदायाच्या दृष्टीने महत्त्वाची रचना. प्रतलेखक अज्ञात. काल निर्देश नाही.

५२९ क्र. २० **बाड**

आ. १४ × २० सें. पृ. १२० × २. प्र.पा.ओ. १६. अक्षर नेटके. शाई गडद काळी. कागद जाड.

यात अमृत, आनंदतनय, शिवदिनाची गुजराथी रचना, कबीर उद्धवचिद्घन, तुकाराम, नामदेव, निजानंद, रामदास. रचना, सुभाषित, श्लोक, समस्या इ. पूरक लेखन समाविष्ट आहे. ललित, दंडीगान. संस्कृत उतारे. गुलबर्गाजवळील सुलतानपूर येथील संग्रहाचे बाड.

५३० **शृंगारकवी बिल्हण**

वरील बाडात ही दुर्मिळ रचना. कल्याण चालुक्य विक्रमादित्यकालीन काश्मीरचा कवी बिल्हण कल्याणी येथे होता. त्याच्याबद्दल राजदरबारी झालेल्या चर्चेचा भाग आधारास घेऊन केलेली ही रचना आहे.

आरंभी :

श्रीमहालक्ष्मी प्रसन्न। श्री वीरसेन नृप गुजर देशवासी॥ वास्तव्य पुरनळपट्टन नामत्यासि॥ पृथ्वी समुद्र वळयांकित किर्तीदाता॥ विद्या विशारद महा श्रुतिशास्त्र वक्ता॥१॥

शेवटी :

आज्ञापिंते कनक चंपकदामगौरी॥

उत्फुल्ल पद्मनयनान्तनु रोम हारी॥
जागृत्य होय शयनी मद विव्हळांगी॥
ती कारणें स्मरतसें सुरत प्रसंगी॥६१॥

लेखक व प्रतीचा काळ दिला नाही. संस्कृत महाकाव्य विक्रमांकदेवचरित रचनाकार बिल्हणबद्दलची ही दुर्मिळ रचना आहे. कामपीडित स्थिती आणि मनोविलास दर्शन घडविले आहे.

५३१ **पवनविजय** मल्लिकार्जुन

वरील बाडातच ही रचना. पृ. ११ × २. ओ. २१४. सं.

आरंभ : श्रीव्यंकटेशाय नमः॥ श्रीगणेश नमीला गौरी कुमरु॥ जो अज्ञानाचा अंकुरु॥ विज्ञाने विघ्न हरु॥ सदोदीत॥१॥

शेवटी : स्वरतोचि ईश्वर॥ येथे करी जो निर्धार॥ तो तरे योगेश्वरु॥ सिवोपदेशी॥१४॥ एकूण २१४॥ इतिश्री पवन विजययो ग्रंथ संपूर्णमस्तु॥ शुभंभवतु॥ वोव्या संख्या॥२१४॥छ॥

स्वर घेणे हा : पुरक॥ सोडणे हा : रेचक॥ कोंडणे हा : कुंभक॥ त्राहाटक हा : चढवणे॥

हरिहर दासु मल्लिकार्जुन हा लेखक असा उल्लेख शेवटी एक ठिकाणी आलेला आहे.

कवी म्हणतो : हा पवन विजयोग्रंथ॥ ईश्वर उमेसीकथित॥

५३२ **मूळस्तंभ**

वरील मोठ्या बाडातच ही रचना. अ. ७. पृ. २६ × २. प्र.पा.ओ. १५. अक्षर मोठे. कागद जाड. ओ. ३९७. सं.

आरंभ : श्रीगणेशाय नमः॥ अता नमीन देव ईस्वरुं॥ जो गिरीजा पती मनोहरी॥ वंदिला शंकरू॥ आदि पुरुष॥१॥

शेवटी : इतिश्री मूळस्तंभ ईश्वर पार्वती संवादे दत्तात्रेय आवधुत वानुवादा दोन्नाम सप्तमोध्याय॥छ॥ वोव्या संख्या ३९७ संपुर्णमस्तु.

प्रत लेखक व काल दिला नाही.

बाडाच्या शेवटी दामाजीपंताचे 'अनुसंदान' रचनेचे एक पान. पुढील पाने गहाळ.

५३३ ग्रं.क्र. २१ **हस्तामलक** एकनाथ

आ. २२ × १२ सें. पृ. ६६ × २. प्र.पा.ओ. १०. ओ. ६७३. कागद जाड. अक्षर मोठे. काळी - गडद शाई. दोन्ही बाजूस लाल रेघा.

शेवटी : मन्मथ आश्विन दक्षिणायन शरत शुक्ले रवी पंचमी हस्तामलक आचार्य भाषित टिका नाथ मुखे आगमी॥ महाग्रामी गुरू नागनाथ चरणा सन्निद्ध तो संपला॥ येणे लेखक ब्रह्मीभूत ब्रह्मानंदे स्वये लिहिला॥१॥ श्रमे करुनि लिहिला॥ जरी ग्रंथ बापा अवलोकुनी अनुभवी स्वये आपआपा॥ तो हाचि होय सुटका तरि या जिवासी सहजी सहज मग संगमचित्सुखासी॥२॥

५३४ ग्रं.क्र. २२ **वैराग्यतरंग** रघुनाथ

आ. २१ × ९ सें. पृ. ८ × २. प्र.पा.ओ. १२. अक्षर बारीक-नेटके. वडवाळ नागनाथासंबंधीची रचना.

५३५ ग्रं.क्र. २३ **जीवनमुक्ती**

आ. २३ × १३ सें. पृ. ५२ × २. प्र.पा.ओ. ९. प्र. २६. सं.

आरंभी : ॥ श्रीगुरू राम॥

शेवटी : इति निराक्षिमानंदशा प्रकर्ण समाप्त॥ श्री गुरु वडवाळ सिद्ध नागनाथ सर्वेष्ट देवतार्पणमस्तु॥ शके १७५९ अब्दे हेमलंबीच कार्तिक शुक्ल पक्षये येकादशी सौम्य वारेच महाग्रामे समाधये तु॥छ॥ प्रकरण २६॥ पत्रसंख्या ५२॥छ॥छ॥

मूळ रचना कुणाची कळत नाही. प्रतलेखक अज्ञात.

५३६ ग्रं.क्र. २४ **कपिलगीता**

आ. २८ × १५ सें. पृ. ३२ × २. प्र.पा.ओ. १२. अ. ५. टीकाभाष्य. सं.

आरंभी : श्रीगुरु राम प्रसन्न॥ ॐ आधी नमो श्रीगणेश॥ जो भक्ताचा पूर्वी आशा॥ करी मतीचिया प्रकाशा सुमहेशाचा॥

शेवटी : इति श्री कपिलगीताया योगशास्त्रे कपिलमुनी विरचिते पंचमोध्याये॥५॥

मूळ भाष्य कुणाचे कळत नाही. प्रतलेखक व लेखनकाल अज्ञात.

५३७ ग्रं.क्र. २५ **सिद्धांतसार**

आ. २५ × १३ सें. पृ. ६ × २. प्र.पा.ओ. १२. त्रु. उमा महेश्वर संवादे कोशप्रतिकोश प्रकरण संपूर्णमस्तु॥ श्रीरस्तु॥

टीका कुणाची अर्थबोध होत नाही. प्रतलेखक नाव नाही. रचनेचा काल दिला नाही.

५३८ ग्रं.क्र. २६ **बाड**

आ. १५ × १२ सें. पा. ६ × २. विविध स्फुट रचना. यात सिद्धभटकृत आरत्या. अल्लंखानची पदे, इ. रचना. अक्षर साधारण. कागद पातळ.

५३९ ग्रं.क्र. २७ **संवत्सरफल** सहदेव

आ. १२ × १७ सें. पृ. २२ × २. प्र.पा.ओ. १२. अक्षर मोठे सुटसुटीत. बाडात प्रथमची काही पाने मोडीतून हिशेबाची. बाडाच्या दुसऱ्या भागाकडून लेखन आरंभ.

आरंभी :

सहदेव भाडळी जोतीश सांगे।।
साठीसंवत्सराची फळे।।

शेवटी :

धर्मराज बैसला।। साठी।। संवत्सराचे फले।।
सहदेव सांगतो संख्या।। समाप्त.
नंतर संवत्सर इ. नावे. पुढील पाने, २२ नंतर कोरी.

५४० ग्रं.क्र. २८ **बाड**

आ. १७ × १२ सें. पृ. ५० × २. अक्षर बारीक. यात विविध रचनांचे संकलन. अज्ञानसिद्धकृत नागनाथ चरित्र, ११ पोवाडे, इतर स्फुट काव्य. अज्ञानसिद्ध यांची परंपरा-सांप्रदायिक महत्त्वाची रचना.

५४१ ग्रं.क्र. २९ **अज्ञानसिद्ध सांख्य**

आ. १८ × १५. सें. ओ. १९ × २. प्रथम व शेवटची ओवी हिंदीतून अन्य सर्व मराठी रचना.

आरंभी :

।। साक्या।। आद घर की सुनो बात।।
हे गुरु बाबा बमन जात।।१।।

शेवटी :

प्रभूनागेश मिला ये।।
घणघण पद पावेरे।।१९।। संपूर्ण।।

५४२ ग्रं.क्र. ३० **तत्त्वबोध** अज्ञानसिद्ध

आ. १८ × १५ सें. प्र.पा.ओ. ११. अक्षर मोठे. पृ. २७ × २. ओ. २०१. कागद जाड. वेदांतपर रचना. सं.

आरंभी : श्रीगणेशाये नमः।। श्री सरस्वत्येय नमः।। जय जय लंबोदरा।। गिरजा शंभुप्रिया कुमरा।। नमनज्ञान भास्करा एकदंता।।१।। नमोजी गजवदना।। सर्व सिद्धी वरदायना।। करावया ग्रंथरचना।। कृपा की जे।।२।।

शेवटी : इति तत्त्वबोध नागेश वरदे ग्रंथसिद्ध।। अज्ञान म्हणे आनंदे।। संती आवडी सेवावा।। २०१।। इति श्री तत्त्वबोध महावाक्य ग्रंथ संपूर्णमस्तु।। शुभं भवंतु।।छ।।

लेखनकाल दिलेला नाही.

५४३ ग्रं.क्र. ३१ **तत्त्वबोध**

आ. १८ × १५ सें. पृ. १० × २. वरील ग्रंथाचाच विवरणात्मक गद्य स्वरूपाची रचना. त्रु. लेखनकाल व लेखक अज्ञात.

५४४ ग्रं.क्र ३२ **पृच्छापत्र**

आ. १७ × १५ सें. पृ. ६०. ओ. १९८. अक्षर मोठे. सांप्रदायिक स्तवन स्वरूपाची रचना.

शेवटी :

जी पृच्छापत्र पाठविले राजचंद्रे।।
तरी तुवा विज्ञानस्थिती योगेंद्र।।छ।।

५४५ ग्रं.क्र. ३३ **बाड**

आ. १७ × १२ सें. पृ. ४० × २. प्र.पा.ओ. ११. अक्षर साधारण. विविध सांप्रदायिक रचनांचे संकलन. मार्डी येथील प्रतीवरून लेखन केलेले. यात वारया जंगम, अल्लं प्रभू, सिद्धलिंग, निरंजनशिष्य, सखुसेवक, उद्धव चिद्घन यांची मराठी रचना. अभंग, आरत्या, पोवाडे, पद. इ. वाङ्मय प्रकार.

५४६ ग्रं.क्र. ३४ **शिवरात्री माहात्म्य** अज्ञानसिद्ध

आ. १५ × १२ सें. पृ. ५९ × २. प्र.पा.ओ. १५. अक्षर बारीक. अ. ५. ओ. ५००

शेवटी : स्कंद पुराणे सुतऋषिसंवादे।। श्रीमद्ज्ञानसिद्ध विरचिते शिवरात्री महात्म्य कथननाम पंचमोध्याय।।छ।।

५४७ ग्रं.क्र. ३५ **नागनाथसहस्त्रनामावली**

आ. ३१ × १२ प्र.पा.ओ. २५. पृ. १९ × २. अक्षर सुटसुटीत.

नागनाथाची १००८ नावांची रचना. शेवटी २ आरत्या भास्कर किंकरकृत. १ आरती संपूर्ण, तर दुसरी त्रुटित.

५४८ ग्रं.क्र. ३६ **काळज्ञान** अज्ञान

आ. ३२ × २२ सें. अक्षर बारीक. प्र.पा.ओ. ३३. पृ. १२ × २३. अ. ओ. ३७६. सं.

आरंभी : ।। अथ काळज्ञान प्रारंभ।। ॐ नमोजी शिवशिव।। परमसिद्ध नागेश देखा।। नमस्कार अंगिकारावा।। मज बाळकाचा।।१।।

प्रतीचा काल नाही. प्रतलेखकाचे नाव नाही.

५४९ ग्रं.क्र. ३७ **बाड**

आ. १७ × १५ सें. पृ. ३५ × २. प्र.पा.ओ. १२. अक्षर बारीक.

विविध स्फुट रचनांचे बाड. रघुनाथ, त्रिंबक, सिद्धलिंग, नरहरी, रामभव, बहिरा पिसा, बस्वलिंग, मारुतीबुवा, रामलिंग शिष्य सुजात सिद्ध चैतन्य दत्त, सिद्धनाग, स्वामी शिवप्रभू कवींची मराठी रचना व बसवेश्वरांची एक हिंदी रचना या बाडात आहे. सांप्रदायिक महत्त्वाचे बाड.

५५० ग्रं.क्र. ३८ **चक्री भजन** रघुनाथ

आ. १६ × १२ सें. पृ. २४ × २. अक्षर बारीक. नागनाथ परंपरेतील १५ भजन रचना, आरत्या, पदे, सर्व रचना रघुनाथ भट्ट यांची असा निर्देश आढळतो.

५५१ ग्रं.क्र. ३९ **विवेकसिंधू** मुकुंदराज

आ. २७ × १५१।। सें. प्र.पा.ओ. १०. त्रु. पृ. ५० × २. अ. ७. वरील पान व प्रत्येक अध्यायास वेलबुट्टीची सजावट. अक्षर मोठे. लाल रेघा पानास दोन्ही बाजूंस आहेत. शेवटची पाने नाहीत. लेखनकाल वा प्रतलेखक अज्ञात.

५५२ ग्रं.क्र. ४० **भामाविलास** वामन

आ. १४ × २० सें. प्र.पा.ओ. १६. पृ. ५ × २. अक्षर मोठे. कागद जाड. ओ. ४७.

आरंभ : श्रीकुळदेवताये नमः।। लता सत्याअंकी खग गमन भक्ता मरुतरु।। तरु हाती तो श्रीपती भवनदि पार उतरू।। धरी लक्षी पक्षी कारतळ युगी पादंयुगळ।। गळारत्न ध्यावा द्रुम गरूड संयुक्त सगळा।।१।।

शेवटी : भाते प्रभा केवळ चित्स्वरूप।। मशक्ति युक्ति वरि जेवि रुप।। भामा विलास प्रभुनाम याचे।। ठेवी आसे कृष्ण अघ नाशयाचे।।४७।। इति श्री भामाविलास संपुर्णमस्तु।।छ।।छ।।

बाड क्र. २० मध्ये ही रचना. शीर्षकाच्या जवळ वामनी असा निर्देश. लेखनकाल व प्रतलेखक नाव दिले नाही.

५५३ ग्रं.क्र. ४१ **चरित्रबहिरापिसा** उद्धव

आ. १४ × २० सें. पृ. ४ × २ प्र.पा.ओ. १६ अक्षर मोठे. बाड क्र. २० मध्येच ही रचना. ओ. २०.

आरंभी : बहिरंभट प्रतिष्ठाननिवीदे वीनये पुरता।। मानन्यें लोकी कि आसता त्याच्या कैस जालेचरिता।।१।। बरवी संतचरित्र हो।। पावण परम पवित्र हो।। गंगास्नान निसी दिनी सारुनी माध्यानीये सारी।। घरासि येऊन भोजने करी आपुल्या सह परिवारी।।२।।

शेवटी : ऐसा महिमा आगाध त्याचा।। म्हणऊनि बोले वाचा।। समर्थ स्वामी तारीयेल मज जये जये नागनाथा।।१९।। ऐस आपार संतवर्णीता सर्वहि संशये जातो।। आठवलते ऐकां भाव उत्धव चीध्दन गातो।।२०।।छा।।छ।।छ।।

५५४ ग्रं.क्र. ४२ **भर्तृहरीनीतिशतक**

बाड क्रमांक २० मध्येच ही रचना आहे. मूळ संस्कृत काव्य व त्यावर मराठी टीका अशी रचना.

आरंभी : चंद्रला दिवसां प्रकाश नसणें ये कामिनीलाजरा।। प्रपावीण जळे निरक्षर मुखीं जो नेटका गोजरा।। दात्याला धन लोभ नित्य वसतो दारिद्र्य विद्वजनी।। दुष्टांचा पगडा महिपतिग्रही हे सात शैल्यें मनी।।१।।

शेवटी : अंकित जे विधिचे सुर सर्वही त्यासि उगा प्राणिपात करावा।। प्राक्तन कर्म तसे फळ दे तरी तो विधि थोर किमर्थ म्हणावा।। कर्मबळे फळतिल।। फळ तरी कर्मीचि भाव कसा न धरावा।। दुर्बळते सुर दुर्बळतो विधि काय तयास्तव आर्थ घडावा।।१६।।

ही नीतीशतकाची भृर्तहरीची रचना मूळ १६ संस्कृत श्लोकांची समश्लोकीच आहे. यात रचनाकाराचा वा कालनिर्देश नाही.

५५५ ग्रं.क्र. ४३ **अनामिक** वामन

बाड क्रमांक २० मध्ये समश्लोकी टीका आहे. एकूण ९३ श्लोक.

आरंभी : रंगीहाटक वर्ण नाटक उभी हंसासनीशारदा।। वीणा पुस्तक पद्महास्तक सदा वाणी वदे सर्वदा।। विद्या सागर रम्य नागररूपे लवण्ये यौग्य स्वरि।। दासा मंडेण पाश खंडण करि वाग्यस्वरि सुंदरी।।२।।

शेवटी :

जो तांबडा सकळ रंग विशाळ डोले।।
दांडि आगारू गुडघे पद का न काळे।।
जाना कुमाईत तुरंगम तो बळाचा।।
युधात गाठ पडिल्या गुणध्या तयाचा।।८६।।

वरील हे भाष्य वामन पंडितांचे असावे. कारण यातील काही वामनाचे श्लोक प्रसिद्ध असे आहेत. एकूण ९३ श्लोक येथे संस्कृतमधील असून, पुढील एक पान कोरे आहे. ही रचना १०० श्लोकांची असावी. या रचनेस शीर्षक दिलेले नाही. प्रतलेखक वा कालनिर्देश नाही.

ॲड. प्रभाकरराव जहागीरदार गुलबर्गा, संग्रह

५५६ क्र. १ **दाजीमहाराज चरित्र** खंडेराव गंगाखेडकर

आ. २७ × १० सें. पृ. २५ × २. अ. १४. प्र.पा.ओ. १०. अक्षर ठसठशीत. जाड कागद. ओ. १६७४. सं: आरंभी मनोगतात कवी म्हणतो :

श्रोता पुसती कवणग्रंथ।।
हा कवणे रचिला कार्य अर्थ।।
आणि काय कर्म आहे यात।
ऐका सुचित होऊनिया।।

मराठवाड्यातील टाकळीच्या दाजीमहाराजांचे हे चरित्र आहे. आरंभी अन्य २७ संतांचा परिचय व नमन आहे. यात येवलेकर, देवमामलेदार, जनार्दनस्वामी, कबीर, कमाल, अक्कलकोटस्वामी, बाळकृष्ण बाबा, गुंडामहाराज, वीरप्पा अण्णा, मल्लप्पा महाराज, पुण्याचे काळोबा (जंगली महाराज), शरण बसवेश्वर संत आहेत. दाजी महाराजांचे चरित्र सविस्तर ग्रंथित केले आहे. कवी खंडेराव गंगाखेडकर गुलबर्गा येथे स्थायिक झाले. त्यांच्यावर कृपा करणारे बालस्वामी नृसिंह सरस्वती १६ व्या वर्षी जिवंत समाधी घेते झाले. कवीवर त्यांच्यामुळे कुरवपुरी श्रीपाद श्रीवल्लभांनी कृपा केली. कवी म्हणतो एकूण रचना ९००० इतकी आहे. गुरूच्या समाराधनेतील भोजनाचे वर्णन

जनि म्हण आहे या परी।।
कर्नाटकी सार उत्तम परी।।
महाराष्ट्राची कढी बरी।।
आमटी खरी कोकणची।।

ग्रंथाचे लेखन क्षयसंवत्सरी सीतपौर्णिमा ज्येष्ठ मास गुरुवार शके १८३१ वंजारा संगमी दशहार पर्वावर संगमेश्वर मंदिरात केले. उपलब्ध प्रतीचा लेखक एकनाथ बळवंत परळीकर इंदूर निजामाबादचा राहणारा. त्याने रविवार १८३१ तारीख १० दय सन १३१९ फसली हा काल निजाम राजवटीमुळे दिला. ही मूळ रचनेनंतरची ताजी प्रत आहे. या ग्रंथाच्या आरंभी मूळ लेखकाचा फोटो चिकटवलेला आहे. कवी बहुश्रुत होता याचा प्रत्यय येतो. कवीचे नातलग जहागीरदार यंच्या घरातील पूजेतच ही पोथी आहे. हा यांच्या भगिनीचा वंश आहे.

५५७ क्र. २ **वीरनाथमहाराज चरित्र** खंडेराव

आ. २७ × १२।। सें. पृ. १८० × २. अ. १२. प्र.पा.ओ. ११. ओ. १५२४. कागद जाड. अक्षर नेटके. सुटसुटीत.

हा ग्रंथ कवीने मूळ जीवन कवीच्या एका चरित्रात्मक ग्रंथावरून संक्षेप करून रचलेला आहे. प्रथम गुंडामहाराज देगलूरकर यांची माहिती आहे. त्यानंतर वीरनाथ व त्यांचे पुत्र

मल्लप्पामहाराज औसेकर यांचे समग्र चरित्र टिपलेले आहे. रोजगारामुळे मूळ गंगाखेड सोडून स्थलांतर, हैद्राबाद व गुलबर्गा वास्तव्य. दत्तमंदिराशेजारील गुरूमठाचे वर्णन यात आहे. जीवन कवीच्या ग्रंथाचा हा पाव भाग आहे.

शेवटी :

स्वस्ती श्री वीरलीलामृतसार।।
बोले दीन वाणी चंद्रकुमर।।
सदा श्रवण करोत भाविक नर।।
द्वादशोध्याय गोड हा।।१३१।।

वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने चरित्र नायकांच्या दोन पिढ्यांचा इतिहास महत्त्वाचा आहे. या ग्रंथाचे लेखन शके १८३० च्या सुमारास कवीने केलेले आहे.

५५८ क्र. ३ **गुरुलीलामृतसार** खंडेराव

आ. २७ × १२ सें. पृ. ७० × २. कागद जाड. अक्षर नेटके, मोठे. अ. १२.

पूर्वी संपूर्ण पोथी संशोधनात उपलब्ध होती. त्या स्थानी आज सूचीच्या कामी ग्रंथ पाहावयास उपलब्ध नव्हता.

५५९ क्र. ४ **नामविजय** खंडेराव

आ.२७ × १२ सें. पृ. ८० × २. अक्षर जाड. मोठे. लेखन ठसठशीत. ओ. १५००.

पूर्वी संशोधनात उपलब्ध झालेली पोथी सूचीच्या टिपणाच्या वेळी पाहावयास मिळाली नाही.

५६० क्र. ५ **गोकर्णमाहात्म्य** खंडेराव

आ. २७ × १२ सें. पृ. १९ × २. अक्षर मोठे - सुटसुटीत. ओ २००. स्थिती चांगली. पूर्वी संशोधनात मिळालेली पोथी सूचीच्या वेळेस उपलब्ध झाली नाही.

५६१ क्र. ६ **रामेश्वरयात्रा** खंडेराव

आ. २७ १२ सें. पृ. २० × २. अक्षर मोठे.

पूर्वी संशोधनात लाभलेली पोथी सूचीच्या वेळेस मिळाली नाही.

५६२ प्र.क्र. ७ **पंढरीमाहात्म्य** खंडेराव

आ. २७ × १२ सें. पृ. ३५ × २. अक्षर मोठे. अ. ५

पूर्वी संशोधनात टिपलेली पोथी सूचीच्या वेळेस उपलब्ध झाली नाही.

५६३ क्र. ८ **भागवत माहात्म्य** खंडेराव

आ. २७ × १२ सें. पृ. ४० × २. अक्षर रेखीव - जाड. ओ. १८८.

आरंभ : श्रीमन्महागणपतीपतयेनमः।। निर्विघ्नमस्तु।। नमीला श्रीगणनाथ गजानन मंगलदायक हा।।धृ.।। पाशांकुशधर मोदक ज्यावरी।। मस्तकी मुकुट सुढाळ।।१।।

शेवटी : असो बहु बोलते काय काज।। स्फुरले ते वर्णिले सहज।। ज्याचे मनी जैसी समज।। तेवि तया भासत से।।८७।। स्वस्ती श्री भागवत माहात्म्य सारा।। पद्म पुराणीचा विस्तारा।। विनवि पेमदेव जोडुनी करा।। करा श्रवण निरंतर हो।।१८८।। श्रीकृष्णार्पणमस्तु।। शुभं भवतुशेवटी म्हाळसाकांत आणि पांडुरंगाची आरती दिली आहे. लेखनकाल दिला नाही. रचनेत 'पेमु'जन्मनाव, व आरतीत रामचंद्रसुत हे नाव दिले आहे.

५६४ क्र. ९ **अज्ञानभक्तोद्धार** खंडेराव

आ. २७ × १२ सें. अ. १२. ओ. १९१६ प्र.पा.ओ. ११. अक्षर मोठे सुवाच्य. गडद काळी शाई. कागद जाड.

आरंभी : श्रीगणेशाये नमः।। श्रीसरस्वतैय नमः।। श्रीगुरुभ्यो नमः श्रीमार्तंड भैरवाय नमः।। श्रोते पुसती कवन ग्रंथ।। काय बोलीले येथ।। श्रवण केलियाने प्राप्त।। काय होतसे।।१।। ग्रंथनाम अज्ञानभक्तोद्धार।। भक्तकथा मनोहर।। येथे बोलिला सविस्तर।। भक्तिमार्ग।। भक्तिचे नि योगे देव।। निश्चये पावती मानव।। ऐसा आहे अभिप्राय।। इहग्रंथी।।३।।

शेवटी : आता जोडोनिया उभयहस्ता।। प्रार्थितो सकळ साधुसंता।। कृपा करोनी मजवरी आता।। अभय कर ठेविजे माथा निजकृपे।।१६६।। स्वस्ती श्री अज्ञान भक्तोद्धार ग्रंथ।। ऐकताचि तुष्टे श्री भगवंत।। प्रेमळ ऐकोत भाविक भक्त।। द्वादशोध्याय गोड हा।। १६७।। श्रीकृष्णार्पणमस्तु।। श्रीमाल्हारि म्हाळसाकांत चरणार्विदी अर्पणमस्तु।। श्रीसद्गुरुनाथ स्वामी नृसिंह सरस्वती।। ईहचरण

कमलार्पणमस्तु।। शुभं भवतु।।छ।।छ।।छ।। कवी ८० वर्षांपूर्वीचा आहे. या रचनेत लेखनकाल दिलेला नाही. पोथी सुस्थितीत आहे. लेखन काळजीपूर्वक आणि वेलबुटीने सुशोभित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. कवीच्या मूळ अक्षरातील आहे.

५६५ क्र. १० **बाड**

आ. १२ × १५ सें. पृ. ६० × २. अक्षर मोठे. कागद जाड. यात विविध संतांच्या रचनेबरोबर खंडेराव यांची पण स्फुट रचना ही कवीची महत्त्वाची स्फुट रचना आहे.

अहंकार मोठा दुर्धर या संसारी।
तू पडू नको मानवा याचे भरी।।धृ.।।
हा मोठा दुष्ट भोगवी अति कष्ट।।
अंतःकरणी म्हणवितो हाच श्रेष्ठ।।
अहंकारावर ही आठ कडव्यांची रचना आहे.

गुरुकृपेचा प्रसंग एका वर्णनात :

आता मी काय वाणुगुरुराया।।
थोर केली दया दिनावरी।।धृ.।।
द्वादशी पर्वकाळ थोर।।
होता संवत्सर शुक्ल नाम।।
अपूर्व जे क्षेत्र होते कृष्णातीर।।
उपदेशील षडाक्षरी मंत्र मज।।७।।
मस्तकी ठेविला अभय तो कर।।
रामचंद्र सुत म्हणे केला उद्धार सद्गुरू राय।।८।।
कवी आपला उल्लेख खंडेराव, खंडेराय, रामचंद्रकुमार रामचंद्रसुत, जन्म नाव पेमु असेही करतो
एका हिंदी काव्यात कवी म्हणतो :
जिस झाडके फल गिर पडे।।
फिर न लगे डार।।३।।
मनुष्य जन्म की येही मौज है।।
फिर ना आये बार।।४।।

या बाडातून कवीची अशी बरीच स्फुट रचना दिलेली आहे. लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

शिवराम (समर्थ शिष्य) मठ, संग्रह

५६६ क्र. १ **रामायण** कृष्णदास मुदगल

आ. ३० × २२ सें. अ. ७९. कागद जाड - पांढरट रंग कसरीने कागद खराब झालेला. काळी गडद शाई. अक्षर नेटके. युद्धकांड रामायणातील विविध प्रसंगांचा भाग. या ग्रंथाची प्रत रामजी गोसावी याने केलेली आहे. ग्रंथाचा लेखनकाल दिलेला आहे. प्रमोदनाम संवत्सर शके १५७२ तिथी कार्तिक व।। ७. शुक्रवार.

५६७ क्र.२ **भागवत** वामन

आ..२२।। × १७।। सें. पृष्ठ २०० × २. त्रु. प्रतलेखक व लेखनकाल दिला नाही. अक्षर चांगले. रेखीव - सुटसुटीत. कागद जाड पण काळपट. अवस्था चांगली.

५६८ क्र. ३ **महाभारत** मुक्तेश्वर

आ. २५ × १८ सें. प्र.पा.ओ.१२. त्रु. मुक्तेश्वराच्या महाभारताचा भाग. यात शेवटचा भाग नाही. अक्षर मोठे कागद जाड-लालसर. जीर्ण झालेली प्रत. यात आदिपर्व संपूर्ण आहे.

५६९ क्र. ४ **गीतापदबोधिनी**

आ. १७ × १५ सें. पृ. ४७२ × २. अक्षर मोठे. कागद जाड-जीर्ण.

गीतेचा श्लोकार्थ सुलभतेने होण्याकरिता पर्याय शब्द दिलेले आहेत. ही रचना कुणाची आहे हे कळत नाही. मूळ रचना शके १६१६ ला क्षेत्र नाशिक क्षेत्री झाली असून, प्रतीचा काल शके १७०१ असा दिला आहे. लेखन चांगले सुस्पष्ट. लेखकाचे नाव दिले नाही. उत्तरायण युवसंवत्सर वैशा शु. १२ चा ग्रंथ. त्यांची प्रत १७०१ शुक्ल संवत्सरी.

५७० क्र. ५ **योगवाशिष्ठ** हरिदास

आ. २७ × १२ सें. पृ. १०५० × २. प्र. पा. ओ. १२. एकूण ओ. १६५००. कागद जाड पण जीर्ण. प्रत्येक अध्याय दोरीने स्वतंत्र बांधलेला.

आरंभ : तुझा अनुग्रहो गणेशु।। देतो आपुला सौरसु।। काव्य कलेचा विलासु।। करि उपन्या सुबोलधि।।१।। वरदहस्ते अंतःस्फुर्ति।। तोचि सिद्धी सरस्वती। वागविलासे विस्तारे ग्रंथि।। जीवसिवयासि उगवोनि।।३।।

शेवटी : श्रीरघुराज करुणाघन।। स्वये प्रकटोन आपणा।। केले वासिष्ठ निरोपण।। न्यून पूर्ण तोचि जाणे।।८४।। ज्या प्रभुचे सरोविण।। तृणहिं करू नसके चळण।। तेणे जिवाजेसि प्रेरुन।। केले निरोपण येथे।।८५।। योगवासिष्ठ तिस सहस्त्र।। तयात निवडिला सा सहस्त्र।। त्यावरि संस्कृत भाष्येकार।। योगेश्वर स्वात्मसुख।।८६।। पाहोन संस्कृत विलास।। भावार्थ दीपिका योजले भाष्य।। वोविया प्रबंध अति सुरस।। रघुराज दिनेश स्वयं करी।।८७।। गोदातटी वाल्मीक नगर।। जे राम पंडित योगेश्वर।। त्याचिया संवादे टीका सुंदर।। जाला विस्तार ग्रंथासी।।८८।। शांतानंदाचे वंशी।। श्रीरघुनाथ नामांकित।। हरिदास नाम सद्गुरुदत्त।। ग्रंथ समाप्त योजला।।८९।। ईश्वर नामसंवत्सर १६१९ अश्विन व।। ७ भानुवारची प्रत भागानगरी येथे केलेली आहे. मूळ प्रत शके १६१० वै. शु।। ७ भृगुवाराची आहे. मूळ प्रतीनंतर केवळ ९ वर्षांनी ही प्रत केली आहे.

५७१ क्र. ६ **गुरुचरित्र** सहस्वती गंगाधर

आ. २७ × १८ सें. अक्षर साधारण. कागद जाड. अ. ५१. सं.

प्रत लेखक मैराळ केशव असून, ही प्रत हि. स. १२५०ची आहे. (तो काळ इ.स. १८२९ चा येतो.)

तुगाव परगणे गुंजोटी शके १७– प्लवंगनामसंवत्सर.

५७२ क्र. ७ **रामायण**

आ. ३० × १८ सें. लेखन बारीक अक्षरांत. प्र.पा.ओ. १३. लेखन साधारण. कागद जाड. या प्रतीत अनेक प्रसंगांची चित्रे आहेत. मूळ लेखन कोणत्या कवीचे आहे याचा बोध होत नाही. प्रतलेखक आणि लेखनकाल शके १६७० विभवनामसंवत्सर आषाढ मंदवासर ति.१३।।

५७३ क्र. ८ **एकादशस्कंद** एकनाथ

आ. २५ × १८ सें. पृष्ठ १३० × २. अक्षर साधारण. त्रु. शेवटचा भाग गहाळ. कागद जीर्ण. प्रतलेखक व काल अज्ञात.

५७४ क्र.९ **शिवलीलामृत**

आ. ३० × २१ सें. पृ. ७२ × २. प्र.पा.ओ.११. अक्षर साधारण. प्रतलेखक अज्ञात. लेखनकाल शके १७१९ चा दिला आहे. नारायण सत्य केशव सुत गंजोटीहून पश्चिमेस तुगाव येक योजन सन १२०७ माहे रविलावल।। पिंगल नाम संवत्सर अश्विन शु।। १ गुरुवार।।

५७५ क्र. ११ **अध्यात्मरामायण**

आ. ३० × २५ सें. प्र.पा.ओ. १३. त्रु. अक्षर साधारण. अधूनमधून पाने गहाळ. शेवटचा भाग उपलब्ध नाही. रचना कुणाची आहे हे कळत नाही.

५७६ क्र. १० **बाड**

आ. २५ × १६ सें. प्र.पा.ओ. ९. अक्षर निषकाळजीपणाने काढलेले. कागद जाड. बांधीव वही. या बाडात 'परमार्थसार' नावाची एक रचना अज्ञात कवीची; तसेच रामभक्तीपर पदे दत्ताची पदे इ. रचना. आत्माराम, शिवराम रचना.

५७७ क्र. १२ **बाड**

आ. १८ × १२ सें. पा. ४२ × २. अक्षर जाड. कागद पातळ - चिवट तपकिरी रंगाचा. रामदास संप्रदायी बाड. विविध आणि विपुल पदे. आत्मारामाची बरीच रचना. स्फुटकाव्य विविध प्रकारचे.

५७८ क्र. १३ **चातुर्माससमास** रामदास

आ. २४ × १२ सें. पृ. ६० × २. अक्षर रेखीव. कागद जाड चिवट. समर्थांची विविध आणि विपुल रचना. संपूर्ण बाड रामदासी संप्रदायाचे. मठातील शिष्य वर्गानेच केलेली प्रत आहे. कर्नाटकातील समर्थांचा हा महत्त्वाचा मठ आहे.

५७९ क्र. १४ **बाड**

आ. २८ × १८ सें. पृ. ३८ × २. काळी शाई. जाड कागद. सुटसुटीत लेखन. यात विविध संतांची पदे, अभंग आरत्या इ. यात तुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ, शिवराम कल्याणीकर, केशव, रंगनाथ यांची रचना संग्रहित आहे.

५८० क्र. १५ **बाड**

आ. १७ × १८ सें. अक्षर साधारण पृ. ५८ × २. कागद जाड. यात 'वैराग्य' प्रकरण अनामिक कवीचे.

५८१ क्र. १६ **बाड**

आ. १८ × २४ सें. अक्षर बारीक कागद पातळ तपकिरी रंगाचा. यात विविध मंत्र व संतांची पदे. पूजेच्या उपचाराबद्दलचे विवेचन.

५८२ क्र. १७ **ज्ञानेश्वरी** ज्ञानेश्वर

आ. ३० × १८ सें. पृ. ३०० × २.

प्र.पा.ओ. १०. अ १८. सं. अक्षर साधारण स्वरुपांचे. लेखनकाल व प्रतलेखक नाव नाही.

५८३ क्र. १८ **गीताचंद्रिका** शिवराम

आ. २४ × १५ सें. पृ. ८० × २. अक्षर मोठे. गडद काळी शाई. कागद जाड. त्रु. शिवराम स्वामी कल्याणीकर यांच्या गीताभाष्याची रचना. भगवान श्रीकृष्ण शिवरामाच्या मुखाने गीता सांगत आहे ही मनोहर कल्पना प्रभावी वाटते. प्राचीन मराठी पंडिती गद्य परंपरेची भाषा. शेवटचे अध्याय नाहीत. पोथी भिजून खराब झाली आहे. ही प्रत शके १६९७ ची आहे. एवढी नोंद आढळते.

५८४ क्र. १९ **गळाठा**

विविध आकाराच्या अनेक ग्रंथांचे भाग. एकत्र ठेवलेल्या या संकलनात विविध संतांची पदे, अभंग, आरत्या अनेक ग्रंथांची प्रकरणे आहेत. अक्षर निरनिराळे.

५८५ क्र. २० **दासबोध** रामदास

आ. ३० × २५ सें. पृ. ९० × २. अक्षर बारीक पण छान. कागद जीर्ण. त्रु. समर्थांच्या दासबोधाची रचना. शेवटचा भाग नाही. त्यामुळे रचनाकाल व प्रतलेखक ज्ञात नाही.

५८६ क्र. २१ **बाड**

आ. २८ × १५ सें. पा. ४२ × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर बारीक. कागद जीर्ण. विविध मराठी संतांची रचना. तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर यांची बरीच रचना. अक्षर निरनिराळे. संकलनात अभंग, पदे, आरत्या, पाळणा, दंडीगाण, कैकाय, अधूनमधून रागतालांचा निर्देश असलेली रचना.

५८७ क्र. २२ **बाड**

आ. २८ × १५ सें. पृ. ११२ × २ अक्षर बारीक. लेखन व्यवस्थित. कागद जीर्ण. या बाडात अनेक प्राचीन ग्रंथांचे उतारे आहेत. समर्थ संप्रदायाची विपुल रचना यात आहे. दत्ताचीपदे, रामाची पदे, शिवरामकृत रचना.

५८८ क्र. २३ **आत्मप्रतिती** माणिक कवी

आ. १८ × १५ सें. पृ. १८ × २. अक्षर मोठे. कागद भिजून खराब झाले आहेत. अधूनमधून पाने नाहीत. त्रुटित भाग.

५८९ क्र. २४ **दासबोध** रामदास

आ. १७॥ × २२॥ सें. पाने २८० × २. अक्षर मोठे. कागद जाड. प्रत चांगली. सं.

प्रतलेखक व काल शके १५४५ क्रोधनाम संवत्सर दक्षणायन अश्विन शु॥ १० सौम्यवासर. रामदासांकित श्रीकल्याण वरदनाम शिवकल्याण याची प्रत.

शेवटी : मध्यस्तक बारीक लेखन केले ते उतारवयात उपयोगी नाही. म्हणून मोठे अक्षरात लिहिले॥ हे त्रिविध बहुश्रमाचे लेखन॥ जपवणूक करावे॥ शुद्धाशुद्ध पाहावे॥

५९० क्र. २५ **नित्य उपक्रम उपचार**

आ. १७ × १५ सें. पा. ३० × २. अक्षर मोठे. कागद साधारण. स्थिती चांगली. रोजच्या उपासनेत उपयोगी पडणारी सर्व रामदासी संप्रदायाची रचना येथे पूर्ण संकलित केलेली आहे.

५९१ क्र. २६ **परमामृत** मुकुंदराज

आ. ७ × १२ सें. पा. १० × २. अक्षर साधारण. त्रु. मुकुंदराजाची रचना. प्रतलेखक व काल नाही. प्रथमची पाने नाहीत.

५९२ क्र. २७ **पंचीकरण** शिवराम

आ. १० × १५ सें. पा. २० × २. ही शिवरामस्वामींची गद्यरूप टीका मूळ आचार्यांच्या ग्रंथावर. या रचनेत शेवटी ५

आरंभ : तुझा अनुग्रहो गणेशु।। देतो आपुला सौरसु।। काव्य कलेचा विलासु।। करि उपन्या सुबोलधि।।१।। वरदहस्ते अंतःस्फुर्ति।। तोचि सिद्धी सरस्वती। वागविलासे विस्तारे ग्रंथि।। जीवसिवयासि उगवोनि।।३।।

शेवटी : श्रीरघुराज करुणाघन।। स्वये प्रकटोन आपणा।। केले वासिष्ठ निरोपण।। न्यून पूर्ण तोचि जाणे।।८४।। ज्या प्रभुचे सरोविण।। तृणहिं करू नसके चळण।। तेणे जिवाजेसि प्रेरुन।। केले निरोपण येथे।।८५।। योगवासिष्ठ तिस सहस्त्र।। तयात निवडिला सा सहस्त्र।। त्यावरि संस्कृत भाष्येकार।। योगेश्वर स्वात्मसुख।।८६।। पाहोन संस्कृत विलास।। भावार्थ दीपिका योजले भाष्य।। वोविया प्रबंध अति सुरस।। रघुराज दिनेश स्वयं करी।।८७।। गोदातटी वाल्मीक नगर।। जे राम पंडित योगेश्वर।। त्याचिया संवादे टीका सुंदर।। जाला विस्तार ग्रंथासी।।८८।। शांतानंदाचे वंशी।। श्रीरघुनाथ नामांकित।। हरिदास नाम सद्गुरुदत्त।। ग्रंथ समाप्त योजला।।८९।। ईश्वर नामसंवत्सर १६१९ अश्विन व।। ७ भानुवारची प्रत भागानगरी येथे केलेली आहे. मूळ प्रत शके १६१० वै. शु।। ७ भृगुवाराची आहे. मूळ प्रतीनंतर केवळ ९ वर्षांनी ही प्रत केली आहे.

५७१ क्र. ६ **गुरुचरित्र** सहस्वती गंगाधर

आ. २७ × १८ सें. अक्षर साधारण. कागद जाड. अ. ५१. सं.

प्रत लेखक मैराळ केशव असून, ही प्रत हि. स. १२५०ची आहे. (तो काळ इ.स. १८२९ चा येतो.)

तुगाव परगणे गुंजोटी शके १७– प्लवंगनामसंवत्सर.

५७२ क्र. ७ **रामायण**

आ. ३० × १८ सें. लेखन बारीक अक्षरांत. प्र.पा.ओ. १३. लेखन साधारण. कागद जाड. या प्रतीत अनेक प्रसंगांची चित्रे आहेत. मूळ लेखन कोणत्या कवीचे आहे याचा बोध होत नाही. प्रतलेखक आणि लेखनकाल शके १६७० विभवनामसंवत्सर आषाढ मंदवासर ति.१३।।

५७३ क्र. ८ **एकादशस्कंद** एकनाथ

आ. २५ × १८ सें. पृष्ठ १३० × २. अक्षर साधारण. त्रु. शेवटचा भाग गहाळ. कागद जीर्ण. प्रतलेखक व काल अज्ञात.

५७४ क्र.९ **शिवलीलामृत**

आ. ३० × २१ सें. पृ. ७२ × २. प्र.पा.ओ.११. अक्षर साधारण. प्रतलेखक अज्ञात. लेखनकाल शके १७१९ चा दिला आहे. नारायण सत्य केशव सुत गंजोटीहून पश्चिमेस तुगाव येक योजन सन १२०७ माहे रविलावल।। पिंगल नाम संवत्सर अश्विन शु।। १ गुरुवार।।

५७५ क्र. ११ **अध्यात्मरामायण**

आ. ३० × २५ सें. प्र.पा.ओ. १३. त्रु. अक्षर साधारण. अधूनमधून पाने गहाळ. शेवटचा भाग उपलब्ध नाही. रचना कुणाची आहे हे कळत नाही.

५७६ क्र. १० **बाड**

आ. २५ × १६ सें. प्र.पा.ओ. ९. अक्षर निषकाळजीपणाने काढलेले. कागद जाड. बांधीव वही. या बाडात 'परमार्थसार' नावाची एक रचना अज्ञात कवीची; तसेच रामभक्तीपर पदे दत्ताची पदे इ. रचना. आत्माराम, शिवराम रचना.

५७७ क्र. १२ **बाड**

आ. १८ × १२ सें. पा. ४२ × २. अक्षर जाड. कागद पातळ - चिवट तपकिरी रंगाचा. रामदास संप्रदायी बाड. विविध आणि विपुल पदे. आत्मारामाची बरीच रचना. स्फुटकाव्य विविध प्रकारचे.

५७८ क्र. १३ **चातुर्माससमास** रामदास

आ. २४ × १२ सें. पृ. ६० × २. अक्षर रेखीव. कागद जाड चिवट. समर्थांची विविध आणि विपुल रचना. संपूर्ण बाड रामदासी संप्रदायाचे. मठातील शिष्य वर्गानेच केलेली प्रत आहे. कर्नाटकातील समर्थांचा हा महत्त्वाचा मठ आहे.

५७९ क्र. १४ **बाड**

आ. २८ × १८ सें. पृ. ३८ × २. काळी शाई. जाड कागद. सुटसुटीत लेखन. यात विविध संतांची पदे, अभंग आरत्या इ. यात तुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ, शिवराम कल्याणीकर, केशव, रंगनाथ यांची रचना संग्रहित आहे.

५८० क्र. १५ **बाड**

आ. १७ × १८ सें. अक्षर साधारण पृ. ५८ × २. कागद जाड. यात 'वैराग्य' प्रकरण अनामिक कवीचे.

५८१ क्र. १६ **बाड**

आ. १८ × २४ सें. अक्षर बारीक कागद पातळ तपकिरी रंगाचा. यात विविध मंत्र व संतांची पदे. पूजेच्या उपचाराबद्दलचे विवेचन.

५८२ क्र. १७ **ज्ञानेश्वरी** ज्ञानेश्वर

आ. ३० × १८ सें. पृ. ३०० × २.

प्र.पा.ओ. १०. अ १८. सं. अक्षर साधारण स्वरुपांचे. लेखनकाल व प्रतलेखक नाव नाही.

५८३ क्र. १८ **गीताचंद्रिका** शिवराम

आ. २४ × १५ सें. पृ. ८० × २. अक्षर मोठे. गडद काळी शाई. कागद जाड. त्रु. शिवराम स्वामी कल्याणीकर यांच्या गीताभाष्याची रचना. भगवान श्रीकृष्ण शिवरामाच्या मुखाने गीता सांगत आहे ही मनोहर कल्पना प्रभावी वाटते. प्राचीन मराठी पंडिती गद्य परंपरेची भाषा. शेवटचे अध्याय नाहीत. पोथी भिजून खराब झाली आहे. ही प्रत शके १६९७ ची आहे. एवढी नोंद आढळते.

५८४ क्र. १९ **गळाठा**

विविध आकाराच्या अनेक ग्रंथांचे भाग. एकत्र ठेवलेल्या या संकलनात विविध संतांची पदे, अभंग, आरत्या अनेक ग्रंथांची प्रकरणे आहेत. अक्षर निरनिराळे.

५८५ क्र. २० **दासबोध** रामदास

आ. ३० × २५ सें. पृ. ९० × २. अक्षर बारीक पण छान. कागद जीर्ण. त्रु. समर्थांच्या दासबोधाची रचना. शेवटचा भाग नाही. त्यामुळे रचनाकाल व प्रतलेखक ज्ञात नाही.

५८६ क्र. २१ **बाड**

आ. २८ × १५ सें. पा. ४२ × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर बारीक. कागद जीर्ण. विविध मराठी संतांची रचना. तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर यांची बरीच रचना. अक्षर निरनिराळे. संकलनात अभंग, पदे, आरत्या, पाळणा, दंडीगाण, कैकाय, अधूनमधून रागतालांचा निर्देश असलेली रचना.

५८७ क्र. २२ **बाड**

आ. २८ × १५ सें. पृ. ११२ × २ अक्षर बारीक. लेखन व्यवस्थित. कागद जीर्ण. या बाडात अनेक प्राचीन ग्रंथांचे उतारे आहेत. समर्थ संप्रदायाची विपुल रचना यात आहे. दत्ताचीपदे, रामाची पदे, शिवरामकृत रचना.

५८८ क्र. २३ **आत्मप्रतिती** माणिक कवी

आ. १८ × १५ सें. पृ. १८ × २. अक्षर मोठे. कागद भिजून खराब झाले आहेत. अधूनमधून पाने नाहीत. त्रुटित भाग.

५८९ क्र. २४ **दासबोध** रामदास

आ. १७।। × २२।। सें. पाने २८० × २. अक्षर मोठे. कागद जाड. प्रत चांगली. सं.

प्रतलेखक व काल शके १५४५ क्रोधनाम संवत्सर दक्षणायन अश्विन शु।। १० सौम्यवासर. रामदासांकित श्रीकल्याण वरदनाम शिवकल्याण याची प्रत.

शेवटी : मध्यस्तक बारीक लेखन केले ते उतारवयात उपयोगी नाही. म्हणून मोठे अक्षरात लिहिले।। हे त्रिविध बहुश्रमाचे लेखन।। जपवणूक करावे।। शुद्धाशुद्ध पाहावे।।

५९० क्र. २५ **नित्य उपक्रम उपचार**

आ. १७ × १५ सें. पा. ३० × २. अक्षर मोठे. कागद साधारण. स्थिती चांगली. रोजच्या उपासनेत उपयोगी पडणारी सर्व रामदासी संप्रदायाची रचना येथे पूर्ण संकलित केलेली आहे.

५९१ क्र. २६ **परमामृत** मुकुंदराज

आ. ७ × १२ सें. पा. १० × २. अक्षर साधारण. त्रु. मुकुंदराजाची रचना. प्रतलेखक व काल नाही. प्रथमची पाने नाहीत.

५९२ क्र. २७ **पंचीकरण** शिवराम

आ. १० × १५ सें. पा. २० × २. ही शिवरामस्वामींची गद्यरूप टीका मूळ आचार्यांच्या ग्रंथावर. या रचनेत शेवटी ५

श्लोक आहेत. ती रचना समर्थांनी यात समक्ष येऊन भर घातलेली आहे.

५९३ क्र. २८ **बाड**

आ. १७ × २८ सें. पृ. २१ × २. अक्षर मोठे - जाड. कागद जीर्ण. शाई गडद. यात शिवराम कल्याणीकर याची विपुल रचना, भारूड, इ.

५९४ क्र. २९ **एकादशस्कंद** शिवराम

आ. १७ × १५ सें. पृ. ४० × २. अक्षर साधारण. शिवराम स्वामी याची एकादश स्कंधावरील समश्लोकी टीका. शेवटचे ६ अध्याय गहाळ. प्रतलेखक व काल अज्ञात.

५९५ क्र. ३० **बोधबासष्टी** शिवराम

आ. १२ × १८ सें. पा. ३२ × २. अक्षर साधारण मध्यम. ओ. ६२ सं. कागद जाड - घोटीव.

शिवराम स्वामींनी आपल्या शिष्यास प्रबोधण्याकरिता केलेली रचना. प्रतलेखक व काल नाही. विवरण अन्यत्र आले आहे.

५९६ क्र. ३१ **परमार्थसार**

आ. १२ × १८ सें. पा. २१ × २. अक्षर मोठे. प्र.पा.ओ. १३.

वेदांताचा ऊहापोह. लेखक बाळकृष्ण पाटील मुगळी. कालनिर्देश नाही.

५९७ क्र. ३२ **ज्ञानेश्वरी** ज्ञानेश्वर

आ. १७ × २८ सें. पाने ३२० × २. अक्षर चांगले. रेखीव. प्र.पा.ओ. १०. पूर्ण पोथी. अ. १८. कागद घोटीव जाड पांढरा. स्थिती चांगली. पोथी अपूर्वच वाटावी अशी आहे. प्रतलेखक व लेखनकाल नाही. मठातील पारायणातील महत्त्वाची पोथी असावी. पानाच्या दोही बाजूंस लाल दंडरेषा.

५९८ क्र. ३३ **बाड**

आ. २० × २४ सें. पा. ३० × २. अक्षर जाड. प्र.पा.ओ. ९. रामभक्तिपर पदे व इतर स्फुटरचना. कागद जाड शाई गडद.

५९९ क्र. ३४ **बाड**

आ. २२ × १७ सें. पा. २८ × २. उभा आकार. कागद जाड प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक. यात दत्ताची पदे. गाणगापूर येथे पालखीसमोर म्हणावयाची सर्व पदे यात आहेत. लेखनकाल- लेखक अज्ञात. गाणगापुरी पूजेत शिवरामाच्याच या आरत्या आहेत.

६०० क्र. ३५ **बाड**

आ. २८२ × ३० सें. पृ. ३१ × २. अक्षर मोठे. रामायणातील अनेक प्रसंगांवरची स्फुट रचना. अक्षर सुटसुटीत व स्वच्छ कागद जाड-पांढरा. अधूनमधून कोरी पाने.

६०१ क्र. ३६ **बाड**

आ. २० × १८ सें. पा. २० × २. अक्षर बारीक. प्र.पा.ओ. १३. यात समर्थ रामदास स्वामी यांची विपुल रचना. समर्थ संप्रदायी महत्त्वाचे बाड. आत्माराम रचना.

६०२ क्र. ३७ **बाड**

आ. २२ × १७ सें. पा. १८ × २. अक्षर साधारण. प्र.पा.ओ. ९. यात शिवराम स्वामी कल्याणीकर यांची विविध आणि विपुल रचना. एका पानावरची नोंद, सुटे पान.

शास्त्राभ्यासनकी।। श्रुती पाहु नको।। तीर्थासी जाऊ नको।। योगाभ्यास नको।। व्रते मख नको।। तीव्र तपती नको।। दुष्टासी शंकु नको।। ज्याचिया स्मरणे पतीत तरती तो शंभु सोडू नको।।

दस्तुर श्रीनिवास विठल पटवारी भिमहळ्ळी शके १८२१ विकारी नामसंवत्सर का. शु. १२

६०३ क्र. ३८ **मल्हारीमाहात्म्य**

आ. १७ × २२ सें. पा. २३८ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर साधारण. शेवटचा भाग गहाळ. त्रु. कागद जाड पण जीर्ण. शाई गडद.

श्री. शिवराज कुलकर्णी संग्रह

६०४ क्र.१ **परोपकारपद्धती**

आ. १० × १५ सें. पा. ३८ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक. कागद पातळ साधारण. श्लो. ३००. या ग्रंथाचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. उत्तर कर्नाटक भाग म्हणजे हैद्राबाद कर्नाटकाच्या गुलबर्गा भागात अनेक कानडी ग्रंथ मराठी बाळबोध लिपीत आढळतात. ही या भागाची प्राचीन परंपरा दिसते. यास अनुसरून हा वरील कानडी ग्रंथ मराठी लिपीत आहे. कन्नड भाषेतील महत्त्वाचा ग्रंथ. प्रत लेखक व काल अज्ञात. त्रिशतश्लोकी रचना म्हणून प्रसिद्ध.

६०५ क्र.२ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. ७।। × २१।। सें. पृ. ४८५ × २. अ. ५१. कागद जाड. काळी गडद शाई. लेखन साधारण. ओ. ७४०५ प्र.पा.ओ. ९. सं. नृसिंहसरस्वती दत्तमहाराज, गाणगापूर पंचक्रोशीत. हा भाग भीमेच्या दक्षिण तीरावर येतो. निजशिष्य नरहरी कवीचा हा गाव. संशोधनदृष्ट्या या प्रतीची संहिता अत्यंत महत्त्वाची आहे. परंपरेतील प्रत असल्याने कुठलाही भाग न गाळता केलेली प्रत. ५१ अध्यायांत ७४०५ ओव्या फक्त या प्रतीतच आहेत. मूळ गुरुचरित्र ५१ अध्यायांचेच आहे. हे विपुल हस्तलिखित ग्रंथांवरून ज्ञात होते.

केवळ या प्रतीत अ.२ ओ.२ मध्ये नामधारकाचे नाव विष्णू शर्मा अथवा विष्णुनामांकित असे असल्याचे येथे प्रत्ययास येते.

याखेरीज ज्ञानेश्वर परंपरेचा धागा या पोथीतच प्रथम आढळतो. आजवरच्या असंख्य प्रती व जुने संशोधन गौण ठरते. प्रथमच्या अध्यायात कविकुलास वंदन करताना येथे ज्ञानेश्वरसंबंध स्पष्ट कळतो. ती संहिता–

आता वंदु कवीश्वरासी।
व्यास वाल्मीकी परा शरासी।।
ज्ञानदेवेजी भरवंसे।।
आपुला दास म्हणवुनी।।

आजवर "ज्ञानद्यावाजी भरवसे" असा पाठ होता. न ये महाराष्ट्र भाषा।। म्हणुनि विनवी तुम्हासी।। असे व्यास वाल्मीकीना सरस्वती गंगाधराने सांगण्याचे कारण नाही. मला मराठी भाषा येत नाही. कृपा करावी म्हणून त्याने ज्ञानेश्वरांना वंदन केले आहे. ज्ञानेश्वरीनंतर गुरुचरित्र ग्रंथ २५० वर्षांनी झाला. ज्ञानेश्वरांखेरीज सोडून अन्य मराठी कवी सरस्वती गंगाधरापुढे नव्हता.

तसेच या ग्रंथात प्रत्येक अध्यायास रंगीत चित्रे आहेत. यात नृसिंह सरस्वतीस्वामींच्या ठिकाणी प्रत्यक्ष नृसिंहाचा फोटो कवीने दिला आहे. दत्त म्हणजे विष्णूचा अवतार असे कवी म्हणतो. विष्णू व सरस्वती यांचा दत्तावतार नृसिंह सरस्वती मंत्ररक्षणार्थ गुरुपद क्षेत्रात झाला हा स्कंद पुराणातील भाग मनन करण्याजोगा आहे. अवधानपूर्वक ही प्रत तयार केलेली आहे. म्हणून ही संहिता महत्त्वाची ठरावी.

लेखनकाल।। शके।। १७२२ च्या प्रवर्तमाने रौद्रिनाम संवत्सरे उत्तरायणे शशिऋतौ माघ मासे कृष्ण पक्षे द्वादश्या भौम वासरे उत्तराषाढा नक्षत्रे सिद्धनाम योगे तैतुलाकृपे प्रथम प्रहरे पुस्तक लिखित संपूर्णमस्तु।।

शेवटी : आलदे + ळग्रकर्णिका।। नामजयरामदेखा चरित्र लिहिले हे येक।। कृपा करणे स्वीया।।१।। वाचायासि फार नेण।। अर्थ अन्वय कही नेण।। पुस्तक लिहिला खूण।। सिदनहाळ कर्णिकाच्या।।२।। तयाच नाव जखरस सदा ध्यास श्रीगुरुचरणास।। मुख्य शिष्य तुझे पारंपरदास।। कृपा करावा सत्य सत्य।।३।। शेवक मनीचा हेवा।। पुरवावी श्रीगुरु रावा।। सदह नाही माझे ठेवा मना।। बोलू आपुलें सत्यकरी।।४।। दीर्घ स्वरित पुस्तक।। हस्तदोष अनेक।। पडिली असेल जे निक।। क्षमा करावा देवराया।।५।। मंगळ महा श्री श्री श्री मुगळनागांव ग्राममध्ये।। श्रीभोगलिंगस्वामी सन्निधे।। श्रीगुरुदत्तात्रेय मूर्ति चरित्रे।। पुस्तक लिखित संपूर्णमस्तु।।१।। श्रीगुरु नरसिंहसरस्वतीयार्पणमस्तु।। श्रीकल्याणमस्तु।।छ।। श्रीराम जयराम जयजयराम।।छ।।

प्रतलेखकाचे निवेदन स्थलकालासह आलेले आहे.

६०६ क्र. ३ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. १७ × २८ सें. पृ. ४०५ × २ कागद जाड. काळी गडद शाई. लेखन व्यवस्थित. अक्षर साधारण. ओ. ७५४२. अ. ५१. सं.

नरहरी कवीच्या परंपरेतील व्यक्तीने ही प्रत केली आहे. मूळ रचनेतील सर्व कानडी पदे, परंपरेचे स्तोत्र आणि स्तवन यासह ही प्रत आहे. यामुळे सर्वात जास्त ओव्या या प्रतीत आहेत. अधूनमधून काही पाने पुसट अक्षरांची. या ग्रंथाचा प्रतलेखक अज्ञात. कालही दिला नाही; पण ग्रंथ लेखनास आरंभ 'प्रतिपदा माघ शुद्ध आरंभ एवढीच नोंद आहे. हे घराणे गाणगापूर नृसिंहसरस्वती निजशिष्य नरहरी कवीच्या संबंधित असल्याने पारायणाच्या दृष्टीने त्या नरहरी कवीच्या वंशजानेच प्रत केली असावी. पोथी चांगल्या स्थितीत आहे.

६०७ क्र. ४ **पांडवप्रताप** श्रीधर

आ. ३० × १८ सें. प्र.पा.ओ. ११. अक्षर बारीक पण रेखीव. लाल दंड. लेखन व्यवस्थित. चांगली स्थिती. सं. कागद जाड.

प्रतीचा लेखक आणि कालनिर्देश नाही.

६०८ क्र. ५ **पांडवप्रताप** श्रीधर

आ. २८ × १७ सें. पृ. ४३० × २. अक्षर बारीक पण रेखीव. कागद जाड प्रतलेखक व काल दिला नाही.

६०९ क्र. ६ **ज्ञानेश्वरी** ज्ञानेश्वर

आ. २७ × १८. सें. पृ. २४० × २. अक्षर बारीक पण व्यवस्थित. दोन्ही बाजूस जाड लाल जोड रेषा. कागद जाड. श्रीक्षेत्र गाणगापूर येथे ही प्रत लिहिलेली आहे, याचा उल्लेख. लेखन काल व प्रतलेखक नामनिर्देश नाही. संपूर्ण प्रत सुव्यवस्थित पण गाणगापूर दत्त भक्त भीमरायन याची प्रत अशी टीप आहे.

६१० क्र. ७ **भामिनी षट्पदी**

आ २५ × २० सें. पृ. ३०० × २. सं. अक्षर व्यवस्थित.

ही मूळ रचना कानडी भाषेतील आहे. कन्नड साहित्यातील महत्त्वाचा ग्रंथ. पूर्ण ग्रंथ मराठी बाळबोध लिपीमध्ये आहे.

या प्रतीचा लेखक चिंतामणी कवी असून तो हादीहिप्परगा येथील राहणारा असे नमूद केले आहे. काल दिला नाही. या परिसरातील परंपरेस अनुसरून बाळबोध लिपीत कन्नड ग्रंथ लिहिलेला आहे. नारायण कर्नाटक याचा ग्रंथ शेवटी चिंतामण विनायक श्रीनृसिंह सरस्वती कल्लिनाथ हादीहिप्परगा श्रीपाद दीक्षित मार्तंड भैरवशंकर मल्लारी कुलदैवत श्रीरेणुका।। असा उल्लेख.

६११ क्र. ८ **देवार्चन** शास्त्र

आ. १५ × १२ सें. पृ. २४ × २. अक्षर साधारण. कागद जाड. देवतार्चनातील विविध व विपुल मंत्र, उपचार, विधान याचे विवेचन. प्रतीचा काल व प्रतलेखक अज्ञात.

६१२ ग्र.क्र. ९ **बाड**

आ. २२ × १७ सें. पृ. ३२ × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर बारीक. यात विविध मराठी संतांची रचना. ज्ञानेश्वर, रघुनंदन, एकनाथ, तुकाराम, नामदेव, शिवराम, केशव, रंगनाथ यांची विपुल रचना. दत्तपर पदे. याचे लेखन संगमेश्वरी झाले, अशी नोंद शेवटी आहे. हे बाड मोडी लिपीत लिहिलेले आहे.

६१३ क्र. १० **पंचतंत्र**

आ. ३० × २२।। सें. पृ. २०० × २. अक्षर अत्यंत बारीक आणि रेखीव असे मोडी लिपीत. संपूर्ण पोथीची कसरीने दुर्दशा झाली आहे.

पंचतंत्रातील सर्व गोष्टी टिपलेल्या असून, शेवटची पाने गहाळ. प्रतलेखक व प्रतीचा काल अज्ञात.

६१४ क्र. ११ **बाड**

आ. १७ × १० सें. पृ. ४८ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर -मोठे रेखीव. कागद भिजून खराब. या संकलनात संत तुकाराम, रामदास, एकनाथ, ज्ञानेश्वर, सुरदास, कबीर, पुरंदर दास यांची मराठी, हिंदी व कन्नड रचना आहे. भीमराज, शिवराम, रघुनंदन, नामदेव, भीमाशंकर, नारायण आत्मज नानाजीनंदन, गोसावीनंदन, विश्वात्मज, रुक्मांगद त्रिमरुसुत विठ्ठल दीक्षित यांची रचना.

६१५ क्र. १२ **बाड**

आ. १२ × १० पा. ३५ × २. प्र.पा.ओ. ९. अक्षर साधारण. काळी गडद शाई. जाड कागद, या बाडात मराठी संतांची बरीच पदे, अभंग, आरत्या इ. या बाडाचे लेखन भीमाजे येंकट याने केल्याची नोंद आहे. प्रतलेखनाचा कालनिर्देश नाही.

६१६ क्र. १३ **बाड**

आ. १५ × १० सें. पा. ५२ × २. लेखन बारीक अक्षरात. प्र.पा.ओ. ११, कागद जाड. यात संत कवींची विपुल रचना. त्यात पदपदांतरे आवर्जून आहेत. रामजन्म, कृष्णजन्म, ब्रह्मोत्तरखंड, गजगौरी आख्यान.

६१७ क्र. १४ **सिंहासनबत्तिशी**

आ. २७ × १८ सें. पा. २१० × २. प्र.पा.ओ. ११. त्रु.

कागद भिजून खराब व जीर्ण झाले आहेत. प्रतलेखक व काल निर्देश नाही.

६१८ क्र.१५ **त्रिकोटक रुद्रसंहिता**

आ. १० × १८ सें. पृ. २१ × २. प्र.पा.ओ. १७ लेखन मध्यम अक्षरात. कसरीने पाने गळालेली आहेत. भोके पडून दुर्दशा. मंत्रसंहिता, विवेचन आणि विधानप्रत लेखक वा काल दिला नाही.

६१९ क्र. १६ **जातकीय** विठ्ठलदास

आ. १७ × १३ सें. पृ. १२ × २. अक्षर साधारण. पातळ चिवट कागद. केवळ बालकांडाचा भाग असूनही रचना कुण्या विठ्ठलदास कवीची आहे, याची नोंद आढळते. प्रतलेखक व काल दिला नाही.

६२० क्र. १७ **बाड**

आ. १६ × १२ सें. पृ. २३ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक. सर्व पोथीची पाने भिजून खराब झाली आहेत. या संपूर्ण बाडात श्रीकृष्ण चरित्रपर काव्य टिपलेले आहे. प्रतलेखक वा काल अज्ञात. मधली काही पाने नाहीत.

६२१ क्र.१८ **हरिविजय** श्रीधर

आ. ३० × २२ सें. पृ. १४ × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर मोठे. कागद जाड. गडद काळी शाई. ही त्रुटित प्रत. अधूनमधून राहिलेली काही पाने आहेत.

६२२ क्र.१९ **विष्णुअपमार्जन**

आ. १२ × ८ सें. पृ. १७ × २. अक्षर अत्यंत बारीक. लेखन व्यवस्थित. मंत्राचे शेवटी काही मराठी संतांची देवतास्तुतीपर रचना पदे, स्तोत्रे, अभंग, अष्टक इ.

६२३ क्र.२० **सज्जनपद्धती**

आ. १७ × १२ सें. पाने ३४ × २. अक्षर साधारण. कागद पातळ तपकिरी. काळी शाई. मूळ कन्नड भाषेतील रचनेची मराठी बाळबोध लिपीतील प्रत. प्रतलेखक वा कालनिर्देश नाही. कानडीतील विविध व विपुल रचना.

६२४ क्र.२१ **बाड**

आ. २० × १५ सें. पा. १० × २. प्र.पा.ओ. ९ अक्षर बारीक. कागद पांढरा जाड. यात रामरक्षा आणि बरीच स्फुट रचना. प्रतलेखक अथवा काल दिला नाही.

६२५ क्र.२२ **गीताभाष्य**

आ. १८ × १५ सें. पा. १९ × २. त्रु. प्र.पा.ओ. १२. अक्षर बारीक.

गीतेचे मूळ श्लोक आणि समश्लोकी मराठीभाष्य. विस्कळित पाने उपलब्ध. मूळ रचना कुणाची कळत नाही. शेवटचा भाग गहाळ.

६२६ क्र. २४ **लक्ष्मीनारायणहृदय**

आ. ७ × १८ सें. पृ. २८ × २. प्र.पा.ओ. ९. अक्षर बारीक. मूळ संहिता व विवेचन. यात देवीस्तुतिपर स्तवन स्तोत्र, आरत्या, भूपाळ्या, अशी रचना जगदीश व अन्य मराठी कवींची.

६२७ क्र. २४ **नदीस्तोत्र**

आ. २७ × १८ सें. पृ. २८ × २. प्र.पा.ओ.११. अक्षर बारीक. संपूर्ण पोथीचे कागद भिजल्याने जीर्ण. या रचनेत भारतातील विविध नद्यांची स्तोत्रे व माहिती याचे विवेचन पुराणाधारे. मूळ रचना वा प्रतलेखक अथवा काल दिला नाही.

६२८ क्र. २५ **बाड**

आ. २३ × १८ सें. पा. ३६ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक पण सुटसुटीत.

हे संपूर्ण बाड कन्नड भाषेतील पदे, आरती, अभंग स्तोत्र याचे असून प्रसिद्ध कन्नड संतांची ही रचना मराठी बाळबोध लिपीतून टिपलेली आहे.

६२९ क्र. २६ **नदितटाक**

आ. २७ × १८ सें. पृ. १४ × २. त्रु. अक्षर बारीक. पाने विस्कळित. भारतीय नद्यांचा इतिहास पुराणाधारे. शेवटचा बराच भाग गहाळ.

६३० क्र. २७ **पांडवप्रताप** श्रीधर

आ २५ × २२ सें. पृ. ६३ × २. प्र.पा.ओ. ९. अक्षर मोठे. त्रु. कागद भिजलेला. प्रथमचा भाग नाही.

ही प्रत शके १७३३ प्रमोदनाम संवत्सर उत्तरायण... शुक्ल १२ इंदुवासर.... असा उल्लेख. प्रतलेखक नाव दिले नाही.

६३१ क्र. २८ **पांडवप्रताप** श्रीधर

आ. २८ × १५ सें. त्रु. पा. ८० × २. अक्षर मोठे. कागद जाड पांढरा. शेवटचा भाग नाही.

६३२ क्र. २९ **भागवत**

आ. ३० × २२ सें. पा. २४० × २. प्र.पा.ओ. ११. अक्षर मोठे. कागद जाड. मूळ कन्नड भाषेतील ही भागवत रचना आहे. संपूर्ण लेखन बाळबोध लिपीतून. प्रतलेखक चिंतामण कर्णिक हा असून, याचे लेखन शके १७५३ साली झालेले आहे. लेखक आणि लेखन स्थल निर्देश शके १७५३ खरनाम संवत्सर शिशरऋृतु उत्तरायण फाल्गुन कृष्णपक्ष भृगुवासर जखो चिंतामण कर्णिक हिप्परगी समत निलीगी।। असा आहे.

६३३ क्र. ३० **रुक्मिणी स्वयंवर** एकनाथ

आ. २७ × १५ सें. पा. १२० × २. त्रु. अक्षर खूप मोठे. अधूनमधूनच काही पाने गहाळ झाली आहेत. प्रतलेखक वा कालनिर्देश नाही. कागद घोटीव जाड.

६३४ क्र. ३१ **ब्रह्मोत्तरखंड**

आ. २७ × १५ सें. पा. १२ × २. त्रु. प्रत. शिवपूजेच्या वर्णनाचे काही अध्याय. पहिला व शेवटचा भाग नाही. ही टीका कुणाची आहे कळत नाही. अक्षर-रेखीव व्यवस्थित.

६३५ क्र. ३२ **बाड**

आ. २० × १८ सें. पा. ४० × २. अक्षर बारीक. लेखन साधारण. यात ज्ञानेश्वर, मालो, नामदेव, जनार्दन, एकनाथ, शिवराम यांची विविध पदे. हरिपाठाचा काही भाग. पहिली व शेवटची पाने नाहीत.

६३६ क्र. ३३ **बाड**

आ. २५ × १८ सें. पा. ३२ × २. प्र.पा.ओ. ११. अक्षर बारीक. या संपूर्ण बाडांत रामचरितपर रचनेचे संकलन. विविध पद्यरचना, रागतालांचा निर्देश. बांडाचे लेखन १२१३ फसलीत झाले, असा उल्लेख शेवटी. त्या वेळेस इ. स. १८०० चा येतो. लेखक अज्ञात.

६५५ क्र. ३७ **भागवत**

आ. ३० × २५ सें. पा. १२ × २. त्रु. अक्षर मोठे. भागवतातील मूळ श्लोक व मराठी टीका, मधलीच पाने उपलब्ध. टीका कुणाची आहे, हे कळत नाही.

६३८ क्र. ३८ **दत्तात्रेय कवच**

आ. ७ × १० सें. पा. २२ × २. प्र.पा.ओ. ७. मूळ दत्तात्रेय कवच आणि दत्तोपासनेचे विवेचन. काही महत्त्वाची दत्तस्तुतिपर रचना. स्तोत्र, पदे इ.

६३९ क्र. ३९ **पांडवप्रताप** श्रीधर

आ. ३० × २५ सें. पा. ४४ × २. प्र.पा.ओ. ११. अक्षर मोठे. त्रु. सर्व पोथी भिजून खराब. पाने चिकटलेली.प्रथमचा भाग नाही. शेवटी ग्रंथ लेखन काल शके १७३३ असा दिला आहे. प्रतलेखक अज्ञात.

६४० क्र. ४० **बाड**

आ. २८ × १५ सें. पाने २१ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर मोठे. यात विविध मराठी संतांची विपुल रचना. ज्ञानेश्वर, शिवराम, रामदास, एकनाथ, नामदेव, भीमराज, इ.

६४१ क्र. ४१ **मल्हारीमाहात्म्य**

आ. २५ × १८ सें. पा. ६० × २. त्रु. प्र.पा.ओ. १०. शेवटचा भाग नाही. कागद जाड पिवळसर. अक्षर मध्यम प्रतलेखक व काल नाही. काही पाने कसरीमुळे खराब झाली आहेत.

६४२ क्र. ४२ **पारिजात** अपरालतमणा

आ. २८ × १२ सें. पा. १८० × २. अक्षर बारीक. प्रथमची २ पाने मोडी लिपीत.

कन्नडसाहित्यातील ही दुर्मिळ रचना आहे. ग्रंथ मूळ कन्नड आहे. त्याची ही मराठी बाळबोध लिपीतील प्रत. व्यवस्थित लेखन केलेले आहे. प्रतलेखन शके १७५६ सालचे आहे. प्रतलेखकाचे नाव नाही. कन्नड वाङ्मयात ही दुर्मिळ प्रत ठरावी. मराठी बाळबोध लिपीतून ती जोपासली गेली आहे.

६४३ क्र. ४३ **गुरुगीता**

आ. १७ × १२ सें. पा. ३३ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक. व्यवस्थित. ईश्वर पार्वती संबादाची रचना भाष्यासह.

मूळ भाष्य कुणाचे याचा अर्थबोध होत नाही. या प्रतीचा लेखक भीमाशंकर जखपा आहे, याचा निर्देश केलेला आहे. तिथी व वर्ष दिले नाही.

६४४ क्र. ४४ **बाड**

आ. १० × १३ सें. पा. २१ × २ प्र. पा. ओ. ९ मोडीमध्ये बारीक अक्षर. यात संगमेश्वर देवालयाची माहिती व पुराणाधारे वैशिष्ट्य नमूद केले आहे. प्रतलेखक व काल अज्ञात.

६४५ क्र. ४५ **वस्त्रहरण**

आ. १० × १८ सें. पाने २८ × २. त्रु. अक्षर मध्यम. कागद जीर्ण. यात वस्त्रहरण आख्यान. मूळ कवी अज्ञात. प्रतलेखन शके १०९ (?) शुक्ल संवत्सर वैशाख १२ भीमाजी व्यंकटेशाद्री कुलकर्णी मौजे हादी हिप्परगा अशी शेवटी नोंद.

६४६ क्र. ४६ **अश्वमेध** श्रीधर

आ. ३० × २५ सें. ओ. ९७२४. अक्षर मोठे. कागद अत्यंत जीर्ण. सं. प्रतीचा काल दुर्मुखनाम संवत्सर भाद्रपद वद्य ७ मंद वासर शके १७५८ असा दिला असून, श्री क्षेत्र गाणगापूर येथे भीमा अमरजा संगमावर नंदीनाम कवी, बसव रस अंशिक भीमाशंकर सुत चिंतामणी पुय जखणा नमो नमः।। तीन प्रहरी ग्रंथ पूर्ण केला।। असा उल्लेख.

६४७ क्र. ४७ **शिवगिरीपद** पुराण

आ. २२ × १८ सें. पा. २७ × २ त्रु. अक्षर मोठे. प्र. पा. ओ. यु. शंकराच्या स्थानाचे वर्णन. आहे ती पाने विस्कळित. प्रतलेखक आणि लेखनकाल अज्ञात. शेवटचा प्रथमचा भाग गहाळ.

६४८ क्र. ४८ **मल्हारी माहात्म्य**

आ. ३० × १८ से. पा. ४२ × २ त्रु. अक्षर खूप मोठे. प्रथमची काही पाने व मधलाच काही भाग उपलब्ध

६४९ क्र. ४९ **रामचरित्र**

आ. २५ × १८ सें. पृ. ३६ × २ त्रु. रामचरित्रातील अनेक प्रसंगांचे वर्णन. शेवटचा भाग नाही.

सन १२१३ फसली (इ. स. १८०३) च्या रुधिरोद्धारी संवत्सरात मार्ग. शु. ११ शुक्रवारी ही प्रत केलेली आहे. मूळ रचना कुणाची आहे हे कळत नाही.

६५० क्र. ५० **रामविजय** श्रीधर

आ. ३२ × २८ सें. पृ. २८ × २ प्र. पा. ओ. १२ अक्षर सुटसुटीत मोठे. मधूनच काही अध्यायाचा भाग.

कर्णिक बाळाजी जखो (जखप्पा) याने ही प्रत हिप्परगा समीप नेलविगी येथे केली, असा उल्लेख आहे. नरहरी कवीच्या कुलकर्णी वंशजातील माणसानेच ही प्रत केली आहे. कालोल्लेख नाही.

६५१ क्र. ५१ **पांडवप्रताप**

आ. २० × १८ सें. पृ. ५० × २ अक्षर अत्यंत बारीक. त्रु. पोथीचा मधलाच भाग असल्याने कालोल्लेख आणि प्रतलेखक अज्ञात. कागद जीर्ण.

६५२ क्र. ५२ **हरिविजय** श्रीधर

आ. ३० × २८ से. पा. १८ × २ त्रु. अक्षर खूप मोठे. कागद जीर्ण. कसरीमुळे उजवा भाग भोके पडून खराब. कागद खूप जाड व पांढरट शाई गडद काळी. दोन्ही बाजूस लाल रेषा. लाल दंड.

श्री भीमाशंकर मठ, शिंदगी संग्रह

६५३ क्र. १ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. २० × १५ सें. प्र.पा.ओ. १०. अ ५१. पा. ५८२ × २. लेखन व्यवस्थित. अक्षर मोठे.

आरंभी : श्रीगणाधिपतये नमः।। श्री शारदाये नमः।। श्रीगुरुभ्योनमः।। श्री गुरुचरित्र लेखन आरंभ।। ॐ नमो।।...

प्रत्येक अध्यायास वेलबुट्टीने सजावट. दोन्ही बाजूंस लाल रेषा. अध्याय ५० ला ७१०८ ओव्या पूर्ण. ५१ अध्याय ७० श्लोकापर्यंत. शेवटची २ पाने गहाळ. उपलब्ध ओव्या एकूण ७१७८. मठातील पारायणाची पोथी. कागद जाड चिवट. त्या आकाराच्या एका लोखंडी पेटीत प्रत ठेवलेली आहे. ही पूजेकरिता सोय केलेली असावी.

६५४ क्र. २ **श्री सद्गुरू भीमाशंकर** रामलिंग

आ. २३ × १६ सें. प्र.पा.ओ. १३. अक्षर साधारण. मूळ कन्नड ग्रंथाचे लेखन मराठी बाळबोध लिपीतून. अ. २३. पृ. ४०० × २. प्रथमन्यास पद्धतीचे विवरण ४ पा.

आरंभी : श्री गणेशाय नमः।। सद्गुरू भीमाशंकर यतीवर्या नमः।। श्री बनशंकरी देवी।। श्री संगमनाथाय नमः।। धन्य धन्य गजानना।।

शिंदगीमठ परंपरा म्हणजे ज्ञानेश्वरांची नाथ परंपरा कर्नाटकात चालविणारा मठ. आदिनाथ, गोरक्ष, गहनी, निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुकुंद ही त्यांची परंपरा आहे.

संपूर्ण ग्रंथात मठाची व मठाधीशाची माहिती ग्रथित झाली आहे. गाणगापूर नृसिंहसरस्वती दत्त महाराज परंपरेस संबंधित मठ असून, त्या दृष्टीने ग्रंथाच्या शेवटच्या अध्यायात तो भाग आला आहे.

नृसिंहसरस्वती अवतार समाप्तीच्या वेळी भक्तांनी प्रार्थना केली. तेव्हा गुरूंनी निर्गुण पादुका पूजण्याची आज्ञा दिली. त्यांच्या अवतार समाप्तीनंतर यवनांची धाड आली. मान्य हाळ, बाबाजी, केशवचैतन्य, आळंद येथील राघवचैतन्य वर्णन. यवन प्राबल्याने पुजारी चिंताग्रस्त. ख्वाजा हुसैन निर्गुण पादुका पाहण्याची पृच्छा करतो. त्या वेळेस रुद्रपाद येथे, पादुका गुहेत ठेवल्या. प्रभाकरभट, मुरळी तुळजपा, मुंगळी काशप्पा, मालगी रामप्पा, भृंगवळी मेगप्पा, नरोणा नारायण देव त्या वेळी आले. दत्ताच्या प्रचितीने यवनाना उपरतीच्या जखमा भीमाशंकर पुत्राने गाणगापूरचे नियम केले. इ. या गोष्टी दंतकथारूपाने टिपल्या आहेत. लेखन रामलिंग यांचे आहे. प्रत लेखन काल नाही. अंदाजे २५० पूर्वीचे लेखन मानतात. इतिहास दृष्टीने महत्त्व बेताचे ठरते. दंतकथा विपुल प्रमाणात आहेत.

६५५ क्र. ३ **बाड**

आ. १७ × १२ सें. पृ. ३२ × २. या बाडात मठाधीश आणि परंपरेतील वंशज आणि शिष्यानी केलेली रचना, स्फुट पदे, आरती अशी वानगी आहे. भाषा मराठी आणि लिपी कन्नड अशी ही रचना आहे. उत्तर कर्नाटकाच्या मुंबई कर्नाटक भागात मराठी ग्रंथ कानडी लिपीत प्रामुख्याने आढळतात. बेळगाव, धारवाड, विजापूर परिसरात अशी रचना आढळते. यातील मराठी रचनेची काही पदे. तासगाव गजाननाचे वर्णन :-

(१) श्रीमधुमा रमण सुत गणपती असता।।
आतां करु काहो चिंता।। हे रंभा।।
(२) गणराज प्रभु वो सकळ दुरित परिहर्ता।।धृ।।
(३) आदिगुरु आदिनाथा मूळ संतती।
नाथा मुळ रुपा।।
मच्छेंद्र ते तुम्ही झाला आनंदमूर्ती।।
आदि ओवाळी आदिगुरु संपदा।।
सद्भावा स्वानंद प्रेम नाथ समर्थ।।
(४) गोरक्षी शिष्यास त्याच्या गहनीनाथाला।।
निवृत्तीनाथ त्यांना उपदेश केला।।
हरिज्ञानदेव सोपान मुकुंदमुनी।।
नाथ मुकुंदमुनी।।
अलक्षा चिंतनात अव्यक्त मुनी।।
हरे भिक्षुनाथ रामनाथ।।
चरण कमल वंदुनी भीमाशंकरमुक्त।।
(५) माझा सद्गुरुराज सिद्धापूर निवास।।

मठाच्या परंपरेतील अशी विपुल रचना आहे. यातच वंशावळ व गुरुपरंपरा रचना आहे.

६५६ क्र. ४ **सद्गुरू स्तवन**

ही रचना एकूण १३ कडव्यांची आहे. मठ परंपरेत महत्त्वाची रचना. भाषा मराठी, लिपी कानडी असे लेखन.

आरंभी :

आदि ओवाळु आरती सद्गुरुनाथा।।
श्रीगुरुनाथा।।
सदा सदभाव तू चि तू चि तत्त्वता।।धृ।।

शेवटी :

भीमाशंकर तीर्थ आनंदगात्रा।।
स्वानंदगात्रा सद्गुरु चरणावरी
लोळे निरंतरा।।
आदि।।१३।।

६५७ क्र. ५ **बसवेश्वर चरित्र** भीमाशंकर

ही छोटी रचना संप्रदायात मुख्य मानतात. वीरशैव संत बसवेश्वर यांच्याहून हा भिन्न बसवेश्वर आहे. मठाच्या या परंपरेतील एका बसवेश्वराबद्दलची रचना भाषा मराठी. लिपी कानडी याप्रकारे केलेली आहे.

आरंभ :

त्रिभुवनी माजि थोरी महाशिवालय नगरी रे।।
उदंडकारी कुळीयवतारी कर्णिक मिरासी रे।।
कोळ्कुरी वासकरी बसवेश्वर घरी रे।।

वर्णाचारी माजि थोरी ब्रह्म गुरुवाहरीरे।।छ।।

शेवटी :

मंगला जयमंगला मंगला गुरुनाथा रे।।
तत्त्वमाला भूषतगळा मुक्तीच्या कुंडला रे।।
मेखळारती सोज्वळा स्वानंद मुद्रिका रे।।
शोभे माळा आनंद गळा चिन्मया चंदना रे।।

६५८ क्र. ६ **भीमाशंकर चरित्र** जकप्पया

भाषा मराठी आणि लेखन कानडी लिपीतून अशी भीमाशंकर गुरूच्या बद्दल चरित्रात्मक रचना. एकूण ६६ ओव्या यात आहेत.

आरंभी :

माझा श्री सद्गुरू राज शिंधापुरी निवासी।।
अजन्मा जन्मासि येऊनि शंकरनाम विलासी।।१।।

शेवटी :

शंकर स्मरण भवाद्वि तरण काया वाचा मन।।
शंकरानंद सरस्वतिवर विरहित अनन्य जाण।।६६।।
मठातील वंशजाने केलेली महत्त्वाची मराठी रचना.

६५९ क्र. ७ **जकप्पास्तवन**

ही रचना पण भाषा मराठी आणि लिपी कन्नड या स्वरूपाचीच आहे. मठात नित्य पठनात असलेली रचना.

आरंभी :

जय जयादि सद्गुरू। परब्रह्म साकारू।।
संत साधुवृंद मेरू। भक्तजन कल्पतरु।।धृ।।
अग्रवर्ण ब्रह्मसुकुळी। लिंगर्स वंशावळी।।
सत्व शिरोध मेळी। उत्पन्न मंडळी।।१।।

शेवटी :

पंचमात्र कार्यसकला। कार्यकारणी मिळाला।।
साम्राज्यमुक्ति सोहळा सद्गुरू भीमाशंकरी मिळाला।।११।।

श्री दादासाहेब मोहरीर संग्रह

६६० क्र. १ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. २३ × १३ सें. अ. ५१. प्र.पा.ओ. ११. लेखन व्यवस्थित.

आरंभ : श्री गुरुभ्यो नमः।। श्री कुलदेवताभ्यो नमः।। श्री नृसिंह सरस्वतीभ्यो नमः।। श्रीपाद श्रीवल्लभभ्यो नमः।।

प्रथमची ओवी लाल शाईत. प्रथमची २,३ पाने कडेने खराब. शेवटची ओवी लाल रंगात.

या प्रतीत ५१ अध्यायांत श्रीगुरू मंडपी प्रवेश करते झाले असा उल्लेख. संशोधनदृष्ट्या महत्त्वाचा पुरावा.

शेवटी : इदं पुस्तक शके १७१६ भावनाम संवत्सर.. तिथौ रविवासरे संपूर्ण।।

शेवटचे पान अक्षर पुसट.

शेवटी :

दत्त।। गुरु।। दत्त।। स्वामी।। अवधूत।।

शेवटची टीप : गुरुचरित्र पोथी जुनी हस्तलिखित गुंडभट कलंभट पुजारी श्रीक्षेत्र गाणगापूरकडून आम्हास प्रसाद दिले. शके १७१६. भावनाम संवत्सर।। चरित्र महत्त्वाचे।। दर वर्षी माघ शु।। नवरात्रात पूजा करून ठेवणे।।छ।।

६६१ क्र. २ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. २० × १६ सें. प्र.पा.ओ. २१. अक्षर बारीक. ओ. ७३००.अ. ५३.

अ. २. ओ. १. विष्णुनामांकित उल्लेख.

शेवटी : श्री भगवान दत्तात्रेय नमस्तु। श्रीनृसिंहसरस्वती स्वामी निर्गुण।। श्री वरदीपादुकार्पणमस्तु।। लेखक चरण।। सेवक हरिहर ऊर्फ दादा -----।। रामराव मोहरीर----।। अफझलपूर मिती माघ शु।। १ शके १८९५ रोज गुरुवार आरंभ लिखाण करून आज चैत्र ----।।१ वर्ष शके १८९६ आनंद संवत्सर संपूर्ण केले. निर्गुण पादुकास अर्पण केले असे ता. २४ माहे मार्च १९७४ इ. स. वी. श्रीरस्तु।। गुरुचरित्र पारायणाप्रमाणे गुरुचरित्र लेखन सेवा म्हणून केलेली अर्वाचीन प्रत।।

६६२ क्र. ३ **रामविजय** श्रीधर

आ. २२ × १६ सें. प्र.पा.ओ. १२ पहिली व शेवटची ओवी लाल रंगात. अक्षर मोठे सुटसुटीत. कागद जाड. सं.

शेवटी : हे पुस्तक लिखिते भीमाशंकर त्रि. म. संवछर श्रावण शुध पंचेमी गु. साद्यंत वोळी संख्य.... शेवटचे पान डावीकडे फाटलेले.

६६३ क्र. ४ **रामविजय** श्रीधर

आ. २५ × १२ सें. प्र.पा.ओ. ९. अक्षर मोठे व्यवस्थित त्रु.

यात फक्त ३३ ते ४० असे ८ अध्याय आहेत. पूर्वीचा भाग गहाळ. प्रतलेखक व कालनिर्देश नाही.

६६४ क्र. ५ **विवेकसिंधू** मुकुंदराज

आ. २० × १८ सें. पाने. १४० × २. प्र.पा.ओ. ९. अक्षर बारीक.

प्रतलेखक व कालनिर्देश नाही.

श्री माणिकप्रभु संस्थान ग्रंथसंग्रह

६६५ क्र. १ **बाड**

आ. ३५ × १२ सें. पा. २२ × २. अक्षर खूप मोठे रेखीव. बोरूने लिहिलले. गडद काळी शाई. प्र.पा.ओ. ४

मुखपृष्टावर "श्री गुरु सिद्धराज माणिक प्रभू महाराज दिंडीतील पदांची यादी." यात सर्व पदांचे धृपद, कडवे इ. ची नोंद. काल दिला नाही. प्रतलेखक अज्ञात.

६६६ क्र. २ **उपदेशरत्नमाला**

आ. ३१ × १२ सें. पृ. १२६ + १३७ × २. अक्षर खूप मोठे. बोरूचे लेखन. गडद काळी शाई. कागद पांढरा जाड. बांधीव वह्या २.

आरंभी : श्री माणिका।। जय माणिक।। हर माणिक हरी माणिक।। चिन्मणिक।।१।।

शेवटी : ज्ञानरूप मार्तंड उगवता संशय तम हरते।। चिन्तामणिक आम्ही सर्वही झालो आनंदी आनंद।। वही क्र. १ पृ. १२६.

वही क्रमांक २ लेखन पद्धत तीच पा. १३७ प्र.पा.ओ. ८ वरील विषयाचाच भाग. पुरवणीत.

६६७ क्र. ३ **आरत्या**

आ. ३१ × १८ सें. प्र.पा.ओ. ५. अक्षर खूप मोठे. बोरूने लिहिलेले. कागद पांढरा जाड. गडद काळी शाई.

यात एकूण ३५ आरत्या संकलित केलेल्याँ. या संप्रद्रयाचीच रचना. धृपद, चरण व आकडे अनुक्रमे लाल, काळी आणि हिरवी शाई. आरती पुढे क्रमांक इ. ची नोंद. या सर्व मार्तंड माणिक प्रभू आरत्या म्हणून खुलासा केलेला आहे. पीठामध्ये उपयोगात येणाऱ्या सर्व आरत्या येथे क्रमाने दिल्या आहेत. प्रत. लेखक व काल दिला नाही.

६६८ क्र. ४ **श्री माणिकगीताहृदयस्तोत्र**

आ. ३८ × ४ सें. पा. ५ × २. अक्षर मोठे. कागद पांढरा जाड. मठातील पूजेत उपयोगात येणारे परंपरेचे स्तोत्र. रचना काल नाही. ही एक आडवी बांधीव लांब पट्ट्याची वही. बोरूने लिहिलेले.

६६९ क्र. ५ **रामविजय** श्रीधर

आ. २८ × ४४ सें. प्र.पा.ओ. ११. अ. ४०. संपूर्ण. प्रत. सं. प्रथमचे मुखपृष्ठ वेलबुट्टी काढून सजविलेले. त्यामागे एक रंगीत चित्र. स्थिती छान.

आरंभी : श्री गणाधीपतीये नमः।। श्री सरस्वतये नमः।। श्री गुरुभ्यो नमः।।

काल : स्वस्ती श्रीनृप शालिवाहन शके १७१७ साधारण संवछर श्रावण वद्ये आष्टमी भृगुवासरे प्रथम प्रहरे शुभ नक्षत्री ग्रंथराज समाप्त।।

हस्ताक्षर आंबाजी पर्वतराव बोकील मोकाम मौजे लव्हारा मामले आवसा।।छा।।छा।।

इदं पुस्तकं बायोजी रंगनाथ वास्तव्ये मौजे राजेश्वर याचा ग्रंथ परोपकारार्थ संग्रहीला असे. भग्न पृष्टी...

६७० क्र. ६ **मल्हारीमाहात्म्य** माणिकदास

आ. २२ × ११ सें. प्र.पा.ओ. ७ पृ. ३४ × २ सं. अक्षर छान. कागद लालसर पण चिवट. सं.

आरंभी : श्रीगुरू माणिक प्रभु।। प्रार्थना जि देवक्रतुंडा।। वेलाकृती सरळ सोंड।। वदेन महात्म मार्तंडा।। कृपा करोनि वदवा जि।।१।। कैलास मेरूचे सीखरी पार्वतिसिवासी प्रसन्न करी।। म्हणे स्वामीसीया पुनित तीर्थ कोणते।।२।।

शेवटी : कलियुग... दुजा देव नाही देख।। सनत्कुमार ऋषिलोक।। पार्वति...इति।। श्री क्षेत्र खंड ब्रह्मांड पुराणे मल्लारी माहात्म्य अरुरौणे प्राकृत भाषण माणिकदास बोलले असे।।

६७१ क्र.७ **मल्हारीमाहात्म्य** माणिकदास

आ. २१ × १३ सें. प्र.पा.ओ. ६. अक्षर मोठे. कागद जाड. गडद काळी शाई. लाल दंड रेषा. दोन्ही बाजूंस लाल रेघा. पा. ६२. सं. पहिली २ पाने कोरी. लेखन संपूर्ण बोरूने

केलेले, रेखीव. संप्रदायाची प्रत.

आरंभी : श्री माणिक प्रभुकृत।। मल्हारी महात्म अदभुत।। एक एक अक्षर रसभरित।। बाळ माणिक लिहिला असे।। सद्‌गुरू शंकर माणिकार्पणमस्तु।।

शेवटी : स्वस्ती श्री नृप शालिवाहन शके १८६३ पृपे संवछरे चैत्र कृष्ण पक्ष १३ गुरुवार.

६७२ क्र. ८ **उत्तरगीता**

आ. २२ × ११ सें. प्र.पा.ओ. ६. अक्षर साधारण. कागद जाड. पहिली ६ पाने कसरींमुळे खराब. सं. अ. ३. लेखनात लाल दंड रेषा. प्रत थोडी भिजल्याने काही भाग पुसट. ओ. ११४.

आरंभ : श्री गणेशाय नमः।। श्री गुरुभ्यो नमः।। सच्चिदानंद -- गुरुवेवृत्ति--सिणे।। प्रत्यक्ष चैतन्यरूपाय सद्‌गुरू माणिकराज ये नमः।। ॐ नमोजी अनादि सित्धा।। मंगलमणि महाप्रसित्धा।।

शेवट : आता असो हे बोलणे।। अनुभवी तोची जाणे।। येरा काय सांगणे अंतरीचे।।३७।। अंबिका देशी पवित्र।। वडग्राम जे का सुक्षेत्र।। ग्रंथ संपूर्ण विचित्र।। तये स्थळी।।३८।। स्वस्त श्रीनृप शालिवाहन शके सोळाशते आणि त्रिदशक सर्व धारि संवत्सरे देखे।। आषाढ शुद्ध पूर्णीमा।। उत्तरगीतेची टीका आकाराशी पूर्ण देख।। सीतारामी अक्षय सुख पारचि नाही।। इतिश्री उत्तर गीता सुपतिष्ठत्सुब्रह्मविद्या योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे तृतियोध्याय।। कृष्णार्पणमस्तु।।

अवत्धोरा सुबत्धीवा ममदोषपाविद्यते।। श्री सद्‌गुरूनाथार्पणमस्तु।।

प्रतलेखकाचे नाव नाही. मूळ टीकाकार कोण याचा उलगडा होत नाही.

६७३ क्र. ९ **प्रकाशदीप**

आ. २६ × १४ सें. प्र.पा.ओ. १०. सं. अक्षर मोठे. काळी शाई. पृ. ७९ × २. प्र. ४

आरंभी : श्री गणेशाय नमः।। ॐ नमो भगवते वासुदेवाय नमः।। पांडुरंगरुक्मिणीश वर प्रदे.।।

शेवटी : शके १७५२ विकृतनाम संवत्सर चैत्र कृष्ण ६ बुध. प्रतलेखकाचा नामनिर्देश नाही.

६७४ क्र. १० **पूजाविधान**

आ. २८ × १५ सें. प्र.पा.ओ. १०. पृ. ६९ × २. अक्षर, साधारण. काळी शाई. कागद जाड.

सांप्रदायिक पूजा पद्धती मंत्रोच्चारासह दिलेली आहे. काल निर्देश नाही.

६७५ क्र. ११ **गौडपादसूत्राणी**

आ. २९ × ८ सें. पृ. २०३ × २. प्र.पा.ओ. १. अक्षर बोरूने गडद काळ्या शाईत. कागद जाड-चिवट-पांढरा. सं. विवेचनात्मक टिपण.

अथशास्त्रा मंत्रागण।। (एवढा मजकूर एका पानावर.)

जिज्ञासा।। (येवढा मजकूर दुसऱ्या पानावर.) डाव्या बाजूने शिवण. पुठ्ठा घालून बांधीव वही सुबक. खूप मोठ्या रेखीव अक्षराची प्रत. प्रतलेखक व काल दिलेला नाही.

६७६ क्र. १२ **शिवलीलामृत**

आ. ३४ × २१ सें. प्र.पा.ओ. १०. अ. ४०. सं. मोठ्या अक्षरांत. बोरूचा वापर. गडद काळी शाई. प्रथमची पाने विविध रंग वापरून सजविलेली. वेलबुट्टी काढलेली.

शेवटी : हरिहराचा महिमा अगाध।। मनी लागला तोचि छंद।। श्री सद्‌गुरू मार्तंड प्रबोध मनी साठविला।।१।। त्या सद्‌गुरू कृपेकरून।। शिवलीलामृताचे लेखन।। भक्तिभाव प्रेमे करून।। लेखनास केला आरंभ।।२।। शके अठराशे त्र्यायशी।। प्लवनाम संवत्सर वैशाख मासी अधिक जेष्ठ मास शुक्ल पक्ष दशमीस गुरुवार दशहरास संपूर्णग्रंथ झाला असे।। सिद्धराज माणिक प्रभू चरणी।। बाळ प्रमाण्ये प्रेमा करूनी।। ग्रंथ समर्पण केले असे।। शुभं भवतु।।

प्रतलेखक नाव दिले नाही.

६७७ क्र. १३ **पंचीकरण** शिवराम

आ. २४ × १७ सें. प्र.पा.ओ. ८. पृ. १८ × २. अक्षर मध्यम. प्रथमची २ पाने कोरी. आचार्यांच्या पंचीकरणाचे विवरण.सं. ग्रंथ गद्य स्वरूपाचाच आहे. ही शिवराम कवीची रचना आहे.

लेखनकाल आणि प्रतलेखक अज्ञात. या रचनेच्याशेवटी रंगीत चक्राचे एक चित्र दिले आहे. पंचीकरण **चक्रमाळा**सह असलेली ही एक विशेष प्रत आहे. आरंभीच शिवरामाचा उल्लेख आहे :

श्रीगणेशाय नमः।। श्री सरस्वत्येय नमः।। अथ शिवरामकृत पंचीकरण प्रारंभः।। श्री सच्चिदानंद रूपाय।।

६७८ क्र. १४ **प्रकाशदीप** मृत्युंजय

आ. २४ × १७ सें. प्र.पा.ओ. ९. एकूण प्र. ४. अक्षर खूप मोठे. वरील पोथीसोबत हा भाग. सं.

प्रारंभ :

म्हणोनि तुझे तुज स्तवन।
करिता उजळे ज्ञान।। प्रकाशे विधान।।
स्वस्वरूप।।३।।

शेवट : भक्ति ज्ञान विरक्ति।। तनु मने श्रीगुरुची चिती।। तयाचीच होय प्राप्ती।। यश दुर्लभ।।४०।। ज्ञानंजन बेचाळीस ओव्या।। बोलीला मृत्युंजया।। भावे वाचिता विजय।। होय त्रैलोकी।। इति श्रीज्ञानांजन संपूर्णम।। ही मृत्युंजय स्वामीची रचना असून मी लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात. प्रकाशदीपाचेच नाव ज्ञानांजय असे पण दिलेले आहे असे वाटते. शीर्षक प्रकाशदीप असेच आहे.

६७९ क्र. १५ **जीवनमुक्त** मृत्युंजय

आ. २४ × १७ सें. वरील पोथीबरोबरच ही रचना आहे. अक्षर खूप मोठे. लेखन स्वच्छ. प्र. ५ सं.

आरंभी : जीवनमुक्त महावाक्य बोध प्रारंभ।। साधन चातुष्ट्य संपत्र साधक जे असतील त्या कारणेस हा वाक्य सागर बोध करुनि हेतु महावाक्ये।।

शेवट : बोधा वाचून आत्मज्ञान होत नाही. या कारणे महावाक्य बोध बोलिजे जो महावाक्य म्हणजे तत्त्वमसीचे ज्ञान हा जीवनमुक्तता केली हेचि पाहत राहावे म्हणजे जीवन आपणिची होता.

ही गद्यात्मक टीका आहे.

इतिश्री जीवनमुक्त पंचप्रकरण समाप्त।। ही मृत्युंजयाची रचना आहे. काल दिला नाही.

६८० क्र. १६ **पवनविजय** मृत्युंजय

आ. २४ × १७ सें. वरील रचनेबरोबरच ही रचना आहे. अक्षर मोठे-स्पष्ट. काळी शाई. कागद जाड.

प्रारंभ : श्रीगुरु दत्तात्रेय नमः।। सरस्वतेय नमः।। दत्तात्रेयवाच ब्रह्मानंद श्रीगुरु।। श्री... नंदने नमः।। दत्तात्रेय वाच।। कवन मन।। कवन पवन।। कवन शब्द।। कवन प्राण।। कवन ब्रह्म।। कवन हासे काळ।। कवन शून्य।। कवन जीव।। कवन निरंजन।। श्री दत्तात्रेय अविनास वाचा।।१।।

शेवटी : हेच ज्ञानत्व।। समस्ता भूतना परमेश्वर परब्रह्म।। भ्यतरा साक्षीसे आत्मा।। सर्वास बीद ब्रह्माइति मृत्युंजय।। आज्ञानसित्ध नागेश प्रछनीश्वये।। संपूर्णमस्तु।।छ।। माणिक।। माणिक।। माणिक।। पुढील पाने सर्व कोरी..

या रचनेत काल व प्रतलेखक निर्देश नाही. मठातील शिष्याने केलेली मृत्युंजय स्वामींची रचना.

६८१ क्र. १७ **शरीरज्ञानचक्रमाला**

आ. २४ × १७ सें. वरील मोठ्या वहीतच ही रचना. अक्षर सुटसुटीत खूप मोठे. विविध चित्रे, आलेख यासह विषयाचे विवेचन-सर्व चित्रे रंगीत, ठळक असून, त्या खाली चक्रनाम व विवरण. सं.

आरंभी : श्री गणेशाय नमः।। पूर्ण परब्रह्म परमात्मा गुणातीत सर्वांतर।। समस्त रूप नटला परिता पूर्ण अक्षर अनादि अनंतु ईश्वर।। त्या पासुन सकळ ब्रह्म माया येणे संयोगे क्षरला।।

पुढील विवेचन रंगीत चित्रासह त्या त्या चित्राखाली टीप. "हे शून्यचक्र, गुरुमंडळ, सहस्रदल, ब्रह्मरंध्र, अर्धकपाट, नादचक्र, सभावी जीवन कळा।। (सत्रावी कळाचे विवेचन घोडा व मोर याच्या संयुक्त चित्राने) दशदल, क्रमीधराचक्र, भ्रमरगुंफा, अग्निचक्र, चक्षुचक्र, त्रिवणीनासिका देहांती उकार, लोळीचक्र, जिव्हाचक्र, हिजिव्हा, तुर्मार्गचक्र, अधोमुख कुंडली, लिंगस्थान, आधारचक्र, मगरीचक्र, मुंडाचा, मनचक्र, हृदय कमळ, ऊर्ध्व कुंडली, त्रिकोणचक्र, गुदस्थान, योनीचक्र, कर्मचक्र, नाभिकमळ, द्वादशचक्र, सूर्यमंडळ, चंद्रकमळ, मूत्रस्थान, मलस्थान, स्वरूपज्ञान, विशुद्धचक्र, रत्नकंदन, अनुहतचक्र, कामाक्षादेवी, मगरीचक्र, गंध कोठरा इ. एकूण ४५ ठळक रंगीत चित्रे आहेत. काही चित्रे आकर्षक व कलेच्या दृष्टीने पण अपूर्व ठरावीत, अशी आहेत.

शेवटी : इतिश्री शरीर ज्ञानचक्रमाला संपूर्णम।।छ।।

यात मूळ रचना कुणाची, प्रतलेखक वा काल याबद्दल कोणतीही नोंद नाही. या प्रचंड बाडाची पुढील २०० पाने पूर्ण कोरी आहेत. या मठात संस्कृतग्रंथ विपुल आहेत.

६८२ क्र. १८ **बाड**

आ. ३३ × २१ सें. पृ. ६६ × २. प्र.पा.ओ. ९. हे लेखन बोरूच्या साह्याने जाड अक्षराचे आहे. शाई गडद काळी. कागद-पांढरा जाड. या संकलनात प्रचंड बाडाचा भाग असावा. यातील रचनेत रामाची पदे, आणि वेदांतपर कवन असून, संप्रदायात म्हटली जाणारी रचना दिलेली आहे.

६८३ क्र. १९ **बाड**

आ. ३३ × २१२ सें. पृ. ३२ × २. प्र.पा.ओ. ९. हे बोरूने केलेले लेखन. अक्षर खूप मोठे आणि सुटसुटीत. यावर शीर्षकात सिद्धराज पदे असा उल्लेख आहे. पृष्ठ क्रमांक ५२४ ते ५६२ असे आहेत. मोठ्या बाडाचा हा भाग आहे. ही अर्वाचीन प्रत वाटते. यावर शक १८९१ असा दिला असून, माणिक शक १५२ नमूद केला आहे. या बाडाचे लेखन माणिक जीवन कुलकर्णी यांनी केलेले आहे.

६८४ क्र. २० **बाड**

आ. ३३ × २१ सें. पृ. १४०. अक्षर मोठे, बोरूने लिहिलेले. कागद पांढरा-जाड. यात या पीठाचे मनोहर माणिक प्रभू यांची रचना आहे. एकूण ६८ पदे यात आहेत. रागातालांचा आवर्जून उल्लेख आढळतो. संप्रदायाची महत्त्वाची रचना. यात सरस्वती, शंकर, कृष्ण, यांच्यावरील विविध पदे, हिंदुस्थानी दोहरे, उर्दू कवन, कन्नड पदे, प्रत्येक रचनेत रागतालांचा आवर्जून उल्लेख. पीठाच्या दृष्टीने परंपरेतील विपुल पद्य रचना.

६८५ क्र. २१ **माणिक प्रभूचरित्र** रामचंद्रबुवा

आ. २१ × ३२ सें. पृ. ४१४ × २. प्र.पा.ओ. २१. अक्षर बारीक. शाई निळी. कागद साधारण. एक मोठी बांधीव वही. बेळगावच्या गोरक्ष संस्थेचे १९२१ सालचे एक मोठे रजिस्टरच उपयोगात आणलेले. विरुद्ध बाजूच्या प्रथम पानावर हाताने काढलेले गायीचे चित्र व गोरक्ष असे लिहिलेले. त्या भागात त्या संस्थेचा शिक्का अनेक ठिकाणी. शेवटची २०० पाने कोरी.

शेवटी : गद्य चरित्री उल्हास।। सोलापुरकरे दाविला विशेष।। तोचि विवरुनि रामवदास वर्णि विशेष ओव्यामधी।।१३६।। इतिश्री प्रभुचरित्र सुधा।। जीवनदायक होईली बुधी।। सोलापूरकर रामवरि आनंदा।। ही कथा वित्पदा वर्णिली।।१३७।। एका रामचंद्रबुवा भक्ताने केलेली ही रचना आहे. लेखनकालनिर्देश वा मूळ रचना केव्हाची आहे याचे वर्णन नाही. या लेखनात प्रथम केलेली प्रार्थना :

हाचि वर द्यावा गणेशा।। करुनि ममहृदयी निवास।।
प्रभुचरित्र वदयाची आशा।। पूर्ण करावी दातारा।।५।।

संप्रदायाच्या दृष्टीने अनेक प्रसंग विशद करणारी रचना महत्त्वाची ठरावी. प्रत १९२१ नंतरची आहे हे स्पष्ट होते.

६८६ क्र. २२ **माणिक प्रभू चरित्र**

आ. ३१ × २० सें. पृ. ७५८ × २. अक्षर नेटके - खूप मोठे. बोरूने केलेले लेखन. गडद काळी शाई. पांढऱ्या कागदाची सुव्यवस्थित बांधलेली वही. प्र.पा.ओ. ६ ते ८. यातून एकूण २७० पदांतून चरित्र गुंफलेले आहे. ही अर्वाचीन प्रत असून, याचे लेखन निज चैत्र प्रतिपदा शके १८८६ रोजी केलेले आहे, असा निर्देश आहे. प्रतलेखक अज्ञात. अक्षर प्रथमपासून शेवटपर्यंत एकाच पद्धतीने ठळक व सुवाच्य.

६८७ क्र. २३ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. २३ × १६ सें. पृ. ४८५ × २. प्र.पा.ओ. १२. ओ. ७१९२ अ. ५१. त्रु. अक्षर साधारण. प्रथमचा एक अध्याय आणि अध्याय २ प्रथमची ४ पाने नाहीत. कागद जीर्ण झालेला आहे. पोथीच्या १६ व्या पृष्ठापासूनचा भाग आहे.

शेवटी : शके १७९६ भाव नामब्दे उत्तरायणे भीष्म रुतौ आषाढ अधीक मासे कृष्ण पक्षे एकादश्या गुरुवासर तृतीय प्रहरे विदुर नगरस्थ मुडगेयुर्पनामक अणंभट्टात्मज भाऊ भट्ट सुत गोविंद शर्मणा गुरुचरित्र पुस्तक लिखित स्वार्थ परार्थच इदं पुस्तकं सदभक्त गोविंदराज महाराजस्य श्री. गु. छ।।छ।। दत्तात्रेयार्पणमस्तु।।छ।।

६८८ क्र. २४ **मूळस्तंभ**

आ. १६ × ११ सें. प्र.पा.ओ. १०. पृ. ४६. सं. अक्षर साधारण. काळी शाई. कागद जाड. प्र. ७. ओ. ४११.

आरंभ : श्री गणेशाय नमः।। तो वंदिन परमेश्वरा आदि पुरुष।।१।।

शेवटी : अनुभव मनी आला। ज्ञानबोध जाला।। भ्रांति पडदा फाटला।। स्वामिचेनि बोधे।।५१।। संपूर्ण जाला सिवनीबधु।। ईश्वर पार्वती संवादु।। हा सीव निबधु।। येथुनि जाला।।५२।। इतिश्री मूळस्तंभ ईश्वरपार्वती संवादे दत्तात्रेय अवधूत अनुवादे सप्तमोध्याय गोड हा।।५३।।

टीप : मूळस्तंभ स्तोत्र पठण करा। राम सुमुरारे गोविंद गोपाळ रे नारायण रे हारा रे र रामात्वर जरे।।छ।।

मूळ रचना कुणाची व प्रतलेखकाचे नाव दिले नाही. प्रतीचा काल पण दिलेला नाही.

६८९ क्र. २५ **गुरूचरित्र** माणिकदास

बाडातील पद रचना. पदे २. ओ. ७ + ११. दत्त संप्रदायाच्या दृष्टीने महत्त्वाची रचना. सं. पहिल्या पदात दत्तावतार श्रीपाद श्रीवल्लभ चरित्र दिले असून, दुसऱ्या पदात श्रीगुरू नृसिंह सरस्वती चरित्र गोवलेले आहे. या पदात झिंझोटी, दीपचंद धुमाळी असा रागतालाचा उल्लेख आहे. शेवटच्या पदातील शेवटचा भाग :

ज्याचा जैसा भाव त्यासी तैसा तूं पावसी॥

इच्छिले पदार्थ देसी तूंच या जगासी॥ पडतां संकट स्मरता त्वरित निवारिसी॥ मज कारे स्वामी तू आता कठोर झालासी॥ धावधाव दत्ता नरसिंहा किती अंत पाहासी॥ माणिक दिनासी तारि तू धरूनी पोटासी॥१॥

६९० क्र. २६ **नवरत्नहार** मनोहर प्रभु

बाडातील रचना पद, अष्टक स्वरुपात. संस्कृत १७ आणि मराठी १६ ओव्यांची ही रचना. याला ही रागताल दिले आहेत. सं.

आरंभी : भक्तपालकादैन्य नाशका॥ पापहारका जगन्नायका॥ अनंतकोटी ब्रह्मांडनायका॥ नुपेक्षी मला दत्त माणिका॥१॥

शेवटी : मनोहरात्मजा कल्याणकारका॥ प्रगटिसी स्वये दत्त माणिका॥ बहुत तारिले पदरजःकणी॥ रक्षि मनोहर रूप दावुनी॥८॥

आणखीन एका रचनेत शेवटी :

भुवन सुंदरा मनोहरा। भक्त कामनापर विसत्वरा॥

ध्यानकारका ब्रह्मरूपका॥ मानसी सदा॥८॥

६९१ क्र. २७ **व्यंकम्मा पंचपदी** मार्तंड प्रभू

परंपरेतील रचनेत व्यंकम्माच्या नावे ही पंचपदी पाच पदाची असून, एकूण ओव्या १७ आहेत. यांनाही रागतालांचा उल्लेख आहे. सं. मार्तंड प्रभूकृत ही पीठाची रचना आहे. यातील एका पदाचा शेवटचा भाग :

शब्द रूपरसगंधाभोगुनि॥ स्वरूपी चित्त असंगा॥२॥

श्रीव्यंका जल माणिक जलधी॥ चिन्मार्तंड तरंग॥३॥

६९२ क्र. २८ **महामंत्र** मार्तंड प्रभू

ही आर्या रचना मार्तंड प्रभूंची आहे. एकूण ओ. २२. सं. प्रत्येक आर्येच्या रचनेतील आद्यअक्षर घेतल्यास 'श्रीगुरू माणिक जय गुरू माणिक जयजय माणिक' हा मंत्र तयार होतो. यामुळे या आर्या रचनेस महामंत्र असे शीर्षक दिलेले आहे. शेवटी फलश्रुती दिली आहे :

तन्नाम ग्रहण करी जो त्यासी सुखे निर्विकल्पि नांदवितो॥२०॥ मनन करी स्तोत्र जो, श्रद्धेने त्या मिळेल गुप्तपथ॥ अनृत वदोतरी स्तोत्रा हो का निर्दय तो प्रभु आम्हास ही शपथ॥२१॥ ज्ञानरूप मार्तंडस्फूर्ती ही निज सुखांत अवतरली॥ निश्चित जनक पाहुनि सद्भक्ताते स्वंयकरे वरिली॥२२॥

६९३ क्र. २९ **प्रभु चरित्र** मार्तंड प्रभु

हे एक श्लोकबद्ध चरित्र रचलेले आहे. यात एकूण श्लो. ९. संप्रदायाची महत्त्वाची रचना.

प्रारंभ :

श्री दत्तात्रेय रामतीर्थ नगरीगर्भात आले पहा॥

माता देवि बया, मनोहर पिता, लाडाख्य सिद्धाचिया॥

ग्रामी बाल चरित्र दावुनि जना कल्याण क्षेत्रासिये॥

तो हा दत्तप्रभु निजात्म भुवनी माणिक क्षेत्री वसे॥१॥

शेवटी : जे का बद्ध सुभक्त मुक्त असती या अष्टका वाचिती॥ होती दिव्यतनु अनेक विभवानंदी सुखे डोलती॥ नासोनी तम, ज्ञान पुंजवर जी मार्तंड तो सर्वदा॥ भासे होवुनि निर्विकल्प प्रभु हा नोहे कधी आपदा॥९॥

६९४ क्र. ३० **उपदेश रत्नमाला** मार्तंड प्रभु

ही १५ ओव्यांची रचना. संप्रदायाच्या उपासनेत महत्त्वाची.

शेवटी वर्णन :

धन्य माता धन्य पिता॥ धन्य उपासना धर्मदैवता॥

जो आदरी या सकल मता॥ तोचि धन्य धन्य॥१४॥ स्वरूप प्रकाश आनंद चैतन्य॥ शिष्य गुरू मी तू पण॥ सर्वरूपे हा श्रीप्रभुजाण॥ म्हणे ज्ञान मार्तंड॥१५॥

६९५ क्र. ३१ **बाड**

यात विविध स्फुट पदे, आरत्या व भजन दिले आहे. ही रचना चाळकापूर मादती, संगमेश्वर, रेवणसिद्ध बलक प्रभू, वीरभद्र : याप्रमाणे पंचपदी आहे. प्रत्येक दैवताचे पद भजन, अष्टक आणि शेजारती, शेवटी श्रीहरी व केशव षट्क रचना. एक कानडी रचना. नित्योपचाराकरिता ही रचना.

६९६ क्र. ३२ **माणिकनगर क्षेत्र माहात्म्य**

(के.ग्रं.अ.नों.पा.) ही रचना संस्कृत व मराठी भाष्य या

क्रमाने आहे. गुरू शिष्य संवादातून क्षेत्राचे व तीर्थाचे माहात्म्य वर्णन केलेले आहे. दोन अध्यायांतून विवेचन. नित्ययात्रा निरूपण व पंचकोश प्रदक्षिणाकार यात्रा असे दोन अध्याय असून, एकूण ओवी संख्या - ४७ + ३८ अशी ८५ ओवींची आहे. प्रतलेखक व कालनिर्देश नाही. संप्रदायाच्या दृष्टीने ही रचना महत्वाची. क्षेत्राची पूर्ण माहिती.

६९७ क्र. ३३ **मल्लारीमाहात्म्य** माणिकदास

(के.ग्रं.अ.नों.पा.) एकूण अ. २२. ओ. १९२. सं.

आरंभ : कैलास मेरुचे शिखरी।। पार्वती शिवासी प्रश्न करी।। म्हणे स्वामी पृथ्वीवरी।। पुनित तीर्थ कोणते।।२।।

शेवटी : कलियुगी तया सारिखा।। दुजा देव नाही देखा।। सनत्कुमार ऋषीलोका।। पार्वतीशी सांब सांगे।।१२।। इतिश्री क्षेत्रखंड ब्रह्मांड पुराण मल्लारीमहात्म्य व्यास कथन।। त्यातील सारांश प्राकृत भाषण।। माणिकदास बोलि असे।।१३।। मल्लारि वाक्य मूळ प्रसाद महात्म्य वर्णनो नाम द्वाविशतिनमोध्याय गोड हा।।२२।। शुभं भवतु।। श्री मार्तंड भैरवार्पणमस्तु।।

निदर परिसरातील मणिचूल पर्वतावरील मल्हारीक्षेत्र मैलार देवताचे वर्णन. या रचनेत लेखनकाल दिलेला नाही.

६९८ क्र. ३४ **हनुमंतजन्म** माणिकदास

(के.ग्रं.अ.नों.पा.) ही माणिकदास यांचीच रचना आहे. अ. ४. ओ. ८९.

वाल्मीकी नाटक यातील ही प्राकृत टीका. सारांशरूपाने आहे, असे कवी नमूद करतात.

आरंभी : आता वंदू श्रोते सज्जनी।। आणि विच क्षण चातुर्यखाणी।। मी दास तुमचा अज्ञानी।। माझे गुणदोष न प्हावे।।३।। अशुद्ध बोले नित्क्षीम बोलिले असे हनुमंत जन्म।। या ग्रंथाची अभिमानी बलभीम।। सत्य सत्य त्रिवाचा।।४।।

शेवटी : वज्रन बाध म्हणे अमर।।। यम म्हणे काळ दंड नसे यावर। रसपति म्हणे सत्वर।। शक्तिहीन कधी न होय।।२१।। समस्त देवे दिधले वरदान।। माळा दिधली विश्वकर्म्याने।। वायु आणोनि बालकालागून।। ठेविता जाला अंजनीपासी।।२२।। इतिश्री हनुमंत जन्मकथन।। वाल्मीक नाटक रामायण।। त्यातील सारांश प्राकृत भाषण।। माणिकदास बोलिला असे।। चतुर्थोध्यायः।।४।। रचनेत काल दिलेला नाही.

६९९ क्र. ३५ **संगमेश्वर माहात्म्य** माणिकदास

(के.ग्रं.अ.नों.पा.) ही माणिकदास पीठाधीशांची रचना आहे. यात अ. ५. ओ. १३८.

निदर परिसरातील संगमेश्वर स्थानाचे हे आख्यान आहे. केवळ याच स्थानात ईश्वरास केवडा पूजेमध्ये चालतो. केतकीसंगम असे पण म्हणतात.

आरंभी : श्रोते ही कथा ऐका बरी।। संगम महात्म्य कवणेपरी।। श्रवण मात्रे होय दुरी।। अनंत जन्मीचे पातक।।२।। अहो कोणी एक्या काळी।। नैमिष्यवती ऋषी मंडळी।। हरिश्चंद्र राजाच्या स्थळी।। यज्ञ पहावया पातले।।३।।

शेवटी : इच्छिले सिद्धार्थ जाण।। करावे अकरा अवर्तन।। तो मनोदय होतसे पूर्ण।। इच्छिलेले मानवाचे।।१८।। जो हे नित्य एकाग्र मनाने।। श्रवण करविती जाण।। भक्तिविरक्त ज्ञान होऊन।। देहांतीमुक्ति होय।।१९।। इतिश्री ब्रह्मांड पुराण।। हरिश्चंद्र सुतसंवाद जाण।। ते संगमक्षेत्र महिमान।। प्राकृत भाषेत माणिकदास बोलिला असे।।२०।। संगमेश महात्म्य पंचमोऽध्याय।।०।।

७०० क्र. ३६ **माणिक प्रभू सहस्रनामावली**

(के.ग्रं.अ.नों.पा.) माणिक प्रभू पीठाच्या उपचारातील ही सहस्रनामावलीची रचना आहे. १००८ नावे. पारायणाच्या दृष्टीने. शेवटी रचनाकार नाव दिलेले नाही. काल नाही.

७०१ क्र. ३७ **अष्टोत्तर शतनामावली**

वरील रचनेबरोबरच ही पूजेत उपयोगी पडणारी अष्टोत्तर नामाची रचना आहे. १०८ नावे संपल्यावर खालील उल्लेख आढळतो.

इतिश्री मन्माणिकानुजनृसिंह तनुज मनोहर मुनिवर्य विरचित अष्टोतर शतनामावली समाप्त।।

रचनेचा कालनिर्देश केलेला नाही.

७०२ क्र. ३८ **देवीअष्टोत्तरनाम**

वरील रचनेसोबतच देवीच्या १०८ स्थानांतील दैवताचा उल्लेख असलेली ही नामावली दिलेली आहे. पीठात पूजेत येणाऱ्या शक्तिपीठांची नावे यात आहेत. रचना पीठपरंपरेतील कुणाची तरी असावी. नामनिर्देश व काल नाही.

आरंभी शीर्षकाखाली : ।। श्री महाकाली महासरस्वती महालक्ष्मी श्री जगदंबाये नमः।। असे लिहिलेले आहे.

७०३ क्र. ३९ **बाड** मार्तंडमाणिक

मार्तंड माणिक प्रभू यांच्या पदांचा हा संग्रह. सोमवार व

गुरुवार भजनाची पदे. एकूण ११ पदांचा हा संग्रह आहे. यात विविध रागतालांची योजना असलेली रचना.

७०४ क्र. ४० **सातवारांचे भजन** माणिकदास

(के.ग्रं.अ.नों.पा.) या सात वारांच्या संकलनात गुरुवारपासून आरंभ केलेला आहे.

गुरुवार : १२ पदे, शेजारती, अष्टक, ६ भजन.

शुक्रवार : ६ पदे, भजन ६, अष्टक, शेजारती.

शनिवार : पदे ५, अभंग ११, शेजारती, भजन १४.

रविवार : पद १, अभंग ११, शेजारती, अष्टक,भजन १३.

सोमवार : पदे ६, भजन ७, शेजारती, अष्टक १ आरतीचे ६ धृपद.

मंगळवार : पदे ६, भजन ६, शेजारती, अष्टक इ.

बुधवार : पदे ६, अष्टक २, शेजारती, भजन ६ या संपूर्ण रचनेत रागतालांचा उल्लेख आहे. रचनाकाल नाही. सर्व रचना माणिकदास सत्पुरुषाची आहे.

७०५ क्र. ४१ **आरत्या**

(के.ग्रं.अ.नों.पा.) या संकलनात अनेक दैवतांवरील विविध व विपुल आरत्या आहेत.

गणपती, राम, व्यंकटेश. हनुमंत, मूळलिंग, घृतमारी, खंडेराय, वीरभद्र, सांब, देवी, पांडुरंग, दत्त, गुरू, निर्विकल्प माणिक व शेवटी २ अष्टक आहेत. एकूण १४ आरत्या यात आहेत. बहुतेक रचना माणिकदास यांचीच आहे. सर्व रचनेत रागताल यांची टीप आढळते. नित्य नैमित्यिक पूजा-उपचारात मठात उपयोगात येणारी ही रचना आहे.

७०६ क्र. ४२ **गुरूसंप्रदाय** मार्तंड

(के.ग्रं.अ.नों.पा.) संप्रदायाच्या व पीठाच्या दृष्टीने महत्त्वाची रचना ठरावी. या रचनेत एकूण अ. ५. सर्वच अध्याय छोटे छोटे आहेत. ओ. ७२.

प्रारंभ : श्रीगुरू माणिक प्रभुः प्रसीदतु।। ॐ नमोजी निर्विकल्पा।। नमो नमोजी स्वस्वरूपा।। जय जय हो सद्‌गुरू भूपा।। सकलवर्या।।१।। जय जयाजी निष्कलंका।। संशयज्ञानहारका।। अनादि विश्वतारका।। स्वतःसिद्धा।।२।।

शेवटी : हा गा गुरूसंप्रदाय क्रम।। प्रेमे वाचतील नित्यनेम।। भागोनि इह सुख गुरुपर ब्रह्म।। साक्षात्कार होईल गा।।१५।। इति श्रीगुरू संप्रदाय।। विश्वासे जरी रत होय।। सापडे परम सुखाची सोय।। मनोहर दीन मार्तंड म्हणे।।१६।। इति श्रीगुरूसंप्रदाय क्रमे पंचमोध्याय।।५।।

७०७ क्र. ४३ **श्री ज्ञानमार्तंड** कुलकर्णी

(के.ग्रं.अ.नों.पा.) मठातील एक भक्त कुलकर्णी मास्तर यांनी सकलमताचे संपूर्ण तत्त्वज्ञान ग्रंथित केलेला हा ग्रंथ पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा दोन खंडांतून आहे.

प्रारंभी : प्रास्ताविकात अमृत विचारमंथन व सांप्रदायिकांना सूचना याचे विवरण आले आहे.

पूर्वार्धात : अनुबंध चतुष्ट्य, साधनसंपत्ती, महावाक्य, आत्मस्वरूप, पंचीकरण, मुक्ती, मन, एकजीव वाद, दृष्टी सृष्टी, संप्रदाय, सकलमताचार्य बिरुदावली, ज्ञान, राजयोग, स्वप्न, मृत्यू, ब्रह्मस्वरूप याचे विवरण आहे.

उत्तरार्धात : दतस्वरूप, मुक्तांचा मायिक जन्म, जडाजड विभाग विचार, अभ्यास, सिंहावलोकन अशी प्रकरणे आहेत. संप्रदायाच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा ग्रंथ. अनेक ग्रंथांचे दाखले देत विषयाचे विवेचन केलेले आहे. सकलमत संप्रदायाची थोरवी नमूद केलेली आहे. हा ग्रंथ गद्यामक असून, यात लेखनकाल दिलेला नाही.

७०८ क्र. ४४ **मुक्तानंद लहरी**

(के.ग्रं.अ.नों.पा.) ही एक छोटीच रचना पण मठ परंपरेतील महत्त्वाची आहे. यात केवळ ६ श्लोक आहेत.

प्रथम :

जगीपाहे नामकृति पुरुष अती सुंदर स्त्रिया।।
सुवेषी आभरणें नटति परिते चित्रचि तथा।।
स्वये साक्षी क्रिडा करित असता आणि रमता।।
मुनी तो मोहेना निजगुरुकृपे ज्ञान पदवी।।१।।

शेवटी : मौना मौन दिसे गुणीत गुणी हा पंडिति पंडित सा।। दीनादीन दिसे सुरळीत सुखी हा भोगीत भोगी दिसे।। मूर्खी मूर्ख असा स्त्रियां तरुणसा वक्त्यासि वक्ता दिसे।। तो हा धन्य जगी सुखी त्रिभुवनी जो अवधूतावधूत।।६।। ही रचना पीठावरील कुणाची आहे, याचा निर्देश नाही. वर्णन माणिक प्रभूंचेच आहे. रचनाकाल पण दिलेला नाही. संप्रदायाच्या दृष्टीने ही रचना महत्त्वाची आहे.

७०९ क्र. ४५ **पद्यमाला**

(के.ग्रं.अ.नों.पा.) श्री माणिक प्रभू महाराज परंपरेतील

विपुल आणि विविध पदे. यात सर्वच पदांना रागतालांचा उल्लेख मराठीतील भजनास रागतालांची साथ देण्यात माणिक प्रभूंचे कार्य अजोड असे आहे. ते या कार्यातील सर्वप्रथम रचनाकार आहेत. संप्रदायाच्या दृष्टीने सर्व महत्त्वाच्या पदांचा संग्रह. हीच पदे अनुयायी व मठ आणि भक्तामध्ये प्रचलित आहेत. यात सद्‌गुरू माणिक प्रभू, मनोहर प्रभू आणि मार्तंड प्रभू यांची समग्र रचना आहे.

७१० क्र. ४६ **उपासना मार्तंड**

(के.ग्रं.अ.नों.पा.) या पीठाचे एक सर्व संकलन केलेले साहित्य. यात सातवार भजन, नित्यकर्म, पंचरत्न गीता, प्रभुनामावली, माहात्म्य, क्षेत्रवर्णन असा प्रथमचा भाग असून दुसऱ्या भागात सर्व संस्कृत रचना, गंगा, माणिक्यसूक्त, षोडशपूजा, मानसपूजा, अपराधक्षमास्तोत्र, माणिकाष्टक, सहस्रनाम, राजोपचार, व्यंकमादेवी, कुंकुमाष्टक स्तोत्र इ. रचना. त्यानंतर हनुमान, संगमेश्वर, मल्लारीचे साहित्य. स्फुट वेचक रचना.

आरंभी संप्रदाय मुख्य दैवत चैतन्यदेव (आत्मदेव) याचे विवेचन. संप्रदायाचे वैशिष्ट्य कथन.

हे अर्वाचीन संकलन असून, शक १८७८ इ. स. १९५६ श्री माणिक प्रभू शक १३९ दिला आहे. संकलनाच्या मुख्य पृष्ठावर ।। जय जय हो सकलमत विजय हो।। असे ब्रीदवाक्य दिलेले आहे.

वे. मोहनभट अणंभट जोशी संग्रह

७११ क्र. १ **दासबोध** समर्थ रामदास

आ. २० × १० सें. प्र.पा.ओ. ९. अक्षर बारीक. २० दशक संपूर्ण. कागद साधारण. काळी शाई. प्रतलेखक आणि काल निर्देश नाही. ग्रंथाची स्थिती चांगली.

७१२ क्र. २ **सोळा सोमवार कथा**

आ. १६ × ११ सें. प्र.पा.ओ. १०. पृ. १० × २. अक्षर मोठे. कागद जाड जीर्ण. सं.

शेवटी : इति श्री व्यासरचित सोळा सोमवार कथा संपूर्ण श्रीगुरुनाथार्पणमस्तु।।

शके १७९९ प्रवर्तमाने ईश्वरनाम संवत्सरे उत्तरायणे शैशरुतौ फाल्गुन मास शुक्ल पक्षे दशम्या भार्गविवासे तीन प्रहरे सोळा सोमवार कथा संपूर्णम् ।। श्री सांबसदाशिवार्पणम्।।छ।। प्रतलेखकाचे नाव दिलेले नाही.

७१३ क्र. ३ **व्यंकटेश कथा**

आ. २१ × १० सें. प्र.पा.ओ. ९. पृ. ४ × २. त्रु. शेवटची पाने गहाळ.

प्रारंभी : श्री गणेशाय नमः।। श्री व्यंकटेश कथा प्रारंभ।। नमन करून व्यंकटेश प्रभूस।। निजनिमिप विलासे जो स्वीक्षि प्रभुते।।

प्रतलेखक व काल आणि मूळ रचना कुणाची हे कळत नाही.

७१४ क्र. ४ **पंचांग**

आ. १५ × ५ सें. पृ. १४ × २. प्र.पा.ओ. ८. अक्षर अत्यंत बारीक. कागद जाड. गडद शाई. शके १७७४ चे पंचांग. या घराण्यात १०० वर्षांची पंचांग परंपरा. त्यातील वानगीदाखल घेतलेली प्रत. बाळंभट्ट श्रीपतीचे लेखन. (१४४ वर्षांपूर्वीचे)

७१५ क्र. ५ **पंचांग**

आ. १८ × ६ सें. पा. १६ × २. प्र.पा.ओ. ८. वरीलप्रमाणेच सुंदर हस्ताक्षरातील पंचांग. याचा काल १७८३ चा आहे. बाळंभट श्रीपतीकृत (१३५ वर्षांपूर्वीचे).

७१६ क्र. ६ **संगीत श्रीयाळ नाटक**

आ. २१ × ८ सें. पा. १६ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर मोठे. जांभळी गडद शाई. कागद जाड तपकिरी. शीर्षक 'संगीत श्रीयाळचरित्र नाटक' आरंभीच्या पानावर १ ला असे शीर्षक. एका पानावर क्रमांकासह पात्रांची नावे. अधूनमधून पदे रागतालासह आणि संवाद. लेखनकाल व प्रतलेखक नाव नाही. लेखन सुटसुटीत.

७१७ क्र. ७ **कोकशास्त्र**

आ. २१ × ८ सें. प्र.पा.ओ. १२. अक्षर साधारण. वरील पोथीसोबत ही प्रत. पा. ३२. कोकशास्त्राचे विवेचन वेगवेगळ्या शीर्षकांसह. अनेक कोष्टक आणि तख्ते दिले

आहेत. शाई काळी व जांभळी गडद. कागद तपकिरी जाड. शेवटी रामचंद्र गुरुनाथ जोशी कलबुर्गीकर असे नाव मोडीमध्ये.

७१८ क्र. ८ **मूळ स्तंभ**

आ. १२ × १७ सें. प्र.पा.ओ. १५. अक्षर बारीक. अ. ७. सं. कागद जाड. पृ. २६ × २.

शेवटी : कानामात्राक्षेमा करावी वाचीजे या श्रोते जन क्षेमा करावी।।

सन १२५५ फसली. ता छ।।१२ मोहरम रोज यैतवार तृ. प्रहर दिवस।। (हा काल इ. स. १८४५ चा येतो.) प्रतलेखक नाव नाही. कालनिर्देश मोडी लिपीत आहे.

७१९ क्र. ९ **रामविजय** श्रीधर

आ. २४ × १६ सें. प्र.पा.ओ. १३. पा. २६ × २. त्रु. अक्षर साधारण. कागद जाड. प्रथमची पाने आहेत. ६ अध्याय पूर्ण.

७२० क्र. १० **रुक्मिणी स्वयंवर**

आ. ३३ × २१ सें. प्र.पा.ओ. १८. अक्षर बारीक. अ. १८ पूर्ण. कागद जाड. लेखन रेखीव. प्रत्येक चरणास लाल दंड रेषा. दोन्ही बाजूंस लाल रेघा. शेवटचे पान जीर्ण. प्रतलेखक आणि काल दिला नाही. ग्रंथाची स्थिती चांगली.

७२१ क्र. ११ **विवेकसिंधू** मुकुंदराज

आ. २३ × १५ सें. प्र.पा.ओ. १६. पा. ९५ × २. अ. १८. सं. अक्षर साधारण. समासविरहित सर्व लेखन. व्यवस्थित असलेली प्रत.

लेखनकाल व प्रतलेखक नाव दिले नाही. मात्र शेवटी लाल शाईत -

श्री दत्तमद सदानंद।। रामानंद तथा अमलानंद गंभीर ब्रह्मानंद--- प्रसादेन गंभीरानंद---

आनंद संप्रदायी परंपरेची प्रत.

७२२ क्र. १२ **स्वर्गारोहण** विष्णुदासनामा

आ. २२ × १६ सें. प्र.पा.ओ. १२. पा. ६० × २ त्रु. प्र. १७. विष्णुदास नामा याचा उल्लेख अनेक प्रकरणांच्या शेवटी आलेला आहे. प्रतलेखक नाव व कालनिर्देश नाही.

७२३ क्र. १३ **शिवलीलामृत** श्रीधर

आ. ३१ × २१. सें. प्र.पा.ओ. १६. पा. ४५ × २. अक्षर रेखीव. प्रत्येक चरणास लाल दंड. यात केवळ ६ अध्याय उपलब्ध. शेवटचा भाग नाही. प्रतलेखक आणि काल नाही.

७२४ क्र. १४ **ब्रह्मोत्तर खंड**

आ. ३१ × २१ सें. पा. १५० × २. अ. १४. प्र.पा.ओ. १६. अक्षर रेखीव. चरणास लाल दंड. दोन्ही बाजूंस जाड तांबड्या रेघा.

शेवटी : शिवलीलामृत ग्रंथ प्रचंड।। स्कंद पुराणी ब्रह्मोत्तरखंड।। चतुर्दश अध्याय अखंड।। येथोनि ग्रंथ समाप्त जाहला।।२१६।।

प्रतलेखक व कालनिर्देश नाही.

७२५ क्र. १५ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. १४ × २५।। सें. पा. ४८३ × २. प्र.पा.ओ. ८. सं. कागद जाड. अक्षर साधारण. गडद काळी. श॥ ई. अ. ५१. ओ. ७५७६. गणपतीचे रंगीत चित्र. वेलबुट्टीने सजावट. त्यानंतर दुसरे चित्र. मध्यभागी विष्णू आणि दोन्ही भागास साधक व साधिका चित्र. यानंतर ग्रंथरचनेस आरंभ. दत्त म्हणजे विष्णू हा अभिप्रेत अर्थ.

प्रथम : श्री महागणपती प्रसन्न।। श्री शारदा सरस्वत्यै नमः।। इष्टदेवता कुलदेवताभ्यो नमः।। श्री म्हाळसा मार्तंड भैरव देवता।। गुरुभ्यो नमः।। श्री गुरुदत्तात्रेय श्रीपाद श्रीवल्लभ नृसिंहसरस्वती।। निर्विघ्नमस्तु।। ॐ नमोजी विघ्नहरा।।... अ. २ वो. २ "भक्तनामांकित."

शेवटी : शके १७८५ प्रवर्तमाने दधिरोनाम संवत्सरे दक्षिणायने वर्षाऋतौ श्रावण मासे कृष्ण पक्षे अद्या चतुर्थ्या भौम वासरे रेवती नक्षत्रे चतुर्थ प्रहरे समाप्तोयें।। इदं पुस्तक कलबुर्गी ज्योतिष कृष्णाभट्टात्मज नरशिभट्ट सुत बालंभट्ट सुत श्रीपतिना लिखितं।।४।। श्रीपाद श्रीवल्लभ मस्तु।। श्री पितृनाथानमोस्तु।। श्री गजानन नमोस्तु।। ७५७६

७२६ क्र. १६ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. २२ × ११ सें. पा. ४१४ × २. प्र.पा.ओ. अ. ५१. स. ओ. ७५७६. अक्षर चांगले. कागद पिवळसर थोडा भिजलेला जीर्ण. आतील एका पानावर आरंभी "श्रीमद् गुरुचरित्र

प्रारंभा श्री दिग् विजई भव'' असे मध्यभागी लिहिलेले ग्रंथनामे. त्यानंतर ३ पाने. फोटोचेवरील वेष्टनाचे पान कलाकुसरीने सजवलेले. त्यामागे चित्र सजावटीस काळी व जांभळी शाई वापरलेली. सिद्ध, श्रीपाद श्रीवल्लभ व नामधारक. तिसऱ्या पानावर एका बाजूस पादुका व श्लोक. नंतर अथगुरुनाथ प्रसन्न।। अथ गुरुचरित्र असे ग्रंथनाम एका पानावर.

प्रारंभ : श्री महागणपतये नमः।। श्री लक्ष्मी व्यंकटेशाय नमः।। श्रीपाद श्रीवल्लभ।।...

अ. २ वी. २ यात नामधारक नाव नाही. भक्त नामांकित ओवी चरणास लाल दंड. दोन्ही बाजूंस लाल रेघा.

शेवटी : ५१ अध्यायाच्या ९२ ओळींनंतर : इति श्रीमन्महा-गुरुचरित्रकामध्ये... सिद्ध नामधारक संवादे श्रीशैल्यास यात्रा अगमनन्नाम यक्कावन्न अध्याय गोड हा।। प्रसंग।। श्री गुरुनाथार्पणमस्तु।। श्री लक्ष्मीव्यंकटेशार्पणमस्तु।। श्रीसित्धविनायकार्पणमस्तु।।छ।।

शके १८०० बहुधान्य नाम संवत्सरे. उत्तरायणे वसंत ऋतौ वैशाख मासे शुक्ल पक्षे अद्याव्दादशाया इंदु वासरे हस्त नक्षत्रे माध्यान्ह समये श्री गुरुचरित्र समाप्तोयं।। इदं पुस्तकं कलबुर्गी ज्योतिष कृष्णंभट्टात्मज नरसिंहभट्ट सुत बाळंभट्ट सुत श्रीपतिन लिखितं।। ओ. ७५७६. जोशी घराण्याचे वंशजानेच केलेली प्रत. (इ. स. १८७८ ची प्रत) स्थिती चांगली.

७२७ क्र. १७ **अथवेदांतविचररहणी**

आ. १६ × ७ सें. पा. ११ × २. प्र.पा.ओ. ५. अक्षर मध्यम. एका बाजूस लेखन. त्यामुळे एका लांब कागदाचे तुकडे घडी घातल्याचे. त्रु.

आरंभी : आत्मत्वाचे निअतुसंधान।। कैसे करिती योगीजन।। ते ऐकावे सावधान।। मुमुक्षुजन तारावया।।१।। स्वये तरोनि आपण।। तेणे तरे सकळजन।। ऐसा विचारी निज कल्याण।। सावधान।।२।।

रचना कुणाची कळत नाही. पुढील भाग गहाळ. एका तुकड्यावर २ आकडा. म्हणजे दोन लांब कागदावरचे लेखन. प्रतलेखक व काल निर्देश नाही.

७२८ क्र १८ **माणिकस्तवनराज**

आ. १६।। × १०।। सें. पा. ५ × २ प्र.पा.ओ. ९ लेखन साधारण. कागद जाड जीर्ण.

आरंभी : श्री महागणपतये नमः।। श्री गुरुभ्यो नमः।। श्रीमन प्रभुवर गुरुवेरूपाय नमः।।

शेवटी : इत्योषस्तुति संपूर्ण।। श्री गुरुवर्यार्पणमस्तु श्री मंगल भुवंतु।।छ।।छ।।छ।। शके १७९४ प्रवर्त माने आंगिरनामसंवत्सरे दक्षिणायने हिंमत ऋतौ मार्गशिर्ष मासे शुक्ल पक्षे अद्या अष्टम्या रविवासरे तृतीय प्रहरे शुभ वेलायां माणिकस्तवन राज संपूर्ण।। श्री सद्गुरुनाथार्पणमस्तु।। इदं पुस्तकं कलबुर्गी जोइशी बाळभट्ट सुत श्रीपतिने लिखित।। कस्यस्वत्धोनास्ति।।अथात्धोबा सुयह्यो ममदोष न विद्यते।। श्री लक्ष्मी व्यंकटेशार्पणमस्तु।।छ।।छ।।छ।।

श्री माणिकराव बळवंतराव होदलूरकर संग्रह

७२९ क्र. १ **भक्तराज** ज्ञानदेव

आ. २२ × १३ सें. पृ. २४ × २. प्र.पा.ओ. १०. ओ. ३०२. अक्षर मोठे. गडद काळी शाई. काळ्या शाईने दंड रेषा. कागद तपकिरी– भिजलेला– जीर्ण. सं. प्रास्ताविकात प्रतलेखकाचे निवेदन-

आरंभ : श्री गणेशाय नमः।। चिन्मयाद्रूपा जनार्दनस्वररूपिणे स्वप्रकाशाय शुद्धाय येकनाथाय नमः।।१।। मायातीताय नित्याय माया गुण प्रकाशिने।। व्यक्ताव्यक्तरूपाय आचार्याय नमोस्तुते।।२।। निवृत्तिज्ञानदेवंचत्त्वमेकनाथ दिगंबर।। मुकुंद राज प्रमुखान् वंदे कीर्तनसिद्धये।।३।। प्रतकाराने केलेला या पोथीतील वरील उल्लेख कुठे नाही. केवळ या प्रतीत आहे.

ग्रंथास प्रारंभ करताना :

ॐ नमोजी अदिसिद्धा अनारसा आनंद कंदा।।
चिदानंदा अभेदा।। अदिनाशंतु।।१।।

शेवटी : गीता ज्ञान देवादिका।। संस्कृतचि ऐका।। श्री कृष्णर्जुनासिदेखा हेचि निरोपिले।।३०१।। ग्रंथ नाव भक्तराज।। महाराष्ट्र शब्द जाला सहज।। भक्तिभावे चिंतन सहज।। अखंड ह्रदयी असावे।।२।। इति श्री भक्तराज ग्रंथ ज्ञानदेव विरचिते संपूर्णमस्तु।। शके १७०९ प्र. प्लवंग नाम. कार्तिक १५ त्रयोदशी संपूर्णमस्तु।।छ।। आज २१० वर्षापूर्वीची प्रत आहे.

७३० क्र. २ **कथाकल्पतरु** कृष्णयाज्ञवल्की

आ. ३१ × १४।। सें. प्र.पा.ओ. ११. कागद जाड, तांबूस रंगाचा, जीर्ण. अक्षर मोठे सुटसुटीत. गडद काळी शाई. पृ. ८९. त्रु.

आरंभ : श्रीकृष्णाये नमः।। ॐ नमोजी विश्वंभरदेवा।। अभेद भावे तुझी सेवा।। तुची विश्व ऐसे जीवा।। प्रतीत जाणो नीधरि।।१।। हरिहर सुर्य गणेश युक्ती।। तुची येक बहुयाव्यक्ती।। जेथे धावे मनोवृत्ती।। तेथे तेथे तुची येक।।२।।

यात अ.११ केवळ.

शेवटच्या ११ व्या अध्यायाचा शेवट.

रुषी वैशंपायन सांगेल पुढील प्रश्न।। ते ऐकावे चित्त देऊन म्हणे कृष्ण याज्ञवल्की।।१५३।। इति श्री कथा कल्पतरू सप्तमस्तबक पृथु आख्यानन्नाम यकादशोध्यायः।।११।। छ।।छ।।छ।।

या प्रतीचा प्रतलेखक कोण आहे. मूळ रचना कुणाची आहे, हे कळत नाही. लेखनकाल पण आढळत नाही.

७३१ क्र. ३ **दासबोध** रामदास

आ. ३३ × १४ सें. पृ. ४२१ × २. प्र. पा. ओं. ९. अक्षर, मोठे सुटसुटीत. कागद जाड, पांढरा, पण निळसर. त्रु. प्रथमची व शेवटची पाने गहाळ. प्रत्येक समासास दोरीने बांधलेले. १० दशकांपर्यंतचा भाग. शेवटपर्यत अक्षर एकाच पद्धतीने. अधुनमधून चित्रे व नकाशे, वेलबुट्टी काढलेली. प्रत्येक प्रकरणानंतर १ पान कोरे. लेखन अत्यंत व्यवस्थित केलेली प्रत.

शेवटचा भाग नसल्याने प्रतलेखक आणि प्रतलेखनकाल अज्ञात. विसरलेल्या ओव्या व मजकूर काकपद दर्शवून समासामध्ये लिहिलेल्या. काही चित्रे रंगीत.

७३२ क्र. ४ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. ३० × १५ सें. प्र.पा.ओ. १२. अ. ५ त्रु. उपलब्ध पा.५०. प्रत्येक चरणास लाल दंड रेषा. दोन्ही बाजूंस लाल रेघा. अष्टतीर्थ इ. महत्त्वाचा भाग वर्णन करताना लेखनकाल काळ्या शाईत व एक तांबड्या शाईत असे केलेले आहे. अक्षर अत्यंत सुंदर मोठे. गडद काळी शाई. कागद जाड पण जीर्ण. लेखन रेखीव, सुटसुटीत.

प्रतलेखक आणि प्रतीचा काल उपलब्ध नाही. आळंद येथे धोंडभट बिन दिवाकरभट होदलूरकर यांच्या घराण्यातील प्रत. त्यांच्या वंशातील कुणा व्यक्तीने केले असावे. या प्रतीमध्येच कण्व मठ श्री विठ्ठल कृष्ण पीठाधीश यांचे एक आज्ञापत्र या नावानेच, भाषा कानडी व मराठी बाळबोध लिपीत आढळला. शके १८३८चे हे आज्ञापत्र आहे. तिथी भाद्र. शुक्ल १५ इंदुवासर नळ नामसंवत्सर.

७३३ क्र. ५ **यतिसंस्कार**

आ.२० × १० सें. पा. ८१ × २. प्र.पा.ओ. १० अक्षर साधारण. कागद तपकिरी– पातळ– जीर्ण. संपूर्ण संस्कृत रचनेचा भाग. मध्येच थोडे विवरण मराठीचे.

आरंभ : श्री गणेशाय नमः।। अथ यति संस्कारविधी।। अथ एकादशाहि पुत्रकृत्यं।।..

शेवटी : ग्रंथ समाप्तीनंतरा।। इति प्रतिष्ठानपुर वासी तोरोनारायणास जयरुद्र देवकृते प्रतापनारसिंहाख्ये संस्कार।। प्रकाशयीत संस्कारे उपयोगी निर्णयः समाप्त।।छ।।

शके द्दगग्निषटू चंद्रेविभुशुक्लाति उत्तरायणे।। चैत्र कृष्ण द्वादश्याम प्रतिष्ठान पुरे शुभे।।

इंद पुस्तकं. बाळंभट लिखितं।।छ।।छ।।छ।। या होदलूरकर घराण्यात बाळंभट नावाचे विद्वान होते. त्यांचे हे लेखन.

७३४ क्र. ६ **जेष्ठादेवीपूजा**

आ. १५ × १० सें. प्र.पा.ओ. ६. अक्षर मोठे– जाड. जीर्ण. त्रु.

प्रथमची ४ पाने नाहीत. संस्कृत श्लोकासह विवेचन केलेली रचना. विवेचन गद्यात.

शेवटी : ।।ल जे व्रताचे कथा श्रवण करतील।। सकळ तापत्रया पासुन मुक्त होत आहे। अंतिकालि विष्णु लोक प्राप्त होत आहेत।। इति श्री भविष्योतर पुराणे जेष्ठदेळी कथा संपूर्णमस्तु।। शुभं भवतु।।६।। कायेन.।। इदं पुस्तक आंनतभट्ट दरर्गा यांचे आसे।। सत्य सत्य जीवाच्या. अक्षर धोंडभट आत्मजे होदलूर. आळंद येथे श्रीराघवचैतन्य पुजारी घराण्यास दर्गा जोशी नामाभिधान आहे. यात लेखनकाल दिला नाही.

७३५ क्र. ७ **यकपंचदशी** सरस्वती गंगाधर
गुरुचरित्र

आ. १७ × ११ सें. प्र. पा. ओ. ७. अक्षर मोठे– जाड. काळी शाई. सं. पा. ८ × २.

आरंभ : श्री गजानन प्रसन्न।। श्री गुरु दत्तदिगंबर प्रसन्न।। ॐ नमोजी विघ्नहरा।। गजानना।।

शेवटी : सरस्वती गंगाधरू।। श्रोतया करित नमस्कारू।। कथा एका मनी हरू।। सकळाभिष्ट तुम्हा।।५२।। इति नृसिंह सरस्वती पाख्यान सित्धनाम धारक संवादे यक पंचदसी श्रीगुरुचरित्र समप्त।।छ।।छ।।

यदक्षरं पदं भ्रष्टं मात्राहीनच्य यद्भवे ततर्त्सर्वक्षेम्यतां देव दत्तात्रय नमोस्तुते।।

लेखनकाल व लेखकाचे नाव नाही..

पोथीस बांधलेल्या वेष्टनाच्या कागदावर रामभट्ट व बाळंभट्ट होदलूरकर मुखां आळंद असे लिहिलेले आहे.

७३६ क्र. ८ **बाड**

२२।। × १५ सें. प्र.पा.ओ. १२. कागद जाड. अक्षर खूप मोठे. काळी गडद शाई. समासविरहित लेखन. पृ. ८७ प्रथमची व शेवटची पाने गळाली आहेत. २ सुटी पाने. यात विविध स्फुट रचना. तुकाराम, केशव, बाबा तुकोजी, जीवनमुक्त, उद्धवचिद्घन, गोसावीसुत विठ्ठल, रामदास, गंगाधर, महिपती या कवींच्या विविध रचना, पदे, भूपाळी, आख्याने. बाड भिजल्याने कागद चिकटलेला. महत्त्वाच्या संकलनाचे बाड. कागद खूप जाड. संत नामदेवाची रचना. काही श्लोक रचना.

वानगी दाखल : श्री मं मंगलमुर्ति भुसीत च हं हंस्तागुळी मुद्रीका।।

रत्नाचे मुगीटी झळाळ फुलले जैशा सहस्र चद्रें का।।
भाळी चंद्रकळार्थ सोंड सरळी शेंदुर हाले पीला।।
उंदिरास्तनं मोदीका सन मुखी स्फूर्तिसदा स्तापीला।।
नमं पांर्वती पते हर महादेवा।।१।।

काही वामनाचे श्लोक. बाड लेखकाने कुठेच अनुस्वार व जोडाक्षर याचे भान ठेवलेले नाही. रचना पूर्णपणे आकलन होण्यास कष्टाचे; पण सर्व संकलन अत्यंत वेचक व वेधक.

बाडात एक-दोन पानांमध्ये मोडीत फक्त श्रीकृपासागर राजमान्य राजेश्री श्री रागविंदराव कुळकर्णी मुक्काम आळंद स्वामी महाराजांचे चरण सेवसी असा मजकूर-

७३७ क्र. ९ **रामनाममहिमा**

वरील बाडातच ही आख्यान रचना आहे. ओ. २५. पान सं.

आरंभी : आधी नमो पार्वती सुतराया।। देई मला स्फुर्ती बरी वदाया।। विघ्नासि तु निर्वीघ्नकरी दयाळा।। हे मागतो पूर्ण तुला दयाळा।।१।। शंकरा मज हे सागा म्हण बोल आदीमाता।।धृ।। तेतीस कोटी त्या सुखरा।। तुमचा आधार प्राणेश्वरा।। रात्रदीवस गंगा धरा नाम कवणाचं घेता।। मज हे सांगावे मण बोल आदीमाता।। शेकरा मज हे सागा मण बोल आदीमाता।।१।।

शेवटी : जीवनमुक्तीच्या बालका।। जे पद दीधली ब्रह्मादीका।। ते त्वा दीधल रघुनायेका।। सुखी जाहाले सुशामा।। रामरामान कळे तुझी महिमा।।२४।। सिवा सीशरणांगत।। आदीमाता जाऊनी करीता।। धन्य गाईल जो चरीत्र।। वाचा होय पवित्र।।२५।।छ।।छ।।

७३८ क्र. १० **भक्तमालिका** उद्धव चिद्घन

वरील क्रमांक ७२८ च्या बाडातच ही रचना. ओ. ६७. सं. पा. ८ × २. अक्षर जाड- स्पष्ट. गडद काळी शाई.

प्रारंभी : भक्त मालिका प्रारंभ।। ॐ नमोजी सद्गुरू चिद्घन। गणेश शारदा रूप आपण।। भक्त मालिका स्मरण।। करू म्हणोनि आठवलं।।१।। तरीच आठवाचा ही आठव आठवा।। प्रकाशक गुरू देवा हे जाणोनि स्वयेम्येवा।। बोल गौरव शब्दाचे।।२।।

शेवटी : या लागी मती हीन दीन।। आठवलं ते केलं स्मरण।। वादे वदला श्री चिद् गहन।। नीमग्न जाहाला उर्ध्व।। श्री उध्वं ची दृघन।। सन्निध आस रामकृष्ण।। भक्त माळीकास संपुर्ण मस्तु।।छ।। हस्तदोश आक्षेरक चुकली आसली या साभाळुन वाचण मम दोश न ली पीते।।छ।।

प्रतलेखकाचे नाव व काल निर्देश नाही.

७३९ क्र. ११ **अहिल्योधारण** विठ्ठल

वरील बाडातच ही रचना. ओ. ५५. अक्षर मोठे. गडद शाई. पृ. १२ × २. सं.

आरंभ : श्री गणेशाय नमः।। श्री सरस्वत्ये नमः।। श्री गुरुराज प्र।। आहील्ये उधारण।।

आधी नमु त्या गणनायेकाला।। त्यातर वंदीन शरदेला।। भावार्थ माझा चकोरन्ये।। त्या कारण कवी सांगता।। अरभ आहेल्या उत्धां आरंभ।।छ।।

दशरथाप्रती जाऊनी कैसीकःवचेन मागितल पहीलनीकः।। आज सुत खी वंशज भुशण।। रघुपतीस दीजे मख रक्षणे।।१।।

शेवटी : श्री मंदद्वीती ये रघुराज चरित्र वर्णी।। वीत्पंन विठल म्हणे परिसोत कर्णी।। इतिश्री आहेल्या उद्धारं सीता सैवर कथा संपुर्णमस्तु।। प्रसंग द्वीतीयाध्याया।।छ।।

दोन अध्यायांचा उल्लेख असला तरी येथे एकच अध्याय आहे. लेखनात योजलेली लिपी व पद्धत यामुळे ही प्रत किमान तीनशे वर्षांपूर्वीची असावी.

७४० क्र. १२ **गरूड आख्यान** रामदास

वरील बाडातच हे आख्यान।। ओ. १६६. पृ. २० × २ अक्षर मोठे. सुस्पष्ट. गडद शाई. सं.

आरंभ : श्रीगणेशप्रसन्न।। गरूड आख्यान।। प्रथम वंदिला

गजानन।। देवस्तवन।। परमपावन वीनायेकु।।१।। ध्यान करुनिया चित्ती।। मग म्या नमिली हो सरस्वती।। जाहली वर्णावया स्फुर्ती।। जे जे क्षीती वर्तली।।२।। हदयी चिंतन करूनीया आतां।। सद्गुरू चेरणी ठेवीला माथा।। जना मरण प्रबळे व्यथा।। त्यानंतव्रताछेदीली।।३।।

शेवटी : यैसा भक्तीचा विलास।। वर्णी किंकर शामदास।। माझा उलटा मोहो प्रकाश।। श्रीनिवास पावला।।१६६।। इतिश्री गरूड आख्यान हनुमंत भेटी संपुर्णमस्ता।।छ।।छ।।

लेखनकाल दिलेला नाही.

७४१ क्र. १३ **गजेंद्रमोक्ष** गंगाधर

वरील बाडातच ही रचना. ओ. ४४. अक्षर मोठे. पृ. ८ × २. कागद जीर्ण. भिजून चिकटलेले. सं.

प्रारंभ : गजेंद्रमोक्ष।। श्री गणेशाय नमः।। वंदुनि आदी गणनायेकाला।। त्यानंतर जी शारदला।। तीच्या प्रसादे रसना वीलासे।। तेण करुनी खगराज तोशे।।१।। श्रीगुरू नमिला मग आदर।। वद कवीत्व कथामृत सादरे।। भवनीधी पार तराया।। ध्यातसे नीज मनी येदुराया।।२।।

शेवटी : गज आणि नक्रासी उधार जाला।। बरा बोध गंगाधरा प्राप्ती जाला।। सदा वाचीती ऐकती येक भावे।। भवा पासुनी मुक्ती होती स्वभावे।।४४।। गजेंद्रमोक्ष संपुर्णमस्तु।।छ।। छ।।छ।।छ।।

७४२ क्र. १४ **अहिरावण महिरावण** महिपती

वरील बाडातच ही रचना. ओ. १०१. अक्षर मोठे. गडद शाई. भिजून कागदाचा उजवीकडील खालचा भाग जीर्ण झालेला. पृ. २८ सं.

प्रारंभ : आधी नमू त्या गणनायेकाला।। त्रिसत्प दुर्वांगण नायेकायेला। गजानना लेपन शेंदुराचे।। सदैव ज्या वाहान उंदीरा जे।।१।। वागेश्वरी वाजीविरेमेवीण।। संगीत शास्त्री जगी प्रवीण।। पाशाकुशे घेऊनी युग्लवाणी।। प्रार्थीतसे येऊनी बैस वाणी।।२।। आर्य पुजुनी गुरुराज मुर्ती।। अज्ञान ते नासुनी देत स्फूर्ती।। वदोनिया विनवीतो आती दानवाचे।। वर्णीतसे बहुत त्या गुण राघवाचे।।३।।

शेवटी : श्रीराम शेशे मग तेथुनी या निघाले।। त्यांस भ्रमे करुनियाजे चमुमाजी आले।। आनंदले सकळ वानर शेना।। वाखा नीले सुख मुखे मज बोलवना।।१०१।। आ नामा नीर कामा आगणीत गुणदामा रघुवती।। तुंते वर्णीवानी श्रमीत बहुजाली महीपती।। अनंता वेदांता ना कळसी अनंता वरदिया जरी सीता।।

७४३ क्र. १५ **मंगलाकष्टक** गोसावीसुत

आ. २२।। × १५।। सें. पाने ४ × २. प्र.पा.ओ. ११. कागद जाड. गडद शाई. लेखन सुटसुटीत. श्लो. ९. सं.

रचना छोटीच पण चित्तवेधक आहे.राम आणि सीता यांच्या विवाहप्रसंगीचे वर्णन. यात कवीच प्रत्यक्ष तेथे मंगलाष्टक म्हणत असल्याच्या भूमिकेतून ही रचना केलेली आहे. याची वेधक वानगी.

प्रारंभी :

आली लग्नघडी पुरोहित म्हणे
आता करी तातडी।।
वस्त्रे नेस विळी सुगंध सुमना वाहोनिया आवडी।। माडाच्यो घडीया तया वधुवरा पायातळी घातल्ये। नाधीकाहुनी आंत्र पाठ धरीले येद्वंद्व ध्वनी लागल्ये।। कर्योस्छदा मंगलम। सुमुर्त सावधान।।२।।

शेवटी :

राम त्रिंबक च्याप वेठुनी बळ मोडोनिया टाकिले।।
पुष्पाचे वरशाव देव करिती त्रैलोक आनंदले।।
सीता घेऊनि माळ घालीत आस सर्वस्वय अर्पिले।।
गोसावीसुत स्वामी या वधुवरा कुर्यो सदा मंगलम।।
भेरी टाळ मृदांग ढोल गजरे धों धों दमामे किती।।
वेणु आणि सहन या बाहुतश्या वाद्ये।।
किती वाजती।। कैश्या संगीत राघवा समीप
त्या नृतांगना नाचती।। गोसावीसुत स्वामीया वधुवरा कुर्यात सदा मंगलम।।२।।

७४४ क्र. १६ **ध्रुवाख्यान** चिंतामणी

आ २२ × १५. सें. प्र.पा.ओ. १२. त्रु. अक्षर खूप मोठे सुटसुटीत. कागद जाड. गडद काळी शाई. ओ. ३१. पृ. ४ × २. यात प्रथमची पाने गहाळ.

शेवटी : दिव्य विमानी घालुनी धुरू नेला।। आढळपदी नेऊनि बैसविला।। ध्रुवनाम तो लोक वसविला।। ध्रुवा वाचीता चीदानंद जाहाला।।२९।। चंद्र सूर्यादि ग्रह गणतारा।। सप्तरूसी घालीती त्यासी फेरा।। जरामरणची तेथ नाही वारा।। रामनामी लोभ केला थारा।।३०।। ध्रुव आख्यान अैकती गाती वाचा. वास त्याचा।। अनायस शशाब्ध शयेनाचा।। चितामणि वर्णीता गुण केशवाचा।।३१।। श्री ध्रुव आख्यान संपुर्णमस्तु।। श्रीराम चंद्रार्पणमस्तु।।छ।।छ।।छ।।

७४५ क्र. १७ **मार्तंडाष्टक** बाबु तुको

आ. २२।। × १५।। सें. प्र.पा.ओ. १२. पृ. १२ × २. अक्षर जाड. गडद काळी शाई. ओ. ९. एका बाबु तुको तथा द्विजसुत बाबु नावाच्या कवीची ही रचना.

आरंभी :

सखा देव हा देखिला देवराणा।।
झुरगी कसा शोभतो सुर्भ वर्णा।।
हा ज्योदितयाबाणली दीव्ये लीला।।
भजा रे तुम्ही माहाळ साचे प्रतीला।।१।।

शेवटी :

मार्तंड हे नाम मुखी म्हणावं।।
आष्टकाला प्रती आठवावं।।
द्विजसुत बाबु चेरणा बुजाला।।
भजा रे तुम्ही..।।९।। छ।।छ।।

यातच मारुतीची याच कवीची एक आरती आहे. या ५ कडव्यांच्या आरतीत शेवटी :

बाबु तुकोची भावना मारुतीच्या चरणा।
सोडोनी मायेची कल्पना।।
निर्विकारी खुण।। जये जये हनुमंता।।छ।।

आणखीन एका पदाचे ध्रुपद–

अयोध्या सत्वाची, सत्वाची।। नगरी श्री रामाची।। अयोध्या सत्वाची।।धृ।।

आणखीन एका पदात शेवटी–

गडीया पाच साहीजण।। त्याची अैक खुण।।
बाबु तुकोच समाधान।। परब्रह्मी खूण।। चलरे।।५।।छ।।छ।।छ।।

एकूण ७-८ स्फुट पदे. इ. रचना. विशेष वाटते.

याच कवीची आणखी एक वेधक रचना :–

एक म्हणती राम राम।। दुसरा मणे कृष्ण नामे।।
भिन्न ना ही तेथे नेम।। करा घोश दो नामी।। उठा उठ।।५।।
पक्षिपक्षियांचा मेळा।। साई काळी होये गोळा।।
तैसा भक्तिचा जिव्हाळा।। दो अवतारी गे बाई।।६।।
जेनरप्राणि प्रातःकाळी।। मुखी हरिनामाची हाळी।।
बैसे काळाची का टाळी।। नाम घेता ग बाई।। उठा उठा।।
ऐसी रामनामे किर्ती।। प्राणि तरले नेणे किती।।
वरद येक हा मारुती।। बाबु तुका ध्यातसे।।८।। उठा उठा।।

ही एकूण ९ कडव्यांची रचना आहे. अज्ञात पण वैशिष्ट्यपूर्ण कवी वाटतो. या कवीचा काल व अन्य ठावठिकाणा यांचा बोध होत नाही.

७४६ क्र. १८ **गरूड पुराण** पुराण

आ. २४ × १५. सें. प्र.पा.ओ. १०. अक्षर मोठे– साधारण. कागद घोटीव. जाड तपकिरी रंग. अ. ३५. पृ. ६६ × २ सं.

आरंभ : प्रथमची ओळ अस्पष्ट.

....प्रसाद द्वैकुंठच त्रैलोक्य सचराचर।। या विलोकितं सर्व जग स्थावर जंगम।।२।। भूलोक सत्प पर्यत पुर या म्यंविना प्रभो।। भूलोकं सर्व जंतूना प्रपुरं सर्व जंतु षु।।... संपूर्ण संस्कृत संहितेसह. अधूनमधून मराठीत विवेचन.

शेवटी : इति श्री गारुडे उत्तर खंडेत विष्णुताक्ष्र्य संवादे पंचत्रिंशोध्याय।।छ।।छ।।छ।।छ।।छ।।६६।।

इदं पुस्तकं बाळंभट हस्ताक्षर त्याचे आहेत. श्री जगदंब प्रसन्न श्री राघव चैतन्य प्रसन।।छ।। लेखनकाळ दिला नाही.

७४७ क्र. २० **शाखाभेदनिर्णय** शास्त्र

आ. २१ × ७ सें. प्र.पा.ओ. ७. अक्षर बारीक. कागद जाड– घोटीव. गडद काळी शाई. पृ. २८ × २. शेवटचे एक पान गहाळ. संस्कृत संहितेसह. सं.

आरंभ : श्री गणेशायनमः।। श्रीगुरुमूर्तयेनमः।। तथा चव सिष्ठादयः।। पारंपर्यागतो येषां वेदः सपरिदृहण।। तछाकं कर्म कुवीत तछाखा ध्यायनं तथा।। अधीत्य शाखा महात्मीया अन्यशाखां ततः पठेतु।।

शेवटी : सन १३२४ फसली हा काळ समासात लिहिलेला. शेवटी एक आरती लिहिलेली आहे.

जयदेव जयदेव शिव चिदंबरा।।
गुरुचिदंबरा।। सज्जनमनरंजनहर
नव जगदोत्धारा।। जय जय।।धृ।।
करुणाकर भूतेशं द्विज गुरु विश्वेश।।
विधीहर प्रमुखाधीशं वदित क्षोणीश।।
क्षय कुष्टादिकानाशं भुसूर दानेश।।

शेवटच्या चौथ्या कडव्यात–

नाथात्मज सुत कुरुमाझी विस्तारे।।

असे वर्णन आहे. प्रतलेखक वा रचनाकाल निर्देश स्पष्ट नाही. यां संग्रही संस्कृत ग्रंथ पुष्कळ आहेत.

७४८ क्र. २१ **स्थालो पाक**

आ. २१।। × ११।। से. प्र.पा.ओ. ६. अक्षर खूप मोठे. कागद पांढरट– जाड. पृ. २० × २. सं.

आरंभ : श्री गणेशाय नमः।। श्री सरस्वतये नमः।। श्री

जानकीरमणाय नमः।. अथ तोगस्त्य स्थात्लपाकाना कर्म परिसमुह्लो पसिप्व्वो।।

संस्कृत संहितेसह.

शेवटी : इतिश्री भास्कराचार्यकृत गुह्यसूत्रे प्रथम कांड समाप्त।।०।। प्रमाधीच नाम संवत्सरे माघ वद्ये द्वितिया गुरुवासरे तृतिय प्रहरेत्तदिने समाप्तः। इदं पुस्तक रामचंद्रस्यास्ति।। तैलाद्रक्षे जलाद्रक्षे द्रक्षेशीतल मेवच।। कष्टेन लिखितं।। ग्रंथ यत्नेन परिपालयेत।।छ।।छ।।छ।। प्रतलेखकाचे नाव स्पष्टपणे दिले नाही. ग्रंथस्वामी रामचंद्र आहे.

७४९ क्र. २२ **कथाकल्पतरू** कृष्णयाज्ञवल्की

आ. ३० × १४ सें. प्र.पा.ओ. १०. पृ. ७ × २. त्रु. अक्षर सुंदर. रेखीव. फक्त स्तबक ७ मधील ११वा अ. पूर्ण.

श्रीगुरुभ्योनमः।। जन्मेजये पुसिं केली।। वैसंपायने सांगितली।। जरी ध्रुव वंशावळी।। कवणा पासव।।१।। ऐक ब्रह्मयाचा नंदनु।। नरची ऐसा बोलिजे तनु।। तंव मरंची पासुनु।। कस्येप नाव।।२।।

शेवटी : रुषी वैशंपायन सांगेल पुढील प्रश्न।। ते ऐकावे चित्त देऊन।। म्हणे कृष्ण याज्ञवल्की।।१५३।। इति श्री कथा कल्पतैरु सप्तम स्तबक पृथु अख्यात्राम येकादशोध्याय ।।११।।छ।।छ।।

७५० क्र. २३ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. ३० × १६ सें. प्र.पा.ओ. १२. पृ. १८२ × २.

प्रथम अध्यायामध्ये ९२ ओव्या नाहीत; तसेच शेवटी ५०-५१ अध्याय गहाळ. कागद पातळ चिवट. लेखन अत्यंत रेखीव. लाल दंड रेषा।। दोन्ही बाजूंस लाल रेघा।। प्रतकारास महत्त्वाच्या वाटणाऱ्या ओव्या लाल शाईत. ४९ व्या अध्यायाच्या शेवटी ग्रंथसंख्या ६८१२ दिली आहे. पहिली व शेवटची काही पाने जीर्ण.

७५१ क्र. २९ **लघुगीता**

आ. १३ × १०. सें. पा. ८ × २. प्र.पा.ओ. ६. अक्षर मोठे. कागद जाड. शाई गडद काळी. ओ. १८.

आरंभ : श्री गणेशाय नमः टीका प्रारंभः।। कृष्णे मजविजयाची चाड नाही आणि राज्यसुखाची गोडी काही।। आणी राज्ये भो सकळ ही।। नलग मज।।१।।

शेवटी : गेला मोहौ म्हणे या पार्थु। तुमचा प्रसादे जाहलो सावचींतु।। संदेह फिटलानी भातु।। करीन वचन स्वामी तुमच।।१८।।

इतिश्री।।छ।।छ।।छ।।छ।।

दोन्ही बाजूंस काळी दंड रेषा. पृष्ठभागावर व शेवटी वेलबुट्टी, सजावट, लेखनकाल व प्रतलेखक नाव नाही. शेवटी २ पाने कोरी. त्या काळातील सरकारी दफ्तराचे कागद वापरलेले. त्यावर उर्दूतील शिक्का. एका पानावर अक्षर वाटिका व भाषा व संग्रहातील अन्य ग्रंथ या दृष्टीने पोथी. २५० वर्षांपूर्वीची असावी.

भाषा व रचनेचे वैशिष्ट्य पाहता ही शिवराम स्वामी यांची रचना असावी; पण नामनिर्देश नाही.

७५२ क्र. ३३ **निवाडा पत्र**

आ. ८ × ३१ सें. पा. १५ × २. प्र.पा.ओ. १९ ते २०. अक्षर बारीक– मोडी लिपीत. प्रथमचे पान फाटून वेगळे. कागद तपकिरी पातळ.

आरंभ : हकिकत वर्तमान येथील अग्रहार लोकांचे रोजचेरोज ब्राह्मीचे तंटा वगैरे जाहले प्रकरणी मिती भाद्रपद शु. १० शके १८०५ आखरीस सुरु जाहले. सन १८०५ या संवत्सरामध्ये...

शेवटी : मंडळीत शके १८१३ मिती मार्गशीर्ष शुद्ध ७ रविवार पासून पंगती एक जाहले आहे. जाणे येणेस काहीच हरकत नाही. मि मार्ग शु. ९ शके १८१३.

७५३ क्र. **हुकूमनामा**

आ. १६ × १६५ से. कागदाची लांबपट्टी. मोडी लेखन. गडद काळी शाई. कागद चिवट– पातळ– तपकिरी. प्रथमचा थोडा भाग कसरीने खराब.

आरंभी : पूर्वी निवाडा पत्र रा. सोमाजी अनंत कदीम जागीर, देशपांडे आळंद, सरकार नळदुर्ग, सुभे दारूल जफर बिजापूर.

यात ४०० होनबद्दलचा वाद मिटविला तो तपशील दिला आहे.

सदरहु असल माजहर वरवरते फारसीत लिहुन दिले आहेत. शिवाय उजवे बाजूस माहीम लोकांची मोहर आहेत ते कागद पांडुरंग अणाजी देशपांडे येथे आहेत. लेखनकाल दिला नाही. सुमारे ३० लोकांच्या सह्या साक्षीदार म्हणून आहेत. औरंगजेबाच्या दक्षिण स्वारीनंतरचा कागद म्हणून दारूल जफर प्रांत नाव.

७५४ क्र. ३१ **बाड**

आ. १७ × १२ से. पा. २२ × २. सुटी पाने. कागद जीर्ण- जाड. गडद काळी शाई. उद्धवलिंग जगदीश, वामन, दामाजी व अन्य कवींची विविध स्फुट रचना. कुळकरण्याचा झाडा नावाची अपूर्व रचना. एक लग्नपत्रिका शके १६६८ क्षय नाम संवत्सर फाल्गुन वा. १२ बुधे १३।२३ श्रवण ६।२१।११ तपशिलाची.

७५५ क्र. १९ **वेदसंहिता**

आ. २२ × १० सें. प्र.पा.ओ. ९. कागद जाड. काळी शाई. पृ. ५०० × २. त्रु. अक्षर नेटके. प्रथमची पाने गहाळ. संस्कृत वेदसंहिता भाग.

शेवटी : इत्यष्टमाष्टके अष्टमोध्यायः।। शके १६६१ प्रवर्तमाने सिद्धार्थनाम संवत्सरे दक्षिणायने वर्षे ऋतौ श्रावण शुद्ध चतुर्दशी इंदु वासरे तद्दिने समाप्तः।। आलंदिकर धर्माधिकारी काशीकृष्णाचे पुस्तक होय सत्य जाणीजे. शिवरामेन लिखित।। श्री वेद पुरुषायेनमः।।समाप्त।।छ।।

७५६ क्र. ३२ **स्वप्नफल**

आ. २० × १० सें. पृ. ४० × २. प्र.पा.ओ. ७. कागद जाड. अक्षर मोठे. गडद काळी शाई. त्रु.

शेवटी : ४० श्लोकांनंतरचा भाग गहाळ. ही संपूर्ण संहिता भाष्यासह कानडी भाषेत व लिपी मराठी अशी आहे. लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

७५७ क्र. २२ **पंच पक्षिग्रंथ**

आ. २३ × १० सें. पा. २७ × २. प्र.पा.ओ.७. त्रु. अक्षर मोठे. संस्कृतचे मराठी भाष्य. प्रथमची पाने नाहीत. श्लोक २८ नंतरचा भाग आहे.

आरंभी : हे पाचही वरि नक्षत्रे लेखीजे।। इति नक्षत्र पक्षि।। विवेचनात काही कुंडल्या व आलेख.

शेवटी : जे प्रश्नासर जेजे येदूळ ते अक्षर चक्रामध्ये पहावेत।। वोळीचे पक्षी बांधून फल सांगिजे।। इति श्री कपिलईश्वर संवादे पंच पक्षिग्रंथ समाप्त।।छ।।छ।।

यात लेखनकाल व प्रतलेखक नाव नाही.

श्री चंदुलाल पदमणप्पा पंडित संग्रह, आळंद

७५८ क्र. १ **बाड**

आकार २० × १४।। सें. पृ. १७७ × २. प्र.पा.ओ. १०. कागद जाड गुळगुळीत. शाई गडद काळी. अक्षर रेखीव ठसठशीत. अक्षर वाटिकेत गुजराथी वळण "भ" "ॐ" याची पद्धत वेगळी. जैन संप्रदायाचे पूजेतील व संहिता याचे हे बाड असून, मोठे बाड डावीकडे मधोमध शिवलेले. आडवी पोथी असा आकार. बाडाच्या १७७ पृष्ठांनंतर कोरी पाने सुमारे ६७. प्रथमची २ पाने कोरी. प्रतलेखकाने पुढील नोंदी केल्या नाहीत. प्रत्येक चरणास लाल दंड रेषा. दोन्ही बाजूंस लेखन केलेल्या व कोऱ्या पानास पण तीन तीन तांबड्या रेखाची रेषा.

यामध्ये संस्कृत, मराठी, हिंदी व क्वचित गुजराथी भाषेत विपुल व विविध रचना प्रथम अनुक्रमणिका दिली असून यात ३७ रचना पृष्ठ क्रमांकासह नोंदविलेल्या आहेत. त्याचा तपशील-

जिनेसेनाचार्यकृत सहस्त्रनाम, पंचपूजा हिराचंदकृत, प्रथम अर श्रहत पूजा, द्वितिय अरहंतपूजा, द्वितियसिद्ध पूजा, तृतिय अकृत्रिमपूर्जा. चतुर्थ सरस्वती पूजा, पंचम गुरुपूजा, दशलक्षणीसमुदायपूजासमुदाय, अष्टान्हिक पूजा समुदाय, रत्नत्रयपूजा, विसविरहमानस पूजा, जोगीरासो, बार अनुपेक्षा, मनीरथमाला, षोडश कारणरास व्रतकथा, दशलक्षणी रास व्रतकथा, अष्टान्हिक रास, आराधना प्रतिबोध, क्षपक निजामणि, जादवकृत नेमनाथ विनंती, चोळी तीर्थंकार विनंती. धर्माचारलि. भूपाल स्तोत्र, एकीभाव स्तोत्र, विषापहार स्तोत्र, कल्याण मंदिर स्तोत्र, पंचकल्याणिक रूपचंदकृत, गुरुविनंती, हिराचंदकृप पदसं, अरति अहिहंताची, द्वितिआरती अ. पंजपूजा संस्कृत.

हा संकलनाचा पसारा आहे. प्रतलेखक वा लेखनकाल दिलेला नाही. बाडाची स्थिती व लेखनातील अक्षरवाटिका यावरून हे बाड. किमान दोनशे वर्षांपूर्वीचे असावे. जैन संप्रदायाच्या दृष्टीने महत्त्वाचे बाड प्रचंड असे आहे. विविध आणि विपुल संकलन असल्याने बाड महत्त्वाचे. स्थिती चांगली. काही पदांना रागतालांचा निर्देश.

७५९ क्र. २ **आरत्या**

आ. २० × १४।। पृ. ६ × २. अक्षर रेखीव. यात मराठी आरत्या दिल्या आहेत. त्याची वानगी

अष्ठ आरती हरिहंताची-

(१) जयदेव जयदेव जय जिन अरहंता।।

भव जल तारक हारक मुनिमानस चिंता।।
सेताळीस गुणवंता मुक्ति श्रीकांता।।
आरती ओवाळीन मी भावे वोवाळिनमी।
तुजला भगवंता।।धृ.।।
(२) जयदेवा वीत रागा दोष विवर्जितांगा।।
आरती वोवाळीन तुज निःसंग संगा।।
जय देवा।।धृ.।।
अक्षया जनू महीना।। नाही तुजला खेद।।
विस्मया वेगळातु नाही-वीष धरवेद।।१।।

रचनाकाराचे नाव दिलेले नाही.

७६० क्र. ३ **क्षपक निजामणि** जिनदास

आ. २१ × १४।। सें. पा. ७ × २. प्र.पा.ओ. १० अक्षर रेखीव. प्रथम व शेवटी एक एक ओळ लाल शाईत. ओ. ५४. सं.

आरंभ : अथक्षपक निजामणि लिख्यते।। श्री सकल जिनेश्वर देव।।+ तह्मपाये कुरुसेव।। हवे निजामणिक कुसार।। जिमक्षपक तरे संसार।।१।।

शेवटी : श्री सकळ किर्ती गुरुध्यान।। मुनिभुवनकिर्ती गुण गाऊ।। ब्रह्म जिनदास म्हणे सार।। एनिजामणि अवतार।। ५४।। इति श्री ब्रह्मचारी जिनदास विरचिते क्षपक निजामणि समाप्त।।छ।।३।। संपूर्ण।। शुभं भुयात् ।।छ।।३।।

७६१ क्र. ४ **आराधनाप्रतिबोध**

आ. २१ × १४।। सें. पृ. ६ × २. प्र.पा.ओ. १०. ओ. ५५. अक्षर नेटके. गडद काळी शाई.

आरंभ : अथ आराधना प्रतिबोध लिख्यते।। श्रीजिनवरस्वामी नवमी।। गुरू निग्रंथ पाय प्रणाम।। करु आराधना सुविचार।। संक्षेपे सार उद्धार।।१।।

शेवटी : जे भणे पुणे नर नारी।। ते जाय भवने पारि।। श्री दिगंबर यातिक ह्यो विचार।। आराधना प्रतिबोध सार।।५५।। इति आराधना प्रतिबोध समाप्त।।छ।।२।। रचनाकार अज्ञात.

७६२ क्र. ५ **मनोरथमाळा**

आ. २१ × १४।। सें. पृ. ४ × २. प्र.पा.ओ. १०. ओ. १६.

आरंभ : अथ मनोरथ माळा लिख्यते।। जिनवर स्वामी मनधरी।। जिनवाणि निश्चय करी।। सार मनोरथ माळा गाइ।। जिनजी।।१।।

शेवटी : हे बा मनोरथ जे करे।। ते सहि मुगति रमणि बरे।। सेवक तेह तण गुण ठाई मनधरे।। जिनजी।।१५।। शाह अचलो तेच गुण मन रे।। जिनजी।।१५।। इति मनोरथ माळा।।छ।।... रचनाकार अज्ञात.

श्री चिदंबर साहित्य प्रसार सभा

७६३ क्र. १ **चिदंबर सहस्रनाम** राजाराम

मराठवाड्यातील राजाराम कवीने मुरगोडच्या चिदंबर स्वामीवर रचलेले सहस्रनाम :

प्रारंभ : भक्त धुरंधर श्री राजा विरचित।।

श्री गणेशाय नमः।। श्री सरस्वतेय नमः।। श्री गुरुभ्यो नमः।।

श्री चिदंबर चिदंबर चिदंबर चिदंबराय नमः।।

शेवटी : सगुणप्रिय दासभेटी।। वरदा भुवतु चिंतित मनोरथ सिद्धीरस्त्विसि।। भक्त वरद श्री चिदंबरेश्वराय नमः।।

सहस्रनामाच्या शेवटी : फलश्रुती.
चिदंबर सहस्रनाम नित्य पठण करिता।।
निजात्मसुख ब्रह्म येती हाता।।१।।
त्यासी कृपाकरी चंद्रमौळी।। स्वानंद दिवाळी ब्रह्मसुख
इति श्री सत राजाराम विरचित।।९।।

चिदंबरसहस्र नामावली संपूर्ण।। श्री शिव चिदंबरायर्पणमस्तु।। शुभं भवतु।। औदुंबर निवासी भक्ताभिमान राजाधिराज श्रीशिवचिदंबरेश्वर सद्गुरु महाराज की जय।।छ।। रचना १७६० शके.

७६४ क्र.२ **बाड** राजाराम

संतरत्न राजाराम महाराज यांची स्फुट रचना. गुरुगौरवपर रचना. त्यातील वानगी. प्रतकाराने मूळ मराठी रचना कानडी लिपीत लिहिलेली आहे.

(१) माझा धाक मानी त्रिभुवन लोक।।
यम कुंभी पाक धाक मानी।।धृ.।।
(२) आरती चिदंबरा।। ब्रह्माविष्णु महेश्वरा।।
कली माजी अवतारा।। जगद्गुरू विश्वंभरा।।धृ.।।
(३) सर्वालागी नाम मात्रा।। द्याली भरवोनी यात्रा।।धृ.।।
(४) जयदेव जयदेव जय चिदंबरा।।
कापुरारती वोवाळीतो ईश्वरा।।जय।।धृ.।।

(५) नामापरते मंत्र नाही।। वेदशास्त्र देती ग्वाही।।धृ.।।
इ. विपुल रचना.

७६५ क्र.३ चिदंबर चरित्र राजाराम

(के.ग्रं.अ.नों.पा.) संतकवी राजाराम शिष्याने मुरगोडच्या श्री चिदंबर महाराजांचे हे चरित्र लिहिलेले आहे. संपूर्ण रचना अभंगाच्या रूपाने आहे. राजाराम हे स्वामींकडे शके १७२७ मध्ये आले आणि त्यांनी या चरित्र लेखनास शके १७३४ मध्ये पौष वा १३ आरंभ केला असे कवी म्हणतो :

शके ते सत्रासे सत्तावीस साली।।
दुष्काळ पडीली उज्याई ते।।
शके सत्रासे चौतीस।। नाम साजे अंगिरस।।

७६६ क्र.४ राजाराम चरित्र सांबदीक्षित

(के.ग्र.अ.नों.पा.) श्री चिदंबर दीक्षित यांचे चरित्र त्यांच्या पणतवाने- सांबदीक्षित यांनी लिहिलेले आहे. या ग्रंथाचा रचनाकाल १९०८ च्या पूर्वीचा आढळतो.

७६७ क्र. ५ श्रीमच्चरित्र सखाराम गर्दे

(के.ग्रं.अ.नों.पा.) श्री चिदंबर चरित्रासच वरील नाव दिलेले आहे. याच ग्रंथास ब्रह्मगिरी जान्हवी असेही नाव आहे. ग्रंथाची रचना प्रचंड अशी आहे. एकूण चार पाद. त्या चार ही पादांत अनुक्रमे २७ + ४९ + ४४ + १९ अध्याय. एकूण अ. १३९ याखेरीज निर्वाण कथेचे ३ अध्याय. कवीने तुरुंगात लेखन केले. तो वेणुग्रामी-बेळगावात काही दिवस कारागृहात होता.

ग्रंथास नाव देण्याचे कारण :

श्री शब्द हा मुख्य होय सर्व शब्दात श्रेष्ठ ही।।
लक्ष्मी शोभा ज्ञाने यशश्री सुवाचक शब्द हो।।
वर्तती जनि ही रुढी श्री चिदंबर स्वामीते।।

तिसऱ्या पादातील २२ वा अध्याय स्वामी निर्वाणानंतर शके १७३७ मध्ये म्हैसाळ येथे लिहिला. जवळ जवळ दोन तपांचा काल या रचनेसाठी कवीचा गेलेला आढळतो. विविध प्रसंग व आख्याने यात आहेत. कवी बहुश्रुत होता. संगीत, छंदशास्त्र, ज्योतिष, पत्रलेखन, वास्तुशास्त्र वर्णन कवीचे संपूर्ण नाव सखाराम त्र्यंबक गर्दे तथा नाना. टिपूचा अत्याचार. त्याला शासन हा भाग आला आहे.

स्वामींच्या जीवनातील इत्थंभूत माहिती यात गोवली आहे. महत्त्वाचे चरित्र.

७६८ क्र. ६ अभंगगाथा विठाबाई

(के.ग्रं.अ.नों.पा.) प्राचीन मराठी कवयित्रीत जनाबाई, बहिणाबाई परंपरेत भर घालणारी. चिदंबराचे ठायी विठ्ठल पाहिला व अभंग वाणीतून पूजा केली. सुमारे चार हजार अभंग व पद्य रचना. संशोधकांना त्यापैकी ६०० अभंगच उपलब्ध. ही चिदंबर शिष्य राजाराम यांची शिष्या. विठाबाईची पूर्ण रचना एका गौडाच्या घरी पूजेत. विठाबाईच्या या गाथेत अभंगाचे वर्गीकरण आत्मचरित्रपर, चिदंबर स्वामीविषयक, भक्तकथा, नाममहिमा याप्रमाणे केलेले आहे. स्वतः विषयी ती नमूद करते :

माझे आईचे नाव संतुबाई जाणा।।
सांगते हो खुणा तुम्हा लागी।।
पिताचे हो नाव रामप्पा नायक।।
दोघे होते देखा पंढरपुरी।।
नाव ठेविती मजसी विठाबाई म्हणून।।
जन्म शके सत्रासे चौदा जाण।।
आषाढ हो मासी वद्य चतुर्दशी।।
मंगळवारी पहाटे प्रहरासी।।

गुरुविषयी ती अभंगात म्हणते :

विठाबाई म्हणे देह भाव गेले।।
चरण देखिले जेव्हा राजाराम।।
उठविती मजसी हस्त दोनी धरून।।
स्वामी पासी न्हेती मजसी जाण।।

आपण जनाबाई होतो. चिदंबर विठल होते. राजाराम नामदेव होते. हे तिला निजात्मबोध झाल्यावर आठवले. तिने या परंपरेतील अनेक प्रसंग तिथीवारासह दिले आहेत. सर्वच रचना प्रासादिक व भक्तिपर आहे. प्रथम राजाराम दिंडीत येते. नंतर चिदंबराचे दर्शन हा कथा भाग रचनेत येतो.

एका अभंगात ती म्हणते :

विठाबाई म्हणे।। जिवंत मरावे।।
चिरंजीव राहावे।। विदेहीने ।।

यावरून तिची अध्यात्मातील योग्यता सहज कळते.'

७६९ क्र. ७ अभंग गाथा राजाराम

(के.ग्रं.अ. नों.पा.) राजारामाची अभंग रचना विपुल आहे. राजारामाने एकूण दीड लाख अभंग व बहुत ग्रंथ लिहिले असे शिष्या विठाबाई नमूद करते. राजारामाने वडील-आई हरिसिंग व लक्ष्मी. रजपूत घराणे. गोदावरीच्या काठी बाभुळगावचे. त्यांचा जन्म १६९० शकेला झाला, असे विठाबाई सांगते.

राजाराम रोजगार कुसंगाबादची शिलेदारी सोडून तेलंगणातून कर्नाटकात आले. राजारामाची अभंगरचना विपुल अशी आहे. त्यातील थोडीच उपलब्ध.

कवीच्या अभंग रचनेची वानगी :

(१) नामपरते ते मंत्र नाही।। वेदशास्त्र देती ग्वाही।।
भागवती तो निर्धारी।। उद्धवासि सांगे हरी।।
स्वमुखे सांगे हृषिकेशी।। गीते माजी अर्जुनाशी
तोचि स्वये दिगंबर।। सांगे दासासी निर्धार।।
(२) सर्वालागी नाममात्रा।। द्यावी भरवोनी यात्रा।।१।।
सुखी व्हावे सर्वजन।। भवरोग तो जाऊन।।२।।
प्रेमरस पाजी जना।। चिदंबरा नारायणा।।३।।
व्हावा आनंद सर्वासी।। दास मनी इच्छा ऐसी।।४।।

७७० क्र. ८ निजात्मबोधं राजाराम

राजाराम कवीची वेदांतपर रचना. अ. १९. सं. ही संपूर्ण रचना मराठीत असून, ती प्रतलेखकाने पूर्ण कानडी लिपीत लिहिलेली आहे. वेदांताचा ऊहापोह महत्त्वाचा असा आहे. या ग्रंथाचे एकूण अध्याय १९ असून, प्रथमच्या १८ अध्यायांत सर्व वेदांत गुरू-शिष्य संवादात आला आहे. शेवटच्या अध्यायात चिदंबराचे चरित्र आणि राजारामाचे आत्मकथन आले आहे. कवीने आपली सर्व माहिती यात दिली आहे. प्रारंभी मंगलाचरणात कवी म्हणतो :

स्वरूप संवेदन मात्म दोवो।।
चकास्ती सर्वत्र सद्वेव सर्वथा।।
प्राणादि देहादि स्वरूप तोही।।
विधाती सर्वत्र परः शिवोही।।१।।

आपल्या सर्व रचनेचे हे सार आहे असे कवी म्हणतो. ही रचना शके १७५० भाद्रपद मास शुक्ल पक्ष चतुर्थी सिद्धीविनायक जयंती दिवशी झाली. ग्रंथात शेवटी फलश्रुती दिली आहे. राजाराम कवीच्या सर्व रचनेत या ग्रंथाचे महत्त्व विशेष आहे. या ग्रंथाचा कानडी अनुवाद गद्यातून झाला आहे. चिदंबर वंशजानेच तो केलेला आहे. परंपरेतील महत्त्वाचा ग्रंथ. या ग्रंथाचा पसारा खालील विषयाचा आहे.

मंगला चरणानंतर, निरावलंब, उपनिषद वाक्यार्थ, सहज समाधी सुख, सोहंस्वरूप, मृत्युनिरसन, मनविवरण, रजतम निरसन, शुद्ध सत्वगुण, ब्रह्मांड देह विवरण, वैराग्य, ज्ञान, अभ्यास मुक्त स्थिती, ज्ञान साधन अंग, साधन चातुष्ट्य योग, त्रिताप, भक्तियोग, ज्ञान लक्षण, अज्ञान लक्षण निरसन, ज्ञेयस्थिती, वर्णन. माया ब्रह्मैक्य वर्णन. अन्वय भक्ती, आत्मज्ञान दृश्य कारण--

आरंभी नमनात : श्री चिदंबर गुरवे नमः।। श्रीत्रिपुरसुंदर्या नमः।। श्री विश्वेश्वरायेन नमः।। श्री मार्तंड भैरवाय नमः।। श्री दत्त गुरुवेनमः।।

७७१ क्र. ९ चिदंबर अष्टोत्तरनाम राजाराम

श्री गुरू चिदंबर महाराज यांच्यावरील अष्टोत्तर नामावलीची रचना राजाराम यांचीच आहे. चिदंबर भक्तांना रोजच्या रोज उपासनेत उपयोगाकरिता ही रचना कवीने केली असून, यात 'दास' हीच नाममुद्रा दिलेली आहे. शेवटच्या कडव्यात फलश्रुती दिली आहे.

श्री नानचंद अमीचंद शहा संग्रह, आळंद

७७२ क्र. १ बाड

आ. २० × १३. सें. १७६ प्र.पा.ओ. ९ ते १०. अक्षर गुजराथी वळणाचे. शाई गडद काळी. प्रत्येक चरणास दंड रेषा लाल. दोन्ही बाजूंस व पानाच्या कडेस पण लाल रंगात जोड रेषा. जैन संप्रदायाचे महत्त्वाचे बाड. शेवटी १७ कोरी पाने. बाडाच्या वर गोट लावून शिवलेले लाल कापडाचे वेष्टण. आडवी पोथी. सुस्थितीत. रचनेत शार्दुलविक्रीडीत, वसंत तिलक, भुजंगप्रयात असा लाल शाईत मजकूर. अथसमाधिमण, जोगीरा सो, आराधना प्रतिबोध, निजामणि, मनोरथमाला, पंचपूजा, अरहंत पूजा, जयमाला, हिराचंदकृत पंचपूजा, शांती पाठ पुष्पांजली, जिनेंद्राय सप्तशत विंशतिसमुदाय पूजा विधान, ॐ श्री उत्तम क्षमादीदशलक्षण, व्रतपूजा अष्टक, क्षोणीदल संख्या, महागुरुस्मरण, पंचपदी, निजगुणस्थिती, महतीसागरकृतपदे, ब्रह्ममहती सागरकृत रवीव्रत कथा, जिनसागरकृत कलश- दशमीव्रत कथा, तत्वार्थाधिगमे मोक्ष शास्त्र,इ. विविध आणि विपुल रचना.

बाडात गुजराथी, हिंदी व मराठी रचना. स्फुट रचनेत. जीवनछंद, मनोरमाछंद, मृदंगीछंद, उपजात छंद, श्रग्धराछंद, त्रोटकछंद, कामक्रीडा छंद, नाराच छंद, स्वागत छंद, प्रमाणिकाछंद, स्वागताछंद, इंद्र व वज्राछंद, उपेंद्रवज्रा, इत्यादी नवीन छंद प्रकारची ओळख होते.

यातील वानगीदाखल काही पदे :

(१) पहिले दर्शन।। निः संकितादिक
दोष संकादिक।। न पाळिता।।धृ.।।
(महतीसागरकृत)

(२) सत्पहे मिथ्यात्व।। जो जीव आचरी।।
ज्ञोत्रसथावरी।। फिरे जीव।।धृ.।।

(३) धर्माचेनि सर्व।। पुत्र पौत्रादिका।।
वांछिद पूर्वक।। सुख होय।।धृ.।।

(४) पाप कर्माचे हे।। काणा आश्रव।।
जोडोनिया जीव।। दुःख भोगी।।धृ.।।

(५) पापी एकलाची अंती।।
कोणिन एति सांगाती।।धृ.।।

(६) श्रीजिन अहो श्री जिन।।
वंदिन तुमचे चरण।।धृ.।।

(७) आझुनिया।। मजतुजउमज पडेना।।
का भुलला नरदेहीरे।। आझुनि।।धृ.।।

(८) नको नको प्राण्या मोह जाळिगुंतु।।
काळ हा ग्रासितु क्षण क्षणी।।
काळ हा राक्षस। नेत असे जे का।।
मायलाप लेका। काय करी।।१।।

(९) आयुष्य इंद्रिय।। शरीर योवन।।
कुटुंबादिधन। अनिसहे।।धृ.।।

(१०) जग प्रकाशि तुज समान।।
इतर दीप नाही।। जग प्र.।।धृ.।।

बाडाचे शेवटी एका रचनेत कालोल्लेख आहे तो भाग :

संवत १९२३ माघ मासे कृष्ण पक्षे तिथौ ३ सोमवासरे फलटण ग्रामे श्री वृषभनाथ चैतालये मूलसंघे सरस्वति गलबलात्कारणे श्री कुंद कुदाचार्यान्वयं इदं ग्रंथलखा पितंशा हेमचंद साकळा भार्या खुशाल बाई उभय पुत्र प्रथम मोतीचंद गोचरवेरज अंबड ज्ञाति लघुशाखाया ज्ञानावर्णिकिर्मक्षयार्थ इदं ग्रंथ लखीपितंशा।। हीराचंद सुरचंद।। गोम आळंदकर नो त्रुट कोम।। श्री शहा माणिकचंद मोतीचंद आळंद असे लिहिले आहे. स्फुट रचनेत विविध व विपुल रचना. पद, लावणी इ. वरील कालावरून १३० वर्षांपूर्वीचे बाड ठरते.

७७३ क्र. २ **अनंतव्रतकथा** ब्रह्मजिनदास

वरील बाडातच ही रचना आहे. पृ. ११ × २. प्र.पा.ओ. ९. चरणास दंड रेषा. प्रथमची व शेवटची ओवी लाल शाईत. ओ. १००.

आरंभी : ॐ नमो सिद्धम् ।। अथ श्री अनंतव्रत कथा महाराष्ट्र भाषाछंदिक लिख्यते।। छंद शार्दुला विक्रिडा।। श्री मंगलमूर्ती देव जिनतू देवाधिदेव महा।। शोभे दर्शन ज्ञानं सौख्य विद्विये आनंत + री महा।। याने सार्थक नाम युक्त प्रभु तू आनंत नाथा भला।। देई सत्वरी आपुले पद मला मी वंदितो तुजला।।१।।

शेवटी : राजभाष गुजरातिक कथा ही।। पूर्वी ब्रह्मजिनदास कृताही।। जिनसागर कृतनिमहाष्ट्री।। सानु मारचिलीमिकिष्ट्री।।९९।। छंद नाराच।। सुदेश दक्षणात फलटणाभिधान सत्पुरी।। श्रेआदिनाथ चंद्रनाथ पार्श्वनाथ मंदिरी।। सकेहि सत्तरा-साव्यासि १७८२ रौद्र वर्ष माघ ही।। वसंत पंचमी भृगुदिनि कथा समाप्त ही।।१००।। इति श्री हिराचंद विरचिता श्री अनंतव्रत कथा महाराष्ट्र भाषा प्रदीप संपूर्ण।।छ।।

७७४ क्र. ३ **आदित्यव्रत कथा** हिराचंद

वरील बाडात ही रचना आहे. पृ. १० × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर सुबक. ओ. ८०.

आरंभ : ॐ नमो सिद्धम् ।। अथ श्री आदित्यव्रत कथा महाराष्ट्र भाषाकृदिक लिख्यते।। छंद. भुजंग प्रयात।। नमोस्तू श्रीपार्श्व प्रभूते विसावा।। भवआरण्य माजी जयाचा विसावा।। शुचीर्भूत होईन मी सर्वां अंगे।। कुधा तुज मी स्वर्ण पारीस संगे।।१।। छंद पंच चामर।। हंसवाहनी विनापुराण घेऊनी करी।। द्वादशांग भूषणांग शोभती अती बरी।। आठवी गणा दिशा दि ऐसि तू सरस्वती।। वंदितो मि हो प्रसन्न ग्रंथ आर्थिदे मती।।२।।

शेवटी : वेणीचंद्र अमोलिकाग्रह कथा छंदिक केली बरी।। शक्के सप्तद शाणिव्यासि (१७८२) बरवे रौद्र संवत्सरी।। मासे कार्तिक शुक्ल षष्ट मी रवीवारी कथा हे पुरी।।८०।। इति श्री हिराचंद विरचित महाराष्ट्र भाषा छंद बंध रविव्रत कथा समाप्त।।

७७५ क्र. ४ **दशलाक्षणिक कथा** ब्रह्ममहती

वरील मोठ्या बाडातील रचना. पा. ८ × २. प्र.पा.ओ. १०. ओ. ७५. अक्षर रेखीव.

आरंभी : ॐ नमो सिद्धम।। अथ दशलाक्षणिक कथा महती सागर कृत लिख्यते।। वोवी।। जयजया जि श्री जिनाग्रमणी।। वर्धमान तू त्रैलोक्य धनी।। समोशरणी अनंती किर्ती।। ज्ञानतरणी उगवला।।१।।

शेवटी : इति दशलाक्षणिक कथा।। श्रवणे मुखी श्रोता वक्ता।। व्रत धर्म ध्यान करिता।। मुक्ति कांतावरी सा।।७५।।

इति भट्टारक श्री देवेंद्रकीर्ति प्रीय शिष्य ब्रह्ममहती सागर विरचिता दशालाक्षणी व्रतकथा समाप्त।।छ।।१।।

७७६ क्र. ५ **शोडषकारण कथा** ब्रह्ममहती

आ. २० × १३ सें. पा. ६ × २. प्र.पा.ओ. १०. ओ. ५३. अक्षर रेखीव. चरणास लाल दंड.

आरंभ :

ॐ नमो सिद्धम ।। अथ शोडषकारण कथा व्रत लिख्यते।। छंद शिखरणी।।

जिनाधीशा देवा महति जिनतू अंतिल मणी।।
प्रभा फाके जेली समवशरनिते दिनमणी।।
कृपा दातारा तव पदि असे मुक्ति भरणी।।
प्रभुऐसा होसी म्हणऊनि तुला चिंतिमीमणी।।१।।

शेवटी : तोचि आश्रयमला फळलासे।। सदविवेकहृदय कळलासे।। त्या स्तवे व्रतकथा मम सांगे।।

वर्णितो महीत सागरसंगे।।५१।। ऐकति पठति सांगती भावे।। चित्त ठेवुनि तव स्थिर भावे।। आचरीत व्रत हे नर नारी।। तस्य तत्परताया शिवनारी।।५२।। इति श्री भट्टारक श्री देवेंद्र कीर्ती प्रियशीष्य ब्रह्ममहती सागर विरचिता शोडषकाराव्रत कथा समाप्त।।छ।।

७७७ क्र. ६ **पुष्पांजलीव्रत कथा** जिनसागर

वरील बाडातच ही रचना आहे. प्र.पा.ओ. ९. पा. ८ × २. ओ. १०४.

आरंभ : ॐ नमो सिद्धम।। अथ पुष्पांजली व्रतकथा लिख्यते।। छंद स्वागता।। गणपती जिनराज मुनी।। नमीन त्यावरि केवल वाणी।। हंसवाहन जयेसि विराजे।। निमित्ततिस बहु कवी राजे।।१।।

तुष्टली जरि सरस्वती ज्यासी।। दिव्य वाणी जरी वदवी जरि त्यासी।। जननि तेच दिसे सुख कंद।। वदवी तेच कथा मतिमंद।।२।।

शेवटी : ।।छंद उपेंद्र वज्रा।। श्री कुंदा कुंदान्वय सात्विक वंशी।। देवेंद्र किर्ती प्रिय सज्जनासी।। ऐसी कथा हे बरवीविधिने।। सांगीतली हो जिन सागराने।।१०३।। इति श्री देवेंद्र कीर्ति प्रिय शीष्य जिन सागरकृत पुष्पांजली व्रत कथा समाप्त।।१।।

७७८ क्र. ७ **रत्नत्रयव्रतकथा** महतीसागर

आ. २० × १४ सें. पा. ४ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर गुजराथी वळण. शाई गडद काळी. ओ. ३८. आरंभ हे भाष्य आहे.

आरंभ : छंद मनोरमा।। जंबुनाम ह द्वीप जे भले।। प्राग्विं देहते क्षेत्र शोभले।। कत्छकावती देश तो वसे।। त्यातर्वीत शोका पुरी वसे।।३।।

शेवटी : रत्नत्रये व्रत वधू नरजे करीती।। ते जन्म सानिव सुमुक्ति सुखा धरिती।। हे मुक्ति सौख्य पद शाश्वत आठवुनि।। देवेंद्रकीर्ती पद अंतरी आठवुनी।।३७।। रत्नत्रय व्रत कथा प्रथमोक्त सांगे।। बुद्धि विना महति सागर वर्णी सांगे।। जे ऐकती पठती सांगती अर्थ धर्मा।। ते भाग्य युक्त सुख पार्वात धर्म अर्थ।।३८।। इति श्री भट्टारक श्री देवेंद्र किर्ती पदनुत ब्रह्म महति सागर विरचिता रत्नव्रतकथा समाप्तः।।छ।।श्री।।१।।

७७९ क्र. ८ **कळशदशमीकथा** जिनसागर

प्रचंड बाडातील हे एक आख्यान. प्र.पो.ओ. १०. पा. ५ × २. ओ. ५०.

आरंभ : ॐ नमो सिद्धम।। अथ कळशदशमी व्रत कथा जिनसागरकृत लिख्यते।। छंद।। शार्दुलविक्रीड।। श्री मंगलमूर्ती देव जिनहा आधी धरा अंतरी।। तेव्हा होईल दुःख शांति बरवी सद्भाव आहे जरी।। वादे संतति पुत्र पौत्र धनहि धामोदिक संपदा।। अंति होईल मोक्ष सिद्ध पदवी जे शाश्वत सर्वदा।।१।।

शेवटी : ।।छंद।। ऐसी कथा हे जिनराज बोली।। श्री सद्गुरू गुरुणो परिपूर्ण केली।। निमित्य केले जिन सागराला।। या लागी वंदितसे बुधाला।।४९।। इति श्री देवेंद्र कीर्ती प्रियशिष्य जिन सागरकृत कळशदशमी व्रतकथा समाप्तः।।छ।।

७८० क्र. ९ **शिखरजीमहाराज लावणी** हिराचंद

क्र. १ च्या बाडात हिराचंदकृत ही लावणी आहे. एकूण १८ कडव्यांची ही रचना आहे. अक्षर रेखीव.

आरंभ : परमक्षेत्रसम्मेद शिखरजी कितीवरणू त्याला।।

सखया किती वरणू त्याला।। जाता येता अनेक यात्रा होती मनुष्याला।। परमक्षेत्र।।धृ.।। दक्षण देशामध्ये फलटण जैनांची काशी।। सखया जैनांची काशी।। आदि जिनादिक पंचभुवन श्रावक वस्ती खासी।। त्या आदिक ब्रह्म संघ मिळाला।। श्री दहीगावासी।।

शेवटी : आणिक एकूण पन्नास भवा मधि मुक्ति पाही।। सखया मधि मुक्ति पाही।। हेची हिराचंद म्हणे द्या प्रभु अस नको काही।। जो ऐसे तिर्थ न करी धिग धिग त्याच्या जन्माला।।

सखया त्याच्या जन्माला।। जाता येता।।०१८।।छ।। इति श्री हिराचंदकृत शिखरजी महाराज लावणी समाप्त।।छ।।१।।श्री।।

७८२ क्र. १० **बाड**

आ. १६ × १०।। सें. पा. ६०० × २. कागद जाड, तपकिरी, निळसर, पांढरा. संपूर्ण बाडात पुढील निम्मा भाग कोरी पाने. प्र.पा.ओ. ७ अक्षर मोठे. यात विविध स्फुट रचना. मराठी, हिंदी, संस्कृत, गुजराथी, स्तोत्र, भक्तकथा, सूत्र, चरित्र भक्ती, देवदर्शन, सहस्रनाम, अरहंत पूजा, कलिकुंड पूजाविधान, जयमाला, नंदीश्वर पूजा, इ. रचना. संकलनाकरिता प्रचंड बाड शिवून तयार केले, पण लेखनाचा भाग थोडाच आहे. विरुद्ध बाजूने पण थोडे लेखन. वादीराज मनुकाव्य. एकीभाव स्तोत्र. भूपालमहाराज विरचित भूपाल स्तोत्र. बाडात प्रथमची २५ पाने कोरी.

७८३ क्र. ११ **बाड**

आ. २० × १६।। सें. पा. ३०० × २. प्र.पा.ओ. १२. शेवटी ९४ पाने कोरी. मधोमध शिवलेली आडवी पोथी. अक्षर खूप मोठे. गडद काळी शाई. हस्ताक्षर विविध. प्रारंभ अनुक्रमणिका पृष्ठक्रमांकासह दिलेली. वरील वेष्टणं गोट लावून शिवलेले. आतून चिटाचे कापड. बांधण्यास वर्तुळाकार टोकास लांब बंद जाड नाडीचा.

यात हिंदी, मराठी, गुजराथी रचना. यातील संकलनात देवदर्शन, देवदर्शन वंदना, लघुतत्त्वार्थ, लघुसामायिक भाषा, विदेहक्षेत्र वीस तीर्थंकर, सामायिक सत्तावीस पाठई, समंत भट्टाचार्यकृत ब्रुहत्स्वयंवर, भक्तामरस्तोत्र, कल्याण मंदिर स्तोत्र, कुमुदचंद्राचार्यकृत, धनंजयसुरीकृत, दिषापहार, भूपालस्तोत्र, एकीभाव स्तोत्र, अभिषेक पूजा, दिक्पालार्चन विधान, क्षेत्रपाल पूजा, द्वितीय क्षे.पा. पूजा, पंचामृत अभिषेक, जिनसेनाचार्यकृत स्थापना, सहस्रनाम, व्योमापगाद्युआष्टक, माघनंदीकृत चतुर्विंश तीर्थंकार जयमाला, अरहंताष्टक, संसारांक इ. रचना.

काही मराठी रचनेची वानगी :

(१) जय जय मेरु जिनेंद्रा।। भुवनत्रये कुमुदनि चंदा।।
पदयुगनुत्तसुरछंदा।। करु आरती करुणा नंदा।।धृ.।।

(२) आरती पार्श्वनाथाची
पहिली आरती गर्भ सुरनारी।।
आरती।।१।।
दुसरी आरति जन्म भयोरी।।
इंद्र सभेस उत्साह करे री।।२।।

या बाडात मराठी रचना तुरळक आहे. हिंदी रचना विपुलतेने आढळते.

७८४ क्र. १२ **उपदेशरत्नमाळा**

आ. ३२ × १३ सें. प्र.पा.ओ. १०. कागद निळसर जाड. गडद काळी शाई. प्रत्येक चरणास लाल दंड रेषा. अ. ६ ते ३३ उपलब्ध. प्रथमची व शेवटची पाने गहाळ. त्रु.

प्रारंभ : उपलब्ध पहिल्या भागाचा आरंभ : श्रीवीत रागाय नमः।। त्रैलोक्यामाजी जे सार।। पंच परमेष्टी भव्याधार।। त तू चरणी मम नमस्कार।। असो वारंवार भक्तिभावे।।१।।

जिन वत्क्राब्जाचे मंडन।। मुनीगण धराचे भूषण।। इंद्रादी करीती पादसेवन।। त्या भारती कारण नमस्कार।।२।।

३३ व्या अध्यायाचा शेवट : इति श्री भट्टारक श्री सिद्धसेन प्रिय शिष्यच्चार्य रत्नकिर्ती विरचिते उपदेश रत्नमाळा ग्रंथ गुरुसेवा वर्णनाम प्रसंग।।३३।। तेहत्तिसावा।। वोव्या संख्या।।९४।। श्री जिनेंद्रार्पणमस्तू।। शुभंभवेतू।।छ।।छ।।छ।।

७८५ क्र. १३ **पांडवभवांतर** यशकिर्ती

आ. ३२ × १३ सें. प्र.पा.ओ. १०. त्रु. पृ. १६४ × २. विस्कळित पाने. अक्षर मोठे. हिंदी रचनेसह मराठी ओव्या. गुजराथी रचना पण अधुनमधून उपलब्ध.

एका अध्यायाचा शेवटचा भाग : इति श्री पांडव पुराणे भट्टारक श्री यशकिर्ती विरचिते. पांडव भवांतर श्रवण वैराग्य धारणाय सर्ग महान अंतकृत केवलीत्रय पांडव मुक्तिगमन नकुल सहदेव सर्वार्थ सिद्धी गमन कुंती शैयदिराजमति सुत शरित्त।।

शेवटच्या पानावर :

शाहेमचंदशा कळा अळंदकर नो ग्रंथ ।।छ।।

रचनाकाल नाही.

७८६ क्र. १४ **यशोधर मुनिराश**

आ. २६ × १५।। सें. पा. ३३ × २. प्र.पा.ओ. १२. कागद घोटीव पातळ. दोन्ही बाजूंस लाल दंड रेषा. पानाच्या कडेने पण जोड रेघा. अक्षर मोठे. गडद काळी शाई.

आरंभी : श्री तिर्थंकराय नमः।। अथ यशोधनोरास लिख्यते।। वस्तू मूनीसूवृतमूनिसूवृतस्तवुतेसार।। तिर्थंकर जेविसमा।। वांछित फल बहूदान दातार सारदा स्वामीवलि स्तवुं।। जिमबुद्धि सारदू वेगे मागु।। गणधर स्वामीने नमोस्तुकरुं।।....

शेवटी : इतिश्री जसोधरनोरा समाप्त।। राजारामारीदत

आधार।। जोगी भैरवानंद छे।। राजा जसौर्थ राणी चंद्रमती।। पुत्र जसोधर।। राणी अमृतादेवी।। जसोमतिपुत्र।। बाई अभेमती आता अभेरुचि श्री छे।। संवत १८१० श. १७५५ फागण श्रुदि. भौमे समाप्तं।। श्री छे।। श्रीछे।। श्रीछे।। साहा हरिचंद भवातुनुले।।छ।।

७८७ क्र. १५ **भक्तामर स्तोत्र** दुगाचार्य

आ. २७ × १६ सें. त्रु. शेवटची पाने उपलब्ध. अक्षर साधारण पण खूप मोठे. शेवटच्या पानावर पृष्ठ क्रमांक ६४.

शेवटचा भाग :

हे स्तोत्र माल जीन जीन दुजिया गुणाचि।।
नाना सुवर्ण रचनारचिलि फुलाची।।
कंठी धरील नर जो सूभ भक्ति लब्धे
हो मान तुंगपद पावल येक लब्धि।।४९।।
माझा मनात भरला मुनिशक्रकिर्ती।।
तो स्तोत्र पाठ वदला गुरु पुष्पमुर्ति।।
मी बालक हाच नमिले जिन सागराला।।
द्यावी क्षमा विनवितो बुधि पंडीताला।।५०।।

इतिश्री मानदुगाचार्य विरचित भक्तामर स्तोत्र संपूर्ण।। श्री छे।। श्री छे।। श्री छे।।

७८९ क्र. १६ **रामायण**

आ. २९ × १६ सें. प्र.पा.ओ. १२ पृ. १२३ ते ३८२ × २ उपलब्ध (पा. २५९)– अक्षर खूप रेखीव. कागद जाड. पांढरा चिवट. प्रत्येक चरणास लाल दंड. रचनेत पद, आर्या, दोहे. रागतालांचा निर्देश. मूळ प्रचंड ग्रंथाचा भाग उपलब्ध. यातील पृ. १२३ वरील मजकूर.

सीतेचे या परि ऐकोनी।। कोपली मंदोदरी राणी।। तिडक परि उठली तत्क्षणी।। वदतसे हिराचंद वदनी।। सीतेसी कलह करीत भारी।। असे का : ।।७।।छ।।६८।। आर्या।। तेव्हा हनुमंत वदे।। मंदोदरी कोपना किजे काही।। दारिद्र्य दुःख कोपे। कोप करूनि अधोगती पाही।।६९।।

— सीता ऐकुनि उठुनी स्नान ही केले।। धौत वस्त्र लेऊनि श्री जिनवर पुजिले।। दान भावना भावोनित या वेळे।। मौन्य सहित भोजन सुभ ठाई केले।। वात्सल्य करूनि पुण्य जोडिले येरा।। सीतावरि मोह धरूनि गेली स्वघरा।। संपूर्ण २५९ पानांतून रामकथेचा भाग दिला आहे.

शेवटचा भाग नसल्याने ग्रंथाचे नाव, लेखनकाल व रचनाकार वा प्रतकार यांचा निर्देश नाही. रचनेत हिराचंद वदनी असे आले त्यावरून हिराचंद कवीने ही रचना केली असे दिसते. असलेली त्रुटित प्रत सुस्थितीत आहे. जैन संप्रदायात रूढ असलेल्या रामकथेचे आख्यान येथे ग्रंथित झालेले आहे. प्रसंग आगळे वेगळे भासतात. रामायण नाव संपादनाच्या वेळी दिले आहे.

७९० क्र. १७ **पदपदांतरे**

आ. २० × १३ सें. पृ. ३० × २. प्र.पा.ओ. ९. अक्षर मोठे. शाई गडद काळी. कागद जाड. यात विविध पदे. हिंदी, गुजराथी, मराठी, काही संस्कृत रचनेचे भाष्य. मराठी २०-२५ पदे. यातील काही पदांचे धृपद :

(१) श्री जिननाथा शिवपदाता।।
मजला तारी रे।। श्री जिन।।धृ.।।
(२) करिजे सुपात्र लागीदान।।
च्यारि प्रकारे हो।। करिजे।।धृ.।।
(३) धरा हो श्रावक व्रत बारा।।
नका बांधू पातक भारा।।धृ.।।
(४) पाहा बलिदान कर्म मोठे।।
चुकाने भोगाविण कोठे पाहा।।धृ.।।
(५) चला कैलासाला जाऊ।।
तीन चोविसि पूजुनि येऊ।। चलाकै।।धृ.।।
(६) वद वद वद रसनि श्री जिननाम।।
नाम नाम नाम ।।वद वद।।धृ.।।
(७) अरे हो रे मानवा रे।। अरे हो रे मानवा रे।।
पाहाया नीतीने फार झाले।। मानवा रे।।धृ.।।
(८) सोडुनिया अभिमान।।
आता रत जिनपाई।।धृ.।।
(९) अखंड वाचेना म जीनाचे।।
तया न बाधे काळ आळ हो।।धृ.।।
(१०) पूर्वी म्या काय पाप केले।।
म्हणुनि दुःख असे झाले।।धृ.।।
निंदा केलि साधुसंतांची।।
पुजा खंडिली जिनदेवाची।।
मोडिली आज्ञा मि गुरूची।।
आशा तोडिली जनत सुताची।।
आनि सप्तव्यसन आदरिले।।
म्हणूनि।।१।।

अशा विविध रचनेत कुठेच कवीचा उल्लेख वा नाममुद्रा नाही. सर्व पदांना रागतालांचा निर्देश आहे.

७९१ क्र. १८ **बाड**

आ. ११ × ११ सें. प्र.पा.ओ. १०. पृ. २२ × २. अक्षर निष्काळजीपणाने काढलेले. कागद तपकिरी जाड. निम्मी पाने कोरी. यात पदे कानडी लिपीत, हिंदी व मराठीमध्ये आरती.

काही स्फुट रचना. काही रचना बाळबोध लिपीत. लेखनकाल नाही.

७९२ क्र. १९ **बाड**

आ. १० × ८ सें. बांधीव आडवी वही. वरील वेष्टन कडा शिवलेल्या. पाने ८० × २. दोन्ही भागाकडून लेखन. मधली पाने कोरी. दोरीने बांधण्याची सोय केलेली. कागद जाड, पांढरा व निळा रंग.

आरंभी व शेवटी कन्नड लिपीतील रचना. मराठी रचनेत एक मेरूची आरती महत्त्वाची :

प्रारंभ :

अध मेरुची आरति प्रारंभ।।
जय जय मेरु जितेंद्रा।. पद युगल नुता सुरवृंदा।।
भुवनत्रय कुमुदनिचंद्रा।। करु आरति करु आनंदा।।धृ.।।

शेवटच्या सातव्या कडव्यात :

शके सोळाशेचाळीस।। शुचिभाद्रपद पंचमी दिवस।।
गुरुधर्म चंद्र उपदेश।। गुण सागर भणोउल्हारा।।
जय।।७।।संपूर्ण।।

या रचनेवरून बाड शके १६४० चे आहे. अक्षर ठळक. प्रतकार अज्ञात.

७९३ क्र. २० **आदीपुराण** महेंद्र कवी

आ. २१ × १५ सें. प्र.पा.ओ. १२. अक्षर खूप मोठे– रेखीव. गडद काळी शाई. प्रत्येक चरणास लाल दंड रेषा. दोन्ही भागांस जाड रेषा. पृ. १७९ × २. आडवी बांधीव वही. प्रथमची व शेवटची पाने गहाळ. यात पुराणातील १२ आख्यानरचना आहेत. रचना महत्त्वाची असल्याने खालील नोंद तपशिलाने दिलेली आहे. उपलब्ध ओव्या ३०७८. त्रु.

(१) प्रथमच्या प्रसंगात ११२ ओळीपासूनचा भाग आहे. तो भाग----।

सुखमदुखम ना जरि। येक कल्प अयुनिधर्मरि।। जुगलाचा।।११३।। शरीर उंच येक कोश।। येक दिना भूक लागे त्यास।। अवल्या प्रमान जेवायास।। अन्न पाहिजे।।

शेवटी : हे कथां यथं राहिली जान।। आयका पुढील अनुसंधान।। उत्पत्ती आता सांगेन।। आदिस्वराची।।२५६।। आता भवांतर सांगेन व्यगली व्यगळी करून।। श्रोति अय कीजे समाधान।।

पून्यें स्तवं।।२५५।। हे चरित्र पून्ये पावन।। कथा थोर आदि पुरान।। गुरु क्रपाळीली म्हनवून।। वोवी केली।।२५६।। वोवी केली मर्हाष्टवानी।। महिंद्र म्हणे मी अज्ञानी।। श्रोतीं न्यावं सावरूनी।। क्षेमा करावी।।२५७।। हे चरित्र महापुरान।। हस्ताक्षर आंबाजी जैन।। नसेलं कान्हामात्राव्यंजन।। श्रोते न्याव सावरोनी।।२५८।। प्रसंग पहिला।।छ।।छ।। अध्यायानंतर लाल रंगात काळ्या शाईने वेलबुट्टी काढलेली.

प्रसंग २ : अति बल राजाची कथा : ओव्या।।५१२।।
वोवी केली देस भासे।। महीचंद्र म्हने मज नसे ज्ञानसे।।
श्रोते सेधाव आक्षेरासे।। सुध करावे।। प्रसंग दुसरा।।२।।

प्रसंग : १ ते १२ पूर्ण असून, १३ वा प्रसंग त्रुटित आहे. ओवी क्रमांक सर्व अध्यायांना सलगच दिल्याने शेवटच्या १३ व्या अध्यायाच्या उपलब्ध पानात ओवी क्रमांक ३०७८ असा क्रमांक आहे. एकूण ही रचना प्रचंड अशी आहे.

शेवटचे पान नसल्याने रचनाकाल व प्रतलेखक अज्ञात. जैन संप्रदायातील महत्त्वाची रचना.

७९४ क्र. २१ **बाड**

आ. १३ × ९ से. प्र.पा.ओ. ११. पृ. ६ × २. बाडाची सुटी पाने. कागद जाड. अक्षर बारीक, गडद काळी शाई. यात स्फुट रचना. हिंदी, मराठी, गुजराथी.

वानगी :

(१) ॐ गुरधैर्य धुरंधर।। त्याचे पटस्थानी।।
देविंद्रकिरनी महामुनी राजे।।
पंचतत्त्वज्ञानी।। आनं।।५।।

(२) अथ गुरुची आरती।।
प्रथम नमन गुरुवर्या।। सारदमाता माहामाया।।
नमिन साधुसंतांसी।। आरती करीन तुज पाया।।धृ.।।

(३) वोवाळु आरती भावे श्री जीन देवा।।
जन्म जरात्रये मृत्युनीवारण दे मुक्तीठावा।।धृ।।

(४) पंचप्राणाची जोती।। अंतरिन पदांबु ज्या।।
जय जय गुरु राजा।।धृ.।।
गुरुविन मारगन दिस जप तप कैच तयास।।
टाकि विकल्प भेद मग होईल गुरुपद सित्ध।।
जय जय।।१।।
गुरु सकलांचा तारू।। भक्त वत्छला ही थोरू।।

जे नरनारी हो ध्याती।। उतरीन भवसिंधु पारु।।३।।
गुरु परब्रह्म केवळ।। इतरा न कळे कळ।।
गुरुपादांबुज महिमा।। देई निजपद आढळ।।४।।
मलखडे सिंहासन आदि।। भट्टारक वादि विद्यानंदी।।
त्याच्या परी सहित वाळ...

जैन संप्रदायातील पूजेच्या उपचाराबद्दची रचना.

७९५ क्र. २२ **नित्यत्रिसकेपूजा**

आ. २१ × १४ सें. प्र.पा.ओ. १०. अक्षर मोठे. कागद जाड. मधला भाग कसरीने खराब. पृ. २४ × २.

प्रथमची १३ पाने ही कानडी लिपीतील रचना. पुढील निम्मा भाग मराठीत.

श्रीवीर।। श्रीवितरागायन नमः।। नित्य त्रिसेक पजालिखितं ॐ नमासिधिय्या ॐ कार... गुजराथी वळणाची अक्षरे. संस्कृत श्लोकासह विवेचन. ।।बिरुदावली।। इ. रचना त्रुटित भाग असल्याने. लेखनकाल नाही.

७९६ क्र. २३ **बाड**

आ.१६ × १२ सें. प्र.पा.ओ. ९. कागद जाड तपकिरी. शाई गडद काळी. अक्षर मोठे. प्रथमची व शेवटची पाने गहाळ. पृ. २० × २. शिवलेली आडवी वही. उपासना व उपचाराची रचना. आरती, अष्टक इ. क्वचित कानडी लिपीतील एखादे पान.

पुष्पांजली क्षपेत।। इति सकळी कारण संपूर्ण।। मंगळ महा श्री।।छ।। ही २० ओवींची रचना.

गुरूची आरती : जय जय गुरुमूर्ति।। महामति सुरिंद्रकिर्ती गछपती।।धृ।। आरती. ७ कडवे.

दुसरी आरती :

प्रथम नमो श्रीपारिस्वजि ने शे ची।।
दुजे हा विलासनि..।।धृ।।

ही प्रदीर्घ ९ कडव्यांची आरती. पुढील पाने गहाळ.

७९७ क्र. २४ **बाड**

आ. १६ × १२ सें. प्र.पा.ओ. १२. बांधीव वहीचे शिवण उसवलेले. वाळवीने पाने सुटी झालेली. शिवणाचा भाग सुटून पाने वेगळी झाली. उभा आकार. दोन्ही बाजूला लाल रेषा. चरणास दंड रेषा. विविध रचना. पृ. ८० × २.

प्रथम ६४ ओवींचे शिखर माहात्म्य. त्याच्या शेवटी : ।।इति श्री रम्येद सीखरमाहात्म्य विनंती चंद्रकिर्ती विरचितं।। ज्ञान वर्णिकर्मनिवारनार्थ शुभं भवतु।।छ।।

अभंग, अनुसंधान भवात आदिनाथ स्वामीकृत.

राजमती विनंती रचना, **लावणी, एका बापूदास कवीची** बरीच रचना. दशलक्षणीक **स्वयंभु, रचना. इ विविध प्रकरणे.** रचनाकाल नाही.

७९८ क्र. २५ **बाड**

आ. ११ × १५ सें. त्रु. पृ. १२ × २. अक्षर मोठे. काळी गडद शाई. कागद चिवट पातळ. उजवीकडील भाग अर्ध वर्तुळाकार असा कसरीने खाल्लेला.

यात हिंदी, मराठी, रचना. संस्कृत श्लोक. एक मराठी, वेधक रचना–

ठीपुरे घालीती बाळा सकीये सांगा।।धृ।।
सुमती मुखरनी कुमतीत या।।
वादेनी आदाऽपाहाऽदोती बोले।।
आपुलाली कानी ठीपुरे घाली बाळा।।३।।
येकशे आठ ताळी करम प्रक्रतीवीची।।
प्रखर आसे आनुधीनी ठीपुरे घालीती बाळा।।४।।

ही रचना ६ कडव्यांची. वाळवीने बाडाची दुर्दशा. लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

७९९ क्र. २६ **बाड**

आ. १७ × १० सें. प्र.पा.ओ. ६. अक्षर मोठे. काळी शाई. कागद निळसर जाड. पा. ३० × २. प्रत्येक चरणास लाल दंड रेषा. त्रु. आडवी पोथी. स्फुट रचना. मराठी, हिंदी. पृ. ५१ क्रमांकापासून पुढील भाग. म्हणजे मूळ मोठी वही होती.

(१) पाचारण करति सुरस कलरी देवासी।।
धर्म येक जेथे गगन स्थिर ताती।।
पाहुनी रचीत तेथे समवश रणासि।।
हे आतिशयं चौतीस शोभति तुजपासी।। जयदेव।।५।।
असोक वृक्षाखाली सिद्धासन तिनी।।
त्या वरत्राधरचेतुरांगुल गगनि।।
चौसष्टीच्या मरतिल वर छेत्र तिनि।।
भां मंडळ विराजी तनम हारक तरणी।।६।।
श्री आया आरिहंत आरती।।छ।।

(२) पार्श्वनाथ आरती।। शेवटी–
पंचमी आरति सीवपद धारी।।
बाळकृष्ण जीनभक्ति विच्यारी।।६।।

(३) नंतर बावन जीनदेवाची आरती–
जयदेव जयदेव जय बावन जिनदेवा।।
जय बावन जिनदेवा।। आरती करू तुमचेरणी
भव जेल निधी ना वा।।धृ।।
(४) जिन गुण सागर गावे भावे सुरकांत।। जय।।७।।

अशी एक आरती आनंदेश्वराची–
(५) जय जय पद्मावती गुणवंती।। सुंदर तुज मोरति।।
भावे करीन मी।। आरती देखील सुख संपत्ती।।धृ।।
सरस्वतीची आरती, गुरुचंद्रकिर्ती आरती,
(६) वारस बेसी आलो मी।।
जीवन पद तुज पाहीन मी।।वारस।।धृ.।।

स्फुट रचनेचे हे खूप मोठे बाड असावे. काल दिला नाही.

८०० क्र. २७ धन्यकुमार चरित्र ब्रह्मजिनदास

आ. ३२ × १० सें. प्र.पा.ओ. ६. अक्षर मोठे रेखीव. कागद जाड. कडा जीर्ण. प्रथमची ओवी लाल. एकूण ओ. ५२५।।. गुजराथी वळणाची लिपी व भाषा. सं. पा. ३३ × २.

आरंभी : श्री गुरुभ्योनमः।। झंडि चोवीस तिर्थंकराय नमः।। अथ धन्यकुमार चरित्र लिखिते।। श्री वीर जिनवरमतेनुसार।। तीर्थंकर चोवीस मो।। वांछित फलदान दातार।। शारदा स्वामी बलिस्तऊ।। बुद्धिसार।। देवो मात।। श्री सकलकिर्ती पाय प्रणामिने।। श्री त्रिभुवन किर्ती अवतार।। धन्यकुंवर कथा वरणऊ।। ब्रह्मजिनदास कहे सार।।२।। माया जशोधरनी।। प्रथम जंबुद्विप माजी सार।। भरत क्षेत्र जग जाणे।। मालवदेश मजार चंग-उ जेणी नगरी वर वाणो।।..

शेवटी : गुरु भुवनकिर्ती मुनिराय।। ब्रह्म जिनदास म्हणे।। स्फुरता निरमल काय।।५२५।। इतिश्री धन्यकुमार नो कथा संपूर्ण।।छ।।

८०१ क्र. २८ सोळा भावना

आ. ३२।। × १४ सें. प्र.पा.ओ. १०. कागद चिवट जाड पांढरा, काळी गडद शाई. अक्षर सुंदर गुजराथी, हिंदी. मिश्रित लेखन. प्रत्येक चरणास लाल दंड रेषा. पृ. १०४ × २. मूळ हिंदी रचना असावी.

शेवटी : इति श्रीषोडश भावना संपूर्ण।।१६।।

सवंत १९४७ शके १८१४ नंदन नाम संवत्सरे मिती कार्तिक व ८ रोज सारे लि. एकनाष्ठा शांति बुबने।। सोलापूर।।छ।। समाप्त।। शुभं भूयात।।छ।।१६।। १६ भावना संपूर्ण।। श्री वीतरा देवायनमः।।१६।।छ।।

ग्रंथ सुव्यवस्थित आहे.

८०२ क्र. ३० सुदर्शनचरित्र

आ. ३४ × २० सें. प्र.पा.ओ. ९. अक्षर खूप मोठे. कागद पातळ. संपूर्ण लाल शाईत बोरूने लिहिलेले. मूळ संस्कृत हिंदीचा भाग त्याचे विवेचन. पृ. ५२ × २.

शेवटी : इति श्रीसुदर्शन चरित्र समाप्त।। संपूर्ण।। श्रीरस्तु कल्पानमस्तु नमोस्तु नमस्तु नमस्तु।। हे ग्रंथ करितं लिखितं सात्रा भाइचंद गोवनजि गाम कलतकर दस्तुरखुद।। पुढील पानावर

यग्रंथ सुदर्शन नाम गाम वऽगाम नदिहरपारसनाथसामिनामुकोछशाकं स्तुर व स्ता वडगाम कर बदल जात ज्यो १९४३ नाव इशाख व ३० भाइचंद्र गोवनजि दस्तुर खुद्द।।.

८०३ क्र. ३० पांडव महाभारत पुराण

आ. ३२।। × १९ सें. अक्षर मोठे. प्र.पा.ओ. १६. पृ. १६४ × २. गडद काळी शाई. केशरी दंड रेषा. अक्षर नेटके. प्रथमची २ पाने नाहीत. मूळ संस्कृत संहितेसह विवेचन. कागद जीर्ण.

शेवटी : इति पांडव पुराणे महाभारत नाम्नि भट्टारक श्री श्री शुभ चंद्र प्रणिते ब्रह्म श्रीपालसहाय सापेक्षे पांडवोपसंर्गसदन केवलोत्पत्ति मुक्ति सद्वीर्थ तिध्दीगमन श्री नेमिनाथ निविण गमन वर्णननाम पंचविशीततमपई।।२५।। मार्गसिर मासे संवत १६२३ शुक्ल पक्षे ११ बुध वासरे. रेवती नक्षत्र सिद्धयोगे विष्ट करण वागड देशे स्थाल शील शुभस्थाने श्री वास्तुपूज्य चैतालये श्रीमत्वाष्टसंघे नदीतटगछे विद्यागणेश भट्टारक श्री उदयसेन आचार्य श्री जयसेन स्वपठणार्थ लिखितं पूर्वा।। तत्पतिमय पश्यनीया इदं पांडव पुराण महाभारत अवलोकनीया पंडित श्री भाई ठाकूरदास साधर्मी स्वहस्ते लिखितं।।

८०४ क्र. ३१ उपदेशरत्नमाळा रत्नकीर्ती

आ ३२ × १३ सें. प्र.पा.ओ. ९. अक्षर मोठे नेटके. गडद काळी शाई. कागद निळसर जाड. प्रत्येक अध्यायाचा भाग दोरीने बांधलेला. अ. ३३. सें.

आरंभी : श्री वीतरागाय नमः।। श्री आळंदी पारीस्वनाथाय नमः।। श्री सारवाये नमः।। श्री गुरुभ्यो नमः।। आथा उपदेश रत्नमाळा प्रारंभ निरोपणं।। युगांतरी जेष्ठ जीनवर।। श्री आदिनाथ

तीर्थंकर।। तयाची चेरणी नमस्कार।। वारंवार सेवकाचा।।१।। अजित शंबवाभिनंदन।। सुमति पद्म प्रभजन।। सुपारीश्वचंद्रा-भाष्टम।। आसो मम द्वदन सदैव।।२।। पुष्पदंत सीतळनाथ।। श्रयांस वासु पूज्य कर्त।। सार्थवाहमूक्ति पंथ।। प्राप्त अर्था नमस्कार।।३।।

शेवटी : हिंसा मार्ग त्यजावा दूर।। असत्ये न वदावे चतुर।। न करावे तस्करासी व्यवहार।। जेणे कथिले सार धर्म तोची।।९०।। नित्य वदावे अष्ट मद।। जेणे होय पापबंध।। ऐसे जाणोनि भावभेद।। धर्म शुद्ध आचरावे।।९१।।

इति भट्टारक श्री सिद्धसेन प्रिय शिष्याचार्य रत्नकिर्ती विरचितं।। उपदेशरत्नमाळा ग्रंथ गुरुसेवा वर्णनो नाम त्रिशतीमोध्याय।।३३।। सं. ९३।। रचनाकाल दिलेला नाही.

८०५ क्र. ३२ **पूजाविधान**

आ. ३० × १२ सें. प्र.पा.ओ. ८. अक्षर मोठे. लाल दंड रेषा. शाई गडद. कागद जाड. पृ. १३ × २.

यात संप्रदायातील पूजा पद्धतीचे मंत्र व विधान याचे विवेचन. काही गुजराथी शब्द. शेवटी इतिश्री त्रिकाळ चौविसी पूजाविधान संपूर्ण मिती जगाम।। संमत १८६६ मिती जेष्ठ कृष्णात् १२ गुरु. प्रतकाराचे नाव नाही.

८०६ क्र. ३३ **चरसासमाधी**

आ. २२।। × १२।। सें. पृ. ६२ × २. प्र.पा.ओ. ११. अक्षर गुजराथी वळण. गडद काळी शाई. चरणास लाल दंड रेषा.

वरील पानावर : अथ चरचा समाधि ग्रंथ प्रारंभ पान पहिलेचे असे।। त्यावर संपूर्ण लाल शाईत वेलबुट्टीने सजावट.

शेवटी : चरचा समाधान ग्रंथ नाम ग्रंथ संपूर्णमस्तु।। शुभंभवतु।।छ।। सवंत शालिवाहन शके १७९६ भावनाम संवत्सर वैशाख मासे कृष्ण पक्षे ४ चतुर्थ प्रहरी लेखन संपूर्ण।। श्री मूल संघे सरस्वती गच्छे श्री...

शेवटी इतिश्री चरचा समाधि ग्रंथ संपूर्णमस्तु श्री जीनार्पण मस्तु।।

८०७ क्र. ३४ **पद्मावतीकथा** जीनसगर

आ. २१ × १५ सें. प्र.पा.ओ. १०. अक्षर साधारण मोठे. काळी शाई. कागद जाड. पृ. १० × २. ओ. ६५

आरंभी : ०।।२४।। श्री शांती नाथाऐ नमः।। पद्मावती माता च कथा लीख्यते।। वंदिन पार्श्वरचीत्तरंगे।। ते सत्थ मिथ्या निवडी गी अंबे।। चीतातुरंगे करि वंदनाला।। जसे असे सिद्ध करी तयाला।।१।।

शेवटी : २-५६१ नेत्र बामर इंदुकेशी।। अश्विनात सितद्वादशी मिदिशी।। पूर्ण दे कथन माझे मती ने।। अधिकते करिया जनी शहाने ।।६५।। इतिश्री पद्मावती कथा जीनसगरकृत संपूर्ण।। श्री शुभगर्पणमस्तु।।छा।।छ।। हा काळ शके १६५२ चा येतो.

८०८ क्र. ३५ **रविवार पूजा**

आ. २८ × १२ सें. प्र.पा.ओ. ९. पृ. २० × २ अक्षर रेखीव. लाल दंड रेषा चरणास. पाने जाड पण कसरीने दुर्दशा झालेली प्रत. मूळ संस्कृत संहितेसह हिंदी, गुजराथी, मराठी विवेचन भाग.

शेवटी : श्रीयकांतिम रोगतासं।। परोपकारां मुदमेवदिया।। दिशं तुकामाधिकरूप मंत्र।। जिनेश्वर केशव सेन पूज्या।।८।। इत्याशीर्वाद।। इतिश्री रबिबार पूजा समाप्ते।। समत १८६६ मिती जेष्ठ कृष्णात ५ भृगु दिने।।छ।।

८०९ क्र. ३६ **चरसासमाध्यन**

आ. २७ × १६ सें. प्र.पा.ओ. १३. कागद जीर्ण. अक्षर मोठे. काळी शाई. दंड रेषा चरणास लाल शाईत. पृ. ५ × २. त्रुटित प्रत. पुढील पाने गहाळ.

८१० क्र. ३७ **रत्नपाळचरित्र**

आ. २३ × १७ प्र.पा.ओ. ११. अक्षर मोठे सुटसुटीत. कागद जीर्ण. चरणास लाल दंड रेषा. अक्षरवाटिका गुजराथी.

आरंभी : ॐ नमो सिद्धेभ्यो नमः।। श्री सरस्वती नमः।। श्री गुरुत्वरण कमलेभ्यो नमः।। श्री सरस्वती प्रसन्न वरदा भवंतु।। अथ श्रीरत्नपाळमुनी चरित्र प्रारंभ्यते निरोपणं।।दोहा।।

श्री वृषभादिक जिननमु।। वर्तमान चोवीस।। श्री मंदिर प्रषानमु।। वेहरमान वलीवीस।।१।। वृषभसेन गौतम नमु।। गणणूधर यथागुणवंत।। चऊ देशाबावन नमु।। मोठा महिमावंत।।२।। सुमरु श्री सारदा।। तिन त्रिभुवन विख्यात।। विणा पुस्तक धारुणि सुत्रमति आयो मात्तं।।३।। निज गुरु नाम जप सदा।। सिद्धिरिद्धी दातार।। मुरखने पंडित करे।। हे मोठा उपगार।।४।।...

गुजराथी व हिंदी. दोहे अधुनमधून रचनेत. ५० पानांचा मजकूर असून, पुढील पाने गहाळ आहेत. प्रतलेखक व काल नाही.

८११ क्र. ३८ धर्मविलास भाईचंद्र

आ. ३५ × २२ सें. प्र.पा.ओ. ९. अक्षर खूप मोठे. लाल दंड रेषा चरणास. कागद भिजून चिकटलेले जीर्ण.

आरंभ : ॐ नमोसिद्धम।। अथश्री धर्म विलासग्रंथ लिखिते छंदिक भाषात।। आर्या स्तुति वर्णन।। पंचपरमेश्वरी स्मरुनी।। वंदुनीया परमेष्टिसी।। भाईचंद्र करतो नामेधर्म विलास ग्रंथासी।। स वैया एकति सा।।३१।। धरमविलास ग्रंथ।। ओममय मुक्ति पंथ।। दोन हार सिव कंथ।।..

पोथी मधील विवेचनात : आर्या।। चरचा त्रिलोकाची सांगिन मी फुट टुकडे टुकडे करुनिया।। समजुत होण्यासाठी ऐका सुंदर तुमि चित्त देऊनीया।।१।। अथ फुटकळ चरचा सांगतो ऐका।।

तिन लोक तिन नामे स्वर्ग मध्यम पाताळ चवदा रजु उच आहे. १४ तिन लोक धनाकार तिनसे त्रेताळ रजु आहे. ३४३ तीन वायुसंख्या ऐका तनु वायु विस हजार योजन आहे. २०,०००. धन वायु पंचवीस हजार... पुढील पाने नाहीत. आहेत ती पाने चिकटून काढता न येण्याच्या अवस्थेत.

श्रीपतानंद आत्मानंद मठ

८१२ क्र. १ सांप्रदायिक मालिका श्रीपती

आ. १७ × १३ सें. पा. ३२ × २ = ६४. प्र.पा. ओ. ९. अक्षर मोठे.

एकनाथांचे पणतू शिवराम स्वामी वंशजापैकी एका शाखेचे वंशज. या बांधीव वहीत संप्रदायाची प्रथम मालिका संस्कृतात, बिरुदावळी व त्यानंतर १ ते ३० क्रमांकात भजन, पदे, अभंग अशी रचना.

यातील रचनेची वानगी :

(१) श्री गुरुचे निजपाय धरुनी धन्यचि मी झाले।।
परम सुखाचा अनुभव घेऊनि अमनपणे वृत्तिविण रमले।।धृ.।।
श्रीपती म्हणे बारे दिवस रजनी।।
रहा हरि चिंतनी पूर्ण होय।।५।।

(२) चिद्रस ओतिव परब्रह्म सावळे।।
ज्ञानियाचे डोळे पाहती संत।।धृ.।।
श्रीपती म्हणे कैसे तरतिल जीवा।।
सदभाव धरावा श्री गुरुपायी।।५।।

(३) हरि येऊनि मजला रतलागे।।
तनुपण माझे हरला गे।।१।।
पंच रंगाचे फाडुनि वसने।।
उघडे अंगचे केलागे।।२।।
भ्रांती कुंचक फेडुनि माझे।।
द्वैत कुच मर्दुनि गेला गे।।३।।
अंगावरि अंग घालुनि मौजे।।
सुख सेजेवरी निजलागे।।४।।
मुख चुंबित रंगित महाळी।।
ओढुनि श्रीपती नेला गे।।५।।

यात सहा आरत्या आहेत :

(१) सचिद्घन श्री आत्मानंदा।।
अनुपमे लावण्य आनंद कंद।।
स्वसते नटुनि स्वछंदा।।
मार्ग दाविसी भक्त वृंदा।धृ.।।

(२) जय जय जय गुरू मंगल आरती।।
सकळ मिळुनी करू नमुनीया श्रीपती।।१।।
प्रसादाचे अभंग, शेजारती रचना.

श्रीपतानंदाचा काल सन १२८५ फसली. (१८८५ इ. स. चा येतो.) रचनेत श्रीपती नाममुद्रा. यातच शिवराम स्वामी पासूनचा वंशवेल दिलेला आहे. संप्रदायाच्या दृष्टीने महत्त्वाची रचना. रामानंद व श्रीपतानंद वंशजाचे संकलन.

८१३ क्र. २ अष्टके

वरील बाडामध्ये अष्टक रचना. परंपरेतील सत्पुरुषाव रचना.

(१) चिद्घनैक्य चित्प्रकाश निदानंद चित्कला।।
चिदाभास चिद्विलास नित्य शुद्ध सोज्वला।।
अनादि अखिल नित्य मुक्त अनंतरुप धारणा।।
येई स्वामी आत्मानंद तोडीत भव बंधना।।१।।

(२) सचिद्घन सुखपूर्ण असता माया भ्रमे व्यापला।।
मद्रूपा नेणतपणे मी देह म्हणुनि दुःखे अति माजलो।।...

(३) तुजसा मजदाता अन्य कोणी न भासे।
अगणित अपराधा क्षमुनि स्वपदी स्थापिलासे।

(४) अमृतमय आदिपुरुष अमरज्योत श्रीहरी।।
शेषशाही श्रीनिवास शांत चित्त साजरी।।

आत्मानंद, धुंडीराज, राम या वंशजांची रचना. रचनाकाल नाही. परंपरेची माहिती गोवलेली. आत्मानंद हेच पूर्वाश्रमीचे श्रीपतानंद होते.

८१४ क्र. ३ बाड श्रीपती

आ. १७ × १३ सें. पृ. ४२ × २ = ८४. प्र.पा.ओ. १२. अक्षर बारीक.

संप्रदायातील विविध पदे व अभंग रचना. यात ७६ स्फुट रचना. यात हिंदी, कानडी (लिपी बाळबोध) व मराठी रचना आहेत.

काही पदाची वानगी :

(१) श्री गुरूला शरण जारे मानवा तुज का कळेला॥धृ.॥

(२) गोकुळीचे जन पहाति डोळा॥
आनंद सोहळा भोगताती॥धृ.॥

(३) नावडे हा संसार मजला॥

(४) स्वकाम सोडोनी खोकल्याचे घसे॥
पडसा अविचारी राहिलागे॥धृ.॥

(५) हा पंचभूताचा पंढरी॥ येथे राहे आत्माहरी॥धृ.॥

ही सर्व रचना श्रीपती कवीची आहे. काही गौळण, रचना.

८१५ क्र. ४ बाड धुंडीराज

आ. ९ × १०॥ सें. पा. २२ × २. प्र.पा.ओ. ९. अक्षर बारीक. निळी शाई. कागद पातळ. बाडाची प्रथमची व शेवटी ७ पाने गहाळ. एकूण २४ रचना. यात या मठाच्या परंपरेतील धुंडीराज कवीची मराठी व हिंदी रचना. मराठी रचनेतील काही रचनांचे धृपद.

(१) जगी नामतप॥ फलदाता श्रेष्ठ॥धृ.॥
शयपुण्यभारी॥ पडिल पदी॥
नाम घेता हरी॥ धुंडा म्हणे॥६॥

(२) जगी बहु संत भक्त महाज्ञानी॥धृ.॥
असंख्य ऐसे भक्त संत नामते॥
धुंडी म्हणे झाले हरिरूप॥५॥

(३) संतसखुबाई॥ भक्त मिराबाई॥
नामे सुखदाई॥ पावन झाल्या॥धृ.॥

(४) हरिनाम नित्यनेम करुनिया॥
स्वहित कराया॥ घेत जावे॥धृ.॥

(५) शांती दया भाव धरुनी मनाशी॥
समान जीवाशी आचरावे॥धृ.॥

(६) अहंपणभावे गुरू अपमानिता॥
अति पिशाच्चतता प्राप्त होय॥धृ.॥

(७) असार कर्मात वय चालले वाया॥
पुनः नर काया दुर्लभची॥धृ.॥

शेवटी आत्मानंद आरती.

एका पदातील भाव महत्त्वाचा :

सहस्रकोटी देव॥ संतज्ञानी मिळून॥
सद्‌गुरू समान होईना की॥धृ.॥

प्रत्येक रचनेत धुंडी ही नाममुद्रा आहे. काही कन्नड पदे बाळबोध लिपीत दिली आहेत. अक्षर कवीचे आहे.

८१६ क्र. ५ हरिपाठ धुंडीराज

आ. ९ × १०॥ पा. १२ × २. प्र.पा.ओ. ८. अक्षर साधारण. कागद पातळ. निळी शाई. कवीच्या अक्षरातील मूळ रचना. त्रु. अक्षर पुसट झालेले. संपूर्ण हरिपाठ रचना संप्रदायाच्या दृष्टीने केलेली असली, तरी सर्वच अभंग उपलब्ध नाहीत. एकूण ३२ अभंगरचना असल्याचा उल्लेख शेवटी आलेला आहे. ती रचना.

अभंग बत्तीस नित्य पाठ म्हणता॥
ब्रह्मानंद चित्ता संचरेल॥धृ.॥
वृत्ति सर्व प्रेमे दासत्व करून॥
होती स्वयंलीन धुंडा म्हणे॥६॥

रचनाकाल उपलब्ध नाही. शेवटी आत्मानंदाची धुंडीराजकृत आरती :

आरती आत्मानंदा परमपद स्वानंदा
लावुनि निजमार्गी तोडी तोडी भवबंधा॥धृ.॥
सद्‌गुरू श्रीपती अखंडानंदमूर्ती॥
धुंडीराज दास प्रेमे ओवाळीतो आरती॥४॥

८१७ क्र. ६ अभंग धुंडीराज

आ. १७ × १३ सें. बाडाची सुटी पाने उसवलेली. प्र.पा.ओ. १२. अक्षर मोठे. या संकलनात कवीची संपूर्ण अभंग रचना आहे. त्यातील वेचक धृपद :

(१) शंभो शिव हर हर शंकर॥
पाहीमां डमरु त्रिशुळ धर॥धृ.॥
मृत्युंजय महागौरी रमणा॥
धुंडीराज नमो तुझिया चरणा॥३॥

(२) जय मंगल जय मंगल श्रीपतानंदा॥
भवबंधन छेदुनी करी विश्व आनंदा॥धृ.॥

(३) सच्चिदानंद गुरुराया॥ अत्रिसुतदत्तात्रेया॥धृ.॥

(४) अहोभाग्य उदयला॥ वैकुंठीचा राजा आला॥धृ.॥

(५) आदिशक्ति जगन्माया॥ दासवंदो तुझे पाय॥धृ.॥
धुंडा म्हणे जगदंबे॥ चाल विसी विश्वकुटुंबे॥३॥

लेखनकाल नाही. पन्नास वर्षां पूर्वीची रचना वाटते.

८१८ क्र. ७ **मनीषा पंचक** शिवराम

आ. १६ × २१ सें. पृ. ३ × २. प्र.पा.ओ. १६. अक्षर बारीक. कागद पातळ. त्रु.

आरंभी :

भिसे जाता शकरे नीट पंथे।।
तेथे एक्या देखिला अंत्य जाते।।
त्या भर्छिले दूरी होसे म्हणुनी।।
ते ऐकोनि तो वदे मंजुवाणी।।१।।

ही आचार्यांच्या रचनेवरील समश्लोकी आहे. केवळ काही श्लोकांचा भाग उपलब्ध. शेवटची पाने गहाळ, त्यामुळे रचनाकाल व प्रतलेखक अज्ञात.

८१९ **आत्मबोध** शिवराम

आ. १६ × २१ सें. पृ. ३ × २. प्र.पा.ओ. १८. अक्षर बारीक. कागद पातळ. त्रु.

या वेदांतपर रचनेतील प्रथमचा भाग :

आत्मबोध विवरीन मराटे।।
पाहाताचि रिघे सुख वाटे।।
भ्रमेने मुनिधर्म जे का मनाचे।।
निजात्मा वरी कलिची दुर्म तीचे।।१।।

एकूण फक्त ७ श्लोकांवर ही टीका उपलब्ध. शेवटची पाने गहाळ.

रचनाकाल व प्रतलेखक अज्ञात.

८२० क्र. ८ **हरिविजय** श्रीधर

आ. ९ × १५ सें. पृ. १२ × २. प्र.पा.ओ. १८. अक्षर अत्यंत बारीक पण सुटसुटीत. केवळ तिसरा अध्याय उपलब्ध. त्रु.

आरंभी : श्री गणेशाय नमः।। जय जय अनंत ब्रह्मांड नायका।। चतुराननाचीया जनका।। चौघाचीही नव्हे आवका।। तुझे स्वरूप वर्णाया।।१।।

प्रतलेखक व काल नाही.

शेवटी : इति श्रीहरि विजय ग्रंथ संमत।। हरिवंश भागवत।। विचक्षण परिसोत संत।। त्रितीयोध्याये गोड हा।।छ।। श्रीकृष्णार्पणमस्तु।।

यात शेवटी दिव्य रसायन : गुरु गोरक्षनाथ टिपण शिंगरूप १ तोळा। तीन धारी निवडंग २ तोळा पूट देऊन भस्म किया जाय. एक पैसा तांबेका मूसी मे डालके अच्छा तपाये. एक गुंज भस्म तोलके डाळ किपूके जोड ची जमील उतरु. धर्म परोपकार की जे. उदरनिर्वाह किजे. हिंदीमिश्रित मराठी लेखन.

प्रतीचा काल व प्रतलेखक अज्ञात.

८२१ क्र. ९ **बाड** धुंडीराज

आ. १७ × २० सें. पृ. ९१ × २ प्र. पा. ओ. १८ अक्षर बारीक पातळ कागद. लेखन सुटसुटीत.

प्रथमची ७ पाने गहाळ. शेवटची काही पाने कोरी.

यात विविध पदे रागतालासह.

पदाची वानगी :

बसवोनीमला एकांती।। तू बाहेर मौज करिशी।।
नेणोनि स्वकुळगोत्रा।। संबंध जोडी अन्यत्र।।
विसरोनि आपला मित्र।। बनलाशी दीन परतंत्र।।
आसक्त विषयामागे।। फिरतोशी भव बाजारी।।१।।

धुंडा कवीची अशी ४४ रचना. पदे, अभंग अष्टक इ. सर्व वेदांतपर.

दसरा पदाचे धृपद :

सीमा अज्ञान उलंघुनी।।
शुभयोग साधा दसरा करोनी।।धृ.।।

शिवराम वंशज लेखकाच्या हस्ताक्षरातील-लेखन काल नाही.

८२२ क्र. १० **सात वारांचे भजन** धुंडीराज

आ. १७ × २१ सें. प्र.पा.ओ. १५ अक्षर मोठे. कागद पातळ. सात वाराच्या भजनाची रचना पदे इ.

शनवार :

भजन प्रियहनुमंत।। भवनिवारका।।धृ.।। अन्य ६ पदे.

रविवार :

गणराजागौरीकुमरा।।धृ.।। अन्य ६ पदे.

सोमवार :

गिरजापती गौरीमनोहर।।
मृत्युंजय महामहेश्वर।।धृ.।। अन्य ८ पदे.

मंगळवार :

जगदंबे माता भवानी।।
नाटक जग विश्व मोहिनी।।धृ.।। अन्य ४ पदे.

बुधवार :

नारायण नमित पोषणा।।
मायापती जगमनोहरा।।धृ.।।

शिवराम वंशज मूळ कवी धुंडीराजाचे लेखन. काल नाही.

८२३ क्र. ११ **हरिपाठ** धुंडीराज

आ. १७ × २२ सें. पृ. १३ × २. प्र.पा.ओ. १२. अक्षर साधारण. कागद पातळ. सं. अभंग ३२ + १

आरंभी :

श्री सद्‌गुरू पूर्णानंद गुरु शिवराम नमः।।
श्री सद्‌गुरू श्रीपतानंद आत्मानंदये नमः।।
श्रीपती सद्‌गुरू श्री हरिस्मरण।।
करिता प्रेमे पूर्ण।। सर्व लाभे मतिमंद।।
किती तरले अनंत।। नाममंत्र जपत भवसिंधु।।१।।

यात संपूर्ण ३२ अभंग असून, नित्य हरिपाठाकरिता सांप्रदायिक रचना, धुंडीराज कवीच्या अक्षरांत. लेखनकाल नाही.

८२४ क्र. १२ **स्तवन** श्रीपती

आ. १७ × २२ सें. पृ. ३ × २ प्र.पा.ओ. १०. अक्षर मोठे. एकूण ओ. ३२. सं.

आरंभ :

प्रथमादि पुरुषा वंदुनी गणेश।।
स्तवन पर पुरुष आरंभितो।।१।।
आरंभीतो ध्यान।। नामसंकीर्तन।।
सद्‌गुरुस्मरण।। मंगलमयी।।धृ.।।

शेवटी :

असे मनोगती आहे की श्रीपती।।
सद्‌गुरू महामती काय करु।।२६

पुढील पानांची अवस्था वाचण्यायोग्य नाही. रचनाकाल नाही. रचना श्रीपतीची.

८२५ क्र. १३ **पंचीकरण** शिवराम

आ. १७ × २२ सें. पृ. ८ × २. प्र.पा.ओ. १२. अक्षर बारीक. ओळीत खूप अंतर. त्रु. प्रथमची व शेवटची पाने गहाळ. असलेल्या भागात

आरंभी : त्वपदाचे शोधन आणि जड चैतन्याचा निवाडा म्हणजे काय ते ऐक बा। जड म्हणेसि नेणे आणि...

शेवटी : आता स्वामीच्या उपकारासी काय उतारा होय म्हणून प्रेमाच्या...

लेखनात कोष्टकाचे रकाने.

आचार्यांच्या पंचीकरणाचे हे भाष्य. मराठी प्राचीन पंडिती गद्य परंपरेचा उत्कृष्ट नमुना. प्रतलेखक व कालनिर्देश नाही. शेवटचा उल्लेख सद्‌गदीत होऊन साष्टांग प्रणिपात केला.

श्री स्वामीने यासी हृदयीधरोन आलिंगले की।

बापा हे स्थिती जिवावया काही सांगतो ऐक १ ×× शंकराचार्य वेद वचन येणे रीतीने जाणीत राहणे.

८२६ क्र. १४ **एकादशस्कंध** शिवराम

आ. १४ × २३ से. प्र.पा.ओ. १०. पृ. २२३ × २. कागद जाड दौलताबादी. शाई गडद काळी. प्रथमची २ पाने वाळवीने खराब. अ. ३१. सं. अक्षर मोठे.

शेवटी : पूर्णानंद गुरू प्रतापचिदुजे साहेचिना बोलणे।। मुकाल। श्रुतिगम्य बोलवितसे। अंधासि दिव्यांजने।। दावि आत्मनिधान ते।। प्रतितीसी आले मला भाविका।। बोलवत शिवराम होऊनि रचये एकादशी भाविका।। बोल श्री शिवरामी स्वये यकादशीची टीका।।

इतिश्री मद्‌भागवते महापुराणे एकादशस्कंध पूर्णानंदानुचरकृत महाराष्ट्र पद्य बंध भगवत. परंधाम निर्णाय नाम एकत्रिशोध्याय।। श्रीपूर्णानंद शिवरामाये नमः।।छ।। श्री कृष्णार्पणमस्तु।।

शके १८५४ अंगिरा संवत्सर पौशशुत्ध–
रोज शुक्रवारे संपूर्ण–
शिवराम वंशजाचे लेखन. लेखक नाम नाही.

८२७ क्र. १५ **नारायण मणिमाला** शिवराम

आ. १७ × १२ सें. पा. ३० × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर साधारण. रचना कन्नड भाषेत; पण लेखन मराठी लिपीत. ओ. ५५ + २ फलश्रुती.

आरंभी : नारायण हरि ये नारायणा।।
हरि ये नारायणा हरिये नारायणा।।धृ.।।

नारायण नामाची महती यात कवीने गोवलेली आहे. विपुल कन्नड रचनेत ही महत्त्वाची प्रदीर्घ रचना. सर्वच लेखन बाळबोध लिपीत केलेली आहे. शेवटी फलश्रुतीतील भाव :

वरील सर्व विचारातून ही नारायणमणिमाला असून, अन्य लोकांना ती विस्ताराचे वाटेल; पण भाविकांना हे मुक्तीचे द्वार आहे. सांगणारे– ऐकणारे अमानव. यातच इच्छित फलप्रदान होते. स्त्रीपुत्रादिकांच्या सह शेवटी सायुज्यता प्राप्त येथे होते.

इतिश्री मत्परमहंस श्री शिवराम स्वामी विरचित श्री मन्नारायण मणिमाला समात्पोयम् ।।

लेखनकाल व प्रतलेखक नाव नाही.

८२८ क्र. १६ **मनीषा पंचक** शिवराम

आ. १० × १३ सें. पृ. ६ × २. प्र.पा.ओ. ९. अक्षर

नेटके. पण बारीक. श्लो. ९ टी. ९ + १. ही समश्लोकी टीका आहे. सं.

शेवटी : ।।टीका।। ज्या आनंद सुसिंधु बिंदुकरिता हे देव आनंदती।। तो आनंद समुद्र लाहुनि सुखे आनंदला जो यती।। आंगे होऊनि राहिला मग उठी की बुद्धिचा अंकूर।।ऐशा।।९।।

आचार्य बोधुनि निजबुद्धिपंचका।। हे दाविले श्लोकरूपेचि दीपिका।। जे या प्रेमेने स्वरूपा विचारती।। भेटे तयाला शिवराम भारती।।१०।।

शिवराम वंशज श्रीपतानंद यांनी केलेली प्रत. प्रतीचा काल दिलेला नाही.

८२९ क्र. १७ **अभंग** शिवराम

आ. १७ × १२ सें. पृ. २३ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर साधारण. कवीची अभंग रचना एकूण ३७ अभंग. कागद पातळ. शाई फिकट.

त्यातील काही वानगी :

(१) वृत्ति जिकडे धावे।।
तिकडे न जावे या पाठी।।धृ.।।
(२) गुरूकरिता ती देखण।।
एरवी न घडे देखण।।धृ.।।
(३) आजि मोठा आनंद झाला माय।।
त्रिभुवनी हे सुख न समाये।।धृ.।।
(४) पाय त्याचे विसरू कसे आता।।
ज्याचे पायी गवसला राम हाता।।धृ.।।
(५) ऐसा नवस वृत्तीसी होता बाई।।
आज पुरलीया सद्गुरूंच्या पायी।।धृ.।।
(६) निज लागली कशी माये।।
प्रलयाचा आठव तोही नोव्हे।।धृ.।।
(७) तो गुरू मज लवकरी दावा गे।।
तत्पदी माझे मन लावा गे।।धृ.।।
(८) संतदयाळु कसे।।
राजारंक जया सरिसे।।धृ.।।
(९) मंगलधाम यदुनाथ पाही।।
अनन्य भावे लागलो ज्याचे पायी।।धृ.।।
(१०) कोणभाग्य नकळे मज माझे।।
दिली भेट दयाळु राजे।।

पूर्णानंद शिवराम, शिवरामी, शिवराम, पुर्णानंदानुचर अशी नाममुद्रा रचनेत आहे. पू. गंभीरानंद कल्याणी हे प्रतलेखक. काल दिला नाही.

वे. भालचंद्र दीक्षित संग्रह

८३० क्र. ४ **पदबोधिनी**

आ. २३ × १४ सें. प्र.पा.ओ. ११. पृ. ८२ × २. त्रु. पान क्रमांक ३८ पासूनचा मजकूर. कागद जीर्ण. गडद काळी शाई. १५ व्या अध्यायाच्या

शेवटी : ॐ इति श्री मन्महाभारते शत सहस्त्र संहिताया वच्चासिक्या भीष्म पर्वाणि श्रीमद भगवदीत सपनिषुत्थु ब्रह्मविद्याया योगशास्त्रे श्री कृष्णार्जुन संवादे पदबोधिनी टीकाया पंचदशोध्यायः।। श्री।।छ।।छ।।

प्रतलेखक नाव व काल दिला नाही.

८३१ क्र. १५ **हरिविजय** श्रीधर

आ. ३१ × १४ सें. प्र.पा.ओ. १३. पृ. २९६ × २. त्रु. कागद जाड, अक्षर छान. काळी शाई.

शेवटी : तो ब्रह्मानंद महाराज पिता।। सावित्री माझी माता श्रीधर वंदुनि उभया।। हरि विजयग्रंथ संपविला।।९।।

सकळ श्रोते सादर साष्टांग नमन श्रीधर।। ब्रह्मानंद करून निर्धार।। हरिविजये विलोकिजे।। इतिश्री हरिविजय कथा सम्मत हरिवंश भागवत चतुर परिसोत प्रेमळ।। पंडिता शेडत्रिराती अध्यये गोड हा।।२५५।। श्रीकृष्णार्पणमस्तु श्री व्यंकटेश।। एव ग्रंथ संख्या।।----।।प्रसंग१६।।छ।।छ।।

हा पुस्तक रामजी गुंडो कुलकर्णी कसबे हळीखेड त्याने ग्रंथसंग्रह केला असे हे हस्ताक्षर गोविंद भगवंत शठ।। समाप्त।।छ।।छ।।

पृष्ठ क्रमांक ६९ पासूनचा ग्रंथाचा भाग आहे. लेखनकाल दिला नाही.

८३२ क्र. १८ **गोत्रप्रवर निर्णय**

आ. २२ × ११ सें. प्र.पा.ओ. १०. पृ. ११ × २. अक्षर बारीक. कागद जाड. चिवट. यात शास्त्रीय विवेचन.

शेवटी : श्री इति भट्टोजीभट्ट ते गोत्रप्रवर निर्णय समाप्त।।

शके १७१६ प्रभवन नाम संवत्सरे आषाढ शुद्ध द्वादसि निर्णय.

हळीखेड जोईस रामभट्ट आत्मज गोपाळभट्ट स्वदस्तुरि लेखन।।छ।।छ।।छ।।

८३३ क्र. २५ **नवग्रह**

आ. २१ × १० सें. प्र.पा.ओ. ८. पृ. १४ × २. यात

संस्कृत स्तोत्राचे विवरण. कागद पातळ– तपकिरी. गडद काळी शाई.

शेवटी : संगमेश्वराय नमः।। श्री गुरुभ्यो नमः।। श्रीस्वस्ति नृप शालीवाहन शके १८१३ खरनाम संवत्सर उत्तरायणे शरदऋतौ कार्तिकमासे कृष्ण पक्षे अद्य नवम्या भोम वासरे इदं पुस्तक अणंभट्टात्मज सांबभट्ट सुत कृष्णेन लिखिता कश्य समंधा नास्ती।। श्री माणिक प्रभुसमर्थ श्री गजानन।।छ।।छ।।छ।।छ।।

८३४ क्र. ४८ **भावार्थ रामायण** एकनाथ

आ. १४ × २१ सें. त्रु. १५ × २. प्र.पा.ओ. १०

शेवटी : इति श्री भावार्थ रामायणे बालकांडे येकाकार टीकाया राम वसिष्ठ संवादे ज्ञानगव्हरति रोपण योगनाम एकादशोध्यायः।।

लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

८३५ क्र. ५० **आत्मदर्शन**

आ. १७ × २१ सें. उभी बांधीव वही. पाने सुटलेली. त्रु. विस्कळित प्रत. पा. २१ × २. यात अद्वैत वेदांतांचे निरूपण आलेले आहे. प्रथमच्या ७ अध्यायांची पाने आहेत. कागद जीर्ण.

लेखनकाल, प्रतलेखक वा मूळ लेखन कुणाचे याचा बोध होत नाही.

८३६ क्र. ४६ **अपरोक्षानुभूती** शिवराम

आ. २२ × १४ सें. पृ. २५ × २. प्र.पा.ओ. १३. श्लो. २९६.

आचार्यांच्या मूळ ग्रंथावर शिवराम स्वामी याची मराठी टीका. समश्लोकी, पद, इ. रचना. प्रतलेखक व काल दिला नाही. ग्रंथाचे विवरण अन्यत्र आले आहे.

८३७ क्र. ४४ **विवेकसिंधू** मुकुंदराज

आ. २१ × १७ सें. पृ. ३० × २. संपूर्ण प्रत पाण्याने भिजून पाने चिकटलेली. त्रु. यात काही प्रकरणे त्रुटितपणे उपलब्ध. मधूनच एखाद्या रचनेत शिवराम स्वामींचे नाव येते. मूळ परंपरेच्या मुकुंदराज ग्रंथावर हे शिवरामाचे भाष्य ठरावे. प्रतलेखक व लेखनकाल नाही.

८३८ ग्रं.क्र. ६१ **योगवाशिष्ठसार** शिवराम

आ. १७ × १३ सें. पा. २१ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर मोठे. एकूण श्लोक २२८. प्र. १०. सं.कागद जाड.

आरंभी :

मन बुडऊनि नेटे योगवाशिष्ठसारि।।
प्रकटित मतितार्थ देशभाषानुसारी।।

वेदांताच्या दृष्टीने निवडक श्लोक कवीने घेतले आहेत.

शेवटी :

ब्रह्मात्म सुंदर निरूपण बोलिलो हे।।
पूर्ण सुखेचि पाहता शिवराम होये।।

श्री सदानंद मठ कल्याणी ग्रंथसंग्रह

८३९ क्र. १ **वेदांत सूर्य** श्रीधर

आ. २० × १० सें. पृ. ७ × २. त्रु. ४७ ओ. अक्षर मोठे. पातळ कागद. गडद काळी शाई.

आरंभी : श्री जगदंब। दशलक्ष जाती जीवनी।।

नवलं क्षपक्षी जाती समुळीहुनी।। इतुके जीव अंडज खाणी।। माझी निपजली जाणिजे।।१।।

शेवटी : एकते भक्ती येतव विघसत्य हे त्यासी सहजचि घडत।। तो आपुले कृपेचे निश्चित आवरण घाली जगावरी।।४७।। आर्या।।छ।। जगदंबार्पणमस्तु।।

प्रतलेखक व लेखनकाल नाही.

८४० क्र. २ **बाड**

आ. २१ × १९ सें. प्र.पा.ओ. १५. अक्षर खूप मोठे. पृ. ७ × २. उभी वही.

शंकराचार्य स्तुती. नामदेव अभंग इ. पुढील पाने गहाळ.

८४१ क्र. ३ **उपदेश रहस्य**

आ. १७ × १० सें. प्र.पा.ओ. ७. कागद जाड. पृ. ७ × २. ओळी ७१ पासून पुढील भाग आहे. त्रु.

आरंभ : काय होईल जनका इतुका।। प्रपंची असोनि ते सुखी अैसा कौतुका।। अेकोनी अनेका श्रुतीमुखे।।७२।।

शेवटी : भाव दाखवी सलगीसी।। परिहर्षे वीशादासि पावेचि।।६२।।

प्रतलेखक व काल नाही. मूळ रचना कोणाची कळत नाही.

८४२ क्र. ४ **विवेकसिंधु** मुकुंदराज

आ. १९ × ११ सें. ६. पानानंतर संपूर्ण. पृ. ६० × २. ६० व्या ओवीपासूनचा मजकूर. कागद घोटीव– जाड. शाई गडद काळी. त्रु.

शेवटी : इतिश्री मद्‌विवेकसिंधु संव्हार शृष्टिक्रमे गुरु शिष्य संवादे महा अद्वैत निरोपणना षोडश प्रकरण संपूर्णमस्तु।। श्री कृष्णार्पणमस्तु।।

लेखनकाल व प्रतलेखक नाव नाही.

८४३ क्र. ५ **बाड** उद्धवचिद्‌घन

आ. २१ × १४ सें. प्र.पा.ओ. ११. पृ. ४ × २. ओवी ४ पासून मजकूर आहे. घोटीव जाड कागद. गडद शाई. त्रु.

उद्धवचिद्‌घनची प्रदीर्घ रचना.

आरंभ : जय जय नागनाथा।।५२।। अैसे अपार संत वर्णिता।। संशय सर्व ही जाती।। आठवल ते ऐका भाव।। उद्धचिद्‌घन न गति।।५३।।

काल व प्रतलेखक अज्ञात.

८४४ क्र. ६ **हरिविजय** श्रीधर

आ. २४ × १५।। प्र.पा.ओ. १३. अक्षर रेखीव. प्रत्येक चरणास लाल दंड. कागद जाड. संपूर्ण प्रत. गडद काळी शाई.

काल व प्रतलेखक नाव नाही. महत्त्वाच्या ओव्या लाल शाईत दिलेल्या.

८४५ क्र. ७ **एकादशस्कंध** एकनाथ

आ. २४ × १६ सें. प्र.पा.ओ. १३. त्रु. प्रकरण १५ पासूनचा भाग. प्रत्येक चरणास लाल दंड रेषा. घोटीव जाड कागद. गडद काळी शाई. अक्षर सुबक. मूळ श्लोक लाल शाईत. मराठी टीका काळ्या शाईत. ३१ व्या अध्यायात १६ ओव्या असून, अन्य भाग गहाळ. प्रतलेखक व काल नाही.

८४६ क्र. ८ **विवेकसिंधु** मुकुंदराज

आ. २२ × १५ सें. प्र.पा.ओ. १६. अक्षर नेटके बारीक. पृ. ४८ × २. त्रु. १८ वा अध्याय. १२८ ओळीपर्यंत आहे.

घोटीव जाड कागद, काळी शाई. कागद भिजून डावीकडील पोथीचा भाग अत्यंत जीर्ण झालेला आहे. प्रतकाल व प्रतलेखक नाही.

८४७ क्र. ९ **आत्मरूप प्रतिती** माणिक

आ. १४ × ८।। सें. प्र.पा.ओ. ६. पा. ३६ × २. उभी बांधीव वही. कागद पातळ. साधारण अक्षर. वरील भागास शिवण. अ.१२. सं.

प्रारंभ : श्री माणिक प्रभु प्रसन्न।। जय जय जगद्‌गुरू जगदीशा।। जय जया परात्परा परम पुरुषा।। स्वयंप्रकाश तुज नमो।।१।।

शेवटी : शिष्य स्वयं ब्रह्म जाहला।। आत्मरूप प्रतितीशी आला।। माणिक विनवी सजनाना।। ग्रंथ श्रवणासी अखंडित असो।। इति श्री आत्मरूप प्रतिती ग्रंथ द्वादशोध्याय।। श्री रस्तु।। इदं पुस्तक सीतारामेन लिखितं।। श्री राम।। श्रीरंगजय।।छ।।

८४८ क्र. १० **अश्वमेध**

आ. २५ × १५ सें. प्र.पा.ओ. ११. पृ.१०० × २. अनेक अध्यायांची विस्कळित पाने. अक्षर अत्यंत रेखीव. कागदाचा जवळ जवळ निम्मा भाग वाळवीने कुरतडलेला. बरेच अध्याय. अ. १०,१३,४०,९,१,३ चा भाग उपलब्ध. त्रु.

८४९ क्र. ११ **पंचीकर्ण तत्त्वमाला** वामन

आ. १७ × १० सें. पृ. १९ × २. निळसर रंगाचा कागद. काळी शाई. अक्षर सुंदर.

आरंभ : श्री गणेशाय नमः।। श्री नागेशानि निर्मित + गला आहे जसा निश्चये।। तैसे विश्व तयात हे उपजते वस्तु स्वभाव स्त्वये।। माया शुद्धतया मध्ये प्रथम जे अजाजेधवा तेव्हा निर्गुण तोचि ईश्वर तया ध्यावद्विधा माधवा।।१।। त्रु.

८५० क्र. १२ **विवेकसिंधु** मुकुंदराज

आ. १६ × १४ सें. प्र.पा.ओ. १०. कागद जाड चिवट. गडद काळी शाई. त्रु.

यात केवळ १ ला अध्याय आहे. वरील वेष्टनाचे पान आणि शेवटचे पान वेलबुट्टीने सजविलेले.

८५१ क्र. १३ **बोधबासष्टी** शिवराम

आ. १६ × ११ सें. प्र.पा.ओ. ८. पृ. ४ × २. अक्षर मोठे. कागद जाड. शाई गडद काळी. शिवराम स्वामीनी शिष्यास प्रबोधण्यास केलेली रचना. प्रतलेखक व लेखनकाल नाही.

८५२ क्र. १४ **बोधबासष्टी** शिवराम

आ. २१ × १२ सें. प्र.पा.ओ. ९. पृ. ३ × २. अक्षर मोठे. सं. प्रतलेखक व काल नाही.

८५३ क्र. १५ **गुरुगीता** शिवराम

आ. २२ × १२ सें. प्र.पा.ओ. ८. पृ. ४० × २. पहिले पान आणि शेवटचे पान वेलबुट्टीने सजविलेले. विवरण अन्यत्र आलेले आहे. याच रचनेत शेवटी दत्तात्रेय स्तोत्र व देवी निघंट रचना. प्रतलेखन काल व प्रतलेखक नाव नाही.

८५४ क्र. १६ **वाक्यवृत्ती** शिवराम

आ. १७ × १० सें. प्र.पा.ओ. ८. पृ. ४ × २. कागद पातळ. शाई काळी गडद. अक्षर साधारण, पण लेखन सुटसुटीत. ओ. १९. सं.

आरंभी : श्री गणेशाय नमः।। श्री गुरुवे नमः।। वाक्यवृत्ति शिवरामकृत समश्लोकी टीका रंभः।। श्री सद्गुरुवर गणेशभारती।। वंदुनि निज मने अति प्रिती।। वाक्यवृती उगवीन कौतुके।। ऐकता मन निवे महत्सुखे।।१।।

शेवटी : हे वाक्यवृत्ति गुरू शंकर बोलिला हे।। जो येथ वृत्ति पसरुनि तदर्थ पाहे।। आभ्यासिती स्थिति धरुनि अखंड राहे।। तो या जनी विरहीता शिवराम होये।।१९।। इतिश्री शंकराचार्य विरचिते वाक्यवृत्ते पूर्णानंद शिवरामकृत समश्लोक संपूर्ण।। श्री रामचंद्रार्पण।।छ।।

श्री. म. प. गंभिरानंद सरस्वती लिखितं शके १८६४ अश्विन वा।।३.

८५५ क्र. १७ **दासबोध** रामदास

आ. ३० × १६ सें. प्र.पा.ओ. १४. अक्षर जाड रेखीव. प्रत्येक चरणास लाल दंड।। त्रु. दशक ९ पर्यंत. ९ व्या दशकास ४१८ ओव्या. वरील भागास पानभर चित्र. चित्राच्या मधोमध एका चौकटीत खालील मजकूर.

श्री दासबोध दशक प्रथम ग्रंथ खंडो विठ्ठल सबनवीस परगणे गुंजोटी याचा असे. ओव्या ३२६.

८५६ क्र. १८ **सभापर्व**

आ. ३८ × १७ सें. प्र.पा.ओ. १०. पृ. १२४ × २. अक्षर मोठे रेखीव.

शके १७०२ शालवरी नाम संवत्सर माघ श्रुत्ध नवमी भृगुवार कृतिका नक्षत्र ब्रह्मयोग.

यातच मुशल पर्व, स्वर्गारोहण, महा प्रसिद्धीपर्व रचना अनुक्रमे १४,७, १० × २ पाने. रचना काल नाही. प्रतलेखक अज्ञात.

८५७ क्र. १९ **भागवत सारामृत** सखाराम

आ. ३३ × १८ सें. प्र.पा.ओ. १२. पृ. ३३९ × २. अ. ९०. अक्षर साधारण. कागद पातळ.

भागवत दशमस्कंधावरील भाष्य.

शेवटी : हा दशम संपूर्ण जाहला।। श्रीहरी चरणी तुळसीचा पाला।। अशे सखारामे वाहिला।। भक्तिभावे करुनिया।।३५।। श्री भागवत सारामृत दशमस्कंध परम पवित्र।। प्राकृत सखाराम विरचित नवार्तत माध्याय गोड हा।।३६।। श्री कृष्णार्पणमस्तु।। इति भागवत सारामृत दशमस्कंध उत्तरार्ध समाप्त।। (८९३५) ३-२९१-८९२५-

लेखनकाल व प्रतलेखन नामनिर्देश नाही.

८५८ क्र. २० **अनिर्वाच्यरूप** नरसिंव्ह

आ. १७ × २२ सें. प्र.पा.ओ. १२. पृ. १४ × २. कागद पातळ. वहीमध्ये प्रत्येक पानास काळी चौकट आखून त्यामध्ये मजकूर. मुखपृष्टावर गुरुवर्य माणिक प्रभू पीठस्य श्री नरसिंव्ह विरचित असे मोठ्या अक्षरांत. अ. ७. ओ. ८४.

आरंभ : गणेशाय नमः।। श्री गुरू माणिक समर्थ।। प्रथम वंदुनियकु।। जो प्रथम अंतातीत यकु।। एक म्हणण्याची हे शंकु।। ज्या नसे।।१।।

शेवटी : जितुके असे ब्रह्मांडी।। तितुके वो पिंडांडी।। दोन्ही एक द्वैता खंडी।। माणिक दिन नरसिंव्ह म्हणे।।१२।। सप्तमोध्याय।।७।।।।८४।।

सप्तमोध्याय संपूर्णः।।

मुखपृष्ठावर शके १८१९ नं. ७ असा उल्लेख. प्रतकाराचे नाव नाही.

८५९ क्र. २ **माणिक-निर्विकल्पबोध** मार्तंड प्रभू

आ. १७ × २२ सें. प्र.पा.ओ. ७. पृ. २४ × २. अक्षर अत्यंत बारीक. ओळीत खूप अंतर. कागद लालसर. अ. १२. सं.

वरील मुखपृष्ठावर वेलबुट्टी व मार्तंड माणिक प्रभू विरचित असा उल्लेख.

आरंभ : श्री अवधूताय नमः।। ॐ नमोजी निर्विकल्पा।। नमो नमोजी गुरुभूपा।। नमोजी स्वस्वरूप।। सहज शुत्धा।।१।। जय जय हो निर्मला स्फूर्तिरहित निष्कळा।। जेथे ही जाणिव कला।। भासे भ्रमरूप।।२।।

शेवटी : माणीक नृसिंह मनोहर मार्तांड।। हे नाम रुपदृश्य बंड।। निरसुनी निर्विकल्प अखंड।। भासे गुरुभक्त।।१०।। इति श्री माणिक निर्विकल्प बोध ग्रंथे द्वादशोध्यायः।।१८१२ अठराशे बाराशकी।। विक्रती नाम संवत्सरी।। अश्विनमास गुरुवासरी।। हा ग्रंथ समाप्तता।।१।।

८६० क्र. २२ यतिधर्म

आ. २१ × १२ सें. प्र.पा.ओ. १९. समासविरहित लेखन. कागद पातळ उभी वही. वरील भागास शिवण. पृ. १२ × २. अक्षर मोठे– साधारण. ही गद्यात्मक रचना श्लोकानुक्रमे केलेली आहे. त्यांची संख्या ९७.

आरंभ : श्री गुरुभ्यो नमः।। शंकराचार्यांनी केलेला यतिधर्म सांगतो.

भिक्षेचे अन्न व अग्निहोत्री ब्राह्मणाचे अन्न व होम शेष अन्न या तीनी अन्नास नखाचा स्पर्श न होता घेणे।।१।। अमावस्या पौर्णिमा व्यतीपात संक्रमण वैधृति या दिवसी करपात्र भिक्षा करावी।।२।। एका घरीच फलाहार करावा. गोमुख भिक्षा तीन घरीच करावी. मधुकरी इच्छेप्रमाणे घेणे, करपात्र पाचच घरी घेणे।।३।।

शेवटी : अमावस्या पूर्णिमा व्यतीपात संक्रांत ग्रहण द्वादशी या दिवसी दंडास स्नान घालणे. वैधृती दिवसी फर्शमुद्रा विसर्जन करून पुनः बांधणे।।९६।। यतीचे मस्तक पाहू नये।। स्नानकाळी मृत्तिका लेपन करावे।।९७।।

शंकराचार्यांनी केलेला यतिधर्म समाप्त।। याद्दशं पुस्तकं द्ध्वाताद्द्शं लिखितं मया।। यदि शुत्ध मशुत्धवा मम दोषोनविद्यते।।१।।

मि. वै. व. १४ आदित्य शके १८६६ तारण।

प्रतलेखकाचे नाव दिलेले नाही.

याच वहीत विरुद्ध बाजून ''उद्धवा शांतवन कर जा'' ही प्रसिद्ध रचना.

माणिक भक्ताची पद्यरचना. शिवराम रचना मध्वमुनिश्वर गौळण.

८६१ क्र.२३ गायत्री टीका ज्ञानदेव

आ. १८ × १० से. प्र.पा.ओ. ६. पा. १२ × २. अक्षर खूप मोठे. दोन्ही बाजूंस लाल रेखा. चरणास काळ्या दंडास मध्ये लाल रंग.

कागद तपकिरी जाड. बांधीव आडवी वही. वरील भागास शिवण.

आरंभी : एका पानावर श्री गुरुपादुकाभ्यांनमो नमः।। श्री गुरुभ्यो नमः।। श्री अथ गायत्री टीका ज्ञान देवक्रत प्रारंभ्यते।। ... संस्कृत मूळमंत्र... इतिमूलमंत्र।। अथ टीका प्रारंभः।। श्लोक।।

कठीण ते अति दुस्तर साधन।। त्यजुनी सर्वही येक धरी मनीते।। भव महोन्नत वारण केसरी।। स्मरे सदा गुरुराज अंतरी।।१।। वंदुनिया सद्गुरूराज मूर्ति।। बोलेन काही परमार्थ स्फूर्ति।। ते अैकवी श्रवणी महंती।। प्रार्थितसे मी करुणा प्रयुक्ति।।२।।

शेवटी : जे सद्गुरूचे निजदास झाले।। गायत्रीचे अर्थ सुखे निवाले।। मुर्ख कितेके पडताति फासा।। सलोभ मोहो भ्रमताती आशा।।१८।। निवृतीदासे निजबोधयुक्ति।। गायत्रीचे ही कथिली प्रयुक्ति।। संति बरे सादरता पाहावे।। सप्रेम गोविंद हरिस गावे।।१९।। मूळ।। श्लोक।। टीका।।३।। इतिश्री ज्ञानदेव कृत गात्री अर्थ समाप्तः।।छ।। श्री ज्ञानदेवार्पणमस्तु।।छ।।छ।।छ।। लाल शाईत श्री गुरुचरणारवींदार्पणमस्तु ईदं पुस्तक रंजेलीकर जयराम भट्टस्यसुतं।।छ।। माणिकेन लिखितं।। हेमलंबी नाम संवत्सर मलपृष्ठ शेवटच्या पानावर लाल शाईत.

इतिश्री गायत्री श्लोक टीकाज्ञान

देवक्रत समाप्त।। निर्विघ्नमस्तु।।

वहीच्या एका पानावर शके १८१२ विरोधीनाम संवत्सर वैशाख शुत्ध १० गुरुवार प्रातःकाळी समाप्त।।छ।।. (१७९७ शकेची वरील रचना ठरते.) शके १८१२ पूर्वी १५ वर्षे हेमलंबी संवत्सर होते.

८६२ क्र. २४ बाड

आ. १७ × २२ सें. प्र.पा.ओ. १५. पृ. ७ × २. कागद पातळ. अक्षर खूप मोठे. समासविरहित लेखन. काळी शाई. बांधीव उभी वही. वरील भागास शिवण.

शंकराचार्यांवर अनामिक कवीची स्तुतिपर रचना. विष्णूपर पदे, तुकाराम, निरंजन, अनेक दैवत नामावली, नामदेव अभंग इ. रचना. प्रतलेखक व काल दिला नाही. शेवटी औषधी माहिती.

यकृतावर : गजगा १० मायफळ १० मिरे पयसा सुंठ अर्ध तोळा जीरे पयसा.

गजकर्ण अवषध : भीमसेनी कापूर दोन तोळे, बारुद दीड तोळा, कडु बदामाचे तैल आठ तोळे.

८६३ क्र. २५ **भक्तविजय** महिपती

आ. २२ × १३ सें. प्र.पा.ओ. १२. कागद जाड. प्रत्येक चरणास लाल दंड रेषा. अ. ५४. सं. अक्षर सुटसुटीत. फक्त शेवटचे पान गहाळ, यामुळे प्रतलेखक आणि कालनिर्देश लाभत नाही. पोथी सुस्थितीत आहे. पोथीचे वरील व खालील कागद थोडे जीर्ण.

८६४ क्र. २६ **हरिविजय** श्रीधर

आ. ३० × १३ सें. प्र.पा.ओ. ११. यात ३६ अ. पूर्ण. कागद जाड- पण जीर्ण. शेवटचा भाग एक पान नसल्याने प्रतीचा काल व प्रतलेखक अज्ञात.

८६५ क्र. २७ **अश्वमेध**

आ. १७ × १३ सें. प्र.पा.ओ. ८. त्रु. कागद घोटीव-जाड. अक्षर मोठे. गडद शाई. यामध्ये ६४ वा अध्याय, अ. ६, ३ चा भाग उपलब्ध. अश्वहरण प्रसंग. ग्रंथ कुणाचा हे कळत नाही. प्रतलेखक व काल अज्ञात.

८६६ क्र. २८ **एकादशस्कंध** एकनाथ

आ. २४ × १६ सें. प्र.पा.ओ. १३. अक्षर सुबक. प्रत्येक चरणास लाल दंड रेषा. कागद जीर्ण. गडद काळी शाई. दोन्ही बाजूंस लाल रेषा. यात केवळ १४ अध्यायांचा भाग पोथीत आहे. पुढील अ. गहाळ. काही प्रकरणांस रंगीत चित्रे. सोनेरी छटा असलेली चित्रे रेखीव. प्रतीचा काल नाही.

८६७ क्र. २९ **दासबोध** रामदास

आ. २२ × १५ सें. प्र.पा.ओ. १३. कागद जाड-चिवट. गडद काळी शाई. अक्षर मोठे. संपूर्ण. चांगल्या स्थितीतील पोथी. प्रतलेखक व कालनिर्देश नाही.

८६८ क्र. ३० **अजपाजपविधी**

आ. १८ × १० सें. पृ. १४ × २ प्र. पा. ओ. ६ तांबड्या शाईचे लेखन. कागद जाड पण भिजून शाई कागदावर पसरलेली. प्रथमची काही पाने काळी शाई. अक्षर मोठे सुटसुटीत.

प्रथम सदस्रादि संख्या विधान. त्यानंतर श्रीअजपा जपविधान. संस्कृतमंत्रासह विवेचन.

शेवटी : इदंपुस्तक रंजेलीकर जयरांभहस्यसुत माणीकेन लिखित।। शके १८१९ हेमलंबी नाम संवत्सर जेष्ट मासे ६ षष्टीम्या रोज चंद्रवार, सायंकाळी समाप्त।। श्रीगुरू चरणारविंदार्पणमस्तु।।छ।।छ।। त्यानंतर संस्कृत गुरुगीता संहिता. शेवटच्या पानावर

आत्मा न जन्मे न मरे असे सदा।।
पूर्वी न झाला उपजे पुनः कदा।।
पुराण हा नित्य अनादी अव्ययो।।
अनीत्यदेही नसता नसे क्षयो।।१।।
शेवटची ओवी जांभळ्या शाईत.

८६९ क्र. ४३ **देहनिंदा** शिवराम

आ. २१ × १५ सें. पृ. १२ × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर मोठे. कागद जाड- पण जीर्ण.

स्वतंत्र ग्रंथ नसून प्रबोध सुधाकर या आचार्यांच्या ग्रंथातील हे एक प्रकरण आहे. देहनिंदा प्रकरणावर समश्लोकी व पद अशी ही रचना. एकाच श्लोकावर अशी विविध रचना. समाजातील प्रत्येक थरातील लोकांना वेदांत कळावा हा उद्देश. ग्रंथाचे विवरण अन्यत्र आले आहे. (क्र. ७५३) प्रतलेखक व कालनिर्देश नाही.

(वे. भालचंद्र दीक्षित हळीखेड बी. बिदर. संग्रह.)

८७० क्र. १६ **प्रतापनारसिंह संस्कार**

आ. १७ × २२ सें. पृ. २४० × २. प्र.पा.ओ. ९. मूळ संस्कृत श्लोकासह विवरण. मंत्र व विधान याचे विवरण. अक्षर बारीक पण नेटके. चरणास लाल दंड.

शेवटी : प्रतिष्ठान पुरोवासी मोरोनारायण आत्मज रुद्र देवकृत प्र. नृ. संस्कार संपूर्ण।। शके १७५९ हेमलंबी नामसंवत्सर दक्षिणायने अश्विनमासे हळीखेड यज्ञेश्वर दीक्षित विश्वंभर दीक्षितात्मज सुत भालचंद्र सुत यज्ञेश्वर लिखित समाप्त।।

(भालचंद्र दीक्षित हळीखेड बी. संग्रह, बिदर)

संकीर्ण : विविध स्थानांतील ग्रंथ
(प्रत्येक विवरणाखाली प्राप्तिस्थल निर्देश)

८७१ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. २८ × १७ सें. प्र.पा.ओ. १३. पृ. ३२० × २. अ. ५१. स्थिती जीर्ण. अक्षर मध्यम.

या ग्रंथात संशोधनदृष्ट्या एक महत्त्वाची गोष्ट विशेष आढळते. अध्याय ५१ मध्ये क्रमांक ३७ वर एक ओळ महत्त्वाची आहे.

ऐसे सांगुनि शिष्य सोमनाथाला।। पादुका शाळिग्राम स्मरणिमाळा।। मठी ठेवुनि अभिनव लीला।। पूजा करी मनोभावे।। ही ओवी अन्य प्रतींत नाही. नृसिंह चिंतामण भीमाशंकर यांची ही प्रत. ४० व्या अध्यायात पण फरक दाखविणारा. आज गाणगापुरी वरील वस्तू पूजेत आहेत. त्या गुरूंनी दिल्या, हे स्पष्ट होते. ग्रंथ प्रतीचा काल शके १७९९ चा दिला आहे.

(गाणगापूरनजीक सिदनाळ येतील प्रत)

श्री. दिगंबर कुलकर्णी सिद्धनाळ.

८७२ सुबोध गुरुचरित्र श्रीपतराव अनगरकर

आ. १७ × २२ सें. बांधीव वह्या ४. अ. ५३. श्लो. ७५०. रचनाकाराने गुरुचरित्राची आधुनिक मुद्रित प्रत आधारास घेऊन केलेली रचना. सर्व जुन्या प्रतीत ५१ च अध्याय आहेत. कवीने आधारास मुद्रित गु.च. प्रत घेतलेली आहे. श्लोकात्मक गुरुचरित्र केलेले.

प्रारंभी :

नमो श्री गणेश नमो वल्लभाथा।।
नमो शारदा देवि विद्या कराया।।
नमो श्री कुलो-देवि विघ्ना हराया।।
गुरूच्या चरित्रास गाया मती द्या।।१।।
अहो शूर्पकर्णा अहो एकदंता।।
तुम्ही कर्णयुग्मा जई हालविता।
उफाळेचि वारा तुझ्या या कृतीने।
निवारीत ती लेखकांचीहि विघ्ने।।२।।

शेवटी :

गुरुमूर्ति हा कल्पतरुच जाणा।।
मनोकामना होतसे पूर्ण कामा।।
असे मंदबुद्धि स्वये मी बहुत।
नमो मीच कर्ता गुरू बोलवीता।।७।।
अहो भक्तराया तुम्हां भक्ति मोठी।।
नको येथ लावु कवीत्वा कसोटी।।
गुरूने स्वये बोलहे बोलविले।।
गुरू आणि भक्तानी मी वाहियेले।।८।।

कवीच्या अक्षरातील सुमारे ५० वर्षांपूर्वी याचे लेखन. गुलबर्गा येथील श्रीपत मार्तंडराव अनगरकर यांनी केलेले आहे.

(श्री. प्रल्हाद अनगरकर, स्टेशन रोड, गुलबर्गा)

८७३ मुद्गल प्रभुचरित्र श्रीधरबाबा

(के.ग्रं.अ.नों.पा.) अ. ४० शके १७६० ते १८४१ चा कालखंडातील गुरुमद्गल प्रभू तथा आनंद जय प्रभू यांच्या कालातील विवेचन. याच परंपरेत सांप्रत मुद्देश प्रभु (कुलकर्णी) यांचे कार्य. मराठी परंपरा गोरक्ष परंपरेची. याचे लेखन शिष्य श्रीधरबाबा हंचनाळ यांनी केले. लेखनकाल शके१८४१ सिद्धार्थी नाम संवत्सरी. रचना कानडी पण लिपी मराठी.

(मठ अंजुटगी, ता. इंडी, जि. विजापूर आणि काळगी ता. मुद्देबिहाळ.)

८७४ मुद्गल प्रभुचरित्र गुरुनाथराव

आ. २१ × १७ सें. पृ. ३०५. प्र.पा.ओ. २०. अ. ४०. ओ. २४८६. सं. अक्षर बारीक. वरील मुद्गल गुरुचरित्राचा मराठी अनुवाद गुरुनाथराव कुलकर्णी यांनी केलेला आहे. ते मुद्देश प्रभूचे शिष्य आहेत.

आरंभ : श्री गणेशाय नमः। श्रीगुरू म्हणती भक्तासी।। निरोपितो सांप्रत कथेरशी।। श्रीधरबाबा शिष्य उत्तरी।।

ग्रंथाकर्ता परियेसा।।१।। धन्य धन्य शिष्य देखा।। राहुनी श्रीगुरू जवळी ऐका।। कानडी भाषे कथानका।। देवनागरी लिपी लिहिले।।२।। तेचि कथा रसाळ।। श्रीभक्त हंचनाळ।। कानडी भाषेत सरळ गुरुभक्ता निवेदिले.

शेवट : संबोधोनि जननी म्हणते। तेचि भूदान स्तरी।। अवतार श्रीदत्त श्रीपादयती।। पीठापुरी परियेसा।।७।। तोचि आनंद गुरू।। पुनरपि अवतरले भुवरू।। करित आहे भक्त उद्धारू।। नरमनुष्य दिसे आम्हा।।८।। उत्तरार्ध कथा प्रभूचि।। दाखले कुठे न मिळती।। रामेश्वर यात्रा पूर्ती।। ग्रंथ समाप्त केले असे।।९।।

हा श्रीपाद श्रीवल्लभाचाच अवतार मानलेला आहे. ग्रंथाची ही अर्वाचीन प्रत.

(श्री. गुरुनाथ माणिक कुलकर्णी, महाद्वार, रोड गाणगापूर)

८७५ पूर्णानंद चरित्र हनुमदात्मज

(के. ग्रं. अ.नों.पा.) आनंद संप्रदायाची रचना. एकूण अ. २१. ओ. ३३८०. सं. लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

(किशनराव करजगी, कोंडद गल्ली, बहापूर, गुलबर्गा)

८७६ शरणबसवेश्वरचरित्र. मोहोळकर

(के.ग्रं.अ.नों.पा.) गुलबर्गा येथील वीरशैवपंथी सत्पुरुष श्रीशरण बसवेश्वर चरित्र. अ. ५. ओ. ४४५.

आरंभ : श्रीसांब सदाशिवाय नमः।। श्रीगुरुभ्यो नमः।। नमो नमोजी मंगलमूर्ती।। अनादि सिद्धा चिन्मय ज्योतीशिवाशंकरा अनंतगती।। तुज पशुपती नमो नमो।।१।। पशुनाम अज्ञानपण।। त्या समूळकर्ता तू हरणा म्हणूनि वंद्य तुझे चरण।। पार्वती रमण नागेश।।२।। नागेश माझा सद्गुरू।। जयाची कृपा आधारू।। मी केवळ अज्ञान पामरू।। काय परिपारु बोलू नको।।३।।

शेवटी : आता नरहरीची विनवण।। की सद्गुरू नागेश कृपे करून। येथे झाला ग्रंथ पूर्ण। तरी आणि संतासी।।७१।। इति श्री शरण बसप्पा चरित्र रसाळ।। परम पावन विशाळ।। सदा परिसोत भक्त प्रेमळ।। पंचमोध्याय सुढाळ हा।।७२।। इतिश्री शरणबसप्पा चरित्र समाप्त।। श्री सांब सदाशिव चरणकमळे समर्पणमस्तु शुभं भवतु।। श्रीरस्तु।।५।।

या भागात कानडी प्रांत असला तरी मराठीमध्ये ग्रंथ का लिहिला याचे विवेचन कवीने केले आहे.

जरी देश कानडी।। परी मराठी लेखन मोडी।। ऐसी पाहुनी परवडी।। ग्रंथ बिरडी घातली पै।।४।। येथिलीया देशी जाण।। सर्वचि मराठी लेखन।। उदीम व्यापार कुलकरण।। मराठी लागून लेख पै।।५।। येथील देशाचे जन।। तया कर्नाटक लिपीचे स्वप्न।। मग ग्रंथ कर्नाटकीत लिहून।। काय प्रयोजन असे जी।।६।। ग्रंथ जो कानडीत लिहावा।। तरी तो कोणी पै वाचावा।। ऐसा विचार आणूनी बरवा।। जनसेवा आरंभली।।

तत्कालीन भाषक परिस्थितीवर येथे प्रकाश पडतो. एका शतकापूर्वीचे हे लेखन आहे. तिथी व साल दिले नाही. नरहर लक्ष्मण मोहोळकर या ब्राह्मण कवीने वीरशैव संतांचे चरित्र गुंडप्पा शरणप्पा हडगील यांच्या साह्याने लिहिले, असा उल्लेख.

८७७ रसकौमुदी विठ्ठल गलंड

(के.ग्रं.अ.नों.पा) आ. २० × १२ सें. पृ. १९ × २. काळ्या शाईने बोरूने लिहिलेले. ४ पाने गहाळ. प्र.पा.ओ. १०. ओ. ४०४.

विठ्ठलगलंड हा विजयनगर राजाच्या दरबारी वैद्य पंडित होता. त्याच्या पणतूवाने केलेली ही प्रत आहे.

आरंभ : श्री कर्णपल्लव झळकता।। जया चंड सूर्यो चषकता।। ते दोंदिल देवता जागी मनी।। ज्ञानेविण कामना। ते वंदुवाग्देवता।। जियेची योग्यता।। शेषादिका।।२।।

शेवटी : इति श्री गलंडपदाकिता पंडित महादेव नय पंडित विठलदेव विरचितया वैद्यक रस कौमुदि ग्रंथ संपूर्ण।। श्रीरस्तु।।

श्री शके १४५६ विजनयानमवत्सर फाल्गुन वदिद्वितीया सोमवासरे तदिनी अळजपूर नगरे श्री काळची निवासे अंबनाथ शिवालये तिथे नगरी ये पवित्र ग्रंथु परोपकारार्थ लिखिते. वासुदेवसुतु पंडितासुतु दामोदर गलंडा विठ्ठल पंडित गलंडे याचा पणतु।। सिसोंतर.. शुभं भवंतु।। श्रीत्वारिता देवी करदा भवंतु।।छ।।

विजापूरचे हे घराणे शिलाग्रामी आले (गुलबर्ग्याचे संस्कृत नाव) आजही हकीम विठ्ठलराव घराणे रोजा येथे आहे. ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेच्या व्याकरणानुसार विशेषनामाच्या आद्य अक्षर "श्री"वर मात्रा आहे. याच कवीची वैद्य चंद्रककारिका, हितोदेश, रसरत्नप्रदिप रचना पण मराठीत आहे. याचा उल्लेख रचनेत येतो. कवी आपल्या रचनेत तृतीया तिथीचा उल्लेख कन्नड शब्द "ततगी" वापरून करतो. ४६२ वर्षांपूर्वीचा रचना आहे. मराठी अक्षरवाटिका यांचा विचार संशोधनदृष्ट्या करण्यास उपयुक्त अशी ही संहिता आहे.

(हकीम विठठलराव घराणे, रोजा गुलबर्गा)

८७८ क्र. १२६ जन्मपत्रिका तुकारामभट्ट

आ. ७२५ × ११ सें. (४।। × २४ फूट) कागद पातळ तपकिरी. प्रमोदनामसंवत्सर फाल्गुन शुभ १४ शके १८५२ रोजी देशपांडे कुळात जन्मले. त्यांची जन्मपत्रिका. यातील तपशील नामचातुष्ट्य, संवत्सरफल, गृहचक्र, विशोंतरी दशाकोष्टक, रासीचक्र, भारिदशाचक्र, संकटदशाचक्र, षडवर्ग सिंधी कोष्टक, लग्नकुंडली, चंद्रकला, चंद्रगर्भ, सूर्यकलाचक्र, द्वादशभावचक्र, ततुभावचक्र, धनभावचक्र, भ्रातृभाव चक्र, मातृभावचक्र, पुत्रभावचक्र, शत्रुभावचक्र, अष्टभावचक्र, धर्मभावचक्र, कर्मभावचक्र, आयभावचक्र, व्ययभावचक्र, शुभभाव आयुर्दाय भाव. ८६ वर्ष आयु.

हा सर्व ज्योतिषशास्त्राचा तपशील. अनेक कुंडल्या, चक्र आणि आलेख यामुळे विवरण केलेली ही पत्रिका अभ्यासाचा आवाका ध्यानी येण्यास उपयोगी. व्यासंगाचे दर्शन सुस्पष्ट. शके १८५२ म्हणजे ६५ वर्षांपूर्वी याचे लेखन ।।वे. तुकाराम धोंडो जोयसी दर्गा आळंद।। यांनी केलेले आहे असा उल्लेख. अक्षर मोठे. कागद चिकटवून २४ फूट लांब पट्टा बनवलेला. व्यवस्थित सुरळी केलेली पत्रिका. काळी व लाल शाई वापरून चक्र, कुंडली इ. सुव्यवस्थित लिहिलेली. प्रथमचा भाग थोडा जीर्ण.

(दे.सा.सं. आळंद)

८७९ ग्रं.क्र. १ गुरुचरित्र सरस्वती गंगाधर

आ. ३१ × १८ सें. प्र.पा.ओ. १७ अक्षर मध्यम रेखीव. कागद जाड चिवट. गडद शाई. बरीच पाने कसरीने खराब. पोथीची दुर्दशा. त्रु. प्रत. पाने विस्कळित. अ १४, २६, ३६, ४१, ४७ ची सुटी पाने. लेखन आकर्षक यामुळे संपूर्ण उपलब्ध पानांना प्लॅस्टिकचे आवरण लॅमिनेशन केलेले. विविध तुकडे आणि भुगा एकत्र करून त्याचेही लॅमिनेशन केलेले. शेवटचे पान नसल्याने प्रतलेखनकाल व प्रतलेखक अज्ञात. विस्कळित पानांची पोथी एवढेच आज स्वरूप आहे. उपलब्ध प्रतीत मोठ्या आकाराची पोथी.

गु. च. लेखक सरस्वती गंगाधराच्या खुद्द वंशातील ही प्रत. तेथे भिंतीत पोथी चुणली व अन्य आख्यायिका गुहा असल्याबद्दल इ. निराधार. कारण आज तो संपूर्ण भागच पाडून उद्ध्वस्त केला आहे. मूळ देव्हारा पण जीर्णोद्धार कार्यात ठेवला नाही; पण प्रचलित दंतकथा मात्र फोल ठरते. प्राचीन वास्तू गेली.

(लक्ष्मीकांतराव कुलकर्णी कडगंची, ता. आळंद)

८८० ग्रं.क्र. २ गुरुचरित्र सरस्वती गंगाधर

आ. ३१ × १४ सें. प्र.पा.ओ. १२ त्रु. प्रत अ. १. ती पण ४० व्या ओळीपासून. लेखन व्यवस्थित. संपूर्ण काळी शाई. कागद जाड. दंडरेषा पण त्याच काळ्या शाईत आहेत. ती पाने पण विस्कळित.

गुरुचरित्र लेखक सरस्वती गंगाधराच्या वंशात तेथे सध्या चुलत घराणे आहे. पोथीचा सर्वच भाग गहाळ, यामुळे प्रतलेखक वा प्रतीचा काळ समजणे कठीण.

सरस्वती गंगाधरांचा वंश नागनाथापासून आहे. नागनाथाची शाखा कडगंचीस नाही. त्यांच्या भावाचा हा वंश या गावी आहे. त्यांनीच स्थानाची व ग्रंथाची जोपासना केली.

(गुरुचरित्र लेखक सरस्वती गंगाधर व राजाचे घरी श्री. लक्ष्मीकांतराव कुलकर्णी मौ. कडगंची, ता. आळंद. आळंद–गुलबर्गा रस्त्यावरील बस स्थानक.)

८८१ प्रबोध सुधाकर शिवराम

(के.ग्रं.आ.नों.पा.) शिवरामस्वामी यांची ही आचार्यांच्या ग्रंथावर मराठी टीका आहे. अ. १२ श्लो. पद. ओ. ६०७ या टीकेत शिवरामस्वामींनी श्लोकाचे मराठी भाष्य व एकपद असा क्रम ठेवला आहे.

बानगी देहानंदा।।

संस्कृत :

स्त्रीपुसो योगे...।।१८।।

भाष्य :

लोभे टिक्रसि पतिसंग होय।।
ते गोठती शोषित शुल्क तोये।।
प्रवेशुनि जिव हळुच भोळा।।
कर्म धरितो त तुगर्भ गोळा।।

पद :

मोठे अनर्व्य मायेचे लाघव।।
भुलले पवित्र देहासि मानव।।धृ.।।
स्त्री आणि पुरुषाचा योग जेव्हा होय।।
शुक्ल शोषित जठरी मोठे तोय।।
जेथे जीवाने प्रवेश अकल्पित।।
करुनि अतिदुःख अतिदुःख अपरिमित।।२।।
पूर्ण हळुहळू हळुहळू भोगावे निजकर्म।।
मग म्हणे शिवराम शिवराम सुटे न कवण्या वर्म।।३।।

प्रत रेकुळगी लिंगणभट्टाची आहे. काल दिला नाही.

(श्री. हणमंतराव मंकाळ चिटगोपा, ता. हुमणाबाद, बिदर) श्रीपूर्णानंद कार्यालय संस्था.

८८२ अपरोक्षानुभूतीदीपिका शिवराम

(के.ग्रं.अ.नों.पा.) शिवरामस्वामींचे भाष्य. ओ. २९६ टीकेच्या शेवटी गुरुभक्तीचे श्लोक.

या रचनेत शिवरामस्वामी स्वतःचा उल्लेख महाकवी असा करतात. हा ग्रंथ वेदांत परिपाकाचा आहे.

आचार्यांच्या ग्रंथावरील ही मराठी टीका आहे. काल व प्रतलेखक अज्ञात.

(हणमंतराव मंकाळ चिटगोपा, बिदर)

८८३ ऐतिहासिक कागदपत्रे शृंगेरी पीठ

शृंगेरी पीठ हे चिक्कमंगळूर जिल्ह्यात आहे. येथील स्वामींना महाराष्ट्रातील निरनिराळ्या राजेरजवाड्यांनी पाठविलेली पत्रे. तेथील दप्तरात ठेवलेली आहेत. त्यांपैकी काही पत्रांचा तपशील संक्षेपाने :

(१) राजाशंभु छत्रपती (इ. स. १७३८-३९)

स्वस्ती श्रीराज्याभिषेक शके ६५ कालयुक्त नाम संवत्सर भाद्र शु. ५ सौम्य वासरे क्षत्रिय कुलवंतास श्रीराजा शंभू छत्रपती याणी चातुर्वण धर्म कुमुदवनी संस्थान विलासपटुता

चंदीर मारीष देसिकवर्या धिष्ठान शृंगेरीमठ संस्थान यासी.

(२) पंडित बाजीराव बल्लाळ प्रधान (इ. स. १७३९-४०) श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य संजात शृंगेरी श्रीसच्चिदानंद भारतीस्वामी यतीवर चरण कमलंषु (शके १६६१) सिद्धार्थनाम संवत्सर. अग्रपूजेबद्दल मंजकूर.

(३) माधव बल्लाळ प्रधान (इ.स. १७६१-६२)

राजश्रिया विराजित राजेश्री त्र्यंबकराव सिव हो स्वामी गोसावी पे।। माधवबल्लाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन..।।छ।।६ स।। समान सितेन मया व अलफ (सन ११६८ हिजरी) शेवटी.

बहुत काय लिहिणे ही विनंती.

(४) महादजी शिंदे (इ. स. १७९३-९४)

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमच्छंशंकराचार्य संस्थान शृंगेरी श्री सच्चिदानंद भारती स्वामीचे सेवेशी सेवक महादजी शिंदे दंडवत विज्ञापना ऐसिजे-----

सन अर्बासितेन (९४) शके १७१५ प्रमादिनाम संवत्सरे....

ता।।छ।।२१ माहे सफर मु. सन अर्बातिसेन मया व अल्फ (हि. स. ११९४)

सेवेशीश्रुत होय हे विद्यापना.

(५) कलेक्टर व मॅजिस्ट्रेट धारवाड

अजम अलेक्झांडर निसबट खासाहेब बहादूर कलेक्टर व मॅजिस्ट्रेट धारवाड याणी दस्तक बेसमी मामलेदार व माहक करी व जिल्हेचे कारकून व जहागिरदार व गावगन्नेचे, पाटील कुलकर्णी व सायर चौकीदार व सरहद्द घाटी रखवालीदारास वगैरे यास कळावे की... ...

ता. ८ माहे जुलाई इ. मु. सन १२५२ फसली शके १७६४ शुभकृत नाम संवत्सरे आषाढ शु।। ११ मु।। धारवाड.

(६) वेदशास्त्रसंपन्न राजश्री नागेश्वर शास्त्री मुखत्यार श्रीमद जगद्गुरू श्री शंकराचार्य महाराज मठ शृंगेरी... तपशिलात देणगीचा उल्लेख. दरसाल. महादजी निळकंठ ५०० रु., नारो शंकर राजेबहाद्दर ७५० रु., गोविंद हरिस्वामी गोसावी १५०० रु., सखाराम भगवंत गोसावी ४०० रु. याबद्दल विविध कागद संग्रही आहेत. जाड कागद, शाई काळी, मोडी लिपी.

(शृंगेरी पीठ. रेल्वेने हरिहर येथून मोटारीने शिमोगामार्गे, हैद्राबाद– रायचूर येथून बसने)

८८४ ऐतिहासिक कागदपत्र हंपीपीठ

सन १३०१ फसली (इ. स. १८९१) च्या सुमारास आळंद येथील मठाचे धर्माधिकारी गोपाळ भीमराव देशपांडे अज्ञातपालनकर्ता किसनराव मोघे वकील यांनी स्वामींना लिहिलेले पत्र. प्रथम शाखाचे शिष्य मंडळी अन्य गुरू केल्याचा तपशील मोडी लिपीत. संग्रहात अशी विपुल व विविध कागदपत्रे मोडी, उर्दू लिपीतील. पूर्ण निजाम राज्य या पीठाचे कक्षेत होते. सुमारे गाडीभर कागद यनकेपल्ली येथील मंदिरात पण विखुरलेली आहेत. विद्यारण्य स्वामींचे शंकराचार्य पीठ.

(गुलबर्गा होसपेट व तेथून हंपीक्षेत्र बसने)

(येनकेपल्ली मुंबई हैद्राबाद सडकेवर सदाशिव पेठ पासून ३ मैल उत्तरेस. आंध्र सरहद्दीवर.)

८८५ गुरुचरित्र सरस्वती गंगाधर

(के.ग्रं.अ.नों.पा.) आ. १७ × १२ सें. पा. ५८३ × २. प्र.पा.ओ. १३. अ. ५१. अक्षर बारीक. प्रत्येक पानास काळी चौकट रेषा मारून दोन्ही बाजूंस अंतराने जोड रेषा.

शेवटी : प्रत शके १८०१ अश्विन वद्य १२ रामभट्ट गुरुभट्ट पुजारी, भीमभट्ट रामभट्ट पुजारी श्रीक्षेत्र गाणगापूर यांची असे.

श्रीगुरू दत्तात्रेयार्पणमस्तु

(वामन भीमभट्ट पुजारी, श्रीक्षेत्र गाणगापूर)

८८६ गुरुचरित्र सरस्वती गंगाधर

(के.ग्रं.अ.नों.पा.) आकार १५ × ११ सें. प्र.पा.ओ. १४. पृ. ४३६ × २. अक्षर चांगले. ओळी जवळ जवळ. अ. ५१. ओ. ७१७९. शके १६८६ वर्षे तारण नाम संवत्सरे उत्तरायणे शशिऋतौ माघ मासे कृष्ण पक्षे तृतीया भृगुवासरे उत्तरानक्षत्रे तद्दिनी ढवळीक करोप नामक पुरुषोत्तमेन लिखितं समाप्तं।।११।। श्री दत्तात्रेयार्पणमस्तु।।छ।।छ।।छ।।छ।।

(धोंडोपंत नरसिंहराव कुळकर्णी, हत्तरबाड, ता. चिकोडी जि. बेळगाव.)

८८७ चोपडी

आ.२७ × १५ सें. कागद जाड– चिवट– तपकिरी रंगाचा. पृ. ६० × २. प्र.पा.ओ. १३. मोडी लेखन. यात देवस्थान गाणगापूर येथे आलेल्या अनेक सत्पुरुष आणि साधक यांच्या सह्या व अक्षरातील मजकूर. सज्जनगडचे भगवान श्रीधर स्वामी यांच्या वडिलाचे अक्षर व मजकूर. ते सेवेकरिता येथे होते. पुढे दत्तकृपेने मुलगा झाला. तेच श्रीधर स्वामी म्हणून प्रसिद्धीस आले. देगलूर : नारायण गिरमाजी

पतकी देगलूरकर दस्तुर खुद्द. त्याखाली बाळबोध सही नारायणगिरमाजी पतकी देगलूरकर हे हैद्राबाद. शके १८२८ (म्हणजे आजच्याला ९० वर्षे झाली.)

(वे. दत्तात्रय शंकरभट, दिवाकर शंकरभट, गाणगापूर)

८८८ गायत्री सहस्रनाम पुराण

(के.ग्रं.अ.नों.पा.) देवी भागवत पुराणातील संहिता विवरणासह. अ. ६. श्लोक १४६.

आरंभी : श्री गणेशाय नमः।। नारद उवाच।। भगवान सर्व धर्मज्ञ सर्व शास्त्र विशारद।। स्मृतिपुराणानां रहस्य तन्मुखाच्छुतं।।१।।

शेवटी : इति श्री देवी भागवते महापुराणे द्वादश स्कंधे गायत्री सहस्रनाम कथनं नाम षष्ठोध्याय।। श्री सांब सदाशिवार्पणत्रस्तु।।

शके १७८३ दुर्मती जेष्ठ शुद्ध प्रतिद्यां समाप्त।।

कवठेकर काशिनाथेन लिखितं।। इति गायत्री सहस्रनाम समाप्तं।।छ।।

(ॐ श्री आण्णा महाराज सरदेशपांडे)

दौलत कोठी, विजापूर.

८८९ क्र. २३९ गौरवकाव्य निंबाळकर

आ. ३० × १९ सें. पृ. ८ × २. गडद जांभळी शाई. अक्षर रेखीव- मोठे. कागद गुळगुळीत पांढरा. घडी घातल्याने काही तुटक तुकडे. ओ. ४१.

श्री कल्याणरावजी व धोंडोपंत देशपांडे, जहागीरदार ता. आळंद- पायगा यांच्या कर्तृत्व हुशारीबद्दल त्रोटक कवन बद्ध वर्णन अशी प्रस्तावना करून पुढे काव्य.

(चाल फटक्याची)

आरंभ :

पंचवीस वर्षांपूर्वी येथे आलो होतो त्या समयी।।

मेळगिररावजिसुत द्वय हे, विलसत तोषितत्या विषयी।।१।।

शेवटी : सहपरिवारा आपणा आहे योग्य शिस्त आदर सगळा।। पाहुनि तोषित आहे. लेखक सांप्रतच्या नाजुक काळा।।४०।। इतके कथुनि पुरे करित मी त्रोटक वृत्ताच्या कवना।। आपण कुटुंबियाच्या प्रेमे "हंसक्षिर" न्याय माना।।४१।।

उभय बंधूस आदरार्थ कर्त्याकडून सप्रेम अर्पण।। ता. २७ मार्च १९३७ मु।। जिडगा. दत्तात्रेय नरहर निंबाळकर (दे. सा. सं. आळंद)

८९० क्र. २४० शिवहृदयरंग अभंगमाला शिवाजीबुवा

(के.ग्रं.अ.नों.पा.) आ. १७ × १४ सें. संकलनात एकूण रचना ५३७. यात श्लोक, आरत्या व पाळणा, शेजारती अशी रचना. वारकरी संप्रदायाच्या कीर्तनाचे अभंग. कवी स्वतः कीर्तन करीत. यांचे वास्तव्य जिडगा ता. आळंद येथे देशपांड्यांच्या वाड्यात होते. हे स्वतःस छत्रपती शिवाजीचे वंशज म्हणवीत. त्यांच्यापर्यंतच्या नऊ पिढ्यांची वंशावळ पण दिलेली आहे. त्यांच्या रचनेची वानगी. कवीने शिव, शिवबा नाममुद्रा वापरलेली आहे. काही हिंदी रचना.

अभंग :

वेदशास्त्राचे माहेर।। एक हरिनाम साचार।।

स्मरलिया निरंतर।। नसे पार सुखासी।।१।।

शिव म्हणे मागिलाचे।। परंपरे तारू साचे।।

म्हणोनिया मनी वाचे।। एकवेचे निशिदिनी।।४।।

शेजारती :

चरणीविनवितो वैकुंठनाथा।।

चारी शिणले वर्ण जाता।।

तेथे किंकर शिवबा किती।।

शैज आरती ओवाळिता।। सुखे।।३।।

आरती :

स्वामी विवेकानंदाची आरती

आरती चंद्र नरेंद्र।। स्वामी विवेकानंदा।।

रामकृष्ण परमहंस।। हृदयकमलमयकंदा।।धृ.।।

गौळणी :

शिवाजी म्हणे तक्री जेवी लोणी।।

भोगिल्या ब्रह्मचर्य गौळणी।।

वेदश्रुति शिणल्या वर्णुनी।।

अठरा पुराणे।।गौ.।।७।।

बाडाचे शेवटी शिवाजी रावजी भोसले, राजे शिराळकर सातारा. लेखनकाल दिला नाही. ८० वर्षांपूर्वीचे लेखन कवी. ह.भ.प. सिद्धमुनी बाळा महाराज मुंबईकर याचे शिष्य म्हणवत. या संकलनात गणपतीस्तवन, सगुणउपास्यपर, मुमुक्ष. लक्षण, मंदमती साधकबाधक लक्षणपर सिद्धलक्षण. सिद्धांतबोध असे अभंग एकूण ५३७ स्फुट रचना (टिपणाधारे)

(दे.सा.सं.आळंद)

८९१ शिवशरण चरित्र गुरलिंगवा

(के.ग्रं.अ.नों.पा.) आळंद येथे हटगार (कोष्टी) वीरशैव

समाजाचे गुरू शिवशरण महाराज हुबळीच्या सिद्धारुढ महाराजांचे शिष्य होते. गुरलिंगवा मल्लाबादी होसटी या बाईने हे काव्य केले असून, भाषा कानडी व लिपी मराठी असा ग्रंथ आहे. या शिवशरण यांची समाधी अक्कलकोट येथे आहे.

ही रचना ७०-८० वर्षांपूर्वीची आहे.

(श्री शरण मंडप, आळंद)

८९२ अजपा मंत्र

आ. २९ × १७ सें. पृ. ४ × २. अक्षर सुटसुटीत आहे, कागद आखीव. मंत्रसंहितेसह विवरण.

पू. गुळवणी महाराज यांच्या हस्ताक्षरातील लेखन प्रास्ताविकात हा मंत्र पूज्य टेंबेस्वामी यांनी प्रत्यक्ष त्यांना अनुग्रहरूपाने दिला आहे आणि तोच मंत्र लिहून पाठविलेला आहे, याची माहिती दिलेली आहे. त्या खाली वा. द. गुळवणी अशी सही.

आरंभ : मानसिक स्नान।।छ।।

अस्यअजपा मंत्रस्य ब्रह्माऋषिः।। अव्यक्त गायत्री छंदः।। परमात्मा देवता।। हे बीज स.

शेवट : जीवात्मने सहसंच सहस्र गुरवे तथा।

टीप : वासुदेवानंद सरस्वतींनी गुळवणी महाराजांना हावनूर येथे मंत्र दिला असा उल्लेख.

(दे. सा. सं. आळंद)

८९३ सप्तपदी रामगुरू

क्रमांक ९९ च्या बाडात. श्री रामगुरु यांची ही रचना आहे. चंदला परमेश्वरी देवीवर सात वारांचे श्लोक ७ आणि रागातालासह ७ पदे आहेत. कवी १०० वर्षांतीलच आहेत. मूळचे व्हनगुंठी क्षेत्राचे. समाधी गुलबर्गा येथे.

रचनेची वानगी :

श्लोक :

रविवार.

जी श्री अत्री सती सुतत्व वरिली माहूर जी राहिली।।
कुरुपुरी आणि वाडि गाणगापुरी चारित्र जी दाविली।।
जी ब्रह्मांड भरुनिया फिरूनी की मायामयी जाहली।।
श्री चंद्रा परमेश्वरीत नटली तत्पादि म्या वंदिली।।१।।

या श्लोकास एकपद- काफी ताल दीपचंदी।।

श्री चंद्रलांबा पराया मैलारवासि जी मल्हारिया।।धृ.।।
मांडी विश्राम म्हळसाप्रिया।।
भजनी उधळीत भंडारा या।।
तेले दिवटी लावुनिया।।
तुंगावरी बैसोनी भानुउदया।।१।।

या क्रमाने. सात वारांचे ७ श्लोक, सात पदे आणि प्रत्येक पदात सात कडवे अशी रचना आहे.

(दे. सा. सं. आळंद)

८९४ क्र. १ बाड वैद्य आपटे.

आ. २२।। × १५ सें. पा. ४२ × २. प्र.पा.ओ. १७. अक्षर मध्यम. काळी शाई. कागद आखीव पातळ.

ज्योतिष विषयासंबंधीचे बाड.

आरंभ : श्री गणेशाय नमः।।

(१) चैत्र श्रु. १ (गुडीपाडवा) ज्या वारी येतो तो वार वर्षाचा अधिपती होतो असे ७ क्रमांक नोंद. त्यानंतर संवत्सर, अ ब क ड चक्र, अष्टोत्तरी महादशा, महादशासंख्याक्रम, अथनक्षत्र, शुभाशुभाचा संग्रह, चालित चंद्र तयार करण्याचा श्लोक, संक्रांतीचे ४ प्रकार, निर्णय, नाडीचक्र, नतउन्नत, पंचांगातील धर्मशास्त्र श्रावणी, भाद्रपद, मास माहात्म्य इ. विवेचनासह संहिता. संकलन महत्त्वाचे. कोष्टक कुंडली. भरपूर. प्रत करणार वैद्य व. गो. आपटे अक्कलकोट बाडाचे वर उर्दूत वसंत गोपाळराव आपटे रा. आळंद, हल्ली. मुक्काम अक्कलकोट. (काल १९४८) शेवटी पाने जीर्ण.

(डॉ. वसंतराव आपटे, बाहेर पेठ, आळंद)

८९५ क्र. २ अश्वपरीक्षा

आ. २२।। × १५ सें. पा. २९ × २ श्लो. १२३ प्र. ७. अक्षर बारीक- व्यवस्थित. प्र.पा.ओ. १७. मूळ श्लोकासह विवरण असे लेखन. प्रथम दोन पानांची प्रस्तावना आहे. ऋषीच्या यज्ञात घोड्यांचा त्रास. देवादिक सर्व त्रासून इंद्राकडे गेले; पण मी असमर्थ आहे. म्हणून शांडिल्य ऋषीकडे धाडले. ऋषीनी दर्भ फेकताच घोड्याचे पक्ष तुटून गेले. घोडा घाबरला, ऋषी आज्ञेने लोकोपकार्य यज्ञात साह्य करण्याची घोड्यास आज्ञा. हा सारांश प्रस्तावनेत.

आरंभ : आधी त्या एकदंता मग नमि सविताभारती देवमाता।। ज्ञानाचा पूर्णदाता, निजगुरू सविता पूर्ण तोडी अहंता।। भावे संता महंता नमि करि कविता होय आनंद दाता।। अश्वाचा बोध आता गुण अवगुण जाण तूं ज्ञानवंता।।१।।

यानंतर घोड्याची उत्पत्ती, घोड्याच्या जाती-ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य, क्षुद्र-दंतपरीक्षा, कालिका व व्यंजनी, शुक्लदंती, हरिव्यंजन, पीतांजली, नीलांजली, शंकित, मीनपस, छीद्रीक,

मुद्रापरीक्षा, शकुन परीक्षा, सुलक्षणी घोडे, कुमाईत, चिंतामणी, जयमंगल, शामकर्ण, सोरटी, अरबी, बदक, जामा (पेगू), आभा, तुरकी, भ्रमर-भोवरे, अशुभ लक्षणे शृंगी, अंजनी, कालांजनी, गीतांजली, रक्तांजली, विष, त्रिकर्ण, गंगापाट, द्वयखुरी, कुरवावर्त, जानुवर्त, मुनिदंत, दीनदंती, मध्यदंती, विक्राळ, तलावर्त, कृष्ण टाळू, काळमुखी, पंचनखी, पांचपाई, शून्य मस्तक, कर्ण मूळ, कौस्तुकी, कैरा, गोम, उर्ध्वमुकी, गोम, अधोमुखी गोम, ह्रदावर्त, कंठाभरण, डंखीक, पंचमुखी, नुचका, खोडिक खांद, बाहाल लोचन, सेन गाठ, आत्यवखोड व्याघ्रकांती, बाशिंग, उतरंडी, लोचनावर्त, अश्रुढाळ, उरगळी, तुटपटास, साल भूंकण, नाशिकावर्त, दाढ साखळ, अहीमुख बोंबला, आडली सर्पिणी, हरी नागळी, पुच्छावर्त, केरसुणी.

शेवटी :

केरसुणी शीर्षकात
एकीक कडेऽ धरिल तो हय आत्मदोडी।।
खोडील केरसुणी त्या धरि दूर लेंडी।।
नेईल तो कसलही धनधान्य भारी।।
स्वामीस जाण करितो हय भिकारी।।

अर्थ :

घोड्याने आपुले शेपूट वळवून बाजूस धरले तर त्यास केरसुणी म्हणतात. हा धन्याचा व धान्याचा नाश करील.

शेवट निर्देश नाही; पण प्रस्तावनेखाली– कर्ता नारायण हरि तुळपुळे. लेखनकाल नाही. शंभर वर्षांतील लेखन. मूळ रचनाकार कोण कळत नाही.

(डॉ. वसंतराव आपटे. बाहेर पेठ, आळंद.)

८९६ गुरुचरित्र सरस्वती गंगाधर

आ. २८ × १२ सें. पृ. ३१० × २. प्र.पा.ओ. १२. अ. ५१. अक्षरवाटिका रेखीव. कागद जाड– जीर्ण. शेवटचे २ अध्याय कसरीने भोके पडलेले. प्रथमचे व शेवटचे पान गहाळ.

पाठभेदाच्या दृष्टीने महत्त्वाची प्रत. उकारात्मक लेखन. (अ. २ ओ. २ नामांकितु।।) इ. अ. १ ओ. ३४ "ज्ञानद्यावे" पाठ. मुद्रित प्रतीत सर्वत्र ज्ञानदावा. एका प्रतीत "ज्ञानदेवे" महत्त्वाचा पाठ, तर येथे ज्ञान द्यावे. अरण- परात- शब्द रचनाकाल स्वस्ति श्रीमनृपं शालिवाहन शके १७२३ दुंदुभीनाम संवत्सरे वर्षा ऋतु श्रावण...

(वे. भीमभट्ट चिंतामण भट पुजारी, श्रीक्षेत्र– गाणगापूर)

८९७ बाड महिपतीनंदन

आ. १४ × १८ सें. प्र.पा.ओ. ११. पृ. ४८ × २. मूळ लेखन कन्नड लिपीत, पण सर्व मराठी स्फुट रचना आहे. विजापूर येथील सत्पुरुष कृष्णराय काखंडकी यांची रचना. यात विविध व विपुल पदे. एकूण पदे. इ. १००. त्याची वानगी.

(१) उदो म्हणा उदो म्हणा।। दिगंबरायाच्या नावे हो।।
स्मरणमात्रे जडजी व उद्धरती।। जिचे नावे हो।।धृ.।।
(२) ऐसा कान्हा बाई गे मनी घ्यावा।।
प्रेमभावे स्मरुनि गीती गावा।।धृ.।।
(३) सत्संगे धन्य जाहले थोर थोर।।धृ.।।
(४) जयदेव जयदेव।। जय पार्वती रमणा।।
शरणांगत जनतारक।। तूरे परिपूर्ण।।धृ.।।
(५) जयदेव जयदेव जय जी गजवदना।।
हिमगिरी तनया करवारिधी अमृतकिरणा।।धृ.।।
(६) जय माय विश्वंभरी।। महालक्ष्मी सत्यरिते।।
आरती ओवाळीन तुज।। लोक विख्यति।।धृ.।।
(७) नामस्मरता दीनोद्धारणारे।। शिवतुझे।।
वंदित मुनिजन चारू चरण घन।। महिम पारवर पावनरे।।धृ.।।
(८) धरिरेमन सद्गुरू नामस्मरण।।
स्वानंद सुख परमदायक पूर्ण।।धृ.।।
(९) जयदेव जयदेव जय सद्गुरुमूर्ती
स्मरण मात्रे जग पावन मूर्ती।।धृ.।।
(१०) श्री परात्पर ब्रह्म विश्वंभरु।।
अनुसयात्मज दत्त दिगंबरू।।धृ.।।

यात जवळ जवळ १०० स्फुट रचना आहेत. यात अभंग, स्तोत्र, आरत्या, पदे इ. रचना. कवी महिपती नंदन, महिपती सुत नाममुद्रा वापरतो.

(ह.भ.प. द्यावपा कारवंडकी कीर्तनकार. दिवटेगिरी गल्ली, विजापूर.)

८९८ बाड

आ. १५ × १८ सें. पृ. ३८ × २. प्र.पा.ओ. १२. अक्षर कन्नड लिपीत बारीक. पूर्ण मराठी पद्यरचना. महिपती काखंडकी यांची रचना. विजापूर येथील प्रसिद्ध संत. घराण्यात कीर्तन परंपरा. प्रत्येक पदास रागतालांचा निर्देश.

काही रचनेची वानगी :

(१) नमो नमो नमो नमो तुजमहिपतो राया।।मा.।।

स्मरण मात्र तरुनी जाते जन त्रया।।धृ.।।
(मांड- दादरा)

(२) तारावे मज गुरुराया।।
आलो शरण सज्जन ध्येया।।धृ.।। (काफी-त्रिताल)

(३) नव्हे नव्हे दरुषण रे।। अंतरी गुरुकृपाविण।।धृ.।।
(भूप-त्रिताल)

(४) वृंदावनी वास कोणाचा सांग माये।।
तेथ आनंद दुमदुमताहे।।धृ.।। (मिश्रपिलु-केरवा)

(५) आम्ही गुरूचे गुरूचे।।
दास महिपती रायाचे।।धृ.।। (पिलु-केरवा)

(६) या मोरयाचे नाव आधि स्मरारे आधि स्मरारे।।धृ.।।
(यमन-त्रिताल)

(७) गणराया रे महाकाया।।धृ.।। (हमीर-त्रिताल)

(८) मी काही नेणे रे।। ज्ञान साधन रामा रे।।धृ.।।
(जीवनपुरी- त्रिताल)

(९) जय दीन दयाळा रामा रे।।
रामा रे सुख धामा रे।।धृ.।। (केदार-त्रिताल)

यात महिपती शिष्याची पण रचना आहे. खुद्द महिपतीची मिश्र भाषांतील चरण असलेली रचना संपूर्ण दिली आहे. एकाच पदात कानडी, मराठी, हिंदी, तेलगू भाषांतील चरण असलेल्या रचनेची वानगी.

बाट पकडलो सीधा।।
न घडे तेथे बाधा।।
इदे गुरु निज बोधा।।
सुसुख समत वादा।।धृ.।।
बंदगी करता करके झूटा।।
तिळय दे निज घनदाटा।।
मर्मन कळता करणे खोटा।।
केळी श्री गुरुविगे नीटा।।१।।
जान बूझकर चलना भाई।।
लक्ष लाऊ नि गुरु पायी।।
इदु यल्लारीगु दोरदील्लया।।
यह समझे कोई विरला।।२।।
तिळदु नोडी श्री गुरु कृपे इंदे।।
हुवा खुदा का बंदा।।
महिपती गायी बहु आनंदा।।
हरि म्हणारे गोविंदा।।३।।

अशा धर्तीची बरीच रचना आहे. या महिपतीचा काल - - आहे.

(ह.भ.प. द्यावपया अप्पया काखंडकी कीर्तनकंठीरव, दिवटेगिरी गल्ली, विजापूर)

८९९ गुरुचरित्र सरस्वती गंगाधर

गुरुचरित्राची संपूर्ण प्रत. अ. ५१. अक्षर चांगले. संशोधनात नोंद केलेली पोथी काही अपरिहार्य कारणामुळे सूची करते वेळी पाहावयास मिळाली नाही. त्यामुळे अन्य तपशील लाभत नाही.

(डॉ. मधुकर कुलकर्णी ५४०/११
वाडा कंपाऊंड, अनगोळ.
बेळगाव ५९०००७)

९०० ज्ञानेश्वरी ज्ञानेश्वर

कागद जीर्ण. अक्षर चांगले. १८ अ. पूर्ण. संशोधनात नोंद केलेली पोथी सूचीच्या प्रसंगी काही अपरिहार्य कारणामुळे पाहावयास मिळाली नाही. त्यामुळे अन्य तपशील लाभत नाही.

प्रत. शके १६५९ ची असल्याचा उल्लेख.
(डॉ. मधुकर कुलकर्णी, अनगोळ, बेळगाव)

९०१ बाड

चिदंबर दीक्षित महाराज परंपरेतील विविध स्फुट रचना यात स्तवन, भजन, आरती, अभंग रचना.

त्यातील वानगी :

(१) नमो चिदंबरा विश्वंभरा।। मायातीतागुण गंभीरा।।
नित्यानंदा निर्विकारा।। विश्वेश्वरा तुज नमो।। (नमन)

(२) भजन : सुमारे ७

(३) आरती राजारामाची :
आरती राजारामा।। अवतार तुकारामा।।
स्वामी चिदंबरनामा।। महासागरविश्वात्मा।।धृ.।।

(४) कर्पूरारती :
जयदेव जयदेव जय चिदंबरा।।
कापुरारती ओवाळितो ईश्वरा।।धृ.।।

(५) चिदंबरनाम सौभाग्य संपूर्ण।।
सकळ आभरण नाम तुझे।।धृ.।।

(६) एका अनंत दासाची रचना सौभाग्यवर्धक अभंग. ही सर्व रचना मराठी भाषा व कन्नड लिपीत.

(चिदंबर साहित्य प्रसार सभा दोडुवाड, बेळगाव)

१०२ आलमगीरची सनद

आ. ३० × २० सें. पाने ४ × २. प्र.पा.ओ. २०. अक्षर मोठे. मोडी लिपीत. कागद तपकिरी पातळ. गडद काळी शाई. सं.

घतरगा ता. अफझलपूर जि. गुलबर्गा येथील भाग्यलक्ष्मी–भाग्यवंती देवीस आलमगीरने दिलेली सनद. प्रत्यक्ष मूर्ती फोडण्यास गेल्यावेळी उपरती झाली. त्या वेळेस हे दान दिलेले आहे. फार्सी उर्दूमिश्रित मराठी भाषा.

आरंभ : फजलहिलाही मीनकता एक दारूल जफर फरमान फरमान कबलोशरफ सहु या फाताब जनाब अज यकतदार बतारीख १ माहे रबिलावल अज शहूर सन १०५७ हासे पन्नास अनवय अलर्फ सरकार हवेली तख्त विजापूर आलमगीर औरंगजेब शिकजादे फरमान इनायती मुबारक दराज इनाम बक्षिस अजरुये हाल काजी कोताल, देशमुख, देशपांडे, सरकार हवेली तीनसे साठ किले, बत्तीस महाल, नऊ ठाणे अठरा परगणे, बादशाची...

शेवटी : सदरी भागवतीचे बांगडे टोचणेचे वगैरे मामुल निमे अरदा मान पुजारीने तेलाची घागर देवळात नेऊन डीकमाळास तेल घालून दिवा लावून तेलाची घागर पाटलाचे घरास न्यावी. पाटलानी घागर घेऊन पुजारी याणी शेला पागोटा द्यावे. भागवितीची ओटी निमेवर सदरी पुजारी घ्यावे. मौजे घतरगी ठिकण मान्य सदर मजकूर अवघे जिरायतीत मदन पडल्यास दर खळ्यास पुजारी गूड मोडण्यास गेल्यावर एक एक मोठा कणस द्यावे...

सदरी महादेवतीस मान वगैरे सदरी बाब अनभवून घ्यावे व सेवेत हाजर असावी मोहर तबसु सनद परगणा अफझलपूर... ... निजलि गपा देशमुख. रामचंद्रप्पा देशपांडे बलवंतराव कुलकर्णी घत्तरगी, मीर देहात अली हजरत बलद, इमामपाटील मोकदम घत्तरगी, अबदुलबेग वजीर, कुष्टप्पा कुलकर्णी अफजलपूर, मिरजासाहे कातिब-।।

मिरजा साहेब यांच्या मोडी दस्तुरातील हे लेखन आहे.

(दे. सा. स. विश्रामधाम आळंद.)

१०३ आत्मस्वरूप बोधो तेजक भजन

आ. १७ × १२ सें. पा. ६० × २. प्र.पा.ओ. १२. अक्षर बारीक. व्यवस्थित लेखन. बांधीव वही. हे एक शिवलेले बाड. कागद पातळ. काळी शाई. यातील संकलन शिवराम स्वामीबद्दल समकालीन व उत्तरकालीन कवींची रचनेवर आधारित.

यातील वानगीदाखल रचना :

(१) शिवराम शिष्य राजमणी विजापूर याची रचना. वक्त्यामाजि बृहस्पतीच दुसरा की व्यास पौराणिकी।। किं गंधर्व गायना अवतरे कांति मुखी हेमकी।।१।।
ज्याचि शाब्दिक युक्ति बोध कविता ब्रह्मसिहीनस्फुरते।।
तो माझा शिवराम पूर्ण गुरू हा मन्मंदिरी वावरे।।२।।

(२) वेदशास्त्र नाही शिकलो।। पूर्ण कर्म बहुदान ने दिली।।
नेमधर्म आम्ही काही नेणतो।।
पूर्ण ब्रह्म शिवराम जाणतो।।१।।

जुगीनाथकृत :

(१) विचार सारामृत पूर्ण जाणे।।
एकात्मतें वाचुनि आन नेणे।।
ज्याच्या गुणाची न गणेचि सीमा।।
स्मरे सदा त्या प्रभु शिवरामा।।१।।

श्रीधर स्वामी नाझरे :

(१) जीवीच्या जीवा सुखधामा।।
सुखया श्री शिवरामा।।धृ.।।
पत्र लिहिले ये भेटी तरी मुळीच नाही तुटी।।
श्रीधर शिवराम अभेद परी लौकिकया गोष्टी।।३।।

रंगनाथस्वामी निगडीकर :

(१) स्वस्ति श्री शिवराम पूर्ण गुरु हा प्रख्यात योगी पहा।।
सिद्धांत गुरुभक्त पुत्र निवळी सामर्थ्य सत्ता महा।।१।।
साक्षात्पंढरीनाथ हार स्वकरी घालुनि कंठी बरे।।
बोले त्यासह पाहती जन खरे प्रत्यक्ष नेत्री बरे।।३।।

रामानंद वगदाळ :

(१) वेदांत वेद्यं विमलं विकाश मद्वैत विराजमूर्ती।।
देहत्रयं साक्षित धुंडिराज रायेश्वर नित्य
महं नमामी।।१।।

आत्माराम :

(१) तो अनुभव वाना या अर्व्हे नव्हे मी।।
तरी पूर्णानंदाचा शिवराम स्वामी।।
कथिले ती पद संज्ञा वळखा तुम्ही।।
चिन्हे कळाया तेथील।।७१।।

अमृतेश्वर :

(१) म्हणती बारे शिवराम।। अन्वर्थ तुझे नाम।
बोल तुझे निगम।। सार सारे।।
या तुझ्या कवीतेची प्रौढी।। विचित्र प्रसादे रस गोडी।।
श्रवणे चित्त देती बुडी।। ब्रह्मानंदी।।
सकळ ग्रंथ पाहुनि।। सामर्थ्य पावले समाधान।।
तो दाखवि पंचीकरण।। शिवराम स्वामी।।
आमुचे मनी होते जण।। प्रांजळ करावे पंचीकरण।।
आता कर्तव्याचे कारण।। उरले नाही।।
तुझे ग्रंथी धरुनी प्रेमा।। वाचील त्या परमात्मा।।
अपरोक्ष होय।।
समर्थ कल्याणासी म्हणती।।
कल्याणी भेटली शिवमूर्ती।।
ज्याची पाहाता ब्रह्मस्थिती।।
शुकादिक डोलावे।।

रामचंद्रसुत :

(१) गुरु गीते प्रमाणे।। ते सहज आठवले जाण।।
शिवराम स्वामीचे वचन।। जाण।।
आशय पूर्ण आर्येचा।।
गुरुथोर की देव थोर म्हणावा।।
नमस्कार आधी कवणा करावा।।
मला पाहता सद्गुरू थोर वाटे।।
जयाचे प्रसादे रघुनाथ भेटे।।

रामचंद्र हेबाळकृत :

(१) श्रीराम देव सद्गुरू समर्थ।।
वरदा विख्याते न रोण।।
नमू आता संतप्रेमे।।
ज्ञानेश्वर एकनाथ तुकाराम।।
श्री समर्थ दासराम।।
पूर्ण शिवराम कल्याणी।।

राजारामप्रसादी :

(१) रुक्मणा पंत परम उल्हासे।।
धन्य म्हणती शिवराम स्वामीस।।
श्री गुरु भेटती वेगी तुम्हास।।
वदती ऐसे संतुष्ट होऊनी।।७१।।

(२) शिवराम स्वामी महा समर्थ।।
आत्मवे त्या माजी जो पंडित।।
ऋणि जयाचा श्री भगवंत।।
जवळ तिष्ठत सर्वदा।।८।।

(३) शिवराम स्वामीचे जन्मांतर।।
गुरुकृपे कळले साचार।।
केला जेणे विश्वोद्धार।।
लीला फार तयाची।।०।।

----

(१) वैशाख मासी तृतिया क्षतासी।।
भीमातिरी ततु टाकिलासी।।
कल्याण थामी करुनि मिरासी।।
शिवराम झाला वैकुंठवासी।।०।।

हनुमदात्मज :

(१) आचार्यकृत ग्रंथ संस्कृत।।
ते दुग्धामाजी नवनीत।।
त्यांचे मंथन करुनी प्राकृत।।
सारार्थ नवनीत उघडे केले।।१।।

(२) ज्याचे कवित्वाचे पुष्पवल्ली।।
घवघवे पसरले भुतळी।।
त्या मकरंदाचे कल्लोळी।।
गुंजारव करतील संत भ्रमर।।१।।

(३) ते शिवरामेश्वर।। जगाचा करुनि उद्धार।।
पूर्ण निज आधार।। ऐक्य होऊनि पैनिष्ठे।।
ज्ञान भीमातीरी।। अक्षय तृतियेस निधारी।।
पूर्णानंद समुद्री।। मग्न होतसे प्रभुराये।।

(४) शिवशब्द मंगलदायक।।
रामशब्द आरामकारक।।
इह सुख परमार्थी चोख।।
नाम मात्र प्राप्त असेल।।

नाथांचे पणतू शिवराम स्वामींबद्दल समकालीन व उत्तरकालीन. राजमणी, जुगीनाथ, श्रीधर स्वामी नाझरे, रंगनाथ निगडीकर, रामानंद वगदाळ आत्माराम, अमृतेश्वर, रामचंद्र सुत, रामचंद्र हेबाळ, राजारामप्रसादी, हनुमदात्मज यांची ही विविध रचना. कवी चरित्राच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली.

(श्री हुताशनानंद बिदर, बबरची गल्ली, सग्रह.)

९०४ **भिल्लीण** शिवराम

आ. ७ × १४ सें. पृ. १४ × २. प्र.पा.ओ. १० अक्षर बारीक. कागद जीर्ण. काळी शाई. काही भाग कसरीने खराब.

आख्यानपर रचना. शिवपार्वती सारीपट खेळताना नारद येतात. तेथे भांडण लागते. उमेला नारदाने सल्ला दिला. ती भिल्लीण वेष घेते. भगवान शंकराच्या प्रेमाने ती शरण येते.

क्रूर चेष्टा केल्याबद्दल क्षमा मागते, हा कथा भाग पद, अभंग, श्लोक यातून कवीने दिला आहे.

ही कथा म्हणजे मुमुक्षूंना मुक्तीचे साधन आहे, असे शिवराम सांगतात.

प्रतलेखन काल व प्रतलेखक अज्ञात.

(दे.सा.सं. आळंद)

९०५ कल्याण चालुक्य शिलालेख पांडुरंग देसाई

आ. २० × ३० सें. पृ. ८ × २ प्र.पा.ओ. १३. कागद जाड तपकिरी. स्थिती चांगली.

आळंद येथील त्रिभुवनमल्ल विक्रमादित्य यांचा शिलालेख. राज्यारोहण वर्ष ७ शके १००५ दुंदुभी नाम संवत्सर पौष शु. ५ आदित्यवार उत्तरायण पर्वाचा कन्नड भाषेत कंदवृत्तात आहे. याचा मराठी अनुवाद डॉ. पां. भी. देसाई यांनी केला.

आरंभी : अखिल सुरगण पूजित श्री सोमेश्वरानी कैलासाहून अवतरून या भूतालाशी तिलकप्राय असलेल्या अलंदपूर मध्ये निवास केला. या सोमेश्वर देवामुळे श्री मदलंदे (आळंद गाव) पवित्र झाले. हे सोमेश्वर व हे सुरेश्वराचार्य यती यांचे मुळे ही भूमी पावन झाली...

शेवटी : गोमल्लयचे मेहुणे सिल्लमय यानी तपोधनाकरिता छात्र वर्गाकरिता विद्यार्थ्यांकरिता आळंदच्या पश्चिमेस असलेल्या बल्लदेव मळ्यातील चार आंब्याची झाडे फळदान म्हणून दिली. आळंदच्या वणिक संघाने म्हणजे व्यापारी लोकांनी मिळून जी काही विड्यांच्या पानाची ओझी विकली जातील त्या प्रत्येक ओझ्यास पन्नासप्रमाणे विड्याची पाने दिली.

ही सर्व दाने नगर महाजन व पंचमठस्थान हे आचंद्रार्क चालवतील.

वरील शिलालेख तारीख इ. स. १०८२ डिसें. २७ चा ठरतो याचा अनुवाद १८ बहमन १३३७ फसली म्हणजे १९२७ च्या सुमारास केलेला आहे.

(दे.सा.स. आळंद)

९०६ प्रतापरुद्राचा ताम्रपट शामराव देशमुख

आ. २० × ३० सें. पा. १२ × २. प्र.पा.ओ. १२. अक्षर मोठे. पातळ कागद.

देवगिरी रामदेवराव याचे कनिष्ठ बंधू आळंद येथे गुरू हेमांड पंतासह होते. त्यांचे वास्तव्य भूषणपूर येथे होते. त्याचा काळ शके १२६० असून, संस्कृतमध्ये लेख आहे. गाणगापूर नृसिंह सरस्वती नंदीनाम शिष्य ग्रामजोशी घराणे कौलगा ता. आळंद येथील देवपाट्यात ही ताम्रपट चवड आढळली. त्याचा अनुवाद मराठीत सुमारे तीस वर्षांपूर्वी शामराव देशमुख खजुरी यांनी केलेला आहे. यावनी आक्रमणाचे भीषण चित्र यात दिलेले आहे. बाल स्वामी संग्रही तो सापडला.

आरंभ : श्री अलंकेश्वरानंद (आळंद) क्षेत्र येथील विद्या मंडळाचे अधिपती यज्ञेश्वर अध्वर्यु यांची सून गंगेप्रमाणे निर्मळ होती. क्रूर यवनांच्या आक्रमणाने प्रभुरामचंद्राने स्थापिलेल्या अलंकेश्वर व आनंदेश्वरीचा विध्वंस झाला. आचार्य संस्थापित पंचायतन आगर नष्ट झाले. पुस्तके, औषधी भांडार, शास्त्रे भस्मसात झाली. देवतास्थान नष्ट झाले. यज्ञेश्वराच्या लहान मूर्ती हलविल्या. विष्णूची मूर्ती पडसावळी येथे गुहेत ठेवली. विद्या केंद्रापासून अर्ध योजनेवर होनट्टी (होनळी) येथे आनंदेश्वरी स्थापिली. नंदी प्रवाहात बुडविला. आचार्य प्रशिष्य आनंद चैतन्य समाधीपर्यंत येई तो सैन्य मंदिर पाडण्याचे काम करीत होते. सिंदगीचे त्रिमलराय यास बोलावले. त्याने यवनास विनविले तर त्याचे हात पाय बांधून जळत्या घरात टाकले...

शेवटी : ... हे धर्म श्री प्रतापरुद्र भूषणराय भूषणपूर मंडळाचे अधिपतींनी शके १२६० बहुधान्य संवत्सर चैत्र शु. पौणिमेस लिहिले आणि श्री रुद्रेश्वर साक्षीने अर्पण केले. माझ्या वंशजानी यास मान्यता द्यावी.

हा अनुवाद ३० वर्षांपूर्वी केलेल्या संग्रही आहे. इतिहास दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा पुरावा. ६५८ वर्षांपूर्वी ताम्रपट (दे. सा. सं. विश्रामधाम आळंद)

९०७ रामविजय श्रीधर

(के.ग्रं.अ.नों.पा.) आकार २७ × १८ सें. अक्षर मोठे. सं. सुस्थितीतील ग्रंथ. पृ. ८०० × २. अ. ४० प्रतीचा काल बहुधान्य संवत्सर शके १६८०. प्रतकार सुबराव हरसूर मुडबी, परगणे प्रतापपूर हा आजच्या कल्याणी जवळील भाग. हुवीन हल्ली ग्रामाचा उल्लेख.

९०८ मांडुक्य उपनिषद मैराळ गोसावी

(के.ग्रं.अ.नों.पा.) मांडुक्य उपनिषदावर मराठीत ही गद्यात्मक टीका. लेखक बिदरच्या परिसरातील आहे. भाष्यकार मैराळ रामचंद्र गोसावी, नारायण खेडकर. यात रचनाकाल दिलेला नाही. अक्षर नेटके व कागद जाड.

संकीर्ण : विविध स्थानांतील अधिकृत नोंदीतून टिपलेले महत्त्वाचे ग्रंथ

(त्या त्या विवरणाखाली ग्रंथ स्थानाची नोंद केली आहे)

१०९ क्र. २५१ गुरुगीता-टिपणी

आ. १७ × २४ सें. पृ. ४० × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर बारीक. त्रु. फिकट काळी शाई. ४०० पृष्ठांचा हा मूळ ग्रंथ असून, त्यातील ही विस्कळित पाने. प्रथमची व शेवटची पाने उपलब्ध.

प्रारंभ : श्री आनंदाय नमः।। श्री शहा दत्ताय नमः।। श्री सद्गुरू आत्मारामाय नमः।।१।। तो तू शहादत्त परदाता। परापर उपदेशिता।। पर विद्यासिदाविता।। अवतरिता कलियुगी।।२।। तू सकळाचा प्रभू अलमा।। प्रभू प्रभुत्वे हे गरिमा।। साक्षी अगमा निगमा। परिपूर्ण नमन तुजा।३।। तूचि मूळ गुरू आत्माराम आदि गणेश।। कुळदेवता सरस्वती विशेष।। अभये करी अतिप्रकाश।। देई उल्हास गुरुगीता टीपणार्थी।।४।।

शहादत्त माहिती. परंपरा, पीठाची व गुरूंची इ. माहिती यात आहे. मूळ लेखक नावात संभ्रम.

शेवटी : धरणीधर क्षेत्र जे प्रसिद्ध। खानदेशमध्ये असे जाणावे। तेथे वत्सगोत्रोत्पन्न।। धर्माधिकारी मधुसुदन।। त्याचा पुत्र सुलक्षणा चिंतामणी नाम जाणि जे तो।। चिंतामणीचा पुत्र सदाशिव नाम सुचरित्र।। धर्माधिकारी पुण्य पवित्र आणि सर्वत्र विख्यात संत द्विजरूपे।। तो हा आत्मा रामानंदे स्वीकारला।। आनंद नामे उपदेशिला। सदानंद नामे प्रसिद्ध केला। मेळविला परमानंद पदी। चंपावती नाम नगरी। त्याचे नाव देव गणपुरी। जे असे गंगानेर उत्तरतीरी। सन्निद्ध विध्यांद्री नाम तो आनंदे।...

तेथे संवत्सर (१७७६) शके सोळासे एकताळीस साचार। आणि विकारी नाम संवत्सर। मास हा साचार श्रावण जाणिजे. स्कंदपुराणे उत्तरखंडे शिवपार्वती संवादे श्री गुरुगीता टिपणी।।छ।। (चांदोरकर) भूमचे शहादत्त अलंप्रभू, अल्लंप्रभू, आनंद संप्रदाय या दृष्टीने महत्त्वाची प्रचंड रचना. रा. सं. मं. च्या मूळ ग्रंथावरून ही केलेली त्रुटित प्रत आहे. संशोधनदृष्ट्या महत्त्वाचा ग्रंथ. नानिवडेकर यांची ही त्रुटित प्रत आहे.

(दे. सा. सं. आळंद)

११० शिवलीलामृत श्रीधर

(के.ग्र.अ.नों.पा.) वरील भागास ब्रह्मोत्तरखंड असे नाव आहे; पण ही पोथी शिवलीलामृताचीआहे. अ. २, ३ गहाळ. प्रतीचा लेखन काल. १७८ प्रवर्तमाने पराभव नाम संवत्सरे उत्तरायणे माघमासे शुक्लपक्षे सप्तमी भृगुवासरे तद्दिने प्रथम यामे ग्रंथ समाप्त।।

(कल्याणी जि. बिदर येथील ग्रंथ)

१११ उपदेश रहस्य विश्वनाथ

पृ. १२२ × २. ओ. १२८२. प्र. १२. शेवटी : शके १६९० सर्व जिव्दर्षे उत्तरायणे पौष कृष्ण सप्तम्यां आदित्य हस्तामृतसिद्धियोगे तद्दिने ग्रंथः।। संपूर्ण मागतम् ।। लिखितं चेदं श्रीमहादेवपाठका नुग्रही वाळिंबेत्युपनामक सखारामेण।। ग्रंथसंख्या द्वादश प्रकरण मिळुन एकंदर वोविया १२८२. (कल्याणी, जि. बिदर येथील ग्रंथ)

११२ आत्मानात्मविवेक सदाशिव

पृ. १०१ × २. त्रु. अ. ५ ते १३ उपलब्ध. सदाशि कवी स्वतःस तुकोद्धवदास, तुकोद्धवार्थक, तुकोद्धवचेला असे म्हणवतो.

(कल्याणी जि. बिदर येथील ग्रंथ)

११३ परमहंसपद्धती निवृत्ती अवधूत

(कें.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १० × २. संपूर्ण रचनेत वेदांताची चर्चा व शास्त्रविवरण. विद्यारण्य परंपरेतील रचना.

(कल्याणी, बिदर परिसर)

११४ शांती संकल्प भुजंगभट्ट

(कें.ग्रं.अं.ना.सां) पृ. ९ × २ त्रु. तपशील मिळत नाही.

शेवटी : शके १६३३ खरनाम संवत्सरे आषाढ वदि तृतीयायां।। स्वहस्ते भुजंगभट्ट चिदरी।।

पुनः शेवटच्या पानावर शके १६३४ वैशाख वदिद्वितीया भानुवासरे असा मजकूर.

(कल्याणी, जि. बिदर येथील प्रत)

११५ आर्या शिवराम

(के.गं.अ.नों.पा) पृ. १८० × २. ग्रंथाची प्रथमची ८ पाने गहाळ. आर्या क्रमांक ३६ ते १११ चा भाग आहे. श्री मन्महामुद्गल सूरीच्या मूळ संस्कृत आर्येवर ही शिवरामी मराठी टीका.

काल शके १६९८ दुर्मुखी नाम संवत्सरे वैशाख शु।।

अष्टमी भृगुवारे प्रथम प्रहरी समाप्त लेखन झाले.

यातच शिवरामकृत शिवपूजा महिमा ओ. ७ ते ४१ प्रतलेखक नामनिर्देश नाही.

(कल्याणी, जि. बिदर येथील ग्रंथ)

११६ आतिविवेक गोपीनाथ

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ३४ × २. गोपीनाथ कवीकृत ही रचना. संपूर्ण तपशील लाभत नाही. रचनाकाल व प्रतलेखक अज्ञात.

(कल्याणी येथील ग्रंथ.)

११७ ग्रं.क्र. अमृतसार मृत्युंजय

पृ. ५६ × २. अक्षर मोठे. याचा तपशील मिळत नाही. या ग्रंथाचाच उल्लेख ज्ञानामृत असाही दिलेला आहे. प्रतलेखक व काल अज्ञात.

(कल्याणी परिसरातील ग्रंथ)

११८ पंचषष्ठी ज्ञानेश्वर

पृ. ६ × २ ज्ञानेश्वरकृत लिखित तथा पंचषष्ठी अशी रचना. विशेष नोंद आढळत नाही.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

११९ गुरुगीता विठो.

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ३७ × २. श्लो. १३१. टीका ओ. ७३४. ज्ञानदेव परंपरेतील कवीची रचना.

शेवटी : श्री गुरुगीता मंगलस्नान।। हे जेथे वसे तेथ कल्याण।। कल्याणरूप शिव आपण।। बोलिला निजखूण गुरुगीता।।७२३।।

मालो सखा नरहरी स्वामी।। माधवगुरू अंतर्यामी।।

विठोसी नांदवी कल्याण धामी।। गुरुगीता आरामी रमविता।।७३२।।

अन्य तपशील आढळत नाही. कवीची परंपरा निवृत्ती-ज्ञानेश्वर-सोपान. मालो-नरहरी-माधव-विठो– लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात. कल्याणीचा कवी होता, याचा स्पष्ट उल्लेख रचनेत.

(कल्याणी, जि. बिदर परिसरातील ग्रंथ)

१२० पंचीकरण प्रमेय अज्ञानसिद्ध

पृ. ८ × २. त्रु. पोथीत दोन भाग करून एका भागास संस्कृत मराठी भाष्य व दुसऱ्या बाजूस दखनी हिंदीमध्ये अनुवाद असा क्रम.

वानगी :

इति मृत्युंजय अज्ञान सिद्ध नागेश।।

पृच्छा निश्चय।।

त्या बाजूस :

इति मृत्युंजयकु अज्ञान।।

सिद्धनागेश पुछा या हक्क।।

विशेष विवरण लाभत नाही. प्रतलेखक व काल नाही.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

१२१ अपरोक्षानुभूतिदीपिका शिवराम

पृ. ३० × २. मूळ संस्कृत श्लो. १४४, त्यानंतर मराठी भाष्य. शेवटी गुरुभक्तीचे ६ श्लोक. विवरण अन्यत्र आले आहे.

प्रतीचा काल : शके १७३० विभव नाम संवत्सर दक्षिणायने वर्ष रुतौ श्रावण मासे शुक्ल पक्षे सप्तम्या भृगुवासरे लिखितं को ऊरजखण भट्टात्मज कृष्णपाने लिखितं स्वहस्ते.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

१२२ लेखणी ज्ञानदेव

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ७ × २. केवळ ५१ ओ. उपलब्ध. यातील ओवी :

गर्जोनि निवृत्तीनाथ। ऐसे अबोलणे वाचिल।।

हे पत्र पैठणी एकनाथ। वाचील वो माय।।५१।।

हे प्रकरण ज्ञानेश्वराचे मानावे तर एकनाथाचा उल्लेख येणे शक्य नाही. प्रक्षिप्त ग्रंथ वाटतो. यासच कल्याण पत्रिका असेही नाव आहे. प्रतलेखन काल व लेखक अज्ञात.

(गुलबर्गा परिसरातील ग्रंथ)

१२३ तत्त्वमसि ज्ञानेश्वर

पृ. २२ × २. भिन्न अक्षरातील ही पोथी. विशेष विवरण आढळत नाही. त्रु.

शेवटी : शके १७२२ रौद्रनाम संवत्सरे श्रावण शु।। चतुर्दश्यां भृगुवासरे तुकोबात्मज भिवरावेन लिखितं।।

(बिदर परिसरातील ग्रंथ)

१२४ विवेकसिंधू परिभाषा

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १९ × २. अपूर्व रचना. ज्ञानेश्वरी

परिभाषाप्रमाणे रचलेला हा ग्रंथ. जास्त विवरण आढळत नाही. काल व प्रतलेखक अज्ञात.

(बिदर भागातील ग्रंथ.)

१२५ विवेकसिंधू मुकुंदराज

(के.ग्र.अ.नों.पा.) पृ. १४७ × २. जीर्ण पोथी. १६ व्या व १७ व्या प्रकरणात काही श्लोक वेगळे.

लेखनकाल शके १६२५ संवत्सर नंदनामा फाल्गुन मासे असितपक्षे। त्रितीयायां इंदुवासरे तद्दिने चंडर ग्रामे। रामेश्वर सन्निधौ परोपकारार्थ लिखितमिदं।। हस्ताक्षर नागेश.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

१२६ अमृतानुभव वीरेश्वर

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ८५ × २. त्रु. प्र. १, ७, ८, १० उपलब्ध. वाळवीने कुरतडलेली प्रत.

शेवटी : श्री गुरू वीरेश्वराये नमः।। ब्रह्मणेय नमः।। वाणी ही ऐकुनि सदैव रमाच याची।। वीरेश्वर प्रभु म्हणोनि जयासि नाम।।

लेखनकाल १६१५ शके.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

१२७ पंचदशी रामकृष्ण

(कें.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १२८ × २. पंचदशीवरील हे मराठी भाष्य. गद्यात्मक टीका आहे. केवळ प्र. १ व ५ त्रु.

पहिल्या प्रकरणात : हे विळंबी संवत्छर मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमा। नारायण लेखक चंदाउरकर।।

पांचव्या प्रकरणात : नारायणेन लिखितम् ।। हे विळंबी संवत्सर माघ शुत्ध पंचमी सोमवारी।। यातील वारानुसार हा काल शके १६९९ चा येतो.

(बिदर भागातील ग्रंथ)

१२८ प्रबोध चंद्रिका ब्रह्मेंद्रयती

(कें.ग्रं.अ.नों.पों.) पृ. ३८ × २ त्रु. अध्याय उपलब्ध. पदपदार्थ बोधिनी अशी भाष्यबद्ध टीका.

प्रतलेखक व प्रतीचा काल नाही.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

१२९ जीवनमुक्ती जीवनमुक्त

(कें.ग्रं.अ.नों.पों.) पृ. ५३७ × २. गीतेवरील टीका. समानार्थी मराठी श्लोक व एक पद असा क्रम.

हा जीवनमुक्त कवी अनत्वार गावाचा राहाणारा. एक्केहळी जवळील ग्राम.

शेवटी : शके १७५२ विकृती संवत्सर येवढा उल्लेख.

(बिदर भागातील ग्रंथ)

१३० चांगदेव पासष्टी वीरेश्वर

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ४७ × २. ज्ञानेश्वरांच्या ग्रंथावर ही गद्यात्मक टीका.

प्रारंभी : श्री ज्ञानेश्वर योगीवर्य चांगदेव योगेश्वरासी पत्र लेखन मिसे वोवी प्रबंध निमूनि समस्त साधक जनासी अनासये ब्रह्यैत्मेक्य बोध व्हावया योग वेदांत सित्धा, तत्वानुभवसिद्धांत प्रगटिते जाले। त्या वोवियाचा अर्थ श्रीगुरु ज्ञानेश्वर ब्रह्म विद्वर्य प्रसादे यथामती सांगिजेतो।।

शेवटी : श्री ज्ञानदेव स्वामी हे साक्षात विष्णु परमात्मा त्याचे या ग्रंथाचे विवर्ण कोण करु शकेल। तथापी तो ह्रदयस्था त्याच्या चिप्रसादे यथामती वोवियाचा अर्थ कथिला तो संती पाहून न्यनाधिक असलिया क्षमा करावी हे विरेश्वर वल्लभ दीक्षिताची विज्ञापना. काल नाही.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

१३१ बाड

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १६ × २. विविध संतांची रचना. समर्थ, तुकाराम, कोकिळ, अनंतसुत, अमृतराय, कबीर, मध्वनाथ, कोनेरी नंदन, गोपाळ, रंगकवी (या रंगकवीने मराठी शब्दांचे कानडी पर्याय शब्द गोवले आहेत.) शिवानंद, निऊर्ती, निजानंद, जीवनमुक्त, गोसावीनंदन, बाळकृष्ण, शेख महंमद, केशव, श्रीधर, शाली गावन शाहीर, आनंदतनय, रंगनाथ, वामन, शिवदिन केसरी, एकनाथ, शिवराम, उद्धवचिद्घन यांची रचना.

(बिदर परिसरातील बाड)

१३२ भक्तविजय महिपती

(कें.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ६०९ × २. एकूण ओव्या ९९९० अक्षर नेटके. शकाचा आकडा नाही.

(बिदर भागातील ग्रंथ)

१३३ येकनाथी भागवत एकनाथ

पृ. १५६ × २. त्रु. २ ऱ्या व १४ व्या अध्यायातील

पाने गहाळ. ओवीसंख्येत फरक. पाठभेद भरपूर.

लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

(बिदर भागातील ग्रंथ.)

१३४ बाड

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ८० × २ यात विविध संतांची रचना. रामदास, अमृतेश्वर, केशव, आनंदमूर्ती, सूरदास, तुकाराम, शिवराम, आनंदतनय, नाथात्मज, जीवनमुक्त, बस्वलिंग, रंगनाथ, शिवदिन केसरी, रमावल्लभदास, गोविंदात्मज, जयरामसुत, जयरामजयसुतांकित, मानपुरीमध्वनाथ, सज्जनरंजन,माधवदास, बाळकृष्ण, गोसावीनंदन, कबीर, मोरोपंत, उद्धवचिद्घन, सदानंद, विष्णुदास, गिरिधर, महामद्गलभट्ट यांची रचना.

(कल्याणी जि. बिदर येथील ग्रंथ.)

१३५ व्यंकटेश सहस्रनाम

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. २२ × २. पुराणाचे विवेचन. लेखनकाल : विलंबी नाम संवत्सर आशाढ वदि त्रदोदश्यांमिंदु वासरे समाप्त।। स्वहस्ते कोनेरी अच्युत नेत्रा लिखितं।। शके १६४०।।

(कल्याणी परिसरातील ग्रंथ)

१३६ बाड

(के.ग्र.अ.नों.पा.) पृ. २८ × २. शेवटची पाने गहाळ. यात समर्थ, केशव, परमानंद, कोनेर, तुका, मालो, बस्वलिंग, माधवदास, शिवराम, तुकाराम यांची रचना. मंत्र, यंत्र, सुभाषिते.

शके १७७२ चा गहाणवटीचा हिशेब यात शेवटी टिपलेला आहे. तोच लेखनकाल धरावा लागेल.

(कल्याणी परिसरातील ग्रंथ)

१३७ ब्रह्मोत्तरखंड रामानंद

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १२५ ×२. सं. अ. २२. अक्षर नेटके. अत्यंत जीर्ण पोथी. जास्त विवरण लाभत नाही.

(बिदर भागातील पोथी.)

१३८ अन्वय व्यतिरेक सीताराम बाबा

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ५३ × २ अक्षर साधारण. त्रु. कोकणातील समर्थ शिष्य सीताराम बाबा याचे लेखन. विशेष विवेचन आढळत नाही.

शेवटी : अन्वय व्यतिरेक ग्रंथ।। समर्थांचा शिष्य सीताराम बाबाकृत समास अक्रा।।११।।

वोवी सं.।।३५८।।

लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

(बिदर भागातील ग्रंथ)

१३९ पुराण प्रकरण रामानंद

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ४०० × २. रामानंदकृत भारत, भागवत, रामायण या पुराणातील प्रकरणे श्लोकबद्ध रचनेत.

कवी हुमणाबाद-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावरील सदाशिव पेठ (आज आंध्र सीमेत) येथील राहाणारा होता. तो उल्लेख : सदाशिवकर व्यंकटेश।। स्वहस्त।।

लेखनकाल दिलेला नाही.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

१४० एकवीस समासी रामदास

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ९८ × २. ग्रंथाच्या मुखपृष्ठावर ।।रामी-रामदासकृत यक्केविसी समासी नाम जुना दासबोध।। असे लिहिलेले.

मुखपृष्ठावर १२४० ओवीसंख्या दिली आहे; पण प्रत्यक्षात १३४० ओव्या पूर्ण आहेत. लेखनकाल प्रतलेखक अज्ञात.

(बिदर भागातील ग्रंथ)

१४१ बाड

(के.ग्र.अ.नों.पा.) मोठे. बाड यात श्रीधर, ज्ञानेश्वर, रामानंद, विठ्ठल, सेनादास, रत्नाकर, निवृत्ती-अवधूत, ताटीचे अभंग, लाखेची शाई करण्याची रीत, नरहरी कवी, आनंदतनय, कल्याण, यशवंत, भीम, मोरोपंत, माधवात्मज, पूर्णानंद, आत्मा, श्रीधर, गोपाळनाथ, बस्वलिंग, माणिक, अमृत, माधवस्वामी, जगजीवन, जनजसवंत, गुंडा, जनी, रंक, श्रीधर, नारायणात्मज, मृत्युंजयशिष्य मुद्या, याची रचना.

(बिदर परिसरातील बाड.)

१४२ बाड

(के.ग्र.अ.नों.पा.) आकाराने छोटे बाड. पृ. २१ × २. यात वामनकृत रुक्मिणी पत्रिका ९ श्लोक. एका व्यंकटेश कवीची श्रीकृष्ण पत्रिका श्लोक. २०.

शेवटी : श्रीमत विष्णुपुराण अर्थ हृदई आणोनिया नेटका।।

हे नारायण पंडिती करविली श्रीकृष्ण सत्पत्रिका।। जेव्हां श्रीशिवभक्त राघवसुत प्रख्यात आज्ञा करी।। तेव्हा हे कवि व्यंकटेश रचिता आले वैखरा।।२०।।

त्यानंतर मोरोपंत संस्कृत आर्या.

(बिदर परिसरातील बाड)

९४३ बाड

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ३९ × २. अक्षर चांगले. कागद जाड. यात रंक कवीने गुरू आत्माराम यांच्यावर केलेली विविध रचना. सर्व पद्य रचना.

(अपचंद मठ, ता. आळंद येथील ग्रंथ)

९४४ बाड

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १० × २. अक्षर बारीक. बहुधान्य संवत्सर चैत्र व।। ५ शनवारी अपचंद येथील समर्थ मठातील देवमूर्ती, उपकरण, अलंकार, भजन साहित्य, रथ सरंजाम, वस्त्र, निशाण, मरहमत कारखाना, रंगाची भांडी, लेखन साहित्य जीनस कोठडी स्वयंपाकाचे, कुणबिकेचे साहित्य याची यादी.

वर्गणीची यादी. आप्तवर्ग शिष्य समूह, संत साधुयोगेश्वर, जमीदार, साहुसराफ उदीमदार, रोजगारी व्यापारी, गावगाना, यांची यादी असून, मथळ्यावर स्वस्ती श्री बहुधान्य संवत्सर चैत्र प्रतिपदा गुरुवार रामदासी संस्थान नवनीत नदीतटी म. अपचंद येथील उपासना चालावयास धर्मवंत सहकारी संग्रह प्रतिवर्षी भिक्षा पोहचावी।। येथील सेवक आत्माराम गोसावी विनवणी!

असा मजकूर असून, कानडी 'बेण्णीतोरी' या नदीचे नाव संस्कृत-मराठीतून नवनीत नदी केले आहे. आळंद तालुक्यात हे अपचंद ग्राम आहे.

ही नोंद शके १७४० ची ठरते.

(अपचंद मठातील बाड)

९४५ बाड

(के.ग्रं.अ.नों.पा.) विविध ग्रंथांचे बाड एकत्र केलेले संकलन. यात विविध रचना, पत्रे इ. चा संग्रह. खूप मोठा गळाठा.

(बिदर भागातील बाड)

९४६ बाड

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १८ × २. यात विविध संतांची पदे. यात माधवदास, गोसावीनंदन, रामानंद, नामा मुक्तेश्वर, शिवरामपूर्णानंद, साम्राज्य, विष्णुदासनामा, दासदिगंबर, बाळकृष्णाचा वेडादास, पुरंदर विठ्ठलाची कानडी पदे मराठी लिपीत.

(बिदर परिसरातील बाड.)

९४७ बाड

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. २३ × २. या संकलनात समर्थ, माधवस्वामी, तुकाराम, आत्माराम, शिवराम, उद्धवचिद्घन, गोसावीनंदन, जीवनमुक्त, अल्लंखान नागेश, यांची पदे व काही कन्नड रचना मराठी लिपीत.

(बिदर परिसरातील बाड)

९४८ बाड

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ३८ × २. काही पाने गळालेली. यात रंक कवीची मराठी हिंदुस्थानी पदे. रंककृत लंकाप्राप्ती, दशरथ लग्न प्रकरण, आत्मारामावर पदे, शिवरामकृत प्रकरण. रंककृत आत्माराम पदाचा भाग :

धन्य दासावतार। आत्माराम।।
मान्य प्रियकर। रघुवीर।।धृ.।।
मूर्ति साजरी सुहास्य।।
सम पाहणे नैराश्य।।
प्रकट प्रतापी सुंदर।।
रंक जनाचा आधारू।।५।।

(बिदर परिसरातील ग्रंथ)

९४९ योगवाशिष्ठ सार रंगनाथ

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ४४२ × २. केवळ ६ ते १० प्रकरणे उपलब्ध. एवढ्या भागाचीच ओवीसंख्या ३५२५ त्रु. प्रत. लेखनकालाबद्दल संभ्रम.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

९५० क्रमसार आत्माराम

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ८९ × २. रामदासी संप्रदायातील महत्त्वाचे लेखन. विशेष विवरण लाभत नाही.

प्रतलेखक व कालनिर्देश नाही.

(अपचंद, ता. आळंद मठाचा ग्रंथ)

९५१ कपिलगीता अवधूत

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ११४ × २. प्रथमचे १ पान गहाळ. मूळ श्लोक २४० टीका. ओव्या १४१०.

अवधूत कवी म्हणतो :

प्रतिष्ठान नाम नगरी। परम पावन गोदातीरी।।
दुर्गा भवानी चिया क्षेत्री। पूर्वजा निर्धारी वास्तव्य।।१२६९।।
आमुचिया पूर्वजाचे मूळपुरुष। आवडी हरिभक्तिविशेष।।
दैवत पंढरी विठलेश।। करिती सेवेस निरंतर।।१२७०।।

चित्तोत्पती-सिद्धेश्वरश्रीधर-शामराज, अवधूत अशी परंपरा. अत्रि गोत्र, गुरूचे नाव गोविंद.

शेवटी :

चैत्र शुत्ध पौर्णिमेसी।। सर्व धारी संवत्छरासी।।
पूर्ण केले हो यात्रेसी।। मूळ पीठासी संतसंगे।।१३७८।।
शालिवाहन शके महिमा।।
सोळा से तीस वरुष नामा।।
सर्वधारी संवत्छर प्रेमा।।
वसंत संभ्रमा चैत्र मासु।।१३८५।।
पर्वता माजिदेवगिरी।।
खडकीग्राम बाई जी पुरी।।
केशवाचिया मंदिरी।।
ग्रंथ निर्धारी संपविला।।१३८८।।

नाथ संप्रदायी कवीचा प्रासादिक ग्रंथ.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

९५२ कल्पवल्ली अनाम

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ३ × २. त्रु. अक्षर बारीक. ओ.४०. कल्पवल्लीचे गुण व अनुपान याचा भाग.

कवी म्हणतो :

हो जगदंबा मूळ पीठिनि।। अखंडयोगियांचे ध्यानी।।
ज्ञानेश्वरांचे अंगणी।। खेळत असे।।३५।।
हे प्रकट न करावे सजनी।। गुप्त राखोनिदृढ राखावे।।
जो प्रकट करील तया आण।। श्री सद्गुरूची।।३६।।
श्री निवृत्तिदाता समर्थ।।
त्याचे कृपे बोलिलो कल्पा आंत।।
ज्ञानेश्वराचे मनोगत। संत समर्थ जाणती।।

प्रतलेखक, मूळ लेखक व काल अज्ञात.

(बिदर भागातील ग्रंथ)

९५३ गीता अनाम

(के.ग्रं.अ.नों.पा.) मराठीतील ही सम ओवी टीका आहे. मूळ रचना कुणाची याचा बोध होत नाही.

शेवटी :

अगाध परमात्म्याची करणी।।
सकळ शास्त्रे मंथन करुनी।। गीता नवनीत काढुनी।।
धनंजयासि दिधले।।७९।। शुत्धा शुत्धतही वाणी।। करावी गीतेची घोकणी।। तेथे संतुष्ट चक्रपाणी।। कर्मबंधन तोडील।।८४।। शके।।१६२२।। विक्रम नाम संवत्सरे अश्विन व।।१० मंदवासर तद्दिने पुस्तक लिखिते. प्रत. माधव कोनेरी.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

९५४ बाड

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १०८. प्रथम आत्माराम महाराजांची १२३ पदे. त्यानंतर एक प्रकरण त्यात रामदासी संप्रदाय इतिहास.

त्यातील आरंभ : चिंतन स्मरण मानसी देवभक्त।। क्षेत्र गुरुस्थान भा... वचन प्रेम अमाईक भाव।। त्रैलोक्य उपासना हरिसाह्य।।छ।।

पुढे ६८ कलमांतून परब्रह्मापासून भारतातील क्षेत्र, देवता, संतसज्जन, त्यांची स्थाने, परंपरा, चाफळ, सज्जनगड, डोमगाव, अपचंदचे वर्णन, परमार्थ विचार व चिकित्सेने इतिहास जोडीनेच नमूद झालेले महत्त्वाचे बाड.

(अपचंद, ता. आळंद मठाचे बाड)

९५५ कूटात्मक अभंग

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ५ × १२. आकार मोठा. मुक्ताबाईंचा एक, तुकारामाचे दोन, श्रीधराचे दोन, अशा ५ कूटात्मक अभंगांचे विवेचन अर्थासह.

(अपचंद, ता. आळंद मठाचा ग्रंथ.)

९५६ ग्रंथराज दासोपंत

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १०६ × २. अक्षर सुंदर नेटके. पोथीची पाने विस्कळित. मधलीच पाने गहाळ. त्रु.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

९५७ आत्मलीळा रंक

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १२५ × २. आत्मारामाचा शिष्य

रंक याची रचना. एक्केहळीचे गुरू आत्माराम यांचे चरित्र कवीने दिले आहे. मधलीच पाने गहाळ. अन्य तपशील आढळत नाही. लेखनकाल नाही. प्रतलेखक अज्ञात.

(अपचंद मठ, ता. आळंदचा ग्रंथ)

९५८ अध्यात्म रामायण शिवराम

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ३६२ × २ यात सात कांडांत ७, ९, १० ९, १५, १६, ९, असे ६५ अ. उत्तर कांडातील शेवटी महत्त्वाची नोंद :

ग्रंथ समाप्ती शके १६०७ विजयादशमी रविवारी. ती ओवी :

रवि वंशाचा मुख्यावतार।। म्हणोनि दिन ही रविवार।।
विजयी जाहला रघुवीर।। तिथी मनोहर विजयादशमी।।
असुरीसंपद संव्हारी।। ऐसीया क्रोधी संवत्छरी।।
गुरुदक्षिणाचिये थारी।। म्हणोनि निर्धारी दक्षिणायन।।१०१।।
शके १६०७ सोळा शहे सात्तोत्तर।। तै टीका केली शिवरामेश्वर।। कोनेरी बाबा सादरे।। झाला विचार लेखकु।।११२।।
पाच सहस्रच शत ५५००।।
इतु की ग्रंथसंख्या गणित।।
श्रोत्या वक्त्या सुख अद्भुत।।
जाळी समाप्त कल्याणी।।११६।।
प्रारंभ ही कल्याणी।। समाप्त स्थळ कल्याणी।।
ग्रंथ श्रवणे ही कल्याण।। नाम कल्याण यासाठी।।११७।।

प्रतलेखक व लेखनकाल नाही.

(कल्याणी, बिदर भागातील ग्रंथ)

९५९ नवग्रह अनंत

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. २० × २. कागद जाड. शास्त्रीय. लेखनकाल शके १६३४. नंदन नाम संवत्सरे वैशाख वदि प्रतिपद मंद वासरे।।

शेवटी लेखक.

स्वहस्त अनंत कोनेरिभट्ट रोजिनदार मोकाम बेदर।।

(बिदर परिसरातील ग्रंथ.)

९६० जीवनमुक्तिवाक्य

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ८२ × २. वेदांत प्रक्रियेचा गद्यात्मक असा ग्रंथ. विविध वेदांत चर्चा. ग्रंथकर्त्याचे नाव दिलेले नाही. जीवनमुक्त कवीचा ग्रंथ असावा.

शेवटी : कोणी येक जीव गीता पारायण करतो। कोणी विष्णुसहस्र नामाचा पारायण करतो। कोण्ही मंत्र जप करतो। कोण्ही भगव चिरकुट करतो। कोण्ही जटाधारी संन्यासी होतो। कोण्ही बैरागी होतो। कोण्ही लिंग बांधून जंगम होतो। कोण्ही जोशी होतो। पृथ्वीवर नानाविध मत्त आहेत। कोण्ही लोक संसार करीत आहेत। कोणी लोक मिरासीवंत आहेत। कोणी कुणबावा करित आहेत।। कोणी सिफाईगिरी करितो। ऐसे सकळही जग आपुल्या आपुल्या अभिमानकडून आहेत। सकळही जग ब्रह्मस्वरूप आहे। ज्यास आपुल स्वरूप ब्रह्मच आहे म्हणून कळत नाही। ज्यास भगवत्कृपा होती त्यास ब्रह्मात्मैक ज्ञान होईल। आणि ज्याला ब्रह्मात्मैक ज्ञान जाल ते सकळ जग ब्रह्मच पाहाताहेत। हा निश्चय निराभिमान दश प्रकर्ण समाप्त।।

लेखनकाल निर्देश नाही.

(बिदर भागातील ग्रंथ.)

९६१ पंचदशी रामकृष्ण

पृ. २८६ × २ यात १५ प्रकरणे. येणे प्रमाणे चित्रदीप, तृप्तीदीप, कूट स्थदीप, ध्यानदीप, नाटकदीप, तत्त्वविवेक, द्वैतविवेक, भूतविवेक, पंचकोश विवेक, महावाक्य विवेक, ब्रह्मानंदे योगानंद, आत्मानंद, विद्यानंद, विषयानंद. १३ वे प्रकरण गहाळ. महिपती स्वहस्त लिखितं।। असा उल्लेख गुरुशिवामार्पणमतु।। या उल्लेखावरून हा महिपती कल्याण शिष्य अपचंद मठाधिपती शिवराम यांचा शिष्य असावा. प्रतीचा काल नाही.

(अपचंद ता. आळंद मठाची प्रत.)

९६२ अमृतानुभव वीरेश्वर

पृ. ४२२ × २ प्रचंड अशी व्याख्यान रचना. ज्ञानेश्वराच्या अमृतानुभवावरचे हे विवेचन. प्र. १०.

शेवटी : इतिश्रीनृसिंह दीक्षित नंदन वीरेश्वर वल्लभकृते अनुभवामृत व्याख्याने। दशम प्रकरणे संपूर्णम्।।१०।। शालीवाहन शके।।१७१७।। आनंदनामसंवत्सरी वैशाख शु.।। द्वितीया गुरुवारी श्रीज्ञानेश्वर प्रसादे श्रीशंकरनाथजी देशिकेंद्रानुग्रहे।। चभापटणास दक्षिणभागी वृंदारण्यक्षेत्री श्रीयोगानंदलक्ष्मी नृसिंहाचे संन्निधी अनुभवामृत ग्रंथाचे व्याख्यान यथामती. वीरेश्वरे केले ते संती परिसोनि अर्थ अधीक उणा असलियां क्षमा करावी हे वीरेश्वराची विनय प्रार्थना।। श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु।। श्रीआत्मार्पण मस्तु

तिथीवारानुसार हा शके १७१६ येतो. आत्मार्पण म्हणजे गुरू आत्मारामास अर्पण.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

९६३ हस्तामलक सटीक एकनाथ

पृ. ८३ × २ एकनाथकृत ही टीका. ओ. ६७९ आरंभी श्रीगुरु सहजानंदाय नम: व शेवटी श्रीगुरु सहजानंदार्पण मस्तु असा उल्लेख. प्रतलेखक कल्याणीच्या सदानंदमठाचा शिष्य असावा. रचना काल दिलेला नाही.

(कल्याणी, जि. बिदर येथील ग्रंथ)

९६४ रामायण रामदास

पृ. ९९ × २. यात केवळ सुंदरकांड आणि युद्धकांडाचा भाग आहे. अक्षर नेटके प्रतीचा काल.

इदं पुस्तक भावनाम संवत्सर श्रावण वद्य नंदा तिथी ११ प्रथम याने लेखन समाप्तोयं।। श्रीराम समर्थ जयजयराम।। शके १७३६।। सन्न १२२३ फसली - प्रतलेखक अज्ञात.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

९६५ अक्षरमालिका आत्माराम

पा. २२ × २ ओ. ८० श्लो. १० अष्टाक्षरी ९, पद १ अभंग १.

विशेष विवरण आढळत नाही.

प्रतीचा काल व लेखक नाव दिले नाही.

(बिदर येथील प्रत)

९६६ आत्महित आत्माराम

पा. १८ × २ यात ओ. १५० आत्माराम यांची ही वेदांतपर रचना. प्रतीचा लेखक व काल अज्ञात.

(बिदर भागातील प्रत)

९६७ स्वरूपनिर्णय अमृत

पा. १२ × २ ओ. ९५ यात वेदांताचा उहापोह. याने आपली गुरूपरंपरा दिली. ती गाणगापूर नृसिंह सरस्वतीची आहे. विष्णु प्रजापतीपासून विद्याराम, कृष्णसरस्वती - नृसिंह सरस्वतीपर्यंत सर्व नावे माधवेंद्र अमृतानंद, गगनेंद्र, माधव सरस्वती (गोंदातीर नाथी तीर्थीवस्ती) विठ्ठल सरस्वती अंबिका सरस्वती - अमृत असा क्रम दिला आहे. लेखनकाल व प्रत लेखकाचे नाव नाही.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

९६८ अपराधस्तोत्र शिवराम

पृ. ६ × २ आचार्यांच्या रचनेवर मराठी भाष्य ही समश्लोकी टीका आहे.

काळ : शके १७३० विभवनाम संवत्सर दक्षिणायने वर्षरुतौ श्रावणमासे शुक्लपक्षे दश्म्या इंदुवासरे लिखितं। कोबुरजक्कणभटात्मज कृष्णपास्वहस्ते लिखितं।।

(बिदर परिसरातील ग्रंथ)

९६९ पदबोधिनी

पृ. ९१ × २ गीतेवरील रचना त्रु. अ. ८-१२-१४ एवढाच उपलब्ध.

मूळ लेखक अज्ञात. विवरण अन्यत्र आले आहे.

काळ : श्रावण शुद्ध प्रतिपदा चंदवारी समाप्त।। वेंकोबा कासीनाथ।। सदाशिव पेठ वस्ती। मोकांब पर्गणे कुलगुरु. एका अ. चे शेवटी.

सित्धार्तिनाम संवत्सर कार्तिक शुद्ध दशमी याचा शक १६०१ येतो.

(बिदर भागातील ग्रंथ)

९७० ब्रह्मबोध

पा. ३४ × २ प्रथमचा अध्याय पूर्ण. श्लो १४८. दुसऱ्यात केवळ ३१ श्लो. त्रु.

मूळ रचना कुणाची कळत नाही. काल व प्रतकार अज्ञात.

(बिदर भागातील ग्रंथ)

९७१ आचार्योपास्ति

पा. ५० × २. वेदांत विवेचन. गद्यात्मक लेखन. यात शेवटी.

श्रीगुरु भक्तीचे ठाई तत्तदात्म्याचा सानुराग सप्रेम आहे. या लागितेणेचि की कारणे हे आचार्योपास्तिचे स्थळ, पद, ठाव पोंखणे वर्धमान करणे मज पडिले म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे ऐसे ग्रंथकारे श्री ज्ञानदेवनामे गोरेनि परब्रह्म बोलिले आहे. आता गीताशास्त्रवक्ता श्री भगवंत तोचि ज्ञानेश्वर रूपे अवतरुनि स्वात्त भक्तिभाव स्वयें ज्ञानेश्वरी ग्रंथराज रुपे बोलिला तेथिला आचार्योपास्तिचे वोव्याचे विवरण मी प्राकृत मूढमति

काथि करीन परि सद्गुरु श्री ज्ञानेश्वर स्वामींनी मज मूढाचिये अधिकारानुरुपै जैसे प्रेरिले तद्नुसारे विवरण केले आहे. म्हणौनि संती उणे पुरें क्षमाकिजे। ॐ तत्सदिति श्री ज्ञानेश्वर्या आचार्योपासनं संपूर्ण।। श्री ज्ञानेश्वरार्पण मस्तु।

लेखक, प्रतलेखक आणि रचना काल अज्ञात.

(बिदर विभागातील ग्रंथ)

१७२ करुणाशतक

पा. १७ × २ निवडक शंभर अभंगांची ही रचना आहे. अत्यंत जीर्ण अशी ही त्रुटित प्रत आहे. यात अभंग १ ते १५ व २१ ते ९४ अभंग आहेत. शेवटचा भाग नाही. प्रतकाराने दोन अभंग निवृत्तीनाथाचे व अन्य तुकारामाचे संकलनात घेतले आहे. प्रतलेखक आणि कालनिर्देश नाही.

(बिदर येथील ग्रंथ)

१७३ ज्ञानेश्वरी ज्ञानेश्वर

पा. १२१ × २ त्रु. प्रत. अत्यंत जीर्ण अवस्था.

आरंभी :

नमोज्ञानेश्वरा निष्कळंका।।
जयाचे गीतेची वाचिता टीका।।
गीता ज्ञान होय लोका।।
अति भाविका ग्रंथार्थिया।।

शेवटी : शालिवाहन शके ।।१७२४।। दुंदुभि नाम संवत्सर वैशाख वद्य ।।४।। शुक्रवारी कानून गोरेणुराय तनूजेन शंकरेण लिखितं।। श्री गुरुवीरेश्वरार्पण मस्तु।।श्री।।

(बिदर भागातील प्रत)

१७४ गीता-अर्थ

पा. १४५ × २ अनामिक कवीची रचना. कवी म्हणतो-

जगदीश्वरे व्यासावतार घेऊन महाभारत निर्माण केले. त्यामध्ये ही भीष्मपर्व गीताशास्त्र सार काढले जे त्रैलोक्याच्या उत्धारास्तव परम दया करून आरंभ श्रीकृष्णार्जुन संवादरूप पृथ्वीवरी.प्रकट केले ते सर्वांस उपेगा अधिकारपरत्वे यथायोग्यास कौरव पांडवांचे युत्ध होत असता धृतराष्ट्र संजयाप्रति पुसता जाला।। अशी प्रस्तावना करून डावीकडे संस्कृत व त्याच्या बाजूस अर्थ दिला आहे. मराठी अर्थाची वानगी ग्रंथारंभीचा भाग.

धृतराष्ट्र उवाच।।०।। संस्कृत ।। टीका.

धृतराष्ट्र बोलता जाला। धर्मक्षेत्रजे कुरु क्षेत्राचे ठायी।।
मिळाले आहेत युद्धाचे इच्छेने।
आमचे आणि पांडवजे।
काय करिते जाले संजया।।१।।

लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

१७५ नि:संदेहदिनकर शिवराम

पा. ९ × २ शिवराम स्वामीची ही रचना. ओ. ९० यात या ग्रंथास नि:संदेह दिवाकर असेही नाव दिलेले आहे. प्रतलेखक व काल निर्देश नाही. ग्रंथाचे विवरण अन्यत्र आले आहे.

(कल्याणी परिसरातील ग्रंथ)

१७६ बोधामृत शिवराम

पा. ९ × २ यातील ६ वे पान गहाळ.

श्लो. ५३ यातील रचनेची वानगी.

हिरोनिया मायिक हा पसारा।।
दिल्हा निजानंदपदीच थारा।।
वारा मज न लगेया भवाचा।।
या लागी मी दास तया गुरुचा।।४४।।
भजन निजगुरुचे सर्वभूती करावे।।
गुरुचरण पहाया सर्व काळी झुरावे।।
गुरुमुख निजबोधे चित्त आधी भरावे।।
गुरुवर शिवरामे बोलिले आचरावे।।५२।।

(कल्याण परिसरातील ग्रंथ)

१७७ संदेहहरण राघवरंक्

पा. ३१० × २ अक्षर बारीक. जीर्ण प्रत. विस्कळित पाने. अधून मधून पाने गहाळ. विशेष विवरण आढळत नाही. प्रतीचा काळ नाही.

(बिदर परिसरातील ग्रंथ)

१७८ गीता प्रभाकर जीवनमुक्त

पा. ५३७ × २. गीतेवरील भाष्य. जीवनमुक्ती असेही नाव. श्लोक, समानार्थी श्लोक व एक पद अशी रचना. रचनेची वानगी.

सम - श्लोक :

मोहार्णवी जीव बुडोनि गेले।

शोकानले भस्म जलोनि जाले।
त्यालागुनी अमृत रूप गीता।।
वंदीन मी तारक दिव्यमाता।।

पद :

सुखदायक माता गीता।।
वंदिन सुरसरिता गीता।।धृ.।।
कृष्ण मुखाब्जापासुनि जाली।।
त्रैलोक्याते व्यापुनि ठेली।।१।।
पतित पावन हे चिद्‌गंगा
स्मरणे करितसे भवसंगा।।२।।
शोकमोहो अनलाते रामवी।।
जीवन्मुक्त पदी जनठेवी।।३।।
कालनिर्देश नाही.
(बिदर परिसरातील रचना)

१७९ गजेंद्रमोक्ष रामदास

पृ. ४० × २ श्लो. ७२. शेवटच्या पानावर ६७ ते ७२ श्लोक. श्लोक संख्या निर्देशात चूक. यात समर्थांचा उल्लेख स्पष्टपणे आला आहे, तो भाग.

गजेंद्रासी तो पावला देव जैसा।
प्रितीने म्हणे त्यासि पावेल तैसा।
म्हणे रामदास यदर्थि विकल्प।।
धरी तो पहा जाणिजे पापरूप।।
प्रतीचा काल व प्रतलेखक अज्ञात.
(बिदर परिसरातील ग्रंथ)

१८० उपदेश रत्नाकर रत्नाकर

पृ. ५८ × २. ओ. ३४२. सं. विशेष विवरण आढळत नाही. प्रतकाल व प्रतलेखक नाही.
(बिदर भागातील ग्रंथ)

१८१ अनामिक ग्रंथ

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. २७ × २. हा ग्रंथ कुणाचा आहे. याचा बोध होत नाही. प्रथमची २ पाने व शेवटचे पान गहाळ. पण यात उल्लेख असलेला काही वेचे :-

ऐका जनार्दनाची वोवी। ब्रह्मसुखाते सहज गोळी।।
सहज भावार्थी जो सहभावी।
महासुखची तो अनुभवी अज्ञानाचे अज्ञान फिटे।
ज्ञानियाचे ज्ञानाभिमान तुटे।।३०६।।
जनीजनार्दनु भेटे सर्वत्र असे।।४५४।।
हे ग्रंथांचे निरोपण।। वरिवरि पाहाते दिसे कठीण।।
परि अभ्यंतरीची गोडी जाण।। अमृता ऐसी।।४६८।।
लेखनकाल व प्रतलेखक आणि मूळ ग्रंथकर्ता अज्ञात.
(कल्याणी परिसरातील ग्रंथ.)

१८२ विवेकसिंधू मुकुंदराज

(के.ग्रं.अ.नों.पा.) २७ × २. त्रु. अक्षर चांगले. शेवटच्या पानावरील काल व प्रत लेखक.

शके १७ से हे २८ नेया प्रवर्त माने क्षयनाम संवत्छरे कार्तिकमासे शुक्ल पक्षे पंचम्मायां स्थिरवासरे तृतीय प्रहरे ग्रंथ लिखितं...।। इदं पुस्तकं काळिगी गोविंद भट्टस्य सुत नीळकंठेन लिखितं नीन्यया।।०।।
(बिदर भागातील ग्रंथ)

१८३ रामतुळसी शिवराम

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ६ × २. अक्षर बारीक. ओ. ११०. विवरण अन्यत्र आले आहे.
लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.
(बिदर परिसरातील ग्रंथ)

१८४ पंचीकर्ण रामदास

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १८ × २. यात काही पाने गहाळ. वरील पानावर ।। पंचीकर्ण रामदास।। असे शीर्षक दिले आहे. प्रतलेखक लेखनकाल नाही.
(बिदर, वगदाळ भागातील ग्रंथ)

१८५ गीतार्णव दासोपंत

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. २२४ × २. प्रचंड रचनेचा भाग. यात फक्त १५ वा अध्याय. एका अध्यायाचीच ओवी संख्या ५०००. ही गीतार्णवाची पोथी आहे. त्रु. यामुळे काल नाही. प्रतलेखक अज्ञात.
(बिदर परिसरातील पोथी)

१८६ लघु प्रकरणे रामदास

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १५६. समर्थ रामदासांचे विविध प्रकरण. काही पाने गहाळ. यात अंतर्भाव-आत्माराम, पंचसमासी निर्गुणध्यान, सगुणध्यान, मानसपूजा, क्षात्रधर्म, अखंड सावधान

(संभाजीराजेना पत्र) इ. बरीच रचना. काल व प्रतलेखक अज्ञात.

(बिदर भागातील ग्रंथ)

१८७ वाक्यसुधा अनाम

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १०० × २ आचार्यांच्या वाक्यसुधा ग्रंथावर अनामिक कवीची ही मराठी टीका. त्रु. लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

(बिदर मठातील प्रत)

१८८ वाक्यसुधा अनाम

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १४ × २. आद्य आचार्यांच्या वाक्यसुधावरील ही गद्यात्मक टीका. त्रु. लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात. अनामिक कवीची रचना.

(बिदर मठाची प्रत)

१८९ पांडवप्रताप श्रीधर

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ७५९ × २. संपूर्ण. श्रीधरकृत भारतसार पांडवप्रताप असून, यात अधुनमधून ओबडधोबड चित्रे दिली आहेत. प्रतलेखक व काल अज्ञात.

(कल्याणी मठातील प्रत.)

१९० भावार्थ रामायण एकनाथ

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ३३ ×२. ग्रंथातील सुंदरकांडातील ब्रह्मलिखित प्रकरणाचा भाग. त्रु. लेखनकाल व प्रतलेखक नाव नाही.

(कल्याणी येथील प्रत.)

१९१ एकनाथी भागवत एकनाथ

(के.ग्रं.अ.नों.पा.) ग्रंथाची त्रुटित प्रत असून, यात केवळ अकरावा अध्याय असून, त्याची ओवी संख्या १५४५ आहे . पाठभेदाच्या दृष्टीने महत्त्वाची प्रत.

(कल्याणी येथील ग्रंथ)

१९२ रुक्मिणी स्वयंवर एकनाथ

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १२७ × २. शेवटची पाने गहाळ. त्रु. अक्षर रेखीव. प्रतकार व काल दिला नाही.

(बिदर मठातील ग्रंथ.)

१९३ ग्रंथराज दासोपंत

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. ११६ × २. त्रु. पाने विस्कळित. अक्षर मोठे व वेधक. प्रतकार व काल अज्ञात. अक्षर नेटके.

(बिदरच्या मठाची प्रत.)

१९४ बाड

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १२ × २. अक्षर निरनिराळे. क्रम सार संज्ञा शीर्षकाखाली आत्मारामाची व समर्थांची वचने उद्‌धृत केलेली वंशावळी तारक प्रकाशमध्ये १५ कडव्यांतून विवेचन. या अभंगात

आरंभी :

आदिनारायण सद्‌गुरू आमुचा।। शिष्य होतयाचा महाविष्णु।।१।।

शेवटी :

मंत्र तारक ॐकारस्वरूप।। देत विश्वरूप मुमुक्षासी।।१३।।

येणे मंत्रे जाणा मुमुक्षु सावध।। साधक प्रसित्ध सित्ध होय।।१४।।

सित्ध होय राम तारक जपता।। मुक्ति सायोज्यता रामदासी।।१५।।

प्रतीचा काल व प्रतलेखक अज्ञात.

(बिदर परिसरातील ग्रंथ.)

१९५ स्थालीपाक रामानंद

(के.ग्रं.अ.नों.पा.) पृ. १२ × २. रामानंद कवीकृत ही रचना असून, यात पदे, श्लोक, वोवी अशी विविधता आहे. विशेष विवरण लाभत नाही. प्रतलेखक व काल दिला नाही.

(बिदर भागातील ग्रंथ.)

१९६ ग्रं.क्र. **पूर्णानंद चरित्र** हनुमदात्मज

(के.ग्रं.अ.नों.पा.) आ. ३० × १७. सें. प्र.पा.ओ. १०. अक्षर मोठे. अ. १८. एकूण ओ. २२८१. सं. स्थिती चांगली. ग्रंथाचे विवरण अन्यत्र आले आहे.

मूळ ग्रंथाचच्या प्रतीत पहिले पान गहाळ, तो भाग अन्य प्रतीतून घेऊन प्रत पूर्ण केलेली आहे.

शंकर श्रीकृष्ण देव यानी संशोधनात ८० वर्षांपूर्वी 'दोड एक्के हळी' येथील आत्माराम मठाचा उल्लेख केला त्या गावास सांप्रत 'जहिराबाद' असे नाव आहे. ही नगरी कर्नाटक व आंध्र सरहद्दीवर आहे. मुंबई हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर

हुमणाबादनंतरचे महत्त्वाचे बसस्थानक.

प्रतीचा काल व प्रतकार अज्ञात.

(वे. शिवराम दीक्षित, सिमथन गल्ली जहिराबाद) मुंबई हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर.)

९९७ निजात्मबोध राजाराम

(के.ग्रं.अ.नों.पा.) आ. १७ × २२. सें. प्र.पा.ओ. ११. अक्षर बारीक. कागद जीर्ण. अ. १९. सं.

बाळबोध लिपीतील हा ग्रंथ. याचे विवरण क्रमांक ७९२ वर आले आहे. मराठी ग्रंथ कन्नड लिपीत असा तो ग्रंथ आहे. त्या ग्रंथाची मूळ मराठी प्रत. स्थिती चांगली. मूळ कवीच्या हस्ताक्षरातील प्रत असावी.

(श्री. बाबूराव कुलकर्णी दोडुवाड, बेळगाव, पिन ५९११८४.)

९९८ चिदंबरअष्टोत्तर भजन राजाराम

(के.ग्रं.अ.नों.पा.) आ. १५ × २२. सें. प्र.पा.ओ. ११. अक्षर मोठे. सं.

यात राजाराम कवीने आपले गुरू चिदंबर महाराजांबद्दल अष्टोत्तरशत भजन ही रचना केली आहे.

त्यातील आरंभ :

रूप तुझे ईश्वरा, दावि मज चिदंबरा चिदंबरा।।१।।
आवडे रूप सुंदर।। दावि ते चिदंबरा चिदंबरा।।

शेवटी :

ऐकुनि धावा कानी, चिदंबर प्रगट वा निदानी।।१०७।।
दासासी भेटसी चिदंबर प्रगट तू जाहलासी।।१०८।।
इति अष्टोत्तर भजन।।

(श्री. बाबूराव कुलकर्णी दोडुवाड, बेळगाव)

९९९ ज्ञानेश्वरस्तुती अनगरकर

(के.ग्रं.अ.नों.पा.) आ. १७ × २२ सें. पृ. १२ × २. सं. अक्षर बारीक. ओळीत खूप अंतर. बांधीव वही. गेल्या पिढीतील कवीची रचना. ओ. ३४. सं.

आरंभ :

महेंद्रायणीच्या तटीं जी आळंदी।।
दुजी पंढरी तीस ऐसी प्रसिद्धी।।
तिथे राहिला ज्ञानियांचा विसावा।।
नमस्कार माझा तया ज्ञानदेवा।।१।।

भृजगप्रयातातील ही रचना. प्रत्येक कडव्यास शेवटी नमस्कार माझा तया ज्ञानदेवा, हे पालुपद.

शेवटी :

पुढे भक्तिने नित्य जो अष्टकाया।।
भवाची भये बाधिती ना तया या।।
म्हणे दास ।।श्रीपाद।। विश्वास ठेवा।।
नमस्कार त्या सद्‌गुरू ज्ञानदेवा।।३४।।

कवी श्रीपाद मार्तंड अनगरकर कवीच्या हस्ताक्षरातील लेखन. यातच ज्ञानेश्वरीची आरती. आरतीचे धृपद :

जयदेवी जयदेवी जय ज्ञानेश्वरीमाते।।
ज्ञानामृतसरिते, प्राकृतवेषधारिणी श्रीभगवद्‌गीते।।०।।

(प्रल्हाद अनगरकर ॲड. स्टेशन रोड, गुलबर्गा,)

१००० गुरुस्तुती अनगरकर

(कें.ग्र.अ.गो.पा.) आ. १७ × २२ सें. बांधीव वही. पृ. १०२ × २. अक्षर बारीक सुटसुटीत. ओ. ११२. सं. कान्हनगड-केरळ परिसरातील आनंदाश्रमाचे सद्‌गुरू रामदास व विश्वमाता कृष्णाबाई यांच्यावरील स्तुतिपर काव्यरचना.

त्यातील प्रथमचा भाग :

नमो श्री गणेशा गणाधीश ईशा।। नमो मोरया मंगलाविघ्ननाश।।

कृपे रक्षिसी ज्ञानकर्मेंद्रियासी।। म्हणोनी प्रभो वंदितो मी तुम्हासी ।।१।।

गुरुराव तोचि निदा नांदयाळु।। मनाचा मवाळु जगी लोक पाळू।।

असे कर्विता तोचि कर्ताहितैसा।। मन मौन माथा पदी रामदासा।।३।।

शेवटी :

गुरू संत माये खरी तू उदार।
तुझीया ठिकाणी नसे सानथोर।।
तुम्ही वृत्तीने संत हो संत खासे।।
पदी श्रीपती रामदासानुदासे।।११२।।
शेवटी आरती रचना.

(प्रल्हाद अनगरकर, गुलबर्गा)

१००१ गुरुस्तुती अनगरकर

आ. १७ × २२. सें. वरील रचनेचीच ही नवीन वाढीव आवृत्ती केलेली. यात १४८ श्लोक आहेत. पृ. २२ × २. अक्षर बारीक. कवीच्या हस्ताक्षरातील प्रत. सुस्थितीत.

(वरील प्राप्तिस्थान)

१००२ माताकृष्णाबाईस्तुती अनगरकर

आ. १७ × २९ सें. पृ. १२ × २. अक्षर बारीक; पण व्यवस्थित. ओ. ५१. सं.

आरंभ :

क्वचित् पुण्या भूमीवर जन्म घेती।।
फुलें मानवी ती सुगंधीक होती।।
जनी प्रेमसेवा बहु वाढवीती।।
आनंदाश्रमासी अलंकार होती।।१।।

शेवटी :

म्हणू कृष्णबाई किती तू उदार।।
तुझ्या अंतरी की नसे सान थोर।।
तुम्ही वृत्तीने संत भगवंत खास।।
पदी श्रीपदी रामदासानुदास।।५१।।

नंतर आरती, अष्टक, स्फुट, अन्य रचना.

(वरील प्राप्तिस्थान)

१००३ बाड अनगरकर

आ. १७ × २२ सें. पृ. ८० × २. अक्षर खूप बारीक. विविध स्फुट रचना, पदे, गौरवकाव्य इ. यात ईशस्तवन, तिळगूळ, गजल, प्रासंगिक विपुल रचना, आरती, दासगणू. स्तुती, रचनेत रागतालांचा उल्लेख. बरीच रचना मार्तंडात्मज या नावाने. कवीच्या हस्ताक्षरातील लेखन. गुलबर्गा राष्ट्रीय शिक्षण संस्था, नूतन विद्यालय व अन्य प्रसंगातील रचना असा परिसराचा ७० वर्षांपूर्वीचा इतिहासच ग्रथित झालेला आहे.

(प्राप्तिस्थान उपर्निर्दिष्ट)

१००४ दासलीला योगीराज

आ. ३० × १८ सें. त्रु. मधलेच काही अध्याय नाहीत. कागद जीर्ण. वाळवीने दुर्दशा. एकूण अ. ३६. ग्रंथ स्तवनात :

आता करू ग्रंथ स्तवन। तेणे उपजे वैराग्यज्ञान।।
श्रवण पठणे समाधान। सर्वांसी अर्पी।।७६।।
या ग्रंथनामा दासलीला। ठेविला मानले सकला।।
अन्वर्थक जैसा चंद्रकला। निधी म्हणवी।।७७।।
की हे चिदाकाश पवित्र। नाना लीला सतेज नक्षत्र।।
मध्यपूर्व समर्थ स्वतंत्र। कलानिधी।।८६।।
साभावे करिता ग्रंथाचे श्रवण। सकळपात केली दहन।।
ज्ञाने वैराग्य भक्तिपूर्ण।। उपजे चित्ती।।८७।।

समर्थांचे चरित्र, संप्रदायाचा इतिहास परंपरा आणि विविध व विपुल प्रसंग या दृष्टीने ग्रंथाचे मोल आगळे ठरावे.

शेवटच्या अध्यायात कवीचे मनोगत आहे. कौशिक गोत्री, माध्यंदिन शाखेचा, उद्धचिद्घन परंपरेचा, कुद्रे उपनाम, असलेला नांदेड जिल्ह्यातील वसुमतीचा राहणारा कवी. ग्रंथाची रचना साधारण नाम संवत्सरी शके १७७२ (इ.स. १८५०) ला जेष्ठ मासी शुभ नवमीस सोमवारी हैद्राबादेस लेखन झाले. भागानगरीतच कवीचे वास्तव्य होते.

ग्रंथाच्या शेवटी ५ आरत्या आहेत.

(वासुदेव महाराज मठ संग्रह, आळंद.)

१००५ टिपण

१७ × २१ सें. बांधीव वही. पृ. ३९ × २. अक्षर बारीक. मूळ उताऱ्यासह काही भाग.

काश्मीरचा कवी बिल्हण याच्या विक्रमांक देवचरित संस्कृत महाकाव्याचे हे सविस्तर टिपण आहे. मूळ कवीची रचना शके १००० ची (इ.स. १०७८) आहे. सर्ग १८ असून, एकूण श्लोक १६५१. रचना छोटीच पण संस्कृतात महाकाव्याचे स्थान आहे. हा कवी ८ वर्षे कल्याणीस विक्रमादित्य दरबारी होता. याने युद्ध करून लंका काबीज केली होती. एका दुर्मिळ ग्रंथाचे हे टिपण अत्यंत महत्त्वाचे असे आहे.

(दे.सा.सं. आळंद)

१००६ ज्ञानदिवाकर भूपाळी मालु कवी

आ. ७ × १२ सें. पृ. ७ × २. अक्षर बारीक. कागद पातळ. प्र.पा.ओ. ९. ओ. १८. निळी शाई.

आरंभ :

ज्ञान दिवाकर प्रसन्न झाला सरली भ्रांती निशा।।
उठोनि प्रातःकाळी घ्यावे सद्गुरू सर्वेशा।।१।।

शेवटी :

उभव समाधिस्वरूप भरले संजीवन निखिले।।१७।।
सदानंदपद शिवकल्याणी वळला पूर्ण कले।।
सहज पूर्ण हा ब्रह्म सनातन नरहरि मालु स्थले।।१८।।

आनंद संप्रदाय परंपरेतील प्रसिद्ध नरहरी मालु कवीची ही रचना आहे. प्रतलेखक व काल दिला नाही. नवनाथ चरित्रकार हा कवी सरस्वती क्षेत्र बासर येथील राहणारा होता.

(नंदीनाम घराणे, कौलगा, ता. आळंद, संग्रह.)

१००७ शिवगंगा भोगळे

आ. १७ × २१. बांधीव वही. भक्तिपरपदे. पृ. ७० ×

२. विविध रागातालांतून. सुमारे ५० वर्षांपूर्वीची रचना. गुलबर्गानिवासी कवी, सदाशिवराव भोगले.

१००८ बनशंकरीदेवी शाखी

आ. १७ × २१ सें. बांधीव वही. पृ. १०० × २. अक्षर मोठे-साधारण. पुराणाधारे बदामी येथील बनशंकरीदेवीचे आख्यान. ओवीबद्ध पुराणाचे विवेचन. गुलबर्गा परिसरातील कवी विठ्ठलराव शाखी. सुमारे ५० वर्षांपूर्वीची रचना.

(विठ्ठलराव शाखी, गुलबर्गा)

१००९ कफ आणि क्षयरोग उपचार जोशी

आ. २० × १८ सें. अक्षर मध्यम. पृ. ८० × २. वैद्यक शास्त्रातील विवेचन. रोगनिदान व उपचार आणि अनुपान याची शास्त्रीय माहिती. सुमारे ७० वर्षांपूर्वीची रचना. लेखक वा. कृ. जोशी हे गुलबर्गा येथील ख्यातनाम डॉक्टर होते.

(डॉ. र. वा. जोशी, स्टेशन रोड, गुलबर्गा)

१०१० इंजेक्शन शास्त्र जोशी

आ. २० × १८ सें. अक्षर बारीक. पृ. ६० × २. नव्यानेच त्या काळी ॲलोपॅथिक उपचाराचे महत्त्व वाढत होते. त्या वेळेस व्यवसायाने डॉक्टर असलेल्या लेखकाने या शास्त्राची संपूर्ण माहिती व विवेचन मराठीतून अभ्यासकांना उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ग्रंथाची रचना केली.

(वरील ग्रंथ प्राप्तिस्थान.)

१०११ मुक्तिमार्ग सोनेश्वर

आ. १८ × २१ सें. पृ. २०५ × २. अक्षर साधारण. कागद तपकिरी पातळ. अ. १४. सं. ओ. १८८६ कवीची अध्यात्मपर रचना. गाणगापूर चिदानंद सरस्वती ग्रंथरचना केली. त्यापूर्वी या ग्रंथाची रचना कवीने केलेली आहे. संपूर्ण रचनेत अध्यात्माचा विषय विवेचनात आला आहे. या ग्रंथातील पसारा चौदा अध्यायांचा असून गुरुलक्षण, मंत्रमहिमा, एकादशीव्रत, दर्शन नाम, विदेही नर, वर्तनक्रम, याचे विवेचन आहे.

आरंभ :

लेखक झाला विश्वनाथ! सोमेश्वराचे मुख निमित्त।
ग्रंथ जन्मकारण विवरणनाम।। प्रथमोध्याय।।११७।।

शेवटी :

शके अठराशे चवतीस! परिधरीव नाम संवत्सरास। ग्रंथ संपला पंढरीस।। चंद्रभागेतटाकी।।६९।।

संतसेवक सोनेश्वर हे सोनोपंत मास्तर म्हणून ओळखले जात. अक्कलकोटजवळील नागणसूरचे. काही काळ वास्तव्य गाणगापूरी इष्टगापूर येथे. तेथे लेखन केले.

(दे.सा.सं. आळंद)

१०१२ जीव्हेश्वरचरित्र साखरे

आ. १८ × २१ सें. प्र.पा.ओ. १२. पृ. २ × २. अक्षर बारीक. कागद आखीव. निळी शाई. सकुळ साळी समाजाच्या परंपरेतील पुराणाधारे श्री जीव्हेश्वर यांचे चरित्र गद्यरूपाने लिहिलेले.

प्रत्येक अध्यायाचा विवेचनाचा भाग. काही मूळ रचनेच्या उताऱ्यासह.

गेल्या अर्ध शतकातील लेखन. भीमाशंकर चंदपा साखरे यांचे.

(भीमाशंकर साखरे, आळंद)

१०१३ कफ क्षय प्रश्नोत्तरे जोशी

वैद्यक शास्त्रावरील प्रश्नोत्तररूपाने दिलेली माहिती व शास्त्रीय विवेचन. एका तज्ज्ञ आणि नामवंत डॉक्टरने लिहिलेला शास्त्रीय ग्रंथ.

पन्नास वर्षांपूर्वीची रचना.

(डॉ. र. वि. जोशी, विकासभवन, स्टे. रोड, गुलबर्गा)

१०१४ पाच नाथांचे चरित्र गहनीनाथ

(के.ग्रं.अ.नों.पा.) अ. १२. ओवीबद्ध रचना. एका नाथ परंपरेतील गणेशनथ ते केशवनाथ महाराज या सत्पुरुषांची माहिती. त्यांचे यौगिक सामर्थ्य आणि चमत्कार यासह आलेली आहे. संकल्पानुसार मूळ कवीचे आणखीन २ अध्याय शेवटचे अपुरे राहिले. त्या कोऱ्या पानावर रामचंद्रराव यांनी चित्र काढली आहेत. या ग्रंथाचे लेखन गहनीनाथ निवृत्ती बोरुले व संगप्पा वडगिरे, भीमराव कुलकर्णी यांचे आहे. मूळ ग्रंथ निवृत्ती हरिबा टेलर यांच्याकडे आहे.

या ग्रंथाची रचना त्या परंपरेतील सद्गुरू गहनीनाथ यांनी वयाच्या बाराव्या वर्षी केली. रचनाकाल इ.स. १९३८ चा ठरतो. नाथ परंपरेच्या संप्रदायातील अलीकडील काळातील महत्त्वाची रचना.

(श्री. जे. एन. कदम होळ समुद्र, जि. बिदर)

१०१५ बाड गणेशनाथ

(के.ग्रं.अ.नों.पा.) गहनीनाथ महाराज यांची स्फुट रचना. यात १७३ पदे, भारूड, २१ शौरी, २ पिंगळा, १० हिंदी पदे आणि १४ आरत्या एवढा पसारा आहे.

त्यातील रचनेची वानगी :

संसारी जो देवाचा न धरे विश्वास।।
तो जाणावा वंश रावणाचा।।१।।
सर्व आहे ठाये न करी भाव भक्ति।।
तया अधोगती बोलिजेत।।२।।
सांगे सर्व ज्ञान न करी अन्नदान।।
नव्हे उद्धरणकि तो काळी।।३।।
गणेशनाथ म्हणे बोले तैसा चाले।।
तोचियोगी जाणे सर्व साक्षी।।४।।
या स्फुट रचनेचा काळ १९३८ चा आहे.
(श्री. कदम होळसमुद्र, बिदर)

१०१६ बाड नाथ कदम

(के.ग्रं.अ.नों.पा.) वरील परंपरेतील विविध रचना. यात नाथांचे अभंग, गुढीपाडवा, नाथांच्या ओव्या, नाथांची आरती अशी विविध रचना. त्या रचनेतील काही वेचे :

(अभंग) :

सारसे गावात गुरु गणेशनाथ।।
हरिबा देशमुख शिष्य केला।।धृ.।।
मलनाथे बोध जालनाथा केला।।
पळवली वाडा पावन केला।।२।।
नाथ कदम म्हणे संत चरणीमाथा।।
समाधी दर्शन घेऊनी आता।।४।।
हरिनाथ गुरुनगरीचा।।
आषाढी कार्तिकी एकादशीचा।।धृ.।।
उभा विणा हरिनामाचा।।
भजन कीर्तन जागरणाचा।।१।।
दुसरा दिन द्वादशीचा।।
दरबारी तुळशी लग्नाचा।।२।।
अभंग भारूड गवळणीचा।।
पालखी मेळा काल्याचा।।९।।

(आरती) :

घागरी घागरी पाण्याने स्नान घालू या होऽऽ स्नान घालू या हो।

श्री हरी नाथांच्या समाधीला होऽऽ समाधीलाऽऽ।।धृ.।।

(या स्थानातील समाधी ३० × ३० फूट व्यासाची अपूर्व अशी म्हणावी लागेल. समाधीची उंची ९।। फूट आहे. समाधी शक १७१३ ठरतो. (ओव्या.)

पहिली माझी ओवी ग। गणेशनाथ गुरूला।।
समाधी आहे त्यांची। सारसे गावाला।।धृ.।।
जत्रा मोठी भरते चैतीच्या पुनवेला।।
समाधी त्यांची आहे धरणाच्या उजनीला।।१।।
दुसरी माझी ओवी ग। हरिनाथ गुरूला।।
भव्य समाधी त्यांची। होळसमुद्र गावाला।।२।।
तरंगत्या पाण्यावरी। सोन्याच्या पाटावरी।।
आत्मा चढवुनी ब्रह्मांडी। जिवंत समाधी ज्ञानपरी।।४।।
चौथी माझी ओवी ग। गुरु जाल नाथाला।।
चौनी पुरगी मुक्कामी। काला होतो तुळशीला।।१०।।
शिष्य केशवनाथाचे। गुरू नारायणनाथ।।
हडबे महाराज सासरे। गुरू शेषनाथ।।१६।।
नाथ कदमाची पुष्पांजली। समाधीच्या चरणी।।
ओवी ऐकुनी श्रोतेजनि। पावन होती जिवनी।।२०।।

(आरती) :

नाथाच्या नगरीत समाधी पाहुनी धन्य झालो आता।।
गुरू हरिनाथा, सखुबाई माता, जय केशवनाथा।।धृ.।।
संसार त्यजूनी जप तप करूनी छतीस वर्षांची सेवा।।
सासरे गावी गणेशनाथ गुरूचा पावूनी बोधामृत मेवा।।१।।
देव नदीकाठी, जंगलदाटी होळसमुद्र नगरीत।
जाळी तोडुनि, वसती करून जन दुःख निवरीत।।२।।
बेदराहुनि परिस बसविण्या आज्ञा तव दिधली।।
गुरूचा आदेश खरा करूनी कार्यसिद्धी केली।।५।।

परंपरेतील अशी ही स्फुट रचना अलीकडील विविध काळात झालेली आहे. नाथ वारकरी पंथातील ही एक अज्ञात परंपरा या परिसरात पुढे येत आहे.

(श्री. कदम होळसमुद्र, जि. बिदर)

१०१७ चरितामृत शिवदास

अ. ४४. ओ. २६७१. श्री अक्कलकोट शिवशरण महाराज यांचे हे चरित्र आहे. विणकर व कोष्टी समाज म्हणजे हटगार समाजांचे हे श्रीगुरुचरित्र असून, यांचा मठ आळंद येथे आणि समाधिस्थान अक्कलकोट येथे आहे.

यात कवीने आरंभी : ॐ जयजयाजी सद्गुरुनाथा।। तूंचि सर्वरूपे नटलासी तत्त्वता।। चराचर गात तुझीच वार्ता। न मानिता दुजे काही।।१।। हे गुज जाणती ज्ञानी लोक। जे ब्रह्म

होऊनि राहिले देख। ब्रह्माहुनी ते नेणती आणीक।। सृष्टी अनेक देखतांही।।२।। (अध्याय १)

शेवटी अवतरणिकेत : नवमाध्यायी शरण गुरुवर।। आळंदामाजी रचून मंडप सुंदर। पूजिती त्रिषष्टी पुरातन नरवर। उद्भट लोकांच्या साह्याने।।२१।।

असो येथे ग्रंथ समाप्त झाला। श्रोते विचारती हा कोणी लिहिला। सद्गुरूने म्हणताच सांग आम्हाला निमित्त कोण म्हणती ते।।६५।। तरी निमित्त मात्र शिवराम। लक्ष्मण तयाच्या पित्याचे नाम।। चंद्रगिरी ऐसे उपनाम।। याचे हाती ग्रंथ करविला।।६६।। मूलग्राम मूक्तापूर। तेथून येऊन सेविले हुबळीनगर।। सिद्धारूढांच्या सेवेत असून तत्पर।। वीस वर्षे राहिले तेथ।।६७।। मग यात्रा करून बहुत दिवस।। शेवटी आलो अक्कलकोटास। येथ शरण स्वामीचा प्रेम विशेष। म्हणून आता राहे येथ।।६८।। त्याचे इच्छेवरून हा ग्रंथ।। लिहिला असे यातील वृत्तांत। त्याच्या मुखे ऐकून समस्त। ओळीरूपे केला असे।।६९।। विरोधी नाम संवत्सर फाल्गुन मासी। वद्य द्वादशी महोत्सवा दिवशी। रथारूढ श्री शरण गुरू पाहण्यासी।। ग्रंथ संपूर्ण सिद्ध जाहला।।७२।।

श्री सद्गुरू सिद्धारूढ चरणारविंदार्पणमस्तु।।छ।।

शकाचा अकडा दिलेला नाही. ही अर्वाचीन कालातीलच रचना आहे. शेवटी एक आरती.

(श्री तीर्थलिंग पट्टदार्य शिवशरण मंडप, आळंद)

१०१८ सिद्धारूढ कथामृत शिवदास

अ. ५६. ओ. ४४२१. हुबळी येथील सिद्धारूढ स्वामी महाराजांचे हे चरित्र ओवीबद्ध केलेले आहे.

प्रारंभ : ॐ जयजयाजी सिद्धनाथ।। गणेश शारदारूपे तत्त्वता।। तूंचि नटलासी अनाद्यनंता।। निर्विघ्नता ग्रंथा तुझिया कृपे।।१।। तुझिया कृपे रेडा बोलिला वेद।। ज्ञानदेवावतारी तव प्रसिद्ध।। तसे जो मी मतिमंद।। तव चरित्र अगाध रचितसे।।२।। (अध्याय १)

शेवटी : तरी निमित्त मात्र शिवराम।। लक्ष्मण तया पित्याचे नाम।। मातोश्री पद्मावती परम।। वैराग्य वृत्ति जियेची।।८५।। ज्ञातीने गौडे सारस्वत ब्राह्मण।। गौत्र कौशिक ऋषि विश्वामित्र जाण।। माता पितरांचे चरण वंदून।। सिद्ध दयाघन सेविला।।८६।। मूळ ग्राम मुक्तापुरा।। सांप्रत राहाणे हुबळीनगर।। सिद्धाश्रमी वसे निरंतर।। सद्गुरूवर कृपेने।।८७।। शके अठराशे चव्वेचाळीस।। संवत्सर नाम दुंदुभी त्यास।। कार्तिक शुद्ध षष्ठी दिवस।। गुरुवारी ग्रंथ समाप्त।।८८।। वंदुनी सद्गुरू दयाघन।। आणि तुम्ही श्रोते सज्जन।। उच्चारून मंगलाचरण।। ग्रंथ लेखन पूर्ण करी।।८९।। स्वस्ति श्री सिद्धारूढ कथामृत।। ऐकतां पापे भस्म होत।। श्री सिद्धारूढ चरणी शिवदास अर्पीत।। षटपंचाशत्तमाध्याय गोड हा।।९०।। ओवी संख्या।।४४२१।। अ. ५६।। शेवटी कथामृताची आरती व गुरू सिद्धारूढ यांची आरती. संप्रदायाची प्रचंड रचना.

वरील ग्रंथ व हा ग्रंथ दोन्ही शिवराम तथा शिवदास लक्ष्मण चंद्रगिरी यांचाच आहे. उर्वरित काळात कवी साकोरीस.

(श्री सिद्धाश्रम क्र. १५८, ४ था रस्ता ७ वा क्रॉस, चामराज पेठ, बेंगलोर ५६००१८)

१०१९ बाड आबाजी

समुद्रवाणीच्या नाथ-वारकरी परंपरेच्या शिष्य मंडळीतील रचना. यात हडबे महाराज आणि शेषनाथ माहाराजांवरील स्फुट रचना आहे. यात २० भक्तिपर पदे आहेत.

त्याची वानगी :

धन्य धन्य गुरु धन्य धन्य जय
शेषनाथ राया।।धृ.।।
नव पदरज वंदन करण्यास्तव।।
मायामय भ्रांती हरण्यास्तव।।
चिरसुख संतोषां वरण्यास्तव।।
वंदितसे पाया।।१।।

आबाजी आनंदभुवन ग्राम ला सोना अशी कवीची माहिति लाभते. लेखनकाल नाही.

(श्री. कदम समुद्रवाणी, बिदर)

वे. रमाकांत दादा दीक्षित संग्रह

१०२० क्र. १ पदबोधिनी

आ. १५ × ३२ सें. प्र.पा.ओ. १०. अक्षर मोठे. पृ. १२ × २. कागद जाड– जीर्ण. त्रु.

प्रारंभी : श्रीगणेशाय नमः।। श्री रामचंद्राये नमः।। श्री गुरू नमामि नारायणं मद्रव्यंपरं।। नमामि नारायण मव्य मं गुरू।। नमामि नारायणीश्वरेश्वर।।१।।

जयजय सकळ आद्या।। जय जय निगमवेद्या।। जय जय विश्ववंद्या।। विद्याविद्य परत्परा।।१।। रात्री अथवा दिन।। सूर्यवा होही विलक्षण।। तेवि विद्या विद्या विहीन।। निजरुप तू देवा।।२।।

उपलब्ध प्रतीत शेवटचा भाग : हे मी सांगितली धर्मात्मा जो का + + थोक तोच माझा परमभक्त।। हे अच्युत बोलतु।।१३८।।

श्लोक ग्रंथाचे विवरण अन्यत्र आले आहे.

प्रतीचा काल व प्रतलेखक अज्ञात. मूळ रचना कुणाची हे कळत नाही.

१०२१ क्र.२ **दासबोध** रामदास

आ. २४ × १४ सें. प्र.पा.ओ. ११. त्रु. १३ दशक आरंभीचे उपलब्ध. कागद जाड. अक्षर मोठे. गडद काळी शाई. जीर्ण पोथी. समास व 'दशक' असा उल्लेख. शेवटचा भाग नसल्याने काल व प्रतलेखक अज्ञात. पाने विस्कळित आहेत.

१०२२ क्र. ३ **पंचांग**

आ. १७ × १४ सें. पृ. २० × २. कागद जाड. कडा झिजलेल्या. शाई गडद काळी. सर्व रकाने आणि संस्कृत मूळ श्लोक गडद केशरी रंगात.

शके १७७६ चे पंचांग संवत १९११ असा उल्लेख. अक्षर खूप सुंदर व नेटके. या दीक्षित घराण्याच्या पूर्वजांनी तयार केलेले पंचांग परंपरेतीलच आहे.

१०२३ क्र. ४ **पंचांग**

आ. ४२ × १७. सें. पृ. १३ × २. अक्षर खूप मोठे. कागद पातळ, पण चिवट. घराण्यातील परंपरेनुसार तयार केलेले पंचांग.

काल शके १८५३ प्रजापती नाम संवत्सर. रमाकांत दीक्षित यांचे हस्ताक्षर. आजच्या सांप्रत पिढी पूर्वीच्या तिसऱ्या पिढीच्या वंशजांनी तयार केलेले.

१०२४ क्र. ५ **जातिविवेक निर्णय**

आ. १७ × २२ सें. पृ. ३२८ × २.अक्षर साधारण. सूत संहिता जातिविवेक या विषयावर विवेचनात्मक लेखन. मूळ संस्कृतचा भाग खूप विस्ताराने.

काल : वृषभनाम संवत्सर शके १७४३ श्रावण कृष्ण २ सौम्य वासर. विदुर नगस्थ मुडगेरी नारायण भट्टात्मज ॐकार भट्ट सुतेन वृत्तादि पुस्तकं लिखितं. हे घराणे मूळ चिक्कमगळूर जिल्ह्यातील मुडगेरीचे. तेच उपनाव आजही. शास्त्रीय विषयावरील महत्त्वाचा ग्रंथ. बिदरचे नाव प्राचीन विदुरनगरीचा उल्लेख.

१०२५ क्र. ६ **रेणुकामाहात्म्य**

आ. १७ × २१ सें. पृ. १२६ × २. अक्षर मध्यम. लेखन सुटसुटीत. मूळ संस्कृत संहितेसह विवेचन. यातील विषय जरा भिन्न वाटतो. उपलब्ध रेणुका साहित्यातील विवेचनाहून भिन्न माहिती.

प्रतलेखक अज्ञात. लेखनकाल शके १७३२ प्रजापती नाम संवत्सर. दीक्षित घराण्यातील कुणाची ही प्रत असावी.

१०२६ क्र. ७ **रुद्रसंहिता**

आ. १७ × १२ सें. पृ. १२ × २. अक्षर बारीक, पण सुटसुटीत.

संथा घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वहस्ते विवेचनात्मक संहिता तयार करून दिलेली आहे. घराण्यात ही परंपराच होती. ती जोपासली याचा प्रत्यय येथे येतो.

शेवटी इदं पुस्तकं मलकुटी नागनाथ शर्मा लिखितं. रमाकांत अप्पू शा याचे असे. शके १८७५ ची प्रत. आषाढ शु।। १५ गुरुवारी हे लेखन नागनाथ शर्मा यांनी करून दिलेल्या विवेचनासह आहे.

श्री. लक्ष्मीकांतराव आणि आबाराव कुलकर्णी संग्रह

१०२७ क्र. ३ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. ३१ × १४ सें. प्र.पा.ओ. ११. लेखन व्यवस्थित. सं. पाने विस्कळित प्रत्येक ओवीस जोड रेषा लाल, त्यामध्ये ओवी क्रमांक. सुटसुटीत लेखन. पृ. ३५९ × २.

शेवटी : १६७९ प्रवर्तमाने प्लवंगनाम संवत्सर उत्तरायण वसंत श्रृतौ वैशाख मासे कृष्ण पक्षे तृतीया स्थिर वारे ज्येष्ठा नक्षत्रे अस्मिन शुभ दिने इदं पुस्तक समाप्तोग्रय।। इदं पुस्तक मांडवगण कातराबाद धर्माधिकारी तस्य नाम नारायण भट्टस्य सुतु सिवराम भट्टात्मज व्यंकटेश लांडगे स्वहस्ते न लिखितं।। अबत्धोवा सुबत्धावा वामदोषोन विद्यते।।१।।

हे पुस्तक नरसो योगिराज तस्य सुत व्यंकाजी नरसिंह कुलकर्णी, कसबे कडेकंची क्षेत्रस्य वास्तव्य दत्तात्रेयार्पणमस्तु।।

(पैठण येथे नाथांचे घरी अशीच नोंद आढळते.)

१०२८ क्र. ४ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. २३ × १२ सें. प्र.पा.ओ. ९. पृ. ८ × २. त्रु. अक्षर पुसट शाईत. कागद जीर्ण.

अध्याय क्रमांक ४९, ५० चा भाग. वरील भागी २२ क्रमांक. यात गुरुगीतेचा भाग.

त्याचा शेवट :

इति श्रीस्कंद पुराणे उत्तरखंडे इश्वर पार्वती संवादे गुरुगीता समाप्त॥

पुढील मजकुरात : श्रीराम जयराम जय॥ या कारण इश्वर पार्वतीसी बोध केला आहे॥ परंपरा मार्ग चालीला पाहे॥ गुरुसेवा दुर्लभ॥१॥ विधाता आदि करुनी॥ समस्त वंदिती याची गुणी॥ तो जाहला अंतर मनोन्मनी तेचि श्रेष्ठ सकल का॥२॥

गुरुसेवा अनंत सुख॥ दूर...

पुढील पाने गहाळ.

प्रतलेखक व काल अज्ञात.

१०२९ क्र. ५ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. २९ × १५ सें.प्र.पा.ओ. १३. पृ. १६ × २. त्रु.अ. १४.

या प्रतीत श्रीगुरू परळीस वैजनाथ दर्शनास आले तो भाग आलेला आहे.

प्रतीचा काल व प्रतलेखक अज्ञात.

१०३० क्र. ६ **द्वादशस्तोत्र** मदानंदतीर्थ

आ. १५ × १० सें. प्र.पा.ओ. ८. अक्षर मध्यम. कागद जाड जीर्ण. त्रु. पृ. २० × २. शेवटी इति श्रीमदानंदतिर्थ भगवत्पादाच्यार्य विरचिते द्वादश स्तोत्र दशोध्याय॥१०॥ द्वादशस्तोत्र समाप्त॥

शके १७२१ रौद्रनाम संवत्सरे आशाड शुध्य द्वादसी श्रूक्रवार तदिने समाप्त॥

इदं पुस्तक आपाजी भास्कर कुलकर्णी मौजे कडगंची सरकार कलबरगा हाली वसती मौजे उजळंब प्रतापूर सन १२१० अवल साल माहे सफर १२ चे रिते समाप्तमस्तु॥

इदं पुस्तक लिखितं बाळाजि भगवंत कुलकर्णी. त्यात वेलबुट्टीचा भाग एक ओळीत.

शेवटी : मौजे उजळंब परगणे प्रतापूर

सरस्वती गंगाधराच्यया वंशात पुढील वंशजांनी केलेली व जोपासलेली प्रत. हैद्राबाद निजाम राजवटीमुळे मुसलमानी कालगणनेची पद्धत.

१०३१ क्र. ७ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. २२ × ११ सें. प्र.पा.ओ. ७. अक्षर मध्यम. कागद जीर्ण. प्रथमची पाने कडा गळून खराब. अ. ५१. सं.

शेवटी : शके १७९८ प्रवर्तमाने धातनाम संवत्सरे वैशाख मासे शुक्ल पक्षे त्रयोदश्या स्थिर वासरे चित्रा नक्षत्रे तुला गते चंद्रेशेपे शुस्थानितदिने समाप्त॥ प्रतलेखक नाव नाही.

१०३२ क्र. ८ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. ३१ × १४ सें.प्र.पा.ओ. १२. केवळ अ. १ त्रुटित. ४० व्या ओवीपासूनचा भाग. पाने विस्कळित. अक्षर मध्यम कागद जाड.

१०३३ क्र. ९ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. २२ × १२ सें. प्र.पा.ओ. ९. अक्षर बारीक- नेटके. कागद जाड- चिवट. सं. पृ. ३०७ × २ अ. ५१. पाने विस्कळित. ओवी क्रमांकास लाल रंग.

शेवटी : इतिश्री गुरुचरित्र कथा कामधेनु संपूर्णमस्तु शके १६६८ प्रवर्तमाने प्रभवनाम संवत्सरे उत्तरायणे शशिऋतौ माघ मासे शुक्ल पक्षे प्रतिपद्याया सौम्य वासरे धनिष्ठा नक्षत्रे अस्मि शुभ दिने इदं पुस्तकं समोत्पोयम् ॥

इदं पुस्तक चिंचणशिरूर ज्योतिष्य अणभटस्य सूरी सुत शेष भटात्मज नारायण भट स्वहस्ते लिखितं. शेवटची ओवी लाल शाईत. भिजल्याने लाल शाई सर्वत्र पसरलेली प्रत.

शेवटी वेलबुटीने सजविलेले पान.

१०३४ क्र. १० **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. ३१ × १४ सें. प्र.पा.ओ. ११. यात केवळ पृ. २३० ते २७० पाने. अ. ३४ वा. फक्त कागद जाड. काळी शाई.

१०३५ क्र. ११ **भक्तिमाला**

आ. १६ × १० सें. प्र.पा.ओ. ८. अक्षर बारीक. कागद जाड. त्रु. पृ. ८ × २.

यात ओ. ४० ते ५२ चा भाग आहे. उपलब्ध भागात-

आरंभ : या दीन ॥सूरदास भक्त मदन मोहोन॥ आणि

जसवंतास उदकात बुडवित जाण।। श्री रघुनंदने उचलिले।।४०।।

शेवटी : नींबरायाचे खांद्यावरि।। किर्तनातू।।...

रचनाकार, प्रतकार व काल अज्ञात.

ग्रंथनाम भक्ती एवढा भाग डावीकडे उजवीकडे कोरा भाग.

१०३६ क्र. १२ विष्णुसहस्रनाम

आ. ८ × १३ सें. पृ. ४४ × २. प्र.पा.ओ. ५. अक्षर रेखीव. कागद जाड. गडद काळी शाई. सरस्वती गंगाधर वंशजानेच केलेली प्रत विवरणासह. लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

१०३७ क्र. १३ मल्हारी कवच

आ. १३ × १० सें. प्र.पा.ओ. ७. पृ. ८ × २. अक्षर मोठे. कागद जाड. त्रु. अ. १४ केवळ.

शेवटी : ब्रह्मांड पुराणे क्षेत्रखंडे मल्हारी महात्म्ये कवचोनाम चंतुर्दशोध्याय संपूर्णमस्तु।। सांबार्पणमस्तु।।छ।।

बिदरजवळील मैलार क्षेत्रासंबंधीची पोथी.

श्री क्षेत्र गाणगापूर येथील काही ग्रंथ
(ग्रंथ विवरणाखाली प्राप्तिस्थल निर्देश)

१०३८ गुरुचरित्र सरस्वती गंगाधर

आ. २१ × ११ सें. प्र.पा.ओ. ९. पृ. ५४३ × २. अक्षर सुटसुटीत रेखीव. कागद जाड. गडद काळी शाई. ग्रंथाच्या आकाराची पत्र्याची डबी. त्यात व्यवस्थित ठेवलेली प्रत. प्रत्येक अध्यायास रंगीत चित्रे. अ. ५१

शेवटी : स्वस्ति श्री नृप शालीवाहन शके १७९९ ईश्वर नामसवत्सर उत्तरायणे ग्रीष्म ऋतौ जेष्ठ मासे शुक्ल पक्षे त्रितिया गुरुवासरे शुभ नक्षत्रे शुभयोगे शुभअभिजितु लग्ने समाप्त।।छ।।

श्रीमहागुरू नृसिंहसरस्वती चरणी अर्पणमस्तु शुभं भवंतु लिखित श्री क्षेत्र अमर्जा संगम येथे नृसिंहसरस्वती चरणसंनिध समाप्त।। श्री गुरुनाथार्पण मस्तु।।०।। कायेन वाचे.... श्लोक।। श्री दत्तात्रेयार्पणमस्तु। श्रीपाद श्रीवल्लभर्पणमस्तु श्री नृसिंहसरस्वतीर्पणमस्तु।।

त्यानंतर आरती पद रचना : मूर्ती अमूर्ति विरहित चिन्मय स्फूर्ती विस्फूर्तिचि स्फुरण मालविती कीर्ती अकिर्ती सत्कीर्ती त्रय मुक्ती।।१।।

भक्ति विरक्ति मुक्ति चरणी वोळगती।।१।। जयदेव जयदेव जय नृसिंहसरस्वती नरहरी सरस्वती।। आरति वोवाळु करुणाकर मूर्ति।।धृ.।। अगाध महिमा तुझे न वर्णवे वेदा। ब्रह्मादिक सनकादिके सेविती श्रीपादा।। गर्व शेष जिव्हे चिरुति स्तुतिवादा।। अनाथ बंधु तारक दिना वाळू जनवृंदा।।२।। अनंता अद्भूता त्यानंतर एक कानडी रचना. पुढे एक अष्टक।। यात "नारायण नरहरी नर वैषधारी अनाथनाथ करुणाकर" ही रचना. शेवटी श्रीधरे रचुनिया नवरत्नमाला ही रचना.

५१ अ. ३७ व्या ओवीत सोमनाथ शिष्यास शाळीग्राम, स्मरणीमाला इ. ठेवल्या त्याची पूजा करावी, असा उपदेश. हा विशेष भाग. विवरण मागे आले आहे.

(नृसिंह चिंतामण कुलकर्णी, सिद्धनाळ, संगमरस्ता गाणगापूर)

१०३९ गुरुचरित्र सरस्वती गंगाधर

आ. ३४।। × २०।। सें. पृ. २९७ × २ + ४ × २. आडवी पोथी. वरील भागास शिवण. बांधीव मोठे रजिस्टर. अ. छापील प्रतीवरून सेवा म्हणून केलेली व अर्पण केलेली प्रत. ओ. ७३०० अधिक श्रावण शु. पक्ष ५ स ही प्रत दत्त चरणी अर्पण केली. शेवटी प्रतकाराने १०२ ओव्या जोडल्या. त्यासोबत एक स्वरचित आरती. सहज स्फुरले ते लिहिले असा उल्लेख. एका वि. ह. रुईकर भक्ताने सेवा म्हणून केलेली प्रत.

(वे. दत्तात्रेय शंकर भट, पुजारी, गाणगापूर)

१०४० गुरुचरित्र सरस्वती गंगाधर

आ. २२।। × ११ सें. प्र.पा.ओ. ९. अक्षर मोठे. प्रथमचा अध्याय गहाळ. दुसऱ्या अध्यायाचे पहिले पान जीर्ण-फाटलेले. अ. ५१.

शेवटी : इतिश्री गुरुचरित्र कामधेनु रसाळकथा योगसिद्ध नामधारक संवादे गुरुचरित्र मठात सदा प्रेमा असोनी श्रीपर्वत गमन पाताळगंगातीरी निजानंद गमननाम एकपंचाशत मध्याय।।५१।। शके १८१० विरोधी नामसंवत्सरे वसंत ऋतौ चैत्रमासे शुक्ल पक्षे प्रतिपदा गुरुवासरे अश्विन दिवस नक्षत्रे गाणगापूर श्री दत्तात्रेय मठे संनिधे लेखन. श्रीदतार्पणमस्तु।। श्रीपाद श्रीवल्लभ नृसिंहसरस्वती चरणारविंद. हरये नमः।।

हे श्रीगुरुचरित्र पुस्तक गुरुभट रामभट्ट पुजारी श्रीक्षेत्र गाणगापूर याचे असे

(शिवराम गुरुभट पुजारी, संगमरोड, गाणगापूर)

१०४१ चोपडी

आ. ३३ × १८ सें. पृ. २६० × २. कागद जाड. वरील भागास लाल कापडाचे वेष्टन शिवलेले. बांधून ठेवण्याची सोय.

यात विविध साधुसंत आणि सर्वसाधारण यात्रेकरू यांचे टिपण हस्ताक्षरासह. मोडी व मराठी लेखन. यातच गुजराथेतील नारेश्वर मठाचे रंग अवधूत यांच्या हस्ताक्षरातील नोंद ते या स्थानी दत्तदर्शनास आले त्या वेळी केलेली. काल १९५०.

(शिवराम गुरुभट पुजारी, गाणगापूर)

१०४२ चोपडी

आ. ३१ × २३ सें. पृ. २६८ × २. अक्षर मोडी मराठी. वरील बाडाप्रमाणेच यात नोंदी.

दासोयोगीराज थोरले देवघर मोमीनाबाद, बीड (अंबेजोगाई) पृ. १७८ वर अश्वन शु. १२ शके १८१४

(शिवरामभट पुजारी)

१०४३ चोपडी

आ. ३१ × २३ सें. पृ. ३०० × २. वरीलप्रमाणेच लेखन व नोंद. यात

(१) गोसावी जहागीरदार विश्वंभर बप्पा थोरले देवघर शके १८०४

(२) चंचलभारती गुरू दत्तलिंगभारती
अमृतभारती गुरू विश्वभारती
माहुरगड, किन्हवट, आदिलाबाद जिल्हा
शके १८४३

(३) दतयोगीराज थो. देवघर

(४) केसकर विश्वनाथ महाराज सास्वड १८५५.

याच बाडात एक सूची आहे. त्यात एकूण अशा २५ बाडा (चोपडीतील) मधील व्यक्ती व काल यांची नोंद परिश्रमपूर्वक केलेली. व्यवस्थित रचना. परंपरेने जोपासलेले सर्व बाड सुव्यवस्थित आहे. क्षेत्र परंपरेस अनुसरून.

(शिवराम गुरुभट पुजारी, गाणगापूर)

१०४४ गुरुगीता

आ. १७ × १० सें. प्र.पा.ओ. ७. पृ. २५ × २ वरील पान व शेवटचे पान वेलबुट्टीने सजविलेले.

शेवटी : इति स्कंदपुराणे उत्तरखंडे ईश्वर पार्वती संवादे श्री गुरुगीता संपूर्णमस्तु शके १८५४ श्रावण कृष्ण ९ गुरुवार श्रीक्षेत्र गंधर्वपूर (गाणगापूर) येथे लेखन समाप्त।। ही गुरुगीता कडगंचीचे गुरुचरित्राचे प्रतीतील आहे. उत्तम आहे. श्रीपतराव जोशी येळावीकर यांचे असे. वरील भागास, भीमभट्ट रामभट्ट पुजारी यांचे असे लिहिलेले.

लेखक अप्पाजी बळवंत देशपांडे महेश्वर संस्थान अध्याय।। देवी होळकर।। कृष्णर्पणमस्तु। ॐ तत्सत. ब्रह्मार्पणमस्तु।।छ।।

(वे. कमलाकर भीमभट्ट पुजारी, गाणगापूर)

१०४५ गुरुचरित्र सरस्वती गंगाधर

आ. २० × ११ सें. प्र.पा.ओ. ९. गडद काळी शाई. कलाकुसरीने काही पाने सजवलेली. अ. ५१. प्रथमचे ३ श्लोक लाल रंगात. अक्षर चांगले.

५१ व्या अध्यायात. ३७ वी. ओवी :

ऐसे सांगोनि शिष्य वर्गासी।।
पादुका शाळिग्राम स्मरणी माळेसी।।
मठी ठेवितो शाश्वतेसी।।
पूजा करावी निरंतर।।३७।।

येथे सोमनाथ नाव नाही. सिद्नाळचे प्रतीत नाव आहे. शके १८०१ अश्विन व।।१२ रामभट्ट गुरुभट्ट पुजारी यांचे लेखन. वेष्टनाच्या कागदावर सायंदेव घरातील गुरुचरित्र भीमभट्ट रामभट्ट यांचे असे लिहिलेले आहे.

(वे. कमलाकर भीमभट्ट पुजारी)

१०४६ गुरुचरित्र सरस्वती गंगाधर

आ. २१ × १२ सें. पानास वेलबुट्टीची सजावट. अ. ५१. अक्षर नेटके. कागद जीर्ण.

शेवटी : स्वस्ति श्री नृपशालीवाहान शके १७७६ आनंदनाम संवत्सर चैत्र शु।। प्रतिपदा सौम्य वासरे पूर्वप्रहरे रेवती नक्षत्र ब्रह्मनाम योग बवकर्णतद्दिन भीमातीर क्षेत्र गाणगापूर मठात श्री नृसिंह सरस्वती, दत्त संनिध गुरुचरित्र लेखन समाप्त।।छ।।

रामभट्ट गुरुभट्ट पुजारी, गाणगापूर, ता. शहाबाद.
पायगा.

(वे. कमलाकरभट्ट भीमभट्ट पुजारी, गाणगापूर)

१०४७ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. २० × १५ सें. प्र.पा.ओ. १२. शेवटच्या पानावर वरील भागास शके १६१५.

अ. २. ओवी २ मध्ये नामधारकाचे नाव 'विष्णुनामांकित'

५१ वा अध्याय शेवटचा भाग नाही. तो भाग अन्य प्रतीतून लिहून पोथी पूर्ण केलेली आहे. हा भाग भीमभट्ट रामभट्ट यांनी पूर्ण केला.

(वे. कमलारभट्ट पुजारी)

१०४८ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

ही गुरुचरित्राची प्रत. ५१ अ. पूर्ण. कागद जाड. सुस्थितीत. संशोधनात सूचीच्या वेळेस काही अपरिहार्य कारणामुळे.

ग्रंथ पाहावयास मिळाला नाही.

(श्रीकांतभट्ट पुजारी, गाणगापूर)

१०४९ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

संपूर्ण पोथी सुस्थितीत. ५१ अ. कागद जाड. अक्षर मोठे. संशोधनात लाभलेली पोथी सूचीची नोंद करताना

(ग्रं.पा.मि.ना.)

(वे. देवणभट पुजारी, गाणगापूर)

१०५० **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

मंदिरातील पूजेच्या महावस्त्रात गुंडाळलेली प्रत. अ. ५१. संपूर्ण पोथी.

संशोधनात सूचीच्या नोंदीच्या वेळेस ग्रंथ हाती येऊ शकला नाही.

(देवस्थान, गाणगापूर)

१०५१ **बाड** तुळजापूरकर

आ. १५ × १७ सें. एक बांधीव वही. पृ. ४७ × २. अक्षर बारीक. यात विविध पदे, आरत्या, अष्टक इ. दत्त दैवत, गाणगापूर, कुरवपूर, स्थान माहात्म्य, दत्त, टेंबे स्वामी, अक्कलकोट स्वामी समर्थ, चंद्रलांबा, ब्रह्मचैतन्य, गोंदवलेकर महाराज, समर्थ रामदास, दासोपंत, माणिक प्रभू यांच्यावरील वेधक व वेचक रचना. काही वानगी. गाणगापूर येथे सरावातील पदे :

(१) श्री शैल्याहुनि फुले परतली।। प्रसादरूपे इथे पातळी। सकलांच्या हृदयात लोटला।। भक्तिरसाचा पूर।।१।। बहरले क्षेत्र गाणगापूर।।धृ.।।

(२) परमकृपाळु गुरु श्रीपाद श्रीवल्लभस्वामी।।धृ.।।

(३) ''दुःखहारक गुरुनाम, मानवा'' ही गाणगापूर दर्शन कविता.

गेल्या पिढीतील कवी वसंतराव तुळजापूरकर यांची ५० वर्षांतील रचना. सातत्याने ५० वर्षे दत्तसेवेत असणारे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे आंध्र राज्य कवी. रचनेत नाममुद्रेचा हव्यास नाही.

(देवस्थान, गाणगापूर)

१०५२ **महागणपती स्तोत्र** राघवचैतन्य

आ. १७ × १२ सें. पृ. ७ × २. अक्षर मोठे. कागद जीर्ण. श्लोक १६.

महागणपतीस्तोत्रम ही राघवचैतन्य यांची रचना.

आरंभ : श्री गणेशाय नमः।। योग योगविंदा विधूत विविध...

शेवटी : एतेन प्रकट रहस्य मंत्रमाला गर्भेण स्फुटतर संविदा स्तवेन। यः स्तौती प्रचुरतरं महागणेशं तस्येयं भवति वंशवदा त्रिलोकी।।१६ इति परमहंस परिव्राजकाचार्य श्री राघव चैतन्य विरचितं महागणपतीस्तोत्र समाप्तम् ।।७।। तुकाराम भट्टदर्गा जोशी राघवचैतन्य पुजारी आळंद. काल दिला नाही.

(गुरुनाथ सदाशिव दर्गा जोशी, ब्राह्मणगल्ली, आळंद)

वे. राजमणी दीक्षित मुडगेरी संग्रह, बिदर

१०५३ क्र. २ **लक्ष्मीनारायण होमप्रयोग** नागनाथ

आ. १७ × २१ सें. पृ. ११ × २. अक्षर बारीक. मूळ लक्ष्मीनारायण संस्कृत रचना विवेचनासह होम व उपचारांबद्दल माहिती.

रचनाकार नागनाथ मलकुट. रचनाकाल शके १८८१.

१०५४ क्र. ४ **शिवमुष्टी पूजाव्रत** रामचंद्र

आ. १७ × २२ सें. पृ. ५ × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर बारीक. कागद जाड. गडद काळी शाई.

शिवमुष्टी व्रताची मूळ संस्कृत संहितेसह माहिती. रचनाकार रामचंद्र दीक्षित मुडगेरी. रचनाकाल शके १७६१.

१०५५ क्र. ५ **संकट चतुर्दशी व्रतकथा** ओंकारभट्ट

आ. १५ × १८ सें. पृ. ५ × २. प्र.पा.ओ. ९. कागद जाड. अक्षर साधारण. गडद काळी शाई. जीर्ण. संकट चतुर्थी तास अनुसरून विवेचनात आलेली कथा.

रचनाकार ओंकारभट्ट मुडगेरी दीक्षित. रचनाकाल वा प्रतीचा कालनिर्देश नाही.

१०५६ क्र. ८ **अनंतव्रत** रामचंद्र

आ. १५ × २३ सें. पृ. १५ × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर बारीक. कागद जाड, पण जीर्ण. गडद काळी शाई. संस्कृत संहितेसह विवेचन.

प्रतकार रामचंद्र दीक्षित. प्रतीचा काल शके. १८१०.

१०५७ क्र. ७ **सिद्धिविनायक व्रत** रामचंद्र

आ. १७ × २२ सें. पृ. १८ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर मोठे. कागद जाड. काळी शाई.

मूळ संस्कृत संहितेसह विवेचन.

प्रतकार रामचंद्र दीक्षित. प्रतीचा काल शके १८१५.

१०५८ क्र. ६ **हरितालिका व्रत** रामभट्ट

आ. १० × १५ सें. पृ. ११ × २ प्र.पा.ओ. ९. अक्षर बारीक. कागद जाड. गडद काळी शाई. जीर्ण मूळ संस्कृत संहितेसह विवेचन.

प्रतकार रामभट्ट वाजपेयी. रचनाकाल शके १६८०.

१०५९ क्र. ९ **गुरुचरित्र** सरस्वती गंगाधर

आ. ३२ × २३ सें. पृ. ४०० × २. प्र.पा.ओ. ११. ५१ अ. सं. अक्षर साधारण. कागद जाड. जीर्ण. प्रतीचा लेखक बाळकृष्ण असून, ही प्रत शके १७८१ सालची आहे. पोथी सुस्थितीत.

१०६० क्र. १४ **वैराग्यशतक** भर्तृही

आ. २२ × १५ सें. पृ. २० × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर बारीक. कागद जाड. अक्षर पुसट. भर्तृहीकृत वैराग्य शतकाचा भाग.

प्रतकार व लेखनकाल निर्देश नाही.

१०६१ क्र. ११ **ज्योतिष्य रत्नमाला**

आ. २२ × १७ सें. पृ. ४६ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर साधारण. कागद पातळ तपकिरी. ज्योतिष शास्त्राचे विवेचन मूळ संस्कृत संहितेसह. प्रतलेखक व प्रतीचा कालोल्लेख नाही.

१०६२ क्र. १५ **योगवाशिष्ठ**

आ. ३२ × २१ सें. पृ. २६९ × २. प्र.पा.ओ. ९. अक्षर बारीक. काळी शाई. कागद जाड. जीर्ण. मूळ संस्कृत संहितेसह विवेचन.

प्रतीचा लेखक आणि प्रतीचा काल दिलेला नाही. एका ठिकाणी नाव मुक्त असा उल्लेख. जीवनमुक्त असा अभिप्रेत शब्द असावा.

१०६३ क्र. १६ **सूर्यसिद्धांत उदाहरण** नागेश

आ. १७ × २१ सें. पृ. २०० × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर बारीक. कागद जाड. काळी शाई.

मूळ संस्कृत संहितेसह विवरण. ज्योतिष शास्त्राचा भाग.

प्रतकार नागेश असून, कालोल्लेख दिलेला नाही.

१०६४ क्र. २५ **सूत्रदीपिका** श्रीभट्ट

आ. १५ × २१ सें. पृ. ३३ × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर बारीक. कागद जाड, पण जीर्ण. काळी शाई. श्रीभट्ट रुद्र प्रणीत सूत्र दीपिका संहितेसह. प्रतीचा लेखक व प्रतीचा काल दिलेला नाही.

१०६५ क्र. २६ **वाक्यसुधा**

आ. २२ × १७ सें. पृ. १० × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक. कागद जाड. काळी शाई.

आचार्यांच्या वाक्यसुधा संहितेसह विवेचन. त्रु. प्रतीचा लेखक गोविंद.

१०६६ क्र. २७ **शिवगीता**

आ. ३० × १८ सें. पृ. १९७ × २. प्र.पा.ओ. ९. अक्षर मोठे. कागद जाड. काळी शाई.

मूळ संस्कृत रचनेच्या संहितेसह विवेचन.

प्रतलेखक व काल अज्ञात.

१०६७ क्र. २८ **योगवाशिष्ठसार**

आ. १७ × १३ सें. पृ. ३६ × २. प्र.पा.ओ. ९. अक्षर बारीक. कागद साधारण. गडद काळी शाई. मूळ

योगवाशिष्ठावरील भाष्य. निवडक श्लोकांची संहिता.

प्रतलेखक वा मूळ भाष्यकार अज्ञात. काल दिला नाही.

१०६८ क्र. २९ **अथोपनिषद**

आ. २० × १३ सें. पृ. ९५ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक. जीर्ण प्रत. विविध उपनिषदांतील संहितेसह विवेचन.

प्रतकार रामचंद्र दीक्षित. प्रतीचा काल नाही.

१०६९ क्र. ३० **निर्णयसिंधु** कमलाकरभट्ट

आ. ३२ × २४ सें. पृ. ११० × २. प्र.पा.ओ. १२. अक्षर बारीक. कागद जाड.

मूळ संस्कृत संहिता व शेवटी थोडे विवेचन. त्रिणी परिच्छेद भाग. प्रतीचा लेखक अज्ञात व प्रतीचा काल दिलेला नाही.

१०७० क्र. ३१ **निर्णयसिंधू**

आ. ३२ × २४ सें. पृ. २५० × २. प्र.पा.ओ.१०. यात संस्कृत संहितेसह विवेचन. तृतीय परिच्छेद भाग. अज्ञात प्रतलेखक व काल शके १८१५ दिलेला आहे.

१०७१ क्र. ३६ **मंत्रपन्न** नागेशभट्ट

आ. २२ × १७ सें. पृ. ३२ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर साधारण. कागद जाड, काळी शाई.

विविध मंत्रांची संहिता. काही विवेचन.

प्रतकार नागेशभट्ट असून, प्रतीचा काल शके १७५३.

१०७२ क्र. ३७ **बोपणभट्टी**

आ. १७ × १२ सें. पृ. ८० × २. प्र.पा.ओ. ७. अक्षर बारीक. कागद जाड, पण जीर्ण.

मूळ संस्कृत संहितेसह केलेले विवेचन.

प्रतीचा लेखक ओंकारभट्ट. शके १६९० ची प्रत.

१०७३ क्र. ३९ **वृतशटीका**

आ. २२ × १७ सें. पृ. ४३ × २. प्र.पा.ओ. ११. अक्षर बारीक. कागद जाड. जीर्ण. काळी शाई. मूळ संस्कृत संहितेसह विवेचन.

ओंकारभट्ट यांचे लेखन. प्रतीचा काल शके १६८८.

१०७४ क्र. ४० **मानवधर्मशास्त्र**

आ. ३० × २२ सें. पृ. १३४ × २. प्र.पा.ओ. १२. अक्षर साधारण. कागद जाड, पण जीर्ण. अ. १२. भृगु प्रोक्त मूळ संस्कृत संहितेसह.

प्रतीचा लेखक बाळकृष्ण. काल दिलेला नाही.

१०७५ क्र. ४३ **भुवनेश्वर शांती**

आ. २२ × १५ सें. पृ. २८ × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर बारीक. कागद जाड. कागद जाड. गडद काळी शाई. मूळ संहितेसह विवेचन. श्री उपासनेतील महत्त्वाचा भाग.

प्रतीचा लेखक पांडुरंग दीक्षित. लेखनकाल १७८५.

१०७६ क्र. ४४ **रत्नमाला**

आ. २१ × १६ सें. पृ. १५ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर साधारण. कागद पातळ.

ज्योतिष शास्त्रातील माहिती संस्कृत संहितेसह. प्रतीचा काल १९४४. ओंकारभट्ट प्रतलेखक.

१०७७ क्र. ५० **मुहूर्तमार्तंड**

आ. ३२ × २५ सें. पृ. १३६ × २. प्र.पा.ओ. ९. अक्षर मोठे. कागद जाड. गडद काळी शाई.

मूळ संस्कृत ग्रंथावरील ही प्राकृत टीका.

प्रतीचा काल १७९४ असून, रामभट्ट यांची प्रत.

१०७८ ग्रं.क्र. **मार्तंडव्याख्या**

आ. ३० × १८ सें. पृ. १६० × २. प्र.पा.ओ. १२. अक्षर बारीक. कागद जीर्ण. काळी शाई.

मूळ संस्कृत संहितेसह केलेले विवेचन.

प्रतीचा काल शके १७६३. प्रतीचा लेखक नागेशभाऊ.

१०७९ **ग्रहलाघव**

आ. १७ × १५ सें. पृ. ८ × २. प्र.पा.ओ. ७. अक्षर मोठे. त्रु.

शके १७९४ ची प्रत. प्रथमचा भाग नाही. प्रतकार अज्ञात.

१०८० क्र. ४७ **त्रिशतश्लोक**

आ. १७ × १५ सें. पृ. ८६ × २. प्र.पा.ओ. ८. अक्षर

मोठे. कागद जाड. काळी गडद शाई.

मूळ संस्कृत श्लोक विवेचनासह.

प्रतीचा काल दिलेला नाही. लेखक ओंकारभट्ट.

१०८१ क्र. ३१ **गोत्रदर्पण**

आ. १७ × १५ सें. पृ. ५ × २. त्रु. प्रत. प्र.पा.ओ. १३. अक्षर बारीक.

मूळ संस्कृत संहितेसह विवेचन. प्रथमचा भाग नाही. प्रतकार अणंभट्ट असून, प्रतीचा काल १७६३ शके.

१०८२ क्र. ३० **गोत्र प्रवर निर्णय**

आ. १७ × २२ सें. पृ. ८ × २. त्रु. प्रत. कागद जाड. गडद काळी शाई.

मूळ संस्कृत श्लोकासह विवरण.

१०८३ क्र. ४२ **माघमाहात्म्य**

आ. २२ × १५ सें. पृ. ८५ × २. प्र.पा.ओ. १०. अक्षर साधारण. कागद जाड. काळी शाई.

मूळ संस्कृत संहितेसह विवेचन.

प्रतलेखक व प्रतीचा काल दिलेला नाही.

१०८४ क्र. १७ **शांतीमयूख**

आ. ३० × २१ सें. पृ. ११६ × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर बारीक. गडद शाई. कागद जाड.

मूळ संस्कृत संहितेसह विवेचन. प्रतकार ओंकारभट्ट.

१०८५ क्र. १४ **अंतिष्टी**

आ. १७ × १५ सें. पृ. ५५ × २. प्र.पा.ओ. ११. अक्षर बारीक. कागद जाड. यात अथ भारद्वाज अंत्येष्टीचा भाग मूळ संस्कृत संहितेसह दिलेला आहे. प्रतीचा लेखक लिंगणभट्ट प्रतीत कालोल्लेख नाही.

१०८६ क्र. २२ **चौलकर्म**

आ. १७ × २२ सें. पृ. ५० × २. प्र.पा.ओ. ९. अक्षर बारीक. कागद जाड.

चौलकर्म कुंडसिद्धीचे मूळ संस्कृत श्लोक व त्याचे विवेचन. प्रतीचा कालोल्लेख नाही.

प्रतकार नरसिंहभट्ट हालकली.

१०८७ क्र. २३ **कुंडमार्तंड**

आ. १७ × १२ सें. पृ. ८५ × २. प्र.पा.ओ. १३. अक्षर बारीक. जाड कागद. जीर्ण.

मूळ संस्कृत रचनेसह विवेचन. प्रतीचा काल व प्रतलेखक अज्ञात.

१०८८ क्र. १९ **संस्कारनिर्णय** **चंद्रचूडा**

आ. २२ × १५ सें. पृ. ६० × २. प्र.पा.ओ. १२. अक्षर खूप बारीक. कागद. जीर्ण.

मूळ संस्कृतश्लोकासह विवेचन. चंद्रचूडाकृत ग्रंथाचे विवरण. प्रतीचा लेखक नागेशभट्ट. काल नाही.

१०८९ क्र. ३ **श्रीकृष्णजन्म**

आ. २२ × १३ सें. पृ. १५ × २. त्रु. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक. कागद जाड. प्रथमचा भाग गहाळ. श्रीकृष्णजन्मव्रत कथा. कालनिर्देश नाही. प्रतलेखक अज्ञात.

१०९० **रामविजय** **श्रीधर**

आ. १४ × ३२ सें. प्र.पा.ओ. ८. अक्षर मोठे. कागद पांढरा– जाड– पिवळसर. गडद काळी शाई. आरंभीचे कागद निळसर जाड. अ. ४०. सं. सुस्थितीत पा. ४६४ × २. प्रारंभी वेष्टनावर रंगीत सजावटीचे कागद. चौकटी व फुलांची सजावट. लाल-हिरवा-पिवळा रंग. मध्यभागी श्री रामविजय प्रारंभ. श्री मारुती राज समर्थ एवढा मजकूर चौकटीत. या एका पानास कसर लागून भोके.

शेवटी : दत्ता पासून सदानंद कल्याणी मठाची परंपरा १९५ ते २०० ओव्यातून (४० वा. अ.) आलेली आहे. भीमातीरी. समाधी स्थापन।। ब्रह्मानंद इतीराज।। २००।। तो ब्रह्मानंद पूर्ण पीता।। सावित्रीनाम माझी माता। तो भावे वंदुनी उभयता।। रामविजय संपविला।।२०१।। शके १६२५ पंचेवीस सुभावुनाम संवत्सरास। भानु सप्तमी शुद्ध विशेष। श्रावणमास विख्यात पां।।२।। पंढरी क्षेत्री निश्चयेसी। ग्रंथ संपविला भावेसी।। लेखक आणि श्रोतियासी। कल्याण असो सर्वदा।।३।। सुभातु संवत्सर भानुवार। भानुवंशी उपजला रघुवीर। भानु आणि रोहिणीवर। तंवरी ग्रंथ असो हा।।४।। ब्रह्मानंदा पांडुरंगा।। श्रीधर वरदा अभंगा। पुराण पुरुषा भक्त भव भंगा। चरणीचंद्र वाहे तुझ्या।।५।। रामविजय ग्रंथ। परिसोत पंडीत चतुर। चौळीसावा आध्या गोड हा।।२०६।। आध्या ।।४०।। समाप्त शके १७८५

सत्रासे पंचाऐसी।। रुद्रोद्धारीनाम संवत्सर।। दक्षिणायने वर्षा रतौ। श्रावण मासे कृष्ण पक्षे। द्वादशी गुरुवारे समाप्त।। भग्न पृष्ठ कटीगीवास्ते। स्तब्धद्रीष्टीरधोमुखं। कष्टेन लिखितं ग्रंथ। यत्नेन परि पालयेत।।१।। इदं पुस्तक भवानराव भगवंत देशपांडे परगणे गोटे प्रांत वीजापूर यांचे पुस्तक असे सन १२७३ दस्तुर भगवानराव देशपांडे यांचे हातचे आसे। श्रीकृष्णार्पणमस्तु। श्रीरामसमर्थय नमः।।

वरील भगवानराव यांचे पणतू शंकरराव देशपांडे मु।। हैद्राबाद यांच्या घरातून पोथी उपलब्ध झाली. १२७३ फसली ची प्रत. (इ.स. १८६३)

(देशपांडे साहित्य संशोधन, आळंद)

१०९१ संमतपत्र

आ. ३० × २० सें. पृ. ४ × २. कागद घोटीव. गडद काळी शाई. मोडी लिपीतील लेखन. सं. स्थिती चांगली.

गुरुचरित्र लेखक सरस्वती गंगाधर यांचे घराणे कडगंची ता।। आळंद येथे आहे. या घराण्यास जागा दिली त्याबद्दल गावकामगार वतनदार लोकांनी लिहून दिलेला कागद असून, संमती पत्र म्हटले आहे.

आरंभ : संमतपत्र बोवानीराव व।। व्यंकट गिराजी कुलकर्णी मौजे कडगची यासी लमोकदमानी चेनमल शेटी प।। गौडपा पा।। गुंडपा डोली प।। चेनबसप्पा प।। बयाबबाजी शिवराम, भास्कर शिवराम, सुबाजी गोविंद, व्यंकाजी मल्हार कुलकर्णी समस्त देव, रियाय, नवकरान, माहे मेहेर सुमार १२०६ फसली कारणे लिहून दिल्हे संमत पत्र ऐसा जे :

शेवटी : आपले खुसी + + + संमत दिल्हे असे. यासी अनपेक्षा करणार नाही. पुढे कोणी या ज्याग्यासी कलल पाडलेसी त्यास हिंदु लोकांस गुरूची शपत व मुसलमान लोकास मकेची शपत व ब्राह्मण लोकांस काशीची शपत आहे. हा आमची आत्म संतोषाने सूर्यचंद्र असे जो परयंत अनुभव करोन घ्यावे हे आपले खुसी आत्म संतोषाने संमतपत्र लिहून दिल्हे सही. ता. १५ माहे रेज्जब सन १२१२ हिजरी. (इ.स. १७६२) वरील कागद लिहिला तो काल २०६ वर्षांपूर्वीचा ठरतो. यावर वतनदार गावकामगार देशमुख इ. सह्या करतो.

(श्री. लक्ष्मीकांतराव कुलकर्णी, कडगंची, ता. आळंद यांच्या घराण्यातील)

१०९२ श्रीचंदलापरमेश्वरी पुराण माहात्म

आ. ३१ × २२ सें. पृ. २५०० × २ मूळ स्कंद पुराणातील ५ खंडांचा मराठी अनुवाद यात देवीबद्दल मूळ पुराणातील केवळ पाच खंड, क्षेत्रखडं, भ्रमरखंड, उपासनाखंड, सेतुस्कंध, व तीर्थस्कंद असा भाग आहे. अनुवाद श्री मुसळगावकर यांनी केलेला आहे.

प्रारंभ : चंद्र ज्याचे शिरोभूषण आहे व जो पार्वतीच्या प्रेमास पात्र आहे, अशा गजशिशुसदृश्य मुख युक्त गणपतिरूप ज्योतिचा मी कार्य सिद्धीसाठी आश्रययघेत आहे।।१।। (क्षेत्रखंड)

शेवटी : जो या नदी वैभव कांडात सांगितलेल्या सर्व कथाचे सार आणि त्याचा गूढ अभिजात जाणतो त्यास पुनः ज्ञातव्य समजण्याचे शेष असे या सह्याद्रि खंडात राहात नाही. तो सर्वज्ञ सर्ववेत्ता आहे. श्रीनारायणावतार महर्षि व्यासाची निर्बाध अशी प्रतिज्ञा आहे जी त्रिकालबाधीत अकाट्य सत्य आहे।।७५।। (तीर्थ स्कंध)

(पू. सद्. राजयोगी आणाजी सरदेशपांडे, दौलत कोटी विजापूर संग्रह)

डॉ. चंद्रशेखर कपाळे संग्रह, गुलबर्गा

१०९३ क्र. १ शिवानंदबोध

आ. १५ × २१ सें. प्र.पा.ओ. ११. अ. १२. त्रु. अक्षर मोठे जाड. गडद काळी शाई. एकूण ओ. २७४७. कागद जाड. प्रथमची १४ ओव्यांची रचना व शेवटचा भाग नाही. मूळ संस्कृतावर मराठी भाष्य. लाल दंड, चरणास व दोन्ही बाजूंस लाल रेषा. काल उपलब्ध नाही.

१०९४ क्र. २ शिवानंदबोध

आ. २२ × १३ सें. अक्षर वेगवेगळे– साधारण प्रतीचे. प्र.पा.ओ. ११.

प्रारंभ : श्रीगणेशा...। स्वामी बसवलिंग गुरुये नमः।। श्री सांब सदाशिवाये नमः। ॐ नमो सद्‌गुरूनागनाथा। सद्‌वस्तु द्यावया तू चिदाता। म्हणोनि सद्‌भावे चरणीमाथा। ठेवुनि आता नमितसे।।१।।

शेवटी : सद्‌गुरू शिवलिंग चरणप्रसादे। मी यथामति

बोलिलो शब्दे। ते परिसोत श्रोते आनंदे। श्रवणी भवद्वंद नाशोक्ता।।२९९।। बसवलिंग विनवी संता।। गुरुनी सिद्धी पावविली गुरुगीता।। श्री नागेश श्रोता वक्ता। सुखरुप तत्त्वता। विश्व नांदो।।३००।। इति श्री शिवानंदबोध ईश्वर पार्वती संवाद। ऐकता निरसे भेदाभेद। ब्रह्मानंद गुरुपुत्रा।।३०१।। इति श्री स्कंद पुराणे उत्तरखंडे। उमामहेश्वर संवादे गुरुगीता स्तोत्र संपूर्णमस्तु।। ।।ओव्या संख्या।।३०१।। श्लोक संख्या।।१५।। एकूण ओव्या २७४७।। श्लोक एकूण १६९ एकूण संख्या एकंदर २९१६।।०।। लेखन काल निर्देश नाही.

१०९५ क्र. ३ **नीलकंठपुराण**

आ. २२ × १३ सें. प्र.पा.ओ. ८. शाई काळी गडद. कागद जाड. अ. १. त्रु. ओ. ५९. पृ. ८ × २. अक्षर साधारण.

प्रारंभ : गुरुभूतनाथाय नमः।। श्री नीलकंठाये नमः।। अथ नीलकंठ पुराण महात्म्य लीखीते सुभमस्तु।। जयजयाजी सदासीवा। आदी पुरुशा महादेवा। तुजीया चेरणाची शेवा। ईछीती सनकादिक।।१।।

शेवटी : हे आधीच असे सौ स्कुत। ते ऐकुन केले प्राकृत प्रीती पावो नीलकंठ मात्म।। क्षत्र वरनन नाम प्रथमोध्यायः।। श्री श्री श्री।। वरील ग्रंथाचा केवळ प्रथम अध्यायच उपलब्ध आहे हे कळते. अन्य माहिती अज्ञात.

१०९६ क्रं. ४ **शिवानंदबोध**

आ. १६ × १० सें. प्र.पा.ओ. ७. सं. कागद पातळ पण पुरातन. अक्षर सुंदर. स्थिती चांगली. लेखनकाल नाही. व्यवस्थित प्रत. यात शेवटी गुरुगीतेची आरती आहे. ती अपूर्व आहे.

तो भाग :

जय देव जय देव गुरुगीते।
तुझीया ज्ञानी जडमूढ होती योगी ते।।धृ.।।
गीतामृत हरिहर। सेविती अति आवडी।
धन्य पार्वती ते लागली हे गोडी।।
सर्व शास्त्रा जननी महावाक्य प्रौढी।।
बसवलिंगे जन्मुनी जोडिली हे जोडी।।३।।

१०९७ क्र. ५ **बाड** लक्ष्मण

आ. १४ × १६ सें. प्र.पा.ओ. ५. अक्षर मोठे– जाड. पा. २२ × २. प्रथमची ४ पाने गहाळ.

यात अष्टोत्तर शत शिवनामावली. बिल्वपत्र त्रिंबकाची आरती. पदनीजे लिंगाची आरती सांभाची... अशी लक्ष्मण कवीची रचना. ही पूजेतील पोथी दोन-चार रेशमी कापडात व्यवस्थित गुंडाळलेली. त्यातच तांब्याचे शिवयंत्र. कालोल्लेख नाही.

१०९८ क्र. ६ **शिवानंदबोध**

आ. २० × १६ सें. प्र.पा.ओ. ९. सं. अक्षर मोठे– जाड रेखीव. गडद काळी शाई. समासास लाल रेषा. चरणास लाल दंड कागद नीळसर. सुस्थितीतील प्रत.

शेवटी : हा ग्रंथ पंचाया स्वामी पट्टाधिकारी संस्थान पेठे वैराग्य याचे असे हे सत्य. सके १७८१ सीद्धार्थनाम संवत्सरे दक्षिणायने मार्गे स्वर कृष्णपंचमी रोज गुरुवार प्रथम प्रहरी समाप्त।। हास्त अक्षेर शामराज माणिकभट जोसी मो जे वाळुज प्रगणे काठी मुक्काम कळमवाडी येथे ग्रंथ लेहुन समाप्तीस पावले. काना व्यंजन गेले आसले ते सांभाळुन घेणे.

१०९९ क्र. ७ **गुरुगीता**

आ. २१ × १२ सें. प्र.पा.ओ. १०. प्रथमची ७ व ८१ नंतरची पाने गहाळ. शाई गडद काळी. संस्कृत श्लोक व मराठी भाष्य त्याकरिता अनुक्रमे लाल व काळी शाई वापरली आहे. त्रु. लाल दंडरेषा. अक्षरवाटिका जुनी.

प्रथमच्या उपलब्ध भागातील ६५ वी ओवी.

।।तरिगुरुवाचुनि काहि। आन सार येथे नाही।।
हेचि सत्य हृदयि धरावे तुवा।।६५।।

उपलब्ध संहितेतील शेवटची १६ पाने कसरीने दुभंगलेली. जीर्ण प्रत.

११०० क्र. ८ **गुरुगीता**

आ. २७ × १५ सें. प्र.पा.ओ. १२. अक्षर मोठे. लाल व काळी शाई. श्लोक व भाष्याकरिता केवळ ६ ते १८ पाने. त्रु. ओवी ५०८. श्लोक १४१ नोंद.

११०१ क्र. ९ **शिवरात्री कथा**

आ. २१ × १४।। सें. प्र.पा.ओ. ९. अक्षर मोठे– जाड. गडद काळी शाई. पृ. ३४ × २.

आरंभ : आता इयावरी अनन्ये होउनि अंतरी। नमन केले परमेश्वरी। कथा अमृतधारी वर्षे गुरु।।१।। या वर्षा वो साजीरी। झाले उत्तम कथा शिवरात्री।। पाप संतापहरी ऐका श्रोत्री सज्जन हो।।२।।

शेवटी : इति श्री लिंग पुराण वचने। कथा शिवरात्री पावने। श्रवणे होये दोश दहने। श्रवण करती या जीवन सुखाचे।।७७।। संख्या वोव्या दोही अध्याच्या पहिला अध्या।।१३३।। दुसरा अध्या।।२७७।। ईश्वर लींग पुराण शिवपार्वती संवादा सीवरात्री कथा समाप्त।। मृग भील्ल उद्धरण।छ।।छ।।

११०२ ग्रं.क्र. १० **श्रीमत्सदाचार स्तोत्र**

आ. १६ × २२ से. प्र.पा.ओ. ११. अक्षर सुंदर-जाड- मोठे. पा. १४२ × २. सुस्थितीत. समश्लोकी टीका. मुखपृष्ठ व मलपृष्टास वेलबुट्टी.

प्रारंभी : श्रीरामगुरुवे नमः।। गणेश-सरस्वती-शिवविष्णू-सद्गुरू-नमन।। विद्यारण्यकृत श्लोक व्याख्यान क्रियेते। श्लोक।। नमः श्री शंक भाष्यः नमन श्रीगुरू पादांबुजा। शंकरानंद मोक्षध्वजा। प्रपंचा सहित अज्ञानबिजा महा मोह ग्रास का।।१।।

शेवटी : इति श्री शंकर विरचित सदाचार शुद्ध वेदांत त्याचीच टीका हे प्राकृत त्रिसप्तशती।।२१०१।। इति श्री सदाचार टीका त्रिसप्तशती समाप्त।। श्लोक ५४।। शतके ११ ओवी संख्या २१०१ श्लोक वोवी मिळोन २१५५. समासास लाल रेघा. चरणास लाल दंड. सुस्थितीतील ग्रंथ.

११०३ क्र. ११ **शंकरसंहिता** नेंबेणा

आ. १३ × २० सें. प्र.पा.ओ. १० पृ. ३० × २. कागद घोटीव जाड. वरील पानावर वेलबुट्टी. लाल दंड रेषा. सं. अ. ५.

आरंभी : श्री शिवाये नमः। श्री बसवराजेयानमः।। श्री गुरू रेवणसिद्ध प्रभवनमः।। निर्विघ्नमस्तु।। स्कंदे शांकर संहितायां वीर शैव धर्म निर्णये।। ॐ स्वामी श्री परंज्योति स्वरूप अव्यय अद्वयमूर्ति।। अव्यक्ता शिवाघरी धरली व्यक्ति।। निजभक्त तारावया।।

संहितेत "ल" च्या जागी "ळ" चा वापर.

शेवटी : रेवणसिद्धेश्वरावंदोन। समाप्त केले ग्रंथ विवरण। सत्यन सेट्टीचा नंदन। नेंबानाने।।१०७ सके सोळासे तीन। विजयादशमी आश्वनि। अति उतमरविदिनि। ग्रंथ समाप्त जाला।।१०८।। हे जे प्रितिपूर्वक सांगति।। आणि जे भावपूर्वक ऐकति। त्याची कोटी कुळे उद्धरती। सदाशिव प्रसादे।।१०९। इतिश्री स्कंद पुराण शंकर संहिताचा मुपरी भागे चतुरासितितमोध्याय।। शिवभक्त सत्यात्मजकृत टीकाया पंचमोध्याये समाप्त।।

११०४ क्र. १२ **बाड**

आ. १३ × २४ सें. उभी वही. कागद पातळ- लालसर-चिवट. प्र.पा.ओ. १५. उजवा वरील भाग कसरीने खराब. पृ. ५० × २. अक्षर मोठे वरील भागास आडव्या २ रेषा. प्रथमच्या २६ पानांत श्रीतत्त्वबोध पंचकर्ण रचना. पुढे अथर्वण वेद उपनिषदाचा भाग.

एका ठिकाणी :

बहुसाधने दुःख होईल जाण।।
सदानंद काजांति ही आकलना।।
आखंडेक आनंद आनंत आदी।।
आसे जाणने हे ची आत्मसमाधी।।१५।।
वेदांताचा ग्रंथ. सं.

११०५ क्र. १३ **निरालंब उपनिषद**

प्र.पा.ओ. ८. अक्षर मोठे. जांभळी शाई. कागद पातळ. जीर्ण. वरील पान फाटलेले.

शेवटी : इति या निरालंब उपनिषदाते। जो अध्ययन करितो। तो ब्रह्म होऊनि पुनः संसारी फिरत नाही। हा निश्चय इति. नि. ३.

११०६ क्र. १४ **बाड**

आ. १४ × २१ सें. प्र.पा.ओ. १५. पृ. १८ × २. अक्षर मोठे- साधारण. घोटीव- जाड कागद. काळी शाई. पुढील काही अक्षरे रेखीव. आरंभी अष्टावरण भाग. शांतलिंग पंचीकरण इ.

प्रथम : श्रीगुरुभ्यो नमः पंचकरण प्रारंभ। माणकपा शांत शुद्ध नीलकंठ ब्रह्म। तेथ चैतन्य इच्छा आगम्ये महतत्त्व माया उगम। ॐ कार उद्भवला।।

शेवटी : या परि पाचास प्राण मिळाला। राज सत्वि गळाले। सत्वतमे निजाले। तम शांति पावला। सुद्ध सत्वी।। तुर्था पावली ते पक्वदशा आली। सकळ शांती पावली ते उन्मणी गा। अविद्यामूळ उपडिले। समूळ केले निर्मळ शांत म्हणे।।

शेवटी ज्योतिर्लिंग अमृत. कानडी लिपीतील नोंद. देवपूजेचे उपचाराचे पद बाळबोध लिपीत.

११०७ क्र. १५ **बाड**

आ. १७ × ११ सें. प्र.पा.ओ. ६. पृ. ६६ × २.

आडवी पोथी. यात स्फुट रचना, तुकाराम, एकनाथ, ज्ञानेश्वर, मुकुंदराज. पोथीला मखमली कापडवेष्ठित पुठ्ठ्याचे कव्हर. शिवण मजबूत.

११०८ क्र. १६ **बाड**

आ. १४ × १२ सें.प्र.पा.ओ. १९. उभी वही. पृ. ६० × २. ओ. १४६. शिवण केलेले वेष्टन. अक्षर मोठे. परमानंद. ज्ञानबोध मन्मथ रचना. इतिश्री ज्ञानबोध गुरुशिष्य संवाद कथिले अध्यात्मज्ञान शुद्धा मन्मथ शिवलिंग म्हणे॥१४६॥

दंतपीडा निवारणार्थ मंत्रतंत्र. शेवटी बरीच पाने कोरी.

११०९ क्र. १७ **नागनाथ (वरद नागेश)**

आ. २३ × १० सें. प्र.पा.ओ. ९. कागद जाड. अक्षर रेखीव. अज्ञानसिद्धाचा वरदनागेश ग्रंथ.

शेवटी : इति श्री नागनाथ ग्रंथे गुरुशिष्य संवादे त्वपदतत्पद मिश्रीत विवरण. पिंडा डे ऐक्यता॥३२। ७

वोवीया दोनी हजार लिहिताक्षर। गुरुदासात्मजे। नागा किंकर गुरू महाराज प्रसाद वरे लिहिले स्वहस्तकी इतिश्री गुरुशिष्य संवादे वरदनागेश ग्रंथे महावाक्ये विवरण जीवशीवैक्य ना योगो नाण। उत्तरार्ध सप्तमोध्याय॥ श्री कृष्णार्पणमस्तु ।।छा।छा।छा।।

नागनाथ नाव दिले तरी मूळ वरदनागेश हा ग्रंथ आहे.

१११० क्र. १८ **शंकरसंहिता** निंबेणा

आ. ३२ × १० सें. प्र.पा.ओ. ७. अक्षर जाड मोठे. दोन्ही बाजूंस लाल रेषा. कागद जाड. गडद काळी शाई. अ. ५. ओ. १५१८ सं. वेष्टन पातळ. वेलबुट्टीने सजावट.

शेवटी : श्री रेवणसिद्ध श्ववावंदून। समाप्त केले ग्रंथ विवरण। सत्याण्णा शेट्टीचा नंद। निब्याणाणे॥१०९॥ शालिवाहन सक्के सोळासे तिनी। विजयादशमी मासी अश्विनी। दुदुंभी संवत्सरी विदिनी टीका समाप्त॥११०॥ हे प्रितिपूर्वक चिंती आणि जे भावपूर्व ऐकती। तयाचि कोटिकुळ उद्धरती। सदाशिव प्रसादे॥१११॥

११११ क्र. १९ **शैवरहस्य**

आ. ३२ × १० सें. प्र.पा.ओ. ७. कागद जाड. अक्षर मोठे. अ. ७. वरील मलपृष्ठ पातळ. त्यावर–

"श्रीमत्त गुरू। श्रीमत पार्वती। श्री शंकर संवाद। श्रीमत् ॥ श्रीपशूपत॥ तंत्र पुराण आहे। स्वहंसकत् ॥श्रीमत॥ कात्यायन ऋषिकृत आहे॥ स्वधर्म परायण जाणून संगृह केला आहे॥ पूराण॥ पट्टलसप्त॥७॥ लिंगसिंग याचे॥ क्रियाकर्म जाण। लिखित अक्षर हस्त॥ गुरुलिंग आया याचे॥

एवढ्या मजकुरात पण काकपद दर्शवून सुटलेले अक्षर दिलेले आहे.

प्रारंभ : कवीने आपली समग्र माहिती दिली आहे. हा भाग रचनेत क्वचितच आढळतो. तो भाग :

माझी जन्मभूमि वसतिस्थान। नामाभिधान निमोण आसे।४४॥ प्रवरेहुनी उत्तरेस दूर असे तेषडकोश। जांब नदी तटाकी वास। वस्ती निवास पूर्वजाशी॥४५॥ ते वस्तीशी शैव कुळी जन्म। लिंग संगिया मेळी। माझी जी का वैषावळी॥ ती परि मली निवोदितो॥४६॥ विठोबा झळके प्रपितामह॥ सदाशिव झळके पितामह पुण्यश्लोकपत्नीसह वास निःसंदेह हे करिती ते॥४७॥ भाऊ झळके नाम ममपिता। काशिबाई नाम मममाता। पुण्यश्लोकते असे उभयता। मम जन्म तत्त्वता त्या उदरी॥४८॥ शके सत्रासे एकेचाळीस। प्रथाथि नाम संवत्सरास। ज्येष्ठ शुक्ल नवमी दिवश सौम्य वासर सूर्यादयी॥४९॥ नक्षत्र फाल्गुनी उत्तरा॥ नक्षत्राचा चरण दुसरा। वृषभ लग्नी जन्म खरा॥ जाणा त्वरा कन्या रासी॥५०॥ मम पिता परमपवित्र। दोन कलम मजला जाले। मज प्राप्त जाला नरदेह। याचे काही सार्थक व्हावे॥५१॥..... दीक्षा दिधली तोची दिन। तुम्हा करितो निरोपन। दीक्षा देऊनी केले पावन। वर्तमान पूर्वजास॥५५॥ शके सतरासे चवऱ्यासीस दुदुभीनाम संस्थरास अश्विन कृष्ण त्रयोदशीस इंदुवासर दिवस तदिन्नी॥५६॥ पंचकलश स्थापन करून॥ विधियुक्ती केले पूजन॥ शैवदीक्षा परम पावन। मज लागनी उपदेशिली॥५७॥

ग्रंथ समाप्ती काल १७९९ ईश्वर नाम संवत्सर दक्षिणायन शरदऋतु इ. लेखनात "ण" "न" यात भेद नाही. वर्णनावरून कवी मराठवाडा परिसरातील आहे.

१११२ क्र. २० **बाड**

आ. १३ × ८. प्र.पा.ओ. ११. कागद जाड. उभी वही. पृ. ६६ × २. प्रथमची व शेवटची ४ पाने गहाळ. अक्षरवाटिका जुनी.

विविध स्फुट रचनेत शंकराचार्यकृत मणिकर्णिका स्तोत्र, आरती जंगमलिंगाची, पुष्पदंतकृतस्तोत्र, टाकैसह, लाल काळी शाई. एका प्रदीर्घ रचनेस गंधर्वाणाविरचिते असा उल्लेख. आरती, सद्‌गुरूचे पद, अभंग, दोहरा, मंत्र, यंत्र वशिकरणाचाइ.

१११३ क्र. २१ **बाड**

आ. १५ × ११।। से. प्र.पा.ओ. १२. पृ. ६० × २. प्रथमची पाने गहाळ. कागद जाड. काळी गडद शाई. उभी वही. अक्षर निरनिराळे. विविध रचनेत बिल्वाष्टक, शिवनाम, पद, केशव, कबीर, शिवदास, विष्णुदास, मन्मथस्वामी, यांची रचना. शेवटी एक मुग्धसंगम चरित्र।। शिवदासाचे अभंग शिवभव, लिंगाची, बाडाच्या विरुद्ध बाजूने पण लेखन. त्यात वेदांतपर रचना, शरण चरित्रे, एकतिरामयाच्या गोष्टी इ. गद्य स्वरूपात नोंद.

१११४ क्र. २२ **बाड** मन्मथस्वामी

आ. १३ × १७ से. पृ. ४ × २. जीर्ण कागद. प्र.पा.ओ. १९. अक्षर जुन्या वळणाचे. यात ७ ते ११ क्रमांकाची पदे. एक कागद वेगळ्या बाडाचे. ही सर्वच रचना मन्मथ स्वामींची आहे.

त्याची वानगी :

(१) सर्वगत तुझे राहो तुजपासी।
आता एक देसी आवडे ध्यान।।धृ.।।
(२) तोवरीच देवा तुज लागी भावे।
मागायाचि हाव। वसे चित्ती।।१।।
(३) मन्मथ शिवलिंग म्हणे वेडावलो।
आसताचि मेलो। संसाराशी।।६।

१११५ क्र. २३ **गुरुगीता** दास

आ. १२ × ७।। से. पृ. ३७ × २. अक्षर चांगले. प्रत्येक चरणास लाल शाई. गुरुगीता. मराठी टीका. ओ. १५०

प्रारंभ : कोण्हि येके अवसरी। रम्य कैलास सीखरि। महादेवि प्रति सुंदरि। पुसते जाहली।।१।।

शेवटी : श्रीमहालिंग स्वामीचे चरणारविंदी। तुकात्मजगुरा आहोरात्रवंदी। म्हणोनी पाहुनी स्वस्थ संधी गूह्य नीज पदी लीहीलीले।। पुढील आज्ञा नसता लेखन त्वा वेदान्वय घडवुनी घेतली। सेवा म्हणोनी घे बळेची दर्शन देवा।। माथा असावा निज अक्षर म्हणोनी। याविषयी कृपावंत मनीन धरावी विकल्पता।। चुकले...

ग्रंथसमाप्ती काल शक. १७९९ दिला आहे.

१११६ ग्रं.क्र. २४ **अष्टावरण** सत्यात्मज

आ. १८ × ११ सें. प्रथमचा व शेवटचा भाग नाही. कागद जीर्ण. प्र.पा.ओ. ९. त्रु.

श्री गुरु रेवण सिद्धेश्वर। दीक्षित सदाशिव किंकर सत्यात्मज बोलि विवर। श्रीलिंग महात्म्य।।छ।।

१११७ क्र. २५ **अनादिवीरशैवधर्म** सत्यात्मज

आ. १९ × १२ सें. पृ. ४१ × २. प्र.पा.ओ. १३. कागद घोटीव– जाड. अक्षर साधारण. प्रथमची ३ पाने गहाळ.

वीरशैव धर्माबद्दल माहिती. यजुर्वेद संहिता व उपनिषद सार. काही पदे, मोडी वाक्ये, देवनागरीत कानडी लेखन. काही पाने अधुनमधून कोरी. पूजाविधान, शंखकलश स्थापना इ. उपचार.

१११८ क्र. २६ **आत्मसार**

आ. २२ × १३ सें. प्र.पा.ओ. १७. पृ. ९८ × २. कागद जीर्ण. लेखन व्यवस्थित. जुनी अक्षरवाटिका. प्रत्येक चरणास लाल दंड. अंक लाल शाईत.

शेवटी : सहजलिंगाकृत शालिवाहन शके १६१९ ईश्वरनाम संवत्सर कार्तिक वा।।१३।।

गुरुपरंपराक्रम वडवाळसिद्ध नागेश, सिद्धय, सहजलिंग, असा आहे. संप्रदायाच्या दृष्टीने महत्त्वाची रचना.

इतिश्री वडवाळ सित्ध। नात्रया गुरुप्रसादे।।३१।। प्रसंग।।१३।। बोलती आत्मसार ग्रंथ समाप्त मीती। स्वस्ती श्री शाली. सके १६१९ ईश्वर नाम सं.।।१३।। शेवटच्या पानावर वेलबुट्टीचे चित्र।।

१११९ क्र. २७ **सानंद आख्यान** सत्यात्मज

आ. १८ × १२ सें. प्र.पा.ओ. १०. अ. ७. ओ. ८११. कागद जीर्ण. अक्षर मोठे. जुनी लिपी. त्रु.

मूळ कानडी कथा. गिरी कृष्ण सोमदा याची त्याचे भाषांतर सत्यात्मजाने केलेले आहे. हा ग्रंथ शके १६७३ चैत्र वा. १ महादप्पा सांगोले कसबे वाल्मीकेश्वरानगरा।

११२० क्र. २८ **सानंद आख्यान** सत्यात्मज

आ. १७ × २२. सें. प्र.पा.ओ. १३. संपूर्ण पोथी. अर्वाचीन प्रत वरील ग्रंथाची. सुस्थितीत.

११२१ क्र. २९ **शिवराम** नागेशदास

आ. २३ × १३ सें. प्र.पा.ओ. ११. कागद जीर्ण. पा.

१५ × २. अक्षर मोठे. ओ. ३२१. कव्हर पानावर कानडी लिपीत नाव. त्याखाली हा ग्रंथ नेब्यण सेटी मालकीचा असा उल्लेख यात आहे. त्यामुळे शके १६०० पूर्वीची रचना ठरते. मठ पीठाची माहिती असल्याने संप्रदायात महत्त्वाची रचना. पंचाचार याच्या पाच पीठांपैकी केवळ चाराचा आवर्जून उल्लेख येतो. ही महत्त्वाची गोष्ट आहे. विषय चिंत्य वाटतो.

११२२ क्र. ३० **वज्रसूची उपनिषद** महादेव रंक

आ. २२ × १३ सें. पृ. २६ × २. प्र.पा.ओ. ११. कागद जाड. काळी शाई. लाल दंड रेषा. ओ. ३१३. ब्रह्मजाणे स्वये आपण। तोचि जाणावा साच ब्राह्मण।। येर ते + + लक्षण।। विप्रही भले।।३१०।।

रचनाकाल शके १६९५ विजय संवत्सर फाल्गुन शुक्ल तदिनी लेखन।।३१३।।

११२३ क्र. ३१ **सीवरहस्य**

आ. २२ × १३ सें. प्र.पा.ओ. ९. श्लोक ४२. ओव्या २६१ एकूण ३०३. पा. ३० × २. अक्षर खूप मोठे– रेखीव. वरील व शेवटच्या पानावर सजावट. स्थिती चांगली.

जाले सिवरहस्य संपूर्ण। परिचिति यासी स्वीवरूप। रंक म्हणे शरण महादेवाचा।।२६१।। हा "रंक महादेवाचा" कुठला याचा बोध होत नाही. बिदर जिल्ह्यातील एका रंक कवीहून हा भिन्न आहे.

११२४ क्र. ३२ **मठस्थळ**

आ. २१ × १२।। सें. प्र.पा.ओ. ११. पा. ६ × २. अक्षर रेखीव. लिपी पुरातन. चरणास लाल दंड. त्रु.

मठस्थळ– मारुळसिद्ध वाक्य. यातील केवळ एक प्रसंग. खालील उल्लेख चिंतनीय.

"मरुळसिद्धा नांदणुक।। मुक्तेवरी।।
गरुदेव लक्षणे अपरंपार।।"

११२५ क्र. ३३ **स्वयंप्रकाश** मन्मथस्वामी

आ. १७ × २२ सें. ही अर्वाचीन प्रत. अक्षर बारीक. कागद पातळ. मन्मथ स्वामींचा संपूर्ण ग्रंथ. वेदांतपर रचना.

११२६ क्र. ३४ **स्वयंप्रकाश** मन्मथ शिवलिंग

आ. १७ × १२ सें. प्र.पा.ओ. १७. अक्षर बारीक. अर्वाचीन प्रत. कागद आखीव. पा. ३४ × २. ओ. ७४४.

मलपृष्टावर ।।श्री शिव योगी मन्मथस्वामी कपिल घाट विरचित स्वयंप्रकाश एवढा मजकूर.

प्रारंभ : नमन गुरू, त्रिदेव, परमगुरूंना असून. त्यानंतर रचना.

शेवट : म्हणोनी वक्ता श्रोता नागेश्वर। तेणेचि विस्तारिला ग्रंथाकरू। मी तयाचा मृणियारगत किंकरू। मन्मथ शिवलिंग म्हणे।।९८।। इतिश्री स्वयं प्रकाश ग्रंथे। गुरू शिष्य संवादे। सत्पुरुष लक्षणं निरूपणं नाम सप्तम प्रकरण समाप्त।। श्री शिवार्पणमस्तु।।

लेखनकाल नाही.

मूळ प्रतलेखन विश्वनाथ काशीनाथ देगावकर, बार्शी शके १८७९ ची प्रत. मि. भा. व।। १० गुरुवार.

११२७ क्र. ३५ **ज्ञानबोध** मन्मथस्वामी

आ. १७ × १२ सें. प्र.पा.ओ. १०. अक्षर साधारण. पा. ७ × २. ओ. १४६.

आरंभी : गणेश, सरस्वती। गुरुवंदन. आता निरोपुज्ञानबोधु। गुरु शिष्य संवादु।। ऐकताची परमानंदी।। श्रोतियाचे होईल।। अर्वाचीन प्रत.

शेवटी : इतिश्री ज्ञानोवेक। गुरुज्ञानची प्रसिद्ध।। तैसा नागेशाची औश।। आपण तो नागेशी विरोण।। नागेशची जाल।।४४।। इति. ऐकताची होय स्वये बोध। म्हणे शांती पाहिजे।। गुरू कथिल अध्यात्मज्ञाना शुद्ध मन्मथ शिवलिंग म्हेणे।। इति ज्ञानबोध संपूर्ण।। शुभं भवतु।।

११२८ क्र. ३६ **गबाळ**

आ. १७ × १२ सें. पृ. ५ × २. अक्षर साधारण. विविध अक्षर. कागद साधारण– पातळ– तपकिरी.

मन्मथ स्वामीकृत जोहार व पदे. जोहारमध्ये बीड हवेली डोंगरचा।। मन्मथ शिवलिंग तेथीचा।। संताच्या पूर्ण दयेचा।। जोहार कानी ऐका की जी माय बाप।।

यातच जोशी, रचना. लक्ष्मण कवीची रचना, जोगडा.

यात नाथपद्धतीची भारुडे आहेत. हे वैशिष्ट्य.

११२९ क्र. ३७ **सानंदआख्यान** सत्यात्मज

आ. १५ × १३ सें. प्र.पा.ओ. १०. पा. ७२ × २. ओ. ८१७. अ. अक्षर मोठे. कागद जीर्ण.

आरंभी : गणेश, सरस्वती गुरू वंदन. निर्विघ्नमस्तु।।

सानंदगण चरित्र।। अकरादि पुरुष सच्चिदानंद महेशा।। अखंडेक स्वप्रकाश।। नित्यरूपा।।१।।

शेवटी : इति श्री सानंदोपाख्याने।। धर्म शास्त्रेकैलासे।। शिवसभा वर्णन सप्तमसंधी समाप्त।।१२५।। सके सोळासे १६७३ चैत्र वदि।। प्रतिपदा ते दिसवस्ती लिखितं।। समाप्त।। माहादपा सांगाळे कसबे वाल्मीकेश्वरणगर।।

तवयेरीकडे सभेआत।। नित्यनिर्मळ विराजित।। भक्त बंधु लोककर्ता।। चतुर्दशाधि देवोत्तम।।१८।। तो आधाती नभमंडळी।। मल्लिकार्जुन श्रीसैली।। तयाचा चरणकमली।। मधुकर कृष्ण सोमणा।। १९।। याच्या पुत्रे ग्रंथु विचारिला रगिरी।। कन्नड भाषा सांगितला।। तो मऱ्हाष्ट्रोतरी प्रगटिला।। सत्यात्मज शिवभक्ते।।२०।। यानंतर ग्रंथाची फलश्रुती दिली आहे.

११३० क्र. ३८ तत्त्वबोध

आ. १४ × ९।। सें. प्र.पा.ओ. ८ पृ. १८ × २ अक्षर मोठे जाड. काळी शाई. कागद घोटीव जाड. अक्षर वाटिका जुनी.

आरंभ : मंगलाचरणानंतर नागेशाचा उल्लेख.

शेवटी : इतिश्रीतत्त्वबोध।। नागेश्वरदे ग्रंथ सित्थ।।

यात कवीने पृ. २८ वर उल्लेख केला तो भाग चिंतनीय आहे.

"भक्ति केले इंद्रे।। एकदंता लंबोदरे।।
पार्वती बसवेश्वरे।। आदि करूनी।।८८।।
शेवटी अज्ञान म्हणे आनंद। संती आवडी रोवा।।२०१।।
इतितत्त्व बोध महावाक्य ग्रंथ संपूर्ण।।
श्रीगुरू विरुपाक्ष वडवाळ सित्ध नागेशार्पणमस्तु।।शुभंमवतु।।

११३१ क्र. ३९ निबंध

आ. १८ × १४ सें. प्र.पा.ओ. ९. पा. २७ × २. मोडी लिपीतील लेखन. अक्षर मोठे. गडद काळी शाई. मूळ शिवलेली उभी वही. पाने सुटी. कागद तपकिरी पातळ.

शीर्षक : श्रीसिद्धेश्वरमहाराज।। लक्ष्मण आप। साधूचा निबंध असे मूळारंभापासून. निबंधास आरंभ। एका पत्रापासून :

रा. रा. प्रबोधरत्न पत्रकर्ते महाराज यासी विनंती विशेष बहुत दिवसापासून माझ्या मनात होता तो कधि कधि सित्थासि जाईल अशी फार आशा होती. त्यात या लक्ष्मण अप्पा जीवन चरित्राची माहिती देताना...

या साधुपुरुषाचे चेरित्रया थोडे मी थोडक्यात संक्षिप्तरूपाने वाचकास कळविण्याची इच्छा धरून होतो. लेखनास आरंभ करतो.

।।भाग १।।...

"मूळ लेखकाचे हस्ताक्षर. सके १८०० भाद्रपद व।। दशमी रोजी समाधी घेतली. त्याहाची समाधी अष्टीचे पूर्वेस नंदणी नामाची नदी आहे. तिचे पूर्व तटावर समाधी जाहली त्या ठिकाणी नित्यनेमाने पूज्या करण्या करिता जातात. हाली आजही नेमाने पूज्या पूरातन शब्द माहिती पुराण आस्तमान व नेमानी भजन होतात. आईसे हा कालपरीयंत आहे. पुढे देव जाणे हे विनंती सके १२२९ पल्वंगनाम संवत्सर माहे माघ शु।।१५ सके १८६९. पुढील बाडाची पाने कोरी आहेत. सर्व पाने निखळून सुटी झाली आहेत.

११३२ क्र. ४० बाड

आ. १७ × २२ सें. प्र.पा.ओ. २१. पृ. १० × २. अक्षर बारीक. गडद काळी शाई. कागद पातळ उजवा भाग मध्यभागी उंदरांनी कुरतडलेला. विविध स्फुट रचना. चरित्रात्म माहिती, नागेशचा उल्लेख. नागलिंगस्वामी, विरुपाक्षस्वामी, गद्यात्मक लेखन. ४ थ्या पानापासून माणूरचा उल्लेख. शिवलिंग, करीबसप्पा, कार्तिक शु।।१५ डोणगाव यात्रा. शके १४८२ माघ।। ५ सुपुत्र जन्म मन्मथस्वामींची माहिती. हा यतीवर होणार तेथे जावळ उतरविले ते विवाहित होते. भूम येथील शिवकडा स्थान. नंतर मन्मथस्वामी अभंग. संप्रदायाच्या दृष्टीने महत्त्वाचे लेखन.

११३३ क्र. ४१ समाधीसुख अभंग

आ. १७ × १२ सें. प्र.पा.ओ. १८. पृ. ३६ × २. जीर्ण कागद– तपकिरी रंगाचा. काळी शाई. यात १३ अभंग. बसवदासाचे अभंग. मन्मथाबद्दल ३० रचना. शिवगुरुदास, रामलिंग इ. ची स्फुट रचना.

११३४ क्र. ४२ बाड

आ. १७ × २१ सें. प्र.पा.ओ. २१. अक्षर बारीक. पा. ४ × २. जीर्ण.

स्फुट रचना. बसवदास, शिवगुरू, गुरुपाद यांचे अभंग, नमस्कार. इ. रचना.

११३५ क्र. ४३ परमरहस्य मन्मथस्वामी

आ. २१ × १४ सें. प्र.पा.ओ. ९. त्रु. कसरीने उजवा

भाग खराब. काळी शाई.

आरंभी : निरनिराळ्या शरणांना वंदन. मुख्य शिवाचार्य यांचे वर्णन.

शेवटी : हे असो! आता जो निरोपिला जंगम।। जो वीर शैव मार्गे उत्तम। तो माझे स्वरुप हे तुज वर्म। निरोपिले वो देवी।। इतिश्री परमरहस्य भक्तिस्थळ नाम नवमांगती समाप्त।।अ.९।।

११३६ क्र. ४४ **गाथा** लक्ष्मण

आ. २६ × १५ सें. प्र.पा.ओ. ७. अक्षर खूप मोठे. पा. ५४ × २. प्रथमची २ पाने गहाळ.

यात अभंग क्रमांक ९९ पर्यंतचा भाग. यात लक्ष्मण कवीचीच रचना आहे.

शेवटी : लक्ष्मणाने म्हने रावन गेला रामरूप होऊन।।८।।

वासुदेव रचनेत नाममुद्रा.

११३७ क्र. ४५ **बाड**

आ. २६ × १६ सें. प्र.पा.ओ. ८. पा. ८९ × २. जाड घोटीव कागद. अक्षर मोठे. काळी गडद शाई.

पहिल्या पानावर :

स्वता श्री शालिवाहन सके १८१०

प्रमायी सर्व काही समत्सरे जेष्ठ शु. १०.

सोमवार ही वही श्री सिधेस्वेराचे देऊळातली आशी कोण्ही घेवोन घाण करू नये गहाण केलियास शेपतआशे ही वही भुपाळ्या आठ अशे. काही मोडीचा मजकूर आरती. शेवटी ८८ पानानंतर रचनेचे अनुक्रम मोडी लिपीत संख्येसह. एकूण ७९ रचनेची नोंद. रचनेचे वर्गीकरण. लेखनकाल १८१०. शेवटी लक्ष्मणाचे काव्य मोडी लिपीतून.

११३८ क्र. ४६ **रेणुकाविजयपुराण**

आ. ३२ × २१ सें. प्र.पा.ओ. १७. अ. ३१ ओ. ५०६४. निळी शाई. अर्वाचीन प्रत. नमनानंतर.

गावया रेणुकाग्रंथ सागरु। उद्युक्त जालो मी तत्परु।। अल्पज्ञ असे साचारु। मांगल्या स्तव नमिते।।१६।।

ईशान गुरुच्या संस्कृत रचनेवरून व कन्नड सिद्धनाचे रचनेवरून ही रचना केली असे कवी नमूद करतो.

शेवटी :

ईशान गुरु विख्यात। हाचि ग्रंथ संस्कृत भाषेत। वर्णिले तेलुगु कानडीत। चरित्र बसवादि कवी।।५६।।

शेवटी अवतरणिका. नंतर

श्रीगुरु बाळ तनये केले ग्रंथ लेखन।। श्री बोराळ क्षेत्री निवांत बैसोन। श्रीनंदीश्वराची कृपाघन। ग्रंथ सांगरी नांदतो।।१८७।। श्री नृ शालीवाहन शके एको. दोन।।

रौद्र नाम संवत्सर जाण। वैशाख अक्षय तृतिया शुभ दिन। संपविला ग्रंथ गुरुवारी इति।।१८८।। श्री रेणुकाविजय ग्रंथ स्कंध पुराणे असे लिखिता परिसोत सज्जन संत।।

११३९ क्र. ४७ **बाड**

आ. १४ × १० सें. प्र.पा.ओ. १०. पा. ६० × २. जाड कागद. आडवी वही. पहिले व शेवटचे पान गहाळ. गडद काळी शाई.

विविध रचना. वेदांतपर रचना. जोहार, मोडीमिश्रित लेखन.

११४० क्र. ४८ **बाड**

आ. १६ × ११ सें. प्र.पा.ओ. १०. अक्षर बारीक. अक्षरवाटिका जुनी.

विविध स्फुट रचना. तुकाराम, रामदास, केशव रंगीरंगनाथ, भक्त, अमृतराय, कृष्णदास, एकनाथ, श्रीधर, रामी रामदास, ज्ञानदेव, उद्धव, नित्यानंद, शिवराम, हिंदी पदे. शेवटची पाने निष्काळजीपणाने रेखाटलेली. काही पाने कोरी.

११४१ क्र. ४९ **बाड**

आ. ११ × १३ सें. प्र.पा.ओ. १६. शिवलेली वही. वेष्टन जाड. शब्द तुटक. प्रथम जप करणाऱ्या साधकाचे चित्र. एका पानावर तीन यंत्रे. यात अष्टावरण सत्यात्मजाची पूर्ण रचना. नंतर पुष्पाजली मंत्र.

११४२ क्र. ५० **गुरुगीता**

आ. ११ × १३ सें. प्र.पा.ओ. १६. वरील बाडातच ही रचना. १५० ओ. समश्लोकीचा उल्लेख. संस्कृत श्लोकासह शेवटी दत्तात्रय स्तोत्र.

११४३ क्र. ५१ **बाड**

आ. १४ × १४ सें. प्र.पा.ओ. १२. जाड अक्षर. काळी शाई. जाड कापडी वेष्टन. आडवी वही. यात विविध पदे. यात तुकाराम, जनाबाई, मुक्ताबाई, ज्ञानेश्वर, जनार्दन, मुकुंदराज, बालकदास, सीवरामात्मज, मध्वमुनेश्वर, संतनाथ बाबा,

गोरक्षनाथ, कविरायची लावणी, मल्हारी भैरू आणि केशवचैतन्याची रचना. महत्त्वाचे बाड.

११४४ क्र. ५२ **बाड**

आ. १५ × १२ सें. प्र.पा.ओ. १५. प्रथमची व शेवटची पाने गहाळ. दोन्ही बाजूने लेखन. मध्येच पाने मोडी लेखन. सर्व संतांची रचना. काही पाने कोरी. विरुद्ध बाजूने १७ अभंग.

११४५ क्र. ५३ **बाड**

आ. १४ × २१ सें. प्र.पा.ओ. २३. अक्षर बारीक. उभी वही. पा. १२५ × २. प्रथम पानास सजावट. कुंडीतील झाडास फुले असे मोठे चित्र. काही संस्कृत रचना. यात अनुक्रमणिका आहे. १११ रचनांचा उल्लेख. आख्यान इ. रचना. सुस्थितीत.

११४६ क्र. ५४ **बाड**

आ. ३४ × ११ सें. प्र.पा.ओ. ११. उभी वही. काळी शाई. कागद मध्यम. शिवदास भजन. मन्मथस्वामी रचना. प्रत्येक अभंगानंतर एक भजन. काही पाने ओघळून सुटी झाली आहेत.

११४७ क्र. ५५ **बाड**

आ. २६ × १४ सें. प्र.पा.ओ. ३०. अक्षर खूप मोठे. मध्येच मोडी मजकूर. माणिक प्रभू संप्रदायाची सर्व रचना टिपलेली आहे.

११४८ क्र. ५६ **बाड**

आ. २६ × १० सें. प्र.पा.ओ.११. पा. ३८ × २. जीर्ण पोथी. २४ पानापासून मोडी लिपीत विविध संतांची रचना आहे.

११४९ क्र. ५७ **बाड**

आ. १२ × २० सें. प्र.पा.ओ. १५. अक्षर मोठे. समासविरहित लेखन.

संतांची पदे. पंचाक्षर, महंत, तुकाराम, नित्यानंद, वीरा, एकाजनार्दन, ज्ञानदेव, वीरनाथ, शंकराचार्य स्तोत्र. एका संतनामावलीत प्रत्येक संतनामाबरोबर 'विठ्ठल' शब्द. मध्येच मोडीतील हिशेब लिहिलेला भाग.

११५० क्र. ५८ **बाड**

आ. १५ × २० सें. प्र.पा.ओ. १२. निरनिराळे अक्षर. कागद जाड. काळी शाई. मोडी व बाळबोध लिपी.

विश्वनाथ काशीनाथ, काशिनाथ यांची रचना. कापडी बाड वेष्टन. माणूरचा उल्लेख. मोठे बाड.

११५१ क्र. ५९ **बाड**

आ. १२ × १० सें. प्र.पा.ओ. ६. अक्षर मोठे. पा. ५० × २. प्रथम व शेवटची पाने नाहीत.

या संपूर्ण बाडात कानडी पदे मराठी लिपीत. जीर्ण असे कागद.

११५२ क्र. ६० **गुरुगीता**

आ. १३ × ११ सें. प्र.पा.ओ. १०. पा. १५ × २.

शेवटी : सण २२ सण १२८२ स्वच्छी श्रीनृपशालिवान सके १७९४ आंगीरा नाम संवत्सर आषाढ शु. बिज.

११५३ क्र. ६१ **विवेकसिंधू** मुकुंदराज

आ. १५ × ११ सें. प्र.पा.ओ. १०. फक्त पहिले पान नाही. अक्षर साधारण. प्रत्येक अक्षर तुटक.

शेवटी संपूर्ण १८ प्रकरणानंतर :

हा भाव पावो सर्वेश्वरी। श्री कैलास नाथ त्रिशूलधारी। मुकुंद राजाचेनी कृपा करी।। घडला हा प्रसंगु। करता करविता श्री गुरूच। मनोरथ पूर्ण केले। ग्रंथ श्रीविवेक सिधुची उत्तरप्रती। लेखनार्थ झाली समाप्ती। स्वस्ती श्रीसद्‌गुरू मोर्ती। कृपात्याची।।१।। सके १७७९ पिंगलनाम संवत्सरेसी। श्रावण वद्य ९ गुरुवार दिने।।२।। अपया वलद वीरसंगाय पेठ ई तकाद नगरी मठपतीया। पूर्व रत्नापूर वसती तये कसबे लातूर म्हणता असो श्री कैलासपती। याती काही एक माजी आवडली प्रिती म्हणुनि करुनिया आपुली स्तुती आदरविलीमज।।४।। जय जय जय श्री गुरु नाथा। जैसे लेहविले ग्रंथा। माते तैसे करावे आता। म्हणोनि तुम्हा विनवितसे।।५।। येथे कोन मी कायसी लिखिता। प्रभु मज दिनाचीया हस्ता लेखन केले समर्था तुमचे तुमी। येथे लिहिला जे मी म्हणतो। ते सर्वथा काहीची नेणतो। अज्ञापने भ्रमती मी मी म्हणूनी। मी तू हे सांडावे। मी मजची ओळखावे। तुझ्या स्वरूपी मुरावे। हेची ज्ञान देई मज।।१०।। हे ग्रंथ पूर्वक

प्रती लेहविली। नेणो काय तुझ्या प्रिती आवडली म्हणोनी मज दासा वरते कृपा केली।।

प्रति लेखनार्थ।। अदाय।।अठरा।।१८।।

११५४ क्र. ६२ **गुरुगीता** राघवाचा दीन

आ. १३ × २० सें. प्र.पा.ओ. १३. पा. ९४ × २. अक्षर मोठे. जाड काळी शाई. चरणास लाल दंड. केवळ प्रथमची २ पाने गहाळ.

शेवटी : म्हणे राघवाचा दीन। हे शिवशक्तीच ऐक्य ज्ञान स्कंध पुराणीच भिजनिरोपण सुत शौनका जाण स्वयं सांगे।।९२।। यांचा निज भावार्थ जाण देशभाष्य केला कथन अश्विन मास शुक्ल पक्षी जाण पौर्णिमेची पूर्ण जाले।।९३।। संवत्सर सतरासे ऐशी शरदऋतु तो परिग्रामी बुऱ्हाणपूर खाणदेशी तापी तिरासी संपल।।१२९४।। श्लोक १४९।। एकूण १४४३।। इतिश्री स्कंद पुराणे उमा महेश्वर संवादे गुरुगीता सहटीका संपूर्णमस्तु।। श्री सांब सदाशिवार्पणमस्तु।।

११५५ क्र. ६३ **ज्ञानरत्नभांडार**

आ. २० × १३ सें. प्र.पा.ओ. १३. अक्षर मोठे. काळी गडद शाई. अ. १८.

शेवटी : ऐसे ज्ञानरत्न भांडार कुसरी। ऐकिजे श्रोते सज्जन चेतुरी। ब्रह्मज्ञान नाना परोपरी। सावधान परिसीजे।। श्रीगुरू उमानंद दातारा। बोलील ज्ञानरत्न भांडारा। ब्रह्मज्ञान निरंतर। श्रोते सादर तुका म्हणे। इति ज्ञानरत्नभांडार नाना विवरण सारासार प्रकरण अष्टादश अध्याये गोड हा।। इति ज्ञानरत्नभांडारे संपूर्णमस्तु।। ओ. २२३।। सन १२७७ पौष शु।। ४ रोज सोमवार ग्रंथ समाप्त होय।। अपया स्वामीचे हस्ताक्षर असे।।

११५६ क्र. ६४ **वीरशैवोत्कर्षसंग्रह**

आ. २३ × १३ सें. पृ. ५० × २. श्री नाथलिंगशास्त्री काशीकर यांनी संग्रहित करून लिथो प्रेसवर इ. स. १८८५ मध्ये छापलेली पोथी. जीर्ण झालेली. एक दुर्मिळ रचना. संप्रदायाच्या दृष्टीने महत्त्वाचे.

११५७ क्र. ६५ **बाड**

आ. २३ × १५ सें. उभी वही. अक्षर खूप मोठे. प्र.पा.ओ. २०. पृ. ९२ × २. प्रत्येक पानाच्या क्रमांकाजवळ विठ्ठल नाम नामदेव, निवृत्ती, ज्ञानेश्वर, श्रीधर स्फुट रचना बरीच आहे.

११५८ क्र. ६६ **बाड**

आ. २१ × १५ सें. उभी वही. अक्षर खूप मोठे.

अभंग क्रमांक ११ पासून भाग उपलब्ध. पुढील सर्व रचना आहे. मन्मथस्वामींची रचना. मुळात बाड खूप मोठे होते. ५८ पानानंतर क्रमांक नाही. १४ नंतरची पाने गहाळ. तेथून ५४ पानापुढील भाग. शेवटी मोडी लेखन.

११५९ क्र. ६७ **बाड**

आ. १५ × ७ सें. प्र.पा.ओ. १५. अक्षर मोठे. समासविरहित लेखन.

विविध स्फुट रचना. शिवदास, मन्मथ, नरहरी सोनार, बस्वलिंग, लिंगेश्वर रचना. बाडात पान क्रमांक १५ वर शके १७७७ राक्षसनाम संवत्सर अश्विन शु।।१२ सोमवार चवथे प्रहरी असा मजकूर.

एकनाथकृत ताकीतपत्र, रूपकात्मक रचना.

जोहार, पुढील भाग नाही.

११६० क्र. ६८ **विवेकसिंधू** मुकुंदराज

आ. १४ × २१ सें. त्रु. अ. ९. प्र.पा.ओ. ९. अक्षर मोठे. कागद जाड, काळी गडद शाई. अक्षरवाटिका जुन्या वळणाची.

११६१ क्र. ६९ **बाड**

आ. २३ × १७ सें. प्र.पा.ओ. १७. विविध स्फुट रचना. यात बसवदास, गुरुपाद, मुसलमानीकृत, करजा, भुलाई, भटकार, शिवलिणी, पदकवडी, खुळ्याचे प्रकरण, भिक्षा, खरा गुरू, भालदार, छडीदार, चोपदार, संग्रहक, शीलवंत, दीक्षावंत, वाद, मुंडा, सौरीमुडा, सौरी, वासुदेव, जंगम, बंदकी भालदार, फौजदार, वृक्ष, अवलीरूप, घोडा, फुगडी, वासद, नोकरदार, चोपदार, भाट, गावभाट, कटार, अष्टक, रुद्राक्षभस्म, जंगम, लिंग महिमान, भटकार, बसवदंड, वालसंग, अडती, कलगी तुरा, मांग, मारवाडी अशी रचना या सर्व शीर्षकाखाली दिलेली आहे. एकूण १७१ क्रमांक दिले आहेत. महत्त्वाचे बाड

११६२ क्र. ७० **बाड**

आ. २४ × १८ सें. प्र.पा.ओ. ७ अक्षर खूप मोठे. आडवी वही.

संकल्प, पूजाविधान, आरती विरुपाक्षकृत.

११६३ क्र. ७१ **गाथा**

आ. १७ × २२ सें. प्र.पा.ओ. १६. भाग पहिला. ४० अध्याय. बसवकृत शके १८३९ चा निर्देश. बसवविद्राव अभंग, गुरुदासकृत स्फुट.

११६४ क्र. ७२ **अनामिक**

आ. १५ × १० सें. प्र.पा.ओ. १२ मोठ्या ग्रंथाची काही पाने ३ × २. यातील पानावर ९८० ते ९८२ असे पृष्ठ क्रमांक दिले आहेत. यातील शेवटच्या पानाचा मजकूर :

आणि जो अत्यंत दुराचारी। त्यासी म्या घातले नरका भीतरी। तो साधुसी शरण जाय जरी। तारते बळत्कारी राहिती तुया।।९५।। आणि जो साधूचा द्वेषी असोनि मज ऐसा अंगिकारि त्यासी।। पृष्ठावर त्या अध्यायाचा पृष्ठ क्रमांक ८०, असा दिला आहे. अक्षर मोठे ठसठशीत. ग्रंथकाराचे नाव उपलब्ध नाही.

११६५ क्र. ७३ **बाड**

आ. १६ × ७ सें. प्र.पा.ओ. ८. अक्षर मोठे. कागद जाड. पा. ३२ × २ लिंगशहातची रचना. शिवमहिमान आख्यान १४ ओव्या. कानडी लिपीत काही लेखन.

११६६ क्र. ७४ **शंकरसंहिता**

आ. २३ × १५ सें. प्र.पा.ओ. ९. अक्षर मोठे. कागद पातळ. पा. १३४ × २. प्रथमचे व शेवटचे पान गहाळ. ओ. १०९७. १५१६.

सके १६९४ नंदन संवत्सर भगवंतभट्ट के दारा मुक्काम कसबे पाथरी लिखिते।

हे पुस्तक संबुजी निराजे वाडकर याचे असे।। श्री शंकराचार्यमस्तु।। जीर्ण पोथी.

११६७ क्र. ७५ **शंकरसंहिता**

आ. २३ × १२ सें. प्र.पा.ओ. १०. त्रु. केवळ अधाय ४-५ उपलब्ध. शेवटी एका ठिकाणी "अंबापुरी राचापा बुरांडे स्यदं पुस्तकं." खाली वेलबुट्टीची सजावट. अंबेजोगाई येथे केलेली ही प्रत एका राचपाची आहे.

११६८ क्र. **शुद्धिपत्र** उत्तरादिमठस्वामी

जीर्ण कागद. काळी शाई. मोडी लिपी. प्राचीन काळी विठ्ठल गलंड यांचे घराणे रसविद्येत पारंगत होते. ही जारण मारण विद्या ब्राह्मणांना निषिद्ध होती, म्हणून त्या वेळच्या शंकराचार्यांनी बहिष्कृत केले, तर मध्वस्वामी उत्तराधिमठ यांनी शुद्धिपत्र देऊन त्यांना माध्व केले. या भागाची बोधभाषा मराठी असल्याने त्या स्वामींनी मराठीतून दिलेले आहे. विठ्ठल गलंडचा रसकौमुदी ग्रंथ ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. विठ्ठल गलंड विजयनगर साम्राजाचा राजवैद्य होता. या शुद्धिपत्राचा काल फाल्गुन शु।।८ शके १७७० असा आहे. (के.ग्रं.अ.नों.पा.)

(हकीम विठलराव, रोझा गुलबर्गा.)

११६९ **रामविजय** श्रीधर

आ. २१ × १६ सें. प्र.पा.ओ. ११. अ. १ ते ३९. त्रु. कागद जाड. प्रत्येक अध्यायास वेष्टनाचा कागद व दोरीने बांधलेले. प्रथमची अक्षरे बेताची. नंतर सलग सुंदर लेखन. गडद काळी शाई. दोन्ही बाजूंस जाड रेषा.

३९ व्या अध्यायाच्या शेवटी :

श्री रामविजय ग्रंथ सुंदर। सम्मत वाल्मिकी नाटकाधार। सदा परिसोत पंडित चतुर। नवत्रिशति अध्याय गोड हा।।१९४।। प्रसंग।।।३९।। संपूर्ण।। श्री रामार्पणमस्तु।।छ।। ३९ व्या अध्यायाच्याशेवटी एक टीप आहे. लाल शाई वापरली आहे. हे रामायण प्रसाद सीता नाहणीचे गुहेत मिळाले. केशवराव यांना मिळाले. मिती आशाढ शु।। ११ शके १८५२ सन १३२७ फसलीला मिळाले. केशवराव बेडगे।।

वरील हा उल्लेख आजच्याला ६८ वर्षांपूर्वीचा आहे. सीतेची न्हाणी हे अमृतकुंड पवित्रस्थान आळंदजवळ सीमा भागात आहे. डोंगराच्या कुशीत कुंड असून, रामकालीन पवित्र स्थान आहे. प्रथमच्या पानावर वेलबुट्टी सजावट. बेडगेचे नातलग आळंद येथे असल्याने पोथी उपलब्ध झाली. औसेकर महाराज उल्लेख.

(श्री आराध्ये c/o गोविंदराव व्हन्नोळीकर.
बाहेर पेठ, आळंद, गुलबर्गा)

बाळेकुंद्री संस्थान, बाळेकुंद्री, जि. बेळगाव

११७० क्र.१ **श्री दत्त प्रेमलहरी** पंतमहाराज

गुलबर्गा जिल्ह्यातील गाणगापूरजवळील मूळ घराणे असलेले

प्रेमावतारी पंतमहाराज हे बाळेकुंद्री येथे होते. त्यांनी दत्त प्रभूंस भक्तीने आळविताना केलीली पदे विपुलतेने यात आहेत. शिष्यांनी ती टिपलेली आहेत. सुमारे तीन हजार पदे आहेत. यात मराठी, कानडी, हिंदी, संस्कृत रचना आहे. काही पदांना नाट्यगीताच्या चाली. रचना प्रासादिक आहे.

काही वानगी :

(१) नाचत गुरुभजनी। आम्ही जाऊ निरंजनी।।
(२) का रुसवा मजवरी। दत्ता दर्शन दे झडकरी।।
(३) दर्शनासी का गा लाविला उशीर।
धरवेना धीर आता काही।।
(४) अखंड प्रेमा देईमज।। बाळ मुकुंदा।।धृ.।।
(मुद्रित ग्रंथ)

११७१ क्र. २ **आरती संग्रह** पंतमहाराज

बालमुकुंद पंतमहाराज यांनी केलेल्या एकूण ८० आरत्या आहेत. निर्गुण उपासनेकडे नेणाऱ्या आरतीतील भाव प्रभावी वाटतो त्यातील वानगीदाखल दत्ताची आरती :

शुद्ध गगनातटी। चंद्रसूर्य ज्योती।
विश्वरूप दत्ता। ओवाळु आरती।।
दुसऱ्या एका आरतीत–
आद्यानंत आकाशताटी। झळके स्वयं ज्योती।।धृ.।।
नाही अंजन सदा निरंजन। तेल ना वाती।।२।।
झळझळ झळके दत्तरूप। नाही दीस राती।।३।।

११७२ क्र. ३ **पत्रसंग्रह** पंतमहाराज

प्रेमावतारी पंतमहाराज यांनी आपल्या शिष्यांना लिहिलेली पत्रे सुमारे २०० आहेत. यात साधनेबाबतीत मार्गदर्शन केलेले आढळते. बाह्य ढोंग कामाचे नाही. अंतरी रजतमाचा मळ धुऊन टाकून शुद्ध सत्वगुणी थारा द्यावा. हा उपदेश यातून आलेला आहे. ''पतनात त्रायते इति पत्र'' ही पत्राची व्याख्याच सर्व काही कथन करणारी आहे. रचनाकाल १८८५-९८.

११७३ क्र. ४ **गद्यरचना** पंतमहाराज

इ. स. १८७५ ते १८८५ या दहा वर्षांत प्रेमावतारी संत पंतमहाराज यांनी विविध रचना केली. यात प्रामुख्याने अद्वैत तत्त्वज्ञान प्रतिपादन केले आहे. यात विपुल निबंध, टीका, स्फुट लेख व प्रश्नोत्तर अशा स्वरूपाची रचना आहे. यात आपण कोण? देव कोण? जग म्हणजे काय? ते कोणी व कधी निर्माण केले? जगात विषय सत्ता का? मन म्हणजे काय? इंद्रिये स्वतंत्र की परतंत्र? बंध आणि मोक्ष म्हणजे काय? तीर्थयात्रा कराव्यात का? ग्रंथ श्रेष्ठ का गुरू श्रेष्ठ? या व अन्य आध्यात्मिक गोष्टींची चर्चा आहे.

आत्माराम महाराज मठ जहिराबाद

पूर्वीच्या हैद्राबाद राज्याचा हा भाग बिदर जिल्ह्यात होता. पूर्वीचे जहिराबादचे नाव एक्केहळी असे होते. आज आंध्र सीमेत आहे. तेथे आज मराठीचा मागमूस नाही. श्रद्धेने पूजेत सांभाळलेले ग्रंथ एवढेच महत्त्व. ३४ × ४५ सें. आकाराच्या लाकडी पेटीत ते ठेवलेले आहे. यातील प्रारंभीचा मुखवटा या नावाचा भाग वेगळा ठेवलेला आहेत. प्रचंड संग्रहाची वाताहत झाली. मुख्य ग्रंथ पूजेच्या ठिकाणी गंधपुष्पाने पूजेत आहे. या प्रचंड संग्रहात असलेल्या व अधिकृत नोंदीवरून ग्रंथांची नोंद केलेली आहे. काही ग्रंथ धुळे येथे गेलेले आहेत. समर्थ संप्रदायाचा आत्मारामाचा मुख्य ग्रंथ :

११७४ क्र. १ **दासविश्रामधाम** आत्माराम

आ. ३२ ×·२६ सें. अ. १२१ प्र.पा.ओ. २१. कागद चिवट. गडद काळी शाई. काही भाग जीर्ण. प्रचंड ग्रंथ. संपूर्ण सुस्थितीत आहे.

हा समर्थ संप्रदायाचा विश्वकोश मानतात. यात अध्यायाचा निर्देश, समास, मान, संग, अध्याय, खंड, पटल, विसावा, स्तबक, कांड, वर्ग, सोपाने स्कंध, अवधान अशा विविध नावांनी आहे. या रचनेत समर्थ चरित्र, मनाचे श्लोक, दासबोध यातील लांबलचक उतारे, इतर संतांची पदे, दोहरे, सवाया आहेत. ती जवळ जवळ चार हजारावर आहेत. याखेरीज आत्माराम यांची रचना अभंग ७४३ पदे २२९ श्लोक ११७ आरत्या ५ चरित्र भागात या विविध स्फुट रचनेची पेरणी आहे. अनक शिष्य व संत यांची वचने देऊन त्यांची ओळख करून दिलेली आहे. कल्याण स्वामींच्या परंपरेतील हा ग्रंथ आहे. लेखनकाल शके १७२५ ते ३० असून, प्रचंड रचना आहे. ग्रंथाची स्थिती चांगली.

या ग्रंथातील वानगीदाखल एक उतारा : रामदास चरित्रातून

।।एकदा एक सरदारानी। सत्व दासाचे पाहावया लागुनि। पत्नी आपुली नेटकी तरुणी। तिसी युक्तीने बोलीला।।०।। निंदकी नावे सांगू जाता। वारी खुणेने अरण्यहंता। या करिता

वानितो प्रताप कथा। संशय सर्वथा न धरावे।।०।। येकांत ठायी बसतोदास। कल्याण गेला असेल कामास। तू जाऊ नि नाना विलासे। मोहुनि वशकरी वेगे। सहज पुरुषाचे चंचल मन। यद्यपि झोंबता न करी अनुमान। बहुतकाळ तपाचे येईल पुण्य। सेवा हे घडली जाणी जे।।०।। शेवटी ती पुढे होताच अंगचा दाह झाला. पश्चात्ताप झाला. यवनच शिष्य बनला :–

सेवा साधुनि दंपत्य सहित।
महाराजा कृपे जाले भक्त।।
ब्रह्मचारी पूर्ण समर्थ।
होती वृतस्थ ज्या नामे।।०।।

हा मूळ ग्रंथ मठात पूजास्थानी ठेवलेला आहे.

११७५ क्र. २ **आत्मलीला** रंक

पृ. ११५ × २ = २३०. रंक नावाच्या शिष्याने या टोपणनावाने आत्माराम यांचे चरित्र लिहिले आहे. आत्मारामाचे मूळ नाव तिपणा होते. बालपणापासून एकांत व आत्मचिंतनाची आवड. अपचंद ता. आळंदचे रामचंद्रपंत महाराज यांची कृपा लाभली. अपचंद व तडवले मठपती जगन्नाथ हे दोन कल्याणचे शिष्य होते.

११७६ क्र. ३ **श्लोकशतक** केशवस्वामी

आळंद संप्रदायातील कल्याणीचे केशव स्वामी भागानगरकर यांची ही रचना असून, यात एकूण २०२७ श्लोक आहेत. या बाडाचे लेखन ज्येष्ठ शु।।१३ दुंदुभी नाम संवत्सरे शके १६०४ मध्ये झाले. ही त्यांची शेवटची रचना असावी कारण त्यांची समाधी पौष १३ सोमवार शके १६०४ ची आहे.

११७७ क्र. ४ **गळाठा**

विविध रचनेचे सुटे कागद. पृ. १०० + २५०. यात विविध संतांची पदे. प्रश्न पाहणे, औषधी, रसमंजिरी, पंडितराम, शिरसाळकरकृत शिवरात्री, वामनकृत बळीचे आख्यान, मनाचे श्लोक, गोपीगीत, आनंद संप्रदायी कल्याणी मठाच्या शिष्यांची रचना. पाने विस्कळित आणि जीर्ण.

११७८ क्र. ५ **देवतार्चनपद्धती**

आ. २२ × १७ सें. पृ. २२ × २ = ४४ पूजेचे उपचार, विधान. ज्या दिवशी ही नोंद केली तो दिवस क्रोधीनाम संवत्सर माघ शु।। १५ भौमवासर हा काल शके १७०६ चा येतो.

११७९ क्र.६ **बाड**

आ. २० × १८ सें. पृ. ५६ × २ = ११२. कागद जाड. अक्षर बारीक. स्थिती जीर्ण. यात अनेक संतांची रचना. समर्थ, उद्धवचिद्घन, रंगनाथ, केशव, श्रीधर, अमृत, तुकाराम, विष्णुदासनाम, एकनाथ, ज्ञानदेव, मध्वमुनेश्वर, नामदेव, गिरिधर प्रभु, शिवदिन केसरी, जयरामात्मज, दत्तात्मज, त्रिंबक, गोसावीनंदन याची पदपदांतरे. आनंद तनयकृत सीतास्वयंवर, एका अनामिक कवीची वेधक रचना :

जिव्हे ते पहिले तुला दधि मधु म्या पाजिले आदरे। देहांती स्मरसील रामरसने या कारणाचे भरे। ते तू विसरलीस भूल पडली जन्मासि आलो पुनः। आता मी तुज निंब पाजीत असे तू ध्याई नारायणा।।०।।

११८० क्र. ७ **दासबोध**

आ. ३० × २५ सें. त्रु. पृ. २५ × २ = ५० त्या काळातील सुंदर अक्षराची प्रत. चौथ्या दशकाचा भाग एका अणप्पाच्या हातचा अवस्था जीर्ण.

११८१ क्र. ८ **आदिपर्व**

आ. ३० × २१ सें. पृ. २०० × २ = ४००. अक्षर रेखीव. कागद घोटीव. मुक्तेश्वरकृत रचनेचा भाग. आदिपर्व, सभापर्व त्रु. शेवटी लेखनकाल.

हे पुस्तक समाप्ती। पार्थिव नाम संवत्सराचे आतिं। सके सोळासे हे स्तयाऐसी जाणिजेति।।१६८७।। मास तो माघेवदि। प्रतिपदा शनिवासरे।।

११८२ क्र. ९ **बाड**

आ. २५ × २८ सें. पृ. ७८ × २ = १५६. यात समर्थांच्या काही लघुप्रकरणांचे संकलन. बाड वाळवीने खराब. उसवलेले महत्त्वाचे बाड.

११८३ क्र. १० **भावार्थ रामायण** एकनाथ

आ. ३० × २६ सें. पृ. ३३ × २ = ६६ अक्षर मोठे, कागद जाड. त्रु.

भावार्थ रामायणातील सुंदरकांडापैकी ब्रह्मलिखिताचे काही प्रसंग उपलब्ध. नाथकृत रचना.

११८४ क्र. ११ **योगवाशिष्ठसार** रंगनाथ

आ. २७ × २२ सें. पृ. ४४२. त्रु. यात केवळ ६ ते १० प्रकरणे आहेत. या पाच प्रकरणांत ओवी संख्या ३५२५ भरते, पण हा ग्रंथ कोणत्या रंगनाथाचा आहे, याचा बोध होत नाही.

११८५ क्र. १२ **योगवाशिष्ठसार** मोगरेकर

आ. २७ × २१ सें. पृ. १११ × २ = २२२ त्रु. या प्रतीत ६ ते ९ प्रकरणे आहेत. ही प्रत रंगनाथ मोगरेकर यांची आहे.

११८६ क्र. १३ **योगवाशिष्ठसार** शिवराम

आ. २० × २७ सें. पृ. ७ × २ = १४. अक्षर बारीक. कागद जीर्ण. शिवरामस्वामीकृत ही टीका असून, यात केवळ ३० श्लोकच उपलब्ध आहेत. केवळ प्रथमचे प्रकरण आहे. त्यातील शेवटचा श्लोक :

वशिष्ठ सारार्थ धरुनि ऐसा।
श्लोका प्रति श्लोकचि देश भाषा।।
तेथील वैराग्य निरूपणाते।
दाऊनि दिल्हे शिवरामनाथे।।

११८७ क्र. १४ **गीता प्रभाकर** जीवनमुक्त

आ. २८ × २५ सें. पृ. २६८ × २ = ५३६ जीर्ण झालेली प्रत. जीवनमुक्त कवीची ही गीतेतून गीता प्रभाकर तथा जीवनमुक्ती नावाची टीका आहे. मूळ संस्कृतास समश्लोकी आहे. जहिराबादजवळ अनंत्वार नावाच्या गावी राहणारा हा कवी जीवनमुक्त असून, त्याच्या भाष्यातील आरंभीचा श्लोक :

अशी रचना पद्धती शिवराम स्वामींची पण आहे.

मोहार्णवि जीव बुडूनि गेले।
शोकानळे भस्म जळोनि जाले।।
त्या लागुनि अमृतरूप गीता।
वंदिन मी तारक दिव्य माता।।०।।

मूळ प्रत्येक श्लोकास मराठी श्लोक व एक पद आहे. वरील श्लोकास खालील मराठी पदभाष्य :

सुखदायक माता गीता।।
वंदित सुर सरिता गीता।।धृ.।।
कृष्ण मुखाब्जा पासुनी जाली।।
त्रैलोक्याते व्यापुनि ठेली।।
पतित पावन हे चिद् गंगा।।
स्मरणे वारितसे भवसंगा।।१।।
शोकमोहो अनला ते शमवी।।
जीवनमुक्त पदी जन ठेवी।।२।।

रचनेच्या शेवटी :

श्लोक :

श्रीकृष्ण अर्जुन जेथ आहे।
धनुर्धर अर्जुन जेथ पाहे।।
तेथेचि लक्ष्मि विजयाभिवृद्धी।
मजबुद्धिचा निश्चय हा त्रिशुद्धी।।०।।

पदभाष्य :

महाराजा सांगतो तुजपाशी।
माझी मती हे जाण निश्चयेसी।।धृ.।।
योगेश्वरकृष्ण जेथे असे।।
धनुर्धरि हा पार्थ जेथे बसे।।१।।
राजलक्ष्मी तेथेचि विजय सिद्धी।।
करुराया तेथेचि अभिवृद्धी।।२।।
स्वये मोक्ष हे तयाचिये हाती।
जीवनमुक्त हे वर्म ओळखती।।३।।

११८८ क्र. **जीवनमुक्ती वाक्य** जीवनमुक्त

आ. २७ × १० सें. पृ. ८२ × २ = १६४. कागद जीर्ण. वेदांत प्रक्रियेचा हा ग्रंथ गद्यरूपात आहे. क्षराक्षर, बद्ध, मोक्ष, शब्द त्रिपात, ज्ञान, भक्ती, वैराग्य, वर्ण, सत्पावस्या, साधक, संसार, निवृत्ती, अखंड वाक्यार्थ, द्वैताद्वैतातीत व्यतिरेक, निराभिमानदशा, असे विविध विषय यात आले आहेत. ग्रंथकाराचा नामोल्लेख नाही. बहुतेक जीवनमुक्त कवीची गद्य रचना आहे. यातील शेवटचा भाग उदाहरणाकरिता :

कोणी यक जीव गीता पारायण करतो। कोणी विष्णुसहस्रनाम पारायण करतो। कोण्ही मंत्र जप करतो। कोण्ही भगव चिरगूट करतो। कोणी जटाधारी संन्यासी होतो। कोण्ही काळी चिरगूट करून मानभाव होतो। कोण्ही लिंग बांधून जंगम होतो। कोण्ही बैरागी होतो। कोणी जोगी होतो। पृथ्वीवर नानाविध मत्त आहेत। कोण्ही लोक संसार करी आहेत। कोणी लोक मिरासीवंत आहेत। कोणी कुणबावा करीत आहेत। कोणी सिफाईगिरी करीत आहेत। ऐसे सकळही जग आपुल्या आपुल्या अभिमान करिताहेत। सकळही जग ब्रह्मस्वरूप आहे। ज्यास आपल स्वरूप ब्रह्म आहे म्हणून कळत नाही। ज्यास भगवत्कृपा होती त्यास ब्रह्मात्मैक ज्ञान होईल। अलम ज्या ब्रह्मात्मैक ज्ञान झाल ते सकळ जग ब्रह्मच पाहात आहेत। हा निश्चय। निराभिमानदशा प्रकर्ण समाप्त।।छ।।

११८९ क्र. १६ **चांगदेव पासष्टी** वीरेश्वर

आ. २७ × १३ सें. पृ. ४७ × २ = ९४. अक्षर साधारण. एका वीरेश्वर कवीची ही गद्यात्मक रचना आहे. ज्ञानेश्वरकृत लेखन ग्रंथ म्हणून ही टीका केली.

आरंभी :

परब्रह्म परंधाम सच्चिदानंद विग्रहम् ।।
ज्ञानेश्वर इतिख्यात प्रणमामि गुरु परम् ।।१।।
असे नमन करून रचनेस आरंभ.

श्री ज्ञानेश्वर योगिवर्य चांगदेव योगेश्वरास पत्रलेखन मिसे वोवी प्रबंध निर्मूनि समस्त साधक जनासि अनायसे ब्रह्मात्मैक्य बोध व्हावया योग, वेदांत, सिद्धांत तत्त्वानुभव सिद्धांत प्रगटिते जाले। त्या वोवियाचा अर्थ श्रीगुरू ज्ञानेश्वर ब्रह्मविद्वर्य प्रसादे यथामती सांगिजेतो।

११९० क्र. १७ **क्रमसार** आत्माराम

आ. १७ × १३ सें. पृ. ८९ × २ = १७८. अक्षर मोठे. कागद– जाड. जीर्ण. ओ. ५४८.

आत्माराम कवीची समर्थ संप्रदायावर महत्त्वाची रचना आहे.

११९१ क्र. १८ **बाड**

उसवलेले बाड. आ. २८ × १७ सें. पृ. ८९ × २ = ७८ अक्षर साधारण. कागद पातळ. यात खड्गमाला, ब्रह्माडपुराण, ललिताहृदय, कवच, इ. रचना-छोटी छोटी प्रकरणे. लेखनकाल विकृतीनाम संवत्छर शके १७५२

११९२ क्र. १९ **पंचदशी** रामकृष्ण

आ. २० × १७ सें. पृ. ११५ + १३ = १२८. एका रामकृष्ण कवीची पंचदशीवर गद्यात्मक टीका आहे. त्रु. केवळ १ ते ५ प्रकरणे उपलब्ध आहेत. शेवटची दोन पाने गहाळ.

प्रथम प्रकरणात शेवटी : नारायणेन लिखितम्। हेविळबि संवत्छर मार्गशीर्ष शुत्ध पौर्णिमा... नारायण लेखक चांदाऊरकर

शेवटच्या प्रकरणात : नारायणेन लिखितम हेविळबि संवत्छर माघ शुद्ध पंचमी सोमवारी.

हा लेखनकाल शक १६९९ चा ठरतो.

११९३ क्र. २० **पंचदशी** महिपती

आ. २५ × १८ से. पृ. २८६ × २ = ५७२.

ही गद्यात्मक टीका आहे. यात चित्रदीप, तृप्तीदीप, कूटस्थदीप, ध्यानदीप, ताटकदीप, तत्त्वविवेक, द्वैतविवेक, भूतविवेक, पंचक्रोशविवेक, महावाक्यविवेक, ब्रह्मानंद, योगानंद, आत्मानंद, विद्यानंद, विषयानंद, अशी प्रकरणे आहेत. यातील १३ वे प्रकरण गहाळ.

चौथ्या प्रकरणात : ।।स्वहस्त महिपती लिखितं।।

असा उल्लेख. अनेक स्थानी श्रीगुरू शिवरामार्पणमस्तु असे म्हटले आहे. यावरून हा रचनाकार आळंद तालुक्यातील समर्थ संप्रदायी अपचंद मठाचा शिष्य असावा, असे वाटते.

११९४ क्र. २१ **बोधचंद्रिका** ब्रह्मानंद

पृ. ३८ × २ = ७६ त्रु. ही गद्य रचना आहे. ब्रह्मानंद यतींनी लिहिलेली आहे. याच ग्रंथास 'पदपदार्थबोधिनी' असेही म्हटलेले आहे. पोथीची दुर्दशा झालेली आहे. लेखनकाल नाही.

११९५ क्र. २२ **अनुभवामृत** वीरेश्वर

पृ. ४२२ × २ = ८४४. अ. १०. ज्ञानेश्वरकृत अनुभवामृताचे हे गद्य व्याख्यान आहे. वीरेश्वर कवीचे लेखन.

यात शेवटचा भाग : इतिश्री नृसिंह दिक्षित नंदन विरेश्वर वल्लभकृते श्री अनुभवामृत व्याख्याने दशम प्रकरण संपूर्णम।।१०।। शालिवाहन शके १७१७ आनंदनाम संवत्सरी वैशाख शुद्ध द्वितीया गुरुवारी असा लेखनकाल आहे. शेवटी आत्मार्पण म्हटले आहे, त्यावरून ती आत्माराम महाराजांना अर्पण करीत आहे असा भाव प्रकट केल्याने अपचंद समर्थ मठाचा शिष्य असावा, असे वाटते.

११९६ क्र. २३ **अनुभवामृत** वीरेश्वर

वरील पोथीची दुसरी प्रत. यात पाने विस्कळित आहेत. १-७-८-१० प्रकरणाची अनुक्रमे १८, ५२, ५, १० पाने आहेत. पोथीची दुर्दशा झालेली आहे.

एका ठिकाणी : श्री गुरू विरेश्वराय बाकृणे नमः।। इदं पुस्तकं शहागडकर चिंतामणी भट्टस्य पुत्र बापूभट्टस्य शांडिल्य गोत्रोद्भव स्य।। एवढीनोंद आढळते.

११९७ क्र. २४ **विवेकसिंधू** मुकुंदराज

त्रु. पृ. १४७ × २ = २९४. भिजून दुर्दशा झालेली पोथी. पाने विस्कळित. लेखनकाल खालीलप्रमाणे :

शके १६३५ संवत्छर नंदननामे फालगुननामे असित पक्षे। त्रितियाया इंदुवासरे तदिने चंडर ग्रामे। रामेश्वर संनिधौ

परोपकारार्थ लिखितमिदं हस्ताक्षर नागेश.

११९८ क्र. २५ **विवेकसिंधू** मुकुंदराज

त्रु. पृ. ११०. केवळ १६, १७, १८ ही तीन प्रकरणे. लेखनकाल खालीलप्रमाणे :

प्रवर्तमाने क्षयनाम संवत्सर कार्तिक शु।। पंचमी शनवार तिसरे प्रहरी शके १७२८.

शेवटी : इदं पुस्तक कालिगी गोविंद भट्टस्य सुत निलकंठेन लिखित नांन्यथा।।छ।। काळगी गाव गुलबर्गा जिल्ह्यात चितापूर तालुक्यात शिवक्षेत्र म्हणून पुराणकालापासून प्रसिद्ध आहे.

११९९ क्र. २६ **विवेकसिंधू परिभाषा**

त्रु. पृ. १७ × २ = ३४.

मराठी वाचकांना मार्गदर्शक असे लेखन. दुर्दैवाने थोडीच पाने सुरक्षित राहिली आहेत. लेखक अज्ञात.

१२०० क्र. २७ **संदेहहरण** रंक

पृ. ३०० × २ = ६०० पाने. विस्कळित. क्रम लावणे कष्टाचे. वेदांतपर रचना, कवी रंक यांची आहे.

१२०१ क्र. २८ **बाड** वेणाबाई

त्रु. केवळ ६ पाने उपलब्ध. वेणाबाईकृत कौल, यावर केवळ २६ श्लोक उपलब्ध आहेत. काल नाही.

१२०२ क्र. २९ **हस्तामलक**

त्रु. पृ. ४८ × २ = ९६ एकनाथ महाराजकृत्त ग्रंथाचा त्रुटित भाग. प्रथमची व शेवटची पाने गहाळ. शेवटी 'एकनाथार्पणमस्तु' असे प्रतलेखक लिहितो.

१२०३ क्र. ३० **हस्तामलक** एकनाथ

त्रु. पृ. ८३ ओ. ६७२ एकनाथकृत रचनेचा भाग. **ग्रंथारंभी :**

श्रीगुरू सदजानंदयेनमः।। आणि शेवटी पण सहजानंदार्पणमस्तु।। असे आहे. आनंद संप्रदायी कल्याणी मठाच्या शिष्याने केलेली प्रत. प्रतलेखक व काल अज्ञात.

१२०४ क्र. ३१ **ब्रह्मोत्तर खंड** रामानंद

पृ. १२५ × २ = २५० अ. २२ सुस्थितीत. शिवामहिमान, शिवआराधना, शिव चरित्रपर आख्यान. शिवपूजेतील एका रामानंद गुरूंची ही रचना, आनंद संप्रदाय परंपरेतील आढळते.

१२०५ क्र. ३२ **रामायण**

त्रु.पु. ९९ × २ = १९८ सुंदरकांड पूर्ण भाग आहे.

शेवटी : इदं पुस्तक भावनाम संवत्सर श्रावण वद्य नंदा तिथी ११ प्रथम यामे लेखन समाप्तोयं।। श्रीराम समर्थ। जयजयराम।। शके १७३६ सन्न १२२३ फसली.

१२०६ क्र. ३३ **निःसंदेह दिवाकर** शिवराम स्वामी

त्रु. ओ. ९०. पृ. १९ × २ = ८ नाथांचे पणतू शिवराम स्वामी यांच्या रचनेचा त्रुटित भाग.

१२०७ क्र. ३४ **निःसंदेह दिनाकर** शिवराम

पृ. ९ × २ = १८ त्रु. वरील पोथीचीच प्रत. नावात फरक. शिवराम स्वामीकृत रचना.

१२०८ क्र. ३५ **प्रश्नोत्तरमाला** शुक्राचार्य

त्रु. पृ. २ × २ = ४. अक्षर बारीक. कागद अत्यंत जीर्ण. शुक्राचार्य विरचित प्रश्नोत्तरमाला. केवळ ३२ संस्कृत श्लोक व काही मराठी भाग.

१२०९ क्र. ३६ **अक्षरमालिका** आत्माराम

पृ. २२ × २ = ४४. ओ. ८०. श्लोक १०. अष्टाक्षरी ९. पद १. अभंग १ अशी विविध रचना. वेदांतर विवेचन. ग्रंथकार आत्माराम.

१२१० क्र. ३७ **आत्महित** आत्माराम

पृ. १८ × २ = ३६ त्रु. ही पण आत्मारामकृत रचना आहे. ओवी संख्या १५० भरते. वेदांतपर विषय आढळतो.

१२११ क्र. ३८ **बोधामृत** शिवराम

पृ. ९ × २ = १८ त्रु. सहावे पान गहाळ. ओ. ५३. शिवराम स्वामींची ही वेदांतपर रचना.

रचनेची वानगी :

हिरोनिया माइक हा पसारा।।
दिल्हा निजानंद पदीच थारा।।

वारा न लगे मज या भवाचा॥
या लागी मी दास तया गुरूचा॥४४॥
भजन निजगुरूचे सर्वभूती करावे।
गुरुचरण मुख निजबोधे चित्त आधि भरावे।
गुरुवर शिवराम बोलिले आचरावे॥५२॥

१२१२ क्र. ३९ **बाड**

त्रु.पृ. १२ × २ = २४. जीर्ण कागद

यात : ''ऐक बा ज्ञानेश्वरा।'' असा ज्ञानेश्वरांना संबोधून निवृत्ती महाराजांनी केलेला समाधिबोध भाग आहे.

ओव्या ३० उपलब्ध. यातच शेवटी चत्वार देह पंचीकरण नावाची एका अनामिक कवीची रचना.

१२१३ क्र. ४० **अन्वयव्यतिरेक** सीताराम बाबा

त्रु. पृ. ३० × २ = ६० + २३ × २ = ४६. कोकण प्रांतातील एका सीताराम बाबा शिष्याची ही प्रत आहे. तो समर्थ संप्रदायी होता.

शेवटचा भाग : अन्वयव्यतिरेक ग्रंथ। समर्थांचा शिष्य सीताराम बाबा कृत समास अक्रा॥११॥ ओवीसंख्या ॥३५८॥

१२१४ क्र. ४१ **स्थालीपाक** रामानंद

त्रु.पृ. १० × २ = २०. एका रामानंद सत्पुरुषाची रचना, पदे, श्लोक माध्यमातून विषय मांडलेला आहे. पाने पुसट व जीर्ण.

१२१५ क्र. ४२ **मुकुंदचरित्र** रामानंद

त्रु.पृ. ५ × २ = १० ही रचना पण एका रामानंदाची आहे. श्लोकबद्ध रचना आहे.

१२१६ क्र. ४३ **राधामाधव विलास** रामानंद

रामानंद कवींची आहे. पोथी भिजून खराब झाली आहे.

१२१७ क्र. ४४ **बाड**

विस्कटलेली पाने. पृ. ४०० × २ = ८००. भागवत, भारत, रामायण या पुराणातील विविध प्रकरणे श्लोकबद्ध करून केलेली रचना. रामानंद यतींचीच ही रचना आहे. दोन ठिकाणी प्रतलेखकाचा उल्लेख (१) सदाशिवनगर वेंकटेश (२) सदाशिव वेंकटेश हा प्रतलेखक एक्केहाळी (सांप्रतचे जहिराबाद) परिसरातील राहणारा आहे. लेखनकाल नाही.

१२१८ क्र. ४५ **कार्तिकमाहात्म्य** रामानंद

पृ. ५३ × २ = १०६. ही ओवीबद्ध रचना रामानंद कवींचीच आहे.

१२१९ क्र. ४६ **गुरुगीता** विठो

पृ. ३७ × १ = ७४. मूळ संस्कृत श्लोक व मराठी भाष्य अशी रचना. कल्याणी येथील विठो कवीची ही रचना. तो आपली परंपरा निवृत्ती-ज्ञानदेव-सोपान-नरहरी-माधव अशी देतो. श्लोक मूळ संस्कृतातून १३१ व टीकाभाष्य ७३४ श्लोक.

१२२० क्र. ४७ **पंचीकरण** रामदास

पृ. १९ × २ = ३८ समर्थ रामदासकृत रचनेचा भाग. ग्रंथराजातील १७-२-१५ मधील ओवीचा आधारास घेतलेला आहे. शेवटी रामदासकृत असा उल्लेख.

१२२१ क्र. ४८ **बोधवासष्टी** शिवराम

पृ. ६ × २ = १२. त्रु. शिवराम स्वामी कल्याणीकर यांनी शिष्य राजमणी यास प्रबोधण्याकरिता केलेली चांगदेव पासष्टी धर्तीवरची रचना. प्रतलेखककाल अज्ञात.

१२२२ क्र. ४९ **बोधपासष्टी** शिवराम

पृ. ९ × २ = १८. वरील ग्रंथाची प्रत. कागद जीर्ण.

१२२३ **पूर्वारंभ** रामदास

त्रु. पृ. ६ × २ = १२ समर्थ रामदासकृत असा उल्लेख.

१२२४ क्र. ५० **स्वरूपनिर्णय** अमृत

त्रु. पृ. १२ × २ = २४. ओ. ९५. अमृत कवीकृत वेदांतपर रचना. त्याने आपली गुरुपरंपरा शेवटी विस्ताराने दिली.

१२२५ क्र. ५१ **स्वरूपनिर्णय** अमृत

पृ. १२ × २ = २४. पृ. ७ व १७ गहाळ. वरील ग्रंथाचीच प्रत.

१२२६ ग्रं. क्र. ५२ **एकवीस समासी** रामदास

पृ. ९८ × २ = १९६. मुखपृष्ठावर 'श्रीरामदासकृत यक्केवीस समासी नाम जुना दासबोध' असे लिहिलेले आहे व मुखपृष्ठावरच ओवीसंख्या १२४० दिली आहे. शेवटी पण ग्रंथनाम असेच समाप्तीचे वेळेस दिलेले आहे.

१२२७ क्र. ५३ **पंचीकरणप्रमेय** अज्ञानसिद्ध

त्रु. पृ. १० × २ = २०. अज्ञानसिद्ध नागेशकृत पंचीकरण प्रमेयाचा त्रुटीत भाग आहे. शेवटी प्रतीचा काल सन १०७४ फसली सन दिला आहे. ३३४ वर्षांपूर्वीचीही पत्र आहे.

१२२८ क्र. ५४ **अंतर्भाव** रामदास

त्रु. पृ. ९ × २ = १८. समर्थकृत अंतर्भाव असा उल्लेख आढळतो. समर्थांच्या छोट्या रचनेचाच हा भाग आहे.

१२२९ क्र. ५५ **अंतर्भाव** रामदास

पृ. १२ × २ = २४. त्रु. वरील ग्रंथाची प्रत. अक्षर मोठे.

१२३० क्र. ५६ **अंतर्भाव** रामदास

पृ. ८ × २ = १६. त्रुटित प्रत.

१२३१ क्र. ५७ **पूर्वारंभ** रामदास

पृ. ५ × २ = १० रचनेचा त्रुटित भाग. अक्षर बारीक पण रेखीव.

१२३२ क्र. ५८ **अपरोक्षानुभूती** शिवराम

पृ. ३० × २ = ६०. शिवरामस्वामींच्या भाष्याची प्रत. लेखनकाल निर्देश १७३०. प्रतलेखक अज्ञात.

१२३३ क्र. ५९ **अपराधस्तोत्र** शिवराम

पृ. ६ × २ = १२. त्रु. शिवरामस्वामी कल्याणीकर यांची टीका. समश्लोकी. प्रत शके १७३२.

१२३४ क्र. ६० **परमामृत** मुकुंदराज

पृ. २८ × २ = ५६. मुकुंदराजकृत रचनेची प्रत. प्रतलेखव काल अज्ञात.

१२३५ क्र. ६१ **निर्गुणध्यान** रामदास

पृ. १३ × २ = २६ त्रुटित. समर्थ रामदासकृत एक प्रकरण प्रतलेखक व कालनिर्देश नाही.

१२३६ क्र. ६२ **लिखित** ज्ञानेश्वर

पृ. ६ × २ = १२. ज्ञानेश्वरकृत या रचनेसच एका ठिकाणी पंचषष्टी, असे नाव दिलेले आहे.

१२३७ क्र. ६३ **लेखणी** ज्ञानेश्वर

पृ. ३ × २ + ५ × २ = १६. ज्ञानेश्वरकृत कल्याणपत्रिका. लेखणी. यात एकनाथांचा उल्लेख. त्यामुळे ज्ञानेश्वर रचनेबद्दल शंका येणे रास्त आहे.

१२३८ क्र. ६४ **पंचमान** रामदास

पृ. १० × २ = २०. समर्थकृत रचनेचा त्रुटित भाग.

१२३९ क्र. ६५ **पंचीकरण योग** रामदास

पृ. ७ × २ = १४. समर्थकृत रचनेतील काही भाग.

१२४० क्र. ६६ **बाड** रामदास

पृ. ९ × २ = १८. या छोट्या उपलब्ध बाडात, अक्षर पद संज्ञा, घाटी, डफगाणे इ. महत्वाची समर्थ रामदासांची स्फुट रचना.

१२४१ क्र. ६७ **आत्माराम** रामदास

पृ. १९ × २ = ३८. समर्थकृत रचनेतील काही भाग.

१२४२ क्र. ६८ **कृतनिर्वाह** रामीरामदास

पृ. २१ × २ = ४२. ओ. २१३. हा ग्रंथ श्रीरामीरामदास यांचा आहे असा उल्लेख येतो. हा श्रेष्ठांचा वा समर्थांचा याबद्दल संभ्रम निर्माण होतो.

१२४३ क्र. ६९ **एकादशस्कंध** शिवराम

पृ. ३० × २ = ६०. ओ. ६००. पूर्णानंदानुसार शिवरामस्वामी कल्याणीकर यांची भागवताच्या अकराव्या स्कंधावरची समश्लोकी टीका. त्रुटित भाग.

१२४४ क्र. ७० **शुकाष्टक** ज्ञानेश्वर

पृ. ५ × २ = १०. त्रु. मूळ ९ श्लोक व भाष्य श्लोक ३९. एकूण ४८ श्लोक. निवृत्तीप्रसादे ज्ञानदेव विरचित असा उल्लेख आहे. काल दिला नाही. प्रतलेखक अज्ञात.

१२४५ क्र. ७१ **विष्णुसहस्रनाम**

पृ. २९ × २ = ३८. अक्षर खूप मोठे. त्रु. शेवटी. 'हे पुस्तक रामचंद्र भट्ट बाबा उपाध्ये तळनकर यांचे असे' अशी नोंद.

१२४६ क्र. ७२ **उपदेशरहस्य** निवृत्ती

पृ. ९१ × २ = १८२. त्यात पान १-२ गहाळ. निवृत्तिनाथकृत रचना. आजे गुरू रंगनाथ याच्या ग्रंथाची भाषा यात आहे.

१२४७ क्र. ७३ **कागदाचे वेटाळे**

यात मध्वमुनी, गोसावीनंदन, किंकर, कृष्णानंद, बाळ, नरहरी, दासतुका, जनपंडित, शांतचैतन्य, मुक्तेश्वर, एकनाथ, ज्ञानेश्वर, विप्र रामदास, महिपती, अनाथ, उद्धवसुत, चिदानंद. दास शिवाचा, उद्धवचिद्घन, आनंदतनय, आदिनारायण या विविध संतकवींची रचना आहे. पदे, आरत्या, इ. सामग्री. अपूर्व बाड.

१२४८ क्र. ७४ **बाड** शिवदिनकेसरी

शिवदिन केसरी कृत 'परमार्थाचा अद्वय ब्रह्मानंद खरा' हे समर्थांवरील पद, इ. स्फुट रचना.

१२४९ क्र. ७५ **रुक्मिणी स्वयंवर** एकनाथ

पृ. १५० × २ = ३०० संत एकनाथकृत रचनेचा विस्कळित भाग. प्रतलेखक व काल अज्ञात.

१२५० क्र. ७६ **एकनाथी भागवत** एकनाथ

पृ. १५२ × २ = ३०४. पाने विस्कळित. क्रमवार अध्याय नाहीत.

१२५१ क्र. ७७ **तत्त्वमसि** ज्ञानेश्वर

पृ. २२ × २ = ४४. ज्ञानेश्वरकृत रचना. शेवटी वेगळ्या अक्षरात :

।।शके १७२२ रौद्रनाम संवत्सरे श्रावण शुक्ल चतुर्दशी भानुवासरे तदिनी।।

तुकोबात्मज भीवरावेन लिखिते।।

१२५२ क्र. ७८ **पदबोधिनी**

पृ. ९१ × २ = १८२. त्रु. गीतेवरील टीका. केवळ अध्याय ८-१२-१४ उपलब्ध.

शेवटी :

।।श्रावण शुत्ध प्रतिपदा चंदवारी समाप्त।।
वेंकोबा कासीनाथ सदाशिव पेठ वस्ति।।
मोकांबे पर्गणे कल्पगुरु।।
आणि १२ व्या अध्यायाच्या शेवटी :
सिद्धार्थीनाम संवत्सर कार्तिक शुत्ध दशमी. हा शक १६०१ चा येतो.

१२५३ क्र. ७९ **अष्टादशजाती उत्पत्ती**

त्रु. पृ. २ × २ = ४ जीर्ण कागद. संदर्भ लागत नाही.

१२५४ क्र. ८० **शुद्ध ब्रह्मज्ञान धडा**

पृ. ४ × २ = ८. त्रुटित.

यात शेवटी :

ऐशा ओविया पंचवीस।।
शुद्ध ब्रह्म ज्ञानाचा रस।।
निवृत्तिनाथ गुरुदास।।
समरसे परब्रह्मी।।२५।।

१२५५ क्र. ८१ **पंचीकरण**

पृ. ११ × २ = २२. त्रु. अक्षर साधारण. प्रतलेखक व काल अज्ञात.

बिदर परिसरातील रचना
समर्थ मठ, निलंगा (लातूर)

१२५६ क्र. १ **बाड**

पृ. २५० × २ = ५००. यात प्रथमची व शेवटची पाने गहाळ.

या बाडात वामनकृत आदिपर्व, सभापर्व, प्रसंग, द्रौपदी **स्वयंवर**, कचो पारायात, कणिकनीति, शकुंतलाख्यान; तसेच **खालील** रचना– श्लोक संख्येसह येणे प्रमाणे : वामनकृत **रामजन्म** (५०) सीता स्वयंवर (११४) लोपामुद्रा (१२) **भरत भाव** (१२) एकनाथकृत रामजन्म (५६) अनंतकृत **लवकुशाख्यान** (१७३) कृष्णदास मुद्‌गलकृत बिभीषण भेट **(१७९)** भीमरवेळ (ओ. ४२) राम छळणार्थ पार्वती गेली **(ओ. ३३)** समर्थकृत सुंदरकांड (ओ. १०१) ब्राह्मणाचे **आख्यान** (ओ. ३२) चाक्षुसी विद्या (ओ. ४२) मध्वमुनेश्वरकृत **पार्वती स्वयंवर** (प्रकरण) वेणाबाईकृत रामगूहक संवाद (श्लो. **४४) या** रचनेत समास १ ते ५ पुढे संक्षेप विवेचन एकूण ओव्या ६२०.

या बाडाचे लेखन ।।शके १६६२ रौद्रनाम संवत्सरे।।
फालगुण मास कृष्णपक्षे इंदुवासरे।।
एक प्रचंड संकलाचे महत्त्वाचे बाड.

१२५७ क्र. २ **बाड**

पृ. २० × २ = ४०. प्रथमची व शेवटची पाने झडलेली. यात **समर्थ** रामदास, दास मुद्‌गल, सूरदास, विठ्ठलनाथ, बाळकृष्ण, काशिनाथपंत, अमृत या संतकवींची विपुल पदे. उद्योगपर्व काही भाग, आर्या, जगदेवकृत अष्टपदी.

१२५८ क्र. ३ **बाड**

उसवलेल्या बाडाची पाने. १२ ते ९० = १९९. प्रथमच्या ११ पानांत संस्कृत सुभाषिते, श्लोक, विठ्ठलकृत बिल्हण चरित्र, बाडाचा काल शके १७०५ दिला आहे. बाडाचा लेखक बाळाजी खटाव.

यात पुरंदरदासाची कन्नड पदे. शेवटी अवधूतात्मजकृत राधाकृष्णावर रचना :

हरिविना किमपि भावेना धीरचि।
धरवेना काय करू साजणी।।धृ.।।
अति गुरतर जालि। मजला नगमे रजनी।।धृ.।।

या बाडात शेवटच्या आठ पानांत विविध अशी कानडी पदे, देवनागरी लिपीत आहेत.

१२५९ क्र. ४ **बाड**

पृ. ५५ × २ = ११०. प्रथमच्या ६ पानास क्रमांक नाहीत. यात कबीर, समर्थ, त्रिमलसुत, मालो, हरिकवी, तुका, रंगनाथ, गंगाजेकोनेरे, एका अनामिकाचे कूटात्मकपद, सज्जनरंजन, अनंतसुत, जीवनमुक्त, सूरदास, शंकरजयराम, मीरा, अमृत, तानसेन, यांची पदे. यात त्रिमससुताची बरीच रचना आहे. वेणाबाईकृत कौल (श्लो. २६) प्रबोधसुधाकर शिवरामस्वामीकृत (११ प्रकरण पूर्ण) दशावतारावर १० आर्या, मेरुकृत परंधाम चिद्रूप (श्लो. ११) निरनिराळ्या रागांची पदे (पृ. ४२ ते ५५) एका ठिकाणी नोंद ।।श्री हनुमंत स्वामींचा पूर्ण दिवस फाल्गुन शुक्ल समाप्ती बुधवार समाप्त।।

१२६० क्र. ५ **बाड**

पृ. ४० × २ = ८०. या बाडात मोरोपंतकृत आर्य भारतातील काही भाग. आर्या. सुदाम चरित्र, केकावलीचा भाग. शेवटी पुरंदरदासकृत कानडी पदे.

१२६१ क्र. ६ **बाड**

पृ. १०८ × २ = ११६. बाडाची पहिली व शेवटची पाने नाहीत. या संकलनात श्रीसमर्थ, जयवंत, पुरंदर, विठ्ठल, श्रीधर, मध्वमुनेश्वर, गोविंद, बाळकृष्ण, नामदेव, कल्याणस्वामी, उद्धव, पांडुरंग, शिवरामपूर्णानंद, कबीर, केशव, एकनाथ, तुकाराम, गुसाईनंदन, मेघशाम, निंबराज, पंडित किंवा वामन पंडित, बहिरा, जनमैत्र नागा, नागेशात्मज विठ्ठल, जगजीवन कृष्णदास इ. कवींची पदपदांतरे.

विशेषतः जयवंताची खूप रचना आहे. त्यात काही कानडी रचना. जयवंत असे समर्थांचेही नाव होते. हा त्यांचा कुणी शिष्य असावा. हा भाग संशोधनदृष्ट्या तपासावा लागेल.

जयवंत रचनेची वानगी :

करी आटण ऐकोनिपट्टण।
आलोमी श्रीरंग धामा।
भावती कावेरी अघ वारी।।
स्नाने तारी बहु महिमा।।
किती कालवे पाट जाती।।
नाना बिजे बहु पिकती।।
जन जयवंता भक्ति मुक्ता।।०।।

आणखीन एका पदात :

देवभक्त शोधिता मूळ तंतरे।
ठाई पडे विचारे तो अनंत रे।।
कल्पनेसी होत से अंतवंत रे।।०।।
संतसंगे निवाले जयवंत रे।।०।।

बाळकृष्ण कवीकृत सीताविलाप, समर्थकृत षडरिपू प्रकरण, जयदेवकृत अष्टपदी अशी बरीच रचना यात आहे.

१२६२ क्र. ७ **बाड**

पृ. १२ × २ = २४. जीर्ण कागद. नामयाची दासी, बाळात्मज, जयराम जयसुत अंकित विठ्ठल कवी, सदानंद तनय, यांची स्फुट रचना. मयुर पंडितकृत वशिष्ठाख्यान (श्लो. २३)

शेवटी : ।।इदं पुस्तक व्यंकटराव बळवंतराव कुलकर्णी मौजे पळसी परगणे बरदापूर।। अशी नोंद.

१२६३ क्र. ८ **बाड**

पृ. १८८ × २ = ३७६. यातील ६ पाने फाडलेली आहेत. या संकलनात मुद्गलकृत आर्येवर शिवराम स्वामींचे मराठी भाष्य. आर्या ३६ ते १११ उपलब्ध. लेखनकाल दुर्मुख नाम संवत्सर वैशाख शु।। अष्टमी

भृगुवासरे प्रथम प्रहरी समाप्त शके १६९८।।

संपादनात आनंदनंदनकृत सुदामचरित्र (श्लो. २५) ताटिका वध (३२) चूर्णिका (४) यज्ञरक्षण (१७) माधवकृत गजगौरी (४८) माधवानंद रचित अनसूया चरित्र (३४) सदाशिवकृत भस्मासुरवध (४१) हनुमंत चरित्र आनंदस्वामीकृत (१८) स्वप्न मंदोदरी (१२) मुक्तेश्वरकृत सभापर्व वनपर्व, थालीपाल, उत्तरगोग्रहण (३०) त्रिमलनंदनकृत रागमालिका (३०) श्रीधरकृत सेतुबंध (५३) एकनाथकृत रामायण भाग, गोविंद चिंतामणीकृत सुलोचना गहिवर (७८) वामनकृत भामाविलास (२३) सखाराम सुतकृत रुक्मिणी स्वयंवर मयुर पंडितकृत मुरली, शुकरंभा, संवाद, ब्राह्मणतेज, शुकजन्म, द्रौपदी स्वयंवर, दीर्धतमा जन्मकथा, शिबी आख्यान, खंडेराय व नलोपाख्यान अशी विपुल रचना संकलन केलेले हे प्रचंड बाड आहे.

१२६४ क्र. ९ **बाड**

पृ. ३५ × २ = ७०. सन १२६४ ते १२६८ असा काल देऊन शके १७७६ ते ८० चा काल दर्शवून या चार वर्षांत टिपलेला जमाखर्च या बाडात आहे. अधुनमधून औषधी माहिती व उपचार याचे विवेचन, सुभाषिते आणि सन १२५९ फसलीच्या एका जन्मतारखेची नोंद.

१२६५ क्र. १० **बाड**

पृ. ३१ × २ = ६२. या बाडात पुरंदर विठ्ठलाची कानडी पदे. गिरीधरसुत कबीर, सूरदार, तुकाराम, वामन, दासवीरा, अनंत, अमृत, मध्वमुनेश्वर, आनंदतनय, नाथभुजंग, एकनाथ, शिवराम पूर्ण, गणेशनाथ यांची पुष्कळ स्फुट रचना. जयदेवकृत गीतगोविंद शंकराचार्यकृत काळभैरव अष्टक, शिवाष्टक, सुदामचरित्र, गोसावीनंदनकृत त्रिंबकाची आरती गुरुपुराणांतर्गत नामावली, बाळक्रीडा इ. रचना.

१२६६ क्र. ११ **बाड**

पृ. १०२ × २ = २०४. यातील प्रथमची व शेवटची पाने नाहीत. समर्थकृत मनाचे श्लोक ५९ ते २००. गुरुभक्त, ज्ञानबोध, मोक्षवर्म असे ६०० श्लोक.

१२६७ ग्र. क्र. १२ **रुक्मिणी स्वयंवर** एकनाथ

पृ. १६५ × २ = ३३०. यातील पाने विस्कळित. एकनाथकृत रचनेचा भाग.

१२६८ क्र. १३ **निगमसार** वामन

पृ. ७७ × २ = १५४. प्रथम व शेवटची पाने गहाळ. अक्षर रेखीव व सारखे. दुर्दशा झालेली पोथी. वामनकृत रचना.

१२६९ क्र. १४ **श्री श्लोक मनाचे** रामदास

पृ. ३३ × २ = ६६. त्रु. भिजून कागद जीर्ण. समर्थांच्या रचनेचा भाग.

१२७० क्र. १५ **बाड**

पृ. ५६ × २ = ११२. या बाडात समर्थ रामदास, उद्धव चिद्घन, रंगनाथ, केशव, श्रीधर, अमृत, तुकाराम, विष्णुदास, नामा, एकनाथ, ज्ञानेश्वर, मध्वमुनेश्वर-नामदेव, गिरधर प्रभू, शिवदिन केसरी, दतात्मज, त्रिंबक, गोसावी नंदन, जयरामात्मज आनंदतनय नाममुद्रा असलेली बरीच रचना आहे.

१२७१ क्र. १६ **बाड**

पृ. ४०० × २ = ८००. या संपूर्ण बाडात मुक्तेश्वरकृत सभापर्व, आदिपर्व यांचे संकलन आहे. शेवटी :

।। हे पुस्तकाची समाप्ती। पार्थिवनाम संवत्सर आति सके सोळासे हे सत्याऐशि जाणिजे।। १६८७।। मास तो माघे वदी।। प्रतिपदा शनीवासरे।।

१२७२ क्र. १७ **बाड**

उसवलेले बाड पृ. ७८ × २ = १५६. समर्थांच्या लघुकाव्यांचा संग्रह यात आहे. ३०-४० पाने वाचता न येण्यासारखी स्थिती. निलंगा मठाचे आणप्पाचे हस्ताक्षर.

१२७३ क्र. १ **गुरुगीता**

आ. १५ × २२. त्रु. प्र. प्रा. ओ. १०. अक्षर मोठे. अक्षरवाटिका प्राचीन. काळी गडद शाई. अ. १७ ते २२. कागद जीर्ण. शेवटी शिवरामार्पणमस्तु असे वर्णन. सांप्रदायिक प्रत. वरील पानावर मोठ्या अक्षरांत ।। गुरू सिवराम।। असे लिहिलेले. प्रतलेखक व काल अज्ञात. भाष्यकार अज्ञात.

१२७४ क्र. २ **जीवनमुक्ती**

आ. २७ × ३० = ८४० प्र. पा. ओ. १३. अक्षर मोठे. टीका भाष्य. अंतवार सदाशिव पेठ संगारेड्डींची प्रत. कागद जीर्ण. (प्र. ग्रं. पा. मि. ना.)

के. शिवराम दीक्षित संग्रह, जहिराबाद.

१२७५ क्र. ३ **पूर्णानंद चरित्र**

आ. ३२ × २२ सें. प्र. पा. ओ. १३. अ. १८. प्रथमच्या १७ ओव्या गहाळ, पण ती अन्यत्र टिपून पूर्ण केलेली प्रत. अक्षर साधारण. प्रथमच्या पानामागे काही नोंदी. वैकुंठस्वामीनंतर केशवराज व सहजानंद दिगंबर ही अर्वाचीन परंपरेची नावे दिली आहेत. कागद जाड. ही प्रत पूजेमध्ये असून, देव्हाऱ्यात मोठ्या पादुकांवर ठेवलेली पोथी. प्रतलेखक अज्ञात. लेखनकाल दिला नाही.

(शिवराम दीक्षित - जहिराबाद)

१२७६ क्र. ४ **बाड**

विविध कागदाचे बाड एकत्र बांधलेले. यात भक्त रत्नावली. (शके १७०४ दुंदुभीनाम संवत्सर मार्ग।।व।।३) गोविंद राजेश्वराष्टक, गोत्र निर्णय, कर्मविपाक, निर्णयसिंधु (प्रभवनाम, सं. शके १६६५. कुणा नारायण भट्टस्यची ही संकलित सामग्री आहे. बरीच संस्कृत रचना यातून आहे. बऱ्याच वेदसंहिता पण सोबत आहेत.

(शिवराम दीक्षित - जहिराबाद)

कै. भीमराव वकील नाईक संग्रह, जहिराबाद

१२७७ क्र. १ **हस्तामलक टीका** एकनाथ

आ. २२ × १३. सें. प्र. प्रा. ओ. ९.

पृ. ६५ × २. प्रथमचे १ पान गहाळ

शेवटी : सके १७२६, रक्तासीनाम शब्दे उतरायणे शरदरुतौ आशा डै कृष्ण पक्षे एकादसि गुरु वासर ऊनद्दिने इदं ग्रंथ समाप्त।

श्रीरस्तु।। : इदं ग्रंथ बाळासेट सुत यशवंत सेट श्रीकुळवृद्धि श्रीसदासीव सिरुद्धमळग्रामेरहिवासु लेखन झाले। ग्राम. हस्ताक्षर एसवंत दत्तात्रेय वरदे समापारस्तु।। श्रीगुदरस्तु।। श्रोतावस्तु। शुभमस्तु।। श्रीरस्तु।।०।।

१२७८ क्र. २ **श्रीरामतुळसी** शिवराम

आ. १७ × २०. सें. प्र. पा. ओ. ९. अक्षर मोठे - काळी निळी शाई. बांधीव वही. कागद पातळ. शिवरामकृत शके १८६६. पौष शु।। १ बुधवार ता. २४ बहमन सन १३५४ फसली.

१२७९ क्र. ३ **सप्तवशती** जीवनमुक्त

आ. १६ × १४ सें. प्र. पा. ओ. १२. अक्षर साधारण. जाड कागद. गडद काळी शाई. प्र. २७. सं. जीवनमुक्त यांची रचना. ग्रंथ पृ. ४५ × २. समाप्तीनंतर श्लोक व भावार्थ :

हे सप्तविशंती प्रकर्ण जया मिळाले। ते जीव निश्चयपणे स्वसुखी मिळाले। हा निश्चये वदला गुरुराज पाही। या वेगळे आणिक साधन योग्य नाही।।१।। आदिजया आवडी स्वात्मपदी मिळावे। तेणेसदा मनी मानस वळवावे। चैतन्य चिद्रूप मगते असेल याचे। श्लोकाद्वये सूचक त्वा सुधारसाचे।।२।।

एका चौकटीत ।। मि. मा. व. ४ सोमवार विजयनाम संवत्सर १८७५।। त्याखाली मोडी सही. दस्तखत गुंडाचार्य बेरुरकर।।

अक्षर खूप मोठे सुवाच्य. शेवटी ४ संप्रदायांची आवली. ग्रंथाच्या शेवटी "पवाडा" नाथषष्टीचा इ. १७ स्फुटरचना. बांधीव वही. जाड पुठ्ठा. वेष्टन.

१२८० क्र. ४ **भगवती स्तोत्र**

आ. ७ × १८ सें. पृ. ४ × २. जाड पुठ्ठ्याचा कागद. अक्षर खूप मोठे. काळी शाई. यात भगवती स्तोत्र पुष्पांजली रचना. शेवटी श्रीदेवी व्यंकमार्पमस्तु असा उल्लेख. यावरून

रचनाकार माणिक प्रभू संप्रदायाच्या आहे. लेखनकाल व प्रतलेखक अज्ञात.

१२८१ क्र. ५ **एकादशस्कंद** शिवराम

आ. २१ × २२. सें. प्र पा ओ. ९. ३० अ संपूर्ण लेखन व्यवस्थित. शिवरामस्वामींची ही समश्लोकी ठीका आहे. कागद साधारण. काळी शाई.

शेवटी : हुताशनानंद. वगदाळ बेदर यांचे शके १७९९ ईश्वरनाम संवत्सर सालचे पोथीवरून प्रत उतरविली. शके १८५७ युवनाम संवत्सर गंभीरानंद सरस्वती स्वामी यांनी प्रत केली. ही प्रत उत्तरायणे माघमासे कृष्णपक्षे मंदवासरे मुक्काम नारायण खेड येथे पूर्ण केली.

१२८२ क्र. ६ **विवेकसिंधू** मुकुंदराज

आ. १५ × २१. सें. प्र. पा. ओ. १३. कागद जाड. अक्षर मोठे. गडद काळी शाई. लेखनकाल अथवा प्रत लेखक अज्ञात सं.

१२८३ क्र. ७ **सरस्वती अष्टक**

आ. ११ × ७ सें. पृ. ५ × २. अक्षर खूप मोठे. रचना साधीच, पण वेधक. लेखनकाल वा प्रतलेखक नाव नाही.

१२८४ क्र. ८ **निःसंदेह दिवाकर** शिवराम

आ. २२ × १२ सें. प्र. पा. ओ. ७. अक्षर बारीक. पृ. ७ × २. निळी शाई. प्रतलेखक अज्ञात. शिवराम स्वामींच्या वेदांतपर रचनेची प्रत. शेवटी तारीख. २९-१२-५४ फसली. वार असा काल दिलेला.

१२८५ क्र. ९ **बाड**

आ. १७ × १२ सें. अक्षर साधारण. कागद घोटीव. संप्रदायाची विविध रचना. यात मंगलाचरण, गुरुपरंपरा, अभंग संप्रदायी स्फुट पदे. लेखनकाल नाही. प्रतलेखक अज्ञात.

१२८६ क्र. १० **बाड**

आ. १७ × १२ से. जाड कागदाची बांधीव वही. काळी शाई. मलपृष्ठानंतर एका पानावर हे काची भीमराव सीवराम सराफ मु. येरेवेळी जिल्हे चिरगोपे इलाखा पायगा सरकार आस्मात जाही याचे आहे असा मजकूर.

या बाडात तबल्याचे बोल. धृवताल, महताल, रूपक झंपक त्रिफट, अडताळ, एकताळ याचे विवरण; तसेच नायकी कानडा, वसंत भैरव. इ. रचना व पदे. विवेचन. संगीतावरचे महत्त्वाचे बाड. अक्षर नीटनेटके पृ. ८० × २. सुस्थितीत.

१२८७ क्र. ११ **बाड**

आ. १७ × २२ सें. पृ. ७१ × २. अक्षर बारीक प्र. पा. ओ. १७. काळी शाई. यात ज्ञानेश्वरी, ब्रह्मसूत्र यातील वेचे विवेचन - प्रवचन अशा स्वरूपाचे लेखन. प्रतलेखक - कालअज्ञात.

१२८८ क्र. १२ **बाड**

आ. १७ × २२ सें. प्र पा. ओ. १४. अक्षर बारीक. पृ. ६० × २. काही पाने कोरी. यात गणपतीच्या मेळ्यातील पदांचा संग्रह केलेला आहे. कागद पातळ. काल दिला नाही.

१२८९ क्र. १३ **बाड**

आ. १७ × १० सें. उभी वही. पृ. ४० × २. काही भाग पुसट. प्र. पा. ओ. २०. बारीक अक्षर. अत्यंत जीर्ण. यात संगीताच्या रागतालाची माहिती पदासह दिलेली आहे. काही भाग पेन्सिलीने टिपलेला आहे.

१२९० क्र. १४ **बाड**

आ. १२ × १० सें. प्र. प्रा. ओ. १०. जीर्णकागद. यात विविध २८ पदे, ५ श्लोक, २ चामरी पुनः ३ पदे असा संग्रह. पाने विस्कळीत. प्रतलेखक काल अज्ञात.

१२९१ क्र. १५ **गीताचंद्रिका** शिवराम

आ. १७ × १२ सें. पृ. २१ × २. शिवरामस्वामींच्या गद्य गीताटीकेचा भाग. फक्त १ ल्या अध्यायाचा शेवटचा भाग. त्रु. जीर्ण कागद. काळी शाई. प्रथमाध्यायाचा शेवटी :

आंगिरसनामसंवत्सर आषाढ शुद्धमास पंचमी गुरुवार अध्याय समाप्त. शक दिला नाही.

१२९२ क्र. १६ **बाड**

आ. ७×१० से. छोट्या आकाराच्या बाडात पृ. २० × २. प्र. पा. ओ. ८. कागद जाड. अक्षर खूप मोठे. गणपती. गुरू यांच्या वरील रचना आणि शेवटी तुकारामांचे अभंग.

१२९३ क्र. १७ **जीवनमुक्ती**

आ. २३ × ३२ सें. पृ. ४८१. बांधीव वही. पुठ्ठावेष्ठन. प्र. पा. ओ १७ अ. १८ संपूर्ण वेदांतपर रचना. समर्थ संप्रदायाच्या या आत्माराम मठाच्या शिष्याची महत्त्वाची रचना. शेवटी हरि ॐ तत्सदितीश्री मन्महा भारते शत सहस्र संहिता यावच्चशक्य भीष्ट....

शेवटी श्लोक, पद, टीका : श्रीगुरु चरण सन्निधौ गीता लिखितं समाप्त।। श्रीगुरू नाईक रामराव कुलकर्णी बेमलखेडा त्यानंतर काही पानांत–

श्रीगुरुमूळ मंत्राचे करन्यास अंगन्यास
इति श्रुतिवाक्य ब्रह्मास्था अखंड.
श्री पांडुरंग महावाक्य प्रबोध, पद, असून शेवटी
गुरुकृपे केशवी ऐक्य
म्हणेतरी मुळीची नाही
भिन्न पना रे ।।०।।
लेखनकाल व लेखक अज्ञात. सुस्थितीत.

१२९४ क्र. १८ **बक्क प्रभूचरित्र**

आ. १७ × २२ सें. प्र पा. ओ. १७. हिंदी-मराठी रचना. गडद काळी शाई. पृ. २६० × २. अक्षर मोठे. बांधीव वही.

माणिक प्रभू संप्रदायाच्या परंपरेतील चरित्र. यात पूजा व उपासनेतील विविध उपचारांची स्फुट रचना शेवटी दिलेली आहे. माणिक प्रभु संस्थानच्या परंपरेतील शिष्य या आत्माराम मठात होता. त्याचे हे संकलन आहे. चरित्रात बक्क प्रभुदत्त असे नाव आले आहे.

१२९५ ग्रं. क्र. १९ **बक्कप्रभुचरित्र**

अ. १७ × २२ सें. पृ. ३०८ × २ प्र. पा. ओ. १३ हिंदी मराठी रचना. वरील चरित्रापासून ही वेगळी रचना याचा लेखक नागनाथ महाराज करकनळी आहे. अक्षर खूप मोठे आहे. याला प्रस्तावना गणेशशास्त्री धरणीधर परळी वैजनाथ यांनी लिहिलेली आहे. काही पानांवर श्रीकृष्ण रामदास महाराज कोहीर असे नाव लिहिलेले. यात विविध व विपुल संप्रदायपर रचना आहे.

१२९६ क्र. २० **निःसंदेह दिवाकर** शिवराम

आ. १७ × २२ सें. अक्षर मोठे प्र. पा. ओ. ७. लाल चौकटीत लेखन. गडद काळी शाई. ओ. ८८. सं. बांधीव वही. प्रत्येक ओवीस क्रमांक लाल शाईत. प्रतलेखक श्री शंकरराव कुलकर्णी बोराळ मु. बोराळ ता. हुमणाबाद. मिती माघ १।।३ शके १८७६. शेवटी रामदासावरील पदे.

१२९७ **गुरुगीता** **हरिहरभट्ट**

अ. ७ x २३ सें. मी. प्र. प्रा. ओ. ७ ते ९ केशरी रंगाने दोन्ही बाजूस डबल रेषा. मूळ श्लोक जाड. बोरूने काळ्या शाईत. श्लोकाचा गद्य अर्थ मराठीत टाकाने बारीक अक्षरात. पृ. ५० २. मुखपृष्ठ व मलपृष्ठ केशरी रंगात. आरंभ करण्यास व हृदयन्यास श्लोक. ग्रंथारंभी श्रीगुरुस्तवन. १२३ श्लोकापर्यंत मराठी अर्थ दिला आहे. त्यानंतर १२४ ते १८३ मूळ केवळ संस्कृत श्लोक दिले आहेत. आरंभी पहिल्या श्लोकाचे विवेचन :

सूत म्हणतात, 'रम्य अशा कैलास पर्वताच्या शिखरावर पार्वतीने भक्ती साधनाचा उपदेश देणाऱ्याचा मुख्य अशा शंकरांना नमस्कार करून पृच्छा केली. (ती पुढील दोन श्लोकांत आहे.)

शेवटी - गुरुगीता समाप्तः। श्रीगुरुदेवतार्पणमस्तु।। श्रेष्ठा श्रेष्ठतराविद्या यत्नेन परिरक्षियेता इदं लेखनं श्रीमद् गुरुदेव देवेश्वर पूर्णानंद (नारायण) शिष्य काश्यपगोत्रीय हरिहर भट्टेन लिखित्वा।। श्रीगुरु देवचयार्पितम।

श्रीमच्छालिहान शंकोत्तमे १५३४ प्रमादीनाम संवत्सरे वैशाख शुभ पौर्णिमित्या लिखित्वा समर्पितम।। इति शिवम।। श्रीक्षेत्र पंढरपूर भीमराजा तटे।। शिवराम स्वामीचे घराण्यात त्या काळी केलेली रचना त्यांच्याच वंशातील माणसाने ग्रंथ लिहिलेला आहे.

(देशपांडे सा. सं. आळंद संग्रह)

१२९८ **पांडवप्रताप** **श्रीधर**

आ. २१ × १६ सें. प्रपाओ. १३ अक्षरवाटिका प्राचीन. गडद काळी शाई अ. ६४ सं. पृ. ७९३ × २ ओ. १३७७२. जाडकागद. कायमचे एक पान गहाळ. ते पुढे कुणीतरी लिहून पूर्ण केले. चौकटीत वर ग्रंथनाम शेवटच्या अध्यायाची पाने डावीकडे कसरीने खराब. प्रतलेखक व काल अज्ञात; संहिता महत्त्वाची.

(श्री. जन्नाथराव कोथळीकर ब्राह्मण गल्ली आळंद)

१२९९ **शिवगीता** आचार्य गणेश

आ. ७ × २३ सें. पृ. ८४ × २ प्र.पा.ओ. १० सं.

काळी शाई. जाड कागद. गणेशकृत ग्रंथ. लेखन काल दुर्मतीनामसंवत्सर शुक्ल सप्तमी रविवार भौमवासरे शके ११८३ (इ.स. १२६१) ७३८ वर्षापूर्वीचा ग्रंथ. दासबोधात समर्थांनी शिवगीतेचा उल्लेख केलेला आढळतो. वेदांतपर रचना.

(प्रा. केशवराव महागावकर खालची आळी ब्रह्मपूर गुलबर्गा.)

१३०० दासविजय

(के.ग्र.अ.नों.पा.) त्रु. केवळ १३.१४.२६ प्रकरण उपलब्ध. शिवाजीचे आणि समर्थ संवादात्मक ग्रंथ. शिवाजी राजे विरक्त बनून संन्यास ग्रहण करण्यास सिद्ध तेव्हा समर्थांनी उपदेश केला की, रानावनात जाऊन तप करण्यापेक्षा हिंदवी स्वराज्य वाचवावे. अनेक स्थळांची आणि विविध शिष्यांची माहिती यात आहे. महत्त्वाची रचना.

एका अध्यायाचा प्रथमचा भागः

श्री गणेशाय नमः। जपतपवृते अनुष्ठान। यज्ञ याग आणि ज्ञान। सत्कर्म आणि तीर्थटण। हे कामानिक साधने रजोगुणी।।१।। निष्कामे करिता लाभे भक्ति। सकामे तयीजे फलश्रुति। परिभक्तिविण श्री हरिची प्राप्ती नव्हे निश्चिती सर्वथा।।२।। सदभाव ही उपजे हृदयी। करिनाम स्मरण मनात। तेणे नाही दुरित चित्त। शुत्धी होतसे अनायसे।।३।। मागिले अध्याइचेरित्र दीना कल्याण स्वामीचे आख्यान। आणि विहिरित उपदेसिला ब्राह्मण संसार बंधन तो।।७।।

कवीचे नाव व काल अज्ञात.

(श्री. चंद्रकांत कुसनूरकर, बेळगाव.)

१३०१ गुरुचरित्र सरस्वती गंगाधर

आ. ३२ × १८ सें. प्र.पा. ओ. १० अक्षर वाटिका जुनी. अ. ५०. शेवटचा अध्याय ५१ गहाळ त्यामुळे शक १ प्रतलेखक नाम अज्ञात.

गाणगापूर नृसिंह सरस्वती निजशिष्य नंदीनाम वंशात जोपासलेली प्रत. वाडी येथे होती. प्रत्येक चरणास लाल दंड व प्रथमची ओवी लाल शाईत गडद काळी शाई, कागद जाड, पण कडा जीर्ण अ. १ ओ. १ मध्ये स्पष्ट विष्णुनामांकित नाव आले आहे. या वंशातच वाडीचे गोपाळस्वामी झाले व त्यांच्या हस्ताक्षरातील प्रत मानतात. शेवटचे उपलब्ध पान अर्धे डावीकडे फाटलेले. वरील दर्शनी पृष्ठावर लाल रंगाची सजावट व मध्यभागी "अथगुरुचरित्र प्रारंभ।।" असे शीर्षक. ही महत्त्वाची प्रत. गुरुचरित्र मूळ जानकभट्ट यांनी केलेल्या प्रतीची प्रत. ते ही या वंशातीलच आहेत.

(बालस्वामी नदिनाम वंशजाकडे कौलगा, ता. आळंद.)

१३०२ एकादशपंचक

(कें.गं.अ.नों.पा.) या ग्रंथात एकूण ११ प्रकरणातून विषयाचे विवेचन. प्रत्येक प्रकरणास ५ अध्याय. एकूण ५५ अध्याय. यातील विषय अवतार पंचक, कृपापंचक, तपश्चर्यापंचक, यात्रावळी पंचक, प्रबोधपंचक. क्षेत्रपंचक असे आहेत. यातील केवळ ५ प्रकरणे उपलब्ध. कथा कल्पतरू असे पण नाव. सिद्धोघृते गुरुचरित्रामृते साक्षात अवलोकन नाम असा उल्लेख अध्यायाच्या शेवटी. हे सिद्धानी दाखविलेले गुरुचरित्र मानतात. यावरून कथाकल्पतरू व आजचे या दोन्ही रचना भिन्न ठरतात. या विषयाच्या संशोधनास ही महत्त्वाची रचना. नंदीनाम वंशजाची जपून ठेवण्यास दिलेली रचना परत त्या घराण्यास त्रुटित रूपाने आज उपलब्ध. गोपालस्वामी या वंशातीलच. त्यांनी वाडीस संजीवनी समाधी घेतली. या स्वामीनी शेवटचा चातुर्मास पंढरपुरी केला व ती व्यवस्था खुद्द अहिल्याबाई होळकर यांनी केली. याचा उल्लेख वंशजाकडे आहे.

(बालस्वामी संग्रह कौलंगा नदिंनाम घराणे) ता. आळंद.

१३०३ श्रीकल्लेश्वर टिपण

पा. २ × २ जीर्ण झालेला कागद. मोडी लिपीतून. नरहरी कवीच्या गावी. हिप्परगा येथील कल्लेश्वर देवालय, त्या देवस्थानातील अर्चनेबद्दलची नोंद. इतिहास दृष्टीने गाणगापूर नृसिंह सरस्वती दत्तमहाराज परंपरेतील महत्त्वाचा पुरावा.

(बालस्वामी संग्रह.)

परिशिष्ट

(१) अनुपलब्ध

(अ) नाथांचे पणतू शिवराम स्वामी
यांची रचना : गुलबर्गा.
बिदर परिसर

(१) कपिलगीता, (२) विरहगीता, (३) संतलक्षण, (४) बिल्वपत्री, यात १०८ श्लोक बिल्वपत्राने शिवपूजा, (५) गर्भगीता, (६) कृत्यंकूर, (७) विद्यामृत, (८) कालयवन, (९) कथाकामधेनू ६४ अध्याय, प्रत्येक चार स्तनधारा ६४ x ४ = २५६ अध्याय, (१०) मुद्रिका, (११) अद्वैत, (१२) वेणूगीत, (१३) गृहनिंदा, (१४) द्रव्यनिंदा, (१५) स्त्रीनिंदा, (१६) लिंगदेह, (१७) वैराग्य, (१८) शिवामृत, (१९) उदबोधदीपिका, (२०) बाह्य विषय निंदा, (२१) मनोनिग्रह, (२२) दृक्दृश्य, (२३) लघुगीता, (२४) पुत्रनिंदा, (२५) पुनःपंचीकरण, (२६) ब्रह्मवाक्यवृत्तीटीका, (२७) सोपान पंचक, (२८) गुरू प्रशंसा, (२९) पादुकाष्टक

(आ) श्री चिदंबर शिष्य राजारामबुवा यांची रचना
दोडुवाड, जि. बेळगाव, परिसर

(१) ब्रह्मानुभव, (२) महानुभाव ज्ञानगर्भ, (३) ब्रह्मानंदलहरी, (४) अद्वैतसार, (५) पंचपदी, (६) बाळक्रीडा, (७) सदगुरुउपदेश, (८) गुरुपदेश, (९) गुरुगम्यठेव, (१०) करुणासागर.

(इ) श्री राघव चैतन्य यांचे ग्रंथ, आळंद परिसर

(१) ब्रह्मस्वरूप, (२) मायाविचार, (३) ईशस्तवन, (४) योगनिद्रा, (५) सनातन धर्म विचार, (६) बुद्धिविकास, (७) इंद्रियदमन, (८) त्रिगुणलीला, (९) निराकारमन, (१०) जितेपणी मरण.

(ई) श्री केशव चैतन्य यांचे ग्रंथ मान्यहाळ, गुलबर्गा परिसर

(१) भक्तिप्रकाश, (२) वैकुंठपद, (३) वासनामयदेह, (४) गीताभागवतसार, (५) परमार्थ विचार.

(३) मृत्युंजयकृत ग्रंथ कल्याणी, बिदर गुलबर्गा भाग.

(१) स्वरूपसमाधान, (२) प्रकाशबोध, (३) अमृतानुभव, (४) अद्वैतप्रकाश, (५) जार्णोद्धारण.

(२)

विविध मठ, मंदिरे व वैयक्तिक संग्रह यात हस्तलिखित संस्कृत ग्रंथ विपुलतेने आहेत. त्या स्थानांचा नामनिर्देश :

(१) वासुदेव महाराज मठ, आळंद (गुलबर्गा)
(२) शंकर नरहर सुभेदार (गुलबर्गा)
(३) गोविंदाज महाराज मठ महागाव (गुलबर्गा)
(४) शिवराम समर्थ मठ, अपचंद ता. आळंद
(५) शिवराज कुलकर्णी हिप्परगा ता. जेवरगी (गुलबर्गा)
(६) श्री माणिक प्रभू संस्थान माणिकनगर (बिदर)
(७) वे. मोहन भट्ट जोशी ब्रह्मपूर, गुलबर्गा
(८) माणिकराव होदलूरकर आळंद, गुलबर्गा
(९) वे. नारायण रामभट ग्रामजोशी, आळंद
(१०) नानचंद अमीचंद शहा, जैन, गल्ली, आळंद
(११) वे. भालचंद्र दीक्षित हळीखेड, बी (बिदर)

(१२) सदानंद मठ कल्याणी, बसवकल्याण (बिदर)
(१३) वे. रमाकांत दादा दीक्षित, चौबारा (बिदर)
(१४) वे. राजमणी दीक्षित, चौबारा (बिदर)

(३)

आंध्र प्रदेश साहित्य परिषद हैद्राबाद येथे नेलेले या परिसरातील ग्रंथ. यात बहुतेक शिवरामरचना आहे. कल्याणी बिदर भागातील ग्रंथ. तेथील ग्रंथक्रमांक. ९५, १२१, १४०, १४१, १४२, १४३, १४६, १७९, १०, १८१, १८८, १९९, २०१.

(४)

समर्थ वाग्देवता मंदिर धुळे येथील संग्रहात बिदर गुलबर्गा कल्याणी परिसरातील नेलेले ग्रंथ. तेथील संस्थेतील ग्रंथक्रमांक १९७, ५४९, ५५०, ५५४, ५६९, ६०८, ६१६, ६१७, ६७९, ६८१, ६८२, ६८८, ७५९, ७६३, ७७८, ७८४, ७९३, ९७७, ९७९, ९८५, १०२७, १०३१, ११०७, ११४७, ११५१, ११५२, ११५८, ११६१, ११६२, ११६६, ११७४, ११९४, ११९८, १२००, १२०१, १२०४, १२०५, १२०९, १२१३, १२२४, १२५०, १२५१, १२५४, १३१२, १४७७, १४९७, १४९८, १५०६, १५०८, १५१०, १५१२, १५१४, १५४४, १५४५, १५४९, १५६७, १५८५, १६३३, १७३५, १७४२, १७६०, १७६१, १८०९, १८४६. ११६, १८४, १९२, २४२, २५०, ३२८, ३७२, ४१२, ४६३, २२३, २३६, ४६३, १०२४, १०५०, १०५८, १०६०, १०६९, १०८१, १०९२, ११२६, ११४२, १२७२, १६६८.

(५) ग्रंथाच्या प्रती करण्याकरिता महागाव मठातून अभ्यासकांनी नेलेले ग्रंथ. एकूण १५ वेचक ग्रंथ.

(१) वारदनागेश (२) नागेशलीलामृत (३) अध्यात्म रामायण (४) एकादशस्कंध इ. हस्तलिखिते. (नोंद करताना टिपलेली यादी गवसली नाही.)

(६) या सूचीमध्ये 'के. ग्रं. अ.नों. पा.' असे नमूद करून टिपणाधारे विवेचन केलेले ग्रंथ बिदर, गुलबर्गा परिसरातील संतकवींचे आहेत. त्यांतील काही ग्रंथ स.वा.मं. धुळे येथील संग्रहातपण आहेत. त्यांचा तेथील ग्रंथ क्रमांक
९९८ ते १०११ कल्याणी परिसरातील
१०१२ ते १०२६ बिदर येथील
१०२७ ते ११५६ बिदर परिसरातील विविध मठांतील संग्रह व गुलबर्गा भागातील काही मठांतील ग्रंथ.

(५) कालगणना हस्तलिखितात शक, संवत्सर, विक्रमशक, फसली सन, हिजरीसन असा निर्देश आहे. निजाम राजवटीत फसली सन रूढ होता. अभ्यासकांना स्थूल मानाने जाणण्याकरिता ते कोष्टक येथे देत आहे.

(१) शकाच्या संख्येत ७८ मिसळण्यास इ. स. येतो.
(२) फसली सनात ५९० मिसळल्यास इ. स. येतो.
(३) फसली सनात १० मिसळल्यास हिजरी इ. स. येतो.
(४) शकामध्ये ३४ मिसळण्यास विक्रम साल येतो.

सूचीतील मोडी लिपीतील ग्रंथ

४, १३, ५४, ६३, ६५, ७३, ८७, ८८, १०६, १०७, १०८, १३८, १४४, २५३, २५४, २५५, २५८, २६३, २६५, २६६, २६७, २६८, २६९, २७०, २७१, २७२, २७५, २७६, २७७, २७८, २७९, २८०, २८२, ६१२, ६१३, ६४४

मराठी कन्नड लिपीत

६५५, ६५६, ६५७, ६५८, ६५९, ७६४, ७७०, ७७१

कन्नड ग्रंथ मराठी लिपीतून

५४, ९९, १५७, १५६, ६१०, ६२३, ६२८, ६३२, ६४२, ६५४, ८९१

■

सूचीची सूची

(१) ग्रंथनामसूची

(ग्रंथनाम आणि वर्णनात्मक सूचीतील क्रमांक या क्रमाने)

(च)

(ज)

(त)

(द)

(ध)

(न)

(प)

(भ)

(म)

(य)

(र)

(ल)

(व)

ग्रंथकार सूची

कर्नाटकातील मराठी हस्तलिखिते

"या परिसरातला समाज सांस्कृतिक जीवनाच्या सर्वांगांची बूज राखणारा होता. संस्कृत विद्या, धर्मशास्त्र, कर्मकांड, शास्त्रग्रंथ यांच्या बरोबरीनेच निरनिराळे संप्रदाय या परिसरात वाढले आहेत. सर्वसमावेशकता हा समाजधर्म बनलेला असल्याने या संप्रदायांचे परस्पर संघर्ष न येता त्यांचा समन्वय झालेला आहे. समाजातल्या सर्व घटकांना त्यामुळे सांस्कृतिक उत्थानाच्या कार्यात स्थान मिळाले आहे... सामान्य जनतेची भाषा कन्नड असली, तरी संस्कृतीचे वहन करणारी भाषा मराठी असल्याने मराठी साहित्य आणि समाजजीवन यांतील सर्व परंपरा या परिसराने नुसत्याच जपल्या नाहीत, तर वाढविल्या आहेत. चैतन्य, आनंद, नागेश आदि सांप्रदाय वारकरी संप्रदायास पूरक होतील, अशा स्वरुपात वाढले आहेत. सर्वच सांप्रदायिक संतांनी सामान्यांसाठी रचलेली पदे, आरत्या इत्यादि साहित्य जवळपास असांप्रदायिक असून भक्तिमार्गाचा आणि अद्वैत वेदांताचा पुरस्कार करणारी आहेत. या बाबतीत शिवरामस्वामींचे उदाहरण आदर्श म्हणून देता येईल. संगीत हे लोकप्रबोधनाचे प्रभावी साधन असल्याने त्यांनी हेतुपूर्वक रागदारीत रचना केलेल्या आहेत. संत माणिक प्रभूंपर्यंत ही परंपरा चालत आलेली आहे.

अनेक भाषांतून रचना हे या परिसरातील साधुसंतांच्या रचनांचे वैशिष्ट्य. संतचरित्रात्मक रचनांचे वैपुल्य एका अंगाने संस्कृतिरक्षणाचे कार्य करणारे आहे, तर दुसऱ्या अंगाने जैन साहित्यातील चरित्र वाङ्मयाच्या महतीचाही तो प्रभाव असू शकेल. गुरुचरित्रांची अनेक हस्तलिखिते आणि त्याच्या खालोखाल मल्हारीविषयक अनेक रचना हे गाणगापूर आणि मैलार या स्थानांच्या प्रभावाचे निदर्शक आहे. मराठीतील आयुर्वेदशास्त्रावरील पहिला ग्रंथ या भागात उपलब्ध झाला. जैन संप्रदायातील हस्तलिखितांचा स्वतंत्रपणे अभ्यास झाला पाहिजे. या परिसरातील सांस्कृतिक जीवनाचा परिपोष मराठी भाषेच्या माध्यमातून होत असे, हे या सूचीचे महत्त्वाचे फलित आहे."

– डॉ. श्री. रं. कुलकर्णी.

राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय,
३ महानगरपालिका मार्ग, धोबी तलाव,
मुंबई - ४०० ००१.